# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

७६५२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ८४०

## खंड १ ला

REFBK-0007779

चांगदेव भवानराव खैरमोडे

स्वतंत्र भारताचे घटनाकार

# डॉ० भीमराव रामजी आंबेडकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ७७७९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

खंड पहिला

१४ एप्रिल १९५२

REFBK-0007779

: चांगदेव भवानराव खैरमोडे :

प्र का श क :
श्री. यशवंतराव भीमराव आंबेडकर
भारत भूषण प्रिंटिंग प्रेस
गोकुळदास पास्ता रोड, दादर, मुं. १४

या आवृत्तीच्या विक्रीचे हक्क प्रकाशकांकडे

इतर सर्व हक्क सौ. द्वारका खैरमोडे
लक्ष्मी व्हिला, १४७ अ, हिंदु कॉलनी
मुंबई, १४, यांचे स्वाधीन

किंमत रुपये पांच
पोस्टानें पांच रुपये दहा आणे

मुद्रक :
श्री. गणेश बाळकृष्ण नेवाळकर
अत्रे प्रिंटिंग प्रेस
३६२, वि. प. रोड, गिरगांव, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23६५९ वि: ५९
क्रमांक ५२० नों: दि: ३।७।५५

अस्पृश्य समाजाच्या आईसाहेब
प्रा तः स्म र णी या
रमाबाई भीमराव आंबेडकर
यांच्या चरणीं अर्पण

**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | कुलवृत्तांत | १—७ |
| २ | वडील व आई | ८—१५ |
| ३ | जन्म | १६–२२ |
| ४ | बाल्यावस्था | २३–३३ |
| ५ | विद्यार्थी-सातारा | ३५–४७ |
| ६ | विद्यार्थी—मुंबई | ४९–६० |
| ७ | कोलंबिया युनिव्हर्सिटींत | ६१–७६ |
| ८ | लंडन युनिव्हर्सिटींत | ७७–८३ |
| ९ | व्यवहारी जगांत | ८४–९० |
| १० | प्रोफेसर | ९१–९८ |
| ११–१७ | सिंहावलोकन | ९९–२५८ |
| १८ | पुनः लंडन युनिव्हर्सिटींत | २५८–२७७ |

# प्रास्ताविक

चरित्रलेखन म्हणजे इतिहासलेखन. इतिहासलेखन म्हणजे सत्यशोधक प्रवृत्तीचें लेखन. चरित्रनायकाच्या अगोदरचा काळ, चळवळी व व्यक्ति; त्याच्या गुणावगुणाला पोषक झालेली परिस्थिति; त्याच्या आसमंतांत वावरलेले भलेबुरे लोक; त्याच्या कार्यांची जडण नि घडण; त्या कार्यांत आलेलीं अरिष्टें व त्यांना धैर्यानें तोंड देऊन आगेकूच करण्याची चरित्रनायकाची धडाडी; त्या कार्याच्या सफलतेंत व विफलतेंत त्याचा भाग, इत्यादि गोष्टींबद्दलचें सत्यकथन चरित्रांत येतें. मी जसा दिसतों अगदीं तसेंच माझें चित्र काढ, असा क्रॉम्वेलनें त्याच्या चित्रकाराला आदेश दिलेला होता, तो डोळ्यापुढें ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें चरित्र लिहावें, अशी माझी फार दिवसांची इच्छा होती. ती सफल करण्याचा योग श्री. यशवंतराव भीमराव आंबेडकर यांनीं जुळवून आणला.

मी बाबासाहेबांचें चरित्र तीन खंडांत लिहित आहे. आंबेडकर कुलाचा वृत्तांत, बाबासाहेबांची विद्यार्थीदशा, हिंदु-समाजाच्या व अस्पृश्य-समाजाच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय चळवळींचा पूर्वेतिहास आणि बाबासाहेबांच्या समाजसेवेचा श्रीगणेशा, इत्यादि मुद्यांसंबंधीं मी चरित्राच्या पहिल्या खंडांत माहिती दिलेली आहे. ही माहिती १९२३ च्या अगोदरच्या काळांतील आहे.

बाबासाहेबांचे पुण्यस्मरण पिताजी रामजी मालोजी आंबेडकर यांच्याबद्दलची माहिती मिलिटरी रेकॉर्डमधून मिळविण्याचा मी प्रयत्न केला. परंतु मिलिटरी रेकॉर्डस सेंटरकडून उत्तर आलें कीं, जुनें रेकॉर्ड अस्तित्वांत नाहीं !

बाबासाहेबांना बडोद्याची स्कॉलरशिप एलिफन्स्टन् कॉलेजांत प्रिव्हियसच्या वर्गापासून मिळत होती, अशी माहिती ५६ पानावर नजरचुकीनें दिलेली आहे. ती स्कॉलरशिप त्यांना ज्युनियर बी. ए. च्या वर्गापासून मिळत होती. आणखी इतर कांहीं चुका वाचकांना या पुस्तकांत आढळून आल्या तर त्या मला कळविण्याची त्यांनीं कृपा करावी.

बाबासाहेब आत्मचरित्र इंग्रजींतून लिहिणार आहेत. त्या ग्रंथांत सर्व मुद्यां-बद्दल आतांपर्यंत अज्ञात असलेली माहिती येईल. तोंपर्यंत माझ्या तुटपुंज्या माहितीवर वाचकांनीं समाधान मानावें, एवढीच त्यांना विनंति आहे.

बाबासाहेबांचे एक नातलग श्री. शिवरामबुवा पालकर व चुलत मामेभाऊ श्री. गोपाळराव महादेव मुरबाडकर यांनीं मला आंबेडकर कुलाचा वृत्तांत सांगितला. अमेरिकेंतील ' कोलंबिया युनिव्हर्सिटी ' आणि ' लंडन स्कूल ऑफ् इकॉनॉमिक्स् अँड पोलिटिकल सायन्स, यांच्या रजिस्ट्रारनीं बाबासाहेबांच्याबद्दलची रेकॉर्डवर असलेली माहिती मला कळविली. सातारा हायस्कूल व एलिफन्स्टन कॉलेज यांच्या

रेकॉर्डवर असलेली माहिती त्या संस्थांच्या अधिकाऱ्यांनीं मला पाठवून दिली. मुंबई व बडोदें ( राजदप्तर ) येथील गव्हर्नमेंट रेकॉर्ड ऑफिसमधील चरित्राला उपयुक्त असे जे कागदपत्र आहेत ते पहाण्याची व त्यांतील माहिती व उतारे पुस्तकांत वापरण्याची मुंबई सरकारनें मला परवानगी दिली, याबद्दल सरकारचे मी आभार मानतों. या पुस्तकाच्या ६६—६७ पानांवर जें इंग्रजी पत्र छापलेलें आहे, तें श्री. वि. शि. जाधव यानीं मला वापरावयास दिलें. पुस्तकाची प्रेसप्रत वरळी भागांतील कांहीं शिक्षकांनीं व मित्रांनीं तयार केली. श्री. य. भी. आंबेडकर, श्री. सहदेव गायकवाड, श्री. व. क. चित्रे, श्री. वि. ग. थत्ते, श्री. भा. मा. उदगांवकर, श्री. वि. कृ. जोशी व श्री. ग. कृ. गोखले यांच्याकडून चरित्राला उपयुक्त अशीं पुस्तकें मला वाचावयास मिळालीं. या उपरिनिर्दिष्ट संस्थांचे व सद्गृहस्थांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. ज्या वर्तमानपत्रांतून, मासिकांतून व पुस्तकांतून मी उतारे घेतलेले आहेत त्यांच्या संपादकांचा, लेखकाचा व प्रकाशकांचा मी फार आभारी आहे. अत्रे प्रिंटिंग प्रेसमधील मित्रांनीं छपाईचें काम आपुलकीनें व लौकर केलें याबद्दल त्यांचा मीं आभारी आहे.

लक्ष्मी व्हिला,<br>
१४७–अ, हिंदु कॉलनी,<br>
मुंबई १४. १४ एप्रिल १९५२

**चां. भ. खैरमोडे**

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
लेख 23554
क्रमांक ... नों. दि.
ग्रंथ संग्रहालय
द्रा. क. ५५५९
ठाणें

# प्रकरण १

## कु ल वृ त्तां त

महाराष्ट्रांत ज्या अस्पृश्य जाती समजल्या जातात त्यांमध्यें महार जात ही प्रमुख आहे. या जातीचा जुना इतिहास काळाच्या ओघांत गडप झालेला आहे. या इतिहासाची जी बारीक सारीक माहिती प्रकाशांत आलेली आहे तीवरून असें दिसून येतें कीं, महार लोक हे महाराष्ट्राचे मूळ रहिवाशी होते. एवढेंच नव्हे तर, ते अत्यंत बुद्धिमान्, सुसंस्कृत आणि पट्टीचे लढवय्ये होते, आणि एके काळीं महाराष्ट्राचे राज्यकर्ते होते.

हिंदुधर्म व हिंदुसमाज यांच्यांतील दुराचार आणि अमानुप चालीरीति नष्ट करून हिंदुधर्म उज्वल करावा व हिंदुसमाज बळकट करावा, या उच्च ध्येयानें प्रेरित होऊन ज्या हिंदु विद्वानांनीं आपल्या लेखनाच्या द्वारें गेल्या शतकांत जोराची चळवळ केली त्यांत श्री. राजाराम रामकृष्ण भागवत ऊर्फ राजारामशास्त्री भागवत ( १८५१ तें १९०८ ) हे प्रमुख होते. "प्राक्शालिवाहन काळांतील वसाहती" ( कै. राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक लेख, पा. ९०–९५ ) हा एक लेख त्यांनीं लिहिलेला होता, त्यांत त्यांनीं खालील उल्लेख केलेला आहे :

"( १ ) महार हे अति पुरातन कालचे अस्सल देशी लोक. यासंबंधानें शंका नको. महारांची बोली शुद्ध व असंकीर्ण देशी समजावी. जें आमच्या भाषेचें रूप आजमितीस त्यांनीं राखून ठेवलें आहे तें आमच्या भाषेच आजमितीचें अतिशय शुद्ध रूप समजावें. महारांचा वाचक–शब्द संस्कृतांत नाहीं. चांडाळ व श्वपच किंवा श्वापक हे दोन शब्द अलिकडेच संस्कृतांत या जातीस लावण्यांत येतात. मनूनें संकीर्ण जातींचे वाचक म्हणून जे शब्द योजिले आहेत ते आपल्या विशिष्ट मुलुखाचे व त्यांतील लोकांचे वाचक होत. मगध, वैदेहक, अंम्बष्ठ, निशाद किंवा पारशव, आवत्य,

द्रवीड वगैरे शद्ब मूळचे त्या त्या मुलुखाचे वाचक होत. चांडाळ शद्ब मूळचा चांदाल किंवा चंदेल असून त्याचा चेदी देशाबरोबर संबंध नसेल ना ? चेदि देश नर्मदेवर असल्यामुळें तो ब्राह्मणांच्या आद्यस्थानास लागू होतो. श्वापक किंवा श्वपच शद्बांचा अर्थ "कुत्रेखाऊ" होतो. आमचे महार कुत्रेखाऊ नव्हत; याविषयीं शंका नको. कुत्रेखाऊ लोक आसाम वगैरे बंगालच्या पूर्वेस जे प्रांत आहेत त्यांत आढळतात. हे शब्द पूर्वी नर्मदेवरील गोंडमंडळांतील किंवा आसामप्रांतांतील तद्देशीय लोकांचे वाचक असून अति निकृष्ट जातीस तिकडेस लाविण्यांत येत होते, ते तसेंच पुढें ब्राह्मणी-धर्माचा प्रसार आमच्या प्रदेशांत झाला तेव्हां, आमच्या मंडळांतील अति निकृष्ट जातीस लावण्यांत येऊं लागले, असें अनुमान निघतें."

"महारांचें राष्ट्र म्हणजेच महाराष्ट्र" असें विधान करणारे पहिले विद्वान ब्राह्मण गृहस्थ राजारामशास्त्री भागवत होत. नाग लोक म्हणजेच महार लोक होत, असेंही त्यांचें मत होतें. भागवतांच्या या मतांना उचलून धरणारे दोन पंडित ब्राह्मण गृहस्थ पुढें निघाले. ते म्हणजे इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे आणि ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर हे होत. त्यांच्या पुढील काळांतहि या मतांचा अनुवाद करणारे कांहीं विद्वान गृहस्थ निघाले.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रविशारद व हिंदुस्थानांतील एक अव्वल दर्जाचे संशोधक-लेखक प. वा. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं आपल्या "प्राचीन महाराष्ट्र" या ग्रंथांत हेंच मत स्पष्ट स्पष्टीकरणें देऊन प्रदर्शित केलेलें आहे. द्रविड-वंशीय लोक आणि आर्य-वंशीय लोक यांचा परस्पर मिलाफ भारतीय (कौरव-पांडव) कुरुयुद्ध झालें त्याच्या अगोदरच्या काळांत झालेला होता असें डॉ. केतकर म्हणतात. (प्राचीन महाराष्ट्र, विभाग परिचय, पा. १). त्यांचें असेंहि मत आहे कीं, भारतीय युद्धाच्या अगोदर महाराष्ट्रांत भोज (भोई), कोळी, महार, रठ्ठ, मान्य, इत्यादि ज्या अनेक टोळ्यांचे लोक रहात असत, त्यांत महार आणि रठ्ठ टोळ्यांतील लोक प्रमुख होते. ते संख्येनें इतरांपेक्षां प्रबल व राज्यकर्ते होते. महार ही टोळी मूळ रहिवाशी, रठ्ठ ही महाराष्ट्रांत नंतर येऊन राहिलेली टोळी होय. महाराष्ट्र हा शब्द व मराठी भाषा या दोन्ही गोष्टी महार व रठ्ठ वंशाच्या मिलाफानें झालेल्या आहेत. या दोन्ही टोळ्या परस्परांत लढल्या व त्यांच्यांत पुढें समझोता झाला. त्यांच्या एकीकरणामुळें आज जें महाराष्ट्र नांव आहे तें भारतीय युद्धाच्या अगोदर (इ. स. पूर्वी १५०० ते ८००) कित्येक वर्षांपासून होतें. त्यांचें एकीकरण संपूर्ण होण्यापूर्वीच महाराष्ट्रावर यादवांच्या व जरासंधाच्या असुरांच्या स्वाऱ्या झाल्या व यादवांनीं महाराष्ट्र पादाक्रांत केल्यानंतर त्यांनीं महार व रठ्ठ यांच्यांत होत असलेला मिलाफ नष्ट केला व या दोन टोळ्या परस्परांपासून दूर ठेवल्या. यामुळें महाराष्ट्र हें नांव कांहीं शतकें व्यवहारांत वापरलें गेलें नाहीं. हेंच डॉ. केतकरांच्या शद्बांत सांगावयाचें तर असें :

"१५. महार आणि रठ्ठ यांचें एकराष्ट्रीयीकरण ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकांत.

"महार व रठ्ठ यांची देशभर मारामारी होऊन एक राष्ट्र होण्याची क्रिया अश्मकांचें राज्य चालू असतां घडणें शक्य नाहीं; तर अश्मक राज्य सुरूं होण्यापूर्वींच महारांच्या देशांत रठ्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनलें असावें आणि त्यांच्या संयुक्त जनतेंत अश्मक राजकुल उत्पन्न झालें असावें, असाच इतिहास असावा असें दिसतें. म्हणजे महाराष्ट्राच्या वैशिष्टयास—महार आणि रट्ठ यांच्या एकीकरणास— आरंभ कुरुयुद्धापूर्वींच झाला असला पाहिजे आणि कुरुयुद्धाच्या कवींनीं महाराष्ट्र हा शब्द न वापरतां अश्मक राज्य, कुंतल राज्य, असे शब्द जरी वापरले असले तरी महार आणि रठ्ठ या दोहोंचें एकीकरण कुरुयुद्धाच्या अगोदर होत होतें, हे असिद्ध होत नाहीं.

"१६. भोजांचें महार व रठ्ठ यांशीं पौर्वापर्य

"महार व रठ्ठ यांचें एकीकरण कुरुयुद्धाच्या पूर्वींच झालें असल्यास भोई, महार आणि रठ्ठ यांच्या आगमनामध्यें पौर्वापर्य कोणाचें याविषयीं विचार करतां आम्हांस वृत्तानुक्रम पुढीलप्रमाणें असावा असें वाटलें :

"(१) अत्यंत प्राचीनकालीन आगमन भोजांचें असावें. आणि अखिल महाराष्ट्र आणि कर्नाटक यांत त्यांचा प्रसार झाला असावा. (२) महार हे शकवंशीय म्हणजे ज्यांची भाषा मूळची आर्यन्, पण ज्यांवर असुर धर्माचा संस्कार झाला आहे असे लोक असावेत आणि त्यांचा प्रसार सर्व महाराष्ट्रभर कुरुयुद्धपूर्वकालीं झाला असावा. महारांच्याशिवाय जी जात प्रसरण पावली असावी ती जात रठ्ठांची होय. हस्तिनापुरांतील रठ्ठपाल, पंजाबांतील आरठ्ठ, सौराष्ट्रांतील सूररठ्ठ, भोरचमधील भरुरठ्ठ, हीं देश-नांवें रठ्ठांच्याच प्रसाराचीं द्योतक आहेत. आजचे कुणबी म्हणविणारे लोक बहुतकरून त्या रठ्ठांचेंच अपरनाम कुणबी किंवा कणबी असावे, आणि कुटुंबी हें त्यांचें संस्कृतीकरण असावें." (पा. १३)

श्री. श्रीपाद महादेव माटे, यांनीं "अस्पृष्टांचा प्रश्न" या पुस्तकांत महारां-संबंधीं खालीलप्रमाणें विचार प्रदर्शित केलेले आहेत :

"महार शब्दाची व्युत्पत्ति कालौघांत नष्ट झाली तरी मह्य हारी (महा आहारी) म्हणजे पुष्कळ खाणारे यावरून महार शब्द बनला असावा असेंच बहुतेकांचें म्हणणें पडतें.

"मनूच्या विभागणीप्रमाणें चातुर्वर्णांतील शेवटचा जो शूद्र समाज त्याच्यापेक्षाहि हलक्या दर्जाचे जे लोक ते अतिशूद्र होत. हेच लोक येथील मूळचे रहिवासी असावेत, असें त्यांच्या नांवावरून सूचित होतें. थोरल्या घरचे म्हणजे थोर कुळांत जन्मलेले हें नांव हेटाळणी करण्याच्या उद्देशानें असावें ! कारण वरील तीनहि नांवें झिडकारण्याच्या बुद्धीनेंच उच्चवर्णीयांकडून महारांना दिलीं गेलीं आहेत.

भूमिपुत्र किंवा धरणीचे पूत म्हणजे पृथ्वीपुत्र या नांवावरूनहि यांचें मूळचें वसतिस्थान कोणतें हें ध्वनित होतें." (पा. ३२)

"महार हे (इतर अस्पृश्य) जातींपेक्षां जास्त ईर्षावान्, सक्त व मांगांपेक्षां जास्त बुद्धिमान् असतात. फार काय सांगावें, ज्या कुणव्यांच्या आश्रयानें ते आपली उपजीविका करतात त्यांच्यापेक्षांहि जास्त सशक्त, जाणिक आणि बुद्धिमान असतात, असें पुष्कळांचें मत आहे. आणि नव्या मनूप्रमाणें त्यांच्या मनबुद्धीच्या विकासाला जागा मिळत गेली तर ते हिंदु समाजाच्या बलिष्ठ वर्गांपैकीं एक होऊन बसतील यांत कांहीं शंका वाटत नाहीं. गांवगाड्यांत त्यांचा प्रवेश नेमका कोणच्या कालमानांत झाला हें सांगवत नाहीं. तरी तो फार प्राचीन काळीं झाला असावा व शूद्रांनीं त्यांच्याशीं आपलें नातें याच मुद्यावर कायम केलें असावें, इतकें ठाम म्हणतां येतें, हें मागें सांगितलेंच आहे. थोरल्या घरचें, भूमिपुत्र हीं नांवें महारांना कुच्छेनें दिलीं आहेत असें वाटत नाहीं. ते खरोखरच थोरल्या घरचे म्हणजे कुणब्याच्या आधींचे होते. भूमिपुत्र हा शब्द तर स्पष्ट ऐतिहासिक व्यंजनेचा आहे. "Son of the soil" हा जो इंग्रजी शब्दप्रयोग तो त्यांच्याशीं किती उत्तम जमतो तो पहा. या भूमीचा तोच पुत्र होय. महाराष्ट्रभूमीची औरस संतति हीच होय. या भूमीला नवें नांव जेव्हां मिळालें तेव्हांचे राजे व तेव्हांची समाजस्थिति यांची हकिगत कळावयास हवी. म्हणजे हा भूमिपुत्र मागें पडून त्याचा कोणी व कसकसा फायदा घेतला, याचा बोध होईल. महारांवर कुणब्यांनीं आक्रमण केलें, कुणब्यांवर मराठ्यांनीं आक्रमण केलें, मराठ्यांवर ब्राह्मण, गुजर, मारवाडी यांनीं आक्रमण केलें, अशीं हीं प्रस्तरणें एकावर एक पडलेलीं आहेत." (पा. १९८).

महार जातीनें राज्यें स्थापन केलीं, इतरांचीं राज्यें धुळीला मिळविलीं आणि राज्यवैभवाचे सुखसोहळे भोगले. त्यानंतर गुलामगिरीच्या खातेऱ्यांत आयुष्य घालविलें. या जातीचा इतिहास जितका चित्तवेधक, रोमहर्षक आणि स्फूर्तिदायक आहे तितकाच तो हृदयद्रावक आहे.

फार प्राचीन काळीं महार हे महाराष्ट्राचे राजे होते, याबद्दल अनेक विद्वान् ग्रंथकारांनीं आपले अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. श्री. वामनराव ए. भट हे "The Harijans of Maharashtra" या आपल्या पुस्तकांत लिहितात :

**"The Mahars: An Ancient Nation**

There are many indications to show that the Mahars were an ancient nation or a large community inhabiting and occupying the plains of Maharashtra. Very probably, through conquest, they lost their possessions and have been treated for generations as a subject people." (p. 43).

या मुद्यावर अशाच तऱ्हेचे विचार डॉ. दत्तात्रय पुरुषोत्तम खानापूरकर या समाजशास्त्रज्ञानें प्रदर्शित केलेले आहेत. यांचा "दलित समाज" हा लेख "नवा महाराष्ट्र" या पुस्तकांत (पा. ९९-१२९) छापलेला आहे. त्यांत त्यांनीं असें मत प्रदर्शित केलेलें आहे कीं, अस्पृश्य हे हिंदुस्थानांतील मूळ रहिवासी व आर्यांनीं त्यांना जिंकून गुलाम केलें. आदिवासी हेहि हिंदुस्थानचे मूळचे रहिवासी पण त्यांना आर्य जिंकू शकले नाहींत. आदिवासींनीं आर्यांना शेवटपर्यंत सतावून सोडलें. आर्यांनीं त्यांना धर्मग्रंथांत "दस्यू" असें तिरस्कारानें नांव दिलें तरी आदिवासी आर्यांचे कधींच दास झाले नाहींत. अस्पृश्य लोक आर्यांचे दास झाले म्हणून आर्य लोकांनीं त्यांच्यावर अस्पृश्यतेची छाप मारली. आदिवासी मात्र रानटी जरी राहिले तरी आर्यांनीं त्यांना आपल्यांत मिसळून घेण्यासाठीं स्पृश्य गणलें. तरी पण आदिवासी आर्यांच्या या जाळ्यांत सांपडले नाहींत. त्यांनीं आर्यांच्या देवता व मंदिरें यांना कधींच मान्यता दिली नाहीं, आणि आर्यांच्या पुरोहिताला तर ते कस्पटासमान लेखीत, साधल्यास आदिवासी आर्यांच्या पुरोहिताला (ब्राह्मणाला) पळवून नेत व त्याचा आपल्या देवतेपुढें यथाविधी बळी देत.

डॉ. खानापूरकर यांनीं महारांसंबंधीं जीं मतें प्रदर्शित केलेलीं आहेत तीं अशीं:—

"सर्व अस्पृश्यांत हिंदुसमाजाकडून जास्तींत जास्त हाल व अपमान झाले असतील तर ते महारांचे. पेशवाईच्या वेळेस यांच्यावर गळ्यांत मडकें बांधून फिरण्याची सक्ती होती. व गांवांत जर ब्राह्मण समोर दिसला तर तो यांच्या छायेनें अपवित्र होऊं नये म्हणून यांना जमिनीवर पालथें पडण्याचा हुकूम होता. इतकेंच नव्हे तर जमिनीवर पडलेल्या यांच्या पावलांच्या खुणांनीं ब्राह्मण अपवित्र होऊं नये म्हणून यांना कांटेरी झुडूप स्वतःच्या मागें घेऊन हिंडावें लागे व त्या झुडुपानें आपल्या पावलांचा माग पुसून टाकावा लागे...महारांचीं दुसरीं नांवें अतिशूद्र व भूमिपुत्र. (भूइया हें ओरिसामधील नांव आहे. त्याचा अर्थ पण भूमीचा मुलगा असाच होतो. हें साधर्म्य लक्षांत घेण्याजोगें आहे.) या दोन्ही नांवांवरून ते आदिवासी असावेत व आर्यांनीं त्यांना आपणांत मिसळल्यानंतर कायमचेंच अस्पृश्य बनवलें असावें. एन्थोवनच्या मताप्रमाणें यांच्यांत जे निरनिराळे पन्नास विभाग आहेत ते सर्व आदिवासी जमातींचे भाग असावेत व ते भाग आर्यांच्या आक्रमणानंतर एकत्र होऊन आपणांस महार या नांवानें ओळखूं लागले असावेत. कदाचित् महाराष्ट्र हें नांवही महारांवरून पडलें असण्याचा संभव आहे. आजहि हे आदिवासी जमातींच्या पुढाऱ्यांप्रमाणें आपणास नाक म्हणजे नाईक म्हणवतात. कांहींच्या मतें नाक हा नाग या शब्दाचा अपभ्रंश असून, वेदपुराणांत नाग नांवाचे जे लोक वर्णन केले आहेत ते हेच असावेत." (पा. ११८-१२९.)

" पूना ऑब्झर्वर अँड सिव्हिल अँड मिलिटरी जर्नल " या पत्रांत शुक्रवार ता. १८-१२-१९०३ रोजीं " The Condition of the Mahars " या शीर्षकाखालीं एक अग्रलेख आलेला होता, त्यांतहि हेंच प्रामुख्यानें सांगितलेलें होतें कीं, पददलित दशेंत दिवस काढणारे आजचे महार यांचे पूर्वज एकेकाळीं राज्यकर्ते होते :

" According to Baden-Powell, the term " Maharashtra " is derived from the fact of the Mahar domination of Western India. This may or may not be true but there is sufficent evidence to warrant the conclusion that they were once a people with their own king, their own laws, religion and social customs. In appearance they are able-bodied and muscular, many of them handsome intelligent and quick to assimilate and possessing physical courage. Their women, many of them could have some pretensions to fine features and graceful forms, like the men can turn their hand to anything." (The Life of Shivram Janba Kamble, p. 141. )

ज्या महाराष्ट्र देशाला महारांनीं जन्म दिला व परमवैभवाला चढविलें त्याच महाराष्ट्रांत महारांना कालांतरानें राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक गुलामगिरी पत्करून लाचारीचें जिणें कंठावें लागलें. या गुलामगिरीच्या नरकयातना महाराष्ट्रांतील जर कोणत्या भागांत अत्यंत तीव्रतेनें महारांना भोगाव्या लागत असतील तर त्या कोंकणांत. असें असूनहि कोंकणचे महार वेळ येईल तेव्हां हातांत नांगर धरून व वेसकराची काठी घेऊन आपलें आयुष्य सेवाचाकरींत घालवीत; आणि तशीच वेळ आली तर हातांत नंगी समशेर घेऊन आपल्या महार रक्ताचें दिव्य तेज रणांगणांत प्रगट करीत. अशा तऱ्हेनें जीवन व्यतीत करणाऱ्या एका महार कुटुंबांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला.

रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत आंबावडे हें एक लहान खेडें आहे. त्याच्या सभोंवतीं डोंगरांच्या रांगा पसरलेल्या आहेत. मालोजीराव संकपाल हे तेथील वतनदार महार. त्यांचें वतन आठ आणे होतें तरी वतनाच्या जाळ्यांत त्यांनीं स्वतःला अडकवून घेतलेलें नव्हतें. याचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या घराण्यांतील पूर्वपरंपरेनें चालत आलेला लष्करी पेशा. वतनदार महार हे वतनाला प्रमुख पेशा मानीत असत व इतर उपजीविकेच्या व्यवसायांना दुय्यम पेशा मानीत असत. मालोजीरावांच्या घराण्याची परंपरा याच्या विरुद्ध होती. त्या घराण्यांतील पुरुष लष्करी पेशाला प्रामुख्य देत व वतनदारीला व इतर व्यवसायांना दुय्यम प्रतीचे व्यवसाय म्हणून समजत असत. मोंगल बादशाही, मराठेशाही व पेशवाई यांच्या कारकीर्दींत मालोजींचे पूर्वज लष्करांत नोकरी करीत असत. ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानांत शस्त्रें चालवून राज्यस्थापनेला सुरवात केली तेव्हांहि मालोजीरावांचे पूर्वज कंपनीच्या

लष्करांत नोकरीस राहिले. मालोजीरावानें तारुण्यांत प्रवेश केला तेव्हां कंपनीच्या लष्करांत नोकरी धरली. पूर्वी महारांचीं नांवें जरी देवादिकांचीं अगर वीर पुरुषांचीं असत तरी तीं व्यवहारांत व कागदोपत्रीं वापरलीं जात नसत. त्या नांवांचें भ्रष्ट रूप व त्यापुढें " नाक " हे शब्द वापरले जात असत. मालोजीरावांचें नांव लष्करच्या व सरकारच्या कागदोपत्रीं मालनाक असें पडलें. महारांचीं आडनांवेंहि कागदोपत्रीं लिहिलीं जात नसत. मालोजीरावांचें आडनांव संकपाल हे कागदोपत्रीं लागलें नव्हतें.

मोंगल, मराठे व पेशवे यांच्या लष्करांतील लोकांना आपल्या गांवचा संबंध तोडून दूरवर राहण्याचे प्रसंग फारसे येत नसत. कंपनीच्या लष्करांतील लोकांना मात्र असले प्रसंग येत. मालोजीराव कंपनीच्या लष्करांत शिरल्यानंतर त्यांना अनेक लढायांच्या धामधुमींत आपल्या गांवीं जाऊन रहावयास मिळालें नाहीं. त्यामुळें त्यांचा आंबावडे गांवाशीं फारसा संबंध राहिला नाहीं. त्यांचे मुलगे लष्करांत नोकरीस लागल्यानंतर त्यांना पेन्शन मिळाली. ते हवालदाराच्या हुद्यावरून पेन्शनींत निघाले. त्यानंतर ते मुलांच्याकडे राहिले; ते गांवीं जाऊन राहिले नाहींत. गांवाकडे ते जाऊन येऊन असत; पण त्या गांवचे रहिवाशी म्हणून ते फार दिवस सहकुटुंब राहिले नाहींत. त्यामुळें वतनदारी व शेतीवाडी हीं कामें करण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले नाहींत.

मालोजीरावांना चार अपत्यें झालीं. तीन मुलगे व एक मुलगी. तीन भावांच्या पाठीवर बहीण जन्मली तिचें नांव मीराबाई. ही जन्मतःच पांगळी होती. तिच्या पाठीवर रामजी झाले. हेच चरित्रनायकाचे वडील. त्यांचा जन्म १८४८ च्या सुमारास झाला असेल. हे तीन भाऊ वयांत आले तेव्हां लष्करांत रिक्रूट म्हणून नोकरीस लागले. त्यांच्या पलटणी वेगवेळया असल्यामुळें त्यांचा परस्परांशीं फारसा संबंध राहत नसे. जो कांहीं संबंध असे तो पत्रव्यवहारांत. कधीं कधीं हे भाऊ रजेवर आले म्हणजे एकत्र राहून आपलें कौटुंबिक जीवन पुणं, ग्वाल्हेर, महू, सातारा किंवा बडोदें येथील लष्करांत ( camp ) आनंदांत घालवीत.

वि: ........
नों: दि: ........

# प्रकरण २ रें

## वडील आणि आई

रामजी हे मालोजीचें शेवटचें अपत्य. चेहऱ्यामोहऱ्यानें ते आकर्षक होते. त्यांचा रंग व देह हीं उठावदार होतीं. मालोजी पेन्शनींत निघाले तेव्हां ते आपल्या पांगळ्या मुलीसह ( मीराबाई ) रामजीकडे रहात.

सैन्यांत नोकरी करणारे जे महार होते त्यांना दोन गोष्टींचें जबरदस्त व्यसन जडलेलें होतें. एक दारूचें व दुसरें आध्यात्मिक ज्ञानाचें. कांहीं जणांना एकाच व्यसनानें पछाडलेलें होतें तर कांहींजण दोन्ही व्यसनांच्या आहारीं जाऊन पडलेले होते. मालोजीराव यांना फक्त एकाच व्यसनानें पछाडलेलें होतें. तें म्हणजे ब्रह्मज्ञानानें. या दोन्ही व्यसनांच्या पायीं कित्येकांनीं आपल्या आयुष्याची राखरांगोळी केली तर कित्येकांनीं आपलीं कुटुंबें धुळीस मिळविलीं. आध्यात्मिक ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान आपणांस प्राप्त व्हावें, म्हणून हजारो महारांनीं पराकाष्ठेचे प्रयत्न केलेले आहेत. असले प्रयत्न करणारे लोक तीन पंथांचे होते. एक रामानंद पंथ, दुसरा कबीर पंथ व तिसरा नाथ पंथ. या ब्रह्मज्ञानाच्या वादविवादांत कबीर पंथी लोक रामानंदी लोकांना " नंदी " म्हणजे बैल—ब्रह्मज्ञानाची तोंडओळख नसतां नुसते नंदी बला-प्रमाणें मान हालविणारे लोक—म्हणून हिणवीत, तर रामानंदी लोक कबीर पंथी लोकांना " बाटगे " ब्रह्मज्ञानी म्हणजे अर्धे हिंदु व अर्धे मुसलमानी ब्रह्मज्ञान ओळखणारे गोसावी म्हणत. या दोन्हीं पंथांमध्यें गुरूपरंपरा असे व ती फार निष्ठेनें पाळण्यांत येई. या दोन्ही पंथांच्या बैठका भरत व त्यांत ब्रह्मज्ञानाच्या गोष्टींवर काथ्याकूट होई. 'वादे वादे जायते तत्वबोधः' या गोष्टीचा पडताळा येण्याऐवजीं त्यांना परस्परांचीं डोकीं फोडण्याची व पिढ्यान्‌पिढ्या हाडवैर पिक-विण्याची पाळी येई. एवढेंच नव्हे तर रामानंद व कबीर या पंथांतील लोक आपल्या गुरूबंधूशींहि ब्रह्मज्ञानाचे वितंडवाद माजवून हाणामार करीत व वैरभाव पेटवून ठेवीत तो असा कीं, तो वैरभाव पिढ्यान्‌पिढ्या टिकावा. ब्रह्म-ज्ञानाची कमजास्त माहिती सांगणारे व वादविवाद करणारे लोक संत, महंत,

इत्यादि नांवांनीं प्रसिद्धीस येत. मालोजीराव यानीं रामानंद पंथ स्वीकारलेला होता. त्यांच्या वाडवडिलांनींहि तोच पंथ स्वीकारलेला होता. मालोजीराव हे पेन्शनींत निघाले तेव्हां ते रामानंद पंथाप्रमाणें योग्य ती पूजा-अर्चा रात्रंदिवस करीत असत.

आपल्या वडिलांनीं रामानंद पंथाची दीक्षा घेतली हें पाहून त्यांच्या दोन वडील मुलांनींहि त्या पंथाची दीक्षा स्वीकारली. रामजीनें मात्र त्या किंवा इतर पंथाची दीक्षा स्वीकारण्याचें नाकारलें. या बाबतींत त्यांच्या वडिलांनीं त्यांना परोपरीनें सांगून पाहिलें, पण त्यांनीं शेवटपर्यंत एकसारखा नकारच दिला. या दोन पंथांची शिकवण किती उदात्त पण अनुयायी तिचें आचरण दारू पिऊन, मारामाऱ्या करून आणि नीचपणानें वागून करतात, हें रामजीनें पाहिलेलें होतें. ज्या भक्तिमार्गाची चोख भक्ति आपणाला करतां येणार नाहीं, त्या भक्तिमार्गाचें इतरांप्रमाणें आपण सोंग आणून स्वतःची व इतरांची कां फसगत करावी, असें त्यांचें मत झालेलें होतें. पलटणीचे व्यवहार आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या या सांभाळून जें ब्रह्मज्ञानाचें वाण प्रामाणिकपणें पार पाडतां येणें शक्य नाहीं, तें न स्वीकारणें हेंच योग्य, असें त्यांनीं आपलें ठाम मत तारुण्यावस्थेंतच बनविलें व त्याप्रमाणें वडिलांच्या म्हणण्यापुढें मान न तुकवितां तें मत कांहीं वर्षें टिकविलें.

रामजी हे १८ वर्षांचे असतील तेव्हां (१८६६ च्या सुमारास) पलटणींत रिक्रूट म्हणून दाखल झाले. त्यांच्या पलटणीचें नांव १०६ सॅपर्स अँड मायनर्स असें होतें. याच सुमारास सखाराम, लक्ष्मण, धर्मा, जानू, शंकाहारी, राघो व डोंगरे मुरबाडकर हे सात भाऊ सहाव्या मराठा पलटणींत सुभेदार होते. लक्ष्मण सुभेदार हे १०६ सॅपर्स ॲण्ड मायनर्समध्यें सुभेदार म्हणून बदलून आले. रामजींचें पिळदार व गौरवर्ण शरीर, मोहक चेहरेपट्टी आणि कवाईतीच्या कामांतील व बंदुकीच्या नेमबाजींतील नैपुण्य पाहून सुभेदार मेजर मुरबाडकर हे त्यांच्यावर खूष झालेले होते. दोघांचें नातें जरी अंमलदार व शिपाई असें होतें तरी ते परस्परांशीं खाजगी व्यवहारांत अत्यंत दिलजमाईनें वागत असत. सुभेदार मेजर मुरबाडकरांना एक मुलगा गणपत व दोन मुली भीमाबाई व बायजाबाई अशीं तीन अपत्यें होतीं. भीमाबाई ही मधली मुलगी. ती दिसण्यांत चुणचुणीत व बोलकी होती. ती आपल्या वाचाळपणानें घरांतील लोकांना हैराण करी. मुलीच्या जातीला परक्याच्या घरीं दासीचें जीवन घालवावयाचें असतें तेव्हां तिनें इतकें हूड व वाचाळ राहतां कामा नये, असा विचार करून घरांतील वडील स्त्रीपुरुष भीमाबाईला धाकदपटशा दाखवून व वेळीप्रसंगीं धम्मकलाडू व चापटपोळ्या देऊन ताळ्यावर आणण्याचे व आपल्या हुकमतींत ठेवण्याचे कसोशीनें प्रयत्न करीत. पण इतका मार घेऊनहि भीमाबाईचा घरांतील धिंगाणा व वाचाळपणा हा पूर्वीप्रमाणेंच अखंड चालू राही. तिचा हा खिलाडू, खोडकर, हेकेखोर, दंगेखोर, भांडखोर व धीट स्वभाव आणि

दुर्दमनीय बोलकेपणा लोकांना आवडे म्हणून ती सर्वांना आवडे. ती दिसण्यांत फारशी देखणी नव्हती. उलट अंशीं तिचें नाक बसकें होतें व वरचे दोन दांत ओठाच्या बाहेर किंचित् आलेले होते. मात्र तिची गौर व बांधेसूद काया आणि विशेषतः गोंडस व लहान आकाराचे तळहात, तेजस्वी व भेदक डोळे, रेखीव भुंवया, सुबक भालप्रदेश आणि कुरळे केस यांमुळें ती आकर्षक भासे. तिच्या हाताचीं बोटें लहान व आकर्षक होतीं. तिच्या तळहाताचा आकर्षकपणा शेवटपर्यंत राहिलेला होता. रामजी या मुलीला योग्य वर होईल, असें सुभेदार मेजर मुरबाडकरांनीं मनांत ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं मालोजीरावांकडे तो प्रश्न काढला. मालोजीरावांनीं भीमाबाईला पाहतांच आपला रुकार दिला. रामजी व भीमाबाई यांचा विवाह मुरबाड ( जि. ठाणें ) येथें अत्यंत थाटांत झाला. कारण कीं, मुरबाड-करांची घरची स्थिती अत्यंत चांगली होती. इतकी कीं, त्यांच्या घरांतील स्त्रिया एखाद्या राजेरजवाड्याच्या घरांतील स्त्रियांप्रमाणें जरीचे शालू व पैठणी नेसत असत. अंगावर सोन्याचे दागदागिने तर खूपच असत. लहान मुलींच्या पायांत सोन्याचे तोडे असत. सणासुदीच्या दिवशीं कुटुंबाचें जेवण चांदीच्या भांड्यांतून होई. त्यांच्या घरची राहणी उच्च दर्जाची होती. पहाटेस सर्वांनीं उठावें, शुचिर्भूत व्हावें व सामुदायिक प्रार्थना करावी. स्त्रियांनीं सडासंमार्जन केल्यानंतरच स्वयंपाक करावा. लष्करांतील अधिकार, ब्राह्मणी कुटुंबांनाहि लाजविणारी घरची सोज्वल व उच्च राहाणी आणि एकंदर सुस्थिती यांमुळें खुद्द मुरबाडांत सुभेदार मेजरांचा दरारा होता. त्या वेळीं त्यांच्या पुतण्या पुतणींचीं लग्नें मोठ्या थाटानें झालीं तसेंच भीमाबाईचेंहि लग्न मोठ्या दिमाखांत झालें. लग्नांत भीमाबाई १३ वर्षांची व रामजी १९ वर्षांचे होते.

भीमाबाई श्रीमंतींत वाढलेली होती आणि रामजींची घरची परिस्थिती इतकी सुखवस्तु नव्हती. राजशाही थाटांत वाढलेली व सोन्याचे तोडे ल्यायलेली आपली सूनबाई आपल्या घरांत कशी काय वागेल, याबद्दल मालोजीरावांना थोडीशी चिंता होती. रामजीलाहि तसेंच वाटत होतें. परंतु पलटणींत नोकरी करणाऱ्या महारांचें राहणीचें मान जसें वाढलेलें होतें तसें तें रामजीचेंहि वाढलेलें होतें. त्यांतून त्यांचे वडील मालोजीराव हे रामानंद पंथाचे एकनिष्ठ भक्त. त्यामुळें रामजीच्या घरांत पवित्र व उच्च वातावरण आणि शुद्ध आचार विचार यांचें साम्राज्य नांदत होतें. या साम्राज्यांत भीमाबाईनें प्रवेश केला व सम्राज्ञीपद गाजविलें. सम्राज्ञीपद गाजविलें असें म्हणण्याचें कारण कीं, आपल्या संसाराच्या गोष्टींत भीमाबाई कोणाचेंहि ऐकत नसत. सर्व गोष्टी स्वतःच्या मनाप्रमाणें झाल्या पाहिजेत, हा त्यांचा खाक्या. या बाबतींत कोणी लुडबुड केलेली त्यांना खपत नसे. खुद्द रामजींनीं जर आपल्या मताचें घोडें पुढें केलें तर त्यांनाहि भीमाबाई धुडकावून देत असत. असे प्रसंग वारंवार येत तेव्हां दोघांचे मोठे खटके उडत. तेव्हां रामजींना असल्या खडाष्टकांतून अंग काढून बाजूला जावें लागे. रामजी स्वभावानें धीरगंभीर, प्रेमळ पण करारी व हातीं घेत-

लेलें काम वाटेल तें करून फत्ते करण्याची ईर्षा बाळगणारे गृहस्थ होते. तसेंच ते विनोदी व थट्टेखोर होते. ते केव्हां केव्हां पत्नीला चिडविण्यासाठीं मुद्दाम भांडण उकरून काढीत व आडवें तिडवें बोलून पत्नीला भडकावून देत. पत्नीच्या नैसर्गिक वाचाळपणाला ऊत चढूं लागला कीं ते बाजूला होऊन मोठ्यांदां हंसूं लागत. पतीच्या थट्टेचा उगम पडल्यानंतर भीमाबाई वरमून जात आणि स्वस्थ बसत. भीमाबाई मस्तक नमवीत त्या फक्त आपल्या नणंदेपुढें—मीराबाईपुढें. मीराबाई ही फार प्रेमळ व सोज्वळ अंतःकरणाची आणि समंजस बुद्धीची स्त्री होती. भीमाबाईच्या कामांत ती कधीं आडमुठेपणानें लक्ष घालीत नसे किंवा नणंदेचा शिरजोरपणा दाखवीत नसे. ती भीमाबाईला योग्य प्रसंगी योग्य सल्ला देई व तो सल्ला भीमाबाई मानें. मीराबाईचा सल्ला पसंत पडला नाहीं तर भीमाबाई त्यांना तसें स्पष्ट कधीं सांगत नसे. मात्र आपणांला जें कांहीं करावयाचें तें नणंदेचें मन न दुखवितां भीमाबाई करीत असत. यामुळें नणंदभावजयांमध्यें मैत्रीचें नातें उत्पन्न झालें. मीराबाई पांगळी होती. तिच्या पंगु अवस्थेंत भीमाबाईनें कधींहि कंटाळा न करतां तिची सेवा व शुश्रुषा केली.

१८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धानंतर हिंदुस्थानांतून कंपनी-सरकार नष्ट झालें. त्याच्या-ऐवजी ब्रिटिश सरकारचें राज्य चालू झालें. तेव्हां सैन्याची जी रचना केलेली होती ती खालीलप्रमाणें:

कंपनी—२५ शिपायांचा एक सेक्शन, असे चार सेक्शन्स् [ म्हणजे १०० शिपाई ] मिळून कंपनी होई. एका सेक्शनवर एक हवालदार असे. अर्ध्या कंपनीवर एक जमादार असे.

बटालियन किंवा रेजिमेंट—आठ कंपन्या मिळून एक बटालियन किंवा रेजिमेंट होई.

शिपाई—हा रिक्रूट म्हणून प्रथम घेतला जाई. पगार दरमहा ७ रु. [ १८९५ च्या नंतर पगार दरमहा रु. ९. ]

लान्स नाईक—शिपायाला प्रथम जी बढती मिळे ती लान्स नाईक म्हणून. तीन शिपायांवरचा अधिकारी. या बढतीचें चिन्ह म्हणून त्याला शर्टच्या बाहीवर एक फीत लावायला मिळे. पगारांत वाढ नाहीं.

नाईक—सहा शिपायांवर अधिकारी. दोन फिती. पगार १२ रु.

हवालदार (हविलदार)—चोवीस शिपायांवरचा अधिकारी. तीन फिती. पगार १४ रु.

कलर हवालदार—तीन फिती व एक क्राऊन. पगार १६ रु.

## कमिशन्ड ऑफिसर्स

जमादार ( जमेदार )—अर्ध्या कंपनीचा अधिकारी. खांद्यावर स्टार ( तारा ) व कमरेला तलवार. पगार ४०-५० रु.

सुभेदार ( सुबदार-सुबेदार )—कंपनीचा अधिकारी. खांद्यावर दोन स्टार्स व कमरेला तलवार. पगार ८०-१०० रु.

वि:

सुभेदार मेजर—कंपनीचा अधिकारी. खांद्यावर क्राऊन व कमरेला तलवार. पगार
१५० रु. कंपनींतील लोकांबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गुप्त रिपोर्ट पाठविणें व कंपनीचा कारभार चोख ठेवणें, हीं याचीं प्रमुख कामें.

उपरिनिर्दिष्ट जागा हिंदी लोकांसाठीं होत्या. प्रायव्हेट, कॉरपोरल, सार्जंट, सार्जंटमेजर, क्वार्टर मास्टर सार्जंट, सेकंड लेफ्टनंट, लेफ्टनंट, कॅप्टन, मेजर, लेफ्टनंट कर्नल व कर्नल या जागा ब्रिटिश लोकांसाठींच असत. ब्रिटिश सैन्यांत शिरलेले पुष्कळ महार व चांभार सुभेदार मेजरच्या जागेवर चढलेले होते. त्यांतून कांहीं महारांनीं रणांगणांत अचाट शौर्य गाजवून ब्रिटिश सरकारकडून तलवार बहादूर व सरदार अशा पदव्या मिळविलेल्या होत्या. तीन चार महार ऑफिसर्स कोर्ट मार्शलचे—न्यायालयाचे—सभासद होते व त्यांनीं गोऱ्या अधिकाऱ्यांवरील खटल्यांतहि निर्णय दिलेले होते.

क्रिकेट, हॉकी, फूटबॉल व कुस्त्या हे खेळ पलटणींतील लोक सर्रास खेळत असत. पहिल्या तीन खेळांत महार सैनिक व अधिकारी नेहमींच तळपत असत. या तिन्ही खेळांतील सामने पुष्कळ वेळां युरोपियन सैनिक व अधिकारी यांच्या बरोबर होत व त्या सामन्यांत महारांचे संघ विजयी होत. रामजीनें क्रिकेट व हॉकी खेळण्यांत प्राविण्य कमाविलेलें होतें. कवायती व निशाणबाजी यामध्येंहि त्यांनीं अधिकाऱ्यांकडून बक्षिसें मिळविलीं होतीं. डाव्या हातांत कबूतर व उजव्या हातांत बंदूक घेऊन कबूतर वर उडवावयाचें, व त्याला गोळी घालून खालीं पाडावयाचें, याबद्दल युरोपियन शिपाई व अधिकारी व हिंदी शिपाई व अधिकारी यांच्यांत पैजेच्या शर्यती लागत असत. अनेक महार सैनिक व अधिकारी अशा पैजा जिंकीत. रामजीनें असल्या शर्यतींत भाग घेतला नाहीं. याचें कारण त्यांची कमालीची धार्मिक प्रवृत्ति. रामानंद वा कबीर पंथाची दीक्षा त्यांनीं जरी घेतलेली नव्हती तरी त्या पंथांतील विचारप्रवृत्ति व हिंदु धर्मांतलि विचारप्रवृत्ति यांचें व्यापक ज्ञान त्यांनीं दोन्ही पंथांतील अनेक गुरुंच्या संगतींत राहून आणि स्वाध्यायानें मिळविलेलें होतें. कबीराचे दोहे, तुकारामाचे, एकनाथाचे, ज्ञानोबाचे, नामदेवाचे आणि चोखोबाचे अभंग त्यांनीं पाठ केलेले होते. ते ज्ञानेश्वरी दररोज वाचीत असत व स्तोत्रें व भूपाळ्या पहाटेस म्हणत असत. या व्यापक धार्मिक अभ्यासामुळें त्यांना हिंसा व अहिंसा यांच्यातील सूक्ष्म भेद कळत असे. कबूतरें उडवून त्यांला गोळ्या घालून मारण्याच्या शर्यतींत ते भाग कां घेत नसत, याचें कारण हें होय. बंदुकीच्या नेमबाजीचे जे पाक्षिक वा मासिक प्रयोग पलटणींत होत त्यांत रामजी केव्हां ना केव्हां उच्चांक मिळवीत व अधिकाऱ्यांकडून शाबासकी पटकावीत.

पलटणींत जे लोक असत त्यांनीं व त्यांच्या मुलांनीं व भावंडांनीं शिक्षण घेतलें पाहिजे अशी पलटणींत सक्ति असे. जे लोक या लष्करी शाळेंतून—नॉर्मल स्कूलमधून—शिक्षण घेण्यास व मुलांना शिक्षण देण्यास तयार होत नसत त्यांना दरमहा दंड

भरावा लागत असे. कंपनी सरकारनें हिंदीलोकोपयोगी ज्या कांहीं गोष्टी केल्या त्यांत लष्करांतील सक्तीचें शिक्षणदान ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. या शिक्षणदानाचा उपयोग पलटणींतील महारांनीं भरपूर करून घेतला. तो इतका कीं, त्यांतील कांहीं पुरुष शिक्षण घेऊन उच्चाधिकारांवर चढले. कित्येक महार कुटुंबांतील मुली सुशिक्षित होऊन पांडवप्रताप, रामविजय, शिवलीलामृत इत्यादि पौराणिक व धार्मिक ग्रंथ वाचून त्यांचें निरुपण श्रोतृवृंदास करून दाखवीत. कित्येक स्त्रीपुरुष अध्यात्मिक धार्मिक विषयांवर कीर्तनें करीत. पलटणींतील नोकरीनें कित्येक महार कुटुंबांचा कायापालट केला तसाच पलटणींतील शाळेंतून मिळणाऱ्या शिक्षणानें त्यांच्यांत दृष्टिपालट झाला. पलटणींतील नोकरीमुळें त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली व सामाजिक दर्जा वाढला; आणि शिक्षणानें त्यांना नवी दृष्टि प्राप्त झाली व ते सामाजिक व धार्मिक हक्कांकडे नव्या दृष्टीनें पाहूं लागले. हिंदु समाजांत मानापानानें, स्वाभिमानानें राहण्याची त्यांना महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली.

मालोजीराव यांनीं नॉर्मल स्कूलमध्यें शिक्षण घेतलेलें होतें व रामजीलाहि त्यांनीं नॉर्मल स्कूलमध्यें घातलें होतें. पलटणींत प्रवेश केल्यानंतर रामजीनें इंग्रजी शिक्षणाला सुरवात केली. कोणतेंहि हातांत घेतलेलें काम चोख करावयाचें, त्यांत थातुरमातुर करून इतरांची व आपली फसवणूक करून घ्यावयाची नाहीं, हें रामजींच्या स्वभावांतील वैशिष्ट्य होतें व तें वैशिष्ट्य त्यांनीं स्वाध्यायानें वाढविलें होतें. इंग्रजी शिक्षणाला सुरवात केल्यानंतर त्यांनीं तें शिक्षण मनापासून घेतलें. अभ्यासानें व वाचनानें त्यांनीं आपलें इंग्रजी भाषेचें सोपपत्तिक ज्ञान वृद्धिंगत केलें; व नॉर्मल स्कूलची परीक्षा उत्तम रीतीनें उत्तीर्ण केली. नॉर्मलची परीक्षा म्हणजे सध्यांची मॅट्रिक परीक्षा होय. इतिहास, गणित आणि इंग्रजी भाषा या विषयांत त्यांनीं नैपुण्य मिळविलें होतें. त्यांनीं ज्योतिषशास्त्राचाही चांगला अभ्यास केला होता. हस्तसामुद्रिक शास्त्राचा तर त्यांना फार हव्यास होता. शुभाशुभ वेळा अचूकपणें सांगण्याबद्दल त्यांची प्रसिद्धि झालेली होती. अंगावरच्या खाणाखुणा पाहून ते एकाद्याचें भविष्य उत्तम रीतीनें सांगत असत. मात्र याबद्दल ते चुकुनसुद्धां कोणाकडून कपर्दिकहि घेत नसत.

आपल्या वडिलांच्या विद्याभ्यासाबद्दल व विद्याभिरुचीबद्दल बाबासाहेबांनीं एकदां माहिती सांगतांना खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत :

"आमचे वडील मास्तर होते. ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा एक फार चांगला नियम होता. तो पुढें पाळला गेला नाहीं, हें आमचें दुर्दैव होय. तो नियम म्हणजे कंपनी सरकारच्या सैन्यांतील दरोबस्त सैनिकांस सक्तीचें शिक्षण दिलें जात असे, व सैनिकांच्या मुलांमुलींसाठीं दिवसाच्या शाळा असून प्रौढ लोकांसाठी रात्रींच्या शाळा असत. प्रत्येक पलटणीसाठीं स्वतंत्र शाळा असत. अशा एका शाळेमध्यें माझे वडील चवदा वर्षे हेडमास्तर होते. सैनिकांसाठीं चांगले शिक्षक तयार करण्यासाठीं

पुण्यास एक ‘ नॉर्मल शाळा ’ होती. त्या नॉर्मल शाळेंत माझे वडील शिकून त्यांनीं मास्तरचा डिप्लोमा मिळविला होता. त्यांची शिकविण्याची पद्धत फार वाखाणण्यासारखी होती. त्यामुळें आमच्या वडिलांच्यामध्यें शिक्षणाविषयीं आस्था व आवड निर्माण झालेली होती. आमच्या घरांतील बायकामुलांनासुद्धां उत्तम लिहितां वाचतां येत होतें, इतकेंच नव्हे तर पांडवप्रताप, रामायणासारखे ग्रंथ वाचून त्यावर निरूपण करण्याची शक्तीही वडिलांच्या प्रोत्साहनानें माझ्या थोरल्या वहिणींत आली होती. ते स्वतः कबीर पंथी असल्यानें भजनें व अभंग त्यांना कितीतरी तोंडपाठ येत असत.” [ प्रा. सत्यबोध हुदलीकर, एम्. ए. : आंबेडकरांबरोबर गप्पागोष्टी, नवयुग, ता. १३–४–१९४७ पा. २८ ].

रामजी १०६ सॅपर्स ॲण्ड मायनर्स या पलटणींत रिक्रूटच्या पदापासून वर वर चढत गेले. ते नाईक झाले तेव्हां १८८४ सालांत १०६ वी पलटण बंद करण्यांत आली. तेव्हां रामजींची बदली १०७ पायोनियर्समध्यें झाली. या पलटणीला पुढें ७ वी बॉम्बे इन्फट्री हें नांव देण्यांत आलें. १०६ वी पलटण बंद करण्यांत आली तेव्हां सुभेदार मेजर मुरबाडकर यांनीं पेन्शन घेतली व ते मुरबाडला कायमचे स्थायिक झाले. त्यांचे सहा भाऊ हेहि निरनिराळ्या पलटणींतून सुभेदार म्हणून पेन्शनींत निघाले व तेहि मुरबाडला येऊन राहिले. या सात सुभेदारांचा कुटुंब–विस्तार मोठा होता. मुरबाडला त्यांनीं एक विस्तीर्ण वाडा बांधला. भीमाबाईचे वडील हे थोरले. ते घरचे कर्ते. घरादारांची योग्य निगा राखणें आणि लहान थोरांचे दररोजचे व्यवहार व्यवस्थित व सुरळीत झाले पाहिजेत, याबद्दल ते फार दक्ष असत. त्यांनीं वाड्याच्या समोर एक मोठी घंटा बांधलेली होती. नोकर ती घंटा पहाटेस वाजवीत त्यावेळीं घरांतील सर्व माणसांनीं उठावें व स्नानादि कार्यें उरकून सामुदायिक प्रार्थनेस यावें, असा सुभेदार मेजर यांचा दंडक होता. तो दंडक पाळण्यांत जे कुचराई करीत त्यांना ते शिक्षा करीत. सुभेदार मेजरनीं मुरबाडमधलि इतर महार रहिवाशांवरहि हा दंडक लादला होता. हा दंडक पाळण्याबद्दल प्रथम त्यांनीं कुरकूर केली. मग सुभेदार मेजर त्यांना आपल्या घरांत घेत नसत. व त्यांना शिवत नसत. महारांनीं त्यांची ही निष्ठावंत शिस्त जाणली व मानली. स्त्रिया सडासंमार्जन केल्यानंतर व स्नान केल्यानंतर स्वयंपाक करूं लागल्या. थोड्याच दिवसांत मुरबाडचा महारवाडा ब्राह्मणवाडा झाला. त्याचें पालटलेलें रूप पाहून स्पृश्य वर्गीय लोकहि सुभेदार मेजरांच्या वाड्यापुढील घंटा ऐकून पहाटेस उठूं लागले व स्नानादि कार्यें करूं लागले. पशू व पक्षी पाळण्याचा त्यांना मनस्वी नाद होता. हरिणी, ससे, गायी, बैल, म्हशी, घोडे इत्यादि जनावरें त्यांच्या वाड्याच्या पुढील गोठ्यांत असत. वानर, पोपट, काकाकुवा, साळुंक्या इत्यादि पक्षांचे पिंजरे वाड्यांतील सोप्यांत असत. शिवाय देशी व विदेशी पैदाशीचीं कुत्रीं असत. त्यांना जमीनजुमला खूप होता. त्यांच्या घरांत नोकर चाकर पुष्कळ होते. आसपासच्या १०।१५ गांवांत त्यांनीं सावकारी केलेली

होती. ते घोड्यावर बसून किंवा बैलगाडींत बसून आपल्या कुळांकडे जात. बरोबर नोकरचाकर असत.

मालोजीराव निवर्तल्यानंतर त्यांच्या चार मुलांच्या गांठी भेटी वारंवार होण्याचें बंद झालें. त्यांतील वडील मुलानें पलटणींतील नोकरी सोडून संन्यास घेतला होता. तो संन्याश्यांच्याबरोबर हिंदुस्थानांतलि सर्व तीर्थयात्रा करीत होता. बाकीचे दोघे भाऊ आपापल्या पलटणीबरोबर हिंडत होते.

मालोजींनीं रामानंद पंथाची दीक्षा घेतली नव्हती तोंपर्यंत ते आंबावडे गांवाला अधूनमधून जात व भवानी या आपल्या कुलदैवताची यथासांग जत्रा करीत. रामानंद पंथाची दीक्षा घेतल्यानंतर त्यांनीं ती प्रथा बंद केली. रामजींनीं कोणत्याहि पंथाची दीक्षा घेतलेली नव्हती. तेहि आधूनमधून आपल्या गांवीं सहकुटुंब जात व कुलदैवताची पूजा आर्चा करीत, व जत्राहि करीत. त्यांचे दोघे कुटुंबवत्सल बंधू हे वडिलांच्या मृत्युनंतर गांवाला कधीं गेले नाहींत व ते कोठें स्थायिक झाले याबद्दल रामजीला कधीं माहितीहि मिळाली नाहीं.

पलटणींतील नोकरीबद्दलची नेकी, खेळांतील प्राविण्य आणि इंग्रजी भाषेचें व्यापक ज्ञान, इत्यादि रामजींचे सद्गुण उठावदारपणानें दिसून आल्यामुळें रामजी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेंत भरलेले होते. ते पलटणींतील उच्च पदांवर चढत चढत १८९६ च्या सुमारास सुभेदार झाले, तेव्हां त्यांचे सात सासरे सुभेदार होऊन निवर्तलेले होते.

# प्रकरण ३ रें

## ज न्म

रामजी व भीमाबाई या दांपत्याला १८९१ पर्यंत चौदा मुलें झालीं. भीमराव हें शेवटचें अपत्य. ते स्वतःस मी आईबापाचें चौदावें रत्न आहे असें म्हणतात, हे सर्वश्रुत आहे.

चौदा मुलांपैकीं कांहीं मुलें एक दोन वर्षांचीं असतांना वारलीं व कांहीं अगदीं लहान असतांना वारलीं. सात मुलांचा त्रोटक इतिहास एवढाच. बाकीचीं सात मुलें म्हणजे तीन मुलगे व चार मुली. त्यांचीं जन्मक्रमानुसार नांवें अशीं: बाळाराम, गंगा, रमाबाई, आनंदराव, मंजुळा, तुळसा, व भिवा ( भीमराव ). मुलामुलींचें योग्य प्रकारें संगोपन करणें व त्यांना योग्य तें वळण लावणें हीं व घरांतील इतर संसारी कामें भीमाबाई करीत असत; मधून मधून त्या घरांत नोकर चाकर ठेवीत. कायमचे नोकरचाकर ठेवण्याइतकी त्यांच्या संसाराची ऐपत नसे. त्यांतून रामजी हे वर्तनानें कट्टर सदाचारी. कसाबसा केलेला स्वयंपाक त्यांना चालत नसे. सडासंमार्जन घालून व अभ्यंग स्नान करून स्वयंपाकास बसणें, हें भीमाबाईचें कर्तव्य होतें. त्यांतून मुलाबाळांचें जंजाळ. शिवाय मधून मधून रामजी आपल्या घरांत पलटणींतील लोकांच्या बैठका ( स्नेहसंमेलनें ) भरवीत. वार्षिक पितृश्राद्ध ते विस्तृत प्रमाणावर करीत. शिवाय अतिथी अभ्यागतांची रीघ त्यांच्या घराकडे अखंड चालू असे. अभ्यागतांचें आगतस्वागत यथासांग करणें हा गृहस्थाश्रमांतील एक उच्च सदाचार होय, ही रामजींची दृढ भावना; म्हणून ते अभ्यागतांची व आमंत्रितांची बडदास्त स्वतःच उत्तम रीतीनें ठेवीत असत. अर्थात् भीमाबाईला या सर्वांना पुरेल असा स्वयंपाक करावा लागे.

गंगा, रमाबाई, मंजुळा व तुळसा या चारी मुलींचीं योग्य त्या वयांत लग्नें झालीं. गंगा लाखावडेकर यांना दिली. रमाबाई हिला मावळणकर यांना दिलें. लाखावडेकर व मावळणकर हे दोघेहि पलटणीत होते. मावळणकर बँड पथकांत होते. ते हवालदार म्हणून पुढें पेन्शनींत निघाले. पेन्शनर झाल्यानंतरहि ते जी. आय. पी.

च्या ऑक्झिलियरी फोर्समध्यें बँड मास्तर होते. मजुळा हिचा विवाह येसू रामजी पंदीरकर यांच्याशीं झाला. पंदीरकर २२ व्या पलटणींत होते. यांचा मुलगा गणपत. तुळसाबाई हिचे लग्न धर्मा कांतेकर यांच्याशीं झाले. धर्माजी हे १०९ व्या फलटणींत होते. यांचा मुलगा केशव.

बाळाराम व आनंदराव हे नॉर्मल स्कूलमध्यें नॉर्मलची परीक्षा पास झाले. बाळाराम फलटणींत बँड पथकांत होते व पुढें ते पोलीस खात्यांत बँड टीचर म्हणून सोलापूर येथे होते. आनंदराव हे पलटणींत शिरले नाहींत.

भीमाबाईंना मध्यंतरी मस्तकशूळाची बाधा झाली. ही व्यथा कधीं कधीं इतकी कळसाला पोहोंचे कीं भीमाबाई आपलें मस्तक भिंतीवर आपटून घेत. तेव्हां त्यांचीं मुले व मुली त्यांच्या सभोंवतीं गोळा होऊन रडत बसत. या व्यथेमुळें त्या कधींकाळीं अंथरुणाला खिळून पडल्या तर मुलाबाळांच्या खाण्यापिण्याची व इतर व्यवस्था रामजी स्वतः करीत असत. या दुखण्यानें फारच जोर केला तर ते आपल्या पत्नीला व मुलांना मुरबाडला नेवून ठेवीत असत.

हिंदुस्थान सरकार व अफगाणिस्तान सरकार यांच्यांत १८७८ मध्यें युद्ध सुरू झालें. हें कंदाहार किंवा अफगाण युद्ध १८८० पयत चाललें. या युद्धांत हिंदुस्थान सरकारला यश मिळालें. त्याचें बरेंचसें श्रेय महार लढवय्ये आणि अधिकारी यांना होतें. सातारा, बेळगांव, पुणें, इंदूर (महू), ग्वाल्हेर, बडोदा, रावळपिंडी इत्यादि ठिकाणीं लष्करी तळ (मिलिटरी कँपस्) होते. येथून युद्धसाहित्य व सैनिक कंदाहारला पाठविण्यांत येत असत. नवीन भरती झालेले लोक सैनिक म्हणून तयार करण्याचे महत्वाचें काम उत्तम तऱ्हेच्या अधिकाऱ्याकडे सोपविलेलें होतें. रामजी सुभेदार यांची नेमणूक याच कामावर झाली. शिवाय ते नॉर्मल स्कूलचेंही काम करीत असत. यानीं तयार केलेले हजारो सैनिक कंदाहारला गेले. ६ वी, १५ वी व १८ वी पलटण, फोर्थ रायफल व फर्स्ट ग्रेनेडियर्स या पलटणी कंदाहारला पाठविण्यात आल्या होत्या. त्यांत महार सैनिकांचा बराच भरणा होता. याच पलटणींनीं मर्दुमकी करून कंदाहारचें युद्ध जिंकलें.

१८७९ सालांत रामजी सुभेदार रावळपिंडीच्या लष्करी तळावर (मिलिटरी कँप) सहकुटुंब होते. त्यांच्याबरोबर इतर महार अधिकाऱ्यांचीहि कुटुंबें होतीं. एके दिवशीं सायंकाळीं स्त्रिया जवळच्या नदीवर धुणीं धुण्यास व पाणी आणण्यास गेल्या होत्या. स्त्रिया धुणीं धूत असतां व भांडी घासत असतां जवळच्या जलप्रवाहासमोर गोसावी लोक आले व तेहि तेथे संध्यास्नान करूं लागले. त्या स्त्रिया धुणें धुतांना व भांडीं घासतांना आपापसांत कोंकणी मराठी भाषा बोलतात हें ऐकून एका वृद्ध गोसाव्यानें त्या स्त्रियांकडे उत्सुकतेनें पाहिलें. अर्धवट स्नान केलेल्या स्थितींतच तो एका मध्यम वयाच्या स्त्रीकडे न्याहाळीत उभा राहिला व सकंप स्वरांत शुद्ध मराठींत उद्गारला, "भीमा, तूं इकडे कशी?" त्या गोसाव्याचे ते आर्जवी व प्रेमळ स्वरांत

उच्चारलेले शद्ब ऐकून भीमाबाई आश्चर्यानें थक्क झाली. हा गोसावी कोण, त्याला माझें नांव कसे माहीत, त्यानें विचारलेल्या प्रश्नाला काय उत्तर देऊं, अशा विचारानें भांबावलेल्या स्थितींत भीमाबाई असतांच तो गोसावी जरा पुढें आला आणि म्हणाला "भीमा! तूं भिऊं नकोस अन् घाबरूं नकोस! मी तुझा थोरला दीर, मी संन्यास घेतलेला आहे व झुंडीबरोबर फिरत फिरत इकडे आलों आहे." भीमाबाईनें गोसावी दिराला भक्तिभावपूर्ण अंतःकरणानें नमस्कार केला आणि त्यांना व त्यांच्या साथीदारांना हात जोडून नमस्कार करून विनंती केली, "मी माझ्या पतीराजांना आपणांला आमच्या घरीं येण्याचें आमंत्रण देण्याला पाठवून देते. तें आमंत्रण तुम्ही स्वीकारा व आमच्या घरीं पायधूळ झाडून आमचें घर पवित्र करा." त्यांनीं भीमाबाईची विनंती मान्य केली. भीमाबाई घाईघाईनें काम उरकून घरी गेल्या व सुभेदारांना त्यांनीं सर्व वृत्तांत सांगितला. सुभेदारानीं सर्व गोसाव्यांना आमंत्रण देऊन घरीं आणलें, त्यांच्या घरासमोर धुनी पेटवून गोसाव्यांनीं भजनाला सुरवात केली. सुभेदारांचे गोसावी बंधू सुभेदाराला म्हणाले, "आम्ही गोसावी लोक आज इथें, उद्यां दुसरीकडे. आम्ही सर्वसंगपरित्याग केलेला आहे. आम्हाला तूं जेवण तयार करून देण्याच्या भानगडींत पडूं नकोस, फक्त फलाहार आम्हांस दे व येथून हालण्यास संमती दे." सुभेदारानीं फळें व मेवामिठाई आणली व ती गोसाव्यापुढें ठेवली. गोसाव्यांनीं फक्त स्पर्श करून बाजूला सारली. भीमाबाईनें दिराला घरांत या व माझी मुलेंबाळें पाहा अशी विनंती केली, तेव्हां दीर त्यांना म्हणाला, "नाहीं बेटा! एकदां नात्यागोत्यांच्या जाळ्यांतून मी बाहेर पडलों तो कायमचा. मी आतां मायेच्या जाळ्यांत सांपडायला घरांत कशाला येऊं? आपल्या घराण्यांतील तीन पिढ्यांत तिघे पुरुष संन्याशी झाले. तिघांनीं घोर तपश्चर्या करून देवाला एकच वर मागितलेला आहे कीं, देवा! आमच्या घराण्यांत एक असा पुरुष उत्पन्न कर कीं जो आमच्या कुळाचें नांव सर्वत्र गाजवील आणि जो आमच्या जातभाईचे व धर्माचे हिणकस दिवस नष्ट करील व जातीला व धर्माला उजाळा देईल! परमेश्वरानें तो वर दिलेला आहे व आपल्या कुळांतील पहिल्या गोसाव्या पासूनच्या तिसऱ्या पिढींत म्हणजे सध्यांच्या पिढींत असा पुरुष उत्पन्न होणार आहे हें नक्की. आतां आपल्या कुळाच्या चालू पिढींत रामजी एकटाच कुटुंबवत्सल पुरुष आहे. माझे इतर भाऊ हे तसे नाहींत. तेव्हां रामजीच्या व तुझ्या पोटीं असला पुरुष निर्माण होणार आहे! हें माझ्या तोंडून बाहेर पडावें अशी परमेश्वराची इच्छा होती म्हणूनच माझी व तुमची भेट अशी अचानकपणें झाली." एवढे बोलून त्या गोसाव्यानें एका स्त्रीच्या हस्ते एक नारळ, तांदूळ, कुंकू व हळद यांनीं भीमाबाईची ओटी भरण्यास लावले. तेव्हां सर्व गोसाव्यांनीं जयजयकार गाजविला व ते गोसावी तेथून निघून गेले. रामजी सुभेदारानीं जमलेल्या लोकांना मेवा मिठाई प्रसाद म्हणून वाटली.

गोसाव्याच्या भविष्यावर रामजींचा व भीमाबाईचा संपूर्णपणें विश्वास बसलेला होता. परंतु त्या भविष्यानंतर त्यांना १७८० पासून १८८७ च्या काळांत जीं अपत्यें झालीं तीं दोन मुली, त्याहि अल्पवयांत वारल्या. यानंतर भीमाबाईची मस्तकशूळाची व्यथा फार वाढली व त्या अंथरुणाला खिळून गेल्या. यांतच आपला अंत होणार, असे त्यांच्या मनानें घेतले व आपल्या गोसावी दिराचें भविष्य खोटें होणार असे वाटूं लागले. भीमाबाईच्या आजारावर अनेक औषधोपचार करून सुभेदार साहेब निराश झालेले होते. त्यांचा आजार फारच वाढला तर ते भीमाबाईला व मुलांना मुरबाडला नेऊन ठेवीत. कारण भीमाबाइ त्यामुळें घरच्या व मुलांच्या कामाच्या जंजाळांतून मुक्त होत व सुभेदारांनाहि मनाला स्वस्थता लाभे. १८८८ सालांत भीमाबाईचा आजार बराच वाढला. तेव्हां सुभेदारांनीं त्यांना व मुलांना मुरबाडला पाठविलें. त्या आजारांत त्यांना झोपेंत बरीच स्वप्नें पडत. एखाद्या वेळीं असें स्वप्न पडे कीं, हातांत भाला व तरवार घेतलेली स्त्री आपल्याकडे डोळे वटारून पहात आहे. कधींकधीं त्यांना असेंहि स्वप्न पडे कीं, पांढरे शुभ्र पातळ धारण केलेली तरुण स्त्री हातांच्या ओंजळींत फुलें घेऊन येई व तीं फुलें भीमाबाईच्या अंगावर उधळी. पण तीं फुलें भीमाबाईच्या अंगावर न पडतां तिच्या आसपास पडत. या स्वप्नांचा अर्थ भीमाबाई असा करीत असत कीं, कित्येक वर्षें आपण आपल्या कुलदैवताला-भवानीला-पाहिलें नाहीं, तिची पूजाअर्चा केली नाहीं, म्हणून ती आपणांवर क्रुद्ध झालेली आहे व तिची यथाविधी पूजाअर्चा केली तर ती आपणांवर संतुष्ट होईल व मुलाबाळांना सुखासमाधानांत ठेवील, अशा अर्थाचीं पत्रें ती सुभेदारांना पाठवित असे व गांवाकडे जाऊन कुलस्वामिनीची यात्रा करण्याबद्दल आग्रह करीत असे. पण सुभेदार यांना सातारा, बेळगांव पुणें, बडोदें इत्यादि ठिकाणच्या लष्करी तळांवरील कामें सुरळीत चालविण्यासाठीं फिरतीवर रहावे लागत असल्यानें त्यांना रजा मिळणें दुरापास्त झालेले होते. त्यामुळें त्यांना भवानी देवीची यात्रा करता आली नाहीं.

आपल्या गोसावी भावाच्या भविष्यावरचा रामजीचा विश्वास उडत चालला होता, तथापि त्यांना मनांत नेहमीं वाटे कीं आपणाला जी आतांपर्यंत संतती झाली ती पुष्कळ झाली, परमेश्वरानें आतां आपणाला असा एक पुत्र द्यावा कीं जगांत नांव कमविल. हे नांव कमविण्याचें क्षेत्र म्हणजे रणभूमी असावे असें त्यांना वाटत नव्हते. रणभूमींतील पराक्रमांपेक्षां बौद्धिक क्षेत्रांतील पराक्रम श्रेष्ठ होय हें त्यांना मनोमन पटलेलें होते. बौद्धिक क्षेत्रांत सूर्याप्रमाणें तळपणारा पुत्र आपल्याला व्हावा हे त्यांनीं अनेकांकडे बोलून दाखविलें होते. रणक्षेत्राशी संबंध असलेला त्यांच्या श्रोत्यांना त्यांचे हें म्हणणें चमत्कारिक किंबहुना वेडेपणाचे व अशक्यप्राय वाटे. रामजी सुभेदार फिरतीवर असतां एकदां साताऱ्याला आले, तेव्हां शिपायांच्या गोळीबाराची कवायत

सातारच्या अजिंक्य किल्ल्याच्या डोंगराच्या पूर्वेकडील बाजूच्या खोऱ्यांत होत असे. कवायतीची पहाणी करण्यासाठीं सुभेदार उंच कड्यावरून इकडे तिकडे फिरत होते. तेव्हां फुत्कार करून फणा उभारलेला भुजंग त्यांच्यावर चाल करून येत असलेला त्यांना दिसला. त्याच्या फण्यावर १० चा आंकडा होता व अंगावर लांब केस होते. जवळच एक वडाचें झाड होतें. कमरेची तलवार काढून सुभेदारांना त्या भुजंगाचे तुकडे तुकडे करतां आले असतें पण तो विचार त्यांना मुळींच सुचला नाहीं. ते दोन्ही हात जोडून त्या भुजंगाकडे निश्चल दृष्टीनें पाहात उभे राहिले. त्याच्या मनांत विचार हा कीं, माझ्या पोटी जर माझ्या गोसावी भावानें सांगितलेल्या भविष्याप्रमाणें पराक्रमी पुरुष जन्म घेणार असेल तर हा भुजंग माझ्या केसालाहि धका लावणार नाहीं; तसें होणार नसेल तर हा भुजंग मला चावून मृत्यु आणील. हा विचार सुभेदारांच्या मनांत चालू असतांच भुजंग फणा उभारून त्यांच्या पायानजिक आला व फणा एकदम बंद करून बाजूच्या वडाच्या झाडावर चढला. सुभेदारांच्या डोकीवर असलेल्या वडाच्या फांदीवर विळखा घालून व फडा उभारून भुजंग विराजमान झाला. सुभेदारांनीं वर पाहिले तों भुजंगाची फडा आपल्या डोकीवर ! भुजंगाला पुन्हां नमस्कार करून सुभेदार आनंदाच्या ऊर्मींनीं उफाळलेल्या अंतःकरणानें गोळीबार पाहण्याच्या कामाला गेले.

आपणाला आतां एकच असा पुत्र व्हावा कीं, जो सर्वत्र आपल्या पराक्रमाचा प्रकाश पाडील, या विचारानें सुभेदारांचें मन इतके भारावलेले होतें कीं, एकादा देखणा पुरुष वा धिप्पाड तरुण त्यांच्या नजरेस पडला कीं त्यांनीं मनांत म्हणावें, माझ्या मुलाचें सौंदर्य असें असावें, त्याचें शरीर असें धिप्पाड व दणकट असावें. ते फिरतीवर असतां त्यांना एका गांवांत गणपतीची मूर्ति पाहावयास मिळाली. त्या मूर्तीचे कान लांबलचक होते. ते पाहून सुभेदार आपल्या बरोबरच्या लोकांना म्हणाले, "मला जो आतां मुलगा होणार आहे त्याचे कान असे रुंद व लांब झाले तर तो मोठा भाग्यवान असणार याबद्दल शंका राहणार नाहीं."

आपणास होणाऱ्या पराक्रमी पुत्राबद्दलचे अनेक विचार सुभेदारांच्या मनांत येत असत. व ते आपल्या मित्रांना व नातलगांना सांगत असत. कांहीं दंतकथा महार समाजांतील वयोवृद्ध लोकांकडून ऐकावयास मिळतात. उपरिनिर्दिष्ट दंतकथा त्यापैकींच होत. त्यांत सत्यांश कितपत असेल, हे पडताळून पाहण्याची जरूरी नाहीं. आजच्या विज्ञान युगांत असल्या दंतकथांवर बुद्धीवादी लोक विश्वास ठेवणार नाहींत. परंतु असले बुद्धिवादी समाजांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतात. समाजांतील बहुसंख्यांक लोक भाविक असतात. असल्या दंतकथांवर त्यांचा विश्वास असतो. या दंतकथा बाजूला सारल्या तरी एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसते ती ही कीं, सुभेदारांना ज्योतिष शास्त्राची व सामुद्रिक शास्त्राची उत्तम माहिती होती. त्या शास्त्राच्या अनुरोधानें ते आपली इष्टकार्यें सुयोगांवर करीत असत. १८९० च्या जून महिन्याच्या सुरवातीस सूर्य व

चंद्र व इतर गृह यांची युति होऊन असा एक महायोग येणार आहे कीं, त्या महायोगाच्या शुभ प्रसंगीं एका विवक्षित वेळीं जर एकादी स्त्री गर्भवती झाली तर तिला जो पुत्र होईल तो अत्यंत पराक्रमकाली व भाग्यवंत निपजेल, याबद्दल सुभेदारांना चांगली माहिती होती. जो महायोग साधण्याचे त्यांनीं मनांत ठरविलें व त्यासाठीं उपास करणें, जप करणें, वगैरे कायाना त्यांनी योग्य काळीं सुरवात केली.

या महायोगावर जन्मणाऱ्या अपत्यांना जे इतर ग्रह पीडा करणारे आहेत, त्यांची शांती करण्यासाठीं जपजाप्य व अनुष्ठानें करावीं लागतात; तीं सर्व सुभेदारांनीं केलीं. परंतु कांहीं ग्रह असें पडत होते कीं, त्यांची बाधा निवारण करण्यास जे उपाय व जीं कार्यें करावीं लागत होती, तीं सुभेदारांच्या आवांक्याबाहिरचीं होतीं. या कार्यांसाठीं सुभेदारांनीं जिवापाड प्रयत्न केले. पण तीं कार्यें त्यांना करतां आली नाहींत. ही हकिकत खुद्द चरित्रनायकानें प्रस्तुतच्या लेखकाला सांगितलेली होती. ज्योतिष शास्त्राबद्दलचें सुभेदारांचें जे नैपुण्य होतें त्याबद्दलची माहिती सुभेदारांच्या अनेक नातलगांनीं व त्यांच्या सहवासांत असलेल्या अनेक लोकांनीं प्रस्तुतच्या लेखकाला सांगितलेली आहे.

सुभेदारांची ७ वी पलटण १८८८ मध्यें महूच्या लष्करी तळावर आली. तेव्हां पासून त्याची वर वर्णन केल्याप्रमाणें मनःस्थिती होती व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न चालू होते. महूला आल्यानंतर ते येथील नॉर्मल स्कूलचे हेडमास्तर झाले. इतर सटरफटर कामांचा त्यांच्यामागें लकडा नसल्यामुळें त्यांना भरपूर वेळ मिळे. त्यामुळे त्यांना जपजाप्य व अनुष्ठानें इत्यादि कृत्यांसाठीं मुबलक सवड होई. पतीच्या या कार्यांत भीमाबाई एकनिष्ठेनें सहाय्य करीत असत. त्या मधून मधून पतीला गांवीं जाऊन भवानी मातेची यथासांग पूजा करण्याबद्दलहि सुचवित. सुभेदार त्या सूचना ऐकून घेत पण त्याबद्दल नक्की काय करणार हे सांगत नसत. त्यामुळें भीमाबाई संतापून जात.

ज्या दिवशीं महायोगाची सुरवात झाली त्या दिवशीं सुभेदारांनीं शेवटचें अनुष्ठान केलें. तें जून १८९०च्या पहिल्या आठवड्यांत. भीमाबाई सोमबारी उषःकाळीं तारीख १४ एप्रिल १८९१ रोजीं प्रसूत झाल्या. त्यांना पुत्र झाला ! मोठ्या थाटानें मुलाचें बारसें करून सुभेदारांनी मुलाचे नांव भीमराव ठेवले. भीमपराक्रम करणारा आपला पुत्र होणार असा विश्वास ! भाग्यवंताची जीं चिन्हें असतात तीं आपल्या पुत्राच्या अंगीं कितपत आहेत हे पाहण्यासाठीं सुभेदार उतावीळ झालेलें होते. त्या चिमुकल्या अंगावर नजरेंत भरणारें एकच चिन्ह त्यावेळीं स्पष्ट होतें. तें म्हणजे कानांचा आकार. कान रुंद व घवघवीत होते. त्यांची पाळें मोठीं होतीं. एवढें एकच चिन्ह पाहूनहि सुभेदार मनांत संतुष्ट झाले. तथापि इतर चिन्हें पाहण्याचीहि

त्यांना उत्कट उत्सुकता होती. भीमराव जसजसा वाढीस लागला तसतशीं त्यांच्या अंगावरची भाग्यवंताची चिन्हें सुभेदारांना दृग्गोचर होत गेली. त्यामुळें सुभेदारांच्या आनंदांत दिवसें दिवस भर पडत चालली. आई मुलाला "भीम" किंवा "भीमराव" असें संबोधित नसे. ती त्याला "भिवा" म्हणे. आणि हेच नांव पुढें रुळलें गेलें, आणि शाळेतहि तेंच नांव दाखल करण्यांत आलें.

१८९१ च्या आसपासचा काळ म्हणजे हिंदुस्थानांत पुढें होणाऱ्या सामाजिक धार्मिक व राजकीय क्रांत्यांचीं बिजें रुजविणारा काळ होता. सामाजिक, धार्मिक व राजकीय स्वातंत्र्यासाठीं या काळांत अनेक पंथ उपस्थित झाले आणि अनेक बंड-खोर पुढें आले. याच काळांत अस्पृश्यांच्या चळवळीचा पहिला झेंडा उभारला गेला. अशा काळांत भीमरावांचा जन्म व्हावा, हें त्यांच्या भावी उज्ज्वल व क्रांतिकारक चरित्राचें सूचक तर नव्हें?

# प्रकरण ४ थें

## बा ल्या व स्था

लॉर्ड किचनेर हे हिंदुस्थानचे सरसेनापती म्हणून आले तेव्हां त्यांनीं हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्याची योजना आंखली. १८९१ पर्यंत लष्करी पलटणींत सर्व जातींचे व धर्मांचे लोक असत. ते आपापल्या धर्माज्ञांप्रमाणें व रीतरिवाजांप्रमाणें खाजगी आयुष्य व्यतीत करीत असत. पण पलटणींच्या कार्यांत ते सर्व भेदभाव विसरून वागत. अशी व्यवस्था असल्यामुळें अनेक पलटणींत असलेल्या अस्पृश्य लोकांना खाजगी आयुष्यांत अस्पृश्य समजले जात असले तरी ते पलटणींतील कार्यांत इतरां-बरोबर समान दर्जानें वागत असत. सर्व पलटणींची पुनर्रचना जातीय पायांवर करा-वयाची योजना जेव्हां लॉर्ड किचनेरनें मनांत ठरविली तेव्हां याची छाननी करण्यासाठीं सरकारनें गॅटेकर कमिशन नेमलें. गॅटेकर हे लष्करांतील उच्चाधिकारी होते. किचे-नर साहेबांच्या या नव्या योजनेला खुद्द ब्रिटिशसरकारचा व हिंदुस्थानसरकारचा विरोध होता. किचनेर साहेब हे लष्करी कार्यांत तज्ज्ञ असले तरी ते व्यवहारांत अनभिज्ञ होते. त्यांतून त्यांचा स्वभाव एककल्ली. गॅटेकर कमिशननें निरनिराळ्या ठिकाणीं दौरे काढून व अनेकांच्या साक्षी घेऊन असा निकाल दिला कीं, किचनेर साहेबांची योजना व्यवहार्य आहे. तरीहि लष्कराची जातीय पायांवर उभारणी करण्याचा हुकूम १८९८ सालांत बाहेर पडला. गुरखा, जाट, रजपूत, शीख, पंजाबी, मराठे, इत्या-दिकांसाठीं जातवार पलटणी रचण्यांत आल्या. आणि महार व चांभार लोकांना पेन्शनींत जावयास सांगितलें. ज्यांची सर्व्हिस २५ वर्षांची झालेली आहे, त्यांनीं ताबडतोब पेन्शनसाठीं अर्ज करावा आणि ज्यांच्या सर्व्हिसला १२ वर्षांचा अवधि आहे, त्यांनीं तेवढी सर्व्हिस पुरी करावी, व नंतर पेन्शन घ्यावें असा कमिशनचा निकाल जेव्हां जाहीर झाला तेव्हां पलटणींतील अस्पृश्यांमध्यें व अस्पृश्यांतील पेन्शनर लोकां-मध्ये खूप खळबळ उडून गेली. या लोकांनीं शिष्टमंडळें पाठवून व अर्ज करून हिंदुस्थान सरकारला व ब्रिटिश सरकारला अशी विनंति केली कीं, आम्ही पिढ्यान् पिढ्या लष्करांत नोकरी केली व लष्करी पेशा हाच आमचा प्रमुख

व्यवसाय, तेव्हां सरकारनें आम्हांला लष्करी नोकरींतून काढून न टाकतां आमच्या पलटणी चालू ठेवाव्यात. याबाबतींत अनेक सुभेदार, सुभेदार मेजर, तलवार बहाद्दर वगैरे पदव्या असलेले महार पेन्शनरांनीं जोराची चळवळ केली. दुलभ्या सुभेदार हा बोलण्यांत फार हुशार होता. तो दिसण्यांतही फार उमदा होता. त्यानें सर्व हिंदुस्थानांतील अस्पृश्य मिलिटरीवाल्यांना एकत्र करण्याचा व सरकारबरोबर झगडण्याचा फार प्रयत्न केला. पण सरकारच्या हुकुमांत कांहींच फेरफार करण्यांत आला नाहीं.

ज्या अस्पृश्यांची सर्व्हिस २५ वर्षांची झाली होती त्यांनीं पेन्शनें घेतलीं; आणि ज्यांच्या सर्व्हिसला अजून १।२ वर्षे अपुरी होतीं ते नोकरींत राहिले. इतर बऱ्याच लोकांना बँड व कारकुनी कामें मिळालीं. पलटणींतील इतर कामें त्यांच्याकडे ठेवलीं नाहींत. रामजी सुभेदारांच्या सर्व्हिसला २ वर्षें अपुरी होतीं. म्हणून ते नोकरींत राहिले. अस्पृश्यांना मिलिटरींमधून काढूं नये याबद्दल जी १८९१ पासून चळवळ चालू झाली तींत त्यांनींहि भाग घेतलेला होता. त्यांचें इंग्रजी चांगल असल्यामुळें सरकारकडे विनंति–अर्ज पाठविण्याचें कार्य त्यांच्या सल्ल्याप्रमाणें होई.

पलटणींतील निरनिराळ्या शाखांत अस्पृश्य लोकांचा शिरकाव झालेला होता. रणांगणावर जखमी व घायाळ झालेल्या लोकांना सेवाशुश्रुषा करण्यासाठीं उचलून नेण्यासाठीं "धूली बेरर्स" जे होते ते सर्व महार. शत्रूंच्या गोळ्या चुकवीत व स्वतःचे प्राण संकटांत टाकून हे 'धूली बेरर्स' महार जखमी शिपायांना व अधिकाऱ्यांना धूलीवर (झोळी) घालून रणांगणांतून वाहत नेत व सेवाशुश्रषा पथकांच्या हवालीं करीत असत. लढून शौर्य गाजविणाऱ्या शिपायांप्रमाणें या धूली बेरर्सना महत्व होतें. किंबहुना त्यांचें महत्त्व कांकणभर जास्त होतें. जातीय पायावर लष्कराची पुनर्रचना झाल्यावर हे महार धूली बेरर्स नोकरींतून कमी झाले. व त्यांचें काम प्रत्येक पलटणींतील कांहीं लोकांना त्या त्या पलटणपुरतें करणें भाग पडलें. या मुद्यासंबंधीं टाइम्स ऑफ इंडियानें किचनेरच्या योजनेवर चांगलाच ताशेरा उडविला होता.

The Indian Army has had many old and experienced commanders and by them was evolved a system whereby all extraneous work, whether ambulance, transport, commissariot, officers, servants, etc.. was performed by non—combatants, leaving the fighting strength of a regiment free and intact to fight. Lord Kitchener coming from other fields where such arrangements were perhaps impossible, became observed with the idea that the Army was swamped by followers and proceeded in characteristic fashion, without further to do, to cut them down wholesale. Amongst those to suffer was the ambulance corps. Formerly on any Indian campaign there was a trained and highly efficient corps of *dhooly* bearers, men born and

bred to the job who performed with greatest gallantry and *sang-froid* their duties in action. These disappeared before the Kitchenerian scythe and in their place were enlisted attenuated cadres of inexperienced carriers, men who had never seen a *dhooly* and certainly never wanted to carry one. The first experience of the new experiment was in the small expeditions on the N.W. Frontier of last year, and assuredly the result was not encouraging. For every serious casualty at least six fighting men had to be withdrawn from the ranks to carry the wounded man to the rear, and these six, however willing, rarely had a chance of rejoining the ranks in time to be of any value. Tha corps of amateur *dhooly* bearers to whom the wounded men next fell were entirely incompetant and his sufferings were greatly augmented thereby. To feed a large number of useless mouths on service is wrong, but the old *dhooly*—bearer amongst others was gallantly worth his feed and liberated the fighting man for his true work." — Life of Shivram Janba Kamble. Page 152-153

ब्रिटिश साम्राज्याची व हिंदुस्थानसरकारची आम्ही पिढ्यान्‌पिढ्या इमानें इतबारें नोकरी केली आणि सरकारनें आम्हांला नोकरींतून कमी केलें व त्या नोकरींत पुनः न घेण्याचें जाहीर केलें, या घटनेच्या मागें कोणते हेतू व कोणतीं कारणें होतीं, याबद्दल पलटणींतील अस्पृश्य लोकांमध्यें दोन समज पसरलेले होते. बडोद्याचे नरेश सयाजीराव महाराज हे मुंबईस आले असतां (१८९०) त्यांना लष्कराची गार्ड ऑफ ऑनर (खडी ताजीम) देण्यांत आली. महाराज सर्व अधिकाऱ्यांशीं हस्तांदोलन करीत करीत त्यांच्याबद्दलची माहिती विचारीत. लक्ष्मण मेहतर या गृहस्थाशीं हस्तांदोलन करून महाराजांनीं त्याची चौकशी केली. तो चांभार (पलटणींतील चांभारांना म्हेतर हें उपनांव मिळालेलें होतें.) आहे असें समजल्यानंतर एका हलक्या जातीच्या गृहस्थाशीं आपणाला हस्तांदोलन करावें लागलें, याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें व हलक्या जातींतील लोकांना पलटणींतून कमी करा व त्यांना पलटणींत पुनः नोकरीला ठेवूं नका, असा महाराजानीं सरकारकडे लकडा लाविला. म्हणून सरकारनें अस्पृश्यांना पलटणींतून काढलें. दुसरा समज असा कीं, महारांनीं इंग्रजांना साहाय्य करून पेशवाई नष्ट केली याबद्दल टिळकांना फार राग आलेला होता. तुम्हीं आमच्यावर राज्य करा पण हीन जातींतील लोकांना तुमच्या नोकरीस ठेवूं नका, कारण त्यामुळें आमचा धर्म भ्रष्ट होतो, असा टिळकांनीं सरकारला सल्ला दिला व तो सरकारनें ऐकला. हे दोन्ही समज गैरसमज होते, हें उघड आहे. या गैरसमजांमुळें पलटणींतून काढले गेलेले अस्पृश्य लोक पुष्कळ दिवस सयाजी महाराज व टिळक यांच्या नांवानें खडे फोडीत होते.

जोपर्यंत अस्पृश्यांची भरती लष्करांत होत होती, तोपर्यंत अस्पृश्यांतील महार व चांभार या जातींचीं कांहीं कुटुंबें पिढ्यान्‌पिढ्या लष्करी पेशांत राहात असत. त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारली व रहाणीचें मान वाढत गेलें. परंतु लष्करी भरतीवर जेव्हां बंधन घालण्यांत आलें, तेव्हां त्या कुटुंबांचा पेशा नष्ट झाला; इतर पेशांत त्यांचा शिरकाव झाला नाहीं व त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति वाईट झाली, व त्याबरोबरच रहाणीचें मान घसरत घसरत खालीं गेलें.

सर्व्हिसला अपुरीं असलेलीं दोन वर्षें पुरीं झाल्यावर सुभेदारांनीं महूमध्यें असतांना (१८९४ सालीं) पेन्शन घेतलें. तें दरमहा ५० रुपयांचें होतें. त्यावेळीं त्यांचा भिवा अडीच वर्षांचा होता. अंगानें गुटगुटीत, चपळ व दंगेखोर असा तो त्यावेळीं होता. त्यावेळीं त्याचें खुलून दिसणारें एक वैशिष्ट्य म्हणजे कुरळे केस. वडिलांचा तो भलता लाडका होता. ते त्याला आपल्या पोटावर पालथा घालून झोपवीत असत. भिवा अडीच वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या डोकीस खवडें झालें. त्या आजारांत दोन तीन महिने गेले. त्यामुळें पेन्शन घेतल्यानंतर सुभेदार महूला पांच सहा महिने राहिले. त्यानंतर दापोलीला कायम राहण्याच्या उद्देशानें महूहून निघाले. लष्करांतून सेवानिवृत्त झाल्यानंतर महार व चांभार सैनिकांची व अधिकाऱ्यांची सुस्थिति झालेली असे, त्यांच्या आचाराविचारांत व रहाणींतहि खेड्यांतील महार व चांभार लोकांपेक्षां तफावत पडलेली होती. अशा परिस्थितींत सेवानिवृत्त लोकांना आपापल्या खेड्यांत जाऊन राहण्याची इच्छा राहिलेली नव्हती. आपल्या वस्तीस एकादें कायम ठिकाण असावें असा विचार जेव्हां लष्करांतील अस्पृश्यांनीं ठरविला, तेव्हां रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली हें गांव त्यांनीं मुकर केलें. तेथें पूर्वी लष्करी तळ ( मिलिटरी कँप ) होता.

लष्करांतील अस्पृश्यांनीं दापोलीला एक विस्तीर्ण गांवठाण सरकारकडून घेतलें व तेथें पेन्शनरांची वसाहत स्थापन केली. ही वसाहत 'कॅम्प दापोली' या नांवानें प्रसिद्धी पावली. सुभेदार येथें १८९४ सालांत येऊन राहिले. त्यावेळीं तेथें सुभेदारांचीं ३६० व इतर अनेक हवलदार, जमेदार इत्यादी पेन्शनरांचीं कुटुंबें राहात होतीं. त्यांच्या मुलामुलींसाठीं एक उत्तम मराठी व इंग्रजी शाळा होती. मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाची सोय उत्तम आहे व पलटणींतील आपले मित्र, सहकारी व नातलग येथेंच राहातात हें पाहून दापोलीला आपलें स्वतःचें घर बांधावें असें सुभेदारांनीं ठरविलें. व त्याप्रमाणें ते प्रयत्न करूं लागले.

लष्करांत नोकरी करीत असलेल्या महार व चांभार लोकांना दारू पिणें व ब्रह्मज्ञान समजावून घेणें ही दोन व्यसनें जडलेलीं होतीं. लष्करांतील कमीजास्त अधिकाऱ्यांच्या मानानें प्रत्येकानें राहावें, ही एक शिस्त त्यांना लागलेली होती. व ती त्यांनीं खाजगी राहणींतहि कडक रीतीनें पाळली होती. म्हणजे मेजर सुभेदार, तलवार बहादूर व सरदार या पदव्या धारण केलेले लोक सुभेदार, जमेदार, हवलदार,

इत्यादि खालच्या दर्जाच्या पदवीधरांनीं कमी लेखीत. सुभेदार, जमेदार, इत्यादि लोकहि तसेच वागत. यामुळें वऱ्या पदवीधरांची घरें एका बाजूला व खालच्या पदवीधरांचीं घरें दुसऱ्या बाजूला असत. शिवाय, रामानंद पंथी व कबीरपंथी व हे पंथ न स्वीकारलेले अस तीन प्रकारचे धर्म पाळणारे पेन्शनर होते. ते आपल्या घराशेजारीं इतर पंथांच्या लोकांना घरें बांधू देत नसत. या सर्व कारणांमुळें या पेन्शर लोकांत ऐक्य कधींच झालें नाहीं. लष्करांतील वरचढपणाच्या पदव्या. पैसापाणी, ब्रह्मज्ञानासंबंधी वादविवाद करणाऱ्या बैठकींतील वरचढपणा, वगैरे गोष्टींमुळें या लोकांमध्यें अनेक पक्ष उत्पन्न झाले होते. शिवाय नाझागोत्र्यांच्या भानगडींमुळें त्यांच्यांत विलक्षण फाटाफूट झाली होती.

सुभेदारांनीं रामानंद पंथ व कबीर पंथ यांची दीक्षा घेतलेली नव्हती. परंतु त्यांनीं दोन्ही पंथांतील सर्व गोष्टींचा सूक्ष्म अभ्यास केलेला होता. कधीं कधीं या दोन पंथांतील लोकांच्या बैठका भरत; कधीं कधीं एकाच पंथांतील लोकांच्या बैठका भरत. या बैठकांमधून २।३ दिवस ब्रह्मज्ञानावर वादविवाद होत असत. रामजी सुभेदारानीं कोणताहि पंथ स्वीकारलेला नव्हता तरी त्या पंथांतील कमकुवत पक्षाचे लोक आपल्या पक्षातर्फें वादविवाद करण्यास त्यांना आमंत्रणें देत व आग्रहानें बैठकीस घेऊन जात. ते तर्कशुद्ध बोलत व दाखले देऊन स्वतःचें म्हणणें पटवून देत. त्यामुळें त्यांचें वादविवादांतील म्हणणें सर्वांना पटे. खुद्द विरुद्ध पक्षाचे लोक त्यांच्या ज्ञानाबद्दल माना डोलावीत. त्यांची देहयष्टि उंच व धिप्पाड होती. त्यांचा आवाज खणखणीत व पल्लेदार होता. त्यामुळें त्यांची श्रोत्यावर विलक्षण छाप पडे. त्यांच्या यशस्वी वादविवादपटुत्वावर खूष होऊन लोकांनीं त्यांना 'चतुर सुभेदार' हें नांव दिलें होतें. जर का त्यानीं एकाद्या पंथाचा स्वीकार केला असता तर त्यांना लोकांनीं 'महंत' 'ब्रह्मज्ञानी' वगैरे पदव्या दिल्या असत्या. त्यांच्यापुढें आपणाला वादविवादांत हार खावी लागणार हें जाणून विरुद्ध पक्षाचे लोक पुढें पुढें त्यांना वादविवादांत बोलण्यास हरकत घेऊं लागले. ते म्हणत, तुमचा गुरु कोण? पंथ कोणता? तुम्हांला येथें बोलण्याचा अधिकार काय? म्हणजे असें कीं, जे पंथाची दीक्षा घेतलेले लोक आहेत तेच वादविवादांत भाग घेण्यास लायक. इतरांना तो अधिकार नाहीं. असले मुद्दे उपस्थित करून विरोधी पक्षाचे लोक सुभेदारांना भरल्या बैठकींतून उठून जावयास लावत. असले अपमानास्पद प्रसंग त्यांच्यावर अनेक आले. आपल्या चाहात्यांच्या व मित्रांच्या मुर्वतीसाठीं असले अपमान त्यानीं सहन केले.

सुभेदारांनीं घरासाठीं जें स्थान पसंत केलें होतें तें एका सुभेदार मेजरच्या घराशेजारीं होतें. हे गृहस्थ होते पैसेवाले. शिवाय ते कबीरपंथी व मिजासखोर होते. सुभेदारांच्या मुलींचीं लग्नें झालीं तरी त्या आपल्या मुलांसह वडिलांच्याकडे राहावयास येत. शिवाय आल्या गेल्या पाहुण्यांची चोख निगा राखणें, हा एक सुभेदारांचा विशेष सद्गुण होता. यामुळें त्यांचा पैसा सढळ हातानें खर्च होई. त्यामुळें

लोकांच्या डोळयांत भरेल असला ऐषआराम त्यांच्या घरांत दिसून येत नसे. आपल्यापेक्षां पैशानें व दर्जानें जे कनिष्ठ आहेत त्यांच्याकडे तुच्छतेनें पाहण्याची वहिवाट दापोलींतील पेन्शनरांमध्यें रुळलेली होती. उपरिनिर्दिष्ट सुभेदारमेजर व त्यांच्या घरांतील माणसें सुभेदार व त्यांचें कुटुंब यांच्याकडे तुच्छतेनें पहात असत. सुभेदारांनीं जेव्हां घरासाठीं स्थळ मुक्रर केलें व त्यासाठीं त्यांनीं कलेक्टरकडे अर्ज केला तेव्हां या सुभेदार मेजरनें सुभेदारांबरोबर भांडण उकरून काढलें. मुलांच्या खेळण्यांतील भांडणावरून, पाणी भरण्यावरून आणि इतर किरकोळ कारणांवरून विरोधी पक्षांतील स्त्रिया भीमाबाईबरोबर भांडण तंटे उपस्थित करूं लागल्या. भीमाबाई त्या सर्व स्त्रियांना पुरून उरलेल्या होत्या. पण सर्व स्त्रियांनीं त्यांच्यावर बहिष्कार टाकला. तेव्हां त्यांनीं मुलांना इतर मुलांमध्यें मिसळूं दिलें नाहीं. सुभेदारांच्या ब्रह्मज्ञानांतील वरचढपणाबद्दल ज्यांना मत्सर वाटत होता ते लोक घरजागेच्या प्रकरणांत सदर सुभेदारमेजरला सामील झाले व त्यांनीं सर्वांनीं मिळून सदर स्थळ रामजी सुभेदारांना घर बांधण्यास देऊं नये अशा अर्थाचा अर्ज केला व खुद्द कलेक्टर, प्रांत व मामलेदार यांना वरचेवर भेटून तें प्रकरण पेटविलें.

नियमानुसार या प्रकरणाची चौकशी झाली. जाबजबान्या झाल्या. हें स्थळ रामजी सुभेदारांना कां देऊं नये, याबद्दल सयुक्तिक कारण विरोधकांना सांगता येईना; तेव्हां त्यांनीं अशी जबानी दिली कीं, रामजी सुभेदार हे आमच्या धर्मपंथाचे नाहींत, आणि ते व त्यांची बायको भांडखोर आहेत. विरोधकांची ही बदमाषी पाहून सुभेदार चिडीस पेटले व याच ठिकाणीं घर बांधून राहीन, असा त्यांनीं निग्रह केला. कलेक्टराला भेटून त्यांनीं सर्व परिस्थिती समजावून सांगितली, व त्या स्थळीं घर बांधण्याची त्यांनीं कलेक्टरची संमति मिळविली. त्यांना तसा लेखी हुकूम येणार हें जाणून विरोधकांनीं व त्यांच्या स्त्रियांनीं आणि मुलांनीं उघड विरोधाचें धोरण स्वीकारलें. ते सुभेदारांना, भीमाबाईना व मुलांना परोपरीनें त्रास देऊं लागले. पुष्कळ वेळां मारामारीचे प्रसंग उद्भवत. तेव्हां बाळाराम व आनंदराव हे हातांत काठ्या घेऊन विरोधी पक्षांतील लोकांच्या अंगावर धांवून जात आणि ४।५ वर्षांचा चिमुकला भिवा हातांत दगड घेऊन ते विरुद्ध पक्षावर फेकीत असे, आणि तोंडानें त्यांच्यावर शिव्यांचा वर्षाव करीत असे.

विरोधी लोकांची दररोजची कटकट होत असे, व सुभेदार आणि भीमाबाई तोंड देत असत. परंतु भीमाबाई मस्तशूळाच्या व्यथेनें जर्जर झालेल्या होत्या. तेव्हां ही कटकट कायमची दूर करण्यासाठीं त्यांनीं पतीला दापोलीला घर बांधण्याचा आग्रह सोडून देऊन कांहीं दिवस मुरबाडला जाऊन रहावें व त्यानंतर योग्य त्या स्थळीं जाऊन कायम राहावें असा सल्ला दिला. पण तो सुभेदारांनीं मानला नाहीं. कुलस्वामिनी भवानी हिची यथासांग पूजा करण्याबद्दल त्या पतीला अधून मधून

सांगत असत. भिवाच्या डोकीला खवडें झालें तेव्हां भीमाबाईनें याबद्दल पतीचें वचन घेतलेलें होतें. पण विरोधकांची नांगी मोडून घर बांधून पूर्ण करणें हेंच कार्य त्यांना त्या-वेळीं महत्त्वाचें वाटत होतें. त्यामुळें मुरबाडला जाऊन राहणें व भवानीची यथासांग पूजा करणें या गोष्टीकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. या बाबतींत पतिपत्नी अनेक वेळा बोलत. एकदां बोलतां बोलतां प्रकरण चिडीस गेलें. पतिपत्नींचें भांडण फार वेळ चाललें. मुलांना जेवूं घालून भीमाबाईनें त्यांना झोंपवलें व घरांतील सर्व सामानाची बांधा-बांध करून तिनें बैलगाडी ठरवून आणली व तींत सामान व मुलें ठेवून ती पहांटेस मुरबाडच्या वाटेस लागली. पत्नीचा हट्टी स्वभाव माहीत असल्यामुळें सुभेदारानीं पत्नीला या बाबतींत विरोध केला नाहीं. तीन चार दिवसांनंतर सुभेदारहि मुरबाडला गेले. दापोलीस घर बांधण्याचें सोडून द्या असें सुभेदारांना मुरबाड-करांनीं वेळोवेळीं सुचविलें. पण सुभेदार आपला निश्चय सोडण्यास तयार होईनात दापोलीस मुलांचें शिक्षण पूर्ण झालें व त्यांना उच्च शिक्षण द्यावयाचें तुम्ही ठरविलें, तर तुम्हांला मुलांना दुसरीकडे ठेवावें लागेल; तेव्हां तुम्ही असें ठिकाण शोधून काढा कीं तेथें राहून तुम्हांला मुलांचें प्राथमिक व उच्च शिक्षण संपूर्ण करतां येईल असा सल्ला मुरबाडकरांनीं जेव्हां दिला तेव्हां सुभेदारांना तो पसंत पडला. कारण मुलांना संपूर्ण शिक्षण द्यावयाचें व भिवावर सारी भिस्त ठेवावयाची, हें त्यांनीं अगोदरच मनांत ठरविलेलें होतें. हा सल्ला त्यांना पटल्यानंतर दापोलीचें स्थळ आपणाला नको असें सुभेदारांनीं कलेक्टरास लिहून कळविलें. आपण मुंबईला कायम राहिलों तर मुलांचें शिक्षण आपणाला संपूर्ण करतां येईल, असें सुभेदारांनीं ठरविलें. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा व मुलांच्या शिक्षणाचा खर्च आपल्या पेन्शनींत भागणार नाहीं, त्यासाठीं आपणाला नोकरी करावी लागेल असें ठरवून त्यांनीं मुंबईत नोकरी मिळविण्यासाठीं निरनिराळ्या युरोपियन मिलिटरी ऑफिसर्सकडे पत्रें पाठविलीं. तेव्हां एका अधिकाऱ्याकडून उत्तर आलें कीं, सातारा पी. डब्ल्यू. डी. च्या कचेरींत स्टोअर कीपरची जागा खालीं आहे तिकडे अर्ज करावा. अर्ज केल्यानंतर त्यांना नोकरीचें बोलावणें आलें. सर्व कुटुंब पुनः दापोलीला परतलें होतें तें दापोलींतून साताऱ्याला १८९६ सालांत आलें. साताऱ्याच्या लष्कर भागांतील महारवाड्याच्या समोरील एका जागेंत विस्तीर्ण झोपडीवजा घर तयार करून सुभेदार तेथें राहूं लागले. थोड्या दिवसांनंतर त्यांनीं एक बंगला भाड्यानें घेतला व तेथें ते राहूं लागले. आसपास दहाबारा पेन्शनरांचीं (कोकणस्थ महार) कुटुंबें राहात होतीं. तीं कुटुंबें साताऱ्याला ४०-५० वर्षे अगोदर येऊन स्थायिक झालेलीं होतीं. त्या पेन्शनरांपैकीं ९ व्या पलटणीचे (नाईन्थ बॉम्बे इन्फंट्री) सुभेदार मेजर व सरदार बहादूर इटनाक भिकनाक देवळेकर, जमादार निवरेकर, १२ व्या पलटणीचे भागूराव मुरबाडकर आणि पिंपरीकर बुवा हे होते.

सुभेदार मेजर व सरदार बहादूर इटनाक भिकनाक देवळेकर हे लष्करी दर्जानें व सांपत्तिक स्थितीनें सर्वांत श्रेष्ठ असल्यामुळें ते त्या महार पेन्शनरांमध्यें आदरणीय समजले जात. ते कबीरपंथी होते. परंतु वाचन व अभ्यास कांहीं नाहीं. ते रंगानें काळे व किरकोळ होते. चांगले कपडे व दागदागिने घालून मिरविण्याची त्यांना फार हौस. सुभेदार रामजी हे रंगानें गोरे, शरीरानें धिप्पाड व उंच होते. ते डोकीस सफेत दुपेटा वापरीत व अंगावर साधे कपडे वापरीत. पण ते दिसायला आकर्षक व आदरणीय वाटत. तशांतून आध्यात्मिक विषयांत त्यांचा खोल अभ्यास झालेला व उत्तम तऱ्हेचे विवादपटु म्हणून त्यांचा लौकिक झालेला होता. ते गणपति वगैरे देवतांची पूजा दररोज करीत व त्यासाठीं ते सकाळीं २ तास व संध्याकाळीं २ तास खर्च करीत. ते संस्कृत श्लोक, स्तोत्रें व गीतेंतील श्लोक पूजेच्या वेळीं म्हणत. पूजेच्या वेळीं त्यांचीं लहान मुलें त्यांच्या सभोंवती बसून असत. तीं पाठ झालेलीं स्तोत्रें व श्लोक वडिलांच्या बरोबर म्हणत असत. त्यांच्या कुटुंबाची राहणी उच्च दर्जाची व शुद्ध त्यामुळें देवळेकरांच्या कुटुंबापेक्षां रामजी सुभेदारांच्या कुटुंबाला आसपासचे लोक जास्त मान देऊं लागले. ही परिस्थिती पाहून देवळेकर प्रथम मत्सरानें तडफडत राहिला. परंतु तो गृहस्थ समंजस होता. त्याला रामजीच्या ज्ञानाची व संस्कृतीची जसजशी जास्त माहिती होत जाऊं लागली तसतसा त्याचा मत्सराग्नि विझत चालला. व शेवटीं तो रामजीला मान देऊन राहूं लागला.

→ देवळेकरांच्या घरासमोर एक वडाचें झाड होतें. त्याच्या सावलींत खेळण्यासाठीं सर्व मुलें जमत. ५।६ वर्षांचा भिवा दररोज खेळण्यास येई. तो शरीरानें दणकट असे. त्याचे महू व दापोली येथील पूर्वीचे दिवस तंटेबखेडे व मारामाऱ्या पाहण्यांत व शिव्या देण्यांत गेलेले होते. वडाच्या झाडाखालीं जीं मुलें खेळण्यास येत तींहि अशाच वातावरणांत वाढलेलीं होतीं. त्यांत भिवापेक्षां वयानें व हीं शरीरानें मोठीं मुलें असत. खोखो, विटीदांडू, चेंडूलगोऱ्या, फूटबॉल, क्रिकेट वगैरे मुलें खेळत. त्यांत भिवाचें वैशिष्ट्य म्हणजे खेळांत आपली जीत कधीं कबूल करावयाची नाहीं; आणि आपली जीत झालेली असतांही 'जीत झालेली नाहीं' असें इतर मुलांच्या तोंडून वदवून घ्यावयाचे. मुलें तसें करण्यास तयार झालीं नाहींत तर त्यांच्यावर शिव्यांचा वर्षाव करणें, त्यांना धरून बडविणें व मोठ्या वयाच्या व शरीरांच्या मुलांना लांब उभें राहून दगड मारणें. ज्या मुलांना भिवाकडून मार खावा लागे त्यांचे आईबाप भिवाच्या आईबापाबरोबर भांडावयास येत असत. असलीं भांडणें बहुधा दररोजचीं असत व तीं मिटवितांना त्याच्या आईबापाच्या व बहिणीच्या नाकीं नऊ येत. मुलें खेळतांना आरडाओरड व दंगा करीत असत. त्यांत भिवाचा नंबर पहिला. सुरपारंब्या खेळतांना इतर मुलें वडाच्या डहाळीबरोबर लोंबकळत जमिनीवर उड्या मारून काठीस शिवावयास येत. भिवाची स्वारी डहाळीपासून उडी घेई ती प्रथम देवळेकरांच्या छपरावर व तेथून

जमिनीवर. छपरावर उडी मारल्यामुळें आंत कचरा होई व आवाज होई. जीं माणसें दुपारीं छपरांत झोपलेलीं असत त्यांची झोपमोड होई. झोपमोड झालेले लोक भिवाला अद्वातद्वा बोलून दमदाटी देत कीं, पुनः छपरावर उडी मारलीस तर तुझे पाय मोडूं! लोक झोपावयास गेले व खेळ परत सुरूं झाला कीं भिवाची स्वारी नेमकी त्याच छपरावर उडी मारावयाची व तेथून जमिनीवर! लोक संतापून भिवाला मारण्यास धांवत; तेव्हां हे वीर तेथून सुंबाल्या करीत. भिवा अशा यःपलायनाच्या अवस्थेंत असलेला पाहून देवळीकर संतापानें लाल होऊन जात; व भिवाला शिव्यांची लाखोली वहात. 'भिव्या! तुला पटकी कशी रे येत नाहीं! म्हणजे तुझ्या त्रासांतून एकदांचे आम्ही सुटूं!' असे शिव्याशाप एके दिवशीं देवळीकरांनीं दिले. त्या दिवशीं भिवानें देवळकिराच्या घरांतलि मुलांना गांठून यथेच्छ बडविलें व काळोख पडल्यावर देवळीकरांच्या शेळयांचीं दावीं सोडून त्यांना लांब नेऊन सोडलें. खुराड्यांतील कोंबड्या नेऊन दुसऱ्या ठिकाणीं लपवून ठेवल्या. त्यानंतर भिवानें देवळीकरांच्या घरावर दगड फेकले. दोन्ही कुटुंबांतील मोठ्या माणसांमध्यें भांडण जुंपलें. तें बरेंच विकोपास गेलें. देवळीकरांनीं सुभेदारांशीं भाषण वर्ज्य केलें.

भिवाच्या या दांडगाईबद्दल घरच्या व बाहेरच्या लोकांचा मार त्यास खावा लागे. अशा वेळीं त्याचें आश्रयस्थान म्हणजे मीरा आत्या. ती भिवाला पाठीमागें लपवून घेई व त्याचा मार अनेक वेळां चुकवी. हा मार बहुतेक आईच्या हातचा व व क्वचित् थोरली बहिण तुळसा हिच्या हातचा मिळे. वडील भिवाचे लाड करीत. त्याच्या दांडगाईचें व भांडखोरपणाचें कौतुक करीत. त्यानें उडवून दिलेल्या कहरांतून जीं भांडणें उपस्थित होत त्यांना ते तोंड देत. अधून मधून ते भिवाला दटावीत व माराची भीति घालीत. पण प्रत्यक्ष मारीत नसत. देवळेकरांच्या बरोबर जेव्हां भांडण झालें तेव्हां मात्र वडिलांनीं भिवाला चोप दिला. व इतर मुलांमध्यें इतःपर खेळावयास जाऊं नकोस, गेलास तर बेदम मारीन, असा वडिलांनीं त्याला धाक दपटशा दिला. त्यांनीं भिवाला चार पांच दिवस घरांतून बाहेर पडूं दिलें नाहीं. तो बाहेर जाण्यास चुळबूळ करूं लागला कीं, वडील माणसें त्याला दटावून घरांतच बसवून घेत. त्याची ही कोंडलेली व केविलवाणी स्थिति पाहून वडिलानीं त्याला क्रिकेट, विटीदांडू, वगैरे खेळांचें सामान आणून दिलें. व घरांतील बहिणींच्या मुलांशीं स्वतंत्रपणें खेळावयास भिवाला परवानगी मिळाली. थोड्याच दिवसांनीं तेथील कांहीं पेन्शनर लोकांनीं आपलीं कुटुंबें तेथून हालविलीं तेव्हां रामजी सुभेदारांचें कुटुंब आणि दुसरीं दोन कुटुंबें कांहीं दिवस तेथें राहिलीं. भिवाला आपले भांडणतंटे बहिणींच्या मुलांशीं करणें भाग पडलें. परंतु लौकरच त्याला इतर मुलांमध्यें हुदडायला व भांडण्याला मिळालें.

भिवानें कितीहि भांडणें उत्पन्न केलीं किंवा घरांतील सामानाची नासधूस केली अगर घरांतील लहान मोठ्या माणसांशीं दांडगाई केली तरी सुभेदार त्याला रागावीत

नसत. भीमाबाई मात्र त्याचा खरपूस समाचार घेई. आपणाला आईनें चोप दिल्याची हकिगत भिवा वडिलांना सांगत असे. व " बाबा ! तुम्ही बईला मारा " असा हट्ट धरून बसे. तेव्हां सुभेदार पत्नीला रागावून सांगत कीं, 'हे बघ भिवाचे गणपतीसारखे कान व पोट, या बघ त्याच्या हातांवरील भाग्यवंताच्या रेषा. भिवा भाग्यवंत आहे. तुझ्यापोटीं तो आला आहे यांत धन्यता मान. तो फार मोठा व किर्तिवंत होणार आहे. त्याच्या या सान्या खोड्या म्हणजे कृष्णानें लहानपणांत केलेल्या खोड्यांसारख्या आहेत. त्या तूं निमूटपणें सहन केल्या पाहिजेत. त्याच्या अंगाला हात लावतां कामा नये.' असें म्हणून ते भिवाला पोटाशीं घट्ट धरीत. त्याचे पटपट मुके घेत. महूला असतांना सुभेदार भिवाला आपल्या पोटावर पालथा निजवीत असत. भिवाला ही जी संवय झाली ती तो सात वर्षांचा होईपर्यंत राहील. वडिलांना कांहीं कामानिमित्त बाहेर राहणें झालें तर ते येईपर्यंत भिवा डुलक्या घेत अंथरुणावर बसे. कोणाच्याहि रागावण्यानें अगर धाकदपटशानें तो अंथरुणाला अंग लावीत नसे. वडील आल्यानंतर ते त्याला पोटावर पालथा घेऊन थोपटून झोंपवीत.

सुभेदारांच्या घराशीं ममत्वानें वागणारें एक कुटुंब होतें. तें पिंपरीकर बुवांचें. सुभेदारांचा व बुवांचा नात्याचा संबंध होता. बुवांच्या घरांत भिवाचें कोडकौतुक होई व खावयास भरपूर मिळे. बुवांच्या पत्नीला कोंबड्या पाळण्याचा फार नाद असे. तिला न कळूं देतां भिवा खुराड्यांतील अंडीं पळवून नेई व सवंगड्यांना जमा करून तीं त्यांना प्यावयास देई. या चोऱ्या भिवा मुलांच्या चिथवण्यावरून करीत असे. 'अंडीं कोणीहि आणील; पण तुला कोंबडीचीं पिल्लें आणतां येणार नाहींत.' असें एकदां मुलांनीं भिवाला चिडीस घातलें. तेव्हां 'मी पिल्लें घेऊन येतों' म्हणून त्यानें मुलांना वचन दिलें. पिंपरीकर व त्यांची पत्नी दुपारीं वामकुक्षी करीत असलेली पाहून भिवानें दोन पिल्लें पकडलीं व धांवत जाऊन तीं मुलांच्याकडे दिली. त्या पिल्लांचें काय करावयाचें, यावर मुलांमध्यें चर्चा सुरू झाली. तेव्हां भिवानें सुचविलें कीं, 'हीं पिल्लें आपण भाजून खाऊं या.' लगेच मुलांनीं काटक्या गोळा केल्या व त्यांना आग लावली व त्यांत पिल्लें होरपळून तीं त्यांनीं खाल्लीं. पिंपरीकर बुवांच्या पत्नीनें अंड्यांवर कोंबडी बसविलेली होती. तीं अंडीं खाण्याचें मुलांनीं ठरविलें व तीं अंडीं हस्तगत करण्याचें काम भिवाकडे देण्यांत आलें. तेव्हां भिवा दुपारीं बाईकडे आला व तिला म्हणाला, "बय ! हें शिंक्याला काय वर लावलें आहेस?" बाई म्हणाली, "मी अंड्यांवर कोंबडी बसवलेली आहे." भिवा म्हणाला, "किती दिवसांनीं कोंबडी पिल्लें काढील?" बाई म्हणाली, "पंधरवड्यांत." भिवा म्हणाला, "अग पण तूं कोंबडी बसवून दहा दिवस झाले. कोंबडीनें कांहीं केलेलें तूं पाहिलेंस कीं नाहीं?" बाई म्हणाली, "नाहींरे बाबा." भिवा म्हणाला, "अग तें लौकर बघून घे नाहींतर सर्वच घोटाळा होईल. कारण तीं सर्व अंडीं नासून जातील." भिवाचा हा सल्ला बाईला पसंत पडला व तिनें अंड्यांची

टोपली खालीं उतरली. तेव्हां भिवा टोपली उघडून बाईस म्हणाला, "बघ! मी सांगत होतों तेंच होणार. ही कोंबडी काय पिलें घालणार आहे! असल्या कोंबड्या अंडीं नासवतात. काढ तिला बाजूला आणि बसव दुसरी कोंबडी; नाहींतर हीं सर्व अंडीं फुकट जातील बघ." बाई विचारांत पडली. कारण सर्व कोंबड्या अंडीं उबवीत नाहींत, हें तिला माहित नव्हतें. तिला भिवाचा सल्ला पसंत पडला व ती म्हणाली, "आतां दुसरी कोंबडी बसवायला पाहिजे." पण भिवा म्हणाला, "ती या अंड्यांवर कशाला? या अंड्यांवर दुसरी एक कोंबडी बसलेली होती, हें आतां तूं जी कोंबडी बसविणार आहेस तिला पसंत पडणार नाहीं. व हीं अंडीं एक दोन दिवसांत नासून जाणार. तीं आतां तूं व्यर्थ घालवूं नकोस. बुवांना ७।८ अंडीं खावयास ठेव व बाकीचीं मला देऊन टाक. तूं असें नाहीं केलेस तर सर्व अंडीं फुकट जातील बघ." पिंपरेकर बाईनें भिवाचा सल्ला निमूटपणें ग्राह्य मानला. भिवानें मुलांना अंडीं नेऊन दिलीं व त्यांच्याकडून वाहवा मिळविली. सर्व मुलांनीं वडाच्या झाडाखालीं बसून अंडीं पिऊन टाकलीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३५४९ विः
क्रमांक ........ नों: दि: ........

# प्रकरण ५ वें

## विद्यार्थी–सातारा

१८९६ सालांत सुभेदार साताराला आले. तेव्हां त्यांनीं कबीरपंथाची दीक्षा घेतली. स्टोअर-कीपरच्या कामांतून त्यांना मुबलक वेळ मिळे. सकाळीं पहांटेस ५ वाजल्यापासून ते भूपाळ्या व स्तोत्रें म्हणत. ७ ते ९ पूजा करीत. पुनः सायंकाळीं एक दोन तास ते पूजा व प्रार्थना करीत. प्रत्येक पौर्णिमेला व अमावास्येला ते कडक उपास करीत. घरांतील सर्व माणसांबरोबर सूर्यास्ताच्या वेळीं पूजा व प्रार्थना करण्यास बसत. प्रार्थनेंतील कबीराचे दोहे, तुकारामाचे व चोखोबाचे अभंग, दत्ताचीं संस्कृत स्तोत्रें व गीतेंतील कांहीं श्लोक ते म्हणत व इतर माणसें त्यांच्या मागून म्हणत असत. गीतेंतील त्यांचे आवडते श्लोक माणसाच्या आत्म्याच्या अमरत्वाबद्दल होते. ते श्लोक म्हणतांना त्यांच्या चेहऱ्यावर जें गांभीर्य येई तें पाहण्यांत आसपासचे लोक रंगून जात. पूजा संपत आली म्हणजे ते हातांत बत्तासा घेत व त्यावर कापूर ठेवून त्याला काडी लावीत. कापूर पेटल्यानंतर ते गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील १९ ते २३ श्लोक म्हणत :

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हानी न हन्यते ॥१९॥**
**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वाऽभविता वा न भूय ः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽचं पुराणो न हन्यते हन्यमाने न शरीरे ॥२०॥**
**वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।**
**कथं स पुरुषः पार्थ कं घातयनी हन्ति कम् ॥ २१ ॥**
**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृहणाति नरो ऽ पराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥२२॥**
**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥**

हे श्लोक म्हणतांना त्यांचा स्वर अत्यंत गंभीर व मधुर असे. या श्लोकांचा

सारांश असा कीं, आत्मा अमर आहे. त्याला कोणी मारीत नाहीं. किंवा तो कोणाला मारीत नाहीं. शस्त्र त्याचे तुकडे करूं शकत नाहीं. अग्नि त्याला जाळूं शकत नाहीं. पाणी त्याला भिजवूं शकत नाहीं. वारा त्याचें शोषण करूं शकत नाहीं. कपडे फाटके झाल्यानंतर मानव तीं वस्त्रें फेकून देतो व नवीं वस्त्रें अंगांत घालतो. तसेंच आत्मा मृत शरीरांना टाकून देतो व नव्या शरीरांत प्रवेश करतो. शेवटचा श्लोक म्हणून झाला कीं ते आपली ओंजळ सर्वांपुढें करीत व पेटलेल्या कापरावर सर्वांनीं आपले पंजे ठेवून दर्शन घेतल्यानंतर तो बत्तासा पेटलेल्या कापरासकट स्वाहा करीत. पौर्णिमेच्या दिवशीं हा विधि चंद्रोदय होत असतांना करण्यांत येई. पूजा संपल्यानंतर ते सर्वांना प्रसाद वाटीत असत. प्रसाद देतां देतां सर्वांना आशीर्वाद देत असत. ' भिवा, तूं फार फार शिकणार आहेस, मोठा पंडित होणार आहेस. तूं मोठी कीर्ति मिळव आणि आपल्या कुळाचें नांव जगांत गाजव ' अशा अर्थाचा आशीर्वाद ते भिवाला देत. त्याच्या डोक्यावरून व पाठीवरून हात फिरवीत ते उपास सोडावयास बसत.

कबीर पंथाची दीक्षा घेण्याचे अगोदर सुभेदार प्राथना व पूजा दर दिवशीं करीत असत. कबीरपंथाच्या रिवाजाप्रमाणें पंथाची बंदगी ( नमाज ) दिवसांतून २ ते ५ वेळां करावी लागे. सुभेदार ती दोन वेळां करीत. दीक्षा घेतल्यानंतर त्यांनीं मांसाहार सोडला. ते प्रसंगोपात् मद्यप्राशन करीत असत, पण त्यांना त्याचें व्यसन मुळींच नव्हतें. दीक्षा घेतल्यानंतर त्यांनीं मांसाहार व मद्यपान कधींच केलें नाहीं. सडासंमार्जन घातल्याशिवाय व स्नान केल्याशिवाय त्यांच्या घरांतील स्त्रिया स्वयंपाक करीत नसत. दीक्षा घेतल्यानंतर या बाबतींतील सोंवळें कडक झालें. त्यांच्याशिवाय इतर माणसें मांसाहार करीत असत. दीक्षा घेतल्यानंतर घरांत दोन चुली मांडाव्या लागल्या. ज्या दिवशीं घरांत मांसाहाराचे पदार्थ आणिले जात त्या दिवशीं ते पदार्थ एका चुलीवर शिजविले जात व दूरवर असलेल्या चुलीवर सुभेदारांचा स्वयंपाक करावा लागे. त्यांचा स्वयंपाक त्या दिवशीं पत्नीनें अगर एखाद्या मुलीनें केला तर त्यांना सुभेदारांचें जेवण आटोपेपर्यंत त्या पवित्र चुलीपुढील भागांतच सोंवळ्यानें राहावें लागे. त्या भागांत प्रवेश करण्यास इतरांना मज्जाव असे.

भक्ति, भजन व पूजा यांमुळें घरांतील वातावरण कसें झालेलें होतें व त्याचे परिणाम कोणावर कालांतरानें कसे झाले याबद्दलची माहिती बाबासाहेबांच्या शब्दांत खालीं देतों :

" आमचें कुटुंब गरीबीचें असलें तरी त्यामधलें वातावरण पुढारलेल्या सुशिक्षित कुटुंबाला शोभेल असें होतें. आम्हांमध्यें विद्येची अभिरुची उत्पन्न व्हावी, आमचें चारित्र्य सोज्वल बनावें यासाठीं आमचे वडील अतिशय दक्ष असत. जेवायला बसावयाच्या आधीं ते आम्हाला देवघरांत बसवून भजनें, अभंग, दोहे म्हणायला लावीत. अर्थातच

आम्ही सर्व-त्यापैकीं विशेषतः मी नेहमींच अळंटळं करावयाचा.- कसे तरी दोनचार अभंग अर्धेमुर्धे म्हणून जेवणासाठीं ताटावर येऊन बसावयाचे! लगेच वडील आम्हांला हटकून विचारायचे "कां रे, आज लवकर संपलें तुमचें भजन?" त्यांच्या त्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या आधींच आम्ही तेथून पसार झालेलों असावयाचे. पण ही सकाळची धांदल. संध्याकाळच्या वेळीं मात्र आमचे वडील केव्हांही चालू देत नसत. रात्रीचे आठ वाजले कीं माझ्या दोघी वहिणी, माझे वडील बंधू व मी देवघरापाशीं जमा झालेंच पाहिजे असा त्यांचा कडक नियम होता. कोणी गैरहजर राहिल्यास त्याला ते कधींही क्षमा करीत नसत. ज्यावेळीं ते भक्तिभावानें संतांचे अभंग आणि कबीराचे दोहे म्हणूं लागत, त्यावेळीं अतिशय गंभीर आणि पवित्र वातावरण निर्माण होत असे. आमच्या वडिलांचें पाठांतर फार असे. अभंगामागून अभंग ते म्हणूं शकत. वडिलांच्या पाठांतराचें आम्हाला कौतुक वाटे. त्याचप्रमाणें माझ्या वहिणीसुद्धां गोड गळयांनीं जेव्हां अभंग म्हणत, त्यावेळीं धर्म व धार्मिक शिक्षण मनुष्याच्या जीवनांत अत्यंत आवश्यक आहे असें मलासुद्धां पटत असे. मी 'धर्मलंड' आहे असें पुष्कळजण समजतात. पण ही गोष्ट खरी नाहीं. हा लोकांचा माझ्याबद्दलचा गैरसमज आहे. जे जे म्हणून लोक माझ्या सान्निध्यांत येतात त्यांना माझी धर्माविषयींची श्रद्धा व प्रेम माहीत आहे. धार्मिक ढोंग मला बिलकूल पसंत नाहीं......वडिलांच्या पाठांतरामुळें मुक्तेश्वर, तुकाराम वगैरे संतकवींचीं कवनें मला तोंडपाठ झालीं. एवढेंच नव्हे तर त्या काव्यांवर मी मनामध्यें विचार करूं लागलों. माझ्याइतका मराठी संतकवींचा खोल अभ्यास केलेलीं फार थोडीं माणसें असतील. मला भाषांची फार आवड आहे. मी इंग्रजी तर उत्तम जाणतोंच, इंग्रजीइतकाच मला मराठीचाही अभिमान आहे. मी कैक वर्षे 'वहिष्कृत भारत,' 'जनता,' 'मूकनायक' या साप्ताहिकांचा संपादक होतों. व मराठींत मी बरेंच लिखाण केलेलं आहे. 'जनता' पत्रांत येणारे मुख्य संपादकीय लेख बहुतेक सारे माझ्याच लेखणींतून उतरलेले होते. जर्मन भाषेचाहि मी चांगला अभ्यास केला आहे. आतां मी ती थोडीशी विसरलों असलों तरी थोड्याच दिवसांच्या साफसफाईनें मी ती पुन्हां वाचूं शकेन अशी मला उमेद आहे. मी गुजराथींत परवां अहमदाबादेला व्याख्यान दिलें होतें हें तुम्हास माहीत आहेच. मराठींत व्याख्यान देण्यास प्रथम मला उगीच भीति वाटत होती. पण मराठींतही मी चांगलें बोलूं शकतों असें मला पुढें आढळून आलें. मला फ्रेंच भाषा पण येते." (नवयुग, ता. १३।४।४७) सुभेदारांचें कुटुंब दापोलीला होतें तेव्हां आनंदराव हे मराठी शाळेंत जात असत. चिमुकला भिवा लहर लागेल तेव्हां आनंदरावाबरोबर शाळेंत जाऊन बसे. कुटुंबाला दापोलींत सात आठ महिने राहावें लागलें. तेवढ्या अवधींत भिवानें वडिलांच्या व बंधूंच्या सहाय्यानें अक्षरओळख करून घेतलेली होती. पण त्याचें नाव सदर

शाळेंत दाखल केलेलें नव्हतें. दापोलीहून सातारला जेव्हां कुटुंब आलें तेव्हां आनंदरावाचें नांव "कँप स्कूल सातारा" या नांवाच्या शाळेंत घातलें. याच शाळेंत भिवाला दाखल करण्याचें सुभेदारानीं ठरविलें. १८९६ च्या नोव्हेंबरमध्यें एक चांगला सुयोग ठरवून त्या दिवशीं सुभेदारानीं भिवाला स्वतःच्या हातांनीं अभ्यंग-स्नान घातलें, नवे कपडे घातले व त्याच्याकडून गणपति व सरस्वती यांची मनोमय पूजा करून घेतली. नंतर भिवाला बरोबर घेऊन ते शाळेला गेले व त्यानीं भिवाचें नांव शाळेंत घातलें. शाळेंतील मुलांची ओळख झाल्यानंतर भिवा त्या मुलांबरोबर खेळावयास जात असे. या मुलांबरोबर त्यानें हजार वेळां भांडणें व मारामाऱ्या केल्या असतील. परंतु या भाडणांची व मारामाऱ्यांची झळ घरांतील माणसांना लागली नाहीं. आपल्या चळवळ्या व दंगेखोर पण हुशार व तरतरीत स्वभावामुळें आणि फटकळपणें बोलण्याच्या हातोटीमुळें भिवानें आपल्या शिक्षकांचें प्रेम संपादन केलें. सुभेदारांच्या घरची राहणी ब्राह्मणी थाटाची होती. मुलें स्वच्छ सदरे व धोतरें वापरीत. त्यांच्या डोकीवर लांबलचक शेंडी असे. शेंडीसभोंवतीं केसांचा वाटोळा घेर असे. मुलें केसांना चपचपीत तेल चोपडीत. डोक्याला मख-मलीच्या टोप्या वापरीत.

आपल्या कुटुंबांतील लोक 'आंबावडेकर' या नांवानें पूर्वी संबोधिले जात होते; 'आंबावडेकर' या नांवाचें रूपांतर 'आंबेडकर' या नांवांत पुढें कसें झालें, याचा इतिहास बाबासाहेबांनीं एकदां सांगितलेला आहे. तो असा :

## "आमचें खरें आडनांव.

"आमचें आडनांव 'आंबेडकर' नव्हतें. आमचें खरें आडनांव होतें 'आंबावडेकर.' आंबावडे या नांवाचें खेड तालुक्यांत दापोलीजवळ पांच मैलांवर एक लहानसें खेडें आहे. त्यामुळें आम्हांला 'आंबावडेकर' याच नांवानें लोक ओळखीत असत. या "आंबावडेकर" आडनांवाचें "आंबेडकर" हें नांव कसें झालें त्याचा इतिहास आहे. आम्हांला "आंबेडकर" नांवाचे एक ब्राह्मण मास्तर होते. ते आम्हांला फारसें कांहीं शिकवीत नसत, पण माझ्यावर त्यांचें फार प्रेम होतें. मधल्या सुट्टींत मला खाण्यासाठीं शाळेपासून दूर असलेल्या आमच्या घरीं जावें लागत असे. हें आंबेडकर मास्तरांना पसंत नव्हतें. पण तेवढाच वेळ बाहेर भटकायला मोकळीक मिळे म्हणून मलाहि भाकरीसाठीं मधल्या सुट्टींत घरीं जाण्यास फार मजा वाटायची. पण आमच्या या मास्तरानीं एक युक्ति योजली. ते आपल्या-बरोबर भाकरी भाजी बांधून आणीत असत. व रोज मधल्या सुट्टींत कधींहि न चुकतां मला बोलावून घेऊन आपल्या फराळापैकीं भाजी-भाकरी मला खायला देत. अर्थातच शिवाशिव होऊं नये म्हणून ते आपली भाकरी भाजी वरूनच माझ्या हातावर टाकीत. मला सांगायला अभिमान वाटतो कीं, त्या प्रेमाच्या भाजी भाक-

रीची गोडी कांहीं अवीट असे. त्या गोष्टीची आठवण झाली म्हणजे माझा गळा दाटून येतो. खरोखरच आंबेडकर मास्तरांचें माझ्यावर फार प्रेम होतें. एके दिवशीं त्यांनींच मला सांगितलें कीं, हें तुझें 'आंबवडेकर' आडनांव आडनीड आहे. त्यापेक्षां 'आंबेडकर' हें माझें नांव छान आहे. तेंच तूं यापुढें लाव-आणि कॅटलाग-मध्यें त्यांनीं तशी नोंदहि करून टाकली..." (नवयुग १३-४-४७).

आडनांवांच जसें रूपांतर झालें तसें बाबासाहेबांच्या वैयक्तिक नांवाचेंहि वेळोवेळीं रूपांतर झालें. शाळा, हायस्कूल व कॉलेज यांच्या कॅटलॉगमध्यें त्यांच्याबद्दल जी नोंद करण्यांत आली त्याबद्दलची माहिती पाठविण्याबद्दल मी त्या त्या शाळेच्या अधिकाऱ्यांना विनंति केली व त्या अधिकाऱ्यांनीं मला सदर माहिती पाठविली. ती माहिती खालील तक्त्यांत दिली आहे:

| कँप स्कूल, सातारा | | सातारा हायस्कूल | एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई |
|---|---|---|---|
| १ नांव-भिवा रामजी आंबेडकर | | भिवा रावजी आंबेडकर | भिवराव रामजी आंबेडकर |
| २ रजिस्टर नंबर- | — | १९१४ | ४८ |
| ३ जन्म तारीख- | — | १४-४-१८९१ | १४-४-१८९१ |
| ४ प्रवेश तारीख- | — | ७-११-१९०० | ३-१-१९०८ |
| ५ कोणत्या इयत्तेंत दाखल- | — | पहिली | प्रिव्हियस |
| ६ शाळा सोडल्याची तारीख- | — | नोव्हेंबर १९०४ | जानेवारी १९१३ |
| ७ राहण्याचें गांव- | | सातारा | सातारा |

[ (१) हेडमास्तर, गव्हर्न्मेंट ॲग्रिकल्चरल हायस्कूल, सातारा यांचीं दोन पत्रें-नं. ३१९ ता. २१-६-१९४९, नं. ५८५ ता. १६-७-४९.

(२) प्रिन्सिपल एल्फिन्स्टन् कॉलेज, मुंबई यांचें पत्र नं. एल्. (७) २४१ ता. २४-४-१९५०.]

१९०८ ते १९१२ सालांतील मुंबई युनिव्हर्सिटीचीं जीं कॅलेंडरें (पहिला भाग) आहेत त्यांत जें नांव सांपडतें तें 'आंबेडकर भिवराव रामजी' असें आहे. १९१२ सालच्या कॅलेंडरमध्यें (भाग १ ला) सिनियर बी. ए. च्या वर्गातील मुलांचीं नांवें दिलेलीं आहेत. ८७१ पानावर बाबासाहेबांचें जें नांव आहे तें "आंबेडकर भीमराव रामजी" असें आहे. १९१४ च्या कॅलेंडरमध्यें (भाग १ ला)

१९१३ सालांत झालेल्या बी. ए. च्या परीक्षेचा निकाल देण्यांत आलेला आहे. त्यांत ४०५ पानावर बाबासाहेबांचें जें नांव देण्यांत आलेलें आहे तें 'आंबेडकर भिवराव रामजी' असें आहे.

भिवाला शाळेंत जाऊन थोडे दिवस होतात न होतात तोंच सुभेदारांची साताऱ्याहून बदली झाली. सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांतील कांहीं गांवांत दुष्काळ पडलेला होता. सरकारनें तिकडे दुष्काळी कामें सुरू केलीं होतीं. सुभेदारांना गोरेगांव, मायणी व माहुली येथील कामावर काम करणाऱ्या लोकांचे पगार देण्याचें (कॅशिअर) काम दिलेलें होतें. ते आपल्या कामावर गेले ते एकटेच. सर्व कुटुंब सातारला होतें. ते सातारा सोडून गेले तेव्हां भीमाबाईच्या मस्तकशूळानें उचल खाल्लेली होती. हें नेहमींचेंच दुखणें आहे, असें समजून त्यांनीं त्याकडे कानाडोळा केला. भीमाबाई अंथरुणाला खिळून गेल्या व त्यांचा आजार दिवसेंदिवस वाढत गेला. त्यांचा आहार कमी होत गेला व त्या प्रकृतीनें क्षीण झाल्या. ही परिस्थिति सुभेदारांना पत्रानें कळविली तेव्हां ते गोरेगांवाहून सातारला आले. ते आल्यानंतर तीन दिवसांनीं भीमाबाई अत्यवस्थ झाल्या. सर्व मुलें त्यांच्या बिछान्यासभोंवतीं गोळा होऊन रडत बसलीं. चौथ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं मुलांना जवळ बोलावलें. सर्वांना पाहून घेतलें, भिवाच्या पाठीवर हात फिरविला. आणि भीमाबाईनें शेवटचा श्वास सोडला (१८९६). मुलांनीं रडून आक्रांत मांडला. आपल्या डोकीवरील आकाश फाटलें, असें सुभेदारांना वाटलें. सुभेदारांनीं आपल्या पत्नीचे प्रेतसंस्कार यथाविधी केले.

सुभेदारांच्या सर्व मुलींचे विवाह झालेले होते. त्या अधून मधून वडिलांकडे येऊन राहत. पत्नीच्यो नंतर घरची व्यवस्था नीटपणें ठेवण्यास वयस्कर बाईमाणूस कोणी नव्हतें. त्यांचीं बहीण मीरा ही पांगळी होती. बाळाराम यांचें लग्न झालेलें होतें. पण सहकुटुंब नोकरीसाठीं वडिलांपासून ते दूर रहात होते. आनंदराव हे शिकत होते. त्यांचें लग्न करण्याचा सुभेदारांचा विचार होता. त्यांचें ताबडतोब लग्न केलें तरी घरांत येणारी सूनबाई लहान वयाची व अननुभवी असणार. ती सर्व घराची व्यवस्था कशी लावील? घरांतील सर्व व्यवस्था पाहणारी आणि आपल्या पूजासाहित्याची योग्य ती व्यवस्था लावणारी वयस्कर स्त्री घरांत असणें जरूर आहे याची त्यांना जाणीव झाल्यामुळें सुभेदारांनीं स्वतःचा गांधर्वविवाह करण्याचा ठरविलें. या योजनेला मीराबाईनें कसून विरोध केला कोणत्या स्वभावाची ही स्त्री असेल व ती सावत्र आई मुलाबाळांचें संगोपन नीट करणार नाहीं व घरांत तंटे बखेडे उत्पन्न होतील, अशा शंका मीराबाईंना येत. ती भावाला त्या शंका सांगे. परंतु सुभेदारांनीं पुनर्विवाहाचा विचार नक्की केला व ते मुंबईला गेले. त्यांच्या पलटणींतील एक जमादार पेन्शनर मुंबईंत रहात होते. त्यांचें आडनांव शिरकावळे. त्यांची जिजाबाई या

नात्राची विधवा बहीण होती. सुभेदारांनीं जिजाबाईबरोबर पुनर्विवाह लावला. व तिला घेऊन ते सातारला आले. जिजाबाईच्या अंगावर असलेले दागिने आपल्या आईचे आहेत, हें ओळखल्यानंतर भिवाला भयंकर राग आला. "माझ्या वयेचे दागिने काढून ठेव. नाहींतर तुझें डोकें फोडीन." अशी भिवानें आपल्या सावत्र आईला धमकावणी दिली. सावत्र आई दागिने काढून ठेवीत नाहीं, हें पाहून भिवा सावत्र आईला मारावयास जाई. लांब उभा राहून तिला दगड मारी व शेवटीं ओक्साबोक्सी रडत राही. हे प्रकार बहुधा दररोज होत असत. सुभेदारसाहेब हांसून या प्रकाराचें कौतुक करीत. मिराबाई भिवाला धरून स्वतः रडे व त्याला समजाविण्याचे प्रयत्न करी. आनंदराव व दोघी बहिणी व त्यांचीं मुलें बाजूला बसून रडत असत. पण त्यापैकीं कोणी तोंडांतून ब्र काढीत नसे. थोड्याच दिवसांनीं सुभेदार जिजाबाईला घेऊन गोरेगांवाला गेले. सुभेदारांच्या पश्चात् सातारला पूजाअर्चा चालू होती. प्रसाद वाटतांना सर्वांपेक्षां भिवाला जास्त प्रसाद मिळे. तरी पण त्याची आणखी जास्त खाऊ दे म्हणून सारखी कुरकुर चालावयाची. आई वारल्यानंतर 'माझ्या वयेचा वाटा मला दिला पाहिजे' असा त्यानें हट्ट चालू केला. एकदां भिवानें तसाच हट्ट घेतला तेव्हां थोरल्या बहिणीनें भिवाला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला, हेतू हा कीं, मुलानें आईची आठवण अशा रीतीनें काढूं नये. पण भिवा कांहीं ऐकेना. मग बहिणीनें मार दिला तेव्हां स्वारी रुसून घराबाहेर पडली. हा थोड्या वेळानें परत येईल, म्हणून सर्वांनीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. पण दिवेलागणीची वेळ झाली तरी भिवाचा पत्ता नाहीं. मग सर्वजण घाबरले, व त्याला शोधूं लागले. आसपासच्या ओळखीच्या सर्व ठिकाणीं पाहून लोक परतले. आत्यानें त्याला हांक मारून बोलाविलें तर तो हांक ऐकून येईल, असें सर्वांना वाटलें. म्हणून मीराआत्या अंगणांत आली व तिनें भिवाला परत येण्याबद्दल जोरानें ओरडून हांका मारल्या. "तूं कशाला आरडा ओरडा करतेस," असें म्हणत भिवा घरापुढील पिंपळाच्या झाडावरून खालीं उतरला. तेव्हां सर्वांचा जीव भांड्यांत पडला. "तुमची अशीच जिरवायला पाहिजे" असें रागानें म्हणत व पाय आपटीत भिवा घरांत आला तेव्हां जेवणाची वेळ टळून गेलेली होती.

कँपस्कूलमध्यें असतांना भिवाला अभ्यास ही काय चीज आहे, याची तोंडओळखही झालेली नव्हती. वर्गांत जें कांहीं शिकविलें जाई तेवढाच त्याचा अभ्यास. शाळेंतून घरीं आल्यानंतर भिवा आपलें दप्तर एका कोपऱ्यांत भिरकावून टाकी तो दुसऱ्या दिवशीं शाळेंत जातांना त्याला हात लावी. कोपऱ्यांत दप्तर फेकल्यामुळें तें अस्ताव्यस्त पडून राही. दुसऱ्या दिवशीं शाळेंत जातांना 'माझें दप्तर कोणी अस्ताव्यस्त केलें' म्हणून भिवाची घरांत आरडाओरड सुरू होई. मग कोणीतरी तें दप्तर व्यवस्थित करून त्याच्या हातांत द्यावें तेव्हां स्वारी शाळेंत जाई. शाळेंतील

अभ्यास तरी काय होता? याबद्दल बाबासाहेबांनीं आपली आठवण सांगितलेली आहे, ती अशी : "ह्या आमच्या आंबेडकर मास्तरांचें सारेंच कांहीं और होतें. शाळेची घंटा झाली कीं, ते वर्गांत येत व रहिमतुल्ला नांवाचा एक मोठा मुलगा आमच्या वर्गांत असे त्याच्यावर सारा वर्ग सोंपवून खुशाल बाहेर निघून जात. ह्या रहिमतुल्लासुद्धां आमच्या वर्गांतलाच विद्यार्थी. त्याच्या व आमच्या वयांत जमीन अस्मानाचा फरक. आम्ही दहा दहा वर्षांचीं मुलें तर त्याचें वय पंचवीस तीस वर्षांचें! संध्याकाळीं वर्ग सुटण्याचे वेळीं पुनः आमचे मास्तर परत येत व रहिमतुल्लाला विचारीत, 'कसें काय? मुलांनीं गडबड बिडबड फारशी केली नाहीं ना?' 'नाहीं' असा रहिमतुल्लानें त्यांना जबाब दिला म्हणजे ते निश्चित मनानें घरीं निघून जात. हे मास्तर दुपारभर कोठें जात असत असें तुम्ही विचाराल! आमच्या शाळेच्या समोर एक पेपरमिंट व सिगारेट विकणाऱ्या कोमट्याचें दुकान असें. त्या दुकानांत शिपाई व शिपायांचीं मुलें देखील नेहमीं कांहीं जिनसा विकत घेण्यासाठीं येत असत. त्यामुळें या दुकानाची चांगली चलती होती. शाळा चुकवून या दुकानांत आमचे मास्तर हिशेब लिहिण्याचें काम करीत. त्याबद्दल त्याना दरमहा वीस पंचवीस रुपयांची प्राप्ती होत असे. पुढें वार्षिक परीक्षा घेण्यासाठीं दिपोटी हजर झाले कीं मग आमच्या मास्तरांची भारी तारांबळ उडे. दिपोटीनीं वर्गांत गणित घातलें कीं मास्तरांनीं पाटीवर त्या उदाहरणाचें उत्तर ठळक अक्षरांत लिहून तें आम्हांला शेजारच्या खोलींतून दिपोटीच्या नकळत दाखवावयाचे. मग आमच्या साऱ्यांचीं उत्तरें बरोबर यावयाचीं. आणि अर्थात मास्तरांच्या उत्तम शिकवणीबद्दल त्यांना शाबासकी मिळावयाची! परीक्षा आटोपल्यावर संपूर्ण शेरेबुकांत आमच्या मास्तरांना उत्तम शेरा मिळाला. दिपोटींना मास्तरांकडून चहा, चिवडा व चिरूट यांचा नजराणा मिळत असे. अशा तऱ्हेनें एकदां चांगला शेरा मिळाल्यानंतर पुढें वर्षभर अगदीं निश्चिंती असे व आमच्या मास्तरसाहेबांना मेहताजीचें काम निर्धोकपणें वर्षभर करतां येई." (आंबेडकरांबरोबर गप्पा-गोष्टी. लेखक : प्रा. सत्यबोध हुदलीकर, नवयुग ता. १३।४।१९४७)

आंबेडकर मास्तर शाळेंत फारसे शिकवीत नसत. त्यामुळें मुलांना घरीं करण्याचा कांहींच अभ्यास नसे. यामुळें भिवाचा सारा वेळ हुदडण्यांत व तंटेबखेडे उत्पन्न करण्यांत जाई. आंबेडकर मास्तरांनीं आपणाला अभ्यासाचें योग्य तें वळण लहान वयांत लाविलें नाहीं, अशी मात्र बाबासाहेबांची मुळींच तक्रार नाहीं. उलट अंशीं ते मास्तर त्यांना फार ममत्वानें वागवीत असत हें त्यांनीं कबूल केलेलें आहे. तें या पूर्वीं सांगितलेलें आहेच. आंबेडकर मास्तर हे त्यांचे पहिले गुरुजी होते. त्यांच्याबद्दल बाबासाहेबानीं अत्यंत आदराचे उद्गार काढलेले आहेत. ते म्हणाले,

" मी विलायतला राऊंड टेबल कॉन्फरन्ससाठीं निघालों तेव्हां त्यानीं मला अत्यंत प्रेमळ पत्र पाठविलें होतें. तें पत्र माझ्या संग्रहीं आहे. पुढें केव्हांतरी माझें आत्मचरित्र लिहिण्याची मला स्फूर्ति झाली तर मी त्यांत तें छापणार आहे." (नवयुग ता. १३-४-१९४७) सदर मास्तर बाबासाहेबांना भेटावयास १९२७ सालीं आले होते. तेव्हां बाबासाहेबांचें ऑफिस दामोदर-हॉलच्या मागील शाळेच्या इमारतींत तळमजल्यावर होतें. मास्तर ऑफिसांत शिरल्याबरोबर बाबासाहेब झटकन् उठून उभे राहिले व गहिंवरलेल्या स्वरांत "मास्तर" असें उद्गारून त्यांनीं मास्तरांना खालीं वाकून नमस्कार केला. मास्तरांनीं डोळे पुशीत पुशीत आपल्या पराक्रमी विद्यार्थ्याला "चिरंजीव भव" असा आशिर्वाद दिला. हा प्रकार मी पाहिलेला आहे. मास्तर बाबासाहेबांची भव्य लायब्ररी न्याहाळून पाहत मान डोलावीत होते. बाबासाहेबांनीं आंबेडकर मास्तरांना पोषाक केला व गुरु-दक्षिणा म्हणून सव्वा रुपया दिला.

आंबेडकर मास्तरांच्या हाताखालीं मराठी शिक्षण संपूर्ण केल्यानंतर भिवाला ७ नोव्हेंबर १९०० रोजीं सातारा हायस्कूलमध्यें इंग्रजी पहिल्या इयत्तेंत दाखल करण्यांत आलें. त्याच्या अगोदर आनंदराव १८९८ सालीं हायस्कूलमध्यें प्रविष्ट झाले होते. महारांचीं मुलें म्हणून या दोघांना कँप स्कूल व सातारा हायस्कूल येथें वर्गापासून वेगळें बसविण्यांत येई. हायस्कूलमध्यें गेल्यानंतर भिवाला घरीं अभ्यास करण्याची जरुरी भासूं लागली त्यामुळें तो घरीं अभ्यास करी. पण अभ्यासाची त्याला गोडी लागलेली नव्हती. त्याला गोडी लागली होती खेळाची व मुलांच्याबरोबर मारामाऱ्या करण्याची.

आपला स्वभाव किती हट्टी व धाडसी होता याबद्दल एक गोष्ट इंग्रजी शाळेंत असतांना जी घडली ती बाबासाहवहेबांनीं सांगितलेली आहे. ती अशीः

" माझा स्वभाव पहिल्यापासून अतिशय जिद्दी असे. आतां तो तसा आहे किंवा नाहीं हें नक्की सांगता येणार नाहीं. पण लोक म्हणत असतील कीं माझा स्वभाव अजूनही तसाच जिद्दी आहे.

" माझ्या लहानपणीची गोष्ट सांगतों. मला वाटतें, मी इंग्रजी दुसरी इयत्तेंत शिकत होतों. आमची शाळा होती साताऱ्याला कँपमध्यें. त्यावेळीं पेंडसे नांवाचे एक मास्तर असत आम्हांला. त्यांचें माझ्यावर अतिशय प्रेम होतें. माझा स्वभाव हट्टी आहे हें माझ्या संवगड्यांना माहीत असल्यामुळें 'एकादी गोष्ट करूं नकोस' म्हणून मला सांगितल्याबरोबर मी ती हटकून करणार हें त्यांना माहीत होतें. एकदां खूप पाऊस पडला होता व आमची शाळेंत जाण्याची वेळ झालेली होती. माझ्या मित्रांनीं मला सांगितलें, " बघरे बुवा, पाऊस पडतोय खूप. तूं आपला पावसांत जाऊं नकोस हं! उगाच चिंब भिजशील!" मला तेंच पाहिजे होतें. माझा थोरला

भाऊ छत्री घेऊन निघाला. मी त्याला साफ सांगितलें, "तूं आपली छत्री घेऊन जा कसा! मी एकटा पावसांत भिजत येणार!" भावानें माझें मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला पण मी त्याचें म्हणणें धुडकावून लावलें. 'आमची स्वारी' छत्रीबित्री न घेतां थेट पावसांतून जायचें ठरवून निघाली. मी त्यावेळीं वेलबुट्टीची टोपी वापरीत असे. ती टोपी पावसांत भिजेल म्हणून माझी पाटीपुस्तकें व माझी आवडती टोपी मी माझ्या भावाच्या स्वाधीन करून दिली. तो पुढें निघून गेल्यावर मी पावसांतून भिजत भिजत शाळेच्या रस्त्यानें निघालों. पाऊस अगदीं मुसळधार पडत होता. मी शाळेंत येऊन पोहोंचलों तों काय? अगदीं नखशिखांत चिंब भिजलेला. मास्तरांनीं मला अशा स्थितींत आलेला पाहिल्यावर त्यांना फार वाईट वाटलें. त्यानीं मला विचारलें, "अरे पावसांत छत्री घेऊन कां नाहीं निघालास?" मी जबाब दिला, "छत्री एकच होती; म्हणून मी हा असा भिजलों." ही माझी निव्वळ थाप होती हें कांहीं त्या भोळ्या मास्तरांच्या ध्यानांत आलें नाहीं. लगेच माझ्या थोरल्या भावाला त्यांनीं बोलावून घेतलें. तो तेव्हां चवथींत शिकत होता. त्याला मास्तरांनीं विचारलें, "दाखव पाहूं तुझ्या अंगांत किती सदरे आहेत ते?" माझ्या भावाच्या अंगांत एकच सदरा होता. तेव्हां त्यानीं आपल्या स्वतःच्या मुलाला माझ्या बरोबर आपल्या घरीं पाठविलें व त्याला सांगितलें, "घरीं याला नीट गरम पाण्याची आंघोळ करायला पाणी दें, त्याला एक लंगोटी दे आणि त्याचे कपडे म्हणजे धोतर व सदरा वाळत घालायला लाव म्हणजे संध्याकाळीं ते घालून तो आपल्या घरीं जाईल."

"त्याप्रमाणें मास्तरांच्या मुलानें मला आपल्या घरीं नेऊन गरम पाण्याची आंघोळ घातली व नेसायला एक लंगोटी दिली. संध्याकाळपर्यंत शाळेच्या तडाख्यांतून आपण सुटलों म्हणून मला खूप आनंद झाला. मी टिवल्याबावल्या करीत व तोंडानें शिट्या वाजवीत असाच शाळेच्या बाहेर हिंडत होतों. मी वर्गांत आलों नाहीं असें पाहून मला वर्गांत आणण्याविषयीं पुनः मास्तरानीं एका मुलाला सांगितलें. नुसती लंगोटी घालून साऱ्या मुलांच्या देखत वर्गांत बसण्याची मला विलक्षण लाज वाटे. पण मास्तर म्हणाले, 'अरे इथं तर सारी मुलंच आहेत. त्यांची लाज तुला वाटायचं काय कारण?" मी आपला तसाच रडत रडत वर्गांत बसलों. पण या गोष्टीची मला इतकी लाज वाटली कीं, तेव्हांपासून माझ्या स्वभावांतली जिद्द काढून टाकायची असा मी मनाशीं निश्चय केला. तो कितपत साधला आहे, हें इतरांनीं मला सांगायचें." (आंबेडकरांबरोबर गप्पागोष्टी. नवयुग ता. १३–४–४७ पान )

शाळेंतील वातावरणांत अस्पृश्यता पाळली जात होती. तरी पण आंबेडकर व पेंडसे मास्तर यांच्या प्रेमळ वर्तनामुळें आणि स्पृश्य वर्गीय मुलांच्या पुंडाईच्या खेळांमुळें आनंदराव व भिवा यांना अस्पृश्यतेचा कटुपणा चाखावयास मिळालेला नव्हता. त्यांच्या वडिलांबरोबर तीं मुलें पलटणींतील तळावर राहात. तेव्हां

त्यांना शिवताशिवतीची कल्पना नव्हती. सातारला आल्यानंतर त्यांना अस्पृश्यतेची जाणीव भासू लागली. याबद्दलची कहकीकत त्यांनीं सांगितलेली आहे. ती खालीं देत आहेः

" माझा जन्म मु. महू (इंदोर) येथें माझे वडील पलटणींत असतांना झाला. त्यावेळीं माझे वडील पलटणींत सुभेदार होते. आम्ही पलटणींतच रहात असल्यामुळें आम्हाला बाहेरच्या जगाचा संसर्ग झाला नव्हता. त्यामुळें अस्पृश्यतेसंबंधीं कोणत्याही प्रकारची कल्पना मला नव्हती. परंतु जेव्हां माझ्या वडिलांनीं पेन्शन घेतलें तेव्हां आम्ही सर्वजण साताऱ्यास येऊन राहिलों. माझी आई मी अवघा पांच वर्षांचा असतांना निवर्तली. सातारा जिल्ह्यांत गोरेगांवीं दुष्काळ पडला होता. म्हणून दुष्काळी कामें सरकारनें काढलीं. यावेळीं एक पाण्याचा तलाव सुरू करण्यांत आला होता. या तलावाचें काम करणाऱ्या मजूरांना पगार वाटण्याच्या कामावर माझ्या वडिलांची नेमणूक झाली. ते गोरेगांवीं गेले व आम्हा चार मुलांना त्यांनीं साताऱ्यास ठेविलें. जवळ जवळ चार पांच वर्षें आम्ही भातावर काढली. आम्ही साताऱ्यास आल्यापासून आम्हाला खऱ्या अस्पृश्यतेची जाणीव होऊं लागली. प्रथम आमचे केंस कापण्यास आम्हांला न्हावी मिळेना. आमची मोठी पंचाईत झाली. मग माझी वडील बहिण (ती अजून जिवंत आहे) आम्हा चार मुलांच्या हजामती ओट्यावर बसून करीत असे. साताऱ्यास इतके न्हावी असूनही ते आमची कां हजामत करीत नाहींत हें मला प्रथमच कळलें. दुसरा एक असा प्रसंग घडला कीं, आमचे वडील गोरेगांवीं असतांना आम्हाला ते पत्र पाठवीत असत. त्यांनीं आम्हाला एकदां 'गोरेगांवला या' असें पत्र पाठविलें होतें. गोरेगांवला आम्ही आगगाडींत बसून जाणार म्हणून मला फार आनंद झाला होता. तोपर्यंत मी आगगाडी पाहिली नव्हती. वडिलांनीं पाठविलेल्या पैशाचे आम्ही चांगले कपडे केले, व मी, माझा भाऊ आणि वहिणीच्या मुली इतकेजण वडिलांना भेटावयास निघालों. त्यापूर्वी त्यांना पत्र लिहलें होतें. परंतु तें पत्र नोकरांच्या हलगर्जीपणामुळें त्याना मिळालें नाहीं. आम्ही मात्र वडील आम्हांला नेण्याकरितां नोकर वगैरे पाठवतील या आनंदांत होतों. परंतु या बाबतींत आमची निराशा झाली. आम्ही आगगाडींतून उतरतांच नोकराची वाट पाहिली. माझा पोशाख ब्राह्मणासारखा दिसत होता. गाडी येऊन निघून गेली. आम्ही अर्धापाऊण तास स्टेशनवर वाट पहात राहिलों. स्टेशनवर आम्हांशिवाय कुणीच राहिलें नाहीं. तशांत आम्ही सर्वजण मुलें पाहून स्टेशनमास्तर आमच्याजवळ येऊन आम्हांला कुठें जायचें, तुम्ही कोण, वगैरे विचारू लागला. आम्हीं 'महार' असें म्हणतांच स्टेशनमास्तरला धक्का बसल्यासारखा झाला. तो दचकून पांचसहा कदम मागे हटून गेला. तरीपण आमच्या पोशाखावरून आम्ही कोणातरी सुखवस्तु महाराचीं मुलें आहोंत, हें त्यानें जाणलें व आम्हांला गाडी करून

देण्याचें ठरविलें. परंतु संध्याकाळीं सहासात वाजेपर्यंत एकहि गाडीवान आम्हाला आम्ही महाराचीं मुलें म्हणून घेऊन जायला तयार होईना. शेवटीं एक गाडीवान तयार झाला. परंतु त्यानें अशी अट घातली कीं, आपण कांहीं गाडी चालविणार नाहीं. मी पलटणींत दिवस काढल्यामुळें मला गाडी हाकणें कठिण वाटलें नाहीं. आम्ही कबुली देतांच गाडीवान गाडी घेऊन आला व आम्ही गोरेगांवच्या मार्गाला लागलों; गांवच्या बाहेर बरेच दूर गेल्यावर आम्हाला एक नाला लागला. "येथेंच तुम्ही भाकरी खाऊन घ्या, पुढें पाणी प्यायला तुम्हांला मिळणार नाहीं" असें गाडी-वानानें सांगितलें. आम्हीं खालीं उतरलों. भाकरी खाल्या. नाल्याचें पाणी इतकें अस्वच्छ होतें कीं त्यांत बऱ्याच प्रमाणांत शेणाचें मिश्रण होतें. गाडीवान तेवढ्यांत कुठें तरी भाकरी खाऊन आला. पुन्हां आमची गाडी चालू झाली. रात्र बरीच झाली. तेव्हां गाडीवान हळूच गाडींत येऊन बसला. रस्त्यावर दिवा नाहीं, माणूस तर कोणी दिसेना. आम्हांला रडूं कोसळलें. अशा रीतीनें आम्ही रात्रौ बारावाजेपर्यंत वेळ काढली. मनांत तर्कवितर्क चालू होतेच. आपण कांहीं गोरेगांवास जात नाहीं असें वाटलें. इतक्यांत एका टोलनाक्यावर आमची गाडी येतांच आम्हीं गाडींतून उड्याच घेतल्या. भाकरी खाण्याकरितां टोल नाक्यावरील मनुष्यास विचारलें. मला पर्शियन भाषा चांगली येत असल्यामुळें त्या मनुष्याशीं बोलण्यास अडचण पडली नाहीं. परंतु त्यानें मला उर्मटपणानें उत्तर देऊन पाण्यासाठीं समोरचा डोंगर दाखविला. शेवटीं कशी तरी ती रात्र टोलनाक्यावर काढली. सकाळीं पुन्हां गाडी चालू झाली. व शेवटीं दुपारीं अर्धमेल्या अवस्थेंत गोरेगावीं येऊन पोहोंचलों." (जनता ता. २३-५-१९३६)

गोरेगांवला मंडळी आल्यानंतर ती सुभेदारांच्या बरोबर मायणी व माहुली येथें जाऊन राहिलीं. त्या वेळीं मायणीच्या तळ्याची दुरुस्ती चाललेली होती. गांवांतील मुक्कामांत सुभेदार पी. डब्लू. डी. नें बांधलेल्या झोपड्यांत रहात. ते महार-वाड्यांत रहात नसत. तथापि ते महार लोकांत जाऊन बसत. त्यांची रहा-ण्याची उच्च पद्धत व घरादारांतील एकंदर ब्राह्मणी धाटणीचें वातावरण पाहून महार लोक सुभेदारांना व त्यांच्या घरांतील लहान थोरांना मान देऊन वागत. माहुली येथें मुक्काम असतां भिवानें महारवाड्यांतील कांहीं समवयस्क सवंगडी जमा केले व निरनिराळे खेळ सुरूं केले. त्या खेळांत संवगड्यांना मार खावा लागे. पण त्यांचे आईबाप सुभेदाराकडे तक्रार नेत नसत. एकदां संवगड्यांना घेऊन भिवाची स्वारी ओढ्यावर मासे व खेकडे धरण्यास गेली. जमिनींतील बिळांत बस-लेल्या खेकड्यांना बाहेर काढण्यासाठीं इतर मुलें बिळांत हात काटक्या घालीत व खेकड्यांना बाहेर काढीत. भिवा बिळांत हात घालून खेकड्यांची नांगी धरून त्यांना बाहेर काढी. खेकडे बिळांतून बाहेर काढण्याच्या रंगांत भिवा पाण्यांत व

दलदलीत पालथा पडून बिळांत हात घाली. सूर्य मावळल्यानंतर मुलें घरीं जावयास निघालीं. तेव्हां भिवानें आपली शिकार घरीं आणली. त्याचा घाणेरडा पोषाख व ती शिकार पाहून सुभेदारांना संताप आला व त्या संतापाच्या भरांत त्यांनीं भिवाला बेदम चोप दिला. त्यानें आणलेली शिकार त्याला दूर भिरकवावयास लाविली. व त्याला सचैल स्नान घालून जेवावयास बसविलें. 'मी पुनः मासे व खेकडे मारणार नाहीं,' असा कबुलीजबाब सुभेदारांनीं भिवाकडून घेतला होता.

पी. डब्ल्यू. डी. चें दुष्काळीं काम संपल्यानंतर सुभेदारांना साताराला येऊन राहावें लागलें. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांची नोकरी सुटली. तेव्हां ते आपला बराच वेळ मुलांना स्वतः शिकविण्यांत खर्च करूं लागले. आपल्या मुलांनीं खूप शिकावें व नांवलौकिक कमवावा, ही त्यांच्या आयुष्यांतील मोठी इच्छा. मुलांनीं संस्कृत भाषेचा उत्तम अभ्यास करून महापंडित व्हावें, असेंहि त्यांना वाटे. परंतु अतिशूद्रांना गीर्वाण भाषा शिकण्याचा अधिकार नाहीं, या धार्मिक समजुतीचे गुलाम असलेले शिक्षक मुलांना संस्कृत शिकविण्यास तयार झाले नाहींत. म्हणून त्यांना संस्कृत भाषेचा अभ्यास करतां आला नाहीं याबद्दलची आठवण बाबासाहेबांनीं सांगितलेली आहे. तो अशी :

"मी संस्कृत शिकावें अशी त्यांची (वडिलांची) फार इच्छा होती. पण ही त्यांची इच्छा सफल झाली नाहीं. त्याला एक कारण झालें तें असें. माझा थोरला भाऊ सातारा येथें असतांना इंग्रजी चवथींत आला. तेव्हां त्यानेंही संस्कृतचा अभ्यास करावा व चांगला विद्वान् व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती पण आमच्या संस्कृतच्या मास्तरानीं 'अस्पृश्यांच्या पोरांना मी संस्कृत शिकविणार नाहीं' असा हट्ट धरल्यामुळें माझ्या भावाला अगदीं निरुपाय म्हणून पर्शियन भाषा शिकणें भाग पडलें. ते मास्तर वर्गांत आमची हेटाळणी करीत त्यामुळें मनावर एक प्रकारचा वाईट परिणाम होत असे. पुढें मी सुद्धां जेव्हां इंग्रजी चवथ्या इयत्तेंत आलों तेव्हां आमच्या संस्कृत मास्तरांचा हट्ट मलाही भोंवणार हें नक्की माहीत असल्यामुळें मला पर्शियन भाषेकडेच निरुपायानें धांव घेणें भाग पडलें. मला संस्कृत भाषेचा अत्यंत अभिमान आहे व ती मला चांगली यावी अशी अजूनही माझी इच्छा आहे. आतां स्वतःच्या मेहनतीनें मी थोडेसें संस्कृत वाचूं-समजूं शकतों; नाहीं असें नाहीं. पण त्या भाषेंत पारंगत व्हावें अशी माझ्या अंतःकरणांत तळमळ आहे. तो सुदिन कधीं उगवेल तो खरा !

"मी जरी पर्शियन भाषेचा चांगला अभ्यास केला असला व मला शंभरपैकीं नव्वद पंचाण्णव मार्क मिळत असले तरी, हें कबूल करायला हवें कीं संस्कृत वाङ्मयापुढें पर्शियन वाङ्मय अगदीं फिक्कें आहे. संस्कृत वाङ्मयांत काव्यमीमांसा आहे; अलंकार-शास्त्र आहे, नाटकें आहेत, रामायण-महाभारतासारखीं महाकाव्यें आहेत, तत्वज्ञान

आहे, तर्कशास्त्र आहे, गणित आहे, आधुनिक विद्येच्या दृष्टीनें पाहतां संस्कृत वाङ्मयांत सर्व कांहीं आहे. पण तशी स्थिति पर्शियन वाङ्मयांत नाहीं. संस्कृतचा अभिमान व संस्कृत भाषा आपल्याला चांगली अवगत असावी याविषयीं माझ्या अंतःकरणांत विलक्षण तळमळ असतांही शिक्षकांच्या कोत्या वृत्तीमुळें व आकुंचित दृष्टीकोनामुळें मला संस्कृत भाषेला मुकावें लागलें !" ( नवयुग, ता. १३-४-४७ )

"The Victory of an Untouchable" या शीर्षकाखालीं मि. ब्लेक क्लार्क या अमेरिकन ग्रंथकारानें बाबासाहेबांच्या आयुष्यावर व कार्यावर एक लेख लिहून तो न्यूयॉर्क येथील 'ख्रिश्चन हेराल्ड' या मासिकाच्या मार्च १९५०च्या अंकांत प्रसिद्ध केलेला आहे. त्या लेखाचा सारांश "The Reader's Digest" या सुप्रसिद्ध मासिकाच्या मार्च १९५० अंकांत (पानें १०७-१११) प्रसिद्ध झालेला आहे. या लेखांत सातारा हायस्कूलमध्यें बाबासाहेब शिकत असलेल्या वेळच्या दोन आठवणी दिलेल्या आहेत. बाबासाहेबांना दुपारीं तहान लागली तेव्हां मास्तरांनीं माळ्याला नळ खोलून द्यावयास सांगितलें. बाबासाहेब नळांतून खालीं पडत असलेल्या पाण्यावर उलटें तोंड धरून पाणी प्याले. दुसरी आठवण अशी कीं, बाबासाहेबांना क्रिकेटच्या खेळाची फार आवड; पण ते अस्पृश्य असल्यामुळें त्यांचे मास्तर त्यांना इतर मुलांबरोबर खेळूं देत नसत. मुलें क्रिकेट खेळत तेव्हां बाबासाहेब बाजूला बसून क्रिकेटचा खेळ पहात असत.

मुलें इंग्रजी शिक्षणाला लागलीं व आपली नोकरी सुटली. तेव्हां साताऱ्याला राहून पेन्शनींत मुलांच्या शिक्षणाचा व घरचा खर्च चालविणें कठीण होणार, हें जाणून सुभेदारानीं सातारा सोडण्याचें ठरविलें. मुंबईत आपणाला एकादी नोकरी मिळेल व मुलांचें शिक्षणहि तेथें परिपूर्ण करितां येईल या हेतूंनीं त्यानीं मुंबईत जाऊन राहण्याचें मुक्रर केलें. १९०४ च्या नोव्हेंबरमध्यें मुलांच्या परीक्षा झाल्या. आनंदराव पांचवीची परीक्षा पास झाले व भिवा चौथीची परिक्षा पास झाला. सुभेदारानीं साताऱ्याहून बिऱ्हाड हालवून मुंबईस आणलें.

# प्रकरण ६ वें

## विद्यार्थी–मुंबई.

सातार्‍यांतील सर्व गोष्टींची निरवानिरव करून सुभेदारानीं सातारा १९०४ च्या डिसेंबरमध्यें सोडला व ते मुंबईस आले. त्यावेळीं मिलिटरींतून निवृत्त झालेलीं बरींचशीं कोकणस्थ महार कुटुंबें व इतर महार कुटुंबें लोअर परळच्या भागांत रहात असत. त्या भागांत डबक चाळ या नांवाची एक इमारत आहे. तींत सुभेदारानीं आपलें बिऱ्हाड थाटलें. पेन्शनच्या रकमेंत मुंबईचा घरखर्च व दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा खर्च चालणें कठीण आहे, हें जाणून त्यांनीं मुंबईंत नोकरी करण्याचें ठरविलेलें होतें व त्याप्रमाणें त्यांचे नोकरी मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. हिंवाळ्याचीं रजा संपल्यानंतर मुंबईंतील शाळा सुरू झाल्या. सुभेदारानीं मुलांचीं नांवें मराठा हायस्कूलमध्यें घातलीं; परंतु तेथील अभ्यासक्रम सुभेदारांच्या मतें उच्च दर्जाचा नसल्यामुळें त्यांनीं दोन्ही मुलांचीं नांवें सरकारी हायस्कूल–एल्फिन्स्टन हायस्कूल–यांत घातली. पण नोकरी मिळण्याची शक्यता दिसत नसल्यामुळें त्यानीं आनंदरावांचें शिक्षण बंद करण्याचें ठरविलें. आनंदराव स्वभावानें शांत व अबोल असत. शिवाय त्यांची प्रकृती यथातथा असे. त्यांचा अभ्यासहि वर्गाबरोबर असे. भिवा स्वभावानें तापट, बोलभांड्या, उतावीळ व तल्लख असे. त्याची शरीरप्रकृती खणखणीत होती. कोणतीहि गोष्ट करण्यांत त्याचें पाऊल पुढें. उत्साहाचा पाऊस पाडे. अभ्यासाबद्दल नेहमीं टाळाटाळी व चुकारपणा करूनहि तो वर्गांतील मास्तरांवर आपल्या तल्लखपणाची छाप बसवी. भिवानें घरांतील व बाहेरील लोकांवर मोहिनी अस्त्र फेकल्यामुळें सर्वांचे डोळे त्याच्याकडे लागलेले होते. म्हणून भिवाचें शिक्षण चालू ठेवावयाचें, व आनंदरावाचें बंद करावयाचें, असा सुभेदारानीं निर्णय घेतला. त्यांना नोकरीस लावलें तर तेवढाच घरखर्चास आधार होईल, असें मनांत ठरवून त्यांनी आनंदरावांना रिचर्डसन क्रुडास ॲण्ड कंपनी येथें टाईमकीपरची जागा मिळवून दिली. तेथें त्यांचा पगार थोडा व पुढें कांहीं बढतीचें चिन्ह नव्हतें, म्हणून सुभेदारानीं जी. आय. पी. वर्कशॉपच्या मॅनेजरला भेटून तेथील टाईमकीपरची जागा

आनंदरावासाठीं मिळविली. नोकरी लागल्यानंतर प्रत्येक पगाराच्या दिवशीं आनंदराव घरांतील बहिणींच्या मुलांसाठीं खाऊ आणीत असत. त्यांतील एक भाग भिवासाठीं आनंदराव ठेवीत असत. भिवाचें धोतर किंवा शर्ट जरासे फाटले कीं आनंदराव नवे कपडे आणून भिवाला देत व त्याचे जुने कपडे स्वतः वापरीत असत. भिवावर त्यांचें फार प्रेम होतें.

आनंदरावांना कायमची नोकरी लागल्यानंतर सुभेदारांना हायसें वाटलें. त्यांनीं आनंदरावांचें लग्न थोड्याच दिवसांनीं केलें. सूनबाई लक्ष्मी घरांत आल्यावर घरकामें व्यवस्थित होऊं लागलीं. लक्ष्मीबाई अंगापिंडानें दणकट होत्या. त्यांचा वर्ण गोरा होता. त्या स्वभावानें शांत, आज्ञाधारक, कष्टाळू व कमालीच्या सहनशील होत्या. आनंदरावांची देहयष्टि किरकोळ होती. ते उंच व निमगोरे होते. ते स्वभावानें शांत, अबोल व आज्ञाधारक होते. घरांतील बाजारहाट व इतर बाहेरील सर्व कामें ते करीत असत; त्यामुळें सुभेदारांचा सर्व वेळ पूजाअर्चा करण्यांत व ईशचिंतन करण्यात जाई.

आनंदरावाचें लग्न झाल्यानंतर भिवाचेंहि लग्न उरकून टाकावें म्हणजे आपल्या गळ्यांतील एक जबाबदारी कमी होईल, असें ठरवून सुभेदारानीं मुली पहाण्यास सुरवात केली. भिवा सर्व भावंडांमध्यें जास्त गोरा, बळकट व देखणा होता. सर्व भावंडांचे वरचे दांत आईच्या दांतांप्रमाणें ओठाबाहेर आलेले होते. भिवाचे दांत वडिलांच्या दांतांप्रमाणें लहान व सरळ आलेले होते. त्याची देहयष्टी व अंगकांति हीहि वडिलांच्या प्रतिमेप्रमाणें होती. शिवाय तो वडिलांचा फार आवडता होता. तो पुढें फार मोठा कीर्तिवंत होणार आहे ही सुभेदारांची मनोमय भावना. यामुळें सुभेदारांना वाटे कीं, भिवाला अत्यंत सुंदर बायको असली पाहिजे. मुली पाहतांना त्यांना एक सुंदर मुलगी दिसली व ती त्यांनीं मुक्रर केली. थोड्या दिवसांनीं त्या मुलीपेक्षां जास्त सुंदर मुलगी त्यांच्या पाहण्यांत आली. तिच्या आईबापाशीं बोलणें करून तीहि मुलगी सुभेदारानीं मुक्रर केली. कांहीं दिवसांनीं तिसरी मुलगी त्यांच्या नजरेस पडली. व ती सुभेदारांना पहिल्या दोन मुलींपेक्षां जास्त सुंदर वाटली. तेव्हां सुभेदारानीं त्या मुलीच्या नातलगांशीं विचारविनिमय करून ती मुलगी मुक्रर केली. तीच मुलगी बाबासाहेबांची साध्वी पत्नी रमाबाई व अस्पृश्यांची प्रातःस्मरणीय आईसाहेबा. भिवा व रामा यांच्या विवाहाची तिथी जाहीर झाली तेव्हां पहिल्या दोन मुली ठरविण्यांत आल्या होत्या त्यांच्या नातलगांनीं सुभेदारावर जातिपंचायत बसविली. सुभेदारांनीं आपला अपराध कबूल केला. पंचायतीनें बसविलेला दंड भरला.

रमाबाईचें माहेरचें नांव रामीबाई. वडील, भिकू वलंगकर, ते पलटणींत गेलेले नव्हते. ते दापोलीला मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत. त्यांचें

कुटुंब म्हणजे मातृविहीन चार मुलें. तीन मुली व एक मुलगा. सर्व मुलांत मुलगा लहान. पहिली मुलगी दाभोळीकराला दिला होती. बाकीचीं तीन मुलें रामीबाई, गौराबाई व शंकर. माशांच्या टोपल्या समुद्रापासून मार्केटपर्यंत धांवत धांवत आणण्याचें काम करीत असता त्यांच्या छातींत विकार झाला व त्यांतच ते दापोलींत मरण पावले. त्यांच्या मृत्युसमयीं रामीबाई, गौराबाई व शंकर हीं मुलें अगदीं लहान होतीं तीं चुलत्यानें व भावानें मुंबईस नेलीं. चुलता व मामा भायखळा मार्केटजवळ असलेल्या चाळींत रहात असत. चुलता लाकडाच्या वखारींत लाकडें तोडण्याचा धंदा करीत असे. मामा गोविंदपूरकर हे ११६ व्या पलटणींचे पेन्शनर हवालदार होते. ते बी. पी. एस्. सी. सोसायटींत कामाला होते. हीं तीन मुलें चुलत्याकडे व मामाकडे रहात असत. रामीबाई लग्नाला ९–१० वर्षांची होती. भिवा त्यावेळीं इंग्रजी पांचवींत शिकत होता. त्याचें वय १४ वर्षांचें होतें. गौरा हिचें लग्न गंगाराम येलमकर याच्याशीं झालें. चुलता व मामा वारल्यानन्तर गौराबाई व शंकर हीं सुभेदारांकडे रहावयास आलीं.

डबक चाळींत रहावयास मिळाल्यानंतर भिवाच्या दांडगाईला व मारामाऱ्यांना दोन कारणांमुळें विस्तृत क्षेत्र मिळालें. एक कारण खेळ व दुसरें कारण जातिपंचायत. आसपास राहणाऱ्या मुलांची जमवाजमव करून भिवानें हॉकी, फुटबॉल, व क्रिकेटचे खेळ सुरू केले.. स्वतःची टीम बनवून तिचा कॅप्टन तो झाला व परळ, सातरस्ता, वरळी, कोळीवाडा, इत्यादि भागांतील इतर जातींच्या मुलांच्या टीम्स्शीं मॅचेस त्यांनीं लढविल्या. या सामन्यांत कांहीं ना कांहीं कारणांनीं भांडणें उपस्थित होत व त्या भांडणांत भिवा विरुद्ध पक्षांतील लोकांना यथेच्छ बडवून काढीत असे. त्याच्या मारामारीच्या व्यूहांत तो प्रत्येकाची निवड करी व त्या त्या माणसाला नेमलेल्या ठिकाणीं ठेवून विरुद्ध पक्षावर चढाई करी. खेळांतील प्राविण्यापेक्षां मारामारींतील प्राविण्य या टीमनें मिळविलेलें होतें. म्हणून भिवाच्या या टीमशीं इतर टीम्स सामने ठरविताना मागेपुढें पाहात. हॉकी व फुटबॉल या खेळांपेक्षां क्रिकेटच्या खेळाची भिवाला फार आवड व त्या खेळाची त्याला इतरांपेक्षां जास्त माहिती असे. तो स्वतः बॅटिंग उत्तम करी व बॅटिंगमधील खुब्या तो आपल्या टीममधील लोकांना समजावून सांगत असे. क्रिकेटच्या मॅचेस्मध्यें जर भांडणें झालीं तर आघाडीवर मारामारी करणारे भिवाचे जे दोन हात होते ते माळ दाभोळकर व आनंदराव. आपल्या कॅप्टनच्या अंगाला विरुद्ध पक्षांतील कोणी हात लावूं नये म्हणून या दोघांनीं विरुद्ध पक्षांतील लोकांना थोपवून धरतांना आपलीं डोकीं अनेक वेळां फोडून घेतलेलीं होतीं.

खेळांतील भांडणें व मारामाऱ्या बाहेरच्या बाहेर विझत असत. त्यांची झळ घरच्या लोकांना लागत नसे. पण जातिपंचायतीसंबंधीं मुलामुलांमध्यें जीं भांडणें

होत, ज्या मारामाऱ्या होत, त्यांमुळें मोठ्या माणसांनाहि त्यांत हमरीतुमरीवर येऊन भाग घ्यावा लागे.

पलटणींत नसलेलीं जीं महार कुटुंबें (कोंकणस्थ) मुंबईंत रहात असत, त्यांची जातिपंचायत असे. पलटणींतून निवृत्त झालेलीं माणसें मुंबईत येऊन राहिलीं पण त्यांचा शिरकाव जातिपंचायतींत झालेला नव्हता. पहिल्या प्रकारच्या लोकांची रहाणी अगदीं खालच्या दर्जाची असे. दुसऱ्या प्रकारच्या लोकांची रहाणी व आर्थिक परिस्थिती जरा वरच्या दर्जाची होती. त्यामुळें हे लोक एका जातीचे असूनहि ते परस्परांत फारसे मिसळत नसत. जातिपंचायतीतर्फे महार जातींतील सर्व प्रकारचे सामाजिक व्यवहार केले जात. या पंचायतींत पलटणीच्या लोकांचे प्रतिनिधी असावेत असा पलटणीच्या लोकांनीं हेका धरला. पण तो बिनपलटणवाल्या महारांनीं धुडकावून लावला. यामुळें कोंकणस्थ महारांत दोन पक्ष पडले. एक लंगोटीवाल्यांचा पक्ष व दुसरा धोतरवाल्यांचा पक्ष. बिनपलटणवाले घरांत लंगोटी (कोंकणस्थ पद्धतीप्रमाणें) लावून वावरत. पलटणवाले धोतर नेसून घरांत वावरत. धोतर नेसण्याची यांची पद्धत म्हणजे लुंगीसारखी. डबक चाळींत व आसपासच्या चाळींत पलटणवाल्यांचा भरणा होता. या चाळी व्यवस्थित होत्या. बाजूला घाणेरड्या चाळींत बिनपलटणवाले रहात. दोन्हीं पक्षांतील मुलांचीं भांडणें दररोज होत, व कधीं कधीं मारामाऱ्या होत. त्यांत भिवा हा धोतरवाल्यांचा पुढारी होई व लंगोटीवाल्या पक्षातील मुलांना बडवून काढी. हीं भांडणें मोठ्या माणसांत पसरलीं जात व मोठ्या लोकांतहि मारामाऱ्या होत व प्रकरणें पोलीस चौकीवर जात. तेव्हां धोतरवाल्यांची बाजू जरी चुकीची किंवा लंगडी असली तरी ती बहुधा यशस्वी होई व लंगोटीवाल्यांना दंड व शिक्षा होई. याचें कारण असें कीं, धोतरवाल्या पक्षाचे लोक आपापले मिलिटरी ड्रेस घालीत व तरवारी कमरेला लटकावून पोलीस चौकीला जात. त्यांचे म्होरके बहुधां सुभेदार असत. ते फर्ड्या इंग्रजींत भांडणाचें मूळ व इतिहास अधिकाऱ्याना समजावून सांगत. शिवाय, मिलिटरी पेन्शनर यांना सरकारी अधिकारी मानमरातब देत. यामुळें लगोटीवाल्या पक्षावर पुष्कळ वेळां सरकारची तोहमत येई. पण कधीं कधीं धोतरवाल्यांनाहि दंड भरावे लागत.

अशा भानगडींच्या भागांत भिवाचें विद्यार्थीजीवन कसेंबसें चाललें होतें. शाळेंतून सायंकाळीं तो घरीं आला कीं, नेहमींप्रमाणें दप्तर ठरलेल्या ठिकाणीं ठेवावयाचें व नंतर खेळावयला जावयाचें. क्रिकेटची प्रॅक्टिस व मॅचेस महालक्ष्मीचें रेसकोर्स आतां आहे त्या मैदानावर होत असत. खेळून आल्यानंतर जेवण होई व मग गप्पांचा अड्डा पडे. त्या गप्पांत सर्व विषयांवर खल होई व अनेकांच्या बारा भानगडी व कुलंगडीं उकरून निघत. त्या अड्ड्यांतहि भिवा सर्वांत पुढें असायचा. भिवा सकाळीं सुद्धां चकाट्या पिटण्यात वेळ घालवी. शाळेला जाताना पुस्तकांची

जुळवाजुळव करी व रस्त्यानें त्या दिवसाच्या अभ्यासाचीं पुस्तकें (धडे) वाची. शाळेला जातांना व येतांना त्याला बी. बी. सी. आय. च्या गाडीनें जावें लागे. वडील रेल्वेच्या खर्चाला पैसे देत पण भिवानें रेल्वेचें तिकीट व पास कधींच काढला नाहीं. रेल्वेच्या खर्चाला वडिलांकडून मिळालेले पैसे भिवा कधींच व्यर्थ खर्च करीत नसे. त्या पैशांतून तो नवीन व जुनीं पुस्तकें विकत घेई व तीं स्वतः वाचून आपल्या मित्रांना वाचावयास देई. हीं व इतर वाचलेलीं पुस्तकें यांतील नवे शब्द, म्हणी व वाक्संप्रदाय लिहून काढण्यासाठीं वह्या व इतर कागद विकत घेण्यासाठीं कांहीं पैसा खर्च होई.

मुलानें शाळेंत पहिला नंबर ठेवावा, ही सुभेदारांची इच्छा होती. भिवा शाळेच्या अभ्यासाकडे हवें तितकें लक्ष देत नाहीं, याबद्दल त्यांना वाईट वाटे. कधीं रागावून तर कधीं जुलूम जबरदस्ती करून सुभेदार भिवाला अभ्यासाला बसवीत असत व त्याच्याकडून स्वतः अभ्यास करवून घेत. या बाबतींत भिवानें टंगळमंगळ केली तर सुभेदार भयंकर संतापत. त्या रागाच्या भरांत ते भिवाला तब्बल तीनचार तास स्वतःच्या पुढें बसवून अभ्यास घेत. सुभेदारांचें इंग्रजी, मराठी व मोडी हस्ताक्षर फार चांगलें होतें. आपल्या मुलाचें हस्ताक्षर उत्तम व्हावें, याबद्दल त्यांनीं साताऱ्याला असतांना प्रथमपासून काळजी घेतली होती. चिंचेच्या छडीनें भिवाला झोडपून कित्ते गिरवून घेतलेले होते. त्यामुळें भिवाच्या इंग्रजी हस्ताक्षराला अत्यन्त नमुनेदार वळण लागलेलें होतें. आपल्या हायस्कूलमधील शिक्षणासाठीं वडिलांनीं किती धडपड व काळजी केली होती, यासबंधी बाबासाहेबांनीं कृतज्ञतापूर्वक व भारावलेल्या आवाजांत माहिती सांगितली होती. ते म्हणाले :

"मला पहिल्यापासून शाळेच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करून इतर पुस्तकें वाचण्याचा भारी नाद असे. पण तें माझ्या वडिलांना पसंत नव्हतें. त्यांचें म्हणणें कीं, शाळेचा अभ्यास हा अगदीं केलाच पाहिजे. मग हवें असल्यास इतर वाचन नंतर करावें. मराठीप्रमाणेंच त्यांना इंग्रजी भाषेचा पण अभिमान होता. त्यांना इंग्रजी शिकण्याचीहि फार हौस होती. ते मला नेहमीं सांगत, "हावर्डचीं पुस्तकें तोंडपाठ करून टाक!" त्याचप्रमाणें तर्खडकरांचीं भाषांतरपाठमालेचीं तीन पुस्तकें पण त्यांनीं माझ्याकडून पाठ करवून घेतलीं होतीं. मराठी भाषेंतील शब्दांना योग्य इंग्रजी प्रतिशब्द हुडकून काढण्यास व त्यांचा योग्य ठिकाणीं उपयोग करण्यासहि माझ्या वडिलांनींच मला शिकविलें. मी इंग्रजी चांगलें बोलतों व लिहितों अशी माझी थोडीबहुत ख्याति आहे असें मला वाटतें. पण योग्य शब्दाचा तोलतोलून उपयोग कसा करावा हें माझ्या वडिलांनीं मला जसें शिकविलें तसें इतर कोणाहि मास्तरांनीं मला शिकविलें नाहीं. तर्खडकरांच्या पुस्तकांतून उलट सुलट शब्द विचारून ते माझ्या ज्ञानाची नेहमीं चांचणी करीत. त्याचप्रमाणें इंग्रजी वाक्प्रचार (idiom) व योग्य भाषाशैली कशी वापरावी हेही पण त्यांनींच मला शिकविलें.

"त्यांना गणिताचा भारी नाद असे. गोखल्यांच्या अंकगणितांतील एकूण एक उदाहरणें त्यानीं स्वतः सोडवून चांगल्या सुवक अक्षरांत एका मोठ्या वहींत उतरून ठेवलीं होतीं; इच्छा ही कीं, ती वही मी वेळोवेळीं चाळून पहावी व गणित विषयांत खूप हुषारी मिळवावी. त्याचप्रमाणें मी उत्तम तऱ्हेनें पास व्हावें याविषयीं त्यांनीं माझी किती काळजी वाहिली असेल याची कोणाला कल्पनासुद्धां यायची नाहीं.

"पहिल्यानें आमची घरची स्थिति बऱ्यापैकीं होती; पण पुढें पुढें ती फारच हलाखीची झाली. माझ्या वडिलाना थोडेसें पेन्शन मिळत असे पण मुंबईची रहाणी व कुटुंबात बरींच माणसें सांभाळावयाचीं. त्यामुळें लागतील तीं पुस्तकें आणून देणें व मला चांगले कपडेलत्ते करून देणें हें आमच्या वडिलांच्या आटोक्याबाहेरचें असे. तरी पण होईल ती झीज सोसून ते माझ्या सुखसोयीची तरतूद करण्यास नेहमीं तयार असत.

"स्वतःचीं पुस्तकें असावींत, म्हणजे फक्त स्वतःच्या मालकीचीं, एवढीच त्यावेळीं माझी महत्त्वाकांक्षा होती. त्या महत्त्वाकांक्षेमधूनच हल्लीचें माझें ग्रंथसंग्रहालय निर्माण झालें! त्या वेळीं सुद्धां नवीन नवीन पुस्तकें आणून देण्यासाठीं मी माझ्या वडिलांच्या जवळ हट्ट धरी. मी एकादें पुस्तक मागितलें कीं, तें संध्याकाळपर्यंत माझ्या वडिलांनीं कोठून तरी आणून दिलें नाहीं असें कधीं झालेंच नाहीं. आमची आर्थिक स्थिति खूपच हलाखीची होती ही गोष्ट मी आतांच तुम्हांला सांगितली, पण त्या वेळीं मला त्या गोष्टीची फारशी जाणीव नव्हती. माझ्या वडिलांचें अंतःकरण थोर, यांत शंका नाहीं. माझ्याकडून एकाद्या पुस्तकाची मागणी झाली कीं, खिशांत पैसे असोत नसोत–बहुतेक खिशांत पैसे नसायचेच–खाकोटीस आपलें नेहमींचें मुंडासें मारून माझ्या वडिलांची स्वारी थेट बाहेर पडावयाची; त्यावेळीं माझ्या दोघीही वडील बहिणी येथेंच मुंबईत असायच्या. त्यांचीं त्यावेळीं लग्नें झालेलीं होतीं. माझे वडील जें घरून निघायचे ते थेट माझ्या धाकट्या बहिणीकडे जायचे, व तिच्यापाशीं जें कांहीं तीन चार रुपये माझ्या पुस्तकासाठीं हवे असतील ते मागायचे. तिच्यापाशीं तरी कोठून असणार तीन चार रुपये? बिचारी कळवळयानें "माझ्यापाशीं एवढे रुपये नाहींत" असें म्हणायची. पण लगेच माझे वडील पुन्हां आपलें मुंडासें खाकोटीस मारून माझ्या थोरल्या बहिणीकडे जायचे. तिच्यापाशींहि सुटे रुपये नसले म्हणजे ते तिच्याकडून एखादा दागिना मागून घेत असत. अर्थात हे सारे दागिने माझ्या वडिलांनींच माझ्या बहिणींना लग्नात दिलेले होते. तरी पण त्यांची नेकी पहा केवढी होती. तो दागिना घेऊन ते एका ठराविक मारवाड्याकडे जात. त्याच्याकडे महिन्यासाठीं तो दागिना गहाण ठेवीत आणि महिना संपला कीं, पेन्शन हातीं पडल्याबरोबर वडील पुन्हां त्या मारवाड्याच्या घरीं जात व तो गहाण टेवलेला दागिना सोडवून आणून बहिणीकडे पोहोंचता करीत. त्यामुळें माझ्या बहिणीसुद्धां वडिलांनीं दागिना मागिला तर कधींहि नाहीं

म्हणत नसत. याला आणखीही एक कारण होतें. माझी आई माझ्या अगदीं लहानपणींच वारलेली असल्यानें मला माझ्या आतेनें वाढविलें होतें. ही आमची आत्या माझ्या वडिलांच्यापेक्षां मोठी असल्यानें तिचा घरांत मोठा रुबाब व दरारा असे. माझे वडिलसुद्धां तिला खूप मान देत असत. त्यामुळेंच मी आतेचा लाडका म्हणून घरांत मला बोलण्याची कोणाची छाती नव्हती. याचा परिणाम असा झाला कीं मी मात्र त्यामुळें खूपच लाडावलों. माझ्या सुखासाठीं माझे वडील किती दगदग सहन करीत व नाना तऱ्हांच्या अडीअडचणींना कसें तोंड देत याची मला त्यावेळी मुळींच जाणीव नव्हती. मी शेंडीला चपचपीत तेल चोपडून या नव्या आणलेल्या पुस्तकाची उशी करून खुशाल आपला झोंपी जायचा! या पुस्तकाची त्यामुळें काय दुर्दशा होत असेल याची तुम्हीच कल्पना केलेली बरी. लहान वयापासून मला वाचनाचा विलक्षण नाद लागला व तो इतका कीं अमुक पुस्तकांत अमक्या ठिकाणीं एखादी महत्त्वाची बाब आहे ही गोष्ट कोठेंहि टाचणें वगैरे न लिहिलीं असतांहि मी ताबडतोब आठवूं शकतो. या माझ्या संवयीमुळेंच माझी स्मरणशक्ति अतिशय तल्लख झालेली आहे." (नवयुग ता. १३-४-४७)

भिवा घरचा अभ्यास जरी नीटसा करीत नसे तरी तो वर्गांत झालेला अभ्यास लक्षपूर्वक ऐकून त्यावरील उत्तरें बिनचूक देई व आठवड्याच्या परीक्षेंत उत्तम रीतीनें पास होई. मुलें दुपारच्या फराळासाठीं जें कांहीं आणीत तें फळ्याच्या मागें ठेवून देत. एके दिवशीं फळ्यावर भूमितींतील कांहीं आकृति काढून मास्तरनें विद्यार्थ्यांना त्या आकृतीची माहिती सांगितली. ती आकृति पुसून मास्तरनें मुलांना विचारलें, "सांगितलेली माहिती फळ्यावर आकृति काढून कोण सांगू शकेल त्यानें हात वर करावा." वर्गांतून सर्व मुलांतून एकच हात वर झालेला होता व तो वर्गांतील मुलांपासून दूर बसलेल्या भिवाचा. मास्तरनीं भिवाला फळ्याकडे जाण्यास सांगितलें तों सर्व मुलांनीं गिल्ला केला "मास्तर थांबवा त्याला. तो आमच्या फराळाचे जिन्नस बाटवील!" त्यांचा हा गोंगाट पाहून मास्तरनें मुलांना आपल्या दशम्या दूर ठेवण्यास सांगितल्या व भिवाला फळ्यावर लिहावयास सांगितलें. भिवानें सर्व आकृति काढून सर्व माहिती तोंडानें सांगितली. तेव्हां मास्तरनें त्याला शाबासकी दिली व स्पृश्यवर्गीय मुलांची निर्भत्सना केली.

गणिताच्या विषयाच्या मास्तराप्रमाणें पर्शियनचे मास्तर खोदाबक्ष बेहेरामजी इराणी हेहि भिवाच्या हुशारीची वेळोवेळीं स्तुति करीत असत. एवढेंच नव्हे तर ते भिवाला अधून मधून पुस्तकांसाठीं पैसे देत असत. याचें कारण म्हणजे भिवाला पर्शियनमध्यें नेहमीं ७५ च्या वर मार्क्स मिळत असत. हे दोन मास्तर सोडले तर इतर मास्तर सनातनी विचारांना बळी पडलेले लोक होते. त्यापैकीं एक मास्तर असा होता कीं तो भिवाचा राहून राहून पाणउतारा करी. "अस्पृश्यांचा खरा उद्धारक कोण?" या नांवाचा श्री. सीताराम नामदेव शिवतरकर यांनीं लिहिलेला लेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वागत.
अनुक्रम 23559 वि: ........
नों: दि: ........



' जनता ' या पत्राच्या तां. १४-४-१९३४ च्या अंकात प्रसिद्ध झालेला होता. त्या लेखात भीमरावचे एक मास्तर त्याच्याशीं कसे वागत असत, त्याबद्दल माहिती दिलेली आहे ती अशी :

" डॉ. आंबेडकरांच्या अंगीं वेडरपणा किती आहे याची खात्री अस्पृश्य जनतेला पूर्ण आहे. हा गुण त्यांच्या अंगीं लहानपणापासूनच आहे. ते इंग्रजी ५ वी इयत्तेंत शिकत असतांना त्यांच्या वर्गावरील एक ब्राह्मण शिक्षक त्यांना वारंवार टोंचून बोलत असे कीं, ' अरे भीमराव, तूं जातीनें महार आहेस. तुला हें शिक्षण घेऊन काय करावयाचें आहे.' हे त्या आपल्या गुरुजींच्या तोंडचे शब्द भीमरावानें ५।६ वेळ ऐकून घेतले. पण गुरुजीचें आपलें नेहमीं तेच शब्द बोलणें चालूं राहिलें. तेव्हां त्यांनीं आपल्या गुरुजीची कानउघाडणी स्पष्ट शब्दांत केली. ते त्यांना म्हणाले, " गुरुजी, हें शब्द तुम्हीं जर पुन्हां उच्चाराल तर याद राखून रहा. मी शिक्षण घेऊन काय करणार आहे हें विचारण्याचें काम तुमचें नाहीं. तेव्हां यापुढें तुम्हीं मला अपशब्दानें बोलूं नका. नाहींतर परिणाम वाईट होईल. "

हायस्कूल सुटल्यानंतर भिवा अवांतर पुस्तकें वाचण्यासाठीं चर्निरोड गार्डनमध्यें जाऊन बसे. त्यावेळीं वुइल्सन हायस्कूलचे हेडमास्तर व एक विद्याव्यासंगी ब्राह्मणेतर ग्रंथकार प. वा. कृष्णाजी अर्जुन केळुस्कर हे आपलें वाचन करण्यासाठीं ५॥ वाजतां गार्डनमध्यें येत व ठराविक ठिकाणीं बसून वाचीत असत. दोघांनीं परस्परांना ३।४ दिवस पाहिल्यानंतर एके दिवशीं केळुस्करानीं स्वतः भिवाजवळ येऊन सर्व चौकशी केली व भिवाची हकिगत ऐकून ते फार संतुष्ट झाले. पद्धतशीर वाचन कसें करावें याबद्दलची माहिती केळुस्करानीं भिवाला दिली. त्यानीं चांगल्या ग्रंथकारांचीं पुस्तकेंहि भिवाला वाचावयास दिलीं. तेव्हांपासून भिवाच्या विस्तृत वाचनाला सुरवात झाली व केळुस्करांची व त्याची अभेद्य गट्टी जमली.

वरच्या वर्गांत गेल्यानंतर भिवाचा जन्मजात द्वाड व व्रात्य स्वभाव हळुहळूं कमी होऊं लागला. त्याचें खेळांतील लक्षहि कमी होऊं लागलें. तो अभ्यासाकडे लक्ष देऊं लागला. वडिलांची दररोजची देखरेख आणि इराणी व केळुस्कर या दोघांचें उत्तेजन यामुळें भिवानें सातव्या इयत्तेंत झटून अभ्यास केला. १९०७ च्या मॅट्रिकच्या परीक्षेस तो बसला व तींत तो उत्तीर्ण झाला. ( नंबर ८७२, मार्क्स् २८२, युनिव्हर्सिटी कॅलेंडर भाग १. पा. ४१४, १९०८-१९०९ ) भिवा मॅट्रिकची परीक्षा पास झाला, हें ऐकून घरांतील आणि डबक चाळीच्या आसपासच्या सर्व लोकांना आनंद झाला. सुभेदारांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. मॅट्रिकची परीक्षा ही फार कठीण व तींत अस्पृश्य जातींतील एक मुलगा पास झाला, हें पाहून अस्पृश्य वर्गांतील आम लोकांना अत्यंत आनंद झाला. त्यांनीं भिवाचें अभिनंदन करण्यासाठीं डबक चाळींत एक मंडप उभारला व त्यांत जाहीर सभा घेतली. या सभेचे अध्यक्ष

श्री. सीताराम केशव बोले हे होते. सभेला इतर जातींतील लोक आले होते. ही सभा १९०८ च्या जानेवारी महिन्यांत झाली. सभेंत वक्त्यांनीं अभिनंदनपर भाषणें करून या मुलानें विश्वविद्यालयाचें शिक्षण घेऊन बी. ए. व्हावें अशा अर्थाचे उद्गार काढले. भिवाला सभेंत हार घातले. ते स्वीकारून भिवा तोंडांतून "ब्र" न काढतां घरीं गेला. त्यावेळीं त्याचा पोषाख म्हणजे एक शुभ्र धोतर ( काच्या घालून नेसलेलें ) तपकिरी रंगाचा कोट, पायांत मालवणी वहाणा व डोकें बोडकें. भिवाच्या उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ याच सभेंत रोंवली गेली. याबद्दलची हकिकत प. बा. केळुस्कर यानीं 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर' या शीर्षकाखालीं १९३२ च्या एप्रिलच्या 'जनता' खास अंकांत लिहिलेल्या लेखांत सांगितलेली आहे. ते लिहितात "ते ही ( मॅट्रिक ) परीक्षा पास झाले तेव्हां त्यांचें अभिनंदन करण्यासाटीं त्यांच्या कांहीं ज्ञातिबांधवांनीं एक सभा परळच्या बाजूला केली होती. त्या सभेला मी जाऊन दोन अभिनंदनपर शब्द बोललों होतों. सभा आटोपल्यावर त्यांचे तीर्थरूप रामजी सुभेदार पेन्शनर याजकडे मी म्हटलें कीं, "तुमचा हा मुलगा मोठा बुद्धिवान् व तेजस्वी आहे. याला पुढलें कॉलेजांतील शिक्षण अवश्य द्या." ते म्हणाले "मला नुसतें रु. ५० पेन्शन मिळतें. एवढ्यानें माझें व माझ्या कुटुंबाचें भागत नाहीं; तेव्हां याच्या शिक्षणाला मी कोठून पैसे आणूं?" तेव्हां मी त्यांना म्हटलें "याला श्रीमंत महाराज गायकवाड यांच्याकडून कांहीं मदत मिळवून दिल्यास आपण याला कॉलेजांत पाठविण्यास तयार व्हाल ना?" सुभेदारानीं होय म्हटल्यावरून मी रा. भीमरावांना नीटनेटका पोषाख करून महाराजांच्या भेटीस नेलें, आणि त्यांचें दर्शन घेऊन मी त्यास टाऊन हॉलमध्यें नुकतेंच केलेल्या भाषणाची आठवण करून दिली आणि म्हटलें, "महाराजांनीं असें अभिवचन दिलें आहे कीं, अस्पृश्य वर्गापैकीं लायख विद्यार्थी मिळाल्यास आपण त्याला उच्च शिक्षणासाठीं अवश्य मदत करूं. तेव्हां मी आपणाकडे असा लायक विद्यार्थी महार ज्ञातिसंघापैकीं आणिला आहे. तो नुकताच मॅट्रिक झाला आहे. त्याचे वडील लष्करांत सुभेदाराच्या हुद्याला पोहोंचून पेन्शन घेऊन घरीं बसले आहेत. आपली आज्ञा होत असल्यास त्याला आपल्या दर्शनास आणतों." या गोष्टीचा महाराजांस मोठा संतोष वाटून त्यांनीं मला त्यास घेऊन येण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें रा. भीमरावास महाराजांपुढें नेऊन उभें केलें. त्यावेळीं इंदुप्रकाश छापखान्याचे मालक रा. दामोदरशेट यंदे हे तेथें होते. महाराजानीं रा. भीमरावांना कांहीं प्रश्न विचारले त्यांचीं त्यांनीं समर्पक उत्तरें दिलीं. तीं ऐकून महाराज खूष झाले व कॉलेजांत जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठीं दरमहा रु. २५ ची शिष्यवृत्ति देण्याचें अभिवचन दिलें."

३ जानेवारी १९०८ रोजीं भिवाचें नांव एल्फिन्स्टन कॉलेजांत प्रीव्हियसच्या वर्गांत दाखल केलें. कॉलेजमध्यें गेल्यानंतर बडोद्याची दरमहा रु. २५ स्कॉलरशिप त्याला मिळाली व त्यामुळें भिवाला आपल्यावरील जबाबदारीची जाणीव झाली. तो

सकाळीं उठून कॉलेजांत जाई. याच वेळीं श्री. के. बी. इराणी हे त्याचे पर्शियनचे शिक्षक कॉलेजमध्यें पर्शियनचे असिस्टंट प्रोफेसर म्हणून आलेले होते. त्यांनीं आपली खोली भिवाला अभ्यासासाठी दिलेली होती. या खोलींत भिवा सकाळीं साताला येऊन अभ्यासाला बसे. कोटांत काम करण्यासाठीं डबक चाळीच्या आसपासचा एक गृहस्थ ९ वाजतां घरून निघे. त्याच्याजवळ भिवाचें जेवण घरचे लोक देत. तें जेवण म्हणजे बाजरीच्या दोन भाकरी व बोंबलाची चटणी. हें जेवण तो गृहस्थ भिवाला दररोज देऊन आपल्या कामाला जाई. भिवा जेवण १० च्या सुमारास घेई व १०॥ वाजतां वर्गांत जाऊन बसे. हा कार्यक्रम एक दोन वर्षें चालला.

कॉलेजचा अभ्यासक्रम चालला असतांना भिवाचे खेळ व मॅचेस् चालूं होत्या. पण त्याचा हूडपणा व मारामारीला एकदम सुरवात करण्याचा उतावीपळणा आतां बराच कमी झालेला दिसत होता. चातुर्मासांत लावलेल्या पौराणिक ग्रंथवाचनांत तो भाग घेई. आनंदरावांना तबल्याची फार आवड. ते तबला चांगल्या प्रकारें वाजवीत. भिवानें तबला वाजविण्याची थोडीशी कला या वेळीं हस्तगत केली. तो भजनांत प्रसंगोपात् तबला वाजवी. गोकुळाष्टमीचा उत्सव मोठ्या प्रमाणांत साजरा होई त्यावेळीं मुलें शारदा नाटक करीत. हें नाटक भिवानें बसविलेलें होतें. शेक्सपियरच्या ' किंग लियर ' या नाटकावरून भिवानें ' शहाणी मुलगी ' या नांवाचें एक प्रहसन लिहून तें मुलांकडून बसवून लोकांसमोर केलें. तेव्हां लोकांनीं त्याची फार वाहवा केली. संन्यास घेतलेला एकादा बुवा अगर कीर्तनकार आला तर त्याच्याकडून भजनाचे कार्यक्रम व कीर्तनें करण्यासाठीं भिवा आपल्या सोबत्यांसह लोकांकडून वर्गणी गोळा करून कार्यक्रम करीत असे, व या बुवांना दक्षणा देत असे. पौराणिक कथांच्या हकिकतींत जर कीर्तनकारांनीं चुकीची माहिती सांगितली तर तो त्यांची लोकांसमोर फटफजिती करीत असे. भिवाचे हे उपद्व्याप सुभेदारांना आवडत नसत. त्यानें अभ्यास करावा व परीक्षेंत चमकून नांव कमवावें, असें त्यांना वाटे. म्हणून भिवाच्या या अमल्या उठाठेवींना सुभेदार पायबंद घालीत व 'अभ्यासाला लाग,' असा ते त्याच्यामागें लकडा लावीत. तेव्हां भिवा त्यांना चिडून म्हणे, "मी कधींहि नापास होत नाहीं; दरवर्षी बीनबोभाट पास होत असतों, हें नाहीं का पुरें होत? मग मी आणखी अभ्यास करावा म्हणून तुम्ही माझ्या मागें कां लागतां?" (नवयुग, ता. १३-४-४७)

भिवाचा बेफिकीर व तापट स्वभाव सुभेदारांना माहित होता. ते कधीं त्याला रागावून तर कधीं आंजारून गोंजारून अभ्यासाला बसवीत. भिवा ज्युनियर बी. ए. च्या वर्गात गेला तेव्हांपासून सुभेदारांनीं, त्यानें नियमितपणें अभ्यास करावा याबद्दल परोपरीनें प्रयत्न केले. या सुमारास ते डबक चाळ सोडून इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या (पोयबावडी-परळ) चाळींत रहावयास आले होते. कॉलेजांतून घरीं आल्यावर भिवा क्रिकेट खेळण्यास अगर खेळ खेळण्यास जाई. किंवा सायंकाळीं

आगाशीवर बिछाने टाकून मित्रांच्याबरोबर गप्पागोष्टी करी. परीक्षा जवळ आल्यानंतर सुभेदारांनीं भिवाला एका खोलींत अभ्यासासाठीं जवळ जवळ कोंडून ठेवलें. कॉलेजमधून आल्यानंतर त्याला जे एक दोन तास स्वतंत्र मिळत त्यांत भिवा आपले सर्व इतर व्यवसाय करी. प्रार्थनेनंतर जेवण व त्यानंतर झोपणें, हा कार्यक्रम यंत्राप्रमाणें चाले. सुभेदार भिवाला ९ वाजतां झोपण्यास सांगत व स्वतः खोलीच्या बाहेर एकदोन वाजेपर्यंत जागरण करीत बसत व त्यानंतर भिवाला जागें करून अभ्यासाला बसवीत व स्वतः खोलीच्या पुढें झोंपून जात. याबद्दलचें वर्णन त्याच्याच शद्बांत देतों :

"...मी बी. ए. व्हावें याबद्दल माझ्या वडिलांना अत्यंत तळमळ वाटत असे. पहांटे दोन वाजतां उठून मी अभ्यास करीत असे. पहांटेच्या वेळीं मन शांत व प्रसन्न असल्यामुळें अभ्यास चांगला होतो, अशी माझी समजूत आहे. परीक्षेच्या वेळीं मी पहाटे दोन वाजतां जागें व्हावें म्हणून वडील दोन वाजेपर्यंत स्वतः निजत नसत. आरंभीं आरंभीं सकाळीं उठावयाचें माझ्या जिवावर येत असे. वडिलांनीं जबरदस्ती करून मला उठविलें कीं, मनांतल्या मनांत कांहींतरी रागानें मीं पुटपुटत असे. माझ्या उशाशीं त्यावेळीं एक समई ठेवलेली असे. तिच्यांतलें तेल व वात उजेड देऊन देणार तरी किती व मी वाचणार तरी किती? जेमतेम पहांटे पांच वाजेपर्यंत अंथरुणांतल्या अंथरुणांत या कुशीवरून त्या कुशीवर लोळत लवंडत मी कांहीं तरी अभ्यास करायचा किंवा निदान अभ्यासाचें सोंग तरी छान आणायचा. पांच वाजल्यानंतर मात्र एक मिनिटसुद्धां अंथरुणावर निजण्याची आम्हांला परवानगी नसे." ( नवयुग, ता. १३-४-४७. )

१९१२ च्या नोव्हेंबरमध्यें बी. ए. ची परीक्षा झाली व तिचा निकाल १९१३ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत लागला. भिवा त्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला. सर्वांना आनंदीआनंद झाला. सुभेदारांचा आनंद गगनांत मावेनासा झासा. निकाल ऐकल्याबरोबर ते बाजारांत गेले व पांच रुपयांचे पेढे घेऊन आले व देवघरांत धूपदीप लावून ते सद्गदित स्वरानें म्हणाले, "परमेश्वरा! तूं माझी इच्छा तृप्त केलीस. मी तुझी आतां करुणा भाकतों कीं, तूं भिवाला सुखी ठेव!" आसपासच्या लोकांच्या घरीं जाऊन सुभेदारानीं लहान मोठ्यांना पेढे वाटले. प्रीव्हियसपासून बी. ए. पर्यंतचे सर्व दिवस भिवानें एल्फिन्स्टन कॉलेजांत घालविले. त्यावेळीं हें कॉलेज म्हणजे पराच्या गाद्यागिर्द्यांवर लोळणाऱ्या विद्यार्थ्यांचें विद्यालय म्हणून प्रसिद्ध होतें. अद्यावत् युरोपियन ड्रेस करणारे व क्रिकेट, टेनिस, हॉकी, बॅडमिंटन, या खेळांत रममाण होणारे श्रीमंताचे बेटे त्या कॉलेजांत असत. गरीबांच्या मुलांनीं तेथें पाय ठेवणें फार मुष्किल. एकादा गरीबाचा मुलगा तेथें गेला तर त्याच्या पोषाखाकडे नाकडोळे मुरडून व कधीं कधीं त्याची टिंगल करून श्रीमंतांचीं पोरें त्याच्या दुःखावर डागण्या देत. यामुळें श्रीमंतांच्या पोरांत गरीबांच्या पोरांना मिळून मिसळून वागावयास

मिळत नसे. अशा परिस्थितींत भिवाला एल्फिन्स्टन कॉलेजांत दिवस काढावे लागल्यामुळें कॉलेजांतील वातावरण त्याला उत्साहकारक वाटलें नाहीं. उलट अंशीं त्या श्रीमंती वातावरणाबद्दल त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला.

प्रोफेसर लोकांची ओढ श्रीमंतांच्या मुलांकडे असे. प्रसंगोपात् त्यांना गरीबांच्या मुलांकडे लक्ष द्यावें लागलें तर तें त्या वेळेपुरतें देत. पण श्रीमंतांच्या मुलांशीं त्यांचा जास्त घनिष्ट व वेळोवेळीं संबंध येई तसा तो गरीबांच्या मुलांशीं येत नसे. भिवाला याचा अनुभव आलेला होता. त्याचे इंग्रजी व पर्शियन हे विषय फारच उत्तम होते. व त्यांत तो शेंकडा ७५ वर मार्क्स नेहमीं मिळवीत असे. परंतु इंग्रजीचा प्रोफेसर म्युलर आणि पर्शियन असिस्टंट प्रोफेसर के. बी. इराणी यांच्याशिवाय कॉलेजांतील इतर प्रोफेसर भिवाबरोबर प्रेमळपणानें वागून त्याच्या अभ्यासाला उत्तेजन देत नसत. याबद्दल पुढें बाबासाहेबांनीं जे उद्गार काढले ते येथें उद्धृत करतों :

"आमच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यावेळीं प्रो. ओस्वॉल्ड, म्युलर, प्रिन्सिपल कॉव्हर्नटन, प्रो. जॉर्ज अँडर्सन असे चांगले चांगले प्रोफेसर होते. पण काय असेल तें असो, त्यांनीं कांहीं माझ्या मनांत स्फूर्ति उत्पन्न केली नाहीं. प्रो. म्युलरचें तर माझ्यावर फार प्रेम असे. ते मला आपले शर्ट देत. तरी पण त्यांच्या शिकविण्यानें माझ्या अंतःकरणांत नवचैतन्य निर्माण होऊं शकलें नाहीं ही गोष्ट तितकीच खरी. त्यामुळें मी जरी युनिव्हर्सिटीच्या परीक्षा प्रतिवर्षी पास होत गेलों तरी मला कधीं दुसरा क्लास मिळाला नाहीं. बी. ए. ला तर थोड्याच मार्कांनीं माझा दुसरा वर्ग गेला. त्या वेळच्या माझ्या अभ्यासामधल्या प्रगतीवरून पाहतां, मी पुढें मिळविलेल्या पदव्या घेण्यास व लिहिलेलीं पुस्तकें लिहिण्यास समर्थ झालों असतों असें जर माझ्याविषयीं भविष्य कुणीं वर्तविलें असतें तर तें साफ चुकीचें झालें असतें!" (नवयुग, ता. १३-४-४७)

श्रीगणेशापासून बी. ए चें भिवाचें शिक्षण झालें त्यांचे सर्व श्रेय त्यांचे पिताजी सुभेदार यांना आहे. त्या शिक्षणासाठीं सुभेदारानीं ज्या खस्ता खाल्या, जी धडपड केली व जो जीवापाड खर्च केला, त्याबद्दल भिवानें कृतज्ञतेनें वेळोवेळीं उद्गार काढलेले आहेत. त्यांतील कांहीं उद्गार या व गेल्या प्रकरणांत दिलेले आहे. आपण कोणत्याहि परीक्षेंत वर नंबर काढला नाहीं किंवा चमकलों नाहीं व वडिलांच्या सल्ल्याप्रमाणें आपण झटून व प्रामाणिकपणें अभ्यास केला असता तर प्रत्येक परीक्षेंत आपल्या बुद्धीची चमक आपणाला दाखवितां आली असती याबद्दलची जाणीव भिवाला फार उशीरा झाली. वर्गांत वर नंबर ठेवून व परीक्षेंतील बक्षिसें पटकावून आपणाला वडिलांची तळमळ शांत करता आली नाहीं याबद्दल भिवाला पुढें फार पश्चात्ताप झाला व मनस्वी दुःख झालें याबद्दलचे त्याचे पुढील उद्गार साक्ष देतात :

"आमच्या वडिलांची घरची शिस्त कडक व फौजी असल्यामुळें मला त्यांच्या कडकपणाचा फार कंटाळा येई. आतां मला वाईट वाटतें कीं, माझ्या वडिलांच्या

तळमळीप्रमाणें मी अभ्यास केला असता, तर मला मुंबई विश्वविद्यालयांत एकूण एक परीक्षांत दुसरा वर्ग मिळविणें कांहीं अशक्य झालें नसतें. पण त्यावेळीं मला त्यांच्या तळमळीचा अर्थ कळत नसे. म्हणूनच आमच्या मागें ते अभ्यासाचें दुमणें लावतात असेंच आम्हाला वाटत असे." ( नवयुग, ता. १३-४-४७ )

डॉ. आंबेडकर यांचें सर्व शिक्षण ख्रिस्तीत मिशनरी शाळेंत व कॉलेजांत झालें, मिशनऱ्यांच्या सहकार्यानें व उत्तेजनानें डॉक्टरसाहेब पुढें आले अशा आशयाची माहिती हेन्री बोल्टन या लेखकानें आपल्या "The Tragedy of Gandhi" या पुस्तकांत दिलेली आहे. ती माहिती चुकीची आहे हें या व पूर्वीच्या प्रकरणांत दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होतें. भीमरावांच्या बी. ए. पर्यंतच्या शिक्षणाची सर्व प्रकारची जबाबदारी सुभेदारांनीं यशस्वी रीतीनें पार पाडली.

कौटुंबिक व्यवहार, भीमरावाचें शिक्षण आणि पूजा अर्चा या कामांत सुभेदारांचा सर्व वेळ जात असे. जातीच्या पंचायतींत ते प्रामुख्यानें भाग घेत व त्यांच्या शद्बांना मान दिला जाई. जातींतील कार्यांत ते प्रामुख्यानें भाग घेत याबद्दल डॉ. आंबेडकरांनीं जी माहिती सांगितली आहे ती अशी :

"माझे वडील कबीरपंथी असल्यामुळें त्यांना मांसमच्छर व दारू बंद होती हें सांगायला नकोच. ते पक्के शाकाहारी असून दारूला ते हातसुद्धां लावीत नसत. पण जेव्हां जेव्हां म्हणून आमच्या खेड्यांत आमच्या समाजाचें जातिभोजन असेल तेव्हां तेव्हां सर्वांना मिष्टान्न मांस भोजन मिळावें म्हणून माझे शाकाहारी वडील पुढाकार घेत असत. आमच्या घरीं वंशपरंपरेनें चालत आलेलीं हंडे, पातेल्या, परात वगैरे मोठमोठालीं भांडीं असत. त्यांचा उपयोग सार्वजनिक ग्रामभोजनासाठीं व्हावयाचा असें जणूं ठरलेलेंच होतें. माझे वडील स्वतः गांवाबाहेरील झाडाखालीं जाऊन मोठमोठाले दगड डोक्यावर वाहून गोळा करीत, व गांवांतील भोजन-व्यवस्थापकांच्यासाठीं मोठमोठाले चुले स्वतः मांडून देत. बकऱ्याचें मांस, कोंबड्या व मासे यांचें चमचमींत जेवण तयार केलें जात असे. तें जेवण तयार करण्यांत-सुद्धां पुन्हा आमच्या वडिलांचाच पुढाकार असायचा ! अशा जेवणावळींत पुढाकार घेण्यांत आमच्या वडिलांना कधींच दोष वाटत नसे. 'फक्त स्वतः कांहीं खालें-प्यालें नाहीं म्हणजे झालें ! ' असें त्यांचें उदार तत्त्वज्ञान होतें. एवढेंच नव्हे तर दारूच्या बाटल्यासुद्धां ते स्वतः आणून प्रत्येकाला छटाक छटाक वाढीत असत ! पण त्यांनी जन्मभर दारूच्या एका थेंबालाहि स्पर्श केला नाहीं. हीच माझ्या वडिलांची परंपरा मीसुद्धां पुढें चालविली आहे. मी व्हाइसरॉयसाहेबांच्या कार्यकारी मंडळांत असतांना उत्तम उत्तम जेवणें व उत्तम उत्तम व्हिस्की, शांपेन वगैरे माझ्या मित्रमंडळींना दिलेली आहे ! माझ्या वडिलांप्रमाणेंच मीसुद्धां दारूच्या एका थेंबालाहि कधीं स्पर्श केलेला नाहीं, हेंहि पण सर्वश्रुतच आहे." (नवयुग, ता. १३-४-१९४७)

● ●

# प्रकरण ७ वें

## कोलंबिया युनिव्हर्सिटींत

बी. ए. ची पदवी हातीं पडल्यानंतर भीमरावानें मुंबई इलाख्यांत नोकरी करावी व फावल्या वेळांत अस्पृश्य समाजांत शिक्षणप्रसार करायचें कार्य करावें अशीं सुभेदारांची इच्छा होती. परीक्षेचा यशस्वी निकाल लागल्यानंतर सुभेदारांनीं आपला मनोदय भीमरावाला कळविला व म्हटलें, "तुला कुठल्या खात्यांत नोकरी करावयाची आहे तें सांग. तशी नोकरी तुला देण्याबद्दल मी गव्हर्नर साहेबाला जाऊन विनंति करतों. माझ्या विनंतीला ते जरूर मान देतील!" यावर भीमरावानें उत्तर दिलें कीं, "माझें उच्च शिक्षण पार पाडण्यास ज्यांनीं मला आर्थिक सहाय्य केलें त्या सयाजीराव महाराजांची मी नोकरी करावी व माझ्यावरील बडोदे सरकारचें ऋण फेडावें, असें मी ठरविलेलें आहे. तेव्हां तुम्ही गव्हर्नरला भेटण्याच्या भानगडींत पडूं नका." संस्थानी नोकरी हें आळवावरचें पाणी असतें, तशांतून अस्पृश्य वर्गांतील माणूस गुजराथी मुलुखांत अधिकारी म्हणून राहणें, ही विचित्र व अशक्य कोटींतील बाब होईल, वगैरे मुद्यांसंबंधीं सुभेदारांनीं आपल्या दृष्टिकोनांतून भीमरावाशीं चर्चा केली व बडोद्याला नोकरी धरूं नको, असा आग्रह धरला. या बाबतींत दोघांचा कडाक्याचा वादविवाद झाला. तो इतका कीं दोघांचीं मनें त्या दिवसापासून विषण्ण झालीं. त्या दिवशीं दोघेहि जेवले नाहींत. भीमराव वडिलांशीं बोलण्याचा प्रयत्न करीत. पण सुभेदार बोलण्याची टाळाटाळ करीत. ही गोष्ट भीमरावाच्या व घरांतील माणसांच्या मनाला लागून राहिली. घरांतील माणसांनीं व इतरांनीं वडिलांच्या म्हणण्याला संमति दे, असा भीमरावाला परोपरीनें सल्ला दिला. पण भीमरावानें कर्तव्यकठोरपणानें मन आपल्या ताब्यांत ठेवून बडोद्याच्या महाराजांना लिहून कळविलें कीं, आपण द्याल त्या ठिकाणी नोकरी करून आपलें ऋण फेडावें, अशी माझी इच्छा आहे. तेव्हां बडोदे सरकारनें भीमरावाला नोकरीसाठीं बडोद्याला बोलावून घेतलें.

भीमराव बडोद्याला २३ जानेवारी १९१३ च्या आसपास गेले. तेथें त्यांच्या राहाण्याची व खाण्यापिण्याची काहींच व्यवस्था केलेली नव्हती. ते तेथील महारवाड्यांत २।३ दिवस राहिले. ती जागा सर्व दृष्टीनें गैरसोयीची होती. तिथें राहात असतां त्यांची व पंडित आत्माराम यांची ओळख झाली. पंडितजी आर्यसमाजिस्ट पंजाबी हिंदु होते. ते संस्थानांतील अस्पृश्यांच्या शाळांचे इन्स्पेक्टर होते. त्यांनीं भीमरावांना आपल्या आर्यसमाजाच्या कचेरींत रहावयास नेलें. दुसरीकडे व्यवस्था होईपर्यंत भीमरावानें तेथें राहावें असें ठरविलें. ती जागा व भीमरावांना ज्या ऑफिसांत काम करावयाचें होतें ती जागा यांच्यांत दीड मैलाचें अंतर होतें. तेथें राहाण्याची सोय झाली पण जेवणाखाण्याची सोय दुसरीकडे करावयाची होती. तीहि महारवाड्यांतील एका सुशिक्षित गृहस्थाकडे करण्यांत आली.

बडोदें सरकारचें सेक्रेटरिएट म्हणजे कोठी. तेथें सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी व त्यांच्या कचेऱ्या होत्या. भीमरावांना कोणत्या खात्यांत ठेवावें, याबद्दल कोठींतील अधिकाऱ्यांमध्यें भवति न भवति चालू होती. त्यांना निर्णय लौकर घेतां येईना; तोंपर्यंत भीमरावांना एक दिवस एका ऑफिसांत तर दोन दिवस दुसऱ्या ऑफिसांत असें फिराव लागलें. त्या ऑफिसांत त्यांना जें काम देण्यांत येई तें ते झटपट करीत व बरोबर आणलेले एकादें जाडजूड पुस्तक वाचीत बसत, हें दृश्य कित्येकांना कौतुकास्पद वाटे. कित्येक म्हणत कीं, या गृहस्थाला कांहींच काम नसतें म्हणून तो वाचीत बसतो. कांहीं जणांनीं वरच्या अधिकाऱ्याकडे अशी तक्रार केली कीं, या गृहस्थाला कांहीं काम देण्यांत येत नाहीं म्हणून हा पुस्तकें वाचीत बसून पगार घेणार. त्या अधिकाऱ्यानें भीमरावांना बोलावून याबद्दल विचारलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं "मला जें काम देण्यांत येतें तें मी एक पळही व्यर्थ न घालवितां संपवितों व मग कांहीं काम नसेल तेव्हां इतरांप्रमाणें गप्पा मारीत न बसतां पुस्तकें वाचतों. शिवाय, मला येथील लोक अस्पृश्य म्हणून दूर ठेवतात व म्हणून मला त्यांच्यांत मिळून मिसळून बसतांहि येत नाहीं व गप्पाहि मारतां येत नाहींत." हा खुलासा ऐकून तो अधिकारी गप्प बसला.

रहाण्याची मनासारखी व्यवस्था नाहीं व ऑफिसांतील वातावरण मनाला त्रास देणारें अशा परिस्थितींत भीमरावांचा एक आठवडा गेला. ते बडोद्याला आले तेव्हां त्यांनीं सुभेदारांना एक पत्र पाठविलें होतें पण वरील परिस्थितीबद्दल कांहींहि कळविलें नव्हतें. नवव्या दिवशीं भीमरावांना तार आली कीं, सुभेदार फार आजारी आहेत. भीमरावांशीं भांडण झाल्यानंतर सुभेदारांना ताप येऊं लागला. भीमराव बडोद्याला गेल्यानंतर त्यांचा आजार वाढत गेला. "माझ्या आजाराबद्दल भिवाला कांहीं कळवूं नका, त्याच्या नव्या नोकरींत ही आणखी एक काळजी त्याला नको;" अशी घरातील लोकांना सुभेदारानीं ताकीद दिल्यामुळें घरांतील

लोकांनीं भीमरावाला आजारपणाबद्दल पत्र पाठविलें नव्हतें. पण सुभेदारांचा आजार वाढूं लागल्यानंतर घरांतील लोकांनीं भीमरावांना तार केली. ती तार पाहून त्यांना जबरदस्त धक्का बसला. त्यांनीं जेवण घेतलें नाहीं. ऑफिसांतील अधिकाऱ्यांना भेटून त्यांनीं आठ दिवसांची रजा काढली व ते मुंबईस निघाले. याबद्दलची त्यांची आठवण त्यांच्याच शब्दांत खालीं देतों:

"बी. ए. पास झाल्यावर मात्र माझ्या वडिलांना वाटलें कीं मी इथेंच राहावें, व कांहीं केल्या बडोद्याला जाऊं नये. बडोद्याला गेल्यानंतर माझा जो अपमान होणार होता त्याची कल्पना माझ्या वडिलांना आधींपासूनच होती असें वाटतें. बडोद्याच्या नोकरींत मी प्रवेश करूं नये यासाठीं त्यांनीं नाना तऱ्हांनीं माझें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण मी माझा हट्ट सोडला नाहीं. अखेर जें व्हायचें तेंच झालें. मी बडोद्याला गेल्यानंतर अकरा दिवसांतच त्यांचा अंत झाला ! ते एकाएकीं आजारी पडल्याची मला बडोद्यास तार आली. त्याबरोबर मी बडोद्याहून मुंबईस पोहोंचण्यासाठीं निघालों. वाटेंत सुरत स्टेशनवर वडिलांसाठीं सुरतेची बर्फी घ्यावी म्हणजे त्यांच्या मनाला बरें वाटेल अशी माझी कल्पना. पण बर्फी घेण्याच्या गडबडींत माझी गाडी केव्हांच निघून गेली. म्हणून दुसरी गाडी सुरतेहून निघे-पर्यंत मुकाट्यानें वाट पहात बसण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतें. त्यामुळें मीं दुसरे दिवशीं दुपारीं फार उशीरा मुंबईस पोहोंचलों. घरीं येऊन पहातों तों वडिलांची प्रकृती अत्यवस्थ झालेली व सारी मंडळी त्यांच्या अंथरुणाशेजारीं चिंतातुर होऊन बसलेली. तें दृश्य पाहतांच माझ्या काळजांत चर्र झालें. वडिलांनीं माझ्या अंगावरून प्रेमानें हात फिरविला व मला एकदां पूर्णपणें डोळे भरून पाहून त्यांनीं आपला प्राण सोडला ! केवळ माझ्या भेटीसाठींच त्यांचे प्राण एकसारखे घुटमळत होते. सुरतेला उतरल्यामुळें त्यांना लौकर भेटतां आलें नाहीं, याबद्दल मला अतिशय पश्चात्ताप वाटला !" ( नवयुग, ता. १३–४–४७ ).

२ फेब्रुवारी १९१३ रोजीं सायंकाळीं सुभेदार दिवंगत झाले. त्यांच्या प्रेतयात्रेला हजारों लोक उपस्थित होते. घराण्यांतील दुःखी वातावरण व सुतकाचे दिवस, यामुळें रजा संपल्यावर आपणाला बडोद्याला येतां येत नाहीं, असें भीमरावांनीं आपल्या अधिकाऱ्याला कळविलें.

कांहीं विद्यार्थ्यांना बडोद्यातर्फे अमेरिकेला उच्च शिक्षणासाठीं पाठवावें, याबद्दल महाराजांचा विचार चालू होता. महाराजांचा मुक्काम मुंबईंत असतांना भीमराव आपली बडोद्यांतील नोकरीची व रहाण्याची किती गैरसोय आहे, याबद्दलची माहिती महाराजांच्या कानावर घालण्यासाठीं व त्यांच्याकडून कांहीं हुकूम घेऊन पुन्हां बडो-द्याला जावें या विचारानें, महाराजांना भेटण्यास मलबार हिलवरील राजवाड्यांत गेले. या भेटींत भीमरावानें आपली सर्व हकीगत महाराजांना निवेदन केली. भीम-रावाबद्दलची एकंदर हकिगत महाराजांच्या कानावर गेलेली होती. त्यांचें इंग्रजी

भाषेवरील प्रभुत्व व त्यांचें नयनमनोहर इंग्रजी हस्ताक्षर पाहून महाराज त्यांच्यावर खूष झालेले होते. त्यानें आपल्या गैरसोयींबद्दलची जी हकीकत सांगितली त्याबद्दल महाराज एकहि शब्द न बोलतां भीमरावबरोबर निरनिराळया विषयावर संभाषण करूं लागले. महाराज ज्या विषयावर प्रश्न विचारीत त्या प्रश्नांवर भीमराव आपलें मत देत. अशा चर्चेत अर्धा तास गेला. मग महाराज भीमरावाला म्हणाले, " तूं मला उद्यां याच वेळीं भेट. " आपल्या तक्रारीबद्दल महाराज कांहींच बोलले नाहींत, याबद्दल भीमरावाला वाईट वाटलें. ते दुसऱ्या दिवशीं महाराजांना भेटले तेव्हां महाराज म्हणाले, " तुला कोणत्या विषयाचा अभ्यास करावा असें वाटतें ? " भीमराव उत्तरले, " समाजशास्त्र, अर्थशास्त्र, आणि विशेषतः पब्लिक फायनान्स. "

**महाराज**— या विषयांचा अभ्यास करून पुढें तूं काय करणार आहेस ?

**भीमराव**— या विषयांच्या अभ्यासानें मला माझ्या समाजाची अवनत अवस्था कशी सुधारावी याचे मार्ग दिसतील व त्या मार्गांनीं मी समाजसुधारणेचें कार्य करीन.

**महाराज**— ( हंसून ) पण तूं आमची नोकरी करणार आहेस ना ? मग तुला अभ्यास करणें, नोकरी करणें व समाजसेवा करणें या गोष्टी कशा पार पाडतां येतील ?

**भीमराव**— महाराजांनीं मला तशी संधि दिली तर मी या सर्व गोष्टी व्यवस्थित रीतीनें पार पाडीन.

**महाराज**— मी तोच विचार करीत आहे. तुला अमेरिकेला पाठविण्याचा मी विचार करीत आहे. तूं जाशील काय ?

**भीमराव**— होय महाराज.

**महाराज**— मग जा तर. तूं विद्याधिकाऱ्याकडे परदेशांत विद्याभ्यास करण्यासाठीं शिष्यवृत्ति मिळावी म्हणून अर्ज कर व मला तसें कळव.

हे महाराजांचे शब्द ऐकून भीमरावांना साश्चर्य आनंद झाला. त्यांनीं अर्ज बडोद्याला पाठवून दिला. तो मंजूर झाला व दरमहा साडे अकरा पौंडांची शिष्यवृत्ति ४ एप्रिल १९१३ रोजीं मंजूर करण्यात आली. हें वृत्त समजल्यानंतर भीमराव १८ एप्रिल १९१३ रोजीं महाराजाना पुन्हां भेटले व स्कॉलरशिप मंजूर केल्याबद्दल त्यांनीं त्याचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. पुढील प्रवासाच्या तयारीबद्दल व स्कॉलरशिपबद्दल भीमरावांनीं विद्याधिकाऱ्याला २१ एप्रिल १९१३ ला पत्र लिहिलें.

बडोदें संस्थानची शिष्यवृत्ति घेऊन जे विद्यार्थी परदेशांत विद्याभ्यासाला जात त्यांना कांहीं अटी पाळाव्या लागत व त्या अटींचा बॉंड लिहून द्यावा लागे. शिवाय दोन इसमांचा हवाला ( Surety ) द्यावा लागे. ते दोन इसम बडोदें संस्थानचे रहिवाशी असले पाहिजेत व त्यांची स्थावर जंगम इस्टेट संस्थानाच्या हद्दींत असली पाहिजे.

शिवाय, विद्याभ्यास संपल्यानंतर सदर विद्यार्थ्यानें शिष्यवृत्तीची सर्व रक्कम संपूर्णपणें फिटेपर्यंत संस्थानची नोकरी केली पाहिजे. भीमरावांना दोन लायक इसम शुअर्टी म्हणून मिळणें दुरापास्त होतें व ही गोष्ट भीमरावांनीं महाराजांच्या नजरेस आणून दिली होती. म्हणून ही अट भीमरावांना लागूं करूं नये असा नायब दिवाणानें हुकूम काढला व तो विद्याधिकाऱ्याला कळविला. यामुळें भीमरावांना शुअर्टी बाँड लिहून द्यावा लागला नाहीं. त्यांना फक्त एक करार ( memo of agreement ) लिहून द्यावा लागला. या कराराला आठ आण्याचा स्टँप लावण्यांत आला व भीमरावांनीं व त्यांचे दोघे साक्षीदार त्रिभुवन जे. व्यास आणि अंताजी गोपाळ जोशी ह्यांनीं ४ जून १९१३ रोजीं त्यावर सह्या केल्या. शिष्यवृत्तीची मुदत १५ जून १९१३ पासून ते १४ जून १९१६ पर्यंतची म्हणजे तीन वर्षांची मुक्रर झाली.

भीमरावांच्या घरची आर्थिक परिस्थिति म्हणजे दोन्ही वेळचें जेवण मुला-माणसांना नियमित मिळें, इतकीच होती. गंगाजळींत शिल्लक कांहीं नव्हतें. आनंदराव एकटे कमवणारे व घरांत तर १०।१२ माणसांचा उदरनिर्वाह करणें जरूर होतें. अशा परिस्थितींत कुटुंबाचा चरितार्थ कसा काय चालेल ही एक मोठी चिंता भीमरावांना होती. शिवाय अमेरिकेच्या प्रवासाला आवश्यक वस्तू विकत घेण्याची ताकत आपणाला नाहीं या सर्व परिस्थितीचा व अमेरिकेंतील खर्चाचा विचार करून भीमरावांनीं संस्थानाकडून पॅसेज व आउटफिट याबद्दलचा खर्च, व तीन महिन्यांची स्कॉलरशिपची रक्कम मिळून एकंदर १९६३ रु. आगाऊ घेतले. त्यांत आपल्या खर्चांत शक्य तों बचत करून कांहीं पैसे कुटुंबखर्चासाठीं ठेवून व तिकडून प्रसंगोपात् पैसे पाठविण्याचें वचन देऊन भीमराव अमेरिकेला जाणाऱ्या बोटीवर चढले. त्यांची एस्. एस्. 'अकोना' बोट सोमवार ता. २० जुलै १९१३ रोजीं दुपारीं १२ वाजतां न्यूयॉर्क शहराच्या धक्क्याला लागली. बोटींतून उतरल्यानंतर भीमराव अनेक लोकांना विचारीत विचारीत न्यूयॉर्क येथील सुप्रसिद्ध कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या कचेरींत गेले. युनिव्हर्सिटीचें 'समर सेशन' अगोदरच सुरूं झालेलें होतें म्हणून त्या सेशनसाठीं भीमरावांना प्रवेश मिळाला नाहीं. सप्टेंबरपासून सुरूं होणाऱ्या टर्मसाठीं त्यांना प्रवेश मिळाला. युनिव्हर्सिटीचें वसतिगृह 'हार्टले हॉल' यामध्यें ते पहिला एक आठवडा राहिले. पण येथील अन्न बहुतेक गाईच्या मांसाचे असे व तें चांगलें शिजविलेलें नसे, त्यामुळें तें अन्न त्यांना आवडत नसे. म्हणून त्यांनीं हार्टले हॉल सोडून दिला व ते ११४ व्या रस्त्यावर असलेल्या (५५४, पश्चिम) कॉस्मॉपॉलिटन क्लबांत येऊन राहिले. तेथें हिंदी विद्यार्थी रहात असत व त्यांचेपैकीं एकजण (श्री. दीक्षित) भीमरावांचा सातारा हायस्कूलमधील वर्गबंधु होता.

भीमरावांनीं ४ ऑगस्ट १९१३ रोजीं श्री. शिवनाक गोनाक जमेदार (पोईपकर) यांना न्यूयॉर्कहून पत्र पाठवून वर सांगितलेली हकीगत व इतर माहिती कळविली.

हे जमेदार सेकंड ग्रेनेडियर बॉंबे इन्फन्ट्रीचे पेन्शनर होते. ते भीमरावांचे वडील सुभेदार यांचे स्नेही होते, दोघांच्या मंडळींचा घरोबा होता. जमेदार हे शिक्षणाचें फार चहाते होते. पत्रांत ज्या मुलीचा उल्लेख केलेला आहे ती जमेदाराची मुलगी गंगू. ही त्यावेळीं महारजातींतील एकटीच शाळेंत जाणारी मुलगी (४ थ्या इयत्तेंत) होती. हे जमेदार भीमरावांच्या शिक्षणाबद्दल आस्था बाळगीत व वेळोवेळीं त्यांना उत्तेजन देत. भीमराव अमेरिकेस जाण्याचे वेळीं ते धक्यावर आले, तेव्हां त्यांनीं साश्रु नयनांनीं भीमरावांना आशीर्वाद दिला. त्याबद्दल भीमरावांनीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. तें पत्र असें:

COLUMBIA UNIVERSITY,
NEW YORK

4th August 1913
554 west, 114th Street
New York, U. S. A.

My dear Jamedar,

I am deeply thankful to you for the interest you have usually taken in me and I shall ever remember the tears of a fatherly affection that fell down from your eyes when you came to wish me good-bye, and hope you will regard my other brothers with equal sympathy as you do me favouring them with your kind advice when you think it is needful.

Not only your kind attitude has impressed me but your reforming spirit has always induced me to wish many more of your kind: but nothing will be more displeasing to me or to any one else who earnestly desires the well-being of this down-trodden community than to see your sons not acquitting themselves. I believe you are wise enough to profit yourself by correcting the mistakes committed by that giant race of Subhedars and Jamedars whom our unfortunate community had the honour to count among its members. You must remember what Shakespeare says

"There is a tide in the affairs of men
Which if taken at the flood leads on to fortune

Omitted the voyage of their life is
bound in shallows and miseries."

and which is exactly applicable now to the sons of Jamedars and Subhedars, whom we can count by scores. However I am inclined to blame the parents and not the sons miserable as they are now. We must now entirely give up the idea that parents give "Janma" to the child and not "Karma". They can mould the destiny of their

children: and if we but follow this principle be sure that we shall soon see better days and our progress will be greatly accelerated if male education is persued side by side with female education the fruits of which you can very well see verified in your own daughter.

Let your mission therefore be to educate and preach the idea of education to those at least who are near to and in close contact with you.

Your patience perhaps have been tired to find something personal in this letter : I will therefore turn to it now. I arrived safely at New York on Monday the 21st of July 1913 about 12 noon by the S. S. Ancona and went to the University after inquiring of several persons and got the admission. However I arrived very late for the Summer Session which I have joined for the sake of mere initiation. I don't like the food and I don't think I will, as majority of the dishes are illcooked and of beef: I am not therefore keeping proper health: however you need not be anxious. My regular work will commence with the fall i. e. from September when the term begins. For a week I was staying in the Hartley Hall, a dormitary of the University which I exchanged for the Cosmopolitan Club 564 West, 114th St. where some of the Indian students live and am fortunate enough to find one of them as my old class-friend of the Satara High School. Please present my best regards to all the Time office staff and to your family.

Yours affectionately,
Bhimrao R. Ambedkar

P. S. Please give the address at the top to the Ticket boys to enable them to write to me if they want.

भीमरावांना कोलंबो युनिव्हर्सिटीच्या राज्यशास्त्र विभागांत ( Faculty of Political Science ) जुलै १९१३ ते जून १९१६ या तीन वर्षांसाठीं प्रवेश मिळाला. त्यांत अर्थशास्त्र हा प्रमुख विषय आणि समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र आणि राजकारण हे दुय्यम विषय त्यांनीं घेतले.

परदेशांत विद्याभ्यासासाठीं जाणारे विद्यार्थी आपण विद्यार्जनांत नांवलौकिक कमवूं अशा ईर्षेनें जातात, पण परदेशांतील मायावी वातावरणांत गेल्यानंतर ते आपली प्रतिज्ञा विसरतात व जेमतेम अभ्यास करून पदव्या घेऊन मायदेशीं परततात. भीमरावांना परदेशांत जाण्याची संधि मिळाली तेव्हां त्यांनीं आपण खूप अभ्यास

करणार असें ठरविलें. पण ते न्यूयॉर्कला गेल्यावर आपला निश्चय विसरले. ते सातारला व मुंबईत होते तेव्हां त्यांना उच्चवर्णीय मुलांमध्यें मिळून मिसळून राहतां येत नसे व त्यांच्यांत खेळतांही येत नसे. न्यूयॉर्कला त्यांना राहणें व जेवणेंखाणें इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें करतां येऊं लागलें. हिंदी विद्यार्थी व अमेरिकन विद्यार्थी-विद्यार्थिनी परस्परांत फार खेळीमेळीनें रहात व अनेक खेळांत ते कसलाहि संकोच न धरतां भाग घेत. मुलींच्या-बरोबर नृत्य करणें, टेनिस-बॅडमिंटन खेळणें, यांत कोणत्याही विद्यार्थ्यांना मज्जाव नव्हता. स्केटिंग करणें हा एक मुलामुलींचा आवडता खेळ सर्रास खेळला जात असे. मुलीनें पुढें बसावें व मुलानें तिच्या कमरेभोंवतीं आपल्या हातांचा विळखा घालून घसरत घसरत टेकडीवरून खालीं जावें, अशा व इतर अनेक करमणुकीच्या कार्यक्रमांत भीमरावांनीं पहिले चार पांच महिने जीवाची चैन करण्यांत घालविले. त्यांची कल्पना अशी कीं, एम्. ए. व पी एच. डी. या दोन पदव्या खेळतां खेळतां काबीज करतां येण्यासारख्या आहेत. मग जिवाला विनाकारण जास्त त्रास कशाला घ्या व अभ्यास करा ! अशा विचारानें विद्यार्थ्यांचे खेळ किंवा गप्पाष्टकें जीं रात्रौ दोन दोन वाजेपर्यंत चालत त्यांत भीमराव दररोज भाग घेत व अभ्यासाकडे फार थोडा वेळ खर्च करीत. परंतु एके रात्रीं गप्पाष्टकें आटोपून ते अंथरुणावर तीन वाजण्याच्या सुमारास येऊन पडले व मनांत विचार करूं लागले, 'मी हें काय करीत आहे ? कुटुंबांतील प्रेमळ माणसांना हजारों मैल दूर टाकून मी इथें अभ्यासाकरतां आलों. आणि अभ्यास करण्याचें सोडून चैन करीत बसलों आहे. आणि तीहि संस्थानाच्या पैशावर ! मला मिळालेल्या संधीचा जर मी सदुपयोग केला तर मला माझा नांवलौकिक वाढवितां येईल. नुसत्या पदव्या मिळवून उपयोगाचें नाहीं. सर्व विषयांचा आमूलाग्र अभ्यास केला तरच मी जगांतील पंडितांच्या रांगेंत बसूं शकेन. नुसत्या पदव्या मिळविण्याकरतां अभ्यास केला तर सामान्य दर्जाचें आयुष्य घालवीत बसेन ! ' अशा तऱ्हेचे विचारतरंग त्यांच्या मनांत चालूं राहिल्यामुळें त्यांचें मन बेचैन झालें. इतर विद्यार्थी घोरत पडले होते तर यांच्या मनांत विचारांचें काहूर उठून त्यानें झोपेला हुसकावून लाविलें होतें. त्यांच्या डोक्यांत विचारांची धुमश्चक्री चालू होती. पहिले चार पांच महिने आपण व्यर्थ दवडले याबद्दल त्यांना अत्यंत खेद होत होता. पहाटें पांच वाजतां ते बिछान्यावर उठून बसले व त्यांनीं मनाशीं ठाम निश्चय केला कीं, यापुढील आपलें आयुष्य निव्वळ अभ्यासांत घालवावयाचें, चैनींत नाहीं ! अशा रीतीनें त्यांचा अंतरात्मा जागा झाला. ही त्यांची रात्र म्हणजे आत्मप्रभावाची जाणीव करून देणारी, आत्मप्रचीतीची ओळख करून देणारी व त्यांच्या भावी प्रभावशाली आयुष्याची मुहूर्तमेढ रोवणारी रात्र होय !

इतर विद्यार्थी सूर्योदयानंतर अंमळशानें उठले व एकमेकांच्या खोल्यांत डोकावून व आंत शिरून गप्पागोष्टी (नेहमींच्या संवयीप्रमाणें) करूं लागले. ते भीमरावांच्या खोलींत पाहूं लागले तों ही स्वारी अभ्यासांत गर्क. हें पाहून कांहीं विद्यार्थी त्यांना चिडवूं लागले "काय रे! युनिव्हर्सिटीवर झेंडा लावणार काय?" तर कोणी म्हणे "आहे बुवा! महाराजांचे डोळे दिपवून खूप पैसा उपटणार एकूण." जे धसमुसळे होते ते त्यांच्यापुढचीं अभ्यासाचीं पुस्तकें काढून घेऊन त्यांना बाहेर भटकायला चला म्हणून मागें लागत. अशा रीतीनें भीमरावांच्या निश्चयाला सर्वजण जाणून बुजून धक्के देऊं लागले. पण हा निश्चयाचा मेरुमणी यत्किंचितही ढळला नाहीं. मुलांच्या रागालोभाची त्यांनीं पर्वा केली नाहीं. समजूत पटणारांना समजावून सांगून व न पटणारांना रागावून झिडकारून त्यांनीं त्यांना आपल्या मार्गांतून दूर केलें. यामुळें त्यांच्या आसपासचा मित्रपरिवार बराच कमी झाला. युनिव्हर्सिटींतील मुलीहि त्यांच्या भोंवतीं जमा होत. तारुण्याच्या सहजसुलभ लीलांनीं तरुण-तरुणींचीं मनें एकमेकांकडे आकर्षलीं जातात. त्या आकर्षणाला भीमरावहि हुकले नव्हते; पण त्याबद्दलहि त्यांना पुढें वाईट वाटूं लागलें आणि स्त्रीसंगतीच्या मोहाचा अंमल त्यांनीं आपणावर फारसा बसूं दिला नाहीं. म्हणून ते युनिव्हर्सिटींतील मुलींपासूनहि चार पावलें दूर राहूं लागले. या सर्व गोष्टींमुळें त्यांना एकांत मिळूं लागला. अपरिहार्य कामांखेरीजचा आपला सर्व वेळ ते अभ्यासांत घालवूं लागले. प्रथम प्रथम संवयीच्या अभावीं त्यांना कंटाळा येई; परंतु तोहि चिकाटीनें त्यांनीं दूर करून अभ्यासाची संवय जडवून घेतली. रात्रौ शेजारच्या खोल्यांमध्यें विद्यार्थ्यांच्या हंसण्याखिदळण्याचा गोंगाट होई तेव्हां भीमराव आपल्या खोलीच्या खिडक्या दरवाजे बंद करून व कानांत बोळे घालून अभ्यासाला बसत. अभ्यासाची वेळ दररोज थोडी थोडी वाढवून त्यांनीं सहा महिन्यांत आपल्या अभ्यासाची वेळ बारा तासांवर आणली.

भीमरावांनीं बी. ए. ला भाषाविषय (इंग्रजी व पर्शियन) घेतलेला होता. पुढें त्यांना कळून आलें कीं शास्त्रीय विषयांचें ज्ञान असल्याशिवाय मनुष्याला खरी विद्वत्ता लाभत नसते. या विषयांचा अभ्यास करून बी. ए. झालों असतों तर फार बरें झालें असतें असें त्यांना वाटूं लागलें. या विषयांची निदान तोंडओळख व्हावी म्हणून त्यांनीं बी. ए. झाल्यानंतर त्यावरील पुस्तकें वाचण्याचा सपाटा चालविला. या वाचनानें समाजशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय अत्यंत महत्त्वाचे होत अशी त्यांची खात्री झाली व कोलंबिया युनिव्हर्सिटींतील आपल्या एम्. ए. व पी एच्. डी. या परीक्षांसाठीं त्यांनीं याच विषयांची निवड केली. कोलंबिया युनिव्हर्सिटींत येण्यापूर्वी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक व राजकीय नीतिशास्त्र वगैरे त्यांनीं आपल्या परीक्षांसाठीं निवडलेल्या विषयांची त्यांना फारशी माहिती नव्हती. कोलंबियाला आल्यानंतरहि त्यांनीं ४।५ महिने अभ्यासाविना व्यर्थ दवडले; परंतु नंतर मात्र याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला, उपरति झाली आणि अखंड अभ्यासाचा दृढ निश्चय केल्या-

नंतर 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' अशा मनोवृत्तीनें त्यांनीं अभ्यासास सुरवात केली. दर दिवशीं १६ ते १८ तास अध्ययनांत घालवून अवघ्या सहा महिन्यांत आपल्या विषयांवर त्यांनीं प्रभुत्व मिळविलें. आणि या प्रभुत्वाची जाणीव त्यांना स्वतःलाच एका प्रसंगानें करून दिली.

पंजाबचे सिंह म्हणून कीर्ति मिळविलेले लाला लजपतराय आपली शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं लंडनला १९१४ सालीं गेले. निद्रानाशामुळें त्यांनीं रात्रंदिवस वाचन व लेखन करण्याची संवय लावून घेतली. लंडनला गेल्यावर अनेक ग्रंथकारांशीं व पुढाऱ्यांशीं त्यांचा परिचय झाला. आपल्या अचाट बौद्धिक सामर्थ्यानें चालता बोलता ज्ञानकोश (Human Encyclopaedia) अशी संज्ञा मिळविलेले विद्वान गृहस्थ, फेबियन सोसायटीचे एक संस्थापक आणि समाजसत्तावादाचे कट्टे पुरस्कर्ते सिडने वेब यांच्यांशीं तर लालाजींचा घनिष्ट परिचय झाला. लालाजी अमेरिकेला येतांना सिडने वेबकडून त्यांच्या परम स्नेह्याला—कोलंबिया युनिव्हर्सिटींतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक एड्विन आर्. ए. सेलिग्मन यांना—लिहिलेलें एक ओळखपत्र घेऊन आले. सेलिग्मनशींहि लालाजींची दाट मैत्री झाली. लालाजी आपला बहुतेक वेळ कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयांत घालवीत. त्यांच्या समोरच्या टेबलावर त्यांच्यापेक्षां अगोदर येऊन बसलेला व त्यांच्यानंतर ग्रंथालयांतून बाहेर पडणारा एक हिंदी विद्यार्थी त्यांना दिसला. लालाजींनीं स्वतः होऊन त्या विद्यार्थ्याचा परिचय करून घेतला. तो विद्यार्थी भीमराव. त्या विद्यार्थ्यानें आपली माहिती सांगितली तेव्हां लालाजींना अत्यानंद झाला. त्या दोघांचें संभाषण चालू असतांना एकदां तेथें प्रो. सेलिग्मन आले व तिघांचें अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांतील निरनिराळ्या प्रश्नांवर संभाषण झालें. तेव्हां भीमरावाच्या या विषयांतील ज्ञानाबद्दल लालाजींनीं प्रशंसोद्गार काढले. प्रो. सेलिग्मन म्हणाले कीं, भीमराव हिंदी विद्यार्थ्यांतच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांतहि श्रेष्ठ आहे.

एम्. ए. व पी. एच. डी. या परीक्षांच्या विषयांचा अभ्यास आटोक्यांत आल्यानंतर त्यांनीं इतर विषयांचीं पुस्तकें वाचण्याचा सपाटा चालविला. निरनिराळ्या देशांचे इतिहास, काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, टीकात्मक ग्रंथ व मानववंशशास्त्रांवरील पुस्तकें त्यांच्या वाचनांत आल्यानंतर त्यांच्या मनांत आपण या विषयांचा खोलवर अभ्यास करावा व त्यांतील गूढ प्रश्नांवर पुस्तकें लिहून यशस्वी ग्रंथकार व्हावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. एका विषयावरचीं एकाच ग्रंथकाराचीं सर्व पुस्तकें वाचावीत व नंतर त्याच विषयावरचीं दुसऱ्या ग्रंथकारांचीं सर्व पुस्तकें वाचावीत, असा भीमरावांनीं वाचायचा क्रम चालू ठेवला. निरनिराळ्या विषयांवरचें विस्तृत वाचन वाढत जाऊं लागलें तेव्हां त्या त्या विषयावरचीं टिप्पणें संक्षिप्तपणें लिहून घेण्याची लघुलिपी त्यांनीं शोधून काढली. आजवरहि ते त्याच लघुलिपीचा उपयोग करतात. वाचनाव्यतिरिक्त त्यांना जो वेळ मिळे तो

निरनिराळीं ग्रंथालयें पाहाण्यांत ते खर्च करीत. अधूनमधून ते कांहीं प्रोफेसरांच्या व बरोबरीच्या अमेरिकन विद्यार्थ्यांच्या घरीं जात. अशा वेळीं अमेरिकन घरांतील टापटीप व सौंदर्यपूर्ण सजावट त्यांना नेहमींच आकर्षित असे. या घरांतील विशेष आवडणारा भाग लायब्ररीचा. आपली स्वतःची एक लायब्ररी असली पाहिजे असें सहाजिकच त्यांना वाटूं लागलें. ग्रंथांवर त्यांची असीम भक्ति जडली. जुन्या पुस्तकांच्या दुकानांत जाऊन पुस्तकें विकत घेण्याचा क्रम त्यांनीं सुरूं केला. शिष्यवृत्तीच्या रकमेंतून आपला खर्च भागवून, घरच्या खर्चासाठीं मुंबईस कांहीं रक्कम पाठवून आपला पुस्तकांचा छंद भागवितां येणें कठिण होतें. यांतून मार्ग म्हणून सुटीच्या दिवसांत काम करून द्रव्यार्जन करण्याचें त्यांनीं ठरविलें. युनिव्हर्सिटींतील नेहमींच्या सुट्या एक दोन महिन्यांच्या असत. आणि या सुट्यांत काम करून पैसे मिळविण्याची अमेरिकेंत सर्वत्र प्रथा आहे. अशा विद्यार्थ्यांना शक्य तेवढें स्वावलंबी बनतां यावें म्हणून त्यांना प्रथम कामें देण्याची पद्धत अमेरिकेंत सर्वत्र आढळते. हॉटेल्स, खानावळी यांत ही पद्धत विशेष पाळली जाई. भीमरावांनीं अमेरिकन हॉटेल्स् व खानावळी यांत काम करण्याच्या पद्धतीचा चांगला अभ्यास केला व कांहीं ठिकाणीं काम करून पैसेहि मिळविले. परंतु या नोकरींतील अंगमेहनत त्यांच्या प्रकृतीस मानवली नाहीं. त्यामुळें त्यांना हा नाद सोडून द्यावा लागला.

न्यूयॉर्कमध्यें हिंदी विद्यार्थ्यांच्या अनेक संस्था व क्लब होते. त्यांच्या समारंभाच्या वेळीं भीमराव हजर रहात पण प्रत्यक्ष भाग कधीं घेत नसत. न्यूयॉर्कच्या महाराष्ट्र क्लबाचे भीमराव सभासद होते. डॉ. हर्डीकर या क्लबमधील प्रमुख कार्यकर्त्यांपैकीं होते. या क्लबांत राजकीय विषयांवर बरीच चर्चा होई. सामाजिक व धार्मिक प्रश्नांकडे मात्र कोणाचेंहि लक्ष नसे. भीमराव वादविवादांना हजर रहात पण भाग घेत नसत. १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें लाला लजपतराय न्यूयॉर्कला आले तेव्हां अमेरिकेंतील गदर पक्षाचे कार्यकर्ते त्यांना भेटले. त्यांच्या साहाय्यानें व प्रोत्साहनानें लालाजींनीं हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्याची चळवळ अमेरिकेंत चालविण्यासाठीं 'इंडियन होमरूल लीग ऑफ अमेरिका' ही संस्था स्थापन केली. डॉ. हर्डीकर मिशिगन युनिव्हर्सिटींतील आपला वैद्यकीचा अभ्यास सोडून या संस्थेचे चिटणीस झाले. लालाजींनीं व गदर पक्षांतील इतर कार्यकर्त्यांनीं अमेरिकेंत व इतरत्र सभा भरवून इंग्रजांविरुद्ध प्रचार करण्याचा सपाटा चालविला. भीमरावांनीं या चळवळींत भाग घ्यावा म्हणून लालाजींनीं बरेच प्रयत्न केले, भीमरावांशीं वादविवाद करून त्यांना आपल्याकडे वळवून घेण्याची शिकस्त केली. अस्पृश्यांना तुमच्या गुलामगिरींत डांबून ठेवून तुम्ही आपली राजकीय गुलामगिरी दूर करूं पहातां, यामुळें अस्पृश्य राजकीय चळवळींत भाग घेणार नाहींत, असें भीमरावांचें म्हणणें असे. त्यावर 'एकदां हिंदुस्थान इंग्रजांच्या गुलामगिरींतून मुक्त झाला कीं हे धार्मिक व सामाजिक भेदाभेद दूर करतां येतील'

असें बोलून लालाजी त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करीत. भीमरावांचें अर्थात्च यानें समाधान होत नसे. व म्हणूनच या चळवळींत भाग घेण्यास त्यांनीं स्पष्ट नकार दिला. १९१६ च्या सप्टेंबर महिन्यांत लालजींनीं भरविलेल्या अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थ्यांच्या परिषदेस भीमराव हजर राहिले नाहींत. (लाला लजपतराय,)

भीमराव एम्. ए. च्या परीक्षेंत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले. ती पदवी त्यांना ता. २ जून १९१५ रोजीं मिळाली. ही पदवी मिळाल्यानंतर अर्थशास्त्रांत संशोधन करून एका प्रश्नावर प्रबंध लिहून पीएच. डी. ची पदवी मिळवावी, असें भीमरावांनीं ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं अभ्यासास सुरवात केली. त्यांचे मुख्य प्रोफेसर सेलिग्मन यांची आतां त्यांच्याशीं दाट मैत्री झालेली होती. त्यांच्या नेतृत्वाखालीं भीमरावांचा बौद्धिक विकास कसा झाला, याबद्दल त्यांनीं माहिती सांगितली आहेः

" मी मागें तुम्हांला सांगितलेंच आहे कीं, मी बी. ए. होईपर्यंत अगदींच साधारण प्रतीचा विद्यार्थी होतों. पुढें माझे हातून कांहीं संशोधन होईल अशी माझ्याबद्दल मलाहि अपेक्षा नव्हती. आणि इतरांना पण नव्हती. म्हणजे, माझी बुद्धि मंद होती किंवा माझ्यांत वाचनाची आवड नव्हती, असेंहि नाहीं. पण संशोधन करण्यासाठीं जो एक विशिष्ट प्रकारचा दृष्टिकोन असावा लागतो, किंवा जें एकप्रकारचें प्रोफेसराकडून मार्गदर्शन व्हावें लागत असतें, तें माझ्या बाबतींत झालें नसल्यामुळें माझ्यांतील गूढ शक्तींना चालना मिळालेली नव्हती, इतकेंच. अंगीं उपजत गुण असले तरी त्यांचा विकास व्हावा लागतोच. अमेरिकेस जाईपर्यंत माझे अनेक गुण सुप्तावस्थेंत होते. त्यांचा विकास होण्याचें कार्य प्रोफेसर सेलिग्मन व इतर दांडग्या विद्वानांच्याकडून झालें, हें मला कबूल करायला हवें. या विद्वान प्रोफेसरांच्या संगतींत आल्यावर मला आढळून आलें कीं, मला स्वतंत्रपणें विचार करतां येतो. मी संशोधन कसें करावें याविषयीं एकदां प्रो. सेलिग्मन यांना विचारलें असतां ते मला म्हणाले " तूं आपलें काम चालू ठेव. म्हणजे तुला आपोआप समजूं लागेल संशोधन कसें करावें तें !

" त्याप्रमाणें मी स्वतःच विचार करूं लागलों; खूप वाचन सुरू ठेवलें आणि त्यामुळें स्वतःच्या पायांवर उभें राहून स्वतःलाच मार्गदर्शन कसें करतां येतें, याचा मला धडा मिळाला. त्यांत माझ्यामागें आणखी एक आंच होती. ठराविक वेळेच्या आंत माझ्या हातून संशोधनकार्य पुरें झालें नसतें, तर मला पुढल्या स्कॉलरशिपवर पाणी सोडावें लागलें असतें; आणि माझें सारें संशोधन एवढ्यावरच थंडावलें असतें, विराम पावलें असतें ! त्यामुळें मला माझें काम नेटानें, उत्साहानें, झपाट्यानें, उरकणें भागच होतें. त्यावेळीं कामास उपयोगी पडणारीं टिप्पणांचीं कार्डें मी तयार केलीं होतीं. अद्यापि माझ्यापाशीं हीं कार्डें आहेत. संशोधन करणाऱ्या

प्रोफेसरांच्या उपयोगी पडावींत म्हणून तीं आपल्या लायब्ररींत ठेवण्याची मी लवकरच व्यवस्था करणार आहे. मी एवढें जबरदस्त वाचन केलें आहे कीं, कोणता संदर्भ कोठें आहे हें मला ताबडतोब स्मरतें. या वाचनामुळें माझी स्मरणशक्तीही दांडगी होत गेली.

"पुस्तकें लिहीत असतांना वेळ कसा निघून जातो व दिवसांमागून दिवस कसे निघून जातात, हें मला कळून येत नाहीं. माझें लिखाण चालू असतांना माझ्या साऱ्या शक्ति एकवटलेल्या असतात. मी जेवणाची पर्वा करीत नाहीं. मी कधीं कधीं तर रात्रभर वाचीत लिहीत बसतों. मला त्यावेळीं कधीं कंटाळा येत नाहीं, कीं थकवा वाटत नाहीं.

पण काम संपवून तें एकदां हातावेगळें झालें कीं मी अत्यंत निरुत्साही व असंतुष्ट होतों! मला चार मुलें झालीं असतीं तरी जेवढा आनद झाला नसता तेवढा मला माझें पुस्तक प्रसिद्ध झालें म्हणजे होतो." (नवयुग, ता.१३-४-४७,)

१७६५ पासून १९१४ पर्यंत हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नांवर जेवढे ग्रंथ व सरकारी अहवाल प्रसिद्ध झालेले होते ते सर्व आणि कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या लायब्ररींत असलेलें सर्व वाङ्मय, आपला प्रबंध तयार करण्यासाठीं भीमरावांनीं वाचून काढलें व शेवटीं "The National Dividend of India—a Historical and Analytical Study" या नांवाचा प्रबंध लिहून त्यांनीं युनिव्हार्सिटीला सादर केला. या प्रबंधावर त्यांना डॉक्टरेट (Ph. D.) पदवी मिळविली. परंतु ती पदवी जाहीर करण्यांत आली नाहीं. याचें कारण हें कीं, परीक्षकांनीं मान्य केलेला प्रबंध ग्रंथरूपानें प्रसिद्ध करावयाचा व त्याच्या प्रती युनिव्हार्सिटीला द्यावयाच्या, असा कोलंबिया युनिव्हर्सिटीचा नियम होता भीमरावांचा प्रबंध परीक्षकांनीं मान्य केलेला होता. परंतु तो छापून प्रसिद्ध करण्यास भीमरावांकडे पैसे नव्हते. तथापि भीमरावांना डॉक्टर ही पदवी युनिव्हर्सिटीनें बहाल केली होती. आणि ती व्यवहारांत वापरण्यास तिची संमति होती. या पदवी मिळालेल्या प्रबंधाचें नांव 'Evolution of Provincial Finance in British India' असें ठेवून तो प्रबंध त्यांनीं इंग्लंडच्या सुप्रसिद्ध P. S. King and Co. या प्रकाशक कंपनीतर्फे १९२७ मध्यें प्रसिद्ध करविला व त्याच्या कांहीं प्रती कोलंबिया युनिव्हर्सिटीला पाठविल्यानंतर भीमरावांना Ph. D. ही पदवी युनिव्हर्सिटीनें ता. ८ जून १९२७ रोजीं रीतसरपणें जाहीर केली.

प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या विषयांतील एकाद्या कूट प्रश्नावर संशोधनात्मक दृष्टीनें विचार करून निबंध लिहावा व तो आपल्या विषयाच्या विद्यार्थ्यांपुढें वाचून दाखवावा, असा कोलंबिया युनिव्हर्सिटीचा नियम होता. त्या निबंधांत लेखक-विद्यार्थ्याचें स्वतःचें संशोधनात्मक विवेचन असलें पाहिजे, अशीहि अट होती.

संभाजीच्या कारकीर्दींत महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिति कशी होती, या विषयावर भीमरावानें संशोधनात्मक निबंध लिहिण्याचें ठरवून शेंकडों पुस्तकें वाचून सामुग्री तयार केली, निबंधही लिहिला; पण पुन्हां त्यांनीं तो विचार रद्द केला.

हा विचार रद्द करण्याचें कारण हें कीं, ज्या जातिसंस्थेमुळें अस्पृश्य समाजाला हीन अवस्था प्राप्त झाली, त्या जातिसंस्थेबद्दल संशोधनात्मक उद्बोधक कांहींतरी लिहावें, असा विचार पुष्कळ दिवस त्यांच्या मनांत खेळत होता. त्या विचारानें या वेळीं जोर धरला. हा विचार नक्कीं झाल्यानंतर त्यांनीं सदर विषयावर निबंध लिहिण्यास सुरवात केली.

समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि इतिहास या विषयांवरचीं शेंकडों पुस्तकें वाचल्यानंतर भीमरावांना हिंदुसमाजांतील जातिसंस्था या प्रश्नाकडे पाहण्याची शास्त्रीय दृष्टि प्राप्त झालेली होती. हिंदु धर्मांतील धार्मिक ग्रंथ, पुराणें, इत्यादिकांमध्यें जाती कशा उत्पन्न झाल्या यासंबंधीं ज्या निरनिराळ्या कथा दिलेल्या आहेत, त्या कपोलकल्पित आहेत, म्हणून त्या त्याज्य आहेत याबद्दल त्यांची मनोमय खात्री झाली; कारण, मनुष्यजातीची उत्पत्ति झाल्यानंतर त्यांच्यांत धर्म, विवाह, कुटुंब, नीति, जाति, देश, राज्यकारभार, साम्राज्य, इत्यादिकांबद्दल विचारजागृतीची उत्क्रांति कशी होत गेली याबद्दलचें शास्त्रशुद्ध ज्ञान भीमरावांना प्राप्त झालें होतें. जाती कशा उत्पन्न झाल्या, या प्रश्नाची छाननी समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, इत्यादि शास्त्रांच्या दृष्टिकोनांतून करून भीमरावांनीं "हिंदुस्थानांतील जाती–त्यांची घटना, उत्पत्ति आणि वाढ" हा निबंध तयार केला. कोलंबिया युनिव्हर्सिटींतील समाजशास्त्राचे प्रोफेसर डॉ. ए. ए. गोल्डनवीजर, यांच्या अँथ्रॉपॉलॉजी सेमिनरपुढें (विद्यार्थीसंघापुढें) ता. ९ मे १९१६ रोजीं हा निबंध भीमरावांनीं वाचला. या निबंधांतील विचारसरणी, विषय मांडण्याची धाटणी आणि जुन्या विषयावर नवा शोधप्रकाश टाकण्याची हातोटी पाहून डॉ. गोल्डनवीजर व सर्व विद्यार्थीवर्ग भीमरावांवर अत्यंत खुष झाला. या निबंधांतील इंग्रजी भाषावैभव इतक्या उच्च दर्जाचें होतें कीं, अमेरिकेंत अभिजात वाङ्मय ज्या ग्रंथांत असतें त्या ग्रंथांचा नामनिर्देश करणाऱ्या एका संस्थेनें भीमरावांच्या या निबंधाचा उल्लेख केलेला होता. हा निबंध भीमरावांनीं Indian Antiquery या मासिकाच्या मे १९१७ च्या अंकांत प्रसिद्ध केला. व तो पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. भीमरावांचें हें पहिलें वाङ्मयीन अपत्य.

आर्य, द्रविड, मंगोलियन आणि सिथियन या लोकांच्या मिश्रणानें हिंदु समाज तयार झाला, आणि हा समाज वन्यावस्थेंतून सुधारत जात असतां त्यांच्यांत रक्तमिश्रणाची कल्पना अमान्य होत गेली व शेवटीं जमातीजमातींतून बेटी व्यवहार बंद केला गेला. बेटीव्यवहारबंदीच्या घटना कालपरत्वें हळूंहळूं दृढ होत गेल्या. परिणामीं

निरनिराळे समाज परस्परांपासून विलग झाले व त्यांच्यांतील रोटी व बेटी व्यवहार बंद पडला. समाजबंधनें कडक झालीं. आणि तीं मोडणारे लोक समाजानें वाळीत टाकले. एका समाजाच्या या कृती पाहून दुसरा समाज तसें करूं लागला. तिसऱ्यानेंहि त्याची री ओढली आणि आज आपणांस माहित असलेली हिंदु समाजव्यवस्था निर्माण झाली. जाती कशा उत्पन्न झाल्या याबद्दलच्या या निबंधांतील सारांश हा असा आहे. भीमरावांनीं सदर निबंधांत आपले विचार साधार व सयुक्तिक रीतीनें मांडले.

भीमराव आपल्या या निबंधांत लिहितात: " ...Thus the superimposition of endogomy means the creation of caste " ( p. 85 )

" As for myself I do not feel puzzled by the origin of caste in India, for, as I have established before, endogomy is the only characteristic of caste and when I say **origin of caste** I mean **the origin of the mechanism for endogomy** " (p. 88).

" My study of the caste problem involves four main points: (1) That inspite of the composite make-up of the Hindu population, there is a deep culrural unity; (2) That caste is a parcelling into bits of a longer cultural unit; (3) That there was one caste to start with; (4) That classes have become castes through imitation and excommunication" (p. 94).

' जाति उत्पन्न कशा झाल्या याबद्दल जो सिद्धांत मी मांडलेला आहे तो जर कोणी खोडून काढला तर मला आनंद होईल; परंतु या विषयावर यापेक्षांहिं भरभक्कम सिद्धांत तयार करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. ' अशा आशयाचे उद्गार भीमरावांनीं निबंधाच्या शेवटीं काढलेले आहेत. ( " For myself, I shall find as much pleasure in a positive destruction of my own ideology, as in a rational disagreement on a topic, which notwithstanding many learned disquisitions is likely to remain controversial for ever. To conclude, while I am ambitious to advance a Theory of Caste, if it can be shown to be untenable I shall be equally willing to give it up. " p 95 ).

भीमराव कोलंबिया युनिव्हर्सिटींत आल्यानंतर त्यांच्यांत ज्ञानार्जनाचा आधाशीपणा उत्पन्न झाला व त्यांनीं अनेक विषयांवरचीं अनेक पुस्तकें अभ्यासलीं. या ज्ञानार्जनासक्तीबद्दल ब्लेक क्लार्क म्हणतो, " Few students on any campus have ever exhibited such a voracious appetite for

knowledge. He became absorbed in history, anthropology, sociology, psychology, and economics. When he received the degree of Doctor of Philosophy in 1917, he had more than double the credits required"– The Readers' Digest, March 1950, p. 108. (ज्ञानार्जनाच्या बाबतींत भीमरावांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत जो भयंकर अधाशीपणा दाखविला तसा अधाशीपणा दाखविणारे विद्यार्थी क्वचितच पाहण्यांत येतात. कोलंबिया युनिव्हर्सिटींत दाखल झाल्यानंतर इतिहास, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, आणि अर्थशास्त्र या विषयांच्या अभ्यासांत ते आपलें देहभान विसरले. १९१७ सालांत त्यांना डॉक्टरेट मिळाली तेव्हां पदवी मिळविण्यासाठीं आवश्यक असलेल्या अभ्यासप्राविण्याच्या दुपटीवर त्यांची ज्ञानसाधना होती.)

## प्रकरण ८ वें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23545 वि: ५.८.७
क्रमांक 570 नोंः दिः ५.८.५

# लंडन युनिव्हर्सिटींत

कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या दोन पदव्या मिळविल्यानंतर अर्थशास्त्रांतील इतर प्रश्नांवर प्रबंध लिहून लंडन युनिव्हर्सिटीच्या सर्व पदव्या काबीज कराव्यात, अशी भीमरावांना महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. या पदव्यांसाठीं दोन वर्षें लागतील व तेवढ्या काळांत कायद्याचा अभ्यास करावा व बॅरिस्टर व्हावें म्हणजे बडोदें संस्थानाच्या ऋणांतून मुक्त होतांच आपणाला स्वतंत्रपणें वकिली करतां येईल, सामाजिक कार्यें करतां येतील, व पुस्तकेंहि लिहितां येतील, असे विचार भीमरावांच्या मनांत घोळूं लागले. संस्थानची शिष्यवृत्ति तीन वर्षांसाठीं होती व ती १९१६ च्या जूनमध्यें बंद होणार होती. ही शिष्यवृत्ति आणखी दोन वर्षें वाढवली तर आपण लंडन युनिव्हर्सिटींत अभ्यास करून अर्थशास्त्राच्या सर्व पदव्या घेऊं, असें सयाजीराव महाराजांना भीमरावांनीं १९१६ फेब्रुवारी महिन्यांत लिहून कळविलें. रीतीप्रमाणें महाराजांनीं भीमरावांचें म्हणणें विद्याखात्याकडे पाठविलें. त्या वेळीं संस्थानचे दिवाण सर मनुभाई मेहता हे होते. विद्याखात्याचे अधिकारी व दिवाण यांनीं शिष्यवृत्ति चालू करण्याचें नाकारलें व बडोद्याला ताबडतोब यावें व नोकरीवर रुजूं व्हावें, असें भीमरावांना त्यांनीं लिहून कळविलें. तेव्हां भीमराव बेचैन झाले व त्यांनीं आपली हकिकत प्रो. सेलिग्मनला सांगितली. त्यांच्या सल्ल्यावरून भीमरावांनीं महाराजांना दुसरें पत्र लिहिलें व त्यावर प्रोफेसरसाहेबांनीं भीमरावानें आतांपर्यंत सर्व विषयांत किती ज्ञान संपादन केलेलें आहे, याबद्दलची सविस्तर माहिती दिली व जर भीमरावाला स्कॉलरशिप दोन वर्षें दिली तर तो खात्रीनें पदव्या घेईल व संस्थानाचाहि नांवलौकिक वाढवील, अशी शिफारस केली. तरी विद्याखातें व दिवाणसाहेब यांनीं आपला निर्णय बदलण्याचें नाकारलें. पण सर्व कागद महाराजांच्याकडे जेव्हां गेले तेव्हां महाराजांनीं सर्व गोष्टींचा विचार करून ती

स्कॉलरशिप प्रथम एक वर्ष चालू करण्याचा हुकूम दिला. दुसऱ्या वर्षी स्कॉलरशिप चालू करणें न करणें हें पुढें ठरविण्यांत यावें असाहि निर्णय त्यांनीं दिला.

स्कॉलरशिप चालू होवो अगर न होवो, आपण आपल्या हिंमतीवर लंडनमध्यें अभ्यास पुरा करणार, असा निर्धार करून बडोद्याच्या निर्णयाची वाट न पाहतां भीमरावांनीं न्यूयॉर्कहून लंडनला जाणाऱ्या बोटीचें तिकिट काढलें व न्यूयॉर्क सोडलें (मे १९१७-शेवटचा आठवडा). ती बोट म्हणजे कमींत कमी प्रवासखर्च लागणारी होती. तिच्यांत तिसऱ्या वर्गानें प्रवास करून भीमराव लिव्हरपूल बंदरांत जून १९१६ मध्यें उतरले. युरोप, अमेरिका व इंग्लंड इत्यादि भागांत त्यावेळीं हिंदी विद्यार्थी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळींतील कामें करीत होते. त्यांत गदर पक्ष व अभिनव भारत संस्था यांचे क्रांतिकारक कार्यकर्ते होते. बॅ. सावरकरांच्या सशस्त्र क्रांतीच्या चळवळीनें ब्रिटिश सरकारला हिंदी विद्यार्थ्यांबद्दल शंका व दहशत बसलेली होती. यामुळें हिंदी विद्यार्थ्यांवर स्कॉटलंड यार्डमधील गुप्त पोलिस डोळ्यांत तेल घालून पाळत ठेवीत होते. भीमराव लिव्हरपूलला उतरले तेव्हां त्यांच्याभोंवतीं चार गुप्त पोलिस जमा झाले. भीमरावांचा तेजस्वी चेहरा व त्यांचा धिप्पाड देह पाहून पोलिसांना वाटलें कीं, हा क्रांतीकारकांच्या पक्षांतील तरुण आहे. आपण बडोदें संस्थानचे विद्यार्थी आहोंत व लंडन युनिव्हर्सिटींत पुढील अभ्यास करण्यास आलों आहोंत, अशी भीमरावानीं आपली माहिती सांगितली, तरी पोलिसांची खात्री पटेना. मग भीमरावानीं आपणाजवळ असलेलीं परिचय-पत्रें पोलिसांना दाखविलीं. तीं पाहिलीं तरी पोलिसांनीं भीमरावांच्या अंगावरील सर्व कपडे तपासून पाहिले व बुटांच्या आंतील भाग व टांचा या बारकाईनें तपासून पाहिल्या. हा सर्व विधी झाल्यानंतर पोलिसांची खात्री झाली व त्यांनीं भीमरावांना पुढें जाऊं दिलें.

लिव्हरपूलपासून लंडनला रेल्वेनें जावयाचें; पण तिकिटाला लागणारे पैसे भीमरावांच्या जवळ नव्हते. ते तिकिट न काढतां आगगाडींत बसले. त्यांच्या डब्यांत एक लंडनचा रहिवाशी होता, त्याला लंडनच्या अलिकडे उतरावयाचें होतें. लंडनमधील 'इंडिया हाऊस' कोठें आहे व तिकडे कसें जावें, याबद्दल भीमरावांनीं त्या गृहस्थाकडे चौकशी केली. त्या गृहस्थानें जो पत्ता दिला तो भीमरावानीं शर्टच्या डाव्या हाताच्या कफवर पेन्सिलीनें लिहून घेतला. आपल्याजवळ तिकिट नाहीं व मध्येंच कोणीं पकडलें तर काय, या विचारांनीं भीमराव थोडा वेळ अस्वस्थ झाले होते. पण गाडी चालू असतां त्यांच्या डब्यांत रेल्वेचा तिकिट-चेकर आला नाहीं. स्टेशनवर उतरल्यावर ते प्लॅटफॉर्मवर इकडून तिकडे फिरत राहिले व निर्धोकपणें स्टेशनच्या बाहेर पडले. टॅक्सी करून ते 'इंडिया हाऊस' मध्यें आले. टॅक्सीचें बिल इंडिया हाऊसच्या चिटणीसानें दिलें. बडोदें सरकारनें एका वर्षाची स्कॉलरशिप मंजूर केली, याबद्दलचें टपाल कोलंबिया युनिव्हर्सिटीकडून दोनतीन दिवसांनीं आलें.

लंडन युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्रोफेसर एड्विन कॅनन् यांच्यासाठीं भीमरावानीं कोलंबिया युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर सीगर यांच्याकडून परिचय-पत्र आणलेलें होतें. तें पत्र पाहून प्रोफेसर कॅननला आश्चर्य वाटलें. कारण, भीमरावांची अर्थशास्त्रांतील प्रगति एकाद्या प्रोफेसरापेक्षांहि जास्त आहे, असें त्या परिचयपत्रांत प्रो. सिगरनें लिहिलेलें होतें. प्रो. कॅनन्नें भीमरावांच्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाची चांचपणी करून पाहिली तेव्हां प्रो. सीगरच्या परिचयपत्रांतील विधानाबद्दल त्यांची खात्री पटली.

लंडनमधील आपल्या अभ्यासाला सहाय्य करतील अशा विद्वानांना दाखविण्यासाठीं भीमरावांनीं आपल्या प्रोफेसराकडून कांहीं परिचय-पत्रें आणलेलीं होतीं. त्यांचेंपैकीं प्रो. सेलिग्मनकडून मि. सिडने वेब यांना एक पत्र आणलें होतें. मि. वेब हे अर्थशास्त्रावरील एक अधिकारी पुरुष होते. त्यांच्या अचाट बुद्धिसामर्थ्याबद्दल अनेक ग्रंथकारांनीं प्रशंसोद्गार काढलेले आहेत. मि. पिअर्सन यांचे उद्गार विशेष उल्लेखनीय आहेत. ते लिहितात. "His career as a young man had been dotted with prizes, exhibitions and scholarships. With an ability to take in the entire contents of a printed page at a glance and to photograph it indelibly on his mind, with a memory that retained every single thing that interested him, and a mental orderliness so precise that no addition to his vast stores of knowledge could produce congestion, it was hardly surprising that he had been first in every examination for which he had entered," (Bernard Shaw, p. 178).

अशा वेबशीं भीमरावांचा संबंध आला. मि. वेब यांनीं भीमरावांना लंडनमधील निरनिराळ्या ग्रंथालयांत प्रवेश मिळवून द्यावा अशी विनंती प्रो. सेलिग्मन यांनीं आपल्या पत्रांत केली होती. भीमरावांना इंडिया हाऊसमधील ग्रंथालयांतील सर्व अर्थशास्त्रविषयक वाङ्मयाचा अभ्यास करावयाचा होता म्हणून मि. वेब यांनीं प्रो. सेलिग्मनकडून आणलेल्या परिचयपत्रावरच, परमनंट अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया या हुद्यावर असलेल्या सर लॉयनेल अब्राहम यांना भीमरावांना इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयांत संशोधनात्मक अभ्यास करूं देण्याची सर्व प्रकारची व्यवस्था करावी अशी विनंती केली. सर लॉयनेल अब्राहमला पत्र लिहून भीमरावांनीं भेटीची वेळ मागितली असतां १८, पोर्चेस्टर टेरेस येथें तुम्ही मला १ जुलै १९१६ रोजीं सकाळीं ११-३० वाजतां भेटा असें सरसाहेबांनीं भीमरावांना नॉर्थब्रूक सोसायटी, २१, क्रॉम्वेल रोड, या पत्त्यावर ३० जून १९१६ रोजीं कळविलें. भीमरावांनीं सरसाहेबांची भेट घेऊन त्यांना प्रो. सेलिग्मन यांनीं दिलेलें परिचयपत्र ( त्यांवरच मि. वेब यांनीं सर लॉयनेल यांना उद्देशून भीमरावांची शिफारस केली होती ) दिलें. परिचयपत्र पुढीलप्रमाणें होतें:—

Columbia University in the
City of New York
Faculty of Political Science
May 23, 1916.

Mr. Sidney Webb,
4, Grosvenor Road,
Westminster Embankment,
London, England.

My dear Webb,

Will you permit me to introduce to you one of my graduate students, Mr. Bhimrao Ramji Ambedkar? Ambedkar came to us on a state scholarship from Baroda and has been with us for three years. He is now spending a year in London to finish up his dissertation on the financial history of India. He is an excellent student and a nice fellow, moderate, broad, and able, and I know that you will be glad to be of service to him in the prosecution of his researches.

Faithfully yours,
Edwin R. K. Seligman.

या परिचय पत्रावर मि. वेब यांनीं सर लॉयनेल अब्राहम यांच्याकडे खालील शिफारस केली होती :

Sir Lionel Abraham,

Mr. B. R. Ambedkar is joining the London School of Economics as a graduate student. He wishes to read in the India Office Library. I should be very grateful if you would be so kind as to get extended to him all the facilities that are permitted.

Yours very truly,
Sidney Webb.

( Government of Bombay Compilation, Education Department, No. 65-I/1918, P. 105 ).

प्रो. सेलिग्मन यांच्या पत्रांतील शेवटचें वाक्य विशेष उल्लेखनीय आहे. भीमरावांच्या संशोधनात्मक अभ्यासांतील प्रगतीबद्दल व फलश्रुतीबद्दल प्रो. सेलिग्मन् यांनीं आपला आत्मविश्वास प्रगट केला आहे.

मुलाखतींत सर लॉयनेल अब्राहम भीमरावांवर खूप खूष झाले व त्यांनीं भीमरावांना इंडिया ऑफिसमधील सरकारी कागदपत्र वाचण्याची व त्यांतील माहितीचा आपल्या भावी ग्रंथाकरितां उपयोग करण्याची परवानगी दिली.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स या संस्थेंत भीमरावांना विद्यार्थी म्हणून आक्टोबर १९१६ च्या पहिल्या आठवड्यांत प्रवेश मिळाला. ११ आक्टोबर १९१६ रोजीं दहा पौंड व दहा शिलिंग फी भरल्यानंतर त्यांना विद्यार्थी पास नंबर ९२४९ देण्यांत आला. बॅरिस्टरीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या हेतूनें भीमरावांनीं ग्रेज इनमध्यें ११ नोव्हेंबर १९१६ ला आपलें नांव दाखल केलें. त्यावेळीं त्यांना प्रवेश फी म्हणून ३३ पौंड १४ शिलिंग, प्रवेश अर्जासाठीं १ पौंड १ शिलिंग, वर्ग फी ५ पौंड ५ शिलिंग आणि ५० पौंडाची अनामत रक्कम असे ९० पौंड भरावे लागले.

अर्थशास्त्राचा अमेरिकेंत बराच अभ्यास केला असून त्या विषयांतील उच्च पदव्या आपण मिळविल्या आहेत म्हणून लंडन युनिव्हर्सिटीच्या बी. एस्‌सी. च्या परीक्षेला न बसतां सरळ एम्. एस्‌सी.च्या परीक्षेस बसण्याची युनिव्हर्सिटीनें परवानगी द्यावी अशी विनंति सुरवातीसच भीमरावांनीं केली. प्रो. कॅनन यांच्या शिफारसीवरून युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें १८ डिसेंबर १९१६ च्या ठरावांत ही विनंति मान्य करून भीमरावांना सरळ एम्. एस्‌सी.च्या परीक्षेस बसण्याची परवानगी दिली. ("Recommended that Bhimrao Ramji Ambedkar be registered as an internal student as from October 1916 and admitted as a candidate for the M. Sc. (Econ.) degree upon his complying with the terms of the regulations under Statutes 113 and 129.")

एम्. एस्‌सी.च्या पदवीसाठीं भीमरावांनीं "Provincial Decentralisation of Indian Finance" या नांवाचा प्रबंध लिहिण्याचें ठरविलें. त्या विषयावरची सर्वतोपरी माहिती मिळविण्यासाठीं लंडन स्कूल, ब्रिटिश म्युझियम व इंडिया ऑफिस या संस्थांतील तीन प्रचंड ग्रंथालयांमध्यें पुस्तकें वाचण्याचा व टिप्पणें लिहून काढण्याचा भीमरावांनीं लंडन स्कूलमध्यें प्रवेश मिळाल्यापासून सपाटा चालविला. नोव्हेंबरपासून ग्रेज इनमधील बारचीं लेक्चर्स ऐकावयास ते जात. सकाळीं ८ वाजतां सुरवात केलेलें वाचन व अभ्यास रात्रीं १–२ वाजेपर्यंत चालत. मध्यंतरींचा सुमारें २ तासांचा वेळ तेवढा जेवण्यांत व विश्रांति घेण्यांत जाई. ज्ञानसाधनेसाठीं एवढी उग्र तपश्चर्या सतत चालली होती. बडोदें संस्थानाच्या शिष्यवृत्त्या घेऊन जे हिंदी विद्यार्थी अमेरिकेंत व युरोपमध्यें शिकत त्यांच्या विद्याभ्यासाची प्रगति, त्यांची नैतिक वागणूक याबद्दल देखरेख करण्यासाठीं व त्रैमासिक अहवाल बडोद्याच्या शिक्षण खात्याकडे पाठविण्यासाठीं संस्थानचा एक

अधिकारी असे. अशा अधिकारावर त्यावेळीं असलेल्या डॉ. एच. सी. बंपस यांनीं आपल्या त्रमासिक अहवालांत भीमरावांच्या अभ्यासाबद्दल व वर्तनाबद्दल अति गौरवाचे उद्गार काढलेले आहेत.

लंडनमध्यें अभ्यास सुरूं केल्यानंतर कांहीं महिन्यांनीं भीमरावांना बडोदें संस्थानाकडून मिळत असलेल्या शिष्यवृत्तीची मुदत संपत आली. हातीं घेतलेला अभ्यासक्रम पुरा करतां येण्यासाठीं आपणास मिळत असलेली शिष्यवृत्ति आणखी दोन वर्षें वाढवावी अशी विनंती भीमरावांनीं बडोद्याच्या विद्याखात्याला केली. त्यावेळीं भीमरावांचे प्रोफेसर व डॉ. बंपस यांनीं त्याबाबत आर्जवानें शिफारस केली. परंतु विद्याखात्यानें शिष्यवृत्तीची मुदत न वाढविण्याचा निर्णय घेतला व तो निर्णय संस्थानचे दिवाण सर मनुभाई मेहता यांनीं उचलून धरला. महाराजांनाहि शिष्यवृत्ति आणखी चालूं ठेवण्याची आवश्यकता दिसली नाहीं. हा निर्णय ऐकून भीमरावांची भयंकर निराशा झाली. आणखी पांच सहा महिन्यांच्या अवधींत त्यांचा Provincial Decentralisation of Indian Finance हा प्रबंध लिहून होणार होता. दोन वर्षें शिष्यवृत्ति पुढें चालूं राहिली तर एम्. एस्सी., डी. एस्सी. व बार-अॅट-लॉ या पदव्या घेऊन बडोद्याला नोकरी करण्यास जाण्याचा व त्यानंतर नोकरीची आवश्यक किमान मुदत संपल्यानंतर मुंबईस स्थायिक होऊन बॅरिस्टरी, ग्रंथलेखन व समाजसेवा हीं कार्यें करण्याचा कार्यक्रम भीमरावांनीं आंखलेला होता. शिष्यवृत्ति पुढें वाढविण्याबाबतच्या नकारानें हा सर्व कार्यक्रम ढांसळल्यामुळें भीमरावांना मनस्वी दुःख व्हावें हें साहजिकच होतें. दोनतीन दिवस वाचन सोडून देऊन भीमरावांनीं दुःखी अंतःकरणानें भावी कालाचा विचार केला व असें ठरविलें कीं, शिष्यवृत्तीची सांप्रतची मुदत संपताच परत बडोद्यास जावें, व तेथें नोकरी करतांना महाराजांना समक्ष भेटून पुनः शिष्यवृत्ति देण्यास उद्युक्त करावें, त्या शिष्यवृत्तीच्या सहाय्यानें हातीं घेतलेला अभ्यासक्रम पुरा करावा व नंतर नोकरी करून बडोद्याच्या ऋणांतून मुक्त व्हावें. त्यांनीं ही परिस्थिति प्रो. कॅनन यांना निवेदिली व आपला झालेला अभ्यास लक्षांत घेतां एम्. एस्सी. साठीं प्रबंध आणखी कांहीं काळानें युनिव्हर्सिटीला सादर करण्याची सवलत मिळवून द्यावी अशी त्यांना विनंती केली. भीमरावांची विनंती मान्य झाली. सवलतीसाठीं त्यांनीं युनिव्हर्सिटीला रीतसर अर्ज १२ जून १९१७ ला केला व प्रो. कॅनन यानीं आपल्या कळकळीच्या शिफारशीसहित आणखी ४ दिवसांनीं तो युनिव्हर्सिटीकडे पाठविला. या अर्जाचा विचार युनिव्हर्सिटी सेनेटच्या १८ जुलै १९१७ च्या बैठकींत होऊन भीमरावांच्या अभ्यासांतील अनपेक्षितपणें पडलेला खंड माफ करावा व आणखी चार वर्षांच्या आंत खंड पडलेला अभ्यास पुनः सुरूं करून त्यांनीं तो संपवावा अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यांत आला. लंडन युनिव्हर्सिटीचे अॅकॅडेमिक रजिस्ट्रार मि. पी. जे. हर्टॉग यांनीं हा निर्णय भीमरावांना १९ जुलै १९१७ ला पुढील पत्रान्वयें कळविला :

University of London,
South Kensington,
S. W. 7
19 th July, 1917

Dear Sir,

I am desired to inform you that the Senate at their Meeting on 18th July 1917 had under consideration your application of 12th June 1917 to be excused the interruption of your study for the M. Sc. (Econ.) Degree, together with a letter (16th June 1916) from the Authorities of the London School of Economics in regard thereto and that they passed the following Resolution in connection therewith :

That Bhivram Ramji Ambedkar be excused the interruption of his course of study for a period not exceeding four years from October 1917 and further, that on resuming his course, he be exempted under Section 4 of the note to the regulations, under Statutes 113 and 129 from attendence for one term, provided that his teachers certify that he has made use, adequate for such exemption, of the material for his thesis available in India.

I am,
Yours faithfully,
P. H. Hartog,
Academic Registrar.

Bhivram Ramji Ambedkar, Esq.
London School of Economics.
Clare Market, W. C. 2.

आक्टोबर १९१७ पर्यंत ग्रेज इनमध्यें चार टर्म्स भरल्या होत्या व आणखी टर्म्स भरावयाच्या होत्या ; त्यानंतर भीमरावांना बॅरिस्टरीच्या परीक्षेला बसावयास मिळणार होतें. एम्. एस्सी. च्या प्रबंधांत जसा त्यांना शिष्यवृत्तीची मुदत संपल्यानें अडथळा आला तसा बॅरिस्टरीच्या कोर्सलाहि आला. म्हणून भीमरावांनीं ग्रेज इनकडूनहि कांहीं काळानंतर पुढील अभ्यास करण्याची परवानगी मिळविली. या सर्व गोष्टींची निरवानिरव करून भीमरावांनीं मुंबईच्या बोटीचें तिकिट काढलें. चालू असलेल्या महायुद्धानें निर्माण केलेली परिस्थिति लक्षांत घेऊन भीमरावांनीं आपल्या सामानाचा सहाशें रुपयांचा विमा उतरला व तें सामान थॉमस कुक अँड सन्सच्या ताब्यांत देऊन भीमराव मुंबईच्या बोटींत बसले.

# प्रकरण ९ वें

## व्यवहारी जगांत

भीमराव लंडनहून मुंबईला परतले तेव्हां त्यांच्या कुटुंबांतील लोकांत आनंदी-आनंद पसरला. त्यांच्या पत्नी रमाबाई यांना वाटूं लागलें कीं, आतांपर्यंत जें आपण दुःखांत आयुष्य काढलें तें संपलें. आपले पति आतां नोकरी करून पैसे मिळवतील व सर्वांना आनंदांत ठेवतील. त्यांना दीन मुलें झालेलीं होतीं. पहिलें मूल यशवंत. भीमराव १९१३ च्या जुलै महिन्यांत अमेरिकेस गेले तेव्हां रमाबाई गरोदर होत्या. त्यांना मुलगा झाला. त्याचें नांव गंगाधर. तो दीड वर्षांचा असतांना मरण पावला. आपल्याला आणखी मुलेंबाळें होतील व आपला संसार सुखाचा होईल, अशी स्त्री-हृदयाला वाटणारी भावी आयुष्याविषयींची गोड आशा रमाबाईला वाटत होती. इकडे आपल्याला आपला अभ्यास पूर्ण न करतांच परतावें लागलें, याबद्दल भीमरावांना मनस्वी दुःख झालेलें होतें. कुटुंबांत आल्यामुळें त्यांना जो आनंद झालेला होता, त्यावर उपरिनिर्दिष्ट दुःखाची दाट छाया पडलेली होती. मात्र त्यांनीं आपल्या दुःखाची कल्पना कोणालाहि दिलेली नव्हती.

आपणाला बडोद्यांत कोणती नोकरी करावी लागणार व आपण त्या नोकरीवर कधीं रुजूं व्हावें, याबद्दलची विचारणा करणारें पत्र भीमरावानीं महाराजांना लिहिलें. १९१३ च्या अल्प मुक्कामांत आपली बडोद्यांत राहण्याची चांगली सोय झाली नव्हती, ती यावेळीं सरकारतर्फे व्हावी अशीहि भीमरावानीं त्या पत्रांत विनंती केलेली होती. भीमरावांचें तें पत्र योग्य अधिकाऱ्याकडे गेलें, व त्याचें भीमरावांना उत्तर आलें कीं, तुम्ही ताबडतोब बडोद्याला यावें. नोकरीची जागा व राहण्याची व्यवस्था, या दोन गोष्टींबद्दल मात्र त्या पत्रांत कांहीं खुलासा नव्हता.

भीमराव लंडनहून मुंबईला आले तेव्हां त्यांच्याजवळ बडोद्याच्या प्रवास-खर्चाला पुरतील एवढेहि पैसे नव्हते. आनंदरावांना जो काय पगार मिळे त्यांत कुटुंबखर्च चाले. तेव्हां घरांतहि पैसे शिल्लक नव्हते. लंडनहून निघतांना दोन-

तीनशें पुस्तकें व इतर सामानसुमान यांचा विमा उतरवून तें सर्व थॉमस् कुक अँड सन्स या कंपनीच्या ताब्यांत दिलेलें होतें. त्या कंपनीनें तें 'सालसेट' या नांवाच्या आगबोटींतून पाठवून दिलें. ती आगबोट मुंबईला पोहोंचण्यापूर्वी तिच्यावर शत्रूंनीं टॉरपेडो टाकून ती समुद्रांत बुडविली. तेव्हां भीमरावांना कंपनीकडून विम्याबद्दल सहाशें रुपये मिळाले. त्यांतून त्यांनीं सर्व गोष्टींची व्यवस्था केली व ते बडोद्याला गेले. बडोद्यांत आल्यानंतर भीमराव राहाण्यासाठीं पंडित आत्मारामांकडे गेले. त्यांनीं भीमरावांची राहाण्याची व जेवणाची व्यवस्था एका पार्शी गृहस्थाकडे केली. त्या पार्शी गृहस्थाचें नांव जहांगीरजी धनजीबाई हॉटेलवाला. या गृहस्थाला एक तरुण अविवाहित मुलगी होती. तिचें नांव बचुबेन. हीं दोघें आनंदपुरा येथील एका कोपऱ्याला असलेल्या घरांत राहात. या घराला सात आठ खोल्या होत्या. बडोद्याला तीन चार दिवस मुक्काम करणाऱ्या प्रवाश्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था जहांगिरजी करीत असे.

भीमरावांनीं अर्थशास्त्रावर प्रभुत्व कमाविलेलें होतें. म्हणून त्यांची नेमणूक फडणीशी खात्याचा मंत्री म्हणून करावी, असें महाराजांनीं सुचविलेलें होतें. म्हणून त्या कामाची माहिती होईपर्यंत ते त्या खात्यांत प्रथम काम शिकूं लागले; व नंतर प्रत्येक खात्यांतील आर्थिक घडामोडींची माहिती व्हावी, म्हणून कोठींतील (कोठी म्हणजे बडोदें संस्थानचें सेक्रेटारिएट.) इतर खात्यांतील कचेऱ्यांत काम पाहूं लागले. कोठींतील कचेऱ्यांत दोन अधिकारी परदेशी शिक्षण घेतलेले होते. पण भीमरावांच्या पदव्या त्यांच्यापेक्षां जास्त होत्या. सर्व खात्यांतील कामाची माहिती पूर्ण झाल्या-नंतर भीमराव बडोदे संस्थानाचे फडणीस होणार होते. ही नेमणूक जाहीर होईपर्यंत भीमरावांना महाराजांचे मिलिटरी सेक्रेटरी म्हणून नेमण्यांत आलें. पगार दरमहा १२५ रुपये. निरनिराळ्या खात्यांतील कचेऱ्यांत काम करीत असतां त्यांना हाताखालील लोकांकडून फार त्रास होऊं लागला. अस्पृश्य जातीचा माणूस आपणावर अधिकारी नेमण्यांत आला, ही गोष्ट सवर्ण हिंदूंना लांछनास्पद होय, अशी सर्वांची समजूत झाल्यामुळें कचेऱ्यांतील सर्व लहानथोर लोक व शिपाई यांनीं भीमरावांना संत्रस्त करण्याचा विडा उचलला. ते लोक भीमरावांचे हुकूम मानीत नसत. ते कागद व फायली भीमरावांच्या टेबलावर लांबून झुगारून टाकून देत व भीमरावांच्या हाताचा स्पर्श न होईल, अशा रीतीनें दूर उभे राहात. भीमरावांना ऐकूं जाईल अशा रीतीनें ते लोक अस्पृश्य जातींतील लोकांची अवहेलना करणारीं संभाषणें करीत असत. कोठींतील अधिकाऱ्यांचा एक क्लब होता. भीमराव कोठींत आल्यानंतर नियमाप्रमाणें क्लबाचे सभासद झालेले होते. कचेऱ्यांतून सुटल्यानंतर हे अधिकारी क्लबांत जात व चहापान करून टेनिस, पत्ते, वगैरे खेळ खेळत. भीमराव प्रथम क्लबांत गेले तेव्हां त्यांना इतर सभासदांप्रमाणें सर्वांनीं वागूं दिलें. पण चारपांच

दिवस लोटल्यावर त्यांना इतर सभासदांकडून असें सुचविण्यांत आलें कीं, त्यांनीं एका कोपऱ्यांत बसावें व एक मुसलमान शिपाई त्यांना वरून चहा व फराळाचे पदार्थ देईल, ते भीमरावांनीं बिनबोभाट स्वीकारावेत. त्यांनीं भीमरावांना असेंहि सुचविलें कीं, तुम्ही टेनिस, बॅडमिंटन वगैरे खेळांत भाग घेऊं नये. ही सूचना हिंदू अधिकाऱ्यांनीं एका पार्शी अधिकाऱ्याच्या तोंडांतून वदविली. तो पार्शी अधिकारी हिंदू अधिकाऱ्यांबरोबर चहापान करी व खेळे. त्याबद्दल कोणी विरोध केलेला नव्हता. त्या क्लबांत दोन मुसलमान अधिकारी होते. त्यांच्याबद्दलहि कोणा हिंदू अधिकाऱ्यांनीं विरोधाची भाषा वापरलेली नव्हती. हिंदू अधिकाऱ्यांना त्यांचा विटाळ भासत नव्हता. पण भीमरावांचा त्यांना विटाळ होत होता. भीमरावांना ज्या सायंकाळीं ही सूचना केली त्या सायंकाळीं त्यांनीं क्लबांत चहा फराळ केला नाहीं. एका कोपऱ्यांत बसून निराळेपणानें वागणें भीमरावानीं मान्य केलें नाहीं.

भीमरावांची ती रात्र फार दुःखांत गेली. त्यांनीं ही हकिकत महाराजांच्या कानांवर घातली. महाराजांनीं भीमरावांना भेटीस बोलावलें. दोघांचें पुष्कळ बोलणें झालें. भीमरावांनीं अर्थशास्त्रावर दोन प्रबंध व जातीभेदावर एक प्रबंध लिहिलेला आहे, हें ऐकून महाराजांना फार आनंद वाटला. क्लबची भानगड व राहण्याची योग्य सोय, याबद्दलचा बंदोबस्त योग्य परिस्थिति प्राप्त होतांच करूं, असें महाराजानीं भीमरावांना वचन दिलें. ही परिस्थिति फार नाजूक आहे व त्याबद्दल मलाहि एकदम अधिकार गाजवून सवर्ण हिंदूलोकांत असंतोष माजवितां येत नाहीं; म्हणून आहे त्या परिस्थितीला धैर्यानें तोंड देत रहा, असा महाराजांनीं भीमरावांना सल्ला दिला. तेव्हांपासून भीमराव आपल्या फावल्या वेळांत बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररींत जाऊन वाचीत बसत असत. कचेरींत एखाद्या दिवशीं लोकांकडून उपमर्दकारक वर्तन घडलें तर भीमराव कचेरी सोडून तडक बाहेर पडत व लायब्ररींत वाचत बसत. कधीं कधीं दोन तीन दिवस ते कचेरीला जात नसत. अशा वेळीं ते लायब्ररींत वाचन करीत. असा त्यांचा कार्यक्रम कांहीं दिवस चालू होता. मधून मधून कांहीं अधिकारी याबद्दल भीमरावांना टाकून बोलत. पण भीमरावानीं लायब्ररींत जाऊन वाचीत बसण्याचा आपला क्रम बंद केला नाहीं. तेव्हां अधिकाऱ्यांनीं ही तक्रार दिवाणाकडे नेली. दिवाणानीं भीमरावांना भेटीस बोलाविलें. तेव्हां ते भेटीस गेले. त्यानीं दिवाणाला सर्व वृत्तांत सांगितला. दिवाणांनीं भीमरावांना सांगितलें कीं, तुम्ही कचेरींतून घरीं राहूं नका; बाकीची सर्व व्यवस्था पुढें करण्यांत येईल. कांहीं दिवस गेले तरी आपल्या क्लबाची व राहण्याची कांहींच व्यवस्था करण्यांत येत नाहीं, हें पाहून भीमरावानीं महाराजांची पुनः भेट घेतली. त्यावेळीं त्यानीं महाराजांना आपल्या अपूर्ण अभ्यासाची माहिती सांगितली; व मला पूर्ण अभ्यास करूं द्या, अभ्यास पूर्ण झाल्यानतर मी संस्थानांत नोकरी करीन, असें विनविलें. याला महाराजांनीं संमति दिली नाहीं. ते म्हणाले कीं, चार वर्षें

संस्थाननें स्कॉलरशिप दिली. यापेक्षां जास्त दिवस स्कॉलरशिप देणें अशक्य आहे. यानंतर भीमराव महाराजांना म्हणाले कीं, मला एक स्वतंत्र बंगला द्या म्हणजे मी माझें कुटुंब आणून त्यांत राहीन. याबद्दल महाराज म्हणाले कीं, पाहूं या. राहण्याची व्यवस्था करण्याच्या बाबतींत महाराजांच्याकडून कांहींच नक्की आश्वासन मिळेना, म्हणून भीमराव निराश होऊन परतले.

कचेरींतील कामें संपवून ते लायब्ररींत वाचावयास जात व लायब्ररींतून पुस्तकें आणून घरीं वाचत बसत. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इत्यादि विषयांवरील सर्व पुस्तकें त्यानीं वाचून काढलीं व त्यांचीं टिपणें तयार केलीं. एके दिवशीं भीमराव कचेरींतील काम संपवून दोन वाजतां लायब्ररीकडे चालले तेव्हां एक अधिकारी म्हणाला, चालले हे साहेब लायब्ररीचें नांव सांगून भटकायला! तेव्हां भीमराव थांबून त्याला म्हणाले, 'हें पहा, तुम्ही माझ्याबरोबर चला लायब्ररींत म्हणजे मी त्या लायब्ररींतील किती पुस्तकें वाचलींत व त्यांवर किती टिप्पणें काढलीत तीं दाखवितों तुम्हांला!' यावर तो अधिकारी कांहीं बोलला नाहीं. दुसऱ्या दिवशीं भीमरावांनीं आपल्या टिप्पणांच्या जाड जाड बारा वह्या सदर अधिकाऱ्याला दाखविल्या व त्याला म्हटलें, 'तुम्हीं बडोद्यांत बारा वर्षें राहतां. सांगा पाहूं तुम्हीं किती पुस्तकें वाचलींत?' यावर तो अधिकारी खजील झाला. तेव्हांपासून तो भीमरावांच्या वाटेस गेला नाहीं. ज्या पार्शी अधिकाऱ्यानें भीमरावांना क्रबांत कोपऱ्यांत बसून फराळ करा म्हणून सांगितलें होतें तो पार्शीधर्माप्रमाणें प्रार्थना कचेरींत करीत असे. त्याचप्रमाणें दोघे मुसलमान अधिकारी करीत. त्यांच्या प्रार्थना झाल्यावर भीमराव त्यांना मुद्दाम खिजवीत कीं, 'ज्या प्रार्थना तुम्ही आतां केल्या त्यांचा अर्थ तुम्हांला समजला का?' यावर ते संतापून म्हणत कीं, 'तूं अस्पृश्य आहेस व तुला कशाला या उठाठेवी हव्यात?' यावर भीमराव त्या प्रार्थनांचा अर्थ व मतितार्थ त्यांना सांगत असत. त्यांचे वादविवाद होत, त्यांत हिंदू अधिकारी भाग घेत. यावेळीं भीमराव आपल्या वादविवादानें त्या सर्वांना हैराण करीत असत. ते त्यांच्या अडाणीपणाची व धर्माबद्दलच्या ढोंगीपणाची खूप टिंगल करीत असत. हे वादविवादाचे व टिंगलीचे कार्यक्रम कांहीं दिवस चालले व हा गृहस्थ बराच जबर आहे, अशी हिंदु, मुसलमान व पार्शी अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर त्यांनीं हे वादविवाद बंद केले. तेव्हांपासून त्यांना भीमरावांबद्दल द्वेषतिरस्कारमिश्रित आदर व भीति, अशा भावना वाटूं लागल्या.

कचेरींतील काम, लायब्ररींतील वाचन व हॉटेलवाल्याच्या घरांत पुनः वाचन व अभ्यास, असा कार्यक्रम भीमरावानीं नोव्हेंबर महिन्यापर्यंत चालविला. ते फिरायला जात नसत अगर कोणाशीं गप्पा मारीत बसत नसत. एका अस्पृश्य गृहस्थाला घरांत ठेवून भ्रष्टाकार केला, असा बडोद्यांतील मूठभर पार्शी रहिवाश्यांतील

कांहीं लोकांनीं जहांगीरजी धनजीभाई हॉटेलवाला याच्याबद्दल गिल्ला केला. एके दिवशीं कांहीं पारशी गृहस्थ हातांत काठ्या घेऊन भीमरावाला जहांगीरजींच्या घरांतून हुसकावून देण्यासाठीं हुल्लड करीत आले. आपलें गिऱ्हाईक तुटेल या भीतीनें जहांगीरजीनें भीमरावाला आपल्या घरांतून बाहेर काढलें. भीमरावानीं हें वर्तमान महाराजांच्या कानीं घातलें, पण महाराजाकडून राहण्याबद्दल कांहीं व्यवस्था होईल असें त्यांना वाटेना. इतक्यांत त्यांची सावत्र आई आजारी आहे, अशी तार आली व भीमराव रजा घेऊन मुंबईस गेले.

बडोद्यांतील घटनेबद्दल ब्लेक क्लार्क यांनीं खालील उद्गार काढलेले आहेतः-
" ...Ambedkar...learned from the Gaekwar that he was to be groomed for the job of Finance Minister. The Accountant General assigned him a desk. Soon a clerk carrying papers for him came down the isle. In front of Ambedkar's desk was a carpet, an excellent conductor of contamination. Standing at its far edge, the messenger flung his bundle at the desk. That was the last work Ambedkar received. After six days of mortifying idleness he asked his superior's permission to spend his days in the public library.

" Then one morning as Ambedkar was leaving his room at an inn he saw a dozen Parsis-members of a select caste-armed with clubs comming up the stairway. " Get out! Get out!" they shouted. He fled for his life. Unable to find lodgings he wrote to the Gaekwar, who referred him to the Prime Minister. But the Prime Minister, the highest official in the State, told him, " Sorry, I can do nothing." (The Reader's Digest, March, 1950).

वर लिहिलेल्या ज्या घटना घडून आल्या त्यांबद्दल प. वा. कृष्णाजी अर्जुन केळूस्कर यानीं आपल्या लेखांत पुढील माहिती दिलेली आहे: "—येथें आल्यावर कराराप्रमाणें बडोदें संस्थानानें सांगितलेली नोकरी स्वीकारावी लागली, परंतु अस्पृश्यतेच्या खुळामुळें त्यांना ती नोकरी करणें अति दुर्घट झालें. पहिली गोष्ट अशी कीं, तेथें ते ज्या कचेरींत काम करीत तेथले दुसरे कारकून त्यांच्याकडे कागद दुरून फेकीत असत. आणि त्यांना आपल्या टेबलाला अगर बैठकीला स्पर्श करूं देत नसत. ही मानखंडना पाहून त्यांना अतिशय खेद होत असे. दुसरी गोष्ट अशी कीं त्यांना रहायला कोठेंच जागा मिळेना. तेथें एका पारशाचें हॉटेल होतें त्यांत त्यांनीं आपला मुक्काम कांहीं दिवस केला होता. पण कोणी चहाडी केल्यामुळें, त्या पारशाला आपली गिऱ्हाईकी जाईल या भीतीनें

आमच्या डॉक्टरसाहेबांना आपल्या हॉटेलांतून काढून लावावें लागलें. त्यांनीं या बाबतींत महाराजांकडे दोन तीन वेळां विनंती-अर्ज केले. परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां ते मुंबईस परत आले; आणि मला त्यांनीं आपली ही सगळी करुणकहाणी सांगितली. तेव्हां मी या बाबतींत महाराजांना एक पत्र लिहिलें. पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. बडोद्याच्या कॉलेजांतील प्रो. जोशी या नांवाचे विद्वान गृहस्थ मुंबईस आल्यावेळीं मी त्यांस सदरील गोष्ट सांगितली. तेव्हां ते म्हणाले कीं, आपण आंबेडकरांस आपल्या घरीं ठेवून घेतों. त्यांना माझ्याकडे पाठवून द्या. यावरून मी त्यांना चिठ्ठी देऊन बडोद्यास पाठविलें व ते अमक्या वेळीं पोहोंचतील हें प्रो. जोशी यांना पत्रद्वारें कळविलें. दरम्यान प्रोफेसरसाहेबांची बुद्धि फिरून त्यांनीं डॉक्टरसाहेब बडोदें स्टेशनवर उतरले तेव्हां त्यांस आपल्या नोकरांकडून असें कळविलें कीं, तुम्ही माझ्या घरीं येऊं नका. माझी बायको जुन्या मताची असल्यामुळें तुम्ही माझ्या घरीं रहाणें तिला आवडणार नाहीं. हा निरोप मिळाल्यामुळें डॉ. आंबेडकर निरुपाय होऊन मागल्या पावलीं परत मुंबईस आले; ते पुन्हां बडोद्यास गेले नाहींत..." (जनता खास अंक, १९३२.)

१७ मे १९३६ रोजीं कल्याण येथें सभा भरविण्यांत आली होती. तींत बडोद्याच्या घटनेबद्दल बाबासाहेबांनीं जी माहिती सांगितली होती ती अशीः "बडोदें सरकारच्या स्कॉलरशिपा मिळाल्यावर मी विलायतेला जाऊन उच्च शिक्षण घेतलें. तेथून परत आल्यावर स्कॉलरशिपांच्या अटीप्रमाणें मला बडोदें संस्थानांत नोकरी करणें भाग पडलें. परन्तु बडोद्यास मला रहावयास एकही घर मिळेना. हिंदु किंवा मुसलमान कोणीच रहावयास जागा देईना. शेवटीं एका पार्शी धर्मशाळेंत पार्शी म्हणून रहावयाचें ठरविलें. विलायतेहून परत आल्यावर मी दिसायला रुबाबदार व गोरा दिसत होतों. शेवटीं मी एदलजी सोराबजी असें पार्शी नांव धारण करून राहिलों. रोजीं दोन रुपये घेऊन रहावयास जागा देण्याचें धर्मशाळेच्या रखवालदारानें कबूल केलें. यापूर्वीच बडोद्यास श्रीमंत महाराज सरकारनीं बडोद्यास एक शिकलेलें महाराचें पोर आणलें आहे, ही कुणकुण लोकांना कळली होती. माझें पार्शी म्हणून धर्मशाळेंत गुप्तपणें रहाणें वगैरे गोष्टी लोकांना शंका येण्यास कारणीभूत होऊन माझ्या गुप्तपणाचा स्फोट झाला. धर्मशाळेंत रहाणारा मीच तो महार हें तेथील पार्शी लोकांना कळलें. दुसरें दिवशीं मी जेवण वगैरे करून ऑफिसला जाण्याकरितां निघालों असतांना पंधरा वीस पार्शी हातांत काठ्या घेऊन मला ठार करण्याकरितां तेथें आले. त्यांनीं प्रथम 'तूं कोण आहेस?' असें विचारलें. मी फक्त हिंदु आहे, असें उत्तर दिलें; परन्तु त्यांचें या उत्तरानें समाधान झालें नाहीं. त्यांनीं हमरीतुमरीवर येऊन जागा ताबडतोब सोडण्यास सांगितलें. या वेळीं माझ्या मनोधैर्याचें मला विलक्षण पाठबळ मिळालें. मी त्यांच्याजवळ निर्भयपणें आठ तासांची मुदत मागितली व ती त्यांनीं दिली.

मी सबंध दिवस जागा मिळविण्याचा कसून प्रयत्न केला. परन्तु मला कुठेंच जागा मिळेना. कित्येक मित्रांकडे गेलों. त्यांनीं निरनिराळीं कारणें सांगून मला वाटेला लाविलें. मी शेवटीं इतका कंटाळलों कीं, आतां पुढें काय करावें हेंच कळेना. मी एका ठिकाणीं खालीं बसलों. माझें मन उद्विग्न बनलें व डोळ्यांतून सारखा अश्रूप्रवाह वाहूं लागला. (यावेळीं डॉ. बाबासाहेबांच्या डोळ्यांतून नकळत अश्रू वाहूं लागले. अस्पृश्यतेच्या भडाग्नीनें त्यांचें अंतःकरण होरपळून गेलेलें दिसत होतें.) शेवटीं अगदींच नाइलाज झाल्यावर मला बडोयाची नोकरी सोडून रात्रींच्या गाडीनें मुंबईस यावें लागलें." (जनता, २३-५-१९३६.)

भीमराव विद्यार्थीदशेंत असतांना त्यांना पैशाची टंचाई आणि हिंदु लोकांचे अपमान हीं सहन करावीं लागलीं. विद्यार्थीदशेंतून पाऊल बाहेर पडल्यानंतर त्यांना व्यवहारी जगांत प्रवेश करावा लागला. त्यांनीं घोर तपश्चर्या करून संपादन केलेली अचाट विद्या, गाढ ज्ञान आणि अफाट बुद्धिमत्ता यांची व्यवहारी जगांत जी अवहेलना झाली ती केवळ ते जातीनें महार होते म्हणून. त्यांना पुढील आयुष्यांत अनेक अपमानास्पद व हिडीस प्रकारचें अनुभव आले त्याचें कारण हिंदु लोकांचा अस्पृश्य जातींतील लोकांकडे तुच्छतेनें व तिरस्कारानें पाहण्याचा दृष्टिकोन हेंच होय.

## प्रकरण १० वें

# प्रो फे स र

१९१७ च्या नोव्हेंबर महिन्यांत बडोद्याहून मुंबईला भीमराव आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांची सावत्र आई जिजाबाई ही मरण पावली. या बाईबद्दल भीमरावांना कधींच माया आली नाहीं, त्यांनीं तिला कधीं 'आई' किंवा 'बाई' असें संबोधलें नाहीं. याचें कारण, ही बाई आपल्या आईचे दागिने घालून मिरवते असा भीमरावांचा लहान वयांत समज झालेला होता. व त्यांच्या मनांत त्या बाईबद्दलचा राग कायमची जागा करून राहिलेला होता. शिवाय, ती बाई फार वाचाळ, भांडखोर व लबाड होती. सुभेदारांशीं तिचें रुसणें फुगणें नेहमीं चाले. तिच्या भांडकुदळ स्वभावामुळें घरांत नेहमीं अस्वस्थतेचें वातावरण असे. या अनेक कारणांमुळें भीमरावांना जिजाबाईबद्दल आदर वा प्रेम कधीं वाटलें नाहीं. ती मरण पावल्यावर भीमरावानीं सक्षौर सुतक पाळलें. ते सुतकांत होते तेव्हां मुंबईत अस्पृश्यांची जंगी जाहीर सभा भरविण्यांत आली होती. ती सभा ११ नोव्हेंबर १९१७ ला सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली होती. या सभेस भीमरावांनीं उपस्थित व्हावें म्हणून बरेच प्रयत्न झाले. पण भीमराव सुतकांत असल्यामुळें सभेस हजर राहिले नाहींत. याच सभेंत भीमरावांचें अभिनंदन करण्यांत आलें. बडोदे सरकारनें त्यांना वाईट रीतीनें वागविलें याबद्दलहि खेद प्रदर्शित करण्यांत आला.

बडोद्याहून मुंबईला आल्यानंतर भीमरावांनीं ब्रिटिश हद्दींत नोकरी करण्याचें ठरविलें. ही नोकरी त्यांना कायमची करावयाची नव्हती. लंडन युनिव्हर्सिटींतील आणि ग्रेज इन् मधील अपुरा राहिलेला अभ्यास पूर्ण कण्यासाठीं त्यांना १९२१ च्या आंत लंडनला जावयाचें होतें. लंडनमधील खर्चाला लागणारा पैसा त्यांना मिळवावयाचा होता. व यासाठींच त्यांना दोन तीन वर्षे नोकरी करावयाची होती. आपल्या शिक्षणाच्या मानानें आपणाला सरकारनें नोकरी द्यावी, म्हणून भीम-

रावांनीं सरकारकडे अनेक अर्ज पाठविले. पण सरकारनें भीमरावांच्या पदव्यांची व विद्वत्तेची कांहींच कदर केली नाहीं. उलट अंशी, विलायती शिक्षण घेऊन आलेले तेजस्वी भीमराव कोणकोणते उद्योग करतात, त्यांचे उद्योग सरकारच्या विरुद्ध आहेत का, त्यांचे संबंध क्रांतिकारकांच्या पक्षांशीं किंवा जर्मनीशीं आहेत का, इत्यादींबद्दल चौकशी करण्याकरितां व त्यांच्या हालचालीवर टेहळणी करण्याकरितां सरकारनें आपले गुप्त पोलीस भीमरावांच्या मागें ठेवलेले होते. सरकारकडून नोकरी मिळणें कठीण आहे, याबद्दल भीमरावांची खात्री झाल्यानंतर ते खाजगी कंपन्यांच्या कचेऱ्यांत नोकरी मिळविण्याचें प्रयत्न करूं लागले. सकाळीं एक कप चहा घेऊन ते बाहेर पडत आणि रात्रीं सात वाजतां घरीं येत. दिवसभर वणवण फिरून थकल्यानंतर ते युनिव्हर्सिटीच्या अगर सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या लायब्ररींत जाऊन वाचत बसत. याचवेळीं आनंदराव हे मूळव्याधीच्या आजारानें जर्जर झालेले होते. ते कित्येक दिवस रजेवर होते. त्यांचा आजार फार वाढल्यानंतर औषधोपचारासाठीं ते आपली सासुरवाडी गोमीटगांव, ता. महाड, जि. कुलाबा, येथें गेले व तेथेंच ते १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यांत वारले. त्यांना दोन अपत्यें होतीं. मुकुंद व गंगाधर. आनंदराव वारले तेव्हां गंगाधर दीड वर्षांचा होता. तो वडिलांच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनीं वारला. या सर्व घटना झाल्यानंतर मनोरमाबाईंना मुलगा झाला. आनंदरावांच्या मृत मुलाच्या स्मरणार्थ गंगाधर हें नांव मनोरमाबाईंच्या मुलाला ठेवलें.

आनंदराव व भीमराव यांचें परस्परांवर अत्यंत प्रेम होतें. आनंदराव हेच कुटुंबांतील प्रमुख मिळवते व कुटुंब चालविणारे. त्यांच्या सहाय्यामुळेंच भीमरावांना आपला विद्याभ्यास करण्यास उत्साह आला. आनंदरावांचा आधार तुटल्यानंतर भीमरावांना आपलें कुटुंब कसें चालवावें व अपुरा राहिलेला लंडनमधील विद्याभ्यास कसा पुरा करावा, याबद्दल मोठी काळजी पडली. त्यांचे सर्वांत वडिल बंधु बाळाराम हे कुटुंबापासून विभक्त झालेले होते. त्यांची पहिली पत्नी पंढरपूरच्या माघ वारीस गेली असतां प्लेग होऊन १९१० सालीं वारली. त्यानंतर त्यांनीं पुनर्विवाह केला. त्यांना मदिरापानाचें जबर व्यसन होतें. त्यामुळें आणि पुनर्विवाह वडिलांच्या संमतीशिवाय केला म्हणून, सुभेदार बाळारामावर फार नाराज होते. बाळाराम कुटुंबापासून फटकून वागत असल्यामुळें त्याचा कुटुंबाला कांहीं आधार नव्हता. पहिल्या बायकोपासून झालेली मुलगी सखुबाई हिला घेऊन तो दुसऱ्या बायकोसह वेगळाच रहात असे.

कोठेंच नोकरी मिळेना म्हणून भीमरावांनीं प्रो. के. बी. इराणी यांच्या ओळखीनें एक आणि कोलंबिया युनिव्हर्सिटींत त्यांच्याबरोबर विद्यार्जन करून व्यापारांत शिरलेले त्यांचे मित्र श्री. भाटीना यांच्या ओळखीनें दुसरी, अशा दोन शिक-

वण्या पार्शी कुटुंबांत मिळविल्या. दोन्ही शिकवण्यांचे प्रत्येकीं ५० रु. दरमहा मिळत. या शिकवण्या करीत असतां भीमरावानीं जास्त पैसे मिळविण्याच्या हेतूनें स्टॉक्स अॅण्ड शेअर्स अॅडव्हायसर्स या नांवाची कंपनी काढून तिची कचेरी कोटांतील दलाल स्ट्रीटवर सुरू केली. स्टॉक्स व शेअर्स यांच्याबद्दल मोठ्या प्रमाणांत व्यापार करणाऱ्या शेटिया भाटियांना व कंपन्यांना सल्ला मसलत देण्याचा उद्योग भीमरावानीं सुरू केला, तेव्हां प्रथम त्यांना बरेंचसें गिऱ्हाईक मिळूं लागलें. पण ही कचेरी एका धेडाची आहे, ही वार्ता चोहोंकडे पसरतांच शेटिये भाटिये या कचेरीकडे ढुंकूनहि पाहण्यास तयार झाले नाहींत. तेव्हां भीमरावांनीं ती कचेरी बंद केली. प्रो. डी. आर. दावर यांनीं दावर्स कॉलेज हें व्यापारी विषयांचें शिक्षण देणारें विद्यालय चालविलेलें होतें. तें सकाळीं व संध्याकाळीं दोन तास चाले. त्या कॉलेजांत अर्थशास्त्र, बँकेचे व्यवहार, व्यापारी कायदे, हे विषय शिकविणारा एक प्रोफेसर हवा होता. त्या जागेवर भीमरावांनीं आपली नेमणूक करून घेतली. त्या जागेचें त्यांना ५० रु. दरमहा मिळत. शिकवण्यांचे १०० रु. आणि कॉलेजचे ५० रु. मिळून दरमहा १५० रु. उत्पन्न झालें. या पैशांतून भीमराव स्वतःचा व कुटुंबाचा खर्च भागवीत. त्या अल्प उत्पन्नांतून त्यांना पुढील शिक्षणासाठीं कांहीं पैसे शिल्केंत टाकतां येत नसत. त्यामुळें भीमरावांना अत्यंत वाईट वाटे. जादा पैसे मिळविण्यासाठीं ते अर्थशास्त्रांतील निरनिराळ्या प्रश्नांवर लेख लिहून वर्तमानपत्रांकडे पाठवीत, पण त्यांतूनहि त्यांना फारसें उत्पन्न होईना. यावेळीं त्यांनीं Castes in India हा निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. पण त्या पुस्तकाचाहि जास्त खप झाला नाहीं. याच काळांत त्यांनीं Small Holdings in India and their Remedies हा निबंध लिहून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला. पण याहि पुस्तकामुळें त्यांना पैसे मिळाले नाहींत. अशा परिस्थितींत भीमरावांनीं दीड वर्ष दुःखांत व हालअपेष्टांत काढलें. या दीड वर्षांचें वर्णन ब्लेक क्लार्कनें पुढीलप्रमाणें केलेलें आहे: "Except for odd jobs, and answering correspondence, one of India's best educated men lived in Bombay for the next year and a half—unemployed, poverty-stricken, miserable." (The Reader's Digest, March, 1950.) अशा दैन्यावस्थेंतहि भीमरावांचें वाचन अखंडपणें चालू होतें. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी व युनिव्हर्सिटी यांच्या व इतर ठिकाणच्या लायब्ऱ्यांत जाऊन ते आपल्या एम्. एस्सी. च्या प्रबंधासाठीं सामुग्री गोळा करीत असत.

श्री. आर. एम्. जोशी हे सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई, येथें इंग्लिश व अर्थशास्त्र या विषयांचे ॲक्टिंग लेक्चरर, होते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्यें पुढील अभ्यास करण्याकरितां ते लंडनला गेलेले होते. त्यांच्या जागेवर

श्री. के. टी. शहा यांना नेमण्यांत आलें. पण श्री. शहा यांनीं राजिनामा दिला; तेव्हां ही जागा भरण्यासाठीं डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन श्री. जे. जी. कॉव्हर्न्टन यांनीं उमेदवारांकडून अर्ज मागविले. एकंदर ११ अर्ज या जागेसाठीं आले. त्यांत भीमरावांचा अर्ज होता. तो त्यांनीं ५ डिसेंबर १९१७ ला लिहिला. या अर्जांत त्यांनीं आपली माहिती देऊन, तो कोलंबिया युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे प्रमुख प्रोफेसर इ. आर. ए. सेलिग्मन व सोशियालॉजीचे प्रमुख प्रोफेसर एफ. एच्. जिडिंग्ज यांचीं शिफारसपत्रें जोडून पाठविला. डी. पी. आय्. कॉव्हर्न्टन् आणि सिड्न्हॅम कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. पेर्सी ॲन्स्टी यांच्यांशीं मुलाखती घेऊन भीमरावांनीं आपली बाजू पुढें मांडली व त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, आपणाला ही नोकरी कायम करायची नाहीं; तर फक्त दोन वर्षे करावयाची आहे. त्यानंतर लंडनला अभ्यास पुरा करण्यासाठीं जाणार. भीमरावानीं ही अट घातल्यामुळें सरकारपुढें पेंच असा पडला कीं, ही जागा लांब मुदतीनें भरावी कीं अल्प मुदतीनें.

अकरा उमेदवारांत भीमराव यांची योग्यता श्रेष्ठ होती, व त्यांना प्रोफेसर नेमावें, असा प्रिन्सिपॉलनें आपला अभिप्राय व्यक्त केला. या जागेवर श्री. जोशी यांचा हक्क होता व ते १९२० पर्यंत लंडनमध्यें राहणार होते. तेव्हां दोन वर्षांसाठीं भीमरावांना नेमावें व नंतर श्री. जोशी परतल्यानंतर त्यांना नेमावें, असा निर्णय सरकारनें घेतला. हा निर्णय घेण्याच्या अगोदर सरकारनें भीमराव व जोशी यांच्या-बद्दलचीं मतें काय आहेत, तीं लंडनमधील प्रोफेसरांकडून अजमावून पाहिलीं होतीं. याबाबतींत प्रो. कॅनन यांचीं दोन पत्रें (ता. २४-११-१९१७ व २५-४-१९१८.) व मि. सी. एस्. मेटकॉफ, सेक्रेटरी, लंडन स्कूल ऑफ् इकॉनॉमिक्स् ॲण्ड पोलिटिकल सायन्स, यांचें एक पत्र (ता. १४-५-१९१८) उल्लेखनीय आहेत. या पत्रांतील भीमरावांबद्दलचे अभिप्राय विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तीं पत्रें खालीं उधृत करीत आहोत :

The London School of Economics and
Political Science ( University of London )
Clare Market, London, W. C.
24th November 1917.

Mr. B. R. Ambedkar came to London in June 1916 highly recommended to me by my old friend, Professor Seagar, of Columbia University, New York, and was readily accepted on his American record as a candidate for the M. Sc. (Economics.) degree

by the University of London, his work to be under my supervision. He proposes to offer a thesis on the Provincial Decentralization of Indian Finance, but being obliged to return to India he has obtained leave to interrupt his work for a time. Before he left for India he had done enough to make me confident that he would produce an excellent thesis. He had attacked his subject in a roughly workmanlike manner suggesting certainty of complete success in regard to it and anything else which he knows himself fit to undertake.

Sd / Edwin Cannan,
Professor of Political Economy in the
University of London.

(Source : Govt. File, E.D., No. 65-I/1918, p.97)

11, Chadlington Road, Oxford
April 25, 1918.

Dear Anstey,

Your letter of the 9th arrived today. Both men are unusually good. I don't know anything about Ambedkar except that he came to do a thesis and attacked it and me in a way wich showed he had quite extraordinary practical ability. "And me" I say, because if he wanted to prefer a request to the University or anything of that kind, he would save me all trouble by recounting all the relevant facts. He chose the subject for the thesis, and got to work on it without giving any trouble, and so far as I could see ( knowing I admit, nothing whatever about the subject) he was doing it very well indeed and would in due time have got the M. Sc. quite easily. It gives a wrong impression to say he was a year with us; if he was, it must have been a very broken year; I don't think I saw him more than three times altogether. I rather wonder if he is a pure Indian; his character is rather Scotch--American, though in appearence he is a fat Indian.

Joshi, on the other hand, is as lean as a tolerably healthy and well-fed person can be, and there is nothing European about him. A thoughtful man, who always gets high marks from me;

we all like him—I should think he is much the best liked of all the Indians we have had. Not, I think, at all self-seeking. Ambedkar would do the job well in his own interest, while Joshi would do it for its own sake. I find it very difficult to decide which of them would be the better teacher. Ambedkar would get up all that was required with ease and put the trusting student safely through his examinations, but I should think Joshi would be much more "inspiring" (Were you ever "inspired" by lectures? I was, by A. L. Smith—never any one else), I think this is really all the help I can give you; you know what kind of students you have, and I don't, because I don't suppose our Indians are representative.

Yours very sincerely,
Sd/ Edwin Cannan.

Was K. T. Shah that you speak of our Shah? Joshi is three or four classes above him.

(Source: Govt File, E. D. No. 65-I/1918 PP. 237-38)

London School of Economics and Political Science,
Clare Market, London, W. C. 2
14th May 1918.

Dear Mr. Anstey,

The Director asks me to say in reply to your letter to him inquiring about the relative merits of Mr. Joshi and Mr. Ambedkar that so far as he can gather from the views at lectures here, Mr. Joshi is a man thoroughly to be recommended. He is able, modest, hard working and most reliable. Mr. Ambedkar's association with the School was not of sufficiently intimate character to permit of any very definite conclusion. Professor Cannan, who saw him several times, judged him to be capable and well instructed with no lack of self-appreciation.

Please remember me very kindly to Mrs. Anstey and with kind regards believe me,

Yours faithfully,
Sd/ C. S. Mactaggart,
Secretary.

(Source : Govt. File, E.D., No. 65-I/1918, p.239)

या तिन्ही पत्रांतील अभिप्रायांवरून असें दिसतें कीं, श्री. जोशी हे श्री. आंबेडकरांपेक्षां जास्त तल्लख बुद्धीचे वाटत होते; आणि श्री. आंबेडकर हे आपल्या बुद्धीचा उपयोग व्यवहारी दृष्टीनें करणारे आणि आपल्या विषयाला व शिक्षकपदाला व्यवहारी कौशल्यानें हाताळणारे वाटत होते. जोशी स्वभावानें साधेसुधे, नम्र आणि पाश्चात्य आचारविचारांच्या पूर्ण आहारीं न गेलेले, असे हिंदी गृहस्थ भासत होते. आणि आंबेडकर स्वभावानें चतुर, आत्मप्रतिष्ठेबद्दल जागृति बाळगणारे, आणि पाश्चात्य आचारविचारांचे अर्क पिऊन हिंदीपणाला सोडचिठ्ठी दिलेले गृहस्थ भासत होते. जोशी विद्यार्थ्यांना स्फूर्तिप्रद आयुष्य देतील, आणि आंबेडकर त्यांना व्यवहारी आयुष्य देतील; जोशी हातांत घेतलेलें काम, एक पवित्र कार्य म्हणून करतील; आणि आंबेडकर हातांत घेतलेलें काम अमेरिकन गृहस्थाच्या व्यवहारी दृष्टीनें पण स्कॉच गृहस्थाच्या चिकाटीनें करतील, आणि त्यांतून हिताचें कांहीं तरी निर्माण करतील.

ही जागा आपणाला मिळाली तर लंडनला जाण्याची सिद्धता लौकरच करतां येईल, याची खात्री झाल्यामुळें ही जागा मिळविण्यासाठीं भीमरावांची सारखी धडपड चालू होती. या बाबतींत आपणाला मदत करावी म्हणून मुंबईचे माजी गव्हर्नर व ज्यांच्या नांवानें कॉमर्स कॉलेज सुरू केलें, ते लॉर्ड सिड्न्हॅम–यांना भीमरावांनीं पत्र पाठवून ( लंडनला ) ही जागा मिळवून द्या अशी विनंती केली व लॉर्डसाहेबांनीं तशी आग्रहाची शिफारस केली. अखेरीस सर्व मुद्यांचा सर्व बाजूंनीं विचार करून सरकारनें भीमरावांची १० नोव्हेंबर १९१८ पासून सदर जागेवर नेमणूक केली. ( एज्युकेशनल डिपार्टमेंट 'नोटिफिकेशन नं. २५६०, तारीख १ आक्टोबर १९१८, बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट, भाग पहिला. पा. १९०३, ता. ३-१०-१९१८ ). पगार दरमहा ४५० रुपये. ते या जागेवर ११ नोव्हेंबर १९१८ ला रुजू झाले. या जागेवर त्यांनीं ११ मार्च १९२० पर्यंत काम केलें.

प्रोफेसरच्या जागेवर नेमल्याचा हुकूम हातीं आला तेव्हां भीमरावांना व घरांतील माणसांना अत्यानंद झाला. यावेळीं भीमरावाजवळ पैसे नव्हते व भरपूर चांगले कपडेहि नव्हते. म्हणून त्यांनीं एका मित्राकडून सहाशें रुपये उसने घेतले, व त्यांतून त्यांनीं स्वतःसाठीं भरपूर कपडे केले. साडेचारशेंची नोकरी मिळाली म्हणून त्यांनीं इम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या चाळींतील ( नं. ४२ ) आपली खोली ( नं. ५० ) सोडली नाहीं. याच खोलींत राहून ते विद्यार्थ्यांना द्यावयाच्या लेक्चरांची पूर्वतयारी करीत असत. त्यावेळीं सिड्न्हॅम कॉलेज व्हाईटवे लेडलॉ ॲण्ड कंपनीच्या इमारतींत ( दुसऱ्या मजल्यावर ) होतें. भीमरावांचीं विद्यार्थ्यांपुढील लेक्चर्स मनोरंजक व प्रबोधक होत. अर्थशास्त्रांवरील त्यांचीं लेक्चर्स फार उत्तम होतात अशी त्यांची कीर्ति त्यांच्या विद्यार्थ्यांनीं फैलावल्यामुळें एल्फिन्स्टन, विल्सन व सेंट झेवियर

कॉलेजांतील इतिहास, अर्थशास्त्र व राज्यघटना हे विषय घेतलेले विद्यार्थी भीमरावांचीं लेक्चर्स ऐकण्यासाठीं वर्गांत जमा होत असत.

वर्गांतील लेक्चर्स संपल्यानंतर भीमराव इतर प्रोफेसरांबरोबर गप्पागोष्टी करण्यांत फारसा वेळ दवडीत नसत. त्यांना कॉलेजांत जो मोकळा वेळ मिळे तो ते कॉलेजच्या लायब्ररींत जाऊन वाचत व टिप्पणें काढीत बसत असत. एम्. एस सी.च्या प्रबंधासाठीं पुस्तकें वाचून त्यांचीं टिप्पणें त्यांनीं काढलीं होतीं.

कॉलेजला जाण्यायेण्याला दोन आणे व दुपारीं चहा व स्लाईस मस्का यासाठीं एक आणा, एवढाच भीमरावांचा दररोजचा खर्च असे. पुस्तकें विकत घेण्यांत ते कांहीं खर्च करीत नसत. घरखर्चासाठीं ते ५०।६० रु. देत व त्या व्यतिरिक्त ते घरांतील माणसांना एक पैहि खर्च करूं देत नसत. इतकी काटेकोर काटकसर त्यांनीं दोन वर्षे केली. ती फक्त एकाच उद्देशानें–विलायतेला जाण्याच्या खर्चाची रक्कम लौकर जमवितां यावी. आणि अत्यंत कठोरपणानें सर्व बाबतींत काटकसर करून त्यानीं दोन वर्षांत सात हजार रुपये संग्रहीं टाकले. विलायतेंतील विद्याभ्यासाला लागणाऱ्या खर्चाची भीमरावानीं तयारी केली ती आत्मक्लेश भोगून !

भीमरावांना १९१३ ते १९२० या सात वर्षांच्या कालावधींत तीन अपत्यें झालीं. दोन मुलगे, गंगाधर व रमेश, व एक मुलगी इंदु. हीं तीन्हीं मुलें वर्ष सव्वा वर्षाचीं असतांनाच वारलीं. भीमरावांना संततिसौख्य मिळालें नाहीं !

## प्रकरण ११ वें

अनुक्रमांक ... दि. ...
क्रमांक ... नों: दि. ...

## सिंहावलोकन

१९१९ व १९२३ या सालांमध्यें डॉ. आंबेडकर यांनीं अस्पृश्यांच्या चळवळींचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. त्याच्या अगोदर हिंदुधर्म, हिंदुसमाज, हिंदु-समाजांतील निरनिराळया जाती यांची एकंदर परिस्थिति काय होती व त्या परिस्थितींत अस्पृश्य समाजाची स्थिति कोणत्या स्वरुपाची होती, हिंदु समाजांत सुधारणेंचें वारें कसें व कधीं खेळूं लागलें, आणि अस्पृश्यांची हीन परिस्थिति सुधारण्यासाठीं कोणी कसे व कधीं प्रयत्न केले; त्याचप्रमाणें अस्पृश्योन्नतीच्या चळवळीचा रागरंग व दिशा काय होती व त्या चळवळीचा पुरस्कार कोणी कोणी व कोणत्या हेतूंनीं केला, याची थोडी माहिती येथें दिली म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या पुढील आयुष्याची, चळवळींची आणि कार्यांची कोणती पार्श्वभूमि होती, हें लक्षांत येईल. म्हणून हिंदुसमाजाच्या परिस्थितीचें आणि अस्पृशोन्नतीच्या चळवळीचें सिंहावलोकन करणें जरूर आहे.

आपला धर्म खुद्द परमेश्वरानें उत्पन्न केलेला आहे व आपलें धर्मग्रंथही त्यानेंच निर्माण केलेले आहेत, अशा प्रकारची भावना जगांतील सर्व धर्मांच्या अनुयायांमध्यें वावरत आहे. तशा प्रकारची भावना हिंदु धर्मांतील लोकांचीहि आहे. परंतु, हिंदु समाजांत ज्या जाती आहेत, त्या परमेश्वरानें निर्माण केलेल्या आहेत, अशी जी भावना हिंदुलोकांमध्यें आहे, तशा प्रकारची भावना इतर धर्मांतील समाजांत असलेल्या वर्गभेदाबद्दल नाहीं. ही भावना म्हणजे हिंदु-धर्माचें व हिंदुसमाजाचें वैशिष्ट्य होय. हें वैशिष्ट्य जगांतील कोणत्याहि समाजाचें नाहीं. हिंदुलोकांची अशी भावना होण्याचें कारण म्हणजे वेद श्रुति, स्मृति, गीता, पुराणें वगैरे हिंदुधर्मग्रंथ व हिंदु-जीवनाचें तत्त्वज्ञान यांची तशी शिकवण आहे, हें होय.

हिंदुसमाजांत अस्पृश्य-वर्ग कोणी, कसा, कां व कधीं उत्पन्न केला, याबद्दल ठाम मत कोणालाहि देतां येणार नाहीं. कारण, या बाबतींत स्पष्ट व ठासीव असे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहींत. अस्पृश्य समाजावर अस्पृश्यता लादण्यांत अस्पृश्यतेला

हिंदुधर्मांतील अनेक ग्रंथांनीं पाठिंबा दिला, यामुळें अस्पृश्यतेचा उगम व त्या उगमाची कारणें शोधण्यासाठीं हिंदुधर्मग्रंथांतील आधार पंडितांना शोधावे लागतात. अस्पृश्यता व अस्पृश्य लोक यांच्यासंबंधीं अनेक धर्मग्रंथांत अनेक प्रकारचें परस्परविरोधी उल्लेख सांपडत गेल्यामुळें निरनिराळ्या पंडितांनीं अस्पृशतेच्या उगमाबद्दल, त्या उगमाच्या कारणांबद्दल व काळाबद्दल निरनिराळे सिद्धांत मांडलेले आहेत. हे सर्व सिद्धांत धार्मिक दृष्टीनें व कांहीं अंशीं ऐतिहासिक दृष्टीनें मांडलेले आहेत. याबाबतींत स्थूलमानानें विचार केला तर आपणांला असें दिसून येतें कीं, वैदिक काळांतील आर्य समाजांतील ब्राह्मण व क्षत्रिय या दोन वर्णांत सत्ताभिलाष आणि अधिकारलोलुपता या भावना जेव्हां जागृत झाल्या व त्यानंतर त्यांच्यांत जे वखेडे उत्पन्न झाले, त्या बखेड्यांमुळेंच आर्यसमाजांत श्रेष्ठ–कनिष्ठ जाती निर्माण करण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली. ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन वर्ग आर्यसमाजांतील आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठीं पिढ्यान्‌पिढ्या लढत राहिले.

( "Another marked tendency in later Vedic period is the rivalry between the Brahamins and the Kshatriya Parjiter, in his Puranic Tradition in Indian History, has brought together a volume of evidence which establishes that the claim of Brahmin superiority was for long resisted by the warrior classes, many of whom were non-Aryans-and the latter day idea of unquetioned Brahmin superiority in caste is the outcome of a large scale of rewriting of books and the use of the systems of education for this purpose. Dr. Sukhatankar, the learned editor of the Mahabharat, in a masterly analysis of the Bhargava Tradition in the Epic, traces this process of the conversion of a Kshatriya tradition-the war in which the Kings of India are arrayed on two sides-into a book of glorifying a Brahimin tribe, As the Epic became the fifth veda and the general encyclopaedia of knowledge for the people, the effect of this transformation on his popular mind became permanent. But essentially all through the earliar Indian literature the conflict of the Kashatriyas and the Brahmins for primacy in the Aryan society can be noticed.:" (A Survey of Indian History P. 17.) )

ब्राह्मण–वर्गाच्या बाजूचे कांहीं क्षत्रिय राजे व त्यांचे अनुयायी हे इतर क्षत्रिय राजाविरुद्ध लढले. ब्राह्मण–वर्गानें आपल्या साथीदार क्षत्रियांच्या साहाय्यानें इतर क्षत्रियांचा पाडाव करून आर्यसमाजांत आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें व त्या श्रेष्ठत्वाला धार्मिक स्वरूप दिलें. या श्रेष्ठत्वाला पोषक असे अनेक धार्मिक विधी व विचार कालांतरानें ब्राह्मण–वर्गानें ग्रंथांत लिहून ठेवले. ते ग्रंथ धार्मिक अतएव वंदनीय मानण्यांत आले. या धार्मिक ग्रंथांत जें विधी, आचार व विचार लिहून ठेवले होते, त्यांपैकींच निरनिराळ्या वर्गाची उत्पत्ति कशी झाली, याची कपोलकल्पित

माहिती देण्यांत आली, हा एक प्रकार होय. चातुर्वर्ण्याची उत्पत्ति ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत दिलेली आहे. (मंडळ १०, ऋचा ९०). ब्राह्मणांचा जन्म ब्रह्मदेवाच्या मुखापासून झाला म्हणून ते समाजांत श्रेष्ठतम होत; क्षत्रियांचा जन्म ब्रह्मदेवाच्या बाहूपासून म्हणून ते ब्राह्मणांच्या खालच्या दर्जाचे होत. वैश्यांचा जन्म ब्रह्मदेवाच्या मांड्यापासून म्हणून ते ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यापेक्षां कमी दर्जाचे; आणि शूद्रांचा ब्रह्मदेवाच्या पायापासून म्हणून ते ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्यापेक्षां नीचतम दर्जाचे होत, असा सिद्धांत ब्राह्मणांनीं तयार करून तो धार्मिक ग्रंथांतर्फे जनतेंत पसरविला. तो सिद्धांत जनतेला मान्य करावा लागला. कारण, हे धार्मिक ग्रंथ म्हणजे पर्यायानें ईश्वरप्रणित ग्रंथ होत, असा प्रचार ब्राह्मण-वर्गानें करून हे धार्मिक ग्रंथ व त्यांतील प्रकार व विचार हे वंदनीय व आचरणीय होत, व त्याविरुद्ध वर्तन करणें हें महत्पाप व दंडनीय कृत्य होय, असा रुढाचार समाजांत चालू झाला. कांहीं ग्रंथ तर अपौरुषेय म्हणजे खुद्द ईश्वरानें लिहिलेले आहेत, असाहि प्रचार ब्राह्मणांनीं केला. आर्य समाजांत प्रस्थापित झालेलें श्रेष्ठत्व व वर्चस्व अभंग रहावें म्हणून ब्राह्मणांनीं आर्यसमाजाची जी रचना केली, तिला चातुर्वर्ण्य हें नांव दिलें. हें चातुर्वर्ण्य खुद्द परमेश्वरानें निर्माण केलेलें आहे, असाहि प्रचार ब्राह्मणांनीं केला. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं" हें वाक्य भगवद्गीतेंत आहे, (अध्याय ४, श्लो. १३). यावरून वरील म्हणण्याला दुजोरा मिळतो. यज्ञयाग करणाऱ्या लोकांचें ऐहिक ऐश्वर्य वाढतें व त्यांना मोक्ष मिळतो. यज्ञयागांत उपस्थित होण्यासाठीं देवांना बोलविणारे मंत्र फक्त ब्राह्मणच जाणतात; म्हणून मंत्राधीन असणारे देव ब्राह्मणाधीन होत, अशी कल्पना लोकांत रुढ करण्यांत आली. यज्ञयागांत बोकड, बैल, गाई, कालवडी यांना मारीत व त्यांचें मांस लोक भक्षण करीत. हें मांस खाण्याचा पहिला मान ब्राह्मणांचा असे. चातुर्वर्ण्याची कल्पना व प्रत्यक्ष कृति हिंदु समाजांत इतकी हाडीमासीं खिळून राहिली म्हणूनच ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व अनेक वर्षांपासून आतांपर्यंत टिकत आलें; कारण ब्राह्मणांना व हिंदु-धर्म-ग्रंथांना पूजनीय मानणारे क्षत्रिय राजे व त्यांची प्रजा, हे ब्राह्मणलोक व त्यांचे ग्रंथ यांना न मानणाऱ्या लोकांना शत्रू समजून त्यांना नेस्तनाबूद करण्यांत कृतकृत्य समजूं लागले. ब्राह्मण लोक व व त्यांचे ग्रंथ यांना न मानणाऱ्या लोकांना शिक्षा करून ब्राह्मण व क्षत्रिय राजे यांनीं त्यांना समाजांत नीचपणाचे दर्जे दिले, त्यांच्यांवर अनेक प्रकारचे निर्बंध लादले. "आपल्या वर्चस्वाविरुद्ध बंडावा करणारांना ब्राह्मणवर्गानें कांहीं काल मुळींच दाद दिली नाहीं. ब्राह्मणवर्गानें कांहीं प्रसंगीं तर आपलें वर्चस्व राखून बंडखोर वर्गाचा व विशेषतः क्षत्रियांचा बीमोड करण्यासाठीं हातीं शस्त्र धरण्यासहि कमी केलें नाहीं. परशुरामानें क्षत्रियांच्याविरुद्ध चालविलेली मोहीम याच लढ्याची दर्शक आहे. पुरोहितवर्गप्रणीत धर्मशास्त्रास धाब्यावर बसवून, "वेन" नांवाच्या राजानें राज्य करण्यास सुरवात करतांच ऋषींनीं त्यास मारून टाकलें व पृथु

नांवाच्या आपल्या हस्तकास त्याच्या गादीवर बसवून त्याच्याकडून ब्राह्मणांस शिक्षा करणार नाहीं आणि वर्णसंकर होऊं देणार नाहीं, असें अभिवचन घेतलें.

पुरोहितवर्गाविरुद्ध वागणाऱ्या वेन राजाला वलिष्ट पुरोहितांनीं (ऋषींनीं) मारून टाकलें. यावरून त्यावेळी पुरोहितवर्गाचें वर्चस्व कोणत्या थराला गेलें होतें याची कल्पना येते...'' (प्राथमिक शिक्षण, पा. १६). आर्यसमाजांतील ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वर्गांतून पुढें ज्या शेकडों जाती निर्माण झाल्या त्यांचा कांहीं अंशी सत्येतिहास वरील प्रकारचा असावा असें वाटतें. खरा इतिहास कांहीं का असेना, एवढी गोष्ट खास कीं, आर्य समाजांत म्हणजे पर्यायानें हिंदुसमाजांत ज्या अनेक जाती निर्माण झाल्या त्यांच्यांवर सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय अशीं जीं बंधनें घातलीं गेलीं तीं ब्राह्मणांनीं लिहिलेल्या धार्मिक ग्रंथांवरून. तीं बंधनें जातीनें पाळावयास लोकांना भाग पाडणारे लोक म्हणजे राजेलोक होत. या प्रकारामुळें प्रत्येक जातीला आपापले सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय हक्क जाग्रतपणें पाळणें हेंच धर्मकृत्य होऊन बसलें. प्रत्येक जातींत श्रेष्ठ जातीबद्दल पूज्यभाव आणि कनिष्ठ जातीबद्दल तुच्छता वाटूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या जातीच्या आचाराप्रमाणें इतर कनिष्ठ जात आचार करूं लागली कीं, पहिली जात दुसऱ्या जातीवर तुटून पडे, राजे लोक पहिल्या जातीला सहाय्य देऊन दुसऱ्या जातीला रसातळाला पोहोचवीत असत, असें जातिजातींत द्वेषभावाचें विषारी बीजारोपण झालें. याचें सर्व श्रेय ब्राह्मण वर्गाला व क्षत्रिय वर्गाला आहे.

"९६ ब्राह्मणें व आरण्यकें यांच्या काळीं तर हा ब्राह्मणवर्गाचा प्रयत्न फारच वाढला. त्यामुळें सामान्य जनतेची हेळसांड झाली. जेथें निरुपाय असें तेथें क्षत्रियांशीं नमतें घ्यावें व वैश्य आणि शूद्र या जातींना दावून टाकावें, असा प्रयत्न ह्या वैदिक वाङ्मयांत सर्वत्र दिसून येतो. ह्यासंबंधीं प्रोफेसर वैजनाथ काशिनाथ राजवाडे ह्यांचा विविधज्ञान विस्तारांतील (नोव्हेंबर १९२७) "ब्राह्मण कालीन जातिभेद" हा लेख मननीय आहे. प्रो. राजवाडे यांचा वैदिक वाङ्मयाचा व्यासंग दांडगा आहे. व त्याचा निःपक्षपातीपणा आणि समतोलपणा सर्वत्र प्रसिद्ध आहे. तेव्हां त्यांच्या लेखांतील कांहीं उतारे येथें देणें योग्य वाटतें. ज्या वाचकांना मूळ लेख वाचणें शक्य असेल त्यांनीं तो अवश्य वाचावा.

९७ प्रो. राजवाडे म्हणतात, "यज्ञक्रिया व पौरोहित्य हीं ब्राह्मणांकडेच रहावीं अशी सारखी खटपट....ज्या राजापाशीं पुरोहित नसेल त्याचें अन्न देव खात नाहींत. तेव्हां यज्ञ करूं इच्छिणाऱ्या राजानें कोण्यातरी ब्राह्मणाला पुरोहित करावें. पुरोहित संपादन केल्यानें स्वर्गास नेणारे अग्निच तो संपादन करतो. सर्व अग्नि तृप्त होऊन त्याला स्वर्गाला नेतात. त्याचें क्षात्रतेज, बल, वीर्य व राष्ट्र वाढतें. पुरोहित नसेल तर हें सर्व नष्ट होतें व त्याला स्वर्गाहून हांकलून लावतात. पुरोहिताच्या

घाणींत, पायांत, कातडींत हृदयांत व आणखी एकेठिकाणीं असें पांच क्रोधाग्नि असतात. या वसा म्हणण्यानें, पाद्यानें, वस्त्रांनीं व अलंकारांनीं, धनानें व राजवाड्यांत ऐषआरामांत राहूं दिल्यानें हे अग्नि शांत होतात (शत. ब्रा. ३।२।४०।१). व त्याच्या राज्याला वळकटी येऊन सर्व त्याच्या ताब्यांत रहातात (६।२।४०-२). (पृष्ठ ४१०-११).

९८ क्षत्रियाला ताब्यांत ठेवण्याकरतां आपण देव आहोंत असेंहि म्हणायाला ब्राह्मण चुकले नाहींत. देव दोन प्रकारचे, एक ज्यांना आपण नेहमीं देव म्हणतो ते. पंडित विद्वान ब्राह्मण हे मनुष्यदेव. आहुतींनीं देवांना खूप केलें पाहिजे. दक्षिणा देऊन मनुष्यदेवांचें समाधान केलें पाहिजे. दोन्ही देव तृप्त होऊन यजमानाला सुस्थितींत ठेवतात. (शत. ब्रा. २।२।२।६). व त्याला स्वर्गाला पोंचवितात (श. ब्रा. ४।३।४।४) [पृष्ठ ४१२].

९९ आपलें वर्चस्व राखण्यासाठीं ब्राह्मणांना अशी खटपट करावी लागली व युक्त्या लढवाव्या लागल्या. ते आपल्याला ओळखून होते. "न वै ब्राह्मणो राज्यायालम्" (शत. ब्रा. ५।१।१।१२). ब्राह्मण राज्य करण्याला अयोग्य. क्षत्रियाशिवाय आपण काय करणार? आपलें वीर्य वाणींत "ब्राह्मणो मुखतोहि वीर्यं करोति मुखतो हि सृष्टः" (ताण्डय. ब्रा, ६।१।६) 'बाहुर्वीर्यो राजन्यो हि सृष्टः" (ताण्डय. ब्रा. ६।१।७). क्षत्रियाच्या दंडांत जोर, तेव्हां त्याच्याशीं एकोप्यानेंच वागलें पाहिजे. याकरितां जेव्हां तेव्हां क्षत्रियांची वढाई गात. "एष वै प्रजापतेः प्रत्यक्षतमी यद्राजन्यतस्मादेकः सन्बहुनामीष्टे यद्वे चतुरक्षरः प्रजापतिश्चतुरक्षरो राजन्यः" (शत. ब्रा. ५।१।५।१४), राजा हा प्रत्यक्ष प्रजापति; म्हणून एक असून पुष्कळांवर राज्य करतो; प्रजापतीच्या नांवांत चार अक्षरें, राजन्य ह्या नांवांतहि चार, ऐन्द्राभिषेकानें राजा प्रत्यक्ष इंद्र होतो. "क्षत्रं वा इंद्राः" (शत. ब्रा. ४।३।३।७). ह्याला साम्राज्य मिळालें, स्वराज्य मिळालें, वैराज्य मिळालें, हा खुद्द परमेष्ठी झाला; खरा क्षत्रिय झाला; सगळ्या विश्वाचा अधिपति, पुरंदर, असुरांना मारणारा ब्राह्मणप्रतिपालक, धर्मरक्षक जन्माला आला, अशा अभिषेकानंतर आरोळ्या ठोकीत (ऐ. ब्रा. ३८-१) [पृष्ठ ४१२].

१०० जेथें अशा प्रकारचें परस्परावलंबित्व, अशा प्रकारचें सख्य, डोकें व बाहु, बुद्धि व शौर्य ह्यांची जोडी, तेथें इतर जातींचें काय चालणार? वैश्याला यज्ञयागादि विधि करण्याचा अधिकार होता तरी ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्यांशीं टक्कर द्यावयाची त्यांची प्राज्ञा नव्हती. पुरुषसूक्तांत वैश्य मांड्यांपासून झाला असें म्हटलें आहे. (ऋ. सं. १०।९०।१२). पण तांड्य ब्राह्मणांत (६।१।१०) ह्याहीपेक्षां कमाल केली आहे. तो प्रजननापासून झाला असें तेथें म्हटलें आहे. ह्यामुळेंच त्याचे जवळ पुष्कळ जनावरें असतात. ब्राह्मणांचा व क्षत्रियांचा तो भक्ष. कारण ब्राह्मण मुखांतून व क्षत्रिय ऊर व दंड ह्यांतून जन्मल्यावर ह्याहूनहि खालच्या भागांतून तो जन्मला, त्याला कितीहि खाल्लें तरी तो कमी व्हायचाच नाहीं (ऐ. ब्रा. ३८।१),

१०१ वैश्य हा गाढव, नेहमीं लादलेला. ब्रह्म व क्षत्र दोघे वैश्यावर अवलंबून, त्याच्यावांचून गत्यंतर नाहीं. तथापि वैश्य नेहमीं दबलेला (श. ब्रा. ११।२।६।१६). वैश्याला जरबेंत कसा ठेवावयाचा हा प्रयत्न (पृष्ठ ४१३).

१०२ जेथें वैश्याची ही दशा तेथें शूद्राला कोण विचारतो! पायांपासून उत्पत्ति. त्याला देवता नाहीं, यज्ञ नाहीं. अग्नि व ब्राह्मण मुखापासून, इंद्र व क्षत्रिय ऊर व बाहु ह्यांपासून, वैश्य व विश्वेदेव प्रजननापासून; पण पायांपासून फक्त शूद्रच; देवता नाहीं, म्हणून शूद्रानें इतर जातींचे पाय धुवावेत (ताण्डव ब्रा. ६।१।१।११), त्याचा भक्ष पाणी. जर पाणी भक्ष म्हणून घेशील तर तुझी प्रजा शूद्रासारखी होईल असें राजाला बजाविलें जाई. नेहमीं इकडून तिकडे हेलपाटे घालावयाला लावावें, हवें त्यानें वाटेल तेव्हां गचांडी देऊन घालवावें, पाहिजे तर ताडन करावें किंवा ठार सुद्धां मारावें (ऐ. ब्रा. ३५।३). त्याला दान देण्याला, विकण्याला कांहीं हरकत नाहीं. 'पशु ह वा एतच्छ्मशानं यच्छूद्रः। तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यम्' (आप. श्रौ.). शूद्र हा चालतें बोलतें श्मशान, त्याला ऐकूं येईल इतकें जवळ अध्ययन करूं नये. जर मुद्दाम होऊन त्यानें श्रुति ऐकली तर त्याचें कानांत लाख किंवा कथिल वितळवून ओतावें (कात्या. श्रौ. व आप. श्रौ.) [पृष्ठ ४१४]" (हिंदी संस्कृति आणि अहिंसा, पा. ४४-४७).

हिंदु समाजांतील चार वर्णांत माणसांना जो जन्म मिळतो तो ज्याच्या त्याच्या मागील कर्मांच्यामुळें, ही दुसरी भावना हिंदु लोकांमध्यें आहे, तिलाहि धर्मग्रंथांचा आधार आहे. माणसांना पूर्वजन्मींच्या चांगल्या कृत्यांमुळें पुढील जन्मांत उच्च योनींत जन्म मिळतो, आणि वाईट कृत्यांमुळें नीच योनींत जन्म मिळतो. पुनर्जन्मवाद आणि कर्मवाद याबद्दलच्या भावना म्हणजे जातिभेदाला कायमच्या टिकवणाऱ्या अजब युक्त्या होत. या भावना हिंदूंच्या हाडीं-मांसीं खिळून गेलेल्या आहेत. त्यांतूनच पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, धार्मिक व सामाजिक हक्क यांबद्दलच्या कल्पना समाजांत रुजविणारे विचार प्रसृत करण्यांत आले. याचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक वर्गांतील लोक धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबींसंबंधीं एका मर्यादित क्षेत्रांत जखडून पडले व ती मर्यादा ओलांडणें म्हणजे धर्मभ्रष्ट होणें, नरकाचें साधन तयार करणें, अशा कल्पना रूढ झाल्या. हिंदु समाजांत विषमतेचें हें जें विष ओतलें गेलें तें कांहीं आपोआप नाहीं. वैदिक काळापासून तो तहत पेशवाईच्या कारकीर्दीनंतर हिंदु समाजांतील चातुर्वर्ण्यामध्यें वर्चस्व प्राप्त करून घेण्यासाठीं ब्राह्मणांनीं जे झगडे केले ते त्याचसाठीं. या झगड्याचें स्वरूप साधारणपणें असे असें कीं, ब्राह्मण जेव्हां इतर क्षत्रियांच्या साहाय्यानें बंडखोर क्षत्रियांना नेस्तनाबूत करीत तेव्हां ते त्या क्षत्रियांना कायमचेच गुलामगिरीच्या गर्तेत डांबून टाकण्यासाठीं धर्मग्रंथांत त्यांच्यांवर कडक बंधनें लिहून ठेवीत. व तीं आपल्या बाजूच्या क्षत्रिय राजांच्या अधिकारांत अंमलांत आणलीं जात. मनुस्मृति व इतर धार्मिक ग्रंथ यांच्यांत ब्राह्मण वर्गाबद्दल सर्व प्रकारचे उच्च अधिकार व इतर

वर्गांसाठीं कमी दर्जाचे अधिकार आणि अस्पृश्य जातींबद्दल तर अत्यंत कडक निर्बंध घातलेले आहेत, ते पाहिल्यानंतर वरील म्हणण्याची सत्यता पटते. निरनिराळ्या जातींचे धार्मिक हक्क आणि त्या जातींच्या उत्पत्तींच्या, श्रेष्ठत्वाच्या व नीचत्वाच्या ज्या कथा पुराणांत घातलेल्या आहेत त्यांवरून तर वरील म्हणण्याच्या सत्यतेला दुजोरा मिळतो. यावरून असेंहि सिद्ध होतें कीं, चार वर्णांच्या व अनेक जातींच्या जन्मकथा ज्या वेदांत किंवा पुराणांत दिलेल्या आहेत त्यांपेक्षां त्या वेगळ्या स्वरुपाच्या असाव्यात. म्हणजे धर्मग्रंथांतील या कथा कपोलकल्पित होत. ब्राह्मण वर्ग व क्षत्रिय वर्ग यांचें या बाबतींतील सहकार्य होण्याचें कारण क्षत्रियांतील राज्यकर्त्या घराण्याला पुराणांतील कथेंत प्रवेश मिळाला. क्षत्रिय राज्यकर्ते जाळपोळ व कत्तल करून राज्यविस्तार करीत व आपल्या नातलगांच्या गाद्या बळकावीत, आपल्या राज्याला स्थैर्य आणण्यासाठीं ते धर्माची कास धरीत, ते यज्ञ करीत, ब्राह्मणभोजनें घालीत, देवांची देवळें बांधीत, उत्सव करीत व देवस्थानांना व ब्राह्मणांना जहागिरी देत. धर्मश्रद्धाळू बहुजन हे प्रकार पाहून राजापुढें व ब्राह्मणांपुढें मस्तक नमवीत व त्यांचें हवें तें म्हणणें निमूटपणें मान्य करीत. ब्राह्मण व क्षत्रिय यांचा हा गारुडी खेळ होता. परंतु हें जाणण्याची बौद्धिक व मानसिक शक्ति त्याकाळच्या बहुजन समाजांतील निरनिराळ्या जातींना कधीं आली नाहीं. त्यांच्यांत ज्या भावना रूढ होत्या त्या अशा कीं, परमेश्वरानें आपला धर्म सांगितलेला आहे, व आपल्या पापकर्मांमुळें आपला जन्म नीच योनींत झालेला आहे. पुढील जन्मीं उच्च जातींत जन्म मिळवावयाचा तर या जन्मांत आपण आपल्या धर्मांप्रमाणें आचरण केलें पाहिजे. म्हणजे ब्राह्मण व राजा सांगेल त्याप्रमाणें आचरण करणें आणि आपल्या वरच्या जातींच्या आज्ञा पाळणें हा त्यांचा धर्म होऊन वसला.

वरच्या स्तंभांत प्रदर्शित केलेले विचार कपोलकल्पित नाहींत. वैदिक व ऐतिहासिक घडामोडींचा अभ्यास करून युरोपियन व हिंदी ग्रंथकारांनीं हिंदुसमाजांतील जातीभेदाबद्दल जे विचार प्रदर्शित केलेले आहेत त्याचा निष्कर्ष वरील स्तंभांत दिलेला आहे. या विद्वान गृहस्थांचीं अशीं मतें दृढ झालेलीं आहेत कीं, मनुष्य ईश्वरानें निर्माण केला ही गोष्ट खरी; पण धर्म हा मनुष्यानें निर्माण केलेला आहे. परमेश्वरानें नाहीं.--

"No religion is born in a day-revealed to a particular prophet, the doctrines and dogmas of each religion crystalise themselves in a process over a whole period of history. It is a period of social transformations- ( Materialism ).

या विचारसरणीप्रमाणें हिंदु धर्मांतील ग्रंथांत सांगितलेल्या जन्मकथा या विवेचक बुद्धीला पटणाऱ्या नाहींत, हें उघड होतें. म्हणजे वेदांतील पुरुषसूक्तांत सांगितलेली मानवनिर्मिति खरी नव्हे.

हिंदी आर्य समाज हा कॉकेशस पर्वताजवळचा प्रदेश, ग्रीस, आसेरिया, इराण, इराक, अफगाणिस्तान, वगैरे प्रदेशांतील रहिवाशी सिथियन, ग्रीक पार्थियन, बॅक्ट्रियन, इराणी, तुर्क, झोरोस्ट्रियन हे फिरत फिरत हिंदुस्थानांत आले व तेथें राहिले. (The Discovery of India, p. 52.) त्या या जमाती वसाहती करतांना परस्परांमध्यें लढल्या व हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशी जे होते, कीं ज्यांना अनार्य म्हणून संबोधित असत, त्यांच्याशीं लढल्या, व वसाहती करून राहिल्या. परस्परांत बेटीव्यवहार करून त्या संमिश्रावस्थेंत राहिल्या. आर्य धर्माचें आचरण जे करूं लागले त्यांचा समाज जरी एक होता, तरी समाजव्यवस्थेसाठीं जे उद्योगधंदे होते ते उद्योगधंदे करणारे लोक पुढें निरनिराळे राहूं लागले. त्यांच्या गटांना निराळेपणा येत गेला व तो पुढें वेगवेगळ्या झगड्यांमुळें कायम होत गेला. जात्याभिमान आणि वर्णाभिमान या दोन पायांवर ज्या अनेक जाती सांप्रत अस्तित्वांत आहेत त्यांतील लोक आपल्या शुद्ध रक्ताबद्दल मनस्वी अभिमान बाळगतात. परंतु वैदिक काळापासून हिंदुसमाजांतील जातींत इतक्या निरनिराळ्या जमातींची रक्तमिसळ झालेली आहे कीं, सांगतां सोय नाहीं. याबद्दलचे खालील उद्गार लक्षांत घ्यावेत:—

"According to well-known ethnologists the population of India is a mixture of Aryans, Dravidians, Mongolians and Scythians." (Castes in India, Indian Antqiuery, p. 81.)

"—Ethnologists are of opinion that none of pure race exist anywhere and that there has been a mixture of all race sin all parts of the world. Especially is this the case with the people of India. Mr. D. R. Bhandarkar in his paper on **Foreign Elements in the Hindu Population** has stated that, "There is hardly a class or caste in India which has not a foreign strain in it. There is an admixture of alien blood not only among the worrior classes the Rajputs and the Marathas—but also among the Brahmins who are under the happy delusion that they are free from all foreign elements." Annihilation of Caste, pp. 14-15 ).

"In fact, the growth of the Neo-Aryan Society was preceded both by a considerable intermingling of castes and a wide acceptance of Non-Aryan people into the Aryan fold." (A Survey of Indian History, pp. 16-17.)

"The Discovery of India" या पुस्तकांत (पा. ३५,५२,-५३,५४ आणि १९७) रक्तमिश्रणानें हिंदूसमाज तयार झाला, याबद्दल श्री. जवाहरलाल नेहरूनीं विवेचन केलेलें आहे.

१९७ पानावर त्यांनीं अशी माहिती दिलेली आहे कीं हिंदुस्थानावर ज्या मुसलमानी टोळ्यांनीं धाड घातली व ज्यांचा हिंदूंनीं पराभव केला त्या पराभूतांच्या

तरुण स्त्रिया व मुली यांना जुलाब देऊन शुद्ध केले व त्यांच्याशीं हिंदूंनीं शास्त्रोक्त विवाह केले.

महाराष्ट्रांतील सत्यसंशोधक व उच्च प्रतीच्या समाजशास्त्रज्ञ विदुषी डॉ. इरावती कर्वे यांनीं "मराठी लोकांची संस्कृति" या आपल्या ग्रंथांत या मुद्यासंबंधीं भरपूर माहिती दिलेली आहे. घाऱ्या डोळ्याची माणसें ज्या जातींत ज्यास्त आढळतात त्या जमातींत रक्तमिश्रण ज्यास्त प्रमाणांत झालेले असलें पाहिजे, असा एक सिद्धांत सदर ग्रंथांत मांडण्यांत आलेला आहे. हा सिद्धांत जर प्रत्येक जातीला लागूं केला तर असें आढळून येईल कीं, श्रेष्ठ वर्णाच्या ज्या जाती समजण्यांत येतात त्यांत कनिष्ठ वर्गाच्या म्हणून ज्या जाती समजण्यांत येतात त्यापेक्षां ज्यास्त लोक घाऱ्या डोळ्याचे सांपडतील म्हणजे रक्तशुद्धीच्या भावनेला बळी पडून जे श्रेष्ठ वर्णीय कनिष्ठ वर्णीयांना कमी प्रतीचे व नीच समजतात त्या जातीमध्येंच ज्यास्त रक्त-मिश्रण झालेलें आहे हें मान्य करावें लागतें.

महाराष्ट्रांतील संस्कृती, कला आणि राज्यसत्ता यांची स्थापना, जोपासना, व वाढ ब्राह्मणेत्तर लोकांनीं केलेली आहे. तेव्हां सर्वांपेक्षां आम्ही श्रेष्ठ अशी घमेंड बाळगणाऱ्या ब्राह्मणांनीं आपली कूपमंडूक वृत्ति सोडून द्यावी आणि सर्वांशी समरस होऊन सामाजिक समता स्थापन करावी, अशी सूचना डॉ. इरावती कर्वे यांनीं आपल्या ग्रंथाच्या शेवटीं दिलेली आहे. त्या म्हणतातः-

"मराठी संस्कृतीचें परिशीलन करतांना आपल्याला कळलें असेल कीं, संस्कृतीच्या विभागांत अब्राह्मण समाज पुढारी आहे. संस्कृतीचें रूप ते ठरवतात, व वळणहि ते देतात. त्यांची कुटुंब-पद्धति ब्राह्मण उचलित आहेत. वारकरी सांप्रदाय त्यांनीं स्थापिला; ब्राह्मण मागून आले. त्यांची साहित्यनिर्मिति ब्राह्मणांपेक्षां तसूभरहि कमी दर्जाची नाहीं. लेणीं खोदणारे असामान्य शिल्पकार खासच ब्राह्मण नव्हते. असें असतांना केवळ गेल्या एकदोन शतकांच्या इतिहासामुळें अब्राह्मण समाजाला घाबरून जाण्याचें कारण काय? सध्यांचा वैराग्नि हे मराठ्यांच्या दैन्याचें लक्षण आहे. खरोखर हें दैन्य वाटण्याचें त्यांना कारण नाहीं. मराठ्यांना एकत्र व्हावयाचें ते कोणातरी विरुद्ध लढाई असेल तरच ते एकत्र होतात, ही परिस्थिति बदलली पाहिजे व स्वतःच्या उच्चतेची वाच्यता न करतां व काल्पनिक नीचतेच्या दैन्याचें शल्य मनांत न धरतां नव्यानें समाजाची एकसंघ फळी उभारली पाहिजे. ज्या समाजांतील शेतकरीवर्गाचें सांस्कृतिक कार्य इतकें उज्वल आहे, तिथें ब्राह्मण अब्राह्मण हा भेद न ठेवतां सरसकट रक्ताची सरमिसळ झाली पाहिजे हें ब्राह्मणांनीं उमजलें पाहिजे. आपण एका राष्ट्राचे व एका संस्कृतीचे लोक अशीच भावना बाळगून कुळीचा अभिमान, जातीचा दुराभिमान, स्वयंसिद्धता हीं बाजूला ठेवून सहजीवन व सांस्कृतिक सहकार्य करण्यांस सिद्ध झालों तर अजूनहि महाराष्ट्र

खरोखरच मोठा होईल व आजपर्यंत भारतीय संस्कृतीचें ज्या वैभवानें वर्णन केलें तसेंच पुढेंहि केलें जाईल." (कित्ता, पा. २८९).

रामायण, महाभारत इत्यादि हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांत जे पूजनीय व वंदनीय असे वरेंच स्त्री-पुरुष मानले जातात. रक्तमिश्रणाचे होते, ते स्वपराक्रमानें आपापल्या कार्यक्षेत्रांत थोरपदाला चढले, आणि त्यांच्या बौद्धिक, शारीरिक आणि आत्मिक सामर्थ्यानें ते बहुजन समाजास आदरणीय झाले. त्यांच्या थोरपणावर धार्मिकपणाचा रंग फांसून ब्राह्मणांनीं त्यांचे माहात्म्य धार्मिक ग्रंथांत वर्णन केल्यामुळें त्यांच्या कुळामुळाचा मागोसा घेण्याची कोणालाहि इच्छा राहिली नाहीं. रक्तमिश्रणापासून ज्यांची उत्पत्ति झाली, अशा कांहीं स्त्री पुरुषांची माहिती श्री. पु. रा. लेले यांनीं "ऋषींचें कुळ" या आपल्या लेखांत दिलेली आहे. हा लेख 'धनुर्धारी' साप्ताहिकाच्या १९५० च्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेला होता. ह्या लेखांतील खालील उतारे सदर मुद्यासंबंधीं उद्बोधक आहेतः—

"जुन्या काळांतील सत्यकाम जाबालाची कथा सुपरिचित आहे. जाबाल विद्याभ्यास करूं इच्छित होता आणि तो एका ब्राह्मण गुरूच्या आश्रमांत गेला. त्या गुरूनें त्याच्या बापाचें नांव विचारलें. आईला विचारून सांगतों असें त्यानें उत्तर दिलें. घरीं जाऊन त्यानें आईला विचारलें असता, 'कुणाचें म्हणून मी नांव घेऊं,' असें आईनें सांगितलें. त्यानें दुसरें दिवशीं आईनें सांगितलेलें उत्तर जसेंच्या तसें गुरूजवळ बोलून दाखवलें, तेव्हां गुरु संतुष्ट झाला आणि म्हणाला, 'तूं आणि तुझी आई सत्य बोलत आहांत, त्या अर्थी तूं अवश्य माझ्या आश्रमांत शिकावयास रहा.' आणि त्या दिवसापासून त्याला आश्रमांत 'सत्यकाम', या नांवानें ओळखण्याची गुरुनें आज्ञा दिली. तो पुढें विद्याभ्यासांत अतिशय पारंगत झाला आणि गुरूचा अत्यंत आवडता शिष्य झाला"

"ऋषींचा ऋषी अशी पदवी शुक्राचार्यांना देत असतात. हा शुकमुनि रंभेमुळें सर्वांना परिचित आहे. रंभा नांवाच्या सुंदरीनें त्याला मोह पाडण्याचा प्रयत्न केला, पण तो मोहित झाला नाहीं. तो आजन्म ब्रह्मचारी राहिला. श्रीमद्भागवत हा ग्रंथ शुकानें सांगितलेला आहे. हा शुक कोणाचा मुलगा? व्यास मुनींचा हा मुलगा. वेदांत सूक्तें लिहिणारें हे व्यास मुनी. यांनीं विवाह केल्याचा पत्ता नाहीं. असें असून शुक हा मुलगा त्यांना झाला. दुष्यंतानें गरोदर शकुंतलेचा त्याग केला, रामानें गरोदर सीतेचा त्याग केला, पण व्यास मुनींनी त्या काळच्या ब्राह्मणपणाला अनुसरून आपल्या मुलाला जवळ ठेवला; इतकेंच नव्हे तर, त्याचें शारीरिक आणि बौद्धिक पालनपोषण अतिशय उत्तमरीतीनें केलें. व्यास मुनींनी कोठल्यातरी एका बाईशीं संबंध केला, तिचा पुढें पत्ता नव्हता; असें असूनहि शुकाला मिळालेल्या मान्यतेंत यत्किंचितहि कमीपणा आला नाहीं. बरें, व्यास मुनी तरी कसे जन्माला आले?

त्यांच्या आईचें नांव सत्यवति. ही एका कोळयाची मुलगी. तिच्याबरोबर नावेंत एकांत करण्याची संधि पराशर मुनींना मिळाली, आणि व्यासांची उत्पत्ति झाली. हीच सत्यवति पुढें मत्स्यगंधा नांवानें ओळखली जाऊं लागली. आणि शंतनु राजानें तिच्याशीं लग्न केलें. एका कोळयाच्या मुलीपासून अवैवाहिक संबंधानें पराशर मुनींना व्यास पुत्र झाला. पराशर मुनींनी सत्यवतीला जाऊं दिलें; पण आपल्या पुत्राचें संगोपन करून त्याला तपःश्चर्येचा धडा शिकविला. बरें, असें करण्यामुळें पराशर मुनींना तरी कमीपणा आला कां? मुळींच नाहीं! पराशर हे एक स्मृतिकार म्हणून हिंदु सभाजांत मान्य झालेले आहेत. सत्यवति ऊर्फ मत्स्यगंधा म्हणजे कुमारिका-माता पुढें शंतनु राजाची पत्नी झाली! शंतनुराजापासून तिला विचित्रवीर्य या नांवाचा मुलगा झाला शंतनु मेला. विचित्रवीर्याचें लग्न झालें. एक नव्हे दोन लग्नें झालीं; पण त्या दोघींपैकीं कोणालाहि संतान होणाच्या अगोदरच विचित्रवीर्य मरण पावला. भीष्मानें म्हणजे शंतनूच्या वडील मुलानें (दुसऱ्या पत्नीपासून) विवाह केला नव्हता. इतकेंच नव्हे तर, आजन्म ब्रह्मचारी राहाण्याची त्यानें प्रतिज्ञा केली होती. अशा परिस्थितींत हस्तिनापुरची गादी बेवारशी होईल आणि शंतनु किंवा विचित्रवीर्य यांना हविर्भाग मिळणार नाहीं, या दोनहि आपत्ति टाळण्यासाठीं सत्यवतीनें (मत्स्यगंधेनें) आपल्या पहिल्या पुत्राला म्हणजे व्यास मुनींला बोलावून आणलें आणि त्याच्याकरवीं विचित्रवीर्याच्या दोनहि पत्न्यांना माता बनवल्या. त्या दोघींच्या मुलांचीं नांवें अनुक्रमें धृतराष्ट्र व पंडु अशीं होतीं. कौरव व पांडव यांचे हे दोघे बाप म्हणून प्रसिद्ध आहेत. व्यासमुनींचे हे ज्ञात पुत्र तीन झाले (शुकचार्य, धृतराष्ट्र व पंडु).

"सत्यवतीनें घालून दिलेला धडा तिच्या नातसुनेनें गिरवला. पंडूचें लग्न वसुदेवाची बहीण कुंती इच्याशीं झालें. ही कुंती कुमारी माता होती (कर्णामुळें). लग्न झाल्यावर तिला असें आढळून आलें कीं, पंडूपासून तिला पुत्रप्राप्ति होण्याचा संभव नव्हता, तेव्हां तिनें निरनिराळया पुरुषांपासून अनुक्रमें धर्म, भीम व अर्जुन या तीन पुत्रांची प्राप्ति करून घेतली. तिच्या या कृतीची कोणीहि हेटाळणी केली नाहीं. इतकेंच नव्हे तर, तिच्या मुलांना भगवान् श्रीकृष्णासारख्यानें सहाय्य केलें. धर्मराजाची ख्याति तर सबंध हिंदुस्थानांत गाजली, आणि तो भारतीय सांस्कृतिक इतिहासांत एक विभूति-पुरुष मानला जातो. या कुंतीची भावजय देवकी. श्रीकृष्णाची जन्मदात्री माता. या देवकीच्या आईला एका पुरुषापासून कंस हा पुत्र झाला, तरीसुद्धां तिला देवकीच्या बापानें म्हणजे उग्रतेजानें टाकिली नाहीं. आणि उग्रसेनाच्या या वर्तनामुळें तो कांहीं गादीला नालायक ठरला नाहीं. कंसाचा वध केल्यानंतर श्रीकृष्णानें त्यालाच मथुरेच्या गादीवर बसविलें. गर्गमुनीनें एका वन्य स्त्रीशीं संबंध ठेवून कालयवनाला जन्म दिला, तरीहि गर्गमुनीचें पौरोहित्य श्रीकृष्णाने काढून घेतलें नाहीं. वसिष्ठमुनीनें आपल्या सुनेला पुत्रवती करण्याची

मोहक कामगिरी केली, तरीसुद्धां सूर्यवंशासारख्या पाक रामराज्याचें गुरूपद त्यांच्याकडे कायम राहिलें. या वसिष्ठमुनींनेंच ज्याचें ब्रह्मचर्य मुळींच ढळलें नव्हतें अशा ऋष्यशृंगाला बोलावून दशरथाच्या तीन पट्टराण्यांना पुत्र व्हावे म्हणून पुत्रकोष्टि नांवाचा यज्ञ त्याच्याकडून करविला.

"रामाची जी पुढें पत्नी झाली ती बोलून चालून शेतांतल्या एका पेटींत सांपडली. ती गोरीगोमटी दिसत होती म्हणून ती ज्याला सांपडली त्या शेतकऱ्यानें जनक राजाच्या स्वाधीन केली. आणि जनक राजानें तिचे आईबाप कोण आहेत याचा तपास न करतां आपली मुलगी म्हणून पाळली. यामुळें तिला 'जानकी' हे नांव प्राप्त झालें.

"कुंती कुमारी–मातेचें पवित्र स्थान ठेवणारा कर्ण एका सूतपुत्राला सांपडला. त्यानें त्याचें संगोपन केलें. पुढें धृतराष्ट्राचा मुलगा दुर्योधन थोडासा मोठा झाल्यावर त्यानें त्याला आपला मित्र म्हणून स्वीकारला. हा टाकलेला पोर आहे, याच्या आईबापांचा पत्ता नाहीं, म्हणून त्याची अवहेलना केली नाहीं. आणि दुर्योधन हा कोण होता? कोणी लुंगा-सुंगा माणूस नव्हता. कांहीं काळ कां होईना दुर्योधन हस्तिनापूरचा राजा आणि भरतखंडाचा सम्राट होता."

याशिवाय इतर उदाहरणें आहेत. आर्यांचा पहिला देव इंद्र हा इराककडून हिंदुस्थानांत आला व त्यानें सर्व राजांना जिंकून सिंध व पंजाब येथें साम्राज्य स्थापन केलें. त्याच्या स्तुतीनें ऋग्वेद भरलेला आहे. कारण यज्ञसंस्था इंद्रानें स्थापन केली व ती ब्राह्मणांनीं पुढें चालविली. हा इंद्र एका कुमारीचा मुलगा होता. त्यानें आपल्या बापाला पुढें ठार मारलें. (हिंदी संस्कृति व अहिंसा, पा. २०–२७). विदूर हा मोठा तत्त्ववेत्ता व धर्मनिष्ठ माणूस होता. तो धर्मराजाचा सल्लागार होता. तो दासीपुत्र होता. पांडवांची दुसरी आई माद्री. ही मद्रदेशाचा (मद्रास) राजा शल्य याची बहीण. शल्य हा अनार्य होता. गांधारीला जे १०० पुत्र झाले, त्यांच्या जन्माची कहाणी अशीच चमत्कारिक आहे.

सारांश, जातिभेद हे रक्त-शुद्धीसाठीं, वर्णसंकर टाळण्यासाठीं उत्पन्न केले गेलेत, असा जे कोणी दावा करतात त्यांत तीळभरही सत्यांश नाहीं. कारण, हिंदुसमाजांतील जाती निर्माण होण्याच्या अगोदर रक्तमिश्रण भरपूर प्रमाणांत झालेलें होतें; आणि जाती निर्माण झाल्यानंतरहि रक्त-मिश्रणाचें प्रमाण फार कमी झालेलें नाहीं. एवढेंच नव्हे तर, ज्या ऋषींना हिंदु पूज्य मानतात, आणि ज्या राजवंशांना पवित्र समजतात, ते ऋषी आणि ते राजवंश पवित्र रक्ताचे नाहींत.

पुनर्जन्मवाद, कर्मवाद, दैववाद, मायावाद इत्यादि विचारसरणीमुळें जातिभेदाचे बीज हिंदु समाजांत कायमचें रूजलें; आणि ब्राह्मण-वर्गाचें स्तोम वाढत गेलें. धार्मिक बाबतींतील सर्व हक्क ब्राह्मण-वर्गाच्या हातीं असल्यामुळें धार्मिक विधी व कृत्यें यांच्या बाबतींत ब्राह्मणांची कर्तुमकर्तुम् अशी शक्ति वाढत गेली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि ........
क्रमांक ........ नों. दि ........



आणि होम-हवन, यज्ञ वगैरे धार्मिक विधींचें हिंदु समाजांत स्तोम माजलें. यज्ञ-विधीमध्यें गाय, बैल, बोकड वगैरे पशूंची सर्रास कत्तल होऊं लागली. या मारलेल्या पशूंच्या मांसावर हजारों ब्राह्मण अब्राह्मण यांच्या भोजन-पंक्ती उठत असत. या यज्ञविधीबद्दल, जातिभेदाबद्दल आणि ब्राह्मणांच्या स्वैर सत्तेबद्दल बहुजन समाजांत असंतोष पसरला. या असंतोषाचा स्फोट क्षत्रिय वर्गांतील महावीर व बुद्ध यांनीं केला. या दोघांची चळवळ म्हणजे ब्राह्मणांचें वर्चस्व नष्ट करणारी क्षत्रियांची चळवळ होती. या दोघांनीं हिंदु-धर्मांतील प्रकारांबद्दल जनतेंत जागृति उत्पन्न केली. हिंदु धर्मांतील अनिष्ट चाली रीतींविरूद्ध बंडाचे झेंडे उभारले.

महावीर पार्श्वनाथ आणि बुद्ध हे समकालीन होते. बुद्ध यांचा काळ ६२४ इ. स. पू. ते ५४४ इ. स. पू. बुद्धाच्या जन्माच्या अगोदर १५ वर्षें महावीर हे नव्या धर्माचा उपदेश जनतेंत करूं लागले. तो धर्म जैन-धर्म म्हणून प्रसिद्धीस आला. बुद्धानें आत्मज्ञान आणि धर्मज्ञान यांची संपूर्ण माहिती घेण्याच्या हेतूनें संन्यास घेतला, तेव्हां तो २९ वर्षांचा होता. सात वर्षें खडतर तपःश्चर्या केल्यानंतर त्याला वाराणसी येथें पिंपळाच्या वृक्षाखालीं आत्मज्ञान आणि धर्मज्ञान प्राप्त झालें. तेव्हां तो ३६ वर्षांचा होता. त्यानें नव्या धर्माचा उपदेश प्रथमतः ज्या पांच लोकांना केला, ते एके काळीं त्याचे सहाध्यायी ब्राह्मण संन्याशी होते. हेच बुद्धाचे पहिले पांच शिष्य. बुद्धानें नव्या धर्माचा उपदेश लोकांत ४५ वर्षें केला. तो धर्म बौद्ध धर्म म्हणून प्रसिद्धीस आला. या दोन्ही धर्मांच्या अगोदर आर्य धर्म किंवा वैदिक धर्म चालू होता. या धर्माचा पाया यज्ञयागावर उभारलेला होता. व त्या यज्ञयागांना उचलून धरणारे वैदिक वाङ्मय (वेद, ब्राह्मणे, उपनिषदें, अरण्यकें आणि श्रुति व स्मृति) ब्राह्मणांनीं व क्षत्रियांनीं तयार केलेलें होतें. या यज्ञयागांचा पुढें फार फैलाव झाला. हे यज्ञयाग करणें हे क्षत्रियांचें प्रमुख कर्तव्य होय; व ते कर्तव्य पूर्णपणें बजावलें तर आपलें राज्य, आपला वंश व आपण स्वतः भरभराटीस येऊं, आपण पुण्यवान् होऊं आणि स्वर्गाला पोहोंचूं, या समजुती राजे लोकांत रुढ झाल्या. या यज्ञयागांचे पुरोहितपण ब्राह्मणाकडे. ब्राह्मण यज्ञयागांच्या जोरावर क्षत्रियांना मुठींत ठेवीत क्षत्रियांच्यातर्फे ते बहुजन समाजाला गुलामगिरींत दडपून टाकीत. यज्ञयागांत ब्राम्हण पुरोहित कर्तुमकर्तुम् शक्ति होऊन बसले. त्यामुळें ते समाजांतील प्रमुख पद पटकावून बसलें. व ते पद क्षत्रियांच्यातर्फे टिकविलें. परंतु, या यज्ञयागांचा उपसर्ग शेतकऱ्यांना व बहुजन समाजाला होई. यज्ञांतील बलिदान जें होई तें ब्राह्मण व क्षत्रिय खात व वर सोमपान करीत; इतर जनता नागावली जाई. या परिस्थितीचा संताप महावीर व बुद्ध यांना आला; आणि त्यांनीं यज्ञयागांत जी पशुहत्या होई त्यांवर हल्ला चढविण्यासाठीं अहिंसा तत्त्वाचा उपदेश सुरू केला. यज्ञयागादि वैदिक कृत्यांना उचलून धरणारे जे वैदिक वाङ्मय होतें तें अपौरुषेय आहे, [illegible] जे तें प्रत्यक्ष परमेश्[illegible] [illegible] आहे, असा ब्राह्मणांनीं

जनतेंत प्रचार केलेला होता, तो लबाडीचा व दांभिकपणाचा आहे, असा महावीर व बुद्ध यांनीं उपदेश सुरू केला. महावीर व बुद्ध यांनीं वेदादि वैदिक वाङ्मयाचा अधिकार अमान्य केला; म्हणजे पर्यायानें यज्ञसंस्थेवर प्रहार केला. या दोन धर्मसंस्थापकांनीं दुसरें एक महान् तत्त्व जनतेंत रुजूं केलें. तें म्हणजे, समता व वैदिक धर्मांतील चातुर्वर्ण्यांमुळें हिंदु समाजांत ज्या अनेक जाती उत्पन्न झाल्या होत्या, त्या ब्राह्मणी धर्मानें उत्पन्न केल्या व ब्राह्मणांनीं आपलें श्रेष्ठत्व टिकविण्यासाठीं समाजांत जातिभेद उत्पन्न केले. असा प्रचार करून समाजांतील जातिभेदाविरुद्ध या दोन्ही धर्मसंस्थापकांनीं बंड पुकारलें. अहिंसा, सत्याचरण, सधर्म, समता, इत्यादि थोर तत्त्वांचा उपदेश लोकांना पटूं लागला. ते या नव्या धर्मांत शिरले. या मुद्यावर खालील उतारा चांगला प्रकाश टाकतोः—

"८०. बुद्धकालापूर्वीं यज्ञयागांचे स्तोम फार माजलें होतें, व जनतेला त्याचा अत्यंत तिटकारा होता; परंतु राजे आणि धनाढ्य ब्राह्मण जबरदस्तीनें शेतीचीं जनावरें शेतकऱ्यांकडून आणीत व मोठमोठ्या यज्ञयागांत त्यांचा वध करीत. लोकांना हें कृत्य किती नापसंत होतें हें दाखवण्यासाठीं येथें एक लहानसा सुत्ताचा उतारा देणें रास्त आहे.

"८१. बुद्ध भगवान् श्रावस्ती येथें रहात होता. त्या काळीं पसेनदि कोसल राजाच्या महायज्ञाला सुरवात झाली होती. पांचशे बैल, पांचशे गोहरे, पांचशे कालवडी, पांचशे बकरे, पांचशे मेंढे, यज्ञासाठीं स्तूपांना बांधले होतें. राजाचे दास, दूत आणि कामगार दंडभयानें भयभीत होऊन आंसवें गाळीत रडत रडत यज्ञाची कामें करीत होते. तो प्रकार कांहीं भिक्षूंनीं पाहिला आणि भगवंताला कळविला.

"८२. अशा प्रकारचे अवाढव्य यज्ञ लोकांना किती अप्रिय होत चालले होते, याची आणखीहि बरींच उदाहरणें बौद्ध वाङ्मयांत सांपडतात. या यज्ञाला कंटाळून जे तापसा जंगलांत शिरत असत, ते जर कधीं काळीं गांवांत आले, तरी लोकांना उपदेश करण्याच्या भानगडींत पडत नसत. हा प्रयत्न प्रथमतः पार्श्वानें केला असावा यज्ञयाग हा धर्म नसून चार याम हाच खरा धर्ममार्ग आहे, हें त्यानें जनतेला दाखवून दिले. यज्ञयागाला कंटाळलेली सामान्य जनता या धर्माकडे तावड-तोब वळली. तथापि, राजे व श्रीमंत ब्राह्मण हे आपल्या स्वास्थ्यासाठीं यज्ञयाग करीतच असत. दुसऱ्याहि श्रमणसांप्रदायांनीं निरनिराळ्या मार्गानें या यज्ञयागाच्या धर्मावर हल्ले चढवले. तरी पण, मौर्य कालापर्यंत कोणत्याना कोणत्या रूपानें यज्ञयाग अस्तित्वांत होतेच." ( हिंदी-संस्कृति आणि अहिंसा, पा० ८२-८३ ).

गौतम बुद्धानें हिंदू समाजाची पुनर्रचना करण्याचें ध्येय आपल्या पुढें ठेवलेलें होतें त्यामुळें त्याला समाजांत एकजीवी संस्था स्थापन करण्यासाठीं जातिभेदाविरुद्ध जसें बंड करावें लागलें, तसेंच स्त्रियांच्या गुलामगिरी विरुद्धहि त्याला बंड करावें लागलें. यासंबंधीचे प्रो. धर्मानंद कोसंबीचे खालील उद्गार विचारार्ह आहेतः

"बुद्ध भगवंताला जातिभेद मुळींच माहित नव्हता. सारिपुत्त मोगल्लानादि ब्राह्मण जसे भिक्षुसंघांत होते, तसाच सोपाक नांवाचा चंडाळहि त्यामध्यें होता.

"जातीमुळें कोणी चांडाळ होत नाहीं, किंवा कोणी ब्राह्मण होत नाहीं. कर्मानें चांडाळ होतो, आणि कर्मानेच ब्राह्मण होतो. हें तत्व बुद्धनें भिक्षुसंघास पूर्णपणें लागूं केलें होतें. कांहीं काळपर्यंत भिक्षुणींचा संघ त्यानें स्थापिला नव्हता. परंतु पुढें त्याचीहि त्यानें स्थापना केली. भिक्षुणी संघाला त्या कालच्या परिस्थित्यनुरूप कांहीं कडक नियम बुद्धानें घालून दिले होते.

("हिंदु धर्मामध्यें स्त्रियांना आणि शूद्रांना वेदाधिकार नाहीं. त्यांनीं पुराणांवर आपली तहान भागविली पाहिजे. असा प्रकार कांहीं बौद्ध धर्मामध्यें नाहीं. बौद्ध स्त्रियांना सर्व धर्मग्रंथ वाचण्याची मोकळीक आहे. आजला ब्रह्मदेशांत त्रिपिटक ग्रंथाचें अध्ययन केलेल्या आणि करणाऱ्या पुष्कळ स्त्रिया आहेत." (बुद्ध, धर्म आणि संघ, पान ६७))

बुद्धाची नव्या धर्माची चळवळ ही सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेची चळवळ होती. त्या चळवळींत जरी क्षत्रियांचा व इतर खालच्या जातींतील लोकांचा विशेष भरणा होता तरी चळवळीचीं सूत्रें ब्राह्मण भिक्षूंच्या हातीं होतीं. बुद्धाचे जे आवडते, विश्वासू व कार्यक्षम शिष्य होते त्यांत सारीपुत्त आणि मोग्गल्लान हे सर्वांत प्रमुख होते. ते ब्राह्मण होते. वयाच्या ऐंशीव्या वर्षी बुद्ध धर्मोपदेश करीत फिरत असतां कुसिनारा (जि. गोरखपूर, संयुक्तप्रदेश) या गांवीं गेला व तेथें एका ब्राह्मणाच्या घरचें जेवण घेतल्यानंतर अजीर्ण होऊन आजारी पडला व दिवंगत झाला.

जैन व बौद्ध धर्मांच्या शिकवणुकीनें जातिभेद नष्ट होत चालले व जाति-भेदांच्या खांद्यावर पोसला गेलेला ब्राह्मण वर्ग लोकांच्या नजरेंतून कायमचा उतरला. या पुढील काळांत शिक्षणाची जोराची चळवळ पसरली व जैन मुनींनीं व बौद्ध भिक्षूंनीं सर्व हिंदुस्थानांत शिक्षणदानासाठीं केंद्रें उभारलीं. या केंद्रांत सर्व शास्त्रें, कला व तत्त्वविद्या शिकविण्यांत येत असत. या केंद्रांना विहार, संघ इत्यादि नांवें असत. त्यांत विद्यार्थी व आचार्य एकत्र राहात असत. विद्यार्थ्यांची संख्या ५०० पासून २०००० पर्यंत असे. विहारांतील ग्रंथालयासाठीं ७–८ मजली इमारती असत. "विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यापूर्वीं त्याची कसून परीक्षा घेतली जाई. अर्थात ज्या विद्यार्थ्याचें ज्ञान अधिक, ज्याला आपलें चारित्र्य चांगलें असावें अशी तळमळ, जो शिस्तीचे नियम पाळण्यास तयार, अशाच विद्यार्थ्याला तेथें प्रवेश; मग तेथें गरीब-श्रीमंत, ब्राह्मण-अब्राह्मण हा प्रश्न नसे. मुलांच्या राहण्याखाण्याचा, शिक्षणाचा, औषधपाण्याचा, वस्त्रप्रावरणाचा वगैरे सर्व खर्च विहारांतून होई." (प्राचीन भारतीय विद्यापीठें, पा. ६७)

जैन व बुद्ध धर्म यांना हिंदु धर्माचा संपूर्णपणें नायनाट करतां आला नाहीं. याचें कारण असें की, या दोन्ही धर्मांनीं वेद व ब्राह्मण वर्ग यांना जरी झुगारून दिलें तरी ते धर्म हिंदु धर्मापेक्षां अगदीं वेगळे धर्म नव्हते; तर ते हिंदु धर्माचेच अंश होते. कारण मानवी विकासाला उत्तेजक अशीं जीं तत्त्वें हिंदु धर्मांत होतीं त्या तत्त्वांच्या पायावरच जैन व बौद्ध धर्माची उभारणी केलेली होती. या दोन धर्मांचा प्रसार व प्रकाश एक हजार वर्षे टिकला. हिंदुधर्माच्या चालीरीती व जातिभेदाची विचारसरणी यांनीं जैन धर्मानुयायांमध्यें प्रवेश केला व कांहीं काळ लोटल्यानंतर जैनामध्येंहि हिंदूंचा जातिभेद कायमचा रुतला. तीच गोष्ट बौद्ध धर्माची. बुद्ध नंतर एक हजार वर्षे बौद्ध धर्म भरभराटीस आला. याचें सारें श्रेय भिक्षुसंघाना दिलें पाहिजे. हे बुद्ध भिक्षू गिरीकंदरांत खोदलेल्या विहारांत राहात व आसपास १५-२० मैलांच्या टापूंतील जनतेंत बुद्ध धर्माची ज्योत तेवत ठेवीत. परंतु या भिक्षुपंथांतील लोकांत बुद्ध धर्माच्या तत्त्वासंबंधीं पुढें मतभेद उत्पन्न झाले. हे पक्षभेद हीनयान व महायान या नांवानें ओळखले जाऊं लागले. हीनयान पक्षाचे भिक्षू हे कट्टर बौद्ध होते, महायान बौद्ध हे कालगतिप्रमाणें बौद्ध धर्मांत बदल घडविणारे व व्यवहारी नफ्याकडे पहाणारे बौद्ध होते. त्यांनीं हिंदूधर्माच्या कल्पना उचलल्या, बुद्धावर संस्कृत व पाली भाषेत काल्पनिक पुराणें रचलीं व बुद्धाला देवाचा अवतार बनवून त्याच्या मूर्तीची पूजा सर्रासपणें सुरू केली. हीनयान व महायान या दोन्ही पक्षांच्या वादविवादांच्या लोकसभांचा शेवट रक्तपातांत होऊं लागला. हे दोन्ही पक्ष परस्परांचे वैरी झाले. महायान पक्षांतील लोकांनीं संघांत जातीभेद घुसविला. या पक्षाचा सर्व झोकनोक हिंदुधर्माच्या चालीरीतींकडे पडल्यामुळें हिंदुलोक व राजे या पक्षाला जवळ करूं लागले. यामुळें खऱ्या बौद्ध धर्माचें सत्य स्वरूप बाजूला पडलें व बौद्ध धर्माची अवस्था विफल झाली.

महावीर व गौतमबुद्ध यांच्या शिष्यपरंपरेंत पुढें पुढें सत्ताभिलाषा व चैन यांचा शिरकाव झाल्यामुळें ते शिष्य आपापली सत्ता टिकविण्यासाठीं आणि आपापली संपत्ति सुरक्षित ठेवण्यासाठीं आणि वाढविण्यासाठीं राजे लोकांचा आश्रय घेऊं लागले. त्या राजांना संतुष्ट करण्यासाठीं ते लोक हवे ते अतर्क्य धर्माचार रूढ करूं लागले. "११८ जैन व बौद्ध साधूंनीं विहार व मंदिरें यांच्या रूपानें परिग्रहाला सुरवात केल्यानंतर अशा असत्य गोष्टी रचून राजांना संतुष्ट ठेवण्याचा धंदा चालविला. पण या गोष्टीवर भरंवसा ठेवून, दावले गेलेले आरामिक किंवा भिक्षूंचे सेवक चूप राहीनात; तेव्हां राजाकडून त्यांची हिंसा करणें प्राप्त झालें. म्हणजे अपरिग्रह, सत्य आणि अहिंसा या तिन्हीहि यामांचा भंग झाला. राहतां राहिला अस्तेय याम. राजानें दाबून टाकल्यावर जो आरामिकांकडून किंवा इतर प्रजेकडून विहाराना आणि मंदिरांना कर मिळे त्याला अस्तेय कसें म्हणता येईल? लोकांकडून जबरदस्तीनें हिरावून घेतलेली ती संपत्ति होय; खुषीनें दिलेलें तें दान नव्हे.

" ११९. ब्राह्मण राजांच्या सहाय्यानें शेतकऱ्यांकडून जबरदस्तीनें जनावरें आणून यज्ञयागांत त्यांचा वध करीत असत; व त्याचमुळें सामान्य जनता श्रमण-संस्कृतीकडे वळली. परंतु जेव्हां तेच श्रमण संघासमांच्या आणि मंदिरांच्या रूपानें श्रीमंत बनले, व राजाश्रय घेऊन सामान्य जनतेकडून संघारामासाठीं कर वसूल करूं लागले, तेव्हां लोकांना ते अप्रिय झाले ह्यांत नवल कोणते? केवळ यज्ञयागांत पशुहत्या करणें हीच काय ती हिंसा, पण अशा रीतीनें लोकांकडून जबरदस्तीनें कर वसूल करणें ही हिंसा नव्हे, अशी त्या श्रमणांची ठाम समजूत झाली असावी! अशा रीतीनें श्रमणसंस्कृति निर्जीव होत गेली, व तिच्या जागीं उज्वल अशी संस्कृति उपस्थित न झाल्यामुळें पौराणिक संस्कृतीला वाव मिळाला, व ती उदयाला आली."
( हिंदी संस्कृति आणि अहिंसा, पा. ९९ )

जैन व बौद्ध धर्मांतील पुढाऱ्यांच्या दुराचारामुळें पुढें या धर्मांत वैदिक धर्मांतील ग्रंथाप्रमाणें ग्रंथरचना झाली, आणि जातीभेदाचें भूत शिरलें. या धर्मांचा ऱ्हास झाल्यामुळें आणि त्यांचें पूर्वीचें उज्वल स्थान उत्पन्न करण्याचें सामर्थ्य इतर कोणत्या धर्मांत नसल्यामुळें वैदिक वा ब्राह्मणी धर्माला वर डोकें काढावयास वाव मिळाला, ब्राह्मणी धर्माला राजाश्रय मिळत गेला व मग ब्राह्मणांच्या चिथावणीवरून जैन व बौद्ध धर्मानुयायांच्या कत्तली करण्यांत आल्या. वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन करण्याची पहिली चळवळ करणारा गृहस्थ ब्राह्मण होता. त्याचें नांव विष्णु ऊर्फ चाणक्य ऊर्फ कौटिल्य. यानें नंद घराण्याचा सूड घेऊन त्यांचा वंश खच्ची केला; आणि त्याच घराण्यांतील दासीपुत्र चंद्रगुप्त मौर्य याला गादीवर बसविलें व तो स्वतः प्रधान झाला. ( इ. स. पू. चवथें शतक ). या चळवळीचा यशस्वी शेवट श्री. शंकराचार्य यांनीं केला. चाणक्यानें मौर्य राज्याचा पाया घातला व मौर्य राजांच्या सहायानें त्यानें बुद्ध धर्माच्या अनुयायांची शिकार करण्यास सुरवात केली. तेव्हां बरेच बुद्ध पुनः हिंदु धर्मांत परत आले.

शंकराचार्य सहाव्या शतकांत होऊन गेले. मलबार प्रांतांतील कालंदी नांवाच्या गांवांत त्यांचा जन्म झाला. ते जातीनें नंबुद्री ब्राह्मण होते. दश ग्रंथ व षड्शास्त्रें यांचा अभ्यास त्यांनीं लहानपणांतच केला. संन्यास घेतल्यानंतर त्यांनीं वेदप्रणीत हिंदुधर्माचें पुनरुत्थापन करण्यासाठीं हिंदुस्थानांत पायीं प्रवास केला. बुद्ध धर्माचा पाडाव करण्यासाठीं आणि हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं त्यांनीं देशभर दौरे काढले व धार्मिक विषयांवरील वादविवादांत भिक्षू पंडितांचा पाडाव करून आपल्या अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यांत बहुतेक सर्व हिंदुस्थानांत हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें. या धर्माची ज्योत एकसारखी तेवत रहावी म्हणून बुद्ध धर्मांतील भिक्षुसंघाचा नमुना पुढें ठेवून शंकराचार्यांनीं हिंदुस्थानांतील शृंगेरी (म्हैसूरीजवळ), पुरी (मद्रास), द्वारका (काठियावाड), आणि बद्रीनाथ (हिमालय), या चार ठिकाणीं मठ स्थापन केले. ते केदारनाथ ( हिमालय ) येथें वयाच्या ३२ व्या वर्षीं मरण पावले.

या मठांना राजाश्रय मिळाले. या मठातर्फे संन्यासी-लोक बुद्धाचा पाडाव करून हिंदुधर्माची पुनर्स्थापना करूं लागले.

हिंदु धर्माच्या पुनर्स्थापनेच्या धुमश्चक्रींत ज्या कांहीं घडामोडी सामाजिक रचनेंत व रीतिरिवाजांत झाल्या त्यापैकीं एका घडामोडीचा उल्लेख करण्यासारखा आहे. मांसाहार करावयास मिळावा आणि तोहि मोफत म्हणून ब्राह्मण अब्राह्मण यजमानांकडून यज्ञांत पशूंचा वध करवितात, व तो यज्ञविधींचा प्रकार बंद पडला तर आपल्या पोटावर पाय पडेल, ही भीति ब्राह्मणांना वाटते, म्हणून ब्राह्मण लोक यज्ञविधी बंद करण्यास तयार होत नाहींत, अशा प्रकारचा एक मुद्दा भिक्षु वादविवादांत मांडीत असत. यज्ञांतील पशुवध व त्या पशूंचें मांस भक्षण करणें, या आपल्या कृतींकडे बहुजन तिरस्कारानें पाहातात, हीं ब्राह्मणांना जाणीव होतीच. शंकराचार्यांचा वादविवादांत प्रचंड जय झाला आणि त्यांनीं जेव्हां हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचा संदेश जाहीर केला, तेव्हां हिंदुस्थानातील सर्व ठिकाणच्या ब्राह्मणांनीं यज्ञांत पशूंना बळी न देण्याचा व मांसाहार सोडण्याचा निर्धार जाहीर केला व तो निर्धार त्यांनीं अंमलांत आणला.

शंकराचार्यांनीं जो हिंदु धर्म पुनः चालू केला त्यांतील प्रमुख अंगें म्हणजे चातुर्वर्ण्य, जातिभेद व ब्राह्मणांचें वर्चस्व, हीं होत. हीं अंगें अबाधितपणें रहावींत म्हणून ब्राह्मणांनीं पूर्वी ज्या स्मृति लिहिलेल्या होत्या, त्यांत आणखी कांहीं स्मृति लिहून भर घातली. या स्मृति म्हणजे निरनिराळ्या जातींनीं कसें रहावें, काय खावें, कोठें रहावें, कोणता उद्योगधंदा करावा, वगैरे बाबी-संबधीं निर्बंध घालणारी धार्मिक पुस्तकें होत. या धार्मिक पुस्तकांना राजाश्रय मिळाला व त्यांतील निर्बंध हे राजकीय व धार्मिक स्वरूपाचे कायदे होऊन बसले. या निर्बंधा-मुळेंच ब्राह्मण जातीची पकड इतर जातींवर कायमची बसली. तीच गोष्ट इतर जातींचीहि झाली. म्हणजे क्षत्रिय स्वतःला वैश्य, शूद्र, व अस्पृश्य लोकांपेक्षां श्रेष्ठ समजूं लागले, व त्याबरोबरच ब्राह्मणापेक्षां आपण नीच होत, हें मान्य करूं लागले. तसाच प्रकार वैश्य शूद्रांचा. अस्पृश्य लोकातील जातींतहि हीच भावना फैलावली व दृढ झाली.

हिंदु धर्मांतील चातुर्वर्ण्य, जातिभेद, पुनर्जन्मवाद, कर्मवाद, दैववाद, तंत्रमंत्र इत्यादि आचारविचारांमुळें हिंदु समाज खिळखिळा झाला. शूद्र व अस्पृश्य गणले गेलेल्या लोकांना पशुतुल्य जीवन कंठावें लागूं लागलें. या परिस्थितीविरुद्ध आणखी तीन बंडें झालीं. पहिलें बंडें साधुसंतांचें, दुसरें बसव यांचें आणि तिसरें चक्रधर यांचें.

ज्ञान, भक्ति आणि कर्म या त्रयींमुळें मोक्षप्राप्ती करून घेतां येते, असें आध्यात्मज्ञानी मानतात. या त्रयींकीं ज्ञान व कर्म यांना प्राधान्य देऊन शंकरा-चार्यांनें जी विचारसरणी रूढ केली तीमुळें ब्राह्मण हे सर्वांत श्रेष्ठ, कारण तेच ज्ञानी

व कर्मयोगी होत, असा समज दृढावला. यामुळें पुढील काळांत ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व व इतरांचें हीनत्व यांना ऊत आला. हिंदु समाजांतील जातिभेद मुळें आणि जातिनिष्ठ असमान वागणुकीमुळें ब्राह्मणादि वरिष्ठ जाती सत्तांधपणानें वागूं लागल्या व शूद्रादि कनिष्ठ जाती गुलामी व लाचार वृत्तीनें वागूं लागल्या. या जातिभेदाविरुद्ध पाहिलें बंड उभारलें तें हिंदु समाजांतील साधुसंतांनीं. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग हे ब्राह्मणांच्या हातांतील निर्वाणीचे बाण होते. ते त्यांच्या हातून हिसकावून घेऊन ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाला शह द्यावा असा साधुसंतांनीं विचार ठरविला. हिंदु धर्माचे ग्रंथ संस्कृतांत होते. त्यांतील खरें ज्ञान ब्राह्मणांनीं आपल्या मुठींत ठेवलेलें होत, तें ज्ञान बहुजन समाजाला व्हावें, म्हणून ते ग्रंथ मातृभाषेंत लिहिले जावेत, असा साधुसंतानीं प्रथम निग्रह केला व तो कर्मठ व जीर्णमतवादी शास्त्रीपंडितांच्या विरोधांना न जुमानतां पार पाडला. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यापेक्षां भक्तिमार्ग हा श्रेष्ठ अशी शिकवण त्यांनीं सुरू केली. परमेश्वर हा सर्वांचा एकच निर्माता होय व सर्व चराचर हीं त्याचीं मुलें होत, म्हणून सर्व स्त्री-पुरुष परस्परांचे बहिणी भाऊ होत. कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ नाहीं, ही दुसरी शिकवण त्यांनीं प्रसृत केली.

या साधुसंतांचा पंथ भागवत किंवा वैष्णव पंथ म्हणून प्रसिद्धीला आला. भक्ति व समानता हा त्या पंथाचा मंत्र. तो मंत्र सफल करावयाचा तर शंकराचार्यांची विचारप्रणाली खोडून काढली पाहिजे, असें ज्या भागवतांना वाटलें त्यांत रामानुजाचार्य ( शके ९३८ ) आणि मध्वाचार्य ( शके ११११-११९८ ) हे पहिले होत. या दोघांच्या विचारसरणींचें लोण वल्लभाचार्य ( शके १४०१-१४५३ ) यांनीं पुढें नेले. भागवत धर्माची चळवळ पुढील काळांत बहुजन समाजांत पसरली. त्याचें श्रेय पुढील काळांतील साधुसंतांना आहे. त्यांतील प्रमुख साधुसंत रामानंद ( १४ वे शतक ), चैतन्य ( इ. स. १४८५-१५३३ ), कबीर ( १५ वें शतक ), चोखामेळा, नामदेव, एकनाथ ( १५३२-९९ इ. स. ), तुळसीदास ( १५३३-१६२४ ), गोरा कुंभार, सेना न्हावी, रविदास चांभार, नरसी मेहता, मीराबाई, नानक ( १४६९-१५३९ इ. स. ), तुकाराम हे होत. त्यांनीं भागवत पंथाची भगवी पताका भारत देशाच्या निरनिराळ्या प्रदेशांत नाचविली. संतांनीं मानवातील विषमतविरुद्ध म्हणजेच जातिभेदाविरुद्ध जोराचें बंड उभारलें व तें भक्तिमार्गातील सर्व आध्यात्मिक उपायांनी लढविलें. परंतु जातीजातींतील भेद मुळासकट नष्ट करण्याचें यश त्याना लाभलें नाहीं. याचें कारण हिंदु धर्मातील पुनर्जन्म, मायावाद, अवतार, कर्मवाद, इत्यादि शिकवणूकीची जनतेवर पडलेली छाप. ही छाप साधुसंतांच्याहि मनावर बसलेली होती. व तीमुळें ते जातीभेद नष्ट करण्याच्या कार्यांत यशस्वी झाले नाहींत.

विज्जल हा बाराव्या शतकांत होऊन गेला. तो कर्नाटकचा राजा होता. त्याचा प्रधान बसव. बसव जातीनें ब्राह्मण होता. त्यावेळीं कर्नाटकांत हिंदुधर्म व जैनधर्म

यांचें प्राबल्य होतें. बिज्जल राजा हा जैनधर्मी होता. बसव शूर, धोरणी, पण भक्तिप्रधान माणूस होता. हिंदु धर्मांतील व जैन धर्मांतील त्यावेळचे रूढाचार पाहून तो दुःखी झाला. या दोन्ही धर्मांत त्याला हेंच दिसलें कीं, बहुजन समाजाची दैन्यावस्था आणि पुरोहित वर्गाची चंगळ ! श्री बसव यांनीं वेद, वेदांगें, श्रुति, स्मृती, पुराणें, ह्यावर प्रचंड हल्ले चढविले. त्याचप्रमाणें त्यानें ब्राह्मणी वर्चस्व, जातीभेद आणि पूजा अर्चा व इतर धार्मिक विधी यांच्याविरुद्ध बंड उभारलें व नवीन धर्माची–लिंगायत–स्थापना केली. श्री बसवाच्या लिंगायत धर्मांत बहुजन समाजाचे व ब्राह्मण समाजाचेहि लोक आले. (The Lingayat Movement, pp. 20.)

बसव यांना जातिभेदांचा लहानपणापासून तिरस्कार होता. जातिभेदांचे थोतांड नष्ट करण्याकरितां त्यांनीं लहानपणापासून कार्य हातीं घेतलें. "बसवेश्वरांचें चरित्र इ. स. १३६९ च्या सुमारास रचिलेल्या 'बसवपुराण' नामक ग्रंथांत गुंफिलें असून त्याच्या तिसऱ्या भागांत असा वृत्तांत दिला आहे कीं, बसव हा ब्राह्मण पुत्र असल्यामुळें त्याचा मुंजीचा बेत ठरला. त्यावेळीं 'मी ब्राह्मण नाहीं' असें म्हणून त्याने मुंज करण्याचें साफ नाकारलें !" (विचार समीक्षा, पा. ५३). जातिभेदांचें थोतांड नष्ट करण्यासाठीं बसवेश्वरांनीं आमरण चळवळ केली व कष्ट केले. परंतु जातिभेदाची कल्पना समाजांतून नष्ट करण्यांत त्यांना यश आलें नाहीं. याचें कारण हें कीं, हिंदुधर्मांतील अवतार, पूर्वजन्म, कर्मवाद, मोक्ष, नरकयातना, मायावाद, इत्यादि शिकवणींची लोकांच्या मनावर पडलेली कायमची छाप ! कालांतरानें बसवेश्वराच्या अनुयायांनीं लिंगायत धर्मांतहि जातिभेदांचें रोप रुजूं दिलें आणि लिंगायतांमध्यें जातिभेदांचें जाळें कायमचें पसरलें गेलें.

जातीभेदाविरुद्ध उभें केलेलें तिसरें बंड चक्रधराचें. चक्रधर महानुभावी पंथाचा संस्थापक व प्रवर्तक. "गुजराथेंतील भडोचच्या मल्लदेव राजाचा विशाळदेव नामक सामवेदी लाड ब्राह्मण होता, त्याचा चक्रधर हा मुलगा. हरपाळदेव हें त्याचें मूळ नांव" (विचार-समीक्षा, पा. २२). त्यांचा जन्म भडोच येथें शके १११६ (इ. स. ११९४) मध्यें झाला. ते शके ११४५ (इ. स. १२२३) मध्यें महाराष्ट्रांत आले. महाराष्ट्र हाच प्रदेश आपल्या कार्याला योग्य आहे असे ठरवून त्यांनीं महाराष्ट्रांत महानुभाव पंथ स्थापन केला व वाढविला. ते गुजराती असूनहि त्यांनीं आपला उपदेश मराठींतून दिला (इ. स. ११८१–इ. स. १२६७). ते शके ११९६ (इ. स. १२७४) सालांत दिवंगत झाले. ते ज्ञानदेवाच्या अगोदर ७१ वर्षे जन्मले. व २१ वर्षे अगोदर दिवंगत झाले. त्यांच्या हयातींत एकहि महानुभावी पंथ ग्रंथ लिहिला गेला नाहीं. परंतु त्यांनीं वेळोवेळीं जो उपदेश केला त्यांतील सूत्रमय वचनें पुढें त्यांच्या शिष्यांनीं एकत्र करून एक ग्रंथी तयार केला. त्याला सूत्रपाठ हें नांव दिलें, तो महानुभावांचा वेद. "जातिभेदाचा

उच्छेद करा, असें सूत्रपाठांत स्पष्ट म्हटलें नसलें, तरी पण 'चातुरिवर्णीचरित भीक्षा या शास्त्रास आनुसारिजें' (आ. ८१) हें सूत्र जातिभेदाला निःसंशय (चातुर्वर्ण्यं चरेद्भक्ष्यम्) प्रतिकूल आहे. मात्र चक्रधराच्या शिष्यांत संन्यास दीक्षा घेतलेले पूर्वाश्रमीचे ब्राह्मण पुष्कळ होते. त्यांनासुद्धां सर्वच शिष्यांना 'तुम्ही चारहि वर्णांच्या हातचें भिक्षान्न ग्रहण करा–' असें चक्रधर सांगतो, तेव्हां तो अन्न व्यवहारापुरता तरी जातीभेद मानीत नव्हता, हें उघड आहे. शंकराचार्यानें ब्राह्मणाखेरीज इतरांना संन्यास दीक्षेचा अधिकार ठेवला नव्हता; पण हें तत्त्व स्वतः चक्रधरानें कधींच धाब्यावर बसविलें नसतें, तर त्याच्या पश्चात् त्याच्या प्रत्येक शब्दाला वेदवाक्य मानणाऱ्या महानुभावपंथीय आचार्यांनीं कोणताहि वर्ण वा जात न पाहतां वाटेल त्याला आपल्या गोटांत घेऊन त्याला संन्यास देण्याचा जो धुमधडाका चालविला होता, तो त्यांनीं तसा चालविला असता काय? यावरूनहि चक्रधर जातिभेदाचा पुरस्कर्ता नव्हता, असेंच अनुमान निघतें. जनरूढीविरुद्ध एकजात सर्वांनाच संन्यास दीक्षेची मोकळीक ठेवावयाची, आणि वर 'तुम्ही चारहि वर्णांच्या हातचें भिक्षान्न ग्रहण करीत जा' असा उपदेश करावयाचा हा जातिभेदावर उघड उघड हल्ला होता. मुख्यतः या हल्ल्यामुळेंच नामदेवापासून महानुभाव पंथावर कोरडे ओढण्याची सनातनी वर्गांत प्रवृत्ति उत्पन्न झाली." (विचारसमीक्षा)

श्री. देशपांडे यांच्या मतें चक्रधर वेदादि हिंदु धर्मग्रंथांना मानीत असे. डॉ. वि. भी. कोलते यांनीं ज्ञानदेव व चक्रधर यांच्यासंबंधीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ५३ व्या वार्षिकोत्सवांत दागळे हॉलमध्यें ता. २३ व २४ नोव्हेंबर १९५० रोजीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांत त्यांनीं स्पष्ट मत प्रदर्शित केलेलें आहे कीं, चक्रधर वेदादि ग्रंथ मानीत असत. आणि जातिभेदांचे ते कट्टर वैरी होते. वेदांत ईश्वरस्वरूपाचें ज्ञान नाहीं व ईश्वरप्राप्तीसाठीं वेदांचा कांहीं उपयोग नाहीं, असें चक्रधर मानीत असत. वेदादि धर्मग्रंथ व जातीभेद यांवर चक्रधरानें प्रखर टीका केली. त्यांची चळवळ व शिकवण ही ब्राह्मणेतरांतील बहुजन समाजांत जोरानें फैलावली व त्यामुळें वेदादि हिंदुधर्मग्रंथ व जातिभेदादि अनिष्ठ रूढि यांच्याबद्दल बहुजन समाजांत अनास्था उत्पन्न झाली. जनतेंत पसरलेली ही अनास्था पाहून ज्ञानदेवानें हिंदुधर्माच्या प्रचाराचें कार्य हातीं घेतलें व त्या प्रचाराला अनुरूप असे ग्रंथ लिहिले. भावार्थ दीपिका हा ग्रंथ लिहून ज्ञानदेवानें चक्रधराच्या विचारप्रणालीचें खंडन केलें व हिंदुधर्मातील वेद, वेदांगें, पुनर्जन्म, अवतार, कर्मवाद, मायावाद, चातुर्वर्ण्य, जातिभेद इत्यादि भावनांबद्दल जनतेंत पुनः निष्ठा जागृत केली.

ज्ञानदेवांच्या धार्मिक चळवळीला हिंदु राजांचा सक्रीय पाठिंबा मिळाला, महानुभावी पंथातील लोकांनीं हिंदूंच्या अमानुष छळांना तोंड दिलें. पण त्यांचें जातिभेद नष्ट करण्याचें कार्य सफळ झालें नाहीं.

मानवी जीवनाच्या प्रगतीला मारक अशा हिंदुधर्माच्या भावना व धर्मग्रंथ यांची जनतेवर जी पकड बसलेली होती तिच्या विरुद्ध अनेक संतांनीं व धर्मसंस्थापकांनीं बंडें उभारलीं तरी ती पकड त्यांना कां सोडवतां आली नाहीं याची संक्षिप्त माहिती देणें जरूर वाटतें.

भागवत धर्माच्या चळवळींतील साधुसंतांनीं ब्राह्मणी हिंदु धर्माची स्तुति गावयाला सुरवात केली. वेदप्रामाण्य, ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व, ब्राह्मणेतरांचें हीनत्व, माया, पुनर्जन्म इत्यादि कल्पना याचा त्यांनीं उदो उदो केला. परमेश्वर एक, सर्व मानवप्राणी एक वगैरे समतेच्या कल्पना जरी ते चळवळींत प्रसृत करीत असत तरी ते चातुर्वर्ण्याला धक्का न लागूं देतां समाजसमता प्रस्थापित करण्यास उद्युक्त झाले होते. कथाकीर्तनांत, अभंगांत, भारूडांत साधुसंत समतेच्या कल्पना सांगतात; पण प्रत्यक्ष आचरणांत तो ब्राह्मण म्हणून श्रेष्ठ व तो महार म्हणून अस्पृश्य अशी त्याची वागण्याची रीत होती. एवढेंच नव्हे तर एकादा ब्राह्मणेतर साधु वा संत भक्तिमार्गांत शिरोमणि जरी ठरला तरी तो अब्राह्मण जातीचा म्हणूनच त्याला वागविण्यांत येई. चोखामेळा, रविदास, नंद, तिरूमल्लुवर, इत्यादि अस्पृश्य संतांचीं चरित्रें याच कथांनीं भरलेलीं आहेत. परमेश्वर हा सर्व मानवांचा बाप, सर्व मानव हीं त्याचीं मुलें, सर्व मानव हे परस्पराचे बहिणभाऊ अशी उदात्त शिकवण आपल्या अभंगांतून देणारे संत आपल्या अभंगांत असेंहि मान्य करीत कीं, ब्राह्मण श्रेष्ठ व वंदनीय असेच मानले पाहिजेत; आणि ब्राह्मणेतर कितीहि थोर झाला तरी त्याला ब्राह्मणानें समानतेनें वागवूं नये, अशी रामदासांची शिकवण होती. ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतराला आपले गुरू करूं नये असा अलिखित नियम होता व तो सर्व संत पाळीत असत. ब्राह्मणांनीं अब्राह्मण गुरु केला तर त्यांत कांहीं वावगें नाहीं, असा रामदासांचा अभिप्राय होता, असें प्रा. फाटक यांचें मत आहे (श्री समर्थचरित्र, पा. २००–२०१)

आपल्या यौगिक बळानें ज्ञानेश्वरानें रेड्याकडून वेद वदविले, असें समजण्यांत येतें. समतेचें निशाण उभारणाऱ्या या संताला यौगिक बळानें अस्पृश्य समाजावरील हीनतेचा छाप का दूर करतां आला नाहीं? आपल्या भक्तिबळानें ज्या साधुसंतांनीं मेलेले लोक जिवंत केले, देवांचीं देवळें फिरविलीं व देवाला एका ताटांत जेवावयास लावलें असें समजण्यात येतें, त्या साधुसंतांना अस्पृश्यांची अस्पृश्यता दूर कां करतां आली नाहीं? हिंदु धर्मांतील साधुसंतांना जातिभेद नष्ट करण्याचें कार्य यशस्वी करतां आलें नाहीं, याचें प्रमुख कारण हें कीं ते स्वतःच चातुर्वर्ण्य निर्मितीच्या रूढ कल्पनेला बळी पडलेले होते. चातुर्वर्ण्य हा परमेश्वरानें निर्माण केलेला आहे व तो यावच्चंद्रदिवाकरौ तसाच अबाधित रहाणार, अशी त्यांची भावना होती. मायावाद, पुनर्जन्मवाद, कर्मवाद इत्यादि हिंदु धर्मांतील रूढ कल्पनासंबंधींहि त्यांचा पुरा विश्वास होता, आणि चातुर्वर्ण्य हें जातिभेदाचें मूलस्थान व त्याला उचलून धरणाऱ्या रूढ कल्पना या त्याचे आधार. तेव्हां जातिभेदाविरुद्ध संतांचें जें बंड होतें तो चातुर्वर्ण्याला व रूढ कल्पनांना

धक्का न लावतां जातिभेद नष्ट करण्याचा चुकलेला मार्ग होता. चातुर्वर्ण्य व रूढ कल्पना अस्तित्वांत राहतील तोंपर्यंत जातिभेद अस्तित्वांत राहतील, ही विचारसरणी संतांना सुचली नाहीं वा मान्य झाली नाहीं. म्हणून त्यांचें बंड अयशस्वी झालें.

ब्राह्मण जातीच्या स्वार्थांधपणामुळें हिंदु समाजांत जाती उत्पन्न झाल्या व या जातिभेदामुळें हिंदु समाज दुर्बळ व गुलामी वृत्तीचा बनला, अशीं अनेक पंडितांचीं दृढ मतें झालेलीं आहेत. हिंदु समाजांतील जातिभेदाची कीड जेव्हां समूळ नष्ट होईल तेव्हांच हिंदु समाज पुरुषार्थी होईल, असें मत प्रतिपादन करण्यासाठीं बॅ. एस्. सी. मुकर्जी यानीं " The Decline and Fall of the Hindus " ( हिंदूंचा ऱ्हास व अधःपात ) हा निबंध १९१९ सालीं प्रसिद्ध केलेला होता. आद्य शंकराचार्य व त्यांच्या पुढील काळांतील ब्राह्मण लोक यांनीं हिंदु समाजावर आपली गुलामगिरी लादण्यासाठीं काय काय खोट्यानाट्या गोष्टी केल्या, यावर या निबंधांत संशोधक प्रकाश टाकलेला आहे :

" To the priestly Brahmans must be ascribed the downfall and decay of the Hindus as a nation. Politically, socially, morally, and spiritually, we have become effete. We have ceased to think, to analyse and compare. Our own system and method have poisoned our blood, blinded our eye-sight, so that today we cannot see the real world nor judge as to how the other civilized races regard us. " ( pp 26-27 )

बॅ. मुकर्जी यांनीं याच पुस्तकांत असें मत प्रदर्शित केलेलें आहे कीं, ज्या बौद्ध धर्मीय लोकांनीं शंकराचार्यांचा हिंदु धर्म स्वीकारण्याचें नाकारलें व हिंदुधर्मप्रसाराला कसून विरोध केला त्यांचा व त्यांच्या पुढाऱ्यांचा क्षत्रिय राजाकरवीं शिरच्छेद करण्यांत आला व त्यांच्या अनुयायांना कडक नियंत्रणाखालीं गांवाबाहेर रहावयास भाग पडलें. आजचे अस्पृश्य लोक हे या लोकांचेच वंशज होत. हीं नियंत्रणें स्मृतींच्या नांवानें धार्मिक झालीं. या पुस्तकाची प्रस्तावना सर प्रफुल्लचंद्र रे या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाची आहे. जातिभेद हा हिंदु समाजाला बिलगलेला प्राणघातक रोग आहे, तो दूर केल्याशिवाय आणि अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट केल्याशिवाय आपण हिंदु लोक राजकीय स्वातंत्र्याला नैतिक दृष्टीनें लायक होत नाहीं, असें विचार त्यांनीं प्रस्तावनेंत प्रदर्शित केलले आहेत.

प्रो. धर्मानंद कोसंबी यांनीं " हिंदी संस्कृति आणि अहिंसा " या ग्रंथांत वरील मुद्यासंबंधीं भरपूर व साधार माहिती दिलेली आहे. त्यांतील कांहीं भाग विचारार्ह आहेत. प्रो. कोसंबी लिहितात :

" १८४. शकांचें राज्य मोडकळीस आल्यावर पहिल्या चंद्रगुप्त राजानें गुप्त साम्राज्याची मोठी इमारत उठवली. हे गुप्त राजे वासुदेवाचे भक्त होते. वासुदेव त्यांचा

कुलदेव होता......तथापि महादेवाच्या किंवा लिंगाच्या पूजेला त्यांनीं मुळींच विरोध केला नाहीं. त्यामुळें ती पूजा तशीच चालू राहिली; आणि तिच्या मागोमाग वासुदेवाचीहि पूजा सुरू झाली. कोणत्या देवाची पूजा करावी व कोणत्या देवाची करूं नये, हा विधिनिषेध ब्राह्मणांनीं निखालस सोडून दिला. कोणताहि कां देव होईना, त्याच्या पूजेनें जर ब्राह्मणांना दक्षिणा मिळत असली, तर त्या दैवतांचें स्तोम माजवण्यास ब्राह्मण जणूं काय एका पायावर उभे असत, आणि ह्या गुप्त कालांत त्यांनीं अनेक दैवतांचीं व तीर्थांची महती वाढवण्यासाठीं वाटेल तेवढीं पुराणें रचलीं.

"१८५. अदैवं दैवतं कुर्युर्दैवतं चाप्यदैवतम्। यमिच्छेयुः स राजास्याद्योनेष्टः स पराभवेत्॥ (ब्राह्मण अदैवताला दैवत आणि दैवताला अदैवत बनवतील; पाहिजे त्याला राजा करतील; जो नको असेल त्याचा पराभव होईल.) कांहीं वीस वर्षांपूर्वी जेव्हां हा श्लोक श्री. चिं. वि. वैद्य यांच्या संक्षिप्त महाभारतांत माझ्या वाचनांत आला, तेव्हां मला वाटलें कीं, बौद्ध आणि जैन श्रमणांच्या रागानें ब्राह्मणांनीं लिंगाला देव बनवलें. पण आतां बऱ्याच विचारांअंतीं दिसून येतें कीं, शकांच्या स्वाऱ्यांनंतर काय किंवा पूर्वी काय, ब्राह्मणांच्या अंगीं हें सामर्थ्य मुळींच नव्हतें.

"२८३. रामानंदी व वारकरी पंथांनीं सौजन्य आणि बंधुभाव यांच्या प्रचारासाठीं पुष्कळ प्रयत्न केला खरा, तरी आमच्यांतील संप्रदाय व जातिभेद कमी झाले नाहींत. त्यांना आळा घालण्यासाठीं अकबर बादशानें थोडासा प्रयत्न केला. आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धांत (इ. स. १५८० नंतर) त्यानें एक दीन-इ-इलाही (ईश्वरीय संप्रदाय) नांवाचा पंथ स्थापन केला. ईश्वराच्या अस्तित्वाचें साक्षात् चिन्ह म्हणून सूर्योपासना करावी, परन्तु कोणत्याहि रीतीनें सांप्रदयिकता राहूं देऊं नये; असे या नवीन पंथाचें धोरण होतें. अकबराच्या दरबारांतील हाताच्या बोटांवर मोजण्या इतक्या अधिकाऱ्यांशिवय इतर लोकांचें या पंथाला पाठबळ मिळालें नाहीं. कारण उघडच आहे. ह्या पंथांत पूजाअर्चेचा भाग नसल्यामुळें ब्राह्मणांची वरणी लागणें शक्य नव्हतें, व कुराणाला महत्त्व दिलें गेलें नसल्यामुळें मौलवी-मौलानांतहि त्या पासून फायदा नव्हता.

"२८४. ह्याच काळीं ब्राह्मणाचें पूर्वसंस्कार अल्लोपनिषदाच्या रूपानें पुढें आले. ह्या उपनिषदाचा कर्ता कोण व त्याला संस्कृत भाषा कितपत अवगत होती, हें सांगतां येत नाहीं. तथापि त्याच्या ह्या उपनिषदाचें ऐतिहासिक महत्त्व बरेंच असल्याकारणानें तें समग्र येथें देत आहों.

अथऽल्लोपनिषदं व्याख्यास्यामः।
अस्माल्लां इल्ले मित्रावरुणा दिव्यानि धत्ते॥

इल्लले वरुणो राजा पुनर्ददुः ।
हया मित्रो इल्लां इल्लल्लेति ॥
इल्लाल्लां वरुण मित्रस्तेजस्कामः ॥ १ ॥
होतारमिन्द्रो होतारमिन्द्रो महासुरिन्द्राः ।
अल्लो ज्येष्ठं श्रेष्ठं परमं पूर्णं ब्रह्माणं अल्लाम् ॥ २ ॥
अल्लो रसूलमहामदरकबरस्य अल्लो अल्लाम् ॥ ३ ॥
आदल्लाबूकमेककम् ।
अल्लाबूकंनिखातकम् ॥ ४ ॥
अल्लो यज्ञेन हुतहुत्वः ।
अल्ला सूर्यचंद्रसर्वनक्षत्राः ॥ ५ ॥
अल्ला ऋषीणां सर्वदिव्यां इन्द्राय पूर्वं माया परममन्तरिक्षाः ॥ ६ ॥
अल्लः पृथिव्या अन्तरिक्षं विश्वरुपम् ॥ ७ ॥
इल्लां कबर इल्लां कबर इल्लां इल्लल्लेति इल्लल्लाः ॥ ८ ॥
ओम् अल्ला इल्लल्ला अनादि स्वरूपाय अथर्वणीशाखां हुं ह्रीं
जनान् पशून् सिद्धान् जलचरान् अदृष्टं कुरु कुरु फट् ॥९॥
असुरसंहारिणीं हुं ह्रीं अल्लो रसूलमहमदरकबरस्य
अल्लो अल्लाम इल्लल्लेति इल्लल्लः ॥ १० ॥

॥ इत्यल्लोपनिषत् समाप्ता ॥

" २८५. हें उपनिषद अथर्व वेदाच्या उपनिषदांपैकीं आहे असें म्हणतात. ह्यांत बरेचसे अरबी शब्द मिसळले असल्यामुळें त्याचा अर्थ काय हें बरोबर सांगता येत नाहीं. हा मजकूर जसा थोडा आहे तसा त्याचा जीवनकालही थोडाच होता, असें वाटतें. अकबराच्या काळीं किंवा त्यानंतर ह्या उपनिषदावर भाष्य करावें असें कोण-त्याही पंडिताच्या मनांत आलें नाहीं. म्हणजे हें उपनिषद उत्पन्न झाल्याबरोबरच थोडक्याच काळांत विलयाला गेलें असावें. तरी त्याचें शरीर अद्यापिहि अस्तित्वांत आहे, व त्यावरून ब्राह्मणी संस्कारांची दिशा चांगली ओळखतां येते.

२८६. इंद्रानें सिंध देश काबीज केल्याबरोबर ब्राह्मणांनीं इतर देवांच्याहि वर त्याला चढवून आपलें अस्तित्व कायम ठेवलें. त्यानंतर शक आले. त्यांच्या महादेवाला वेदाचा आधार देऊन व श्वेताश्वर उपनिषद् रचून त्यांनीं आपला पुजारीपणाचा धंदा कायम ठेवला. गुप्त राजांच्या वेळीं महाभारताची वृद्धि करून व भगवद्गीता

रचून त्यांनीं आणखी एक नवीन दैवत आपलेसें करून घेतलें. परंतु मुसलमानांच्या कारकीर्दींत त्यांना कोठेंच ठाव मिळेना. इतक्यांत अकबरासारखा उदारमनस्क राजा त्यांना सांपडला. त्यावेळीं त्यांचे पूर्वसंस्कार पुन्हा उभे राहिले; व अल्लाला मिसळून हें नवीन उपनिषद् त्यांनीं तयार केलें. पण या लहानशा उपनिषदाला सगळें कुराण व अठरा पुराणें आपल्या ताब्यांत आणतां येणें शक्य नव्हतें. अर्थांत तें जशाच्या तसें पडून राहिलें." (पा. २३९-४२)

# प्रकरण १२ वें

## सिंहावलोकन ( चालू )

हिंदु समाजांत ज्ञातिभेद उत्पन्न झाल्यामुळें जातीजातींत तीव्र द्वेषाचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळें हिंदु समाज खिळखिळा झाला. त्यांत खरें धर्मप्रेम, राष्ट्रप्रेम व बंधुप्रेम राहिलें नाहीं. हिंदु परकीयांच्या आघातांना यामुळेंच संघटितपणें तोंड देऊं शकले नाहींत. ही गोष्ट मुसलमान, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज यांनीं जेव्हां हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या तेव्हां प्रकर्षानें आढळून आली.

"The Moslem invaders enjoyed two notable advantages. They were fanatically united against Hindus whom they loathed as worshippers of idols, and they made converts among the native population. The very opposite of Hinduism, Islam with its doctrine that all Believers are brothers could not fail to attract multitudes of low castes and outcastes who by conversion to Islam might rise to the status of the conquerors. This is the chief reason why the Mahomedans of India to-day number nearly 78,000,000, well over 1/5th of the population; these Indian Moslims are descended not solely from Afgan, Turkish and Persian invaders, but far more from millions of Hindu converts, who embraced Islam at one time or another." (Lothrop Stoddard: Lasting Tides of Colour, pp. 285-286)

"This has checked the development of India into a nation." (Religion of Veda.)

मुसलमानांनीं हिंदुस्थानांत बहामनी, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही, मोंगलशाही हीं राज्यें स्थापन करण्याच्या अगोदर अरब लोक हिंदुस्थानांत व्यापारासाठीं येत व परत जात. पण अरबांनीं इस्लामी धर्माची दीक्षा घेतल्यानंतर ते हिंदु-

स्थानांत व्यापाराबरोबर धर्मप्रसाद करूं लागले. इ. स. ६३७ ते १५६८ पर्यंत पैगंबराचे मित्र सहकारी आणि अनुयायी महाराष्ट्रांत धर्मप्रसारासाठीं आले आणि त्यांनीं ठाणें, नाशिक, दौलताबाद इत्यादिंच्या परिसरांत कित्येक हिंदूंना इस्लामी धर्माची दीक्षा दिली. (एकनाथ चरित्र, पा. ४४-४५). दिल्लीचे बादशहा व निजामशाही, आदिलशाही, इत्यादि राजवटींतील सुलतानांनीं धर्मप्रसाराच्या कार्याला सढळ हातभार लावला; १४ शतकापर्यंत महाराष्ट्रांत हजारों मुसलमानी धर्मप्रचारक कार्य करूं लागले. हिंदु धर्मांतील अमानुष अत्याचारांना कंटाळून गेलेल्या कित्येक अस्पृश्यांनीं इस्लाम धर्म स्वीकारला. वरिष्ठ म्हणविणाऱ्या हिंदूंनींहि आपा-पल्या ऐहिक स्वार्थासाठीं मुसलमानी राजांच्या पदरीं नोकऱ्या पत्करल्या व कांहींनीं धर्महि स्वीकारला. हे हिंदु लोक एका सुलतानाच्या नोकरींत असले तर त्या सुलतानाच्या शत्रुमुलुखांतील हिंदूंबरहि शस्त्रें चालवून पराक्रम करीत व सुलतानांकडून जहागिरी, सरदारकी व इतर किताब मिळवून स्वतःच्या घराण्याची सरकार-दरबारीं प्रतिष्ठा वाढवीत. एकाद्या सुलतानाशीं बेबनाव झाला तर हे हिंदु दुसऱ्या सुलतानाच्या पदरीं नोकरीस राहात.

हिंदुराज्यें जिंकण्यांत मुसलमानांनीं जसा सवर्ण हिंदूंचा उपयोग करून घेतला तसाच अस्पृश्यांना आपल्या लष्करांत प्रवेश करून देऊन त्यांचाही उपयोग केला. अस्पृश्य वर्ग हा सर्व बाजूंनीं नाडलेला व नागावलेला वर्ग असल्यामुळें मुसलमानांनीं हा वर्ग आपल्या हातीं सहजासहजीं घेतला असेल, त्यांतील कित्येकांना मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन आपल्या गोटांत उच्च स्थान दिलें असेल; हिंदु राज्यें व हिंदु देवळें जमीन दोस्त करण्याचा व हिंदूंची सर्रास कत्तल करण्याचा मुसलमानांनीं जो सपाटा चालविला होता, त्यांत आघाडीवर हे धर्मांतरित अस्पृश्य लोकच असतील, याबद्दल शंका नाहीं. कारण हिंदु लोक, हिंदुधर्म व व हिंदु शास्त्रें यांनीं आपणांला मातीमोल करून टाकलें; तेव्हां त्याचा वचपा मुसलमानी धर्मांत राहून काढण्याची त्यांना संधी मिळाली तिचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला असावा. एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन मुसलमान हिंदु लोकांवर तुटून पडत; त्यांत जास्त संख्या धर्मांतरित अस्पृश्य लोकांचीच असावी. आणि मूळ मुसलमानांपेक्षां धर्मांतरित मुसलमानांचीच हिंदूंवर जबरदस्त दहशत बसली असावी. बंगाल प्रांतांत अशी जबरदस्त दहशत बसविणारा काळा पहाड (सुभेदार) हा मुळचा अस्पृश्य होता. त्यानें तेथें एवढा दरारा बसविला होता कीं, हिंदु स्त्रिया आपल्या मुलांना पाळण्यांत झोपविण्याचा प्रयत्न करतांना झोप लवकर, नाहीं तर काळा पहाड येऊन घेऊन जाईल तुला, अशी मुलांना भीति दाखवीत असत.

ज्या हिंदूंनीं आपलीं राज्यें स्थापण्यासाठीं व त्यांचा विस्तार करण्यासाठीं प्रत्यक्ष साहाय्य केलें त्यांना मुसलमानी राज्यकर्त्यांनीं कोणाला सरदार केलें, कोणाला सुभेदार केलें, तर कोणाला जहागीरदार, इनामदार केलें. हिंदु लोक मुसलमानांची

सेवा चाकरी टिकविण्यांत गर्क होऊन गेले. विजापूरच्या बादशहास शहाजी राजे यांनीं एक पत्र लिहिलें होतें. त्याचा उल्लेख Shivaji Souvenir या पुस्तकाच्या ११६ पानावर केलेला आहे. त्या काळच्या वरिष्ट दर्जाच्या हिंदूंची अशा प्रकारची मनोभूमिका होती, हें या पत्रावरून दिसतें. त्या पत्रांत शहाजीराजे यांनीं लिहिलें होतें कीं,......'आम्ही आज पावेतों चार पातशाहीत नोकरी केली. परंतु गैर· हिसाबी भलतेंच नुकसान सोसून बेअब्रूनें व गैरमेहेरबानगीनें पूर्वीं नोकरी केली नाहीं व पुढेंहि करणार नाहीं...पूर्वी थोरले हजरत साहेबांचे मेहेरबानगीस आम्हीं पात्र झालों व हजरत साहेबही आज पावेतों मेहेरबानगीच राखीत आले इत उप्पर आम्हांस ज्यास्त पराक्रमाचे मामले संपादण्याची होस बिलकुल राहिली नाहीं.एकाद्या हिंदूच्या तीर्थात राहून परमेश्वराची सेवा करून हजरत साहेबांस दुवा देत राहूं. आमचे भाईबंद आहेत त्यांपासून आपण सेवा घेतली पाहिजे. (आजकालचा महाराष्ट्र, पा. २२) मुसलमानी राज्यकर्ते हे आपले धनी, आपण त्यांचे चाकर; मुसलमानी राज्यपद्धत संस्कृति व विद्या श्रेष्ठ, वगैरे भावनांची पकड सवर्ण हिंदूंच्या मनावर बसली व मुसलमानांच्या सहवासानें हिंदूंना मुसलमानांबद्दल आपलेपणा व अभिमान वाटूं लागला. म्हणून कांहीं हिंदु व रजपूत राजघराण्यांनीं मुसलमानी संस्कृतीचा स्वीकार केला व आपल्या मुली व बहिणी मुसलमानी राज्यकर्त्यांच्या व सरदारांच्या घराण्यांत देऊन मुसलमानांशीं आपलीं नातीं जुळवून आणलीं. मुसलमानी कारकार्दीचा हिंदु समाजावर काय परिणाम झाला याचा सारांश खालील उल्लेखांत आढळून येतो. :

"मुसलमान सुलतानांनीं हिंदु स्त्रियांशीं लग्नें लावलीं. विजापूरचा पहिला बादशाह युसूफ अदिलशहा याची बायको मुकुंद नामक ब्राह्मणाची बहीण होती. अहमदनगरचा निजामशहा हा वऱ्हाडांतील तिमाप्पा बहिरव नामक कुळकर्ण्याचा मुलगा होता. वऱ्हाडच्या इमामशाहीचा संस्थापकहि मुसलमानी धर्म स्वीकारलेला हिंदु होता. स्त्रीपुरुष वाटून मुसलमान झाल्यावर राजाराणी म्हणून दिमखानें मिरवूं लागल्यावरहि त्यांचा मूळच्या हिंदु घराण्याशीं जिव्हाळयाचा संबंध कायम राहिल्यामुळें मुसलमानी आचार व मुसलमानी विचार हिंदु समाजांत तरंगत तरंगत मिसळले आणि हिंदूंतलि मातबर लोकांनीं मुसलमान बादशहांच्या पदरीं हुद्यांचीं कामें पत्करल्यामुळें तर मुसलमानी आचार, मुसलमानी म्हणजेच इस्लामी संस्कृति महाराष्ट्रीयांच्या गांवागांवांतून व घराघरांतून घुसली.

कंबरसेन नांवाचा ब्राह्मण मुत्सद्दी इ. स. १५०८-१५५३ पर्यंत निजामशाहींत मुख्य प्रधान होता...मुरारदेव हा ब्राह्मण मुत्सद्दी आदिलशाहींत २५ वर्षें मुख्य प्रधानकीचें काम पहात होता. गोवळकोंडा येथील कुतुबशाहींत मुरारराव मदनपंत, जगदेवराव, रामराव, कदमराव, इत्यादि मोटमोठे महाराष्ट्रीय सरदार असून त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें कुतुबशाही अंमलास बळकटी आणिली.

" शहाजी, सरीफजी, फिरंगाजी, बाजी, सुलतानजी, हीं नांवें मुसलमानी होत.

" महाराष्ट्र इतका अविंधाक्रांत झाला कीं, सामान्य हिंदूच्याच काय पण ब्राह्मणांच्याहि घरांत दत्तात्र्येयाच्या पादुकापाशीं पिराची स्थापना होऊन पिरापुढें आरत्या-धुपारत्या करण्यांत अखिल हिंदु लोक पारमार्थिक कल्याण मानूं लागले.... " ( पेशवेकालीन महाराष्ट्र, पा. १२-१३ )

दिल्लीचा सुलतान फिरोझशहा याची आई आणि घियासउद्दीन तघलक याची आई या हिंदु स्त्रिया होत्या. अकबरानें रजपूत व हिंदु स्त्रियांशीं लग्नें लावलेलीं होतीं. त्याचा मुलगा जहांगीर हा अकबराच्या रजपूत पत्नीचा मुलगा होता. जहांगीरनेंहि हिंदु व रजपूत स्त्रियांशीं विवाह लावलेले होते. त्याचा मुलगा शहाजहान हा जहांगीरच्या रजपूत पत्नीचा मुलगा होता. औरंगझेबाची आईहि रजपूत होती.

मुसलमान राज्यकर्ते हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर लढवय्ये शिपाई आणले होते. शेतकरी आणले नव्हते. तेव्हां त्यांच्या सैन्यांना उदरंभरणासाठीं व घोड्यांना, हत्तींना व इतर गुराढोरांना जी सामुग्री लागे ती त्यांना हिंदू शेतकऱ्यांकडून घ्यावी लागे. हिंदू शेतकरी आपल्या काबूंत जाम जखडून ठेवले तर ही सामुग्री आपणांला हवी तेव्हां व हवी तितकी मिळेल असें मुसलमानांना वाटलें. त्यावेळीं सवर्ण हिंदू हे अवर्ण हिंदू व हिंदु शेतकरी यांचे पुढारी होते. त्यांना मुसलमानांनीं हातीं धरलें. मुसलमान हे लष्करी व मुलकी खात्यांतील उच्च पदांवर रहात व कनिष्ट पदांवर सवर्ण हिंदूंना ठेवीत. त्यांच्यातर्फे मुसलमान सर्व हिंदूंवर व शेतकऱ्यांवर अधिकार गाजवीत. हिंदू शेतकरी वर्ग अशा रीतीनें दडपला गेलेला असल्यामुळें तो निःसत्त्व व निःशक्त झालेला होता. तो वर्ग हिंदू व मुसलमान कनिष्ठ अधिकाऱ्याचें भक्ष्यस्थान होऊन बसलेला होता. त्याच्या लाचारी, हीन व दीन वृत्तीला तर सीमा राहिलेली नव्हती. कर व जमीन महसूल गोळा करण्यास एकादा अधिकारी गांवांत आला व त्याला एकाद्या शेतकऱ्यांच्या तोंडांत थुंकण्याची लहर लागली तर तो त्या शेतकऱ्याला आपलें तोंड उघडायास दरडावून सांगे. शेतकरी तोंड उघडे. अधिकारी त्यांत थुंके ! (A Survey of Indian History, p. 159)

मुसलमानी राज्य स्थापण्यास मुसलमानांनीं-अस्पृश्यांचा प्रामुख्यानें उपयोग करून घेतला; परंतु हिंदु लोकांना मुसलमानांनीं सरदारकी, जहागिरी व इनामदारी देऊन त्यांना उच्चपदीं चढविलें तसें मुसलमानांनीं अस्पृश्यांना सरदार जहागिरदार व इनामदार करून उच्चपदीं चढविलें नाहीं. आपल्या राज्याचा व धर्माचा विस्तार करण्यास जे अस्पृश्य लोक कारणीभूत झाले त्यांना उच्च पदीं चढवून मुसलमानांनीं अस्पृश्यांना उपकाराची परतफेड कां केली नाहीं? याचें कारण अस्पृश्यता. मुसलमानांना हिंदूंवर राज्य करावयाचें होतें. हिंदु अस्पृश्यांना अस्पृश्य व हीन समजतात; तेव्हां अस्पृश्यांना सरदार, जहागिरदार, इनामदार सुभेदार इत्यादि उच्चपदीं चढविलें तर हिंदु लोकांत असंतोष माजेल व मुसलमानाच्या कारकीर्दीविरुद्ध हिंदु लोक

बंडाळी करतील; हिंदु लोक राजकीय गुलामगिरी निमूटपणें सहन करतात पण धर्माच्या बाबतींत खालच्या जातीचा वरचढपणा सहन करणार नाहींत, हें वर्म मुसलमानी राज्यकर्त्यांनीं हेरलें होतें. म्हणून त्यांनीं अस्पृश्यांना उच्च पदीं चढवून त्यांच्या उपकाराची परतफेड केली नाहीं. यामुळें मुसलमानी अमदानींत अस्पृश्यांची कोणत्याही बाबतींत उन्नति झाली नाहीं. जे अस्पृश्य मुसलमान झाले ते मुसलमान समाजांत मिसळून गेले. कित्येक सरदार झाले. मुसलमानांनीं धर्माचा स्वीकार केलेला एक अस्पृश्य तर खुद्द तख्ताधीश सुलतान झाला. "... खुश्रुखान म्हणून एक बाटलेला हिंदु होता. त्याच्यावर सुलतानाची बहाल मर्जी होती. त्यामुळें त्याचें वजन दरबारांत फार वाढलें. ही गोष्ट इतर सरदारांस आवडली नाहीं...तो मूळचा गुजराथचा रहिवाशी असून अंत्यज होता. त्यानें हळूंहळूं दरबारांत आपल्या जातीच्या लोकांचा बराच भरणा केला. मग त्यानें आपल्या साथीदारांकडून मुबारकचा (मुबारक शहा सुलतान, इ. स. १३१६-१३९०) एका रात्रीं खून करविला. नंतर नासीरुद्दीन ही पदवी धारण करून तो तख्तावर बसला. मग त्यानें खिलजी कुलांतील सर्व पुरुषांची कत्तल करून त्या कुलाचा निर्वंश करून टाकला. तदनंतर स्वतःस हिंदु म्हणवून त्यानें मुसलमानांचा उच्छेद आरंभिला. त्याच्या अनुयायांनीं मशिदींत मूर्ति स्थापन केल्या व कुराणावर ते वसूं लागले. मोठमोठ्या मुसलमान घराण्यांतील स्त्रियांना त्यांनीं भ्रष्ट करून पांच महिनेपर्यंत दिल्ली येथें कहर करून सोडला. शेवटीं सरहद्दीच्या बंदोबस्तास असलेला सरदार गाझी मलीक यानें येऊन खुश्रूचा पराभव केला व त्यास ठार मारून स्वतः तख्तावर बसला." (हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास, पान १४८.)

पण जे अस्पृश्य मुसलमानांना मदत करूनही हिंदु धर्माला चिकटून राहिले, त्यांना मुसलमान अमदानींत फारसा लभ्यांश मिळाला नाहीं. नाहीं म्हणायला महार लोकांना मुसलमानी अमदानींत ५२ हक्क मिळाले व त्या अनुषंगानें महार म्हणजे देशाच्या राज्यकारभारांतील एक छोटा घटक, असें पद त्यांना प्राप्त झालें. या हक्कांची सनद महारांना इ. स. ११२९ मध्यें (शके १०५१, श्रावण शुद्ध त्रयोदशी, रविवार) मिळाली. परंतु हे ५२ हक्क म्हणजे महारांना गांवांत वंशपरंपरेनें डांबून ठेवणारे ५२ पाश ठरले.

मुसलमानांच्या कचाटयांतून हिंदु धर्म, हिंदु स्त्रिया व पवित्र क्षेत्रें यांना सोडविण्याचें उच्च ध्येय ठेवून मराठ्यांनीं मुसलमानी गुलामगिरीविरुद्ध बंड उभारलें. मुसलमानी सैन्यांत जसे अस्पृश्य शिरले तसा मराठी सैन्यांतहि त्यांनीं प्रवेश केला होता. मराठी सैन्यांत त्यांनीं कमालीचें कार्य केलें होतें. कारण मुसलमानी अमदानींत जे अस्पृश्य किल्ले व गांवें यांच्या बाबतींत मान्याच्या व मोक्याच्या जागांवर नेमलेले होते ते अस्पृश्य मराठी सैन्यांतील आपल्या जातभाईंना व मराठ्यांना मुसलमानी राज्य व मुसलमानी साम्राज्य मूळ पायापासून पोखरण्यास साहाय्य देत होते. मराठी सैन्यांत

कित्येक अस्पृश्यांनीं मर्दुमकी गाजवून नांवलौकिक मिळविला. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत महजूर ( महाशूर या शब्दाचा हा गांवठी अपभ्रंश असावा ) सेटी बिन नागनाक महार हा वीर प्रसिद्धीस आला. तो सातारा जिल्ह्यांतील वाई तालुक्यांतील नागेवाडी या गांवचा पाटील होता. मोंगलांच्या ताब्यांतून वैराटगड हा किल्ला जिंकण्यासाठीं खुद्द राजाराम महाराजांनीं त्याची नेमणूक केली. थोड्याशा महार सैनिकांच्या साहाय्यानें त्यानें मोंगलांच्या प्रचंड सेनेला किल्ल्यांतून पळवून लावलें व तो वैराटगड किल्ला मराठी साम्राज्यांत सामील करून दिला. सातारा जिल्ह्यांतील तासगांवजवळच्या कळंबी गांवचा पेशव्यांचा महार सरदार शिदनाक यानें खर्ड्याच्या लढाईत अप्रतिम शौर्य दाखवून पठाणांच्या तडाख्यांत सांपडलेल्या परशुराम भाऊ पटवर्धन या ब्राह्मण सरदाराचें संरक्षण केलें. रायगडावर इंग्रजांनीं हल्ला चढविला तेव्हां त्या गडाचा प्रमुख रायनाक महार यानें १५ दिवस गड लढवून इंग्रज सेनेचा धुव्वा उडवून दिला. गड रक्षण करतांना तो धारातीर्थी पडला. ( बहिष्कृत भारत, २०।५।१९२७ )

मराठी राज्यांत अस्पृश्यांनीं जिवापाड कामगिरी केली. तरी त्या कारकीर्दीत त्यांचा उत्कर्ष झाला नाहीं. कारण ते हिंदूंच्या दृष्टीनें हीन, त्याज्य, व अस्पृश्य होते. हिंदूंनीं अस्पृश्यांना दूर ठेवलें, मुसलमानांनीं अस्पृश्यांना आपल्या धर्मात घेऊन त्यांच्या साहाय्यानें हिंदु धर्म, हिंदु देवळें, हिंदु स्त्रिया यांची विटंबना केली. तरी हिंदु लोकांना आपली चूक सुधारून घेण्याची बुद्धि झाली नाहीं. हिंदु धर्मातील अस्पृश्यांबद्दलच्या निर्बंधाचे ते गुलाम होते. ही धार्मिक व मानसिक गुलामगिरी झुगारण्याची त्यांना कल्पनाहि शिवली नाहीं. याला शिवाजी महाराजहि अपवाद नव्हते. बजाजी निंबाळकर, नेताजी पालकर हे मराठे मुसलमान झालेले होते. त्यांना हिंदु धर्मात घेऊन शिवाजीनें त्यांचा स्वातंत्र्याच्या कार्यात उपयोग करून घेतला. पण शिवाजीला अस्पृश्यांचा स्वातंत्र्ययुद्धांत उपयोग झाला असतांहि अस्पृश्यांना स्पृश्य करण्याची बुद्धि सुचली नाहीं. कारण? शिवाजी त्या काळाच्या मानानें धार्मिक व सामाजिक गुलामगिरींत अडकलेला होता. तीच गोष्ट पेशव्यांची. आपलें मुसलमानी अंगवस्त्र मस्तानी इच्यापासून झालेल्या पहिल्या बाजीरावाचा मुलगा बंदेखाँ याची ब्राह्मणांकडून मुंज करण्यांत आली होती; तर त्या वेळीं महारांच्या गळ्यांत मडकें बांधण्यांत आलें होतें ! धर्मसूत्रें ब्राह्मणांच्या हातीं, बहुजन समाज धर्मांध, अशा परिस्थितींत बहुजन समाजाला आपल्या पाठीमागें उभे करावयाचें किंवा आपल्या बदफैली वर्तनावर त्याला करडा डोळा करूं द्यावयाचें नाहीं, असें सत्ताधीश हिंदूंना वाटलें तर ते ब्राह्मणांना खुष करण्याकरितां वाटेल तें करीत असत. त्यांना सत्ता, चैनबाजी आणि घमेंडखोरी गाजविण्याचा हव्यास होता; म्हणून त्यांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीचा जाणीव नव्हती. हा मुद्दा शेवटच्या बाजीरावांच्या कारकीर्दीचें विहंगम दृष्ट्या अवलोकन केलें तर जास्त स्पष्ट होतो. त्याचें एकंदर आयुष्य व सामाजिक जीवन खालील उद्‌गारांवरून दिसून येईल.

" सरकारांत कोटिहोमास प्रारंभ केला होता......मोठें अनुष्ठान. श्रीमंत पुण्यवान. ब्राह्मणांस दक्षणा भोजनादिक साहित्य धर्मराजगृहींसारखें. भोजनसमयीं अत्यादर विनंति करावी असें नियम...ब्राह्मणांचें आतिथ्य होतें तें पत्रीं काय लिहावें ! रांगोळया, पांचशात भाज्या, नित्य एक मिष्टान्न, दही, कोशिंबिरी, आतिथ्य उत्या गंधांच्या. केळींचीं पानें...

" प्रथम दिवशीं तीस हजार ब्राह्मण आले. दुसरें दिवशीं छत्तीस हजार शिधा पावले. यंदा साठ हजार पर्यंत येतील अशी बोलवा आहे... गांवांतून रस्त्यांत ब्राह्मणच ब्राह्मण दिसतात. गेल्या वर्षीं दीड लक्ष दक्षणा होती, ती यंदा दुप्पट झाली. श्रीमंतांनीं आपल्या हातें दोनशें, चारशें, बाराशें ते चवदाशें, दोन हजारपर्यंत दक्षणा दिली. आजपर्यंत चार दरवाजे चालू होते. पांचवा... चिणला होता, तो यंदा चालू केला. त्याच दरवाज्यावर श्रीमंतांनीं बसून मोहरा, होन, पुतळ्या, रुपये, मोतीं वगैरे मिळून खिचडी करून वाटली.... "

श्रीमंतांनीं विजयादशमीस नवीन पालख्या वगैरे बक्षिसें दिलीं. सासरे धोंड भट भागवत यांचे घरीं रात्रौ फराळास गेले. सासूस लुगडें आठशें रुपयांचें व त्यांचे सुनेस सहाशें रुपयांचें भरजरी दोन्ही दिलीं. शिवाय सहा हजार रुपयांचा कंठा सुनेस दिला. धोंडभटाचे मुलास कर्नाळा किल्ल्याची मामलत दिली. वरकड जवळच्या मंडळीस झाडून पोषाख सोनेरी बुट्टीचे दिले. हजार आठशेंखालीं पोषाख कोणास नाहीं. रामचंद्र गोसावी गाणार चांगले त्यांस हत्ती दिला. सुप्रसिद्ध गाणारी व्यंकट नरसी इचा नाच व रामचंद्र गोसावी यांचें गाणें तीन रात्र सतत केलें. श्रीमंतांनीं प्रसन्न होऊन अनुक्रमें २६ हजार व १० हजार रुपये बक्षिस दिलें. "

" वाड्यांत दोन तीनशें बायका नित्य न्हावयास येत असत. त्यांनीं सकाळीं न्हावयाचा समारंभ करावा, तो प्रहर दिवसापर्यंत चाले ! नंतर जेवावयाची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाड्यांत बाजीरावाची स्वारी जात असे. पंक्ति-भोजनाचे समयीं सर्व काळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. आश्रित लोकांनीं चार चार पांच पांच लग्नें करून घरीं एक बायको ठेवावी, आणि सरकार वाड्यांत बाकीच्या बायका पाठवाव्या ! आणि याजकरितां अन्याबा राहातेकर यांनीं जास्ती लग्नें केलीं होतीं. जो गृहस्थ वाड्यांत बायको पाठविणार नाहीं त्याजवर श्रीमंतांची इतराजी व्हावयाची. यामुळें अब्रुदार गृहस्थांनीं वाड्यांत जाण्याचें सोडलें. इतकेंच नाहीं तर पुणें देखील सोडिलें. सर्व अब्रुदार तितके या कृत्यास नाराजी होते; आणि गैर अब्रुदार तितके या कृत्यांत सामील होते. बायकांनीं सर्व कारभार करावा व उलटा नवऱ्यांवरच त्यांचा हुकुम असे ! त्यांनीं आपल्या नवऱ्यांकरितां श्रीमंतांस सांगून त्यांस मामलती, कामाविशी वगैरे द्याव्या ! त्यांजवर नवऱ्यांचा हुकुम इतकाच कीं वाड्यांत रहा आणि सरकारची मर्जी खूष करा ! बयाबाई दातारीण, शिता शेंडी, काशी दिक्षितीण, उमा फडकीण, ताई पेठीण या प्रकारच्या सुमारें दोन चारशें उनाड बाय-

कांचा थवा नेहमीं वाड्यांत भरलेला असे. तितक्यांचे शृंगार, दागिने आणि सोंगट्या वगैरे गोंधळ चालून श्रीमंतांनीं काळ काढावा ! शिप्यें, पाणक्ये वगैरेंशीं व्यभिचाराची त्यांस सदर परवानगी असे ! त्यांत किती एक स्त्रिया बहुत देखण्या, रूपवान, ज्वान, थट्टेखोर व बोलक्या असत. त्याचप्रमाणें रावबाजीच्या कारकीर्दींत बहुत गृहस्थांचीं घरें खराब झालीं...जेवून उठले म्हणजे पर्वतीस वगैरे दर्शनास आल्यावर शास्त्री, पंडित व भट यांची कचेरी होत असे. त्यांपैकीं कोणी म्हणावें ' बाजी हा कृष्ण अवतार आहे ! ' कोणी म्हणावें, ' शिवाचा अवतार ' प्रगटला आहे ! ' वर्षांतून सहा महिने याखालीं जावयाचे." (आजकालचा महाराष्ट्र, पा. ५३-५५, यांत मराठी रियासत व ऐतिहासिक गोष्टी यांतून घेतलेले उतारे ).

मुसलमानी व मराठी काळांत अस्पृश्यांना डोकें वर काढण्यास बिलकूल सवलत मिळाली नाहीं; ती सवलत त्यांना इंग्रजी राज्यांत मिळाली. "इंग्रज लोकांनीं जेव्हां या देशांत आपलें पाऊल ठेवलें तेव्हां कोठें या प्रांतांतील अस्पृश्य लोकांस डोकें वर काढण्यास संधी मिळाली. त्या संधीचा फायदा घेऊन त्यांनीं आपल्या अंगीं किती शौर्य आहे, किती तेज आहे व त्यांची बुद्धिमत्ता किती वरच्या दर्जाची आहे, हें सिद्ध करून दिलें. याचा पुरावा जर पाहिजे असेल तर जुनीं आर्मी लिस्टांचीं बाडें चाळून पाहिलीं म्हणजे बस्स होईल. या प्रांतांतील अस्पृश्य वर्गांत किती सुभेदार झाले, किती जमेदार झाले, किती हवालदार झाले, नार्मल स्कूलसारख्या शाळांतून पास होऊन किती हेड मास्तरांच्या हुद्यावर चढले ! एजुटन्ट, क्लार्क व क्वार्टर मास्तर क्लार्कसारख्या जबाबदारीच्या नोकऱ्या चालवून दाखविल्या, यांचा तपशील जर देऊं गेलों तर हें भाषण मर्यादेचें बाहेर वाढेल. इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, एके काळीं जो अस्पृश्य वर्ग सेवक म्हणून नांदत होता तोच वर्ग पलटणींतील नोकरीमुळें अधिकारसंपन्न होऊन दुसऱ्या वर्गावर सत्ता गाजविणारा झाला होता. या पलटणींतील नोकरीमुळें हिंदुसमाजाच्या रचनेंत एक क्रांती झाली होती, असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. ज्या महार चांभार लोकांना गांवांत मराठे वगैरे लोक शिवून घेत नसत व ज्यांनीं जोहार किंवा रामराम केला नाहीं तर मराठे लोक आपला अपमान झाला असें समजत तेच मराठे शिपाई महार व चांभार सुभेदार यांना लवून सलामी देत असत, व ' क्यौं बे ' म्हणून जर त्यांनीं म्हटलें तर डोळे वर करून बघण्याची त्याची ताकद होत नसे. (कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड, येथील डॉ. आंबेडकरांचें भाषण, बहिष्कृत भारत, ३।४।१९२७ )

इंग्रजी अंमल हिंदुस्थानांत सुरू करण्यास हिंदु लोकांनीं इंग्रजांना जी मदत केली होती तिच्या अनेक पट मदत अस्पृश्यांनीं केलेली होती. इंग्रजांच्या पलटणींपैकीं बऱ्याच पलटणी अस्पृश्यांच्या होत्या. अर्काटच्या वेढ्यांत अस्पृश्य शिपायांनीं भाताचे पाणी पिऊन व इंग्रज शिपायांना भात खावयास देऊन अर्काटचा वेढा चार दिवस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........


लढविला व किल्ला इंग्रजांना मिळवून दिला. मुंबईत ज्या पलटणी होत्या त्यांत महारांचा बराच भरणा असे. पेशवाईला धुळीस मिळविण्यास महार सैनिकांचा पहिला टोला कारणीभूत झाला. ता. १ जानेवारी १८१८ रोजीं मुंबईचे नेटिव्ह इन्फंट्रीतील ५०० लोक २५० बेशिस्त घोडेस्वार व दोन तोफा [या मद्रासच्या चोवीस गोऱ्या गोलंदाजांच्या ताब्यांत होत्या.] एवढया अल्प सैन्याच्या जोरावर कॅप्टन स्टॉटन [Staunton] याने पेशव्यांच्या २०,००० हून अधिक अशा प्रचंड सैन्याला तोंड देऊन कोरेगांवचें जें रक्षण केलें तें खरोखरच संस्मरणीय होय. यावेळीं इंग्रजांच्या बाजूचे फक्त २७६ लोक पडले. सुप्रसिद्ध इतिहासकारक टोड् या प्रसंगाचें 'हिंदी थर्मापिली' असें वर्णन करतो. सदर विजयाच्या स्मरणार्थ कोरेगांव येथें एक दगडी विजयस्तंभ उभारण्यांत आला आहे ' [–निबंधमाला, पा. १०७८]. मुंबईची नेटिव्ह इन्फंट्री म्हणजे महार पायदळांची पलटण होय. महार सैनिकांनीं पेशवाईला धुळीस मिळविलें, याबद्दलचा कबुलीजबाब मध्य भागाचे कमिशनर मि. एल. जे. माऊंटफोर्ड यांनीं अस्पृश्यांच्या उन्नतीबद्दलच्या ठरावावर मुंबई कायदे कौन्सिलांत ५ नोव्हेंबर १९२५ रोजीं भाषण करतांना दिलेला आहे. त्यांच्या भाषणाचा सारांश येणेप्रमाणें:

जॉन कंपनीचें जें सैन्य होतें त्या सैन्यांत महार लोकांचा बराचसा मोठा भरणा होता. कोरेगांवला जो जयस्तंभ उभारलेला आहे तो महारांनीं गाजविलेल्या पराक्रमाचें जयचिन्ह होय. पौर्वात्य देशांत जे पराक्रमाचे प्रकार आतांपर्यंत समजले जातात त्यांत कोरेगांवचा महारपराक्रम सर्वश्रेष्ठ होय. खडकीची लढाई संपल्यानंतर कॅप्टन स्टॉटन हा कर्नल बर याला पुण्याजवळ ससैन्य मिळण्यासाठीं खडकीहून निघाला व तो कोरेगांवला थांबला. त्याचें पायदळ ८०० शिपायांचें होतें. त्यांत थोडे अरब होते. बाकीचे सर्व महार होते. अरब तोफखान्यावर होते. दुसरा बाजीराव याच्या नेतृत्वाखालीं पेशव्यांचें सैन्य त्या बाजूला होतें. त्याची व स्टॉटनच्या पायदळाची गांठ पडली. पेशव्याचें सैन्य २५००० होतें. महार सैनिकांनीं पेशव्यांच्या २५००० लोकांना एक दिवस व एक रात्र जागच्या जागीं थोपवून धरलें. त्याला पुढें सरकूं दिलें नाहीं. शेवटीं महार सैनिकांनीं पेशव्यांच्या २५००० सैनिकांचा धुव्वा उडवून दिला. महार हा कोणत्या दर्जाचा लढवय्या आहे याचा हा एक ऐतिहासिक पुरावा आहे. या लढवय्येपणाबद्दल मुंबई सरकारला व हिंदुस्थान सरकारला महारांबद्दल अभिमान वाटतो व साम्राज्य सरकारच्या सैन्याची वाढ करण्याची वेळ येईल व गरज भासेल तेव्हां सरकार महारांची सैन्यभरती जरूर करेल.

(The Joint Memorandum of the Depressed India Association, Bombay, and the Servants of Somavanshi Society, Bombay, presentd to the Royal Statutory Commission, 1927–28, page 1)

१९ व्या बॉंबे इन्फंट्रीमधील सोननाक ताननाक या महार सैनिकानें आपल्या दोन साथीदारांसह १८८० सालीं अद्भुत पराक्रम केलेला होता. या पराक्रमाचें स्मृतिचिन्ह म्हणून एक शिलालेख वॉडबी रोडवर आलेक्झांड्रिया गर्ल्स इंग्लिश इन्स्टिटयूट नामक हायस्कूलच्या इमारतीच्या कोपऱ्यांत बसवलेला आहे. (मुंबई फोर्ट)

(This road is named after Major Sydney James Waudby who with Private Elahi Bux and Private Sonnak Tannak, all of the 19 th Bom. Infantry fell on the 16th April 1880 in defence of the Durbas post in Afghanistan which when warned that an attack in force was imminent they refused to abandon and most gallantly held for 3 hours against 300 of the enemy, many of whom were slain eventually, when all their ammunition was expended they dashed into the midst of their foes and died fighting. In honour of their heroism this tablet is placed by the Regiment.)

इंग्रजांचें राज्य स्थापन करण्यांत हिंदूंनीं इंग्रजांना जें साहाय्य केलें त्याच्या मानानें त्यांना इंग्रजांकडून भरपूर मोबदला मिळाला. शनवार वाड्यावर १० मे १८१८ रोजीं इंग्रजांचें निशाण लावल्याबद्दल बाळाजीपंत नातू या ब्राह्मणाला सरदारकी मिळाली. पेशव्यांच्या सरदारांना संस्थानें व जहागिऱ्या मिळाल्या. आणि महारांना कोरेगांवचा दगडाचा विजयस्तंभ मिळाला. मुसलमानी रियासतींत अस्पृश्यांना मोबदला ज्या कारणामुळें मिळाला नाहीं त्याच कारणामुळें इंग्रजी राज्यांतहि तो अस्पृश्यांना मिळाला नाहीं. एवढेंच नव्हे तर मुसलमानांनीं आपला कार्यभाग झाल्यानंतर अस्पृश्यांना दूर ठेवलें, तसेंच इंग्रजांनींहि केलें.

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा २२ वर्षांचा होता तेव्हांपासून तो पेशव्यांच्या दरबारीं ईस्ट इंडिया कंपनीचा वकील म्हणून काम करीत होता. तेव्हां पेशव्यांच्या राज्यांत कोणकोणतीं दोषस्थळें व दृढस्थळें आहेत हें त्यानें उत्तम रीतीनें समजावून घेतलें होतें. पेशव्यांच्या राज्यांतील एक प्रमुख दृढस्थळ म्हणजे ब्राह्मण जातीचा इतर जातींवरील पिढ्यान् पिढ्या चालत आलेला सर्वाधिकार. ब्राह्मण वर्गाच्या उठावणीनें इतर जाती कोणाच्याहि विरुद्ध बंडाळी करण्यास प्रवृत्त होतील, हें एल्फिन्स्टननें जाणलेलें होतें. म्हणून पेशव्यांच्या सैन्यास कंपनी सरकारच्या अस्पृश्य सैनिकांकडून इंग्रजांनीं खडे चारल्यानंतर कंपनी सरकार सुरू झालें हें जाहीर करण्याकरितां त्यानें कोणाहि ब्राह्मणेतराचा उपयोग केला नाहीं. एकाद्या ब्राह्मणेतराच्या हातून आपलें निशाण पेशव्यांच्या वाड्यावर उभारलें तर 'धर्म भ्रष्टाकार' झाला, अशी आरडाओरड करून ब्राह्मण लोक जनतेला कंपनी सरकाराविरुद्ध बंडास प्रवृत्त करतील हें एल्फिन्स्टननें ओळखलेलें होतें. म्हणून ब्राह्मणांना खूष करण्याकरितां त्यानें बाळाजीपंत नातू या ब्राह्मणाच्या हस्तें कंपनी

सरकारचा झेंडा शनिवार वाड्यावर चढविला. व त्यानंतर लगेच प्रमुख शास्त्री, पंडित, व इतर ब्राह्मण यांना वाईच्या पुण्यक्षेत्रांत आमंत्रण देऊन त्यांना भोजनें व दक्षणा देऊन एलफिन्स्टननें स्वतःला व कंपनी सरकारच्या राज्याला ब्रह्मवृंदाकडून शास्त्रोक्त आशीर्वाद आणि जाहीर पाठिंबा मिळविला.

कंपनी सरकारच्या राज्यकारभाराला मदत करणारे छोटे मोठे नोकर एतद्देशियांमधून विशेषतः ब्राह्मणांमधून उत्पन्न करण्याची जरुरी एलिफन्स्टनला जेव्हां भासू लागली तेव्हां त्यानें मराठी पुस्तकें गोळा करून त्यांचा अभ्यास केला. त्याच्या तंबूंत पडलेला पुस्तकांचा ढीग पाहून त्याचा एक दुय्यम अमलदार, ले. ब्रिग्ज, त्याला म्हणाला कीं, एवढा मोठा पुस्तकांचा ढीग कशासाठीं जमा केलात? तेव्हां एलिफन्स्टन म्हणाला कीं, एतद्देशियांना सुशिक्षित करून त्यांना आपल्या राज शकटाला कसें जुंपतां येईल, याचा आराखडा या पुस्तकावरून काढावयाचा आहे. तो असेंहि म्हणाला कीं, एतद्देशियांना शिक्षण देण्याचें आपण सुरू केलें तर तें शिक्षणदान केव्हां ना केव्हां तरी आपणाला आपला विलायतेचा मार्ग धरावयास लावील.

कंपनी सरकारवर ब्राह्मणांचा रोष होऊं नये याबद्दल एलिफन्स्टन डोळ्यांत तेल घालून दक्षता पाळीत होता. श्रावणांत पर्वतीच्या रमण्यांत व इतरत्र मिळणाऱ्या दक्षिणा, पूजा-अर्चा, कथाकीर्तनें, इत्यादि संबंधीं ब्राह्मणांना पेशवाईत जें उत्पन्न होतें तें एलिफन्स्टननें चालू ठेवलें; ब्राह्मण भोजनेंहि चालू ठेविलीं. हे सर्व प्रकार सरकारी खर्चानें चालू होते. पेशवाईत ब्राह्मण गुन्हेगाराला शिक्षा नसे; मोठ्या गुन्ह्याबद्दल सौम्य शिक्षा असे; हेंहि एलिफन्स्टननें चालू ठेवलें.

आपल्या राज्यकारभारास उपयुक्त माणसें तयार करण्याच्या हेतूनें आपल्या प्रजेंत शिक्षणप्रसार करण्याचें कार्य एलिफन्स्टननें हातीं घेतलें. परंतु शिक्षणदानांत ब्राह्मणेतर लोक गोवले तर ब्राह्मण लोक खवळतील; कारण कीं विद्याभ्यास करणें हें फक्त ब्राह्मणांचें कर्तव्य, ब्राह्मणेतरांचें नाहीं, ही हिंदूंमधील विचारसरणी त्याला माहीत होती. म्हणून ब्राह्मण लोकांना असंतुष्ट करूं नये म्हणून त्यानें प्रथम ब्राह्मणांमध्यें विद्यादान झालें पाहिजे, असें आपलें मत सरकारला (विलायतेस) कळविलें. शिक्षणदानाच्या बाबतींत त्यानें पुढें जे खलिते विलायतेस पाठविले त्यांत त्यांनीं असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, सरकारनें ब्राह्मण जातींत विद्यादानाची शिकस्त करावी; ब्राह्मणेतर जातींत विद्यादान करणें पुढें पहातां येईल. या मताच्या मुळाशीं ब्राह्मण जातीला संतुष्ट करण्याचा हेतु होता, हें उघड आहे. ईस्ट इंडिया कंपनीचा चार्टर प्रत्येक वीस वर्षांनीं पार्लमेंट वाढवीत असे. १८१३ सालीं चार्टरची कालमर्यादा वाढवितांना पार्लमेंटनें १८१३ च्या चार्टर अ‍ॅक्टमध्यें असा निर्बंध घातला कीं, कंपनीनें प्रजेच्या शिक्षणासाठीं सालीना एक लक्ष रुपये खर्च करावेत. या कायद्यान्वयें हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंक यानें एक कमिटी नेमली. तिचे अध्यक्ष

लॉर्ड मेकॉले, व सभासद हॅरिस वुइल्सन, सर चार्लस ट्रिव्हेलिन, डॉ. डफ्, इत्यादि त्यावेळचे अत्यंत नामांकित असे शिक्षणतज्ज्ञ होते. या कमिटीनें एतद्देशीयांना शिक्षण कसें द्यावें, वगैरे गोष्टींचा एक स्पष्ट आराखडा तयार केला. तो अंमलांत आणण्यासाठीं कंपनी सरकारनें १८२२ सालीं मुंबई प्रांतासाठीं बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन केली.

स्पृश्य लोकांना शिक्षण देऊन त्यांना पुढें आणावें व त्यांचा उपयोग आपला राज्य-कारभार सुरळितपणें चालविण्यांत करावा; अस्पृश्यांना शाळेंत येऊं दिलें तर हिंदू लोक अस्पृश्यतेच्या भीतीनें व धर्म भ्रष्ट होईल या भावनेनें आपलीं मुलें शाळेंत पाठविणार नाहींत व मग आपल्या राज्यकारभारास हातभार लावणारी प्रजा आपल्याला उत्पन्न करतां येणार नाहीं; त्याचप्रमाणें अस्पृश्यांच्या मुलांना शिकवून तयार केलें तर त्यांना सरकारी कारभारांत पदाधिकारी म्हणून नेमावें लागेल व त्यामुळें हिंदु लोक चिडून जातील व नीच जातींतील लोकांना आमच्यावरील अंमलदार करून आमची अवहेलना करीत आहे, अशी विचारजागृति हिंदूंच्यामध्यें उत्पन्न होईल, व त्यानंतर मन-प्रक्षोभामुळें हिंदूलोक राजाविरूद्ध बंडाळी करतील, ही भीति कंपनी सरकारला रात्रंदिवस भेडसावीत होती. म्हणून सरकारनें अस्पृश्यांना शिक्षणापासून अगदीं दूर ठेवण्याचें धोरण स्वीकारलें होतें.

कंपनी सरकारनें या धोरणांत उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांत बदल कर-ण्याचें ठरविलें. आग्रा येथील शाळा व कॉलेज यांत फक्त ब्राह्मण व इतर उच्च वर्गांतील मुलांना प्रवेश मिळत होता. व कनिष्ठ वर्गांतील मुलांना प्रवेशबंदी होती. सरस्वती देवीच्या मंदीराचीं कवाडें सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांना सताड उघडीं ठेवण्याचें आणि ब्राह्मण आणि अब्राह्मण विद्यार्थ्यांना सरकारी शिष्यवृत्त्या देण्याचें सरकारनें जेव्हां जाहीर केलें तेव्हां टाइम्स ऑफ इंडिया या पत्रानें ८ नोव्हेंबर १८५१ च्या अंकांत सरकारला हीं सद्बुद्धि उशीरा का होईना सुचली याबद्दल समाधान व्यक्त केलें. मुंबईतील एल्फिन्स्टन् इन्स्टिटयूशन् या इंग्रजी शाळेंत कनिष्ठ व अस्पृश्य-वर्गांतील किती विद्यार्थी शिकत आहेत, आणि जर असा एकहि विद्यार्थी नसेल तर जर असले विद्यार्थी सदर शाळेंत शिकूं इच्छितील तर मुंबई सरकार सदर विद्यार्थांना शाळेंत दाखल करील काय, अशीहि टाईम्सनें पृच्छा केली.

एका महार मुलानें धारवाड येथील सरकारी हायस्कूलमध्यें प्रवेश मिळविण्या-साठीं १८५६ च्या जूनमध्यें सरकारकडे अर्ज केला. तेव्हां त्याला प्रवेश द्यावा कीं नाहीं याबद्दल मुंबई सरकारनें लंडन येथील बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे पत्रव्यवहार केला आणि त्यांतून निष्पन्न काय झालें? सदर महार विद्यार्थ्याला जर प्रवेश दिला तर वरिष्ठ वर्गांतील मुलांचे पालक व आईबाप धारवाडचे हायस्कूल विटाळलें असें समजून आपलीं मुलें हायस्कूलमधून काढून घेतील व शिवाय सरकारविरुद्ध वरिष्ठ

हिंदूंचें मत वाईट होईल; ही परिस्थिति राज्यकारभाराला घातक होईल म्हणून महार मुलाला प्रवेश नाकारावा असा डायरेक्टर्सनीं निर्णय घेतला व मुंबई सरकारनें तो अंमलांत आणला. उच्चवर्णीयांना शिक्षण द्यावें पण अस्पृश्यांना देऊं नये असें अस्पृश्यांच्या शिक्षणाबाबत सरकारचें धोरण होतें; याबद्दलची व धारवाडच्या प्रकरणाची सविस्तर आणि साधार माहिती डॉ. आंबेडकरांनीं बहिष्कृत हितकारणी सभेतर्फे सायमन कमिशनपुढें २९ मे १९२८ रोजीं सादर केलेल्या अहवालांत दिली आहे. सरकारच्या या धोरणामुळें अस्पृश्यांसाठीं १८५५ पर्यंत एकहि शाळा उघडली गेली नाहीं. पण कांहीं वर्षांनीं सरकारनें अस्पृश्यांना शिक्षण देण्याचें ठरविलें आणि शाळा सुरू केल्या. १८८१–८२ सालापर्यंत शिक्षणाची प्रगति किती झाली होती, हें दाखविण्यासाठीं अहवालांत त्यांनीं खालील माहिती दिली होती:

| | जाती | विद्यार्थ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राथमिक शाळा. | इंग्रजी शाळा. | कॉलेजें. |
| १ | ख्रिस्ती, | १५२१ | १४२९ | १४ |
| २ | ब्राह्मण, | ६३,०७१ | ३६३९ | २४१ |
| ३ | इतर हिंदू | २०२३४५ | ६२४ } ३८२३ } | १०८ |
| ४ | मुसलमान | ३९२३१ | ६८७ | ७ |
| ५ | पार्शी | ३५१७ | १५२६ | १०८ |
| ६ | वन्यजाती | २७१३ | ६ | ० |
| ७ | अस्पृश्य | २८६२ | १७ | ० |
| ८ | ज्यू व इतर | ३७३ | १०३ | २ |

ख्रिस्ती धर्माचा प्रसार हिंदुस्थानांत व्हावा अशी हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज लोकांची इच्छा होती व त्याबद्दल त्यांची जिवापाड धडपड चालू होती. ते मिशनऱ्यांना साहाय्य करीत व आपल्या अधिकाराच्या जोरावर धर्मांतरास उत्तेजन देत. हिंदी लोकांना शिक्षण अशा रीतीनें द्यावयाचें कीं, त्यांना आपल्या धर्माचा तिरस्कार वाटावा व ख्रिस्ती–धर्माबद्दल प्रेम वाटावें, असा इंग्रज अधिकाऱ्यांचा नक्की विचार ठरल्यानंतर त्यांनीं लॉर्ड मेकॉले याला शिक्षण योजना तयार करावयास सांगितलें व तशी शिक्षण योजना त्यानें तयार केली. लॉर्ड मेकॉले यानीं आपल्या आईला कलकत्त्याहून ता. १२ आक्टेबर १८३६ ला पत्र लिहिलें असता ख्रिस्ती धर्माचा बंगालमध्यें प्रचार कितपत होईल, याबद्दल त्यानें आपले विचार प्रदर्शित केलेले आहेत. तो लिहितो " It is my firm belief that if our plan of education is followed up, there would not be a single idolator in Bengal 30 years hence " ( सत्तावनचें स्वातंत्र्यसमर, पा. ५७ ) मेकॉलेची शिक्षणपद्धति पुढें हिंदुस्थानांत सरास चालू झाली.

" १८५७ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीचा प्रमुख डायरेक्टर मि. मँगल्स यानें 'हाउस ऑफ कॉमन्स'मध्यें असें विधान केलें कीं, 'हिंदुस्थानच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ख्रिस्ताचा विजयध्वज डौलानें फडकविण्याकरितांच हें हिंदुस्थानचें अफाट साम्राज्य ईश्वरानें आपल्या हातीं सोंपविलें आहे. म्हणून सबंध हिंदुस्थान ख्रिस्तमय करण्याच्या या महान् कार्यांत कोणत्याहि प्रकारची ढिलाई न करतां प्रत्येकानें आटोकाट प्रयत्न करणें अवश्य आहे." [सत्तावनचें स्वातंत्र्य समर–पा. ५६–५७].

" त्यावेळीं रेव्हरंड केनेडीनें म्हटलें आहे कीं, 'आपलें साम्राज्य जोंपर्यंत हिंदुस्थानांत अस्तित्वांत आहे, तोंपर्यंत कोणत्याही अडचणीला न जुमानतां सबंध देशभर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें, हेंच एक आपलें प्रमुख कार्य आहे याचा आपणाला विसर पडून चालणार नाहीं. आपल्या हातीं असलेली सर्व सत्ता नि अधिकार या कामाकरितां आणली जावी नि तें एथपर्यंत कीं हिंदुस्थान ख्रिस्ती धर्माचा पूर्वेकडील प्रबळ असा बालेकिल्ला होऊन राहवा !" [ सत्तावनचें स्वातंत्र्य समर, पा. ५८ ]

" मिशनरी, ख्रिस्तीधर्मगुरू, इत्यादिकांना जो पगार मिळे तो सरकारी तिजोरींतून. इंग्रज मुलकी व लष्करी अधिकारी आपल्या हाताखालील लहान मोठ्या हिंदी नोकरांना ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा पदोपदीं उपदेश करीत, गळ घालीत व सक्तीही करीत. लष्करी हिंदी शिपायांना व अधिकाऱ्यांनाहि बाटविण्याचें कार्य उघड रीतीनें चालू होतें. [ सत्तावनचें स्वातंत्र समर, पा. ६०–६१ ].

" ख्रिस्ती उपदेशकांनीं १८४० १८६० चे दरम्यान साऱ्या देशभर आपली वसतिस्थानें उभीं करून हिंदुमुसलमानांच्या धर्मावर आपल्या व्याख्यान लेखनादि तोफांचा अतिशय निकरानें मारा चालविला होता. जत्रा असो, आठवड्याचा बाजार असो, लोकांची हिंडण्याफिरण्याची जागा असो, जेथें माणसांचा जमाव दिसेल तेथें जाऊन आपल्या उपदेशाचा पट्टा चालवावयाचा, असें मिशनऱ्यांचें व्रत होतें व आहे.

" महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें असल्यास असें म्हणतां येईल कीं, नांव घेण्याजोगें मराठी भाषेंतलें वर्तमानपत्र प्रथम मिशनऱ्यांनींच काढलें. धर्माबद्दल लोकांत विचार चालण्याकरितां, हिंदूंचे सण, मूर्तिपूजा वगैरे विषयांवर निबंध लिहिणारांपुढें मिशनरी मंडळाकडून बक्षिसांचें आमिष टाकलें गेलें व त्याचा लाभ घेण्याला अनेक तरुण लेखक सरसावले. लोकांत धर्माचा विचार चालण्याला या साधनांचा बराच उपयोग झाला. मिशनऱ्यांच्या गोटांत पुष्कळसे ब्राह्मण शिरल्यामुळें आपला धर्म डबघाईस आला असा ग्रह होऊन लोकांमध्यें खळबळ माजली." (रानडे, पा. १०५–१०६ )

दुसरा बाजीराव यानें आपलें राज्य १८१८ सालीं कंपनीला देऊन वार्षिक तनखा आठ लाख रुपये घेतला तो ब्रह्मावर्त येथें जाऊन राहिला. त्यानें आपले लाखों रुपये

कंपनीच्या नोटांत गुंतविले. अफगाणिस्तान व कपनी यांच्यांत युद्ध जुंपलें तेव्हां त्यानें कंपनीला पन्नास लाख रुपयाचें कर्ज दिलें. तो १८५१ सालीं वारला तेव्हां नानासाहेब यास दत्तक घ्यावें, असें मृत्युपत्रांत त्यानें लिहून ठेवलें होतें. (स. स्वा. समर, पा. ३२). परंतु १८४६ सालीं डलहौसी हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून आला. त्यानें दत्तकविधान मान्य न करण्याचें धोरण जोरानें सुरू केलें. त्याप्रमाणें सातारा, ग्वाल्हेर, नागपूर, झांशी इत्यादी निपुत्रिक राजांच्या स्त्रियांना दत्तक घेऊं दिले नाहींत. त्यानें तीं राज्यें खालसा केलीं. बाजीरावाचा दत्तक पुत्र नानासाहेब (माथेरानजवळच्या वेणू खेडेगांवांतील माधवराव नारायण भट या गृहस्थाचा मुलगा–स. सा. समर, पा. २७-२८) याचें दत्तकविधान डलहौसीनें मान्य केलें नाहीं. एवढेंच नव्हे तर बाजीरावाच्या आठ लाख पेन्शनवरील त्याचा हक्कहि डलहौसीनें उडवून टाकला.

राजकीय बाबतींत कंपनीनें जसें उच्छेदाचें धोरण स्वीकारलें होतें, तसेंच धार्मिक व सामाजिक बाबतींत स्वीकारलेलें होतें. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं पगारी प्रचारक नेमून कंपनीनें हिंदु व मुसलमान यांच्या धर्मांवर, आचारांवर आणि रीतिरिवाजांवर भयंकर कोरडे ओढण्याचें सूत्र चालू केलें. या सर्व कारणामुळें हिंदु व मुसलमान, राज्यभ्रष्ट राजे, जहागीरदार, सरदार, व सर्वसाधारण लोक हे कंपनी सरकारावर दांत ओंठ खावूं लागले व कंपनी सरकार उलथून पाडण्याचें बेत रचूं लागले. या गुप्त चळवळींत नानासाहेब पेशवे त्याचा इमानी राजदूत अझीमुल्ला, साताऱ्च्या प्रतापसिंह राजाचा दरबारी वकील रंगो बापूजी गुप्ते, दिल्लीचा वृद्ध बादशाह बहादुरशहा व त्याची तरुण पत्नी झिन्नत महाल, झांशीची राणी लक्ष्मीबाई, जगदीशपूरचा ८० वर्षांचा राणा कुमार सिंह, पेशव्यांचा सेनापति तात्या टोपे, हे प्रमुख सूत्रधार होते. त्यांचे हस्तक गोसावी व मौलवी बनून खेडोपड्यांतून इंग्रजाविरुद्ध बंड करण्यास चिथावणी देत फिरत होते. २२ जून १७५७ ला प्लासीच्या लढाईंत इंग्रजांनी हिंदुस्थानचा पहिला घांस घेतला व १८४८ पर्यंत सर्व हिंदुस्थान गिळंकृत केला. तेव्हां २३ जून १८५८ ला सर्व हिंदुस्थानांत उठावणी करून प्लासीचा सूड उगवावयाचा व इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकून देऊन हिंदुमुसलमानाचें राज्य स्थापन करावयाचें, असा तो गुप्त कट होता. या गुप्त कटांत कटवाल्यांनीं कंपनीच्या पलटणींच्या पलटणी सामील करून घेतल्या.

बंदुकींत वापरण्याचीं नवीं काडतुसें कंपनीनें तयार करून तीं पलटणींतील शिपायांना वापरण्यास दिलेलीं होतीं. तीं काडतुसें चांगल्या स्थितींत रहावींत म्हणजे त्यांना गंज लागूं नये म्हणून त्यांच्यावर डुकराची चरबी व गाईचें रक्त चोपडण्यांत येत असे. गोळीबाराच्या वेळीं हीं काडतुसें सैनिकांना तोंडांत धरून भरावीं लागत असत. या काडतुसांवर चरबी व रक्त चोपडण्याचें काम अस्पृश्य वर्गांतील शिपायांना करावें लागत असे. चरबी व रक्त चोपडण्याचा विधि इतर जातींच्या

शिपायांना अज्ञात होता. एके दिवशीं कलकत्त्याजवळील डमडम गांवांत असलेल्या अस्पृश्य व ब्राह्मण सैनिकांच्या स्पर्शास्पर्शाबद्दलच्या भांडणावरून काडतुसाला गाईचें रक्त व डुकराची चरबी चोपडतात, याचा स्फोट झाला. एका अस्पृश्य सैनिकानें पिण्यासाठीं पाणी मागितलें असतां ब्राह्मणानें उत्तर दिलें कीं, "तुझ्या स्पर्शानें माझा लोटा अपवित्र होईल." यावर तो अस्पृश्य म्हणाला, "महाराज, आतां तो आपला जातीचा अभिमान ठेवा गुंडाळून! यापुढें तुम्हांला गाईचें मांस नि डुकराची चरबी आपल्या दातांनीं तोडावी लागणार आहे! हीं नवीं आलेलीं काडतुसें यांच अपवित्र पदार्थांनीं हेतुतः माखलेलीं आहेत, समजलात!" (सत्तावनचें स्वातंत्र्यसमर, पा. ६४-६५)

मंगल पांडे हा तो ब्राह्मण सैनिक. त्याची पलटण इंग्रजांना कापून काढण्यासाठीं उतावीळ झाली. काडतुसांच्या प्रकाराची माहिती कळल्यानंतर मंगल पांड्यानें २९ मार्च १८५७ रोजीं गोळ्या झाडून कांहीं इंग्रज अधिकारी ठार मारले. "शिपायांनो! बंडास तयार व्हा" असें ओरडत तो बॅरकसमध्यें पळूं लागला. (सत्तावनचें स्वातंत्र्य समर, पा. ११०-१११.). ही बातमी चोहोंकडे पसरली. ठिकठिकाणच्या पलटणींनीं बंडाचा उठाव केला. बंडांत तुम्ही सामील व्हा अगर सहाय्य करा, अशीं गुप्त पत्रें व संदेश नानासाहेब पेशवा व बहादूर शहा बादशहा यांनीं ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे होळकर, सांगलीचे पटवर्धन, कोल्हापूरचे भोसले, हैदराबादचा निजाम, काश्मीरचा महाराजा, नेपाळचा महाराजा, इत्यादि लोकांना पाठविलेले होते. पण ते कंपनीसरकाराविरुद्ध शस्त्र चालविण्यास धजले नाहींत. त्याचप्रमाणें पंजाबांतील शीख व नेपाळचे गुरखे हेहि कंपनीच्या इमानाचे ताबेदार राहिले. कंपनीनें बंडाचा बीमोड १८५९ च्या एप्रील महिन्यांत केला.

स्वधर्मसंरक्षण व स्वराज्यस्थापना करणें, या दोन ध्येयांसाठीं हिंदु मुसलमानांनीं १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध झुंजविलें, परंतु त्यांत अस्पृश्यांना कोणतें स्थान होतें? हिंदूंनीं अस्पृश्यांना मुळांतच दूर ठेविलेलें होतें. मुसलमानांनाहि ते हिंदु म्हणून हीन वाटत असत. कंपनीनें मात्र त्यांच्या पलटणी उभारून त्यांचा उपयोग हिंदु व मुसलमान यांचीं राज्यें नष्ट करण्याकरतां केलेला होता. अशा परिस्थितींत अस्पृश्यांना स्वधर्मसंरक्षण व स्वराज्यस्थापना या ध्येयांबद्दल आसक्ति वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. ते कंपनीच्या नेतृत्वाखालीं लढले व बंडाचा मोड करण्यास प्रामुख्यानें कारणीभूत झाले. बंडवाल्यांच्या हातांतून दिल्ली शहर ताब्यांत घेतांना कंपनीच्या ज्या पलटणींनीं मर्दुमकी केली त्या पलटणींचीं व त्यांतील वीरांचीं नांवें दिल्लीच्या चारी बाजूंच्या प्रवेशद्वारांवर कंपनीसरकारनें कोरून ठेविलेलीं आहेत. त्यांपैकीं बरींच नांवें काश्मीर प्रवेशद्वारांवर अस्पृश्यांचीं आहेत.

काडतुसाला गाईचें रक्त व डुकराची चरबी चोपडण्यांत येते ही स्फोटक बातमी प्रथम एका भंग्यानें प्रसंगानुसार बाहेर फोडली, असें 'सत्तावनचें स्वातंत्र्य-

समर' या ग्रंथांत (पा. ६४) सांगितलेलें आहे. याच मुद्यासंबंधीं 'हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास' यांत श्री. जोशी लिहितात (पा. ५०६-५०७) कीं, मंगल पांड्याबरोबर वादविवाद करणारा गृहस्थ महार होता. 'सन १८५७' (पा. १६६-६७) मध्यें मंगल पांड्याबरोबर तंटा करणारा गृहस्थ एक मजूर होता असा उल्लेख आहे.

शिपायांच्या बंडाचा पुरा वींमोड झाल्यानंतर हिंदी जनतेला आपल्या राज्यांत सुखासमाधानानें राहता येईल, अशी कांहींतरी योजना तिच्यापुढें ठेवून तिचें मन राज्यनिष्ठेकडे झुकतें ठेवणें राज्यकर्त्यांना इष्ट वाटलें. म्हणून त्यांनीं व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा हिंदुस्थानांत नोव्हेंबर १८५८ मध्यें प्रसिद्ध केला. हिंदी जनतेच्या हिताबद्दलचीं आश्वासनें देणारीं जीं कांहीं कलमें या जाहीरनाम्यांत होतीं त्यापैकीं एक कलम असें होतें: "आमची आणखीहि पुढें अशी इच्छा आहे कीं, आमच्या प्रजाजनांपैकीं कोणीहि प्रजाजन, जर तो शिक्षणानें, कर्तृत्त्वानें नि कार्यक्षमतेनें सुपात्र आणि सुयोग्य असेल तर, त्याच्या जातीचा, धर्माचा वा पंथाचा कसलाहि विचार न करतां त्याला निःपक्षपातीपणानें नि निःसंकोचपणें आमच्या सेवेमध्यें कोणत्याहि अधिकारपदावर भरती करून घेतलें जाईल." (सत्त्वानचें स्वातंत्र्यसमर, पा. ५३६)

हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित झाल्यानंतर नोकरशाहीनें राणीच्या जाहीर-नाम्यांतील इतर कलमांत दिलेलीं आश्वासनें जशीं धाब्यावर बसविलीं तशींच उपरिनिर्दिष्ट कलमांतील आश्वासनेंहि धाब्यावर बसविलीं.

बंडाला ब्राह्मण व मुसलमान कारणीभूत झाले म्हणून नोकरशाहीची त्यांच्या-वर १८५९ नंतरच्या काळांत वक्रदृष्टी फिरली. ब्राह्मणांची व मुसलमानांची लष्करां-तील भरती पूर्णपणें बंद करण्यांत आली. एवढेंच नव्हे तर लष्करांतील हिंदी शिपायांमध्यें व् अधिकाऱ्यांमध्यें एकोपा राहूं नये, त्यांच्यांतील उच्चनीच जातिभेद-भाव वाढता राहावा, जातिवैमनस्याच्या अग्नींत त्यांच्यांतील एकोपा जळून जावा, इंग्रज राज्यकर्ते हेच आमचे अन्नदाते व वाली आहेत अशी त्यांच्यांत राज्यनिष्ठा जागृत राहावी, यासाठीं राज्यकर्त्यांनीं १८५९ नंतर सतत आटोकाट प्रयत्न केले.

परंतु राज्यकारभारांतील कलमबहादुरी करण्यास ब्राह्मणजातीशिवाय इतर फारशा जाती नसल्यामुळें इंग्रज राज्यकर्त्यांना ब्राह्मणांना मुलकी खात्यांतील नोकऱ्या देणें भाग पडलें. त्यावेळीं प्रभू, सोनार, पारशी, इत्यादि समाजांत शिक्षण-प्रसार झालेला होता. परंतु सुशिक्षितांची संख्या कमी. इतर जातींत बरेच लोक सुशि क्षित असते तर इंग्रजांनीं त्यांनाच हातीं धरलें असतें व ब्राह्मण सुशिक्षितांना बाजूला सारलें असतें. अस्पृश्य वर्गांतील बरेच लोक लष्करांत उच्च पदाधिकारी झाले होते. परंतु मुलकी खात्यांत अधिकारपदें काबीज करण्याइतके सुशिक्षित तरुण

त्यांच्यांत झालेले नव्हते. पुढें असे तरुण झाले तेव्हां नीच जातीच्या लोकांना उच्च पदाधिकारी नेमलें तर उच्च वर्णीय हिंदु खवळून जातील व पुनः १८५७ ची दुसरी आवृत्ति निघेल, अशी इंग्रज नोकरशाहीला भीति वाटूं लागली, म्हणून पदवी-धर अस्पृश्यांना उच्च अधिकारपदांवर नेमण्यास राज्यकर्ते तयार झाले नाहींत. लॉर्ड किचनेर हे हिंदुस्थानचे सर सेनापति म्हणून आल्यानंतर त्यांनीं १८९२ सालीं अस्पृश्यांच्या लष्करभरतीवरहि बंदी पुकारली व कांहीं वर्षांनीं अस्पृश्यांच्या पलटणी मोडून टाकल्या.

# प्रकरण १३ वें

## सिंहावलोकन ( चालू )

### सामाजिक व धार्मिक सुधारणांचें बीज

उच्च वर्णीय हिंदूंमध्यें शिक्षणाचा प्रसार बराच झाला. त्यांतील सुशिक्षित लोक सरकारी खात्यांत लहानमोठ्या जागांवर काम करूं लागले. विलायतेस जाऊन उच्च विद्याभ्यास वाढवावा व सरकारी खात्यांतील मोठ्या हुद्याच्या जागा मिळवाव्या अशी आकांक्षा हिंदूंमध्यें उत्पन्न झाली. जलप्रयाण व परदेशगमन हीं हिंदुधर्मशास्त्रांनीं निषिद्ध म्हणजे पापमय मानलेलीं होतीं तरी तीं पापें करण्यास सुशिक्षित हिंदु तयार झाले. १८६८ पासून महाराष्ट्रांतील सुशिक्षित हिंदु विद्याभ्यासासाठीं जलपर्यटन व परदेशगमन करूं लागले. या सुमारास ठाकूर नांवाचा महाराष्ट्रीय सुशिक्षित हिंदु आय. सी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण झाला.

हिंदुस्थानांत कंपनी सरकारचें राज्य विस्तार पावत चाललें असतां अनेक युरोपियन विद्वान गृहस्थ व मिशनरी लोक हिंदुस्थानांत आले. त्यावेळीं ब्राह्मणांशिवाय कोणी सुविद्य नसत. संस्कृत भाषा व मराठी भाषा शिकण्यासाठीं या युरोपियन विद्वानांनीं व मिशनरी लोकांनीं सुविद्य ब्राह्मणांना पगारी शिक्षक नेमलें. या दोन्ही भाषांचा उत्तम अभ्यास ब्राह्मणांच्या सहाय्यानें केल्यानंतर या लोकांनीं हिंदु धर्मशास्त्रांचा व संस्कृत ग्रंथाचा कसून अभ्यास केला. अनेक ग्रंथ लिहिले. मॅक्स म्युलर या जर्मन पंडितानें सतत ३० वर्षें खपून संपूर्ण ऋग्वेदाचें प्रकाशन ६ भाषांमध्यें केलें (निबंधमाला, पान ३८७) बोहलिंग [ बोधलिंगाचार्य ] यानें छांदोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांचें भाषांतर केलें व २३ वर्षें खपून संस्कृत भाषेचा प्रचंड कोश ७ खंडांत प्रसिद्ध केला. (निबंधमाला, पा. ४११) मार्टिन हॉग हे १८५९ सालीं पूना कॉलेज [ नंतरचें डेक्कन कॉलेज ] येथें संस्कृतचें प्रोफेसर आणि सुपरिंटेंडेंट ऑफ संस्कृत स्टडीज म्हणून काम करीत असत. " कोणत्याही विषयावर संभाषण करतां यावें इतकें मराठीचें उत्तम ज्ञान संपादन करून ब्राह्मण ग्रंथ, सूत्रें, इत्यादिकांतील पारिभाषिक शद्वांचे अर्थ समजून व उमजूनहि घेण्याकरितां यानें आपल्या बंगल्यावर सोमयाग करविला [ १८६२ ]. हा सोमयाग पांच दिवस चालू असून त्याच्यासाठीं

दशपूर्ण मासासारख्या क्षुल्लक दृष्टींतच नव्हे तर सोमयज्ञांतहि होता, उद्गाना अशीं जबाबदारीचीं कार्यें केलेला श्रोत्रिय हॉग साहेबानें संपादन केला होता. द्विजोपाध्यायाकडून मिळाला असतां आरोग्य, संपत्ति, ज्ञान व ईश्वरी स्फूर्ति देणार सोमरसहि प्राशन करण्यास त्यांना मिळाला होता. अनेक ऋत्विज, अग्निहोत्री, वगैरेशीं संभाषणें करून वेदविषयक शंकानिवृत्ति हे करून घेत." (निबंधमाला, पा. ३८६)

एच्. एच्. वुईल्सन हा संस्कृतचा प्रोफेसर (पुना कॉलेज) होता. यानें मराठी भाषेचा कोश प्रसिद्ध केला. मराठी भाषेचा हा पहिला कोश होय. हा मिशनरी होता.

मिशनरी हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं हिंदुधर्मशास्त्रांचा अभ्यास करून, त्यावर हल्ले चढवून व आपल्या ख्रिस्ती धर्माची महती गाऊन ख्रिस्तीधर्मप्रसारास सुरवात केली. या धर्मप्रसाराच्या कार्यास सरकारनें प्रथम परवानगी दिली नाहीं. कारण सरकारला हिंदु समाजांतील उच्च वर्णीयांना दुखवावयाचें नव्हतें. परंतु मिशनरी म्हणजे स्वार्थत्याग, चिवटपणा, ध्येयनिष्ठा आणि अविश्रांत परिश्रम यांचे मूर्तिमंत पुतळे! त्यांनीं सरकारचीं बंधनें व हुकूम पाळले नाहींत. त्यासाठीं त्यांनीं तुरुंगवास व अनेक हाल अपेष्टा सोसल्या. १८२४ मध्यें दोन मिशनरी आपलें धर्मप्रसाराचें ठाणें मांडण्याकरितां पुण्यास आले असतां सरकारनें त्यांना बंदी केली. पण तेवढ्यानें त्यांच्या धर्मभक्तीला आळा बसला नाहीं म्हणून त्यांना अटकेंत कोंडलें.

महाराष्ट्रांत जे अमेरिकन मिशनरी येऊन स्थायिक झाले त्यांनीं हिंदु समाजांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं जीं साधनें वापरलीं होतीं त्यांत वर्तमानपत्र हें एक साधन होतें. या लोकांनीं अहमदनगर येथें जून १८४२ मध्यें 'ज्ञानोदय' या नांवाचें पत्र सुरू केलें. त्याचे पहिले संपादक हेन्री बालंटाईन हे मिशनरी होते. या पत्राचे पुढें जे संपादक झाले त्यांत रे. तुकारामजी नाथाजी हे एक होते. (वृत्तपत्रांचा इतिहास, पान २०५) या नांवावरून असें वाटतें कीं, हे संपादक महार समाजाचे (धर्मांतरित) असावेत.

'ज्ञानोदय' पत्र जरी ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचें प्रमुख कार्य करीत होतें तरी हिंदु समाजांत ज्या सुधारणा व्हाव्यात म्हणून हिंदु सुधारक प्रयत्न करीत असत त्या प्रयत्नांना तें पत्र उचलून धरीत असे. या संबंधीं ता. ७ एप्रिल १८४९ च्या अंकांत सदर पत्रानें खालील मजकूर प्रसिद्ध केला होता.

### "विधवेचें क्षौर

"नाशकाकडे एका ब्राह्मणी विधवेच्या नातलगांनीं व दुसऱ्या कांहीं ब्राह्मणांनीं तिचें वपन बलात्कारानें केलें. त्यावर तिनें मॅजिस्ट्रेटकडे फिर्याद केली आणि आर्थर साहेब फर्स्ट असिस्टंट मॅजिस्ट्रेट यानीं त्या गुन्हेगार ब्राह्मणांस तुरुंगाची शिक्षा दिली. हे अपराधी ब्राह्मण हल्लीं ठाणेच्या तुरुंगांत कैद भोगीत आहेत. त्यांस जी शिक्षा झाली ती यथान्याय आहे, अशा शिक्षा दिल्यावरून ब्राह्मणांच्या जुलुमांची व मूर्खपणांची बंदी होऊन पुनर्विवाहास व सुधारणेस फार उत्तेजन मिळेल." (वृत्तपत्रांचा इतिहास, पा. ४८४-४८५)

हिंदु समाजांतील जे अनेक दोष मिशनऱ्यांना फारच भडक दिसेल त्यांत जातिभेद व विधवा हे दोष फारच भयानक स्वरूपांचे वाटले. हिंदु धर्मापेक्षां खिस्ती धर्म श्रेष्ठ आहे असें श्रोत्यांना पटवून देतांना मिशनरी लोक या दोन दोषस्थलांवर नेमकें बोट ठेवून हिंदूंची छीः थूः करीत असत. या बाबतींतील मिशनऱ्यांची चळवळ १८५० च्या सुमारास अगदीं जोरांत फोफावत होती. त्या चळवळीचा पुढारी रे. मरे. मिचल हा होता. मिशनऱ्यांच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं अनेक शास्त्री, भटजी व पंडित पुढें येत. कृष्णशास्त्री चिपळुणकर यानीं आपल्या साथीदारांच्या सहाय्यानें 'विचारलहरी' हें वर्तमान-पत्र काढून मिशनऱ्यांच्या हल्ल्याला तोंड देण्याचें कार्य ते करूं लागले. पुढें 'दंभहारक' हें पत्र हिंदुधर्माभिमान्यांनीं काढलें. व त्यांतून मिशनऱ्यांवर चौफेर हल्ले तेहि करूं लागले. "हिंदुधर्मतत्त्व" हा ग्रंथ गंगाधरशास्त्री फडके यांनीं लिहून हिंदुधर्माचा मोठेपणा जनतेसमोर मांडला. मिशनऱ्यांच्या चळवळीला या पुस्तकांत उत्तर दिलें होतें. हिंदु-धर्मावर व समाजावर होणाऱ्या हल्ल्याला लेखणीच्या जोरावर तोंड देणारे जसें लोक पुढें आले, तसेंच मिशनऱ्यांच्या समोरासमोर सार्वत्रिक सभेंत वादविवाद करून मिशनऱ्यांची चळवळ किती द्वेषमूलक आणि हीन स्वरुपाची आहे, तें सिद्ध करणारे वादविवादपटु लोक पुढें आले. त्यांत विष्णुबुवा ब्रह्मचारी हे प्रमुख होते. त्यांचे संपूर्ण नांव विष्णू भिकाजी गोखले. ते शास्त्री अगर विद्वान नव्हते. परंतु हिंदु धर्म व समाज यांच्यांत थोडीफार सुधारणा केली तर तो धर्म व समाज जगांतील सर्व समाजांपेक्षां व धर्मांपेक्षां श्रेष्ठ आहे, अशी दृढ भावना बाळगणारे ते होते. ते अत्यंत बोलके, हजरजबाबी व प्रसंगोपात् अश्लील कोटिक्रम करून प्रतिपक्षाला निरुत्तर करणारे वादविवादपटु होते. १८५० ते १८५८ पर्यंतच्या काळांत यांनीं मिशनऱ्यांबरोबरच्या आपल्या वादविवादांनीं सर्व महाराष्ट्र दणाणून सोडला. त्यांनीं "वेदोक्त धर्म प्रकाश," "भावार्थसिंधु" व "बोधसागर रहस्य" हे तीन धर्मविषयक ग्रंथ व "सुखदायक राज्य प्रकरणीं निबंध" हा राजकीय विषयक ग्रंथ लिहिला. खरा हिंदुधर्म कोणता व प्रचलित धर्माचारांत व समाजरचनेंत फेरफार घडवून आणणें किती जरूरीचें आहे, हें त्यांनीं आपल्या तीन धर्मविषयक ग्रंथांतून सांगितलेलें होतें. परंतु मिशनऱ्यांच्या बरोबर लेखणीनें किंवा वाणीनें झुंज खेळणारे जे शास्त्री, पंडित व इतर लोक होते, ते मिशनऱ्यांच्याविरुद्ध लिहिण्यापलिकडे व बोलण्यापलिकडे कांहीं करीत नसत. म्हणजे मिशनऱ्यांच्या टीकेचीं व निंदेचीं जीं दोषस्थळें हिंदुधर्मांत व समाजांत आहेत तीं नष्ट करण्याकडे त्यांची कर्तृत्वशक्ति वळली नाहीं. उलट मिशनरी लोकांचें कार्य दुहेरी पद्धतीनें चाललं होतें. ते लोक हिंदुधर्म व समाज यांची भरमसाट नालस्ती करून हिंदूंना व विशेषतः अस्पृश्यांना आपल्या घरांत ओढून आणीत असत आणि घरांत आणल्यानंतर त्या घरांतून बाहेर पडण्याची त्यांना कधींहि बुद्धि सुचूं नये अशाबद्दलची ते दक्षता

बाळगीत असत. हीन, दीन, दरिद्री, अज्ञानी हिंदूंना, अस्पृश्यांना आणि विधवा हिंदूंना बातिस्मा दिल्यानंतर ते त्यांच्या शिक्षणाची, उदरनिर्वाहाची व उन्नतीची तरतूद करीत असत. तर मिशनऱ्यांना शाब्दिक विरोध करणारे शास्त्री-पंडित आपल्याच धर्मबांधवांसाठीं आणि विधवा भगिनींसाठीं इकडची काडी तिकडे हालवायला तयार नव्हते. मिशनऱ्यांचें कार्य व्यावहारिक दृष्टीनें चालू होतें. म्हणून हिंदूंच्या शाब्दिक प्रतिक्रियेमुळें त्या कार्याला अडथळा झाला नाहीं.

श्रीपाद शेषाद्रि या ख्रिस्ती झालेल्या उच्च वर्णीय हिंदूला त्याच्या विनंतीवरून बाळशास्त्री जांभेकरांनीं शुद्ध करून हिंदु केलें. पण तें शुद्धिकरण हिंदूंनीं मान्य केलें नाहीं.

हें शुद्धिकार्य म्हणजे हिंदुधर्माचा उच्छेद होय, अशी हिंदूंनीं ओरड केली व बाळशास्त्र्यावर ग्रामण्य रचून त्यांना वाळींत टाकलें. हिंदूंच्या अशा हीन मनोवृत्तीमुळें मिशनऱ्यांना आपलें धर्मांतराचें कार्य निर्विघ्नपणें वाढवितां आलें. या कार्याला चांगलें चिरस्थायी स्वरूप आणण्यासाठीं मिशनऱ्यांनीं सरकारच्या मागें लागून १८३२ सालीं असा कायदा पास करून घेतला कीं ख्रिस्ती झालेले जे कोणी पूर्वहिंदू किंवा मुसलमान असतील त्यांना पूर्वधर्मांतल्या आप्तस्वकीयांच्या इस्टेटीचा हिस्सा मिळाला पाहिजे. हा कायदा सरकारनें १८५० सालीं सर्व हिंदुस्थानला लागू केला. यामुळें मिशनऱ्यांच्या कार्याचीं पाळेंमुळें सर्व हिंदुस्थानभर पसरण्यास उत्तेजन मिळालें.

हिंदु समाजांतील जातिभेद मोडणें जरूर आहे, हें सुधारक हिंदूंना पटलें. पण यासाठीं काय कार्य करावें याबद्दल त्यांना कल्पना नव्हती. या बाबतींत दादोबा पांडुरंग यांनीं एक कार्यक्रम आंखला. जातिभेद मोडण्यास जे लोक तयार आहेत, अशांनीं प्रथम जातिभेद मोडण्याचें प्रत्यक्ष कार्य केलें पाहिजे, व तें अशा रीतीनें कीं, तें त्या माणसाच्या जातींतील लोकांनीं पाहतां उपयोगी नाहीं. कारण त्या कार्याचा परिस्फोट झाला कीं, सर्व लोकांना जातिबहिष्कार पत्करावा लागेल. म्हणून जातिभेद मोडण्याचें कार्य प्रथम गुप्त करावें असें ठरवून दादोबा पांडुरंग यांनीं मुंबईंत १८१४ सालीं 'परमहंस सभा' ही संस्था स्थापन केली. "कोणी कोणाचा द्वेष करूं नये, ब्राह्मणांनीं महारास तुच्छ लेखूं नये, शूद्रांनीं ब्राह्मणांस हात दाखवीन असें म्हणूं नये, हिंदूंनीं पृथ्वींतील सर्व देशांत व्यापारास जावें, तेथील लोकांशीं सख्यत्व करावें, त्यांची कसबें विद्या शिकावी, अडाणी समजुती सोडाव्या, स्वदेशांत परदेशांतील यंत्रें व हरएक हुन्नर आणावें, काशीपासून लंकेपर्यंत मनांत वर्तमानपत्राद्वारें एक सूत्र खेळत असावें. एकाचें दुःख तें सर्वांचें दुःख व एकाचें सुख तें सर्वांचें सुख असें सर्वांनीं मानीत जावें" अशा अनेकविध उद्देशांनीं परमहंस सभा स्थापन करण्यांत आली होती. (चंदावरकर, पा. १९९).

जातिभेद नष्ट करण्यास तयार झालेले निरनिराळ्या जातींतील लोक तिचे सभासद होते. त्यांत ख्रिस्तीहि होते. ख्रिस्ती झालेले पारशी गृहस्थ रेव्हरंड बाबा पदमजी हे एक सभासद होते. त्यांनीं आपलें चरित्र "अरुणोदय" या नांवानें प्रसिद्ध केलेलें आहे. त्यांत त्यांनीं या सभेचा विधी कसा होता याचें वर्णन दिलेलें आहे.

"मंडळांत प्रवेश करण्यास त्याचे नियम वाचून दाखविल्यावर व त्यानें त्यास आपली संमती दर्शविल्यावर तो ओंजळींत पाणी घेऊन खालीं सोडी, नंतर एक दुधाचा पेला दुसऱ्या कित्येकांनीं तोंडास शिवल्यावर त्याला प्यावयास देत आणि रोटीचा (पावाचा) तुकडा खावयास देत." (रानडे, पानें १२३-१२७). परमहंस सभेचे कार्यक्रम गुप्तपणें होत. तिच्या शाखा मुंबई इलाख्यांत पसरलेल्या होत्या. परंतु या जातिविध्वंसनाच्या कार्याचा परिस्फोट जेव्हां झाला तेव्हां सभासदांना त्यांच्या जातींतील लोकांनीं वाळींत टाकलें. कित्येकांनीं जातीचीं दंडादि शासनें भोगून जातींत प्रवेश मिळविला. अशा परिस्थितींत परमहंस सभा सांपडल्यामुळें तिचे कार्यक्रम थंडावत गेले. व सभा अखेरीस १८६० सालीं बंद करण्यांत आली." (चंदावरकर, पा. २५३). जातिभेदाची ही चळवळ व परमहंस सभेचे गुप्त कार्यक्रम हे सुशिक्षित हिंदु वा अहिंदु यांच्यांपुरते होते. त्या वेळीं सर्वसाधारण हिंदु अस्पृश्यांच्या सांवलीचाहि विटाळ मानीत असत. सुधारक हिंदूंनीं स्वतःच्या सुधारणा-चळवळींत अस्पृश्यांना स्थान दिलेलें नव्हतें, तथापि, सुशिक्षित सुधारक हिंदूंमध्यें अस्पृश्यांबद्दल आपुलकीची जाणीव त्यावेळीं उत्पन्न झालेली होती. "ब्राह्मण महारांची निंदा करितात व त्यांस शिवत नाहींत व इंग्रजाजवळ प्रीतीनें बसतात, हें पाहून मला आश्चर्य वाटतें, शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां महार जवळचे." (लोकहितवादी, शत पत्रें, पत्र नं ६४)

"महार दरवाज्याबाहेर आणि ब्राह्मण आंत असा पक्षपात करूं नये." (विष्णुबुवा ब्रम्हचारी.)

परंतु अशा प्रकारचे अस्पृश्यांबद्दलचे सहानुभूतिपूर्वक उद्गार काढण्यापलीकडे त्या काळच्या सुधारक स्पृश्य हिंदूंनीं अस्पृश्यांसाठीं प्रत्यक्ष कार्य कोणतेंहि केलें नाहीं. त्यावेळीं तशी विस्तृत जागृति नव्हती व परिस्थितिहि नव्हती, ही गोष्ट खरी.

विष्णुशास्त्री पंडित हे एक विद्वान गृहस्थ होते. त्यांनीं विधवाविवाहाला शास्त्राधार दाखवून जीर्णमतवाद्यांची समजूत घालण्याचा अटोकाट प्रयत्न केला. विधवाविवाहाच्या चळवळीला प्रत्यक्ष कार्यांत कायम स्वरूप येण्यासाठीं संस्था स्थापण्याची कल्पना त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांना सांगितली व १८६५ सालीं एक संस्था स्थापन केली. त्यांनीं स्वतः एका विधवेबरोबर विवाह केला. विधवाविवाहाची चळवळ सतत चालू ठेवण्यासाठीं व प्रत्यक्ष विवाह घडवून आणण्यासाठीं पुढें अनेक संस्था निघाल्या व अनेक व्यक्तींनीं या कार्याला वाहून घेतलें. पण लक्षांत ठेवण्या-

सारखी एक गोष्ट अशी कीं, विधवाविवाहाची चळवळ ही फक्त ब्राह्मण जातींतील विधवांपुरती होती; आणि त्या चळवळींतील कर्ते लोक व पुढारी हेहि ब्राह्मणच होते. नाहीं म्हणावयास मलबारी या नांवाचे पार्शी गृहस्थ या चळवळींत होते. परंतु या चळवळीचें क्षेत्र प्रथमतः ब्राह्मण विधवांपुरतें मर्यादित होतें. कारण, ब्राह्मण सुधारकांच्या-डोळ्यांपुढें इतर जातींतील विधवा नसत. त्यांची दृष्टि जातीपुरती मर्यादित होती. ब्राह्मणांची ही चळवळ पाहून सारस्वत, कायस्थ, सोनार, इत्यादि जातींतील सुधारक सुशिक्षितांनीं आपापल्या जातीपुरती विधवा विवाहाची चळवळ चालू केली. मराठे व तत्सम जातींतील विधवांकडे वरिष्ठ जातीतील सुधारकांचें लक्ष गेलें नाहीं. मराठे व तत्सम जाती त्यावेळीं अज्ञानांधःकारांत आणि धार्मिक बंधनांच्या आणि रूढाचारांच्या जाळ्यांत खितपत पडलेल्या होत्या. तेव्हां त्या जातींतील लोकांत विधवा विवाहाची चळवळ उत्पन्न झाली नाहीं.

इंग्रजी शिक्षणानें व संस्कृतीनें आणि मिशनरी लोकांच्या हिंदुधर्मावरील हल्ल्यानें ज्यांचे डोळे उघडलेले होते, अशा सवर्ण जातींतील सुधारक हिंदूंनीं हिंदुधर्मातील रूढाचार दूर करण्याची चळवळ चालू केली. हिंदुधर्मांतील धार्मिक रूढाचारांवरील ज्यांचा विश्वास उडालेला होता अशा सुशिक्षित हिंदूंनीं बंगाल्यांत ब्राह्मो समाज स्थापन केलेला होता. त्या पंथाचे प्रचारक बाबू केशव चंद्रसेन हे आपल्या पंथाच्या प्रचारकार्यासाठीं १८६४ व १८६८ सालीं मुंबईंत आले. ते पट्टीचे विद्वान व वक्ते होते. त्यांचीं धार्मिक विषयांवरील व्याख्यानें ऐकून त्या वेळचे मुंबईतील सुधारक हिंदू बेहद्द खूष झाले होते. माजी परमहंस सभेच्या कार्यकर्त्यांना तर नवीन धर्मपंथ स्थापन करण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. अखेरीस "प्रार्थना समाज" स्थापन करण्याची वाटाघाट ३० डिसेंबर १८६६ रोजीं दादोबा पांडुरंग यांचे बंधु डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या घरीं माजी परमहंस सभेच्या सभासदांनीं केली व ३१ मार्च १८६७ रोजीं (रविवारीं) "प्रार्थना समाज" या नांवाखालीं पहिली जाहीर उपासना झाली. (रानडे, पा. १६५)

प्रार्थना समाजचे कार्यक्रम हिंदु समाजांतील सुशिक्षित व सुधारणावादी लोकांपुरते मर्यादित होते. त्या कार्यक्रमाचें लोण हिंदुसमाजांतील इतर जातीपर्यंत जाऊन पोहोचलें नाहीं; कारण त्या दिशेनें प्रार्थना समाजाच्या कार्यकर्त्यांनीं फारसा प्रयत्न केला नाहीं. बहुजनसमाजापर्यंत तें लोण पोहोंचलें नसल्यामुळें प्रार्थना समाज उच्च वर्णीय जातीपुरताच राहिला. अस्पृश्य वर्गासाठीं प्रार्थना समाजाच्या लोकांनीं प्रथम थोडें कार्य केलें, हें मात्र नमूद करणें जरूर आहे. १८७० सालीं ब्रह्मानंद केशव चंद्रसेन हे विलायतेहून परत आले त्यानंतर त्यांनीं मुंबईंत धोबीतळ्यावरील फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्यें हिंदुस्थानांतील सामाजिक सुधारणेबद्दल एक व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं असें सुचविलें कीं, हिंदुसमाजांत ज्या हीन समजल्या जाणाऱ्या जाती आहेत त्यांची उन्नति करण्याचें कार्य प्रार्थना

समाजानें हातीं घ्यावें. ही सूचना प्रार्थना समाजाच्या कार्यकर्त्यांना पसंत पडली व त्यांनीं मुंबईंत कांहीं ठिकाणीं अस्पृश्यांसाठीं रात्रीच्या शाळा सुरू केल्या. त्याहि थोड्याच वर्षांनीं बंद पडल्या. प्रार्थना समाजाचे एक धनिक सभासद शेट दामोदरदास सुखवाड यानीं १८९१ सालीं भायखळा येथें एक शाळा अस्पृश्यांसाठीं स्वखर्चानें सुरू केली. तीहि थोड्याच वर्षांनीं बंद पडली. (चंदावरकर, पान ३३६-३३७)

समाजाच्या कांहीं कार्यकर्त्यांनीं १८५५ सालीं एक मंडळ स्थापन करून मुंबईतील अस्पृश्यांसाठीं कांहीं शाळा सुरू केल्या. पण त्या लवकरच बंद पडल्या. प्रार्थनासमाजाचे कार्यकर्ते व प्रमुख लोक हे सुधारणावादी असल्यामुळें त्यांनीं सामाजिक सुधारणांचा पुढें जोरानें पुरस्कार केला. परंतु बहुजन समाजाचें लक्ष त्यांना प्रार्थना समाजाकडे खेचतां आलें नाहीं. अस्पृश्यांच्या बाबतींतहि ही गोष्ट लागूं पडते.

दुसरा धार्मिक पंथ आर्य समाज. त्याचे संस्थापक दयानंद सरस्वती. त्यांचें मूळचें नांव मूळशंकर. जातीनें औदीच्य ब्राह्मण. काठेवाडांतील मोरवी या शहरीं १८२४ सालीं त्यांचा जन्म झाला. ११ व्या वर्षापर्यंत त्यांनीं वेदाध्ययन केलें. १४ व्या वर्षाच्या आंत त्यांनीं सारी यजुर्वेद संहिता तोंडपाठ केलेली होती. वयाच्या १४।१५ वर्षी ते शिवरात्रीला शंकराच्या देवळांत शिवलिंगाकडे ध्यान लावून शिवाची आराधना करीत असतांना त्यांना शिवलिंगावरील धान्यकणांचे घास खात एक उंदीर उड्या मारीत असलेला दिसला. या दृश्यानें मूळशंकराच्या मनांत विचारचक्रें फिरूं लागलीं. आपल्यावरील उंदराला दूर करण्याचें सामर्थ्य जर शिवलिंगांत नाहीं तर त्याची आराधना कां करावी असा विचार त्यांच्या मनांत उत्पन्न झाला. मूर्तिपूजा व्यर्थ होय, असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांच्या विचारांची गति वाढत जाऊन तें हिंदुधर्मांतील सर्व रूढाचारांवर येऊन आदळलें. त्यांच्या लग्नाचे बेत घरांत चाललेले आहेत याची चाहूल त्यांच्या कानावर आली व ते घरांतून पळून गेले. काशीला व इतर ठिकाणीं धर्माभ्यास करून शेवटीं त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत नवीन सुधारक धर्मपंथ स्थापन केला. वेद हे ईश्वरप्रणित होत व वेदांत सांगितल्याप्रमाणें धर्माचार हेंच आर्यांचे खरे धर्माचार होत; बाकीचे धर्माचार अनार्यांचे होत, ही आर्य समाजाची प्रमुख भूमिका होय. मूर्तिपूजा, विधवाविवाहाला प्रतिबंध, जातिभेद, हे प्रकार आर्य समाजाला मान्य नाहींत. आर्य समाजाचें बाळपण व तरुणपण इस्लाम धर्म, ख्रिस्ती धर्म आणि हिंदूंचा जीर्णमताभिमानी धर्म यांवर कोरडे ओढण्यांत व त्यांतून उत्पन्न झालेले झगडे खेळण्यांत गेलें. या पंथीय चळवळी वरिष्ठ व कनिष्ठ जातींत पसरल्या, परंतु जातिभेद मोडणें वगैरे बाबतींत त्या धर्मपंथाला जास्त कार्य करतां आलें नाहीं.

तिसरा पंथ सत्यशोधक. याचे संस्थापक जोतिराव गोविंदराव फुले. " यांचा पणजा सातारा जिल्ह्यांतील खातगूण या गांवचा वतनदार चौगुला होता. तेथील कुळकर्ण्यापासून त्याला फार त्रास झाल्यानें त्यानें कुळकर्ण्याचा खून करुन तो पुणें जिल्ह्यांतील पुरंदर तालुक्यापैकीं खानवाडी या गांवीं येऊन राहिला. त्याचा मुलगा शेटीबा हा पुढें पुण्यास आला. त्याच्या तिघा मुलांनीं माळ्याचा धंदा केला. पेशवे सरकारांत फुले यांच्या घरांतून फुलांचा पुडा नित्य जाऊं लागला. या तीन मुलांपैकीं गोविंदराव यांच्या पोटीं जोतिराव हे १८२७ सालीं जन्मले. त्यांना लहानपणापासून शिकण्याचा नाद असे. शेजारीं राहणाऱ्या एका मुसलमान मुनशीच्या उपदेशावरून साहेबाच्या मदतीनें जोतिराव इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. पुढें तेव्हांच्या पुण्यांतील प्रमुख ब्राह्मण मंडळीपैकीं सदाशिवराव गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे वगैरे मंडळीचा स्नेह जमला. जोतिरावाच्या अंगीं कुटुंबांत लहाणपणापासून स्वदेशाभिमानाचें वारें शिरलें होतें. आणि वासुदेव बळवंत फडके याप्रमाणें फुलेहि त्यांचे गुरु लहुजीबुवा यांच्या हाताखालीं गोळीबार व दांडपट्टा वगैरे गोष्टी शिकले. 'गुलामगिरीं' नामक पुस्तकांत जोतिराव यांनी असें लिहिलें आहे कीं या विद्या इंग्रजी सरकारला पालथें घालण्याच्या उद्देशानें मी शिकलों व या कामीं मला सुधारत्या भट्ट विद्वानापासून स्फूर्ति मिळाली होती. पण पुढें ही गोष्ट आपण बरोबर केली नाहीं असें त्यांस वाटूं लागलें होतें. आणि पुढें तर त्यांनीं ब्राह्मण जातीला मोडण्याकरितां सत्यशोधक नामक पंथाचीच स्थापना केली. (टिळक खंड १ ला, पा. ६९-७०) जोतिरावांचें मूळ आडनांव गोऱ्हे. एका ब्राह्मण कारकुनाच्या कारवाईमुळें त्यांचें शिक्षण सातव्या वर्षी बंद पडलें. एका मिशनरी साहेबांच्या प्रोत्साहानें फुले १५ व्या वर्षी शाळेंत गेले. व पुढें त्यांनीं विद्याभ्यास केला. प्रथम त्यांचा ओढा देशकार्याकडे होता. एका ब्राह्मण मित्राच्या लग्नांत नवरदेवाच्या मिरवणूकींत ते नवरदेवाजवळ जाऊन चालूं लागले. तेव्हां ब्राह्मणांनीं त्यांना अद्वातद्वा बोलून मिरवणुकींतून दूर हाकलून दिलें. या व इतर प्रकारांमुळें ब्राह्मण व ब्राह्मणेतर जाती यांच्या सामाजिक परिस्थितीसंबंधीं विचार त्यांच्या डोक्यांत खेळूं लागले. ब्राह्मणेतर समाजांत जागृति करणें अत्यंत जरूर आहे, हा त्यांचा विचार नक्की झाल्यानंतर ते त्या दिशेनें आपला कार्यक्रम आखूं लागले. या बाबतींत त्यांना मिशनरी लोकांकडून स्फूर्त्ति मिळाली, व उत्तेजन मिळालें. मिशनरी लोकांचीं भाषणें व लेख वाचून आणि कार्य पाहून त्यांनीं आपले समाजजागृतीचे कार्यक्रम कायम केले व त्या कार्याला आजन्म वाहून घेण्याचें त्यानीं ठरविलें. १८४८ सालीं म्हणजे वयाच्या २१ वर्षी त्यांनीं मुलींची शाळा पुण्यांत सुरू केली. ज्योतिरावांनीं आपली तरुण पत्नी सावित्राबाई हिला शिक्षण देऊन स्वतःच्या कार्यांत ओढून घेतलें. मुलींच्या शाळेंत त्यांची पत्नी अध्यापिका म्हणून काम करीत असे.

शाळेंत जातांना व परत येतांना त्या साध्वीला टवाळखोर लोक खडे मारीत असत. परंतु तिनें आपलें कार्य सोडलें नाहीं. जोतिरावांनीं अस्पृश्यांच्या वस्तींत जाऊन अस्पृश्यांत मिळून मिसळून वागण्याचा कार्यक्रम सुरूं केला, व त्यांच्यामध्यें जागृति करून त्यांनीं अस्पृश्यांत शिक्षणाची गोडी उत्पन्न केली. त्यांनीं महार व मांग जातींच्या मुलांसाठीं १८५४ सालीं पुण्यांत भोकरवाडी येथें शाळा सुरूं केली. तुमचा मुलगा महारा-मांगांत जाऊन मिसळतो व धर्मभ्रष्टाकार करून तुमच्या कुळीला व पूर्वजांना नरकवासांत लोटतो आहे, असें सांगून टवाळखोर लोकांनीं जोतिरावांच्या वडिलांचे कान भरवून दिले व मग वडिलांनीं जोतिरावाला सपत्निक घराबाहेर हाकलून दिलें. तरीहि जोतिराव व सावित्राबाई यांनीं आपल्या समाज जागृतीचें व समाजसेवेचें कार्य सोडून दिलें नाहीं. त्यांनीं "बालहत्त्या प्रतिबंधक" संस्था १८६३ सालीं स्थापून तिच्यातर्फे ते आपल्या घरांत गरोदर विधवा बायांना प्रसूतीसाठीं आणून ठेवीत. मुलांचें संगोपन नवरा बायको मिळून करीत असत. त्यांनीं १८६४ सालीं शेणवी जातींत एक पुनर्विवाह पुण्यांत घडवून आणला. हा पुण्यांतील पहिला पुनर्विवाह होय. सर अस्कीन् पेरी, कर्नल मेडोज, टेलर, वगैरे युरोपियन गृहस्थांचा जोतिरावांच्या कार्यास पाठिंबा होता. ते त्यांना वेळोवेळीं आर्थिक साहाय्य करीत. दक्षिणा प्राईज कमिटीकडूनहि त्यांना आर्थिक मदत मिळत असे. युरोपियन मित्रांच्या शिफारशीवरून सरकारनें जोतिरावांचा १८५२ सालीं विश्राम बागेंत जाहीर सत्कार केला. त्यांनीं 'शिवाजीचा पवाडा,' 'गुलामगिरी,' 'ब्राह्मणाचें कसब,' 'शेतकऱ्यांचा आसूड,' 'सार्वजनिक धर्म,' इत्यादि पुस्तकें लिहिलीं. ब्राह्मणेतर समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावयास ब्राह्मणेतरांवरील धार्मिक व सामाजिक बंधनें हिंदु धर्मशास्त्रांनीं लादलेलीं आहेत तीं नष्ट केलीं पाहिजेत आणि तीं धर्मशास्त्रें ब्राह्मणांनीं लिहिलेलीं आहेत म्हणून ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांच्या अवनतीस कारणीभूत झालेले आहेत. ब्राह्मणेतर जातीवर ब्राह्मण जातीची जी श्रेष्ठपणाची पकड शेंकडो वर्षें बसलेली आहे, ती प्रथम दूर केली पाहिजे, अशी त्यांची विचारणी होती.

"१८७३ सालीं सप्टेंबरच्या २४ व्या तारखेस त्यांनीं 'सत्यशोधक' समाजाची स्थापना केली. या समाजाचे हेतु प्रसिद्धच आहेत. ब्राह्मणेतर लोक शिक्षणाच्या मार्गास लागावे, त्यांनीं ब्राह्मणांची गुलामगिरी टाकून द्यावी, हा तर या समाजाचा मुख्य हेतु होताच, पण ब्राह्मणेतर समाजानें सामाजिक सुधारणा करावी, मद्यपानासारख्या व्यसनापासून निवृत्त व्हावें, वगैरे गोष्टींचाहि उपदेश ते या समाजाचे द्वारें करीत. "मी कोणत्याहि जातीच्या घरीं अन्नग्रहण करीन" असें स्वतःविषयीं त्यांनीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें होतें. जातिभेदखंडनपर ग्रंथ मुंबईचे तुकाराम तात्या पडवळ यांनीं लिहिला. तो छापण्याची कोणाची हिंमत होईना म्हणून जोतिरावांनीं पुढें होऊन तो छापला असें म्हणतात. "गुलामगिरी", "आसूड", "तत्सागार",

'इषारा', 'ब्राह्मणाचें कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म', वगैरे पुस्तकें त्यांनीं स्वजातीकरितां लिहिलीं. या पुस्तकांची भाषा व त्यांतील विवेचनपद्धति दोन्ही निर्दोष किंवा सुसंस्कृत नव्हतीं, पण ब्राह्मणेतर समाजाचें हृद्गत प्रगट करणारीं पुस्तकें या नात्यानें त्यांना विशेष महत्त्व आहे." (टिळक, खंड १ ला, पा. ७०–७१) आपल्या कार्याची माहिती ब्राह्मणेतर जनतेस करून देण्याच्या उद्देशानें फुल्यांनीं सप्टेंबर १८७३ ते १८७६ पर्यंतच्या चळवळीची माहिती "सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट" या पुस्तकांत प्रसिद्ध केली. त्यांनीं "सत्यशोधक समाज" स्थापनेचा उद्देश रिपोर्टांत दिलेला होता. तो चिपळूणकरांनीं आपल्या निबंधमालेच्या ४४ व्या अंकांत पुढीलप्रमाणें उध्दृत केलेला होता: "ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादि लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरतां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारें हजारों वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीनें आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारें त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरतां म्हणजे धर्म व व्यवहारसंबंधीं ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरतां कांहीं सूज्ञ मंडळीनीं हा समाज ता. २४ माहे सप्टेंबर सन १८७३ इसवीं रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयांवर बोलणें अजी वर्ज्य आहे."

जोतीरावांचें कार्य भरीव होत गेलें व सरकारनें त्यांना पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे सभासद १८७४ ते १८८६ पर्यंत केलें. पुण्यांत मोफत सक्तीचें शिक्षण व्हावें म्हणून त्यांनीं या काळांत प्रचंड चळवळ केली व ठिकठिकाणीं शाळा उघडण्यास सरकारला भाग पाडलें. मुंबईतील गिरण्यांतील व गोदींतील कामगारांची संघटना जोतीरावानीं हातीं घेतली व कामगारांचीं दुःखें दूर केलीं. १८८८ सालांत कामगारांनीं त्यांचा मुंबईत जाहीर सत्कार केला व त्यांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली. जोतीराव फुले हेच किसानकामगारांचे पहिले संघटक पुढारी होत. अस्पृश्यांच्या व स्त्रियांच्या उद्धाराचेंहि तेच पहिले पुरस्कर्ते होत. सयाजीराव महाराज त्यांना हिंदुस्थानचा बुकर टी. वॉशिंग्टन म्हणत.

१८७७ च्या जानेवारींत 'दीनबंधु' या नांवाचें पत्र सुरू करून जोतिरावांनीं व त्यांच्या साहाय्यकांनीं व अनुयायांनीं ब्राह्मणेतर चळवळीची जाहीर घोषणा पुकारली, व ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला जाहीर स्वरूप दिलें. ब्राह्मण लोकांचा धार्मिक, सामाजिक व राजकीय वरचष्मा ब्राह्मणेतर लोकांना कसा सहन करावा लागतो व त्यामुळें ब्राह्मणेतर लोक आपल्या माणुसकीच्या हक्कांना कसे पारखे झाले, त्याबद्दलची सडेतोड विचारसरणी या पत्रांतून जनतेपुढें मांडण्यांत आली. त्यामुळें या विचारांचा ओघ बहुजनसमाजांत पसरूं लागला.

जोतिरावांच्या शैक्षणिक कार्याबद्दल गौरवपर उद्गार ज्ञानप्रकाश पत्राच्या ता. १६ ऑगस्ट १८५२च्या अंकांत काढलेले होते. "जोतिराव गोविंदराव फुले यांनीं म्हार,

मांग, कैकाडी, इत्यादि अतिनीच मानलेल्या जातीस कांहीं विद्येचा संस्कार घडून त्यांचें दुर्भाग्य व दुराचार घालवावें म्हणून शाळा पेठ जुनी गंज येथें घातली. त्यांत शंभर मुलें आहेत. व दुसरी एक त्याच जातीची मुलींची शाळा आहे. त्या दोन्ही शाळा आजपर्यंत त्यांनीं आपले पदरचा खर्च करून शिकविल्या. हल्लीं दक्षिण कमिटीनें गरीब लोकांची दया करून व शाळा घालणाऱ्यांची "सर्व भूतहिते रता" अशी बुद्धी पाहून तीनशें रुपये दरसाल दक्षिणेंतून त्यांस खर्चास देण्याचें ठरविलें आहे. असें ऐकून आम्हांस संतोष वाटतो. कारण कीं, हा विद्यावृद्धीचा नवा मार्ग आहे." (वृत्तपत्रांचा इतिहास, पा. २५१-५२)

सामाजिक व धार्मिक बाबतींतील ब्राह्मण जातीचें श्रेष्ठत्व नष्ट व्हावें आणि ब्राह्मणेतर समाजांतील दरिद्री व श्रमजीवी जातींचें जीवन सुखी व्हावें, याबद्दल जोतिरावांची रात्रंदिवस धडपड चालू होती. शेतकऱ्यांना सरकारी साहाय्य मिळवून देण्यासाठींहि ते प्रयत्न करीत. शेतकऱ्यांच्या सभा भरविण्याचा पायंडा त्यांनींच पाडला. अशिक्षित व दरिद्री जनतेपेक्षां सुशिक्षित व खाऊन पिऊन सुखी असलेल्या जनतेकडेच सरकार जास्त लक्ष देतें, अशी ते शेतकऱ्यांच्या सभेंतून टीका करीत. शेतकऱ्यांनीं संघटित व्हावें, आपल्या संघटनेच्या शक्तीवर सरकारला आपलीं दुःखें ऐकावयास लावावें, तीं दुःखें दूर करण्यास लावण्यास सरकारला भाग पाडावें, अशी शिकवण ते आपल्या व्याख्यानांतून शेतकऱ्यांना देत. मुसलमानी आणि पेशवाई अंमलांत शेतकऱ्यांची मनस्वी पिळणूक झाली, याबद्दल ते व्याख्यानांतून सविस्तर माहिती देत. या काळांत शेतकऱ्यांवर करांचे बोजे लादलेले होते. व सरकारकडून शेतकऱ्यांना मदत वा उत्तेजन मिळत नसे. पेशवाईच्या काळांत तर शेतकऱ्यांवर जुलमांचा कळस झाला, शेतकऱ्यानें सारा व कर दिला नाहीं तर त्याचें घर, शेत व गुरें जप्त करण्यांत येत. शिवाय त्या शेतकऱ्याला गांवच्या चावडीसमोर झाडाला उलटे टांगून त्याच्याखालीं मिरच्या जाळून त्यांत शेतकऱ्याचा जीव गुदमरून टाकण्यांत येई. कधीं कधीं तर त्या शेतकऱ्याला वाकायला लावून त्याच्या पाठीवर मोठी शीला ठेवण्यांत येई. तीवर त्या शेतकऱ्याच्या बायकोला बसविण्यांत येई. या हालअपेष्टांनीं शेतकऱ्यांना जीव व संसार नकोसा वाटे. ही परिस्थिति इंग्रजांच्या कारकीर्दीत राहिली नव्हती. याबद्दल जोतीराव शेतकऱ्यांच्या सभांमधून सांगत. इंग्रज सरकार न्यायी आहे अशी त्यांची ठाम समजूत झालेली होती, म्हणून ते शेतकऱ्यांना सांगत कीं, तुम्हीं संघटित व्हा आणि असलीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानीं घालून न्याय मिळवा. त्यांच्या उपदेशाचा परिणाम शेतकऱ्यांवर झाला. जुन्नर, सासवड वगैरे भागांतील शेतकरी संघटित झाले, व त्यांचा मोर्चा जोतीरावांनीं पुण्याच्या कलेक्टरकडे नेला. शेतकऱ्यांचीं दुःखें दूर करण्याचें कलेक्टरनें आश्वासन दिलें. पण पुष्कळ दिवस लोटले तरी कलेक्टरनें सदर प्रकरणांत कांहीं केलें नाहीं. तेव्हां जोतीराव खूप चिडले व सरकारच्या या अनास्थेबद्दल शेतकऱ्यांच्या सभांमधून टीका करूं लागले. त्यांच्या टीकेला पायबंद घालण्यासाठीं

कलेक्टरनें प्रयत्न केले, पण जोतीरावांचें टीकाचक्र सरकाराच्या डोक्याभोंवतीं एक-सारखें फिरत राहिलें. या टीकेला आळा घालण्याचा एक मोका आला.

ड्यूक ऑफ यॉर्क हे हिंदुस्थानांतील दौऱ्यावर असतां पुण्याला आले. तेव्हां त्यांच्या स्वागतार्थ जो जंगी समारंभ पुण्यांत सरकारतर्फे करण्यांत आला होता त्यास हजर राहण्याचें आमंत्रण जोतिरावांना सरकारनें पाठविलें, तेव्हां ड्यूक साहेबांतर्फे लंडनमधील लोकांना हिंदी शेतकऱ्यांची स्थिति कळविण्याची युक्ति जोतिरावांनीं योजिली. ते हातांत निमंत्रणपत्रिका घेऊन समारंभाच्या राजशाही मंडपांत शिरले ते शेतकऱ्याच्या फाटक्या तुटक्या वेषांत! कमरेला जुनें फाटकें धोतर, डोकीस जुनें मुंडासें, अंगांत फाटकी बाराबंदी आणि खांद्यावर घोंगडी! जोतिरावांचें हें ध्यान पाहून कलेक्टर मनांत वरमला. १८८८ सालांत कॉंग्रेसचें अधिवेशन मुंबईला भरलें होतें तेव्हांहि शेतकऱ्याचा एक पुतळा त्यांनीं मंडपाच्या प्रवेशद्वारावर उभारून पुढाऱ्यांचें लक्ष शेतकऱ्यांकडे वेधलें होतें.

जोतिराव ब्राह्मणांना व ब्राह्मण्यग्रस्त हिंदुधर्माला ठोसे देण्याचें कार्य करीत असतांना इतर समाजोपयोगी कामें करीत असत. त्यांच्या प्रचारामुळें ब्राह्मणेतरांत जागृती झालेली होती. पुण्यांतील एका न्हाव्यानें आपल्या नवीन बांधलेल्या घराची वास्तुशांती करण्यासाठीं ब्राह्मणाला बोलावलें. न्हाव्याच्या घराची वास्तुशांती करणाऱ्या ब्राह्मणावर इतर कर्मठ ब्राह्मणांनीं ग्रामण्य करण्याचें ठरविलें. यामुळें पुण्यांतील ब्राह्मण व न्हावी यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. न्हावी लोक जोतिरावांकडे गेले. 'तुम्ही ब्राह्मणांची हजामत करूं नका,' असा जोतिरावांनीं न्हाव्यांना सल्ला दिला. त्याप्रमाणें न्हाव्यांनीं ब्राह्मणांवर बहिष्कार पुकारला व जातीतर्फे ठराव मंजूर करून तो प्रसिद्ध केला. तेव्हां पुण्याचे ब्राह्मण गांगरून गेले. ग्रामण्य करण्याचें त्यांनीं सोडलें. हें प्रकरण १८६० सालीं "न्हावण्यास्त्र" ह्या नांवानें पुण्यांत गाजलें (रानडे, पान ११९-१२०). ब्राह्मण लोक ब्राह्मणेतरांना धार्मिक बाबतींत फसवतात, तसेच ते व्यवहारांतहि ब्राह्मणेतरांचें रक्तशोषण करतात, याचीं उदाहरणें जोतिराव आपल्या प्रचारांतून मांडत असत. ब्राह्मण सावकार ब्राह्मणेतरांना व शेतकऱ्यांना फसवून कसे नागवतात, याचीं पुष्कळ उदाहरणें गोळा करून त्यांनीं जुन्नर तालुक्यांतील शेतकऱ्यांतर्फे सरकारकडे तक्रारी-अर्ज १८८४ च्या जुलै महिन्यांत पाठविला होता.

गरोदर विधवा स्त्रिया, मग त्या ब्राह्मण असोत वा अब्राह्मण असोत, त्यांच्या बाळंतपणाची व्यवस्था करण्याची पहिली संस्था जोतिरावांनीं १८६३ सालीं स्थापन केली. लाला शंकर उमिया शंकर या प्रार्थना समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना या कार्याची स्फूर्ति मिळाली व त्यांनीं १८७८ सालीं पंढरपूरला "अनाथ बालकाश्रम" काढला. त्याच सुमारास लोकहितवादींनीं नाशिकला एक संस्था स्थापन केली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



"दीनबंधू" पत्रांतून ज्योतिरावांनीं विधवांच्या संबंधीं लेखमाला सुरू करून त्यांच्या वपनाला प्रतिबंध करणारी चळवळ उत्पन्न केली. "नापितांचा वर्ग निष्कारण विधवांचे शाप आपल्या शिरावर घेत असतो, केशवपनाच्या पापाचरणापासून त्यांना किफायत होते म्हणावी तर तसाहि भाग नाहीं," असे बरेच लेख दीनबंधूनें प्रसिद्ध केले. दीनबंधूच्या संपादकांनीं नापितांना समक्ष उपदेश करून या बाबतींत त्यांचीं मनें वळविलीं. दीनबंधूला त्याच्या व्यवसायबांधवांनीं (इंदुप्रकाश व सुबोध पत्रिका) प्रोत्साहन दिलें. इंदुप्रकाशांतून एका गृहस्थानें 'वपनाच्या जबरदस्तीबद्दल कोणी विधवा फौजदारींत फिर्याद नेण्याला तयार असल्यास त्या कामीं लागेल तितकें द्रव्य खर्च करायला आपण तयार आहों !' अशा अर्थाची जाहिरात प्रसिद्ध केली. विधवांनीं हा जुल्म टाळण्याकरितां फौजदारी कोर्टांत धांव घ्यावी असें इंदुप्रकाशाचें मत त्यावेळीं बाहेर आलें. जोतिरावांच्या प्रेरणेनें न्हाव्यांची १४ एप्रिल रोजीं (१८८८) एल्फिन्स्टन नजीक कँपाचे मैदानांत मोठी सभा भरली. ४००-५०० न्हावी जमले होते. आर्यसमाजाच्या व प्रार्थना समाजाच्या कांहीं पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. कित्येक न्हाव्यांनीं आपले विचार प्रदर्शित केले. एक वृद्ध न्हावीबोवा म्हणाले कीं, शास्त्राला मान्य नसलेलें पापकर्म ब्राह्मण चार पांच आण्याच्या प्राप्तीसाठीं आपल्याला करावयास लावतात आणि आपण मात्र आठ दहा रुपये उपटतात. सभेंत विधवांचें वपन करूं नये, अशा अर्थाचे ठराव पास झाले. न्हाव्यांच्या सभेची बातमी इंग्लंडला पोचल्यावर तेथील कांहीं स्त्रियांनीं न्हाव्यांना हें सहृदयतेचें कार्य हातीं घेतल्याबद्दल एक अभिनंदनपर पत्र पाठविलें. न्हाव्यांनीं उलट बॉंबे गॅझेटांत एक आभारप्रदर्शनाचें पत्र लिहून आपला निश्चय तडीस नेण्याला विलायतच्या स्त्रियांनीं मदत करावी, अशी विनंती त्यांस केली. परंतु सभा आणि ठराव यापलीकडे सदर चळवळीची मजल गेली नाहीं, असें नंतरच्या अनुभवावरून म्हणावें लागतें." (रानडे, पा. ४३०-३१)

जोतीराव ता. २७ नोव्हेंबर १८९० सालीं वारले. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील ४० वर्षे ब्राह्मणेतर समाजांत चळवळ चालविण्यांत घालविलीं. त्यांनी आपल्या आयुष्याचा व संसाराचा लोकसेवेपायीं अक्षरशः संन्यास केला. सत्यशोधक समाजाला व जोतीराव फुल्यांना डोळयांत भरण्यासारखें कार्य जरी करतां आलें नाहीं तरी ब्राह्मणेतर समाजांतील अडाणी व गांजलेल्या लोकांत आत्मजागृतीची जळती ज्योत पहिल्यांदा त्यांनीं पेटविली. सत्यशोधक समाजानें १९१९-१९२७ च्या काळांत महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर समाजांत जोराची विचारजागृती केली. जोतीराव फुले व सत्यशोधक समाज हे ब्राह्मणेतर बहुजन समाजाचे विचारक्रांतीकारक प्रेरक होत !

जोतिराव ब्राह्मणद्वेष्टे होते, या आक्षेपांत आतां कांहींच सत्य नाहीं, हें उघड झालेलें आहे. कोल्हापूर, बडोदे, इंदूर येथील संस्थानांत सरकारनें बनवाबनवीचे प्रकार करून त्या संस्थानांच्या राजांना पदच्युत करण्याच्या जेव्हां कारवाया केल्या

तेव्हां रानडे, सार्वजनिक काका, टिळक, आगरकर वगैरे समाजसेवकांनीं सरकारच्या या अन्यायी वर्तनाविरुद्ध जनतेंत मोहीम सुरू केली. त्या मोहिमेंत जोतिराव या सर्व ब्राह्मण समाजसेवकांबरोबर कार्य करीत होते. टिळक व आगरकर हे डोंगरीच्या तुरुंगांतून सुटले, तेव्हां जोतिरावांनीं या दोघांचा जाहीर सत्कार मुंबईंत व पुण्यांत केला तो ब्राह्मणेतरांकडून. या दोघांना बगींत बसवून त्यांची मिरवणूक ब्राह्मणेतरांनीं ती बगी ओढत ओढत मुंबईत व पुण्यांत काढली. जें कार्य सत्याच्या पायावर उभारलेलें आहे, तें कार्य ब्राह्मणांनीं जरी चालू केलें असलें तरी त्यांत जोतिराव भाग घेत. त्यांचा राग ब्राह्मण जातीवर नव्हता, तर ब्राह्मणेतरांना सर्व तऱ्हेच्या गुलामगिरींत डांबून टाकण्याच्या त्यांच्या मनोवृत्तीवर आणि कृतींवर होता.

तिसरा पंथ थिऑसाफी. कर्नल ऑल्काट व मॅडाम ब्लॅव्हाट्स्की यांनीं १८७५ सालीं अमेरिकेंत थिऑसफी संस्था स्थापन केली. कर्नल ऑल्काट हे १८६० च्या नीग्रो स्वातंत्र्याच्या युद्धांत कर्नल म्हणून होते. ते हिंदुस्थानांत येऊन पुढें स्थायिक झाले. सर्व धर्मांचीं उत्तमोत्तम तत्त्वें पाळणें, सर्व धर्मांना समभावनेनें पाहणें व या दोन मार्गांनीं विश्वबंधुत्वाची जाणीव जगांतील माणसांत प्रसृत करणें, हे या पंथाचे उद्देश होते. ऑल्काट व ब्लॅव्हट्स्की यांनीं मुंबईंत १८ ऑक्टोबर १८७९ ला थिऑसफी पंथ स्थापन केला. त्यांत सर्व धर्मांचे लोक होते. अर्थात सुशिक्षित. त्यांत हिंदु सुशिक्षित व सुधारक लोकहि होते. या पंथाची चळवळ उदात्त व उच्च ध्येयावर आधारलेली असल्यामुळें बहुजनसमाजांत तिचें लोण गेलें नाहीं. या पंथाची पंढरी मद्रास प्रांतांतील अड्यार हें गांव होय.

हिंदु धर्म, समाज, व सामाजिक अनिष्ट चालीरीती यांच्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं जे सुशिक्षित सुधारक हिंदु प्रयत्न करीत होते त्यांना विरोध करणारे सनातनी शास्त्री व अर्धवट जुन्या शिक्षणानें तयार झालेले जीर्णमताभिमानी ब्राह्मण व तत्सम जातींतील लोक होते. पण पुढें या सुधारणाचळवळींत अशी परिस्थिति उत्पन्न झाली कीं, इंग्रजी उच्च शिक्षण घेतलेले पण जुनें तें सोनें असें मानणारे सुशिक्षित ब्राह्मण सुधारकांच्या चळवळीला प्रत्यक्ष विरोध करूं लागले. या लोकांचा कल सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या अगोदर राजकीय सत्ता काबीज करण्याकडे जास्त होता. अशा लोकांपैकीं विष्णुशास्त्री चिपळुणकर व लोकमान्य टिळक हे प्रमुख होते. चिपळुणकर हे शाळाखात्यांत शिक्षक होते. ते आंग्लविद्याविभूषित आणि संस्कृतचे पंडीत होते. त्यांनीं १८७४ च्या जानेवारीला निबंधमाला मासिक सुरू केलें व ८४ अंक काढून तें बंद केलें. चिपळुणकरांनीं आपल्या मासिकांतून सुधारक हिंदु, हिंदुधर्म व समाज यांच्यावर ज्यांनीं ग्रंथ व टीकालेख लिहिले असे युरोपियन ग्रंथकार, मिशनरी लोक, प्रार्थना समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज यांच्या चळवळी यांबद्दल जोराचे टीकात्मक लेख लिहिले.

१८७५ च्या जुलैमध्यें स्वामी दयानंद पुण्याला दौऱ्यावर आले. तेथें त्यांनीं दोन महिने हिंदु धर्म, वेदशास्त्रें इ. विषयांवर जाहीर भाषणें करून सुधारक सुशिक्षित हिंदूंमध्यें आर्य धर्माबद्दलचें चैतन्य उत्पन्न केलें. जातिभेद, विधवा, अनिष्ट धर्माचार, ब्राह्मणांचें अडाणी धर्मज्ञान वगैरे विषयांवर खरमरीत टीका करून दयानंदांनीं पुणेरी भटभिक्षुकांना दे माय धरणी ठाय करून सोडलें. खिरती धर्म व मिशनरी यांच्यावरहि त्यांनीं वाक्प्रहार केले. पुण्याचे पुराणमताभिमानी महामहोपाध्याय रामशास्त्री आपटे हे सनातन धर्मातर्फे भाषणें करून दयानंदांचे मुद्दे खोडून काढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. त्याचप्रमाणें खिस्ती धर्माचा स्वीकार केलेले ब्राह्मण गृहस्थ रेव्हरंड नीळकंठ शास्त्री थत्ते काशीकर हे खिस्ती धर्मावरील दयानंदांचे आरोप खोडून टाकण्यासाठीं दयानंद ज्या ठिकाणीं भाषणें करीत तेथेंच आपलीं भाषणें करीत. (रेव्हरंडानीं बायबलचें संस्कृतमध्यें अनुष्टुभ छंदांत भाषांतर केलेलें होतें. निबंधमाला, पा. ४४२) परंतु दयानंदांच्या विद्वत्तेपुढें व वक्तृत्त्वापुढें हे दोघेहि विरोधक प्रेक्षक व श्रोते यांच्यामतें फिके पडत. त्यावेळचे पुण्याचे नामांकित वकील गंगाराम भाऊ म्हसके यांनीं दयानंदांना आपल्या घरीं भाषणांस येण्याचें आमंत्रण दिलें. त्यांनीं स्वामिजींना हत्तीवर बसवून समारंभपूर्वक आणण्याचें ठरविलें. तेव्हां स्वामींनीं त्यांना सांगितलें कीं, वेदांना हत्तीच्या अंबारींत ठेवा व त्यांची मिरवणूक काढा. त्याप्रमाणें मिरवणूक निघाली. तेव्हां दयानंदांच्या तीव्र वाक्प्रहारांनीं जर्जर झालेले पुण्याचे जीर्णमताभिमानी व प्रतिगामी विचारांचे ब्राह्मण लोक, आणि त्यांनीं हातीं धरलेले ब्राह्मणेतर लोक यांनीं स्वामीजींची टिंगल करण्याचा डाव रचून तो अंमलांत आणला. "त्यांनीं स्वामीजींची थट्टा करण्यासाठीं स्वामीप्रमाणें पिवळट रंगाचा एक फेटा एका गाढवाच्या डोक्याला बांधला, आणि त्याच्या पाठीवर भरजरी शाल घालून "गर्दभानंदा" चा जयघोष करीत त्याला शहराच्या सर्व रस्त्यांतून फिरविलें... (दयानंदांची) मिरवणूक बुधवारांतल्या भिडेवाड्यानजीक आल्यावर समोरून गर्दभानंदांची स्वारी प्रेक्षकगणांसह वाजत गाजत आली. त्याच्या जयजयकारानें सगळें वातावरण दणदणलें...गर्दभस्वामींची मिरवणूक भिड्यांच्या वाड्यापाशीं थोड्या उशीरानें पोहोंचली. त्यामुळें दयानंदस्वामींना घेऊन मंडळींना वाड्यांत सुरक्षित पोहचण्याला अवकाश मिळाला. दयानंद दिवाणखान्यांत पोहोंचले व स्थानापन्न झाले. त्यांचें समारोपाचें भाषण ऐकण्याला श्रोतृमंडळी पूर्वीं दोनतीन तास तिष्ठत बसली होती. भर रस्त्यांत दयानंद व त्यांचे सहचारी यांस गांठून त्यांची दाणादाण उडविण्याची गर्दभभक्तांची इच्छा निष्फळ झाल्यानें त्यांना अधिक त्वेष चढला. व त्यांनीं गर्दभानंदाच्या जयजयकारांत स्वामींचें दिवाणखान्यांतलें भाषण जिरवून श्रोत्यांचा व समारंभाचा विरस करण्याची युक्ती योजली. स्वामींचा एक शिष्य ही परिस्थिति पाहून चिडला. त्यानें पोलिसांना मदतीस घेऊन गर्दभानंदाच्या पाठींत सोडग्याचे धपाटे घातले. बिचाऱ्या गाढवाला मिरवणुकीचा

आनंद भोगण्याचें ज्ञान नसलें तरी माराचें दुःख समजलें व ते आपल्या नैमित्तिक भक्तांच्या गराड्यांतून पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. भक्तांनीं त्यास आडवून धरलें आणि तेथून पुढें मिरवणुकीचें दंग्यांत रूपांतर झालें. दंगेखोर गर्दभभक्तांनीं प्रथम हत्तीवर दगडविटकरांचा मारा केल्यामुळें माहुतानें त्यास दुसरीकडे नेलें... त्या दिवशीं पाऊस पडून रस्त्यांत चिखल झाला होता.....बऱ्याच सन्मान्य मंडळींना चिखलगोळ्यांचा प्रसाद मिळाला. खालीं रस्त्यांत यावेळीं पोलिसांची व लोकांची मारामारी जुंपली होती. दुसऱ्यांना चिथावून आपण नामानिराळे राहणारे गृहस्थ गर्दभानंदाच्या जमावांत नव्हते असें नाहीं. दूर उभे राहून ते चाललेला प्रकार पहात होते. गर्दभानंदाच्या मानवी साथीदारांनीं आतां आपल्या गुरूच्या जयजय-कारानें कंठशोष करण्याचें सोडून, दयानंदांच्या स्नेही नागरिकांना नांवनिशीवार शिव्या हासडून घसा फोडण्यास आरंभ केला. हा धुमाकूळ रात्रीं नऊ वाजेपर्यंत चालला होता......गर्दभानंदाला मिरविणारांतले दोघे पुढारी पोलिसांनीं गिरफदार केल्यावर त्यांस शिक्षा भोगावी लागली. हे पुढारी कमिशन कचेरींतील पट्टेवाले होते. त्यांच्या हातून गुन्हा घडला होता; पण त्यांच्यामागें लपलेले खरे पुढारी निराळेच होते. गुन्ह्याच्या चौकशीमध्यें ते बुरख्यांतून बाहेर ओढले गेले......त्यांनीं माधव-रावांना (रानडे) शरण जाऊन त्यांची क्षमा मागितली......तुसत्या क्षमेच्या याचनेवर कारस्थानी दयानंदद्वेष्ट्यांची सुटका झाली...ही गोष्ट १८७५ च्या सप्टें-बरांतल्या पांचव्या तारखेस घडली. (रानडे, पानें २३३–२३७)

चिपळुणकरांनीं आपल्या निबंधमालेच्या कांहीं अंकांतून "वक्तृत्व" या विषयावर विस्तीर्ण निबंध प्रसिद्ध केला होता. निबंधमालेच्या २३ व्या अंकांत "हिंदुस्थानांतील इतर भागांतील प्रसिद्ध वक्त्यांचाही कांहीं निर्देश करणें अवश्य होय" अशी प्रस्तावना करून बाबू केशवचंद्र सेन व बाबू प्रतापचंद या दोन ब्राह्मोसमाज प्रचारकांचीं व ब्राह्मो समाजाच्या कार्याची त्यांनीं भरपूर हजेरी घेतली. "आतां सरतेशेवटीं वरील दोघांहूनही जाडें प्रकरण जें वरील महाविख्यात स्वामी त्यांच्या-विषयीं कांहीं लिहूं" असा दयानंदांचा निर्देश करून चिपळुणकरांनीं त्यांची खूपच टवाळी केली. "वरील दोघा बाबूंच्याहूनही वरच्या पदवीस चढवण्याचें कारण उघडच आहे. कीं, ते त्यांच्यासारखे केवळ प्रेषित होऊं पहात नाहींत; तर बुद्ध, ख्रिस्त, महंमद, राममोहन रॉय यांच्याप्रमाणें नव्या पथाचा प्रवर्तकच होण्याची त्यांनी उमेद धरली आहे. स्वामीमहाराजांनीं आमच्या पुण्यपत्तनास आपल्या पवित्र मूर्तीनें पावन करून कांहीं महिन्यांपूर्वी देशोन्नतीप्रीत्यर्थ जीं अनेक व्याख्यानें दिलीं त्यांतील एकांत आपल्या भाविक शिष्यवृंदास आपला चरित्रमहिमा त्यांनीं ऐकविला. त्यावरून असें कळतें कीं, आर्यसमाजवाल्यांची पुण्यभूमि व महातीर्थ गुजराथेंतील अजमीर नाम गांव होणार! कबीर, तुकाराम, तुळशीदास वगैरे आजपर्यंत थोर व पुण्यशील मानलेल्या महामूर्ख व महादुष्ट लोकांची तेजोहानि करून, महार, मांग प्रभृति शूद्रजातींचा अभ्युदय करणारे तेज तेथें उदय पावलें." (माला, पान ३१३)

हिंदुसमाजांतील जातिभेद व अस्पृश्यता हीं नष्ट केलीं पाहिजेत, या मुद्यांवर दयानंदांनीं आपल्या व्याख्यानांत शास्त्राधार दाखवून ते लोकांना पटवून दिले. हे त्यांचे मुद्दे खोडून काढण्यास त्यावेळीं पुण्यांत एकसुद्धां शास्त्री-पंडित नसावा, याची खंत वाटली म्हणून व दयानंदांनीं ब्राह्मणांच्या मूर्ख आचारविचारांचा आपल्या व्याख्यानांतून धुव्वा उडवून दिला होता म्हणून चिडून गेलेल्या चिपळुणकरांनीं स्वामीजींचा महार, मांगप्रभृति शूद्र जातीचा अभ्युदय करणारें तेज उदय पावलें, असा कुत्सितपणें उल्लेख केला. त्यांच्या म्हणण्याचा साराश असा कीं कबीर, तुळशीदास, तुकाराम इत्यादि थोर संतांना महार-मांगांना शिवून घेण्याची कल्पना आली नाहीं, ती दयानंदाला आली, यावरून ती कल्पना खोटी! उपरिनिर्दिष्ट संतांच्या शिकवणुकीच्या विपर्यास चिपळुणकरांनीं जाणून बुजून केला, याचें कारण त्यांची प्रतिगामी विचारसरणी व ब्राह्मणी श्रेष्ठत्वाबद्दल अंधभक्ति !

महादेव गोविंद रानडे, इतर समाजसुधारक, प्रार्थना व ब्राह्मो समाजाचे कार्यकर्ते यांनीं दयानंदांना पुण्यास आमंत्रण देऊन बोलावलें व त्यांचीं व्याख्यानें करविलीं. याबद्दल चिपळुणकरांनीं केलेल्या उल्लेखांपैकीं कांहीं मासले येथें देत आहोंत :

" शिष्यपरिवारासह यथेच्छ चमचमीत पाहुणचार, धर्मजिज्ञासु व मुमुक्षु जनांची दर्शनार्थ नेहमीं दाटी, विद्वत्तादि गुणांचा सर्वतोमुख जयजयकार अशा सोहळ्यांत त्यांचें जेथें तेथें कालक्रमण झालें. श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य उंच व्यासपीठावर खुर्चीवर बसलेले, त्यांच्या सरस्वतीच्या ओघाचा थेंब न् थेंब टिपून घेण्यास लेखक मंडळी बसलेली, भोंवतालीं स्वामींचे मुख्य पुरकर्ते असे कोणी बडे विद्वान्, कोणी छोटे विद्वान् वक्तृत्वाचें सेवन करून माना डोलावण्यास व हंसून विनोदास रंग आणण्यास सदा तत्पर असलेले, आणि सगळ्या दिवाणखान्यांत कोणी केवळ मौज पाहण्याकरितां, कोणी मूर्तिपूजेस कंटाळून सप्रमाण मुक्त होण्याकरतां, कोणी वक्तृत्वाचा लाभ करून घेण्याकरतां, कोणी ब्राह्मणांची व भटांची फजिती ऐकण्याकरतां, अशा निरनिराळ्या उद्देश्यांनीं जमलेल्या मंडळींचा थाट, असा अपूर्व श्रोतवृंद पाहून कोणत्या वक्त्यास धन्य वाटणार नाहीं ! मग अगोदरच पंडितमन्य व अहंकाराचें वसतिस्थान असे आमचे परमहंस तर केवळ आकांडतांडव करूं लागले यांत काय आश्चर्य ?" (माला, पानें ३१५-३१६)

हिंदु धर्मांतील ३३ कोटी देव व मूर्तिपूजा यांवर प्रार्थनासमाजवादी व दयानंद यांनीं खूप कोरडे ओढून जगांत एकच देव आहे व फक्त त्याचीच भक्ति व पूजा करावी, असा प्रचार केला. त्याबद्दल चिपळुणकर लिहितातः

" तीं तुमचीं जुनीं देवळें, जुनीं व्यासपीठें, जुनीं धर्मपुस्तकें वगैरे आतां सर्व विसरा. हल्लीं इंग्रजी राज्यांत नवीं नव्या पद्धतींचीं मंदीरें जेव्हां बांधाल, खुर्च्या

टेबलें आंत ठेवाल, ‘ प्रार्थना संगीता ’ सारखीं अगदीं गाळीव धर्मतत्त्वाचीं अत्यंत शुद्ध अशीं पुस्तकें जेव्हां बाळगाल व युनिव्हर्सिटींत पास होऊन मोठाले किताब मिळविलेल्या एकाद्या विद्वानास धरून त्याच्या धोरणानें जेव्हां चालाल तेव्हां स्वर्गाचा मार्ग तुम्हास दिसेल. पूर्वींचे मार्ग आतां सारे बंद झाले आहेत—अशा प्रकारचा उपदेश मिशनरी लोक व त्यांच्याच मतांचें थोडेसें रूपांतर करून देशांस नवा धर्म देऊं पाहणारे आमचे नवीन पंडीत हे आज वर्षानुवर्षे करीत आलेत. पण त्यांच्या इतक्या दिवसांच्या उपदेशानें, इतक्या व्याख्यानांनीं, इतक्या मासिक पुस्तकांनीं व इतक्या ग्रंथांनीं तेहतीस कोटींतला एकही देव कमी झाला नाहीं किंवा एकही मूर्ती भंगली नाहीं!” ( माला, पान ३१५ )

दयानंदांची व वेदांची पुण्यांत मिरवणूक काढण्यांत आली तेव्हां उपद्व्यापी ब्राह्मणांनीं त्या मिरवणुकीला अपशकून करून मिरवणुकीचा विरस करण्याचा प्रयत्न केला. त्या प्रसंगाचें वर्णन चिपळुणकरांनीं खालीलप्रमाणें केलें होतें:

“ श्रीमत्परमहंसांनीं आपल्या चुटपुटल्या शास्त्रज्ञानानें पुण्याच्याच काय पण सगळ्या भारतवर्षीय पंडीतांचाही पराभव करून टाकला, व त्यांच्यांशीं वादास उभें राहण्यास कोणाचीही छाती होईना. एवढा प्रताप आमच्या मतें कोणत्याही समंजस व सूज्ञ माणसास पुरेसा झाला असता. पण रिपुषट्कांचा स्वामींनीं जय केला असतांही त्यांतील पांचवा एकाएकी उच्छृंखल होऊन त्यानें शिष्यमंडळीस जें प्रेमाचें व भक्तीचें भरतें आलें त्यांस सहाय्य केलें. स्वामींची नव्या नवऱ्या मुलाप्रमाणें मोठ्या थाटाची वरात निघणार ही बातमी पुष्कळास अगोदर खरीशीही वाटेना. गटारयंत्रावरील भटांनीं ती उगीच द्वेषबुद्धीनें पिकवली असेल असें वाटलें. पण अंमळशानें पाहतात तों सर्वांची भ्रांती फिटली. महारापोरांनीं व कामाठ्यांनीं मशाली व दिवट्या धरल्या आहेत, परमहंस गजेंद्रावर आरूढ झालेले आहेत, पुढें वाजांचे ताफे चालले आहेत व लबाड आणि दुष्ट ब्राह्मणांच्या चिरकालिन दास्यांतून विमुक्त झालेले असे त्यांचे शिष्य मोठी कृतकृत्यता मानून आपल्या सद्गुरूंचा पार्श्वभाग सुशोभित करताहेत, अशा थाटानें पालखींत मिरवलेल्या शास्त्राच्या सवाईनें स्वारी ब्राह्मणांचें नाक ठेचीतच शहरांत प्रवेश करती झाली. शेवटीं बुधवारांत दाखल होऊन ज्या ठिकाणाहून दयेचें व आनंदाचें शुभवर्तमान चोहोंकडे फैलावलें त्या पवित्र जागीं सगळे वऱ्हाडी येऊन दाखल झाले. श्रीमंत सिंहासनावर चढले, मग सद्धर्माच्या प्रित्यर्थ येवढा खटाटोप करून थकलेली अशी शिष्टमंडळी मोठी कृतकृत्य होत्साती जागजागीं बसली. नंतर एकादोघा सच्छिष्यांनीं सुरस भाषणें करून एका पंडिताकडून जगद्गुरूंचा स्तुतिपाठ करविला. याप्रमाणें महिना दीड महिना चाललेल्या खटपटीचा सर्व बऱ्या प्रकारें शेवट होऊन एका समाजस्थापनेखेरीज कोणतीही कर्तव्यता उरली नाहींशी दिसली. पण देवाची लीला अगाध ! त्याचें मूर्खत्व नाहींसें करून टाकून वास्तव स्वरूपाची प्रचीति लोकांच्या हृदयांत ठसविण्यास दयानंदजींनीं व त्यांच्या चेल्यांनीं

येवढा विधु रचला असतांही तो अकस्मात् ढांसळून सर्वांवर दे माय धरणी ठाय असा प्रसंग एकाएकी येऊन गुदरला. छबिन्याची मंडळी जी बाहेर उभी राहिली होती तिची व त्यांच्याहून आत्म्याची कळकळ ज्यांस विशेष अशी खाशी मंडळी जी वर माडीवर बसली होती तिची एका अर्ध्या घटकेंत जी तारांबळ व जी त्रेधा उडून गेली ती सांगतां पुरवत नाहीं ! ज्या गजेंद्रानें स्वामींची वरात सुशोभित करून आपलें जीवित धन्य करून घेतलें त्याची कोणी शेपूट ओढून, कोणी सोंड ओढून व महंतास तिसऱ्या ठिकाणीं फुकटाफुकट प्रायश्चित्त मिळून पुण्याच्या दुष्ट व दांडग्या ब्राह्मणांनीं गाढवासारखा माघारीं पार पळवून लावला; ज्या दीपिका या शहरांतील शंभर दीडशें वर्षें सांचलेल्या मूर्तिजन्य अंधाकारासच जाणें काय दूर करीत होत्या त्याही एकदम मालवून दिवट्यांस पलायन करण्यांतच निभावणूक दिसली. बाजेवाल्यांनीं व तासेवाल्यांनीं तोच मुक्तीचा मार्ग पसंत केला. इतक्यांत पोलिसचे शिपाई धांवत आले. त्यांचाही चार पांच हजार लोकांच्या गर्दीत मोठ्या मारामारीनें रिघाव होऊन मग त्यांनीं जो दांडक्यांचा व वाद्यांचा मार सुरू केला तो मोठा कठीण ! शेकडों लोकांस स्वामींचें वक्तृत्व व त्यांच्या सच्छिष्यांची भक्ती फळास आली. कोणाच्या वाट्यास दांडकीं, कोणाच्या चाबूक, कोणाच्या धोंडे, निदान चिखलाचे लपके तरी असा प्रसाद सर्वांस पंक्तिभेद न होतां भरपूर वाढला गेला. माडीवरील मंडळी खिडक्या लावून बसली होती, कोणी मधेमधें उगीच एखादी अंमळ लिकलिकी करून खालची मौज पाहूं लागावें तों आलाच चिखलाचा लपका ! याप्रमाणें सप्टेंबर महिन्याची पांचवी तारीख मोहोरमच्या दहावी प्रमाणें या वर्षी पुण्यास गाजली ! असो; या छोट्याशा नाटकाची परिसमाप्ती शेवटीं अशी झाली कीं, स्वामींच्या जवळ निदानींच्या समयीं एकही सच्छिष्य न राहून ज्यानें त्यानें आपली वाट काढली. शेवटीं पंधरावीस एका बाजूस व पंधरावीस दुसरे बाजूस अशी पोलिसांची रांग दुतर्फा चालून मागून जयघोष होत्साती स्वामींची स्वारी निजधामाला चालती झाली !" (माला, पा. ३१७-१८)

धार्मिक व सामाजिक सुधारणा व तिचे पुरस्कर्ते त्याचप्रमाणें नवे धर्म व त्यांचे पुरस्कर्ते यांच्याबद्दल चिपळुणकरांच्या मनांत किती जळफळाट धुसमुसत होता, हें त्यांच्या लिखाणांतील वर दिलेल्या उताऱ्यांवरून स्पष्ट होतें. त्याचप्रमाणें अस्पृश्य लोकांबद्दल त्यांची भावना किती हलक्या दर्जाची होती हेंहि स्पष्ट होतें.

ब्राह्मण्यग्रस्त आचारविचार यांच्याबद्दल लोकहितवादींनीं आपल्या शंभर पत्रांत 'प्रभाकर' या वर्तमानपत्रांतून टीकेचा धूमधडाका उडविलेला होता. चिपळुणकरांनीं त्यांच्यावरहि निबंधमालेंतून आपला जळफळाट व्यक्त केला.(माला, पा. १०६१-१२०५) ब्राह्मणेतर समाजांत आत्मोन्नतीच्या जागृतीची ज्योत ज्यांनीं महाराष्ट्रांत प्रथम चेतवून जळत ठेवली त्या जोतीराव फुल्यांवर तर चिपळुणकरांनीं आपल्या जळफळाटाची धूळ फेंकतांना जेवढी कुत्सित भावना व्यक्त केली, तेवढी कुत्सित भावना

त्यांना इतरत्र कोठेंहि व्यक्त करतां आली नाहीं. 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' या पुस्तकावर निबंधमालेच्या ४४ व्या अंकांत (पानें ४४१–४५७) अभिप्राय लिहितांना आणि 'दीनबंधु' या नांवानें फुल्यांनीं काढलेल्या वर्तमानपत्रावर मालेच्या ४८ व्या अंकांत (पानें १०१८–१०२६) अभिप्राय देतांना चिपळुणकरांनीं आपल्या कुत्सित भावनांचा मोकाटपणें परिस्फोट केला.

फुल्यांचें शिक्षण फारसें झालेलें नव्हतें, पण ब्राह्मणेतर समाजांत आत्मोद्धाराची ज्योत निर्माण करण्याची त्यांची इच्छा अदम्य होती. याकरितां त्यांनीं अनेक लेख पुस्तकें प्रचारासाठीं लिहिलीं. त्यांच्या लिखाणांत जाड्या पंडीताला शोभणारी विचारसरणी व भाषाशैली नव्हती. एवढेंच काय, पण त्यांना शुद्धलेखनाचीहि माहिती नव्हती. फुल्यांच्या क्रांतीकारक कार्याला हाणून पाडण्याचें सामर्थ्य नसलेल्या चिपळुणकरांनीं फुल्यांच्या या अवगुणाबद्दल अवास्तव वाच्यता व निंदा केली. ती किती जहाल व दुष्ट होती हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल:

"तारीख ५ डिसेंबर रोजीं (१८७२) 'क्षुद्रांनीं ब्रह्मराक्षसांच्या दास्यत्वापासून असें मुक्त व्हावें,' या सदराचें पत्र त्यांनीं तयार केलें. नंतर आपल्या एका स्नेह्यास आज्ञा केली कीं, 'या पत्रांतील ऱ्हस्वदीर्घादि सर्व चुक्या नीट करून त्याची एक प्रत करून एकंदर सर्व भट व ख्रिस्ती वर्तमानपत्रकर्त्यांच्या अभिप्रायाकरितां पाठव." (माला, पा. ४४३)

"स्वतःसिद्ध ऐतिहासिक स्फूर्ती असल्यावर व धोंडीबासारखा बिचारा परम भाविक श्रोता मोठ्या सुदैवानें गवसल्यावर मग कशाला पंचाईत करीत बसा! कवित्वाची स्फूर्ती होतांच धोंडीबास तुणतुणें आणावयास सांगून जोतीबांनीं 'ब्राह्मणाचे कसब' जसें केवळ लीलेनें गाईलें असेल; त्याप्रमाणेंच कविरायांच्या इतिहासाचा सूर लागला असतां 'ब्राह्मणांची गुलामगिरी' ही तेव्हांच निर्माण झाली असेल यांत संशय नाहीं. पण सदरील ग्रंथाचा सर्वांत मोठा गुण अद्याप सांगावयाचा राहिलाच आहे. तो कोणता म्हणाल तर विषयवैचित्र्य. हें वैचित्र्य पाहून तर जोतीबा केवळ ज्ञानमूर्ती आहेत असें म्हणावें लागतें." (माला, पा. ४४८–४४९)

"ज्या महाग्रंथावरून जोतीराव फुले यांचें नांव या देशांत चिरकाल राहून शूद्रबांधवांचें कोटकल्याण होणार व 'ब्रह्मराक्षसांचें' निर्दाळण होणार, जो येथील सत्यशोधक मंडळीचें जणों काय पवित्र शास्त्रच बनून राहिला आहे, जो लिहिण्यास जोतीबांच्या कित्येक विद्वान् मित्रांनीं त्यांस उत्तेजन दिलें, ज्याची अकटोविकट योग्यता वाटून जो ग्रंथकर्त्यानें 'युनैटेड् स्टेट्स् मधील सदाचारी लोकांस' अर्पण केला आहे, व ज्या शूद्र अर्भकाचा ख्रिस्ती पत्रकर्त्यांनीं आपल्याला घरोघर महोत्सव करून त्याच्या जनकास परोपरीनें शाबासकी दिली आहे, त्याच्या स्वरूपाचा कांहीं बोध वरील दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांस होईल. मि. फुले... हे जात्या शूद्र असल्या

मुळें इंग्रजी ज्ञानाच्या योगानें त्यांच्या ठायीं ब्राह्मणांविषयीं स्पर्धा उत्पन्न झालेली असावी, व त्यांतून 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका', 'नानाविध चर्चासंग्रह' यांच्या निरंतर पवित्र परिशीलनानें ब्राह्मणद्वेषाचें मोलवान तत्त्व त्यांनीं पटकावलें असावें... राव जोतींचें महात्म्य आम्हांस पूर्वी जें माहित होतें तें कांहींच नव्हतें! ऐकण्यांत व पाहण्यांत किती अंतर आहे याविषयींची आम्हांस 'गुलामगिरीवरून' जी प्रचीति आली आहे ती आम्ही कधींही विसरणार नाहीं. केवढी अतर्क्य तर्कशक्ति! सत्याविषयीं केवढा अभिमान व तें हुडकून काढण्याविषयीं केवढा हव्यास!...एकूण येवढा पटाईत शिष्य ज्या गुरूनें तयार केला असेल त्यानें आमच्या देशास केवढी जोड करून दिली बरें! हा गुरू कोणी भट जातीचा असेलसें वाटत नाहीं. त्यांतूनही कोणी प्रथमतः असलाच तर त्याची दुष्ट विद्या जोतीबांनीं ओकून टाकून कोणा महासमर्थ मिशनरींच्यापासून चांगला अनुग्रह घेतला असेल. या पूर्वसंस्कारत्यागाच्या बरोबर त्यांनीं ऱ्हस्वदीर्घांची ओळख टाकून दिली कीं काय कोण जाणे! एरवीं एवढ्या महापंडीताला ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार यांविषयीं वानवा असून त्याबद्दल दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याची जरूर पडावी हें संभवत नाहीं! ... बळीराजाचे अनुयायी मिशनरी त्यांचे अनुयायी जे आमचे जोतीबोवा, त्यांनीं तर मिशनरींवर व बळीवरही ताण करून दिली आहे! आमच्या भवभूतीनें 'वाचमर्थोऽनुधावति' (अर्थ वाणीच्या मागून धांवतो) असें जें म्हटलें आहे त्याचा प्रत्यय ज्यास उत्कृष्ट घ्यावयाचा असेल, वलवत्तर स्फूर्तीच्या लोंढ्यासरशीं व्याकरणाची, अर्थसंगतीची वगैरे त्रेधा उडून जाते हा चमत्कार ज्यास पहावयाचा असेल, 'ज्ञानोदयां'तील ४० वर्षांच्या तत्त्वज्ञानाचा ज्यास अर्क काढून घ्यावयाचा असेल, श्रावणमासीं जोतीबांच्या भगिनींचा गालिप्रदानविधी जो मोठ्या थाटानें रस्तोरस्तीं चालतो त्याचा रस ज्यांस चार घटका अनुभवायाचा असेल त्यांस 'गुलामगिरी' सारखें दुसरें साधन नाहीं!" (माला, पा. ४४९–४५१)

चिपळुणकरांनीं सत्यशोधक समाजाविषयीं खालील मतें व्यक्त केली आहेत :

"पण ज्या अर्थीं जोतीबाचा समाज अद्याप बाल्यावस्थेंतच आहे, एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांबुरडें याच त्याच्या प्रचंड सीमा होत, त्या अर्थीं असल्या 'क्षुद्र' सभेवर आम्ही हत्यार धरण्यास उत्साह पावत नाहीं. स्वामींच्या आर्यसमाजाप्रमाणें त्याचा जेव्हां अवाढव्य विस्तार होईल, व सत्यसमाज-मंदीराच्या अग्रभागीं जोतीरावांचा संगमरवरी पुतळा त्यांच्या शुभ्र यशाचा स्मारक म्हणून स्थापला जाईल, तेव्हां त्यांच्या मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करतां येईल!" (माला, पा. ४५३)

"दोन वर्षांपूर्वी या शहरांत एका जगद्गुरूंची स्वारी प्राप्त झाली होती; तिचा आरंभींचा धूळभेटीपासून तों अखेर चिखलवृष्टीपर्यंत एकंदर काय वृत्तांत झाला तो आम्ही आमच्या वाचकांस बराच सविस्तर कळविला होता. त्यावेळीं

स्वामींचें जीवलग अपत्य जो आर्यसमाज त्याविषयीं आम्ही जें भाकित केलें होतें तें लवकरच प्रत्ययास येऊन त्यांच्या पुरस्कर्त्यांचे आशिर्वाद सर्व निष्फळ झाले. हीच गति कदाचित् प्रस्तुत सत्यशोधक समाजाचीही लवकरच होईल व आर्यसमाजाचे जनक जसे आतां धर्मोन्नति करतां करतां थकून काशीवास पत्करून राहिले आहेत, त्याप्रमाणें बहुधा आमचे जोतीरावही सत्य शोधतां शोधतां दमून शेवटीं कदाचित् येरुशलेमास तीर्थयात्रा करून आकाशांतील बापाच्या ज्योतीस जाऊन मिळतील!" (माला, पा. ४४१–४४२)

"पण आमच्या शूद्र धर्मस्थापकांची तर कशी मौज आहे! त्यांस पुरतें व्याकरणाचें व शुद्ध लिहिण्याचेंही ज्ञान नाहीं. आमच्या वाचकांस आठवत असेल कीं, 'गुलामगिरी'ची इमारत पूर्ण तयार झाल्यावर तींतील व्याकरणसंबंधीं खांचाखोचा भरून टाकून साफ गिलावा करण्याविषयीं त्यांनीं आपल्या स्नेह्यास आज्ञा केली. आमचे प्रतिपक्षी 'दीनबंधु' यांचीही व्याकरणाविषयीं आपल्या गुरुसारखीच निष्ठा आहे. तर अशा स्थितींत आम्ही आपल्या शूद्रबंधूंस अशी सूचना करतों कीं, श्रुतिस्मृतींचा ऊहापोह करण्याची हौस त्यांनीं तूर्त एकीकडे ठेवावी; अगोदर लेखनशुद्धीच्या सूत्रांची संथा घ्यावी किंवा दादोक्त महाभाष्यांत पारंगत व्हावें; आणि यांतून पार पडून कर्ता, कर्म क्रियापदांची थोडीबहुत ओळख पटली म्हणजे मग गीर्वाण भाषेविषयीं व मनुवसिष्ठादिकांविषयीं सावकाश विचार करतां येईल!" (माला, पा. १०२१–१०२२)

फुले यांची विचारसरणी व चळवळ साफ चुकीची आहे आणि हिंदु धर्मातील रुढाचार हेच उत्तम आहेत हें दाखविण्याच्या उद्देशानें आणि ब्राह्मणवर्ग हा हिंदुसमाजांत सर्वतोपरीनें श्रेष्ठ होता, आहे व पुढेंहि राहील, हें आपलें जात्याभिमानी ताठ मत प्रतिपादन करतांना चिपळुणकरांनीं पुढील उद्गार काढले होते:

"'गुलामगिरी'च्या जनकानें ब्राह्मणांसारखे दुष्ट व लबाड लोक पृथ्वीच्या पाठीवर मिळायचे नाहींत, व त्यांनीं सर्व सत्ता आपणाकडे ओढून घेऊन मूळच्या रहिवाशांस गुलाम करून टाकिलें वगैरे पुष्कळ निव्वळ बडबड केली आहे. पण त्यानें अंमळ डोळे उघडून जर जगाच्या अनादिसिद्ध व्यवहारांकडे पाहिलें असतें व अमेरिकेंतल्या, आफ्रिकेंतल्या वगैरे मूळ रहिवाशांची स्थिति क्षणभर मनांत आणली तर आपलें भाग्य केवढें व ब्राह्मण हे खरोखरच 'भूदेव' होत अशी त्यांची खात्री झाली असती! शिवाय 'गुलामगिरी'तला इराणी इतिहास जर अक्षरशः खरा मानला तर तेणेंकरून तर ब्राह्मणांचें विलक्षण गौरवच होतें! कां कीं, इराणांतून येऊन एवढा हिंदुस्थान ज्यांनीं काबीज केला त्यांनींच जर पुढें राज्याधिकार क्षत्रियास देऊन व वाणिज्य वैश्यांस देऊन स्वतः अरण्यवास पत्करला तर मग त्यांच्याहून थोर व परोपकारी कोण? ... पण असें असतां आमचे शूद्र प्रतिपक्षी चित्पावनांच्या

उत्पत्तीविषयीं वाटाघाट करून सह्याद्रिखंड, जोतीबाखंड अशा महाग्रंथांचें निर्मंथन करून महापांडित्याचा आव घालतात आणि अमुक ब्राह्मण वरच्या पायरीचे, अमुक खालच्या पायरीचे, या उलाढाली करीत बसतात. मशकानें घार मोठी कीं गिधाड मोठें ही चर्चा मोठ्या पर्वताच्या शिखराग्रावर आरूढ होऊन केली तरी त्यास कांहीं लाभ आहे काय ? इसापनीतींतल्या बेड्या बेडकीप्रमाणें मात्र त्यास महत्त्वाकांक्षेचें फळ फार झालें तर मिळेल ! तर हा मूर्ख व्यापार सोडून देऊन आमच्या शूद्र प्रतिपक्ष्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, चित्पावन हे चितेपासून जिवंत झालेले असोत, किंवा इराणांतून आलेले असोत, त्यांचे नैसर्गिक गुण जे यापूर्वी प्रगट झाले व अद्यापहि होत आहेत ते छपन्न 'गुलामगिऱ्यांनीं' व शंभर 'जातिभेदसारांनीं'ही लवमात्रही कमी होणारे नव्हेत. चित्पावनांनीं गेल्या शतकांत सारा हिंदुस्थान दणाणून देऊन आपल्या क्षत्र-कुलांतक क्षेत्रपर्तीप्रमाणें दिग्विजय केला, व अद्यापही त्यांचें बुद्धिवैभव जसेंच्या तसेंच जागृत आहे. या गोष्टी सर्वजनविश्रुत आहेत. त्या ज्यास सहन होत नसतील त्यांनीं पाहिजे तर दिवाभीतांप्रमाणें गिरिकंदरांत आपलें तोंड लपवून राहावें; वरील पक्ष्यांच्या पंखांनीं दिनमणि जसा झांकला जाणार नाहीं त्याचप्रमाणें जोतीप्रभृतींनीं कितीही कोल्हेकुई केली तरी ती सर्व व्यर्थ होय !" (माला, पा. १०२२-१०२४)

"मि. फुले यांस सूचना अशी कीं, जर त्यांस आपल्या जातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती 'गुलामगिरी'च्या सारखे ग्रंथ तयार केल्यानें व जे आपणांहून सर्वप्रकारें श्रेष्ठ त्यास नुसत्या शिव्या दिल्यानें ती होणार आहे असें मुळींच नाहीं. ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं ज्ञानभांडाराच्या किल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साहाय्या-शिवाय इतर जातींस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळींच मार्ग नाहीं." ( माला, पा. १०२४. )

महार लोकांबद्दल त्यांचें मत कसें होतें तें पहा. महाराष्ट्राचे मूळ रहिवाशी महार होत व त्यांच्यावरून त्या देशाला 'महाराष्ट्र' हें नांव पडलें असा फुल्यांनीं आपला मताभिप्राय व्यक्त केलेला होता. त्याबद्दल चिपळुणकर लिहितातः

"आमच्या सत्यशोधक पंडितांनीं आज कित्येक वर्षे एक कोटि जगास जाहीर केली आहे. ती ही कीं, 'महाराष्ट्र' म्हणजे 'मोठें राष्ट्र' नव्हे तर 'महार-राष्ट्र'! आणि यास प्रमाण काय तर मराठींतली म्हण 'जेथें गांव आहे तेथें महारवाडा आहेच.' या शूद्रश्रुतीवरून निर्णय स्पष्ट होतो कीं, या प्रांतांतील राहणारे मूळचे ब्राह्मणादि महादुष्ट व महामूर्ख लोक नव्हते तर त्यांचे 'महा-अरि' म्हणजे 'महार' हे होत." ( माला, पा. ३९१ )

वैधव्याच्या अवस्थेंत ज्या स्त्रियांना राहावें लागत असे त्यांतील बऱ्याचजणींना यौवनप्राप्त कामवासनेला बळी पडावें लागत असे. अशा विधवा स्त्रियांशीं व्यभिचार

करून त्यांना मातृपद प्राप्त करून देणारे लोक बहुतेक त्याच जातींतील असत. कारण, त्यावेळीं जातिनिर्बंध इतके कडक असत कीं, विधवा स्त्रियांना परजातींतील पुरुषांशीं संबंध ठेवतां येणें अशक्य असे. अशा रीतीनें गरोदर झालेल्या विधवा स्त्रिया व त्यांचे नातलग यांना जातीच्या बाहेर वाळींत टाकण्यांत येई. अशा लोकांना ख्रिस्ती मिशनऱ्यांचा आधार मिळे. पण हिंदूंकडून अशा लोकांची छीः थूः होई. धर्ममार्तंड शास्त्रीपंडित अगर धर्मगुरु शंकराचार्य यांच्याकडे असले प्रकार न्यायदानासाठीं गेले तर ते लोक गुन्हेगारांना माणुसकींतून उठवीत असत. सोलापूर जिल्ह्यांतील माढें या गांवीं १८५९ सालीं एक ब्राह्मण विधवा कोसळलेल्या घरांत सांपडून मेली. तिचे केशवपन झालेलें नव्हतें म्हणून तिचा संस्कार धर्मशास्त्रांप्रमाणें ब्राह्मणांना करतां येत नव्हता. तिचें वपन करून तिला शुद्ध करावें व मग ब्राह्मणांनीं तिचे प्रेतसंस्कार करावेत असें ठरलें; पण प्रेताची हजामत करण्यास न्हावी तयार होईना. शेवटीं त्या विधवेच्या प्रेताला शूद्रांकडून प्रेतसंस्कार करविला. १८५४ सालांत शंकराचार्य नगरला गेले असतां त्यांच्यापुढें विधवा बाया व्यभिचार करतात म्हणून फिर्याद मांडली गेली. एका विधवेनें बालहत्या केलेली होती. गोमूत्र, गोमया आणि आपल्या पायाचें तीर्थ एकत्र करून शंकराचार्यांनीं त्या बाईच्या बापाला पाजून पावन करून घेतलें. त्या बापाकडून १९ रु. दंडहि घेतला. विधवा मुलीला शुद्ध करण्यासाठीं शंकराचार्यांनीं असा सल्ला दिला कीं, आंब्याच्या झाडाची डोली करावी, तींत मुलीला ठेवावें, बाहेरून त्या डोलीला आग लावावी व मुलीला बाहेर काढल्यानंतर एक हजार ब्राह्मणांना जेवण घालावें कीं मुलगी शुद्ध झाली. (रानडे, पा. ११७–११८) विधवा स्त्रियांकडून बालहत्येचीं कामें होत असत, त्यांचा परिस्फोट वर्तमानपत्रांतून होत असे. शिवाय मिशनरी लोक अशा नाडलेल्या विधवांना व त्यांच्या नातलगांना आश्रय देऊन आपल्या धर्मांत घेत. हे प्रकार पाहून सुशिक्षित लोकांचें विधवांच्याकडे लक्ष वेधलें. त्यांनीं या प्रश्नाचा अभ्यास केला. विधवांचीं लग्नें करणें, हाच एक उपाय त्यांना पटला व त्या मार्गानें विधवाविवाहाला शास्त्राधार शोधण्यास ते लागले. गंगाधर शास्त्री या विद्वान गृहस्थानें विधवाविवाहाला अनुकूल शास्त्राधारांनीं भरपूर भरलेला ग्रंथ १८४० सालीं बाळशास्त्री जांभेकर यांच्या साहाय्यानें प्रसिद्ध केला. या प्रश्नावर सुशिक्षित हिंदु सुधारकांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून विधवाविवाहाची चळवळ जीर्णमतवाद्यांच्या निषेधाला न जुमानतां चालविली व ती चळवळ यशस्वी करून दाखविली. सुधारकांच्या प्रेरणेनें सरकारनें विधवाविवाहाला अनुकूल कायदा १८६६ सालीं पास केला. १८६२ सालीं मुंबईत एक विधवाविवाह गुप्तपणें झाला. १५ जून १८६९ ला दुसरा विवाह उघडपणें झाला. (रानडे, पा. १३७ व १४२) १८७० सालच्या मार्च महिन्यांत पुणें येथें शंकराचार्यांसमोर विधवाविवाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं असा वाद नऊ दिवस सुधारक व जीर्णमतवादी हिंदू यांच्यामध्यें झाला; व एका कच्च्या दिलाच्या सुधारकाच्या फितुरीमुळें व दगलबाजीमुळें हा

वाद जीर्णमतवाद्यांच्यातर्फे यशस्वी झाला. डॉ. रामकृष्ण भांडारकर हे सारस्वत म्हणून त्यांना पंच म्हणून या वादांत काम करतां येत नाहीं, असें शंकराचार्यांनीं मत दिलें. त्यामुळें डॉ. भांडारकरांना पंच होतां आलें नाहीं. (रानडे, पा. १४९)

सुधारकांनीं विधवाविवाहाचें प्रचारकार्य आणि प्रत्यक्ष विवाह जुळवून घडवून आणण्याचें कार्य चालू ठेवण्यासाठीं १८६५ सालापासून ठिकठिकाणीं संस्था स्थापन केल्या. (रानडे, पा. १३८) जीर्णमतवाद्यांचा बालेकिल्ला पुणें येथें पहिला विधवा-विवाह १८७४ सालीं झाला. १८९३ सालीं दुसरा व तिसरा विधवाविवाह तेथेंच झाले. १८९५ ते १८९९ पर्यंत चार विधवाविवाह झाले. (आत्मवृत्त, पा. २६३) पुनर्विवाहाच्या कार्याला आणि विधवाशिक्षणाच्या कार्याला आजन्म वाहून घेणारे पुष्कळ सुशिक्षित सुधारक पुरुष व स्त्रिया पुढें निघाल्या. अशा स्त्रियांपैकीं पंडिता रमाबाई ही पहिली स्त्री होय. यांचा जन्म १८५८ सालीं झाला. त्यांचे वडिल अनंतशास्त्री डोंगरे हे होते. अनंतशास्त्र्यांनीं तिला संस्कृत शिकवून उत्तम तऱ्हेची विदुषी केलें. रमाबाई व तिचा भाऊ लहान असतांच त्यांचे आईबाप वारले. तीं लहान अर्भकें विद्वान आईबापाजवळ शिकलेलीं होतीं. तीं भिक्षा मागत मागत प्रवास करीत कलकत्त्याला गेलीं व तेथें त्यांच्या संस्कृत अध्ययनाची कीर्ति सुशिक्षितांमध्यें पसरली. "पुढें वडिल वारल्यानंतर त्यांजवर अनेक प्रसंग येऊन त्या बंगालकडे गेल्या. तिकडील पंडितांनीं त्यांची विद्वता पाहून त्यांना 'सत्यवति' ही पदवी दिली. पंडिता रमाबाई सरस्वति यांनीं नंतर एका बंगाली गृहस्थाशीं विवाह केला......या विवाहापासून त्यांना एक कन्या होऊन वर्ष दीड वर्षांच्या आंतच त्यांच्यावर वैधव्याचा घाला आला. यांचें मन सुसंस्कृत असल्यामुळें व निसर्गाच्या शाळेंत त्यांना स्वावलंबनाचें उत्तम शिक्षण मिळाल्यामुळें या सामान्य विधवेप्रमाणें शोक करीत व दैवाला बोल लावीत बसल्या नाहींत. त्यांनीं लागलीच आपला पुढील मार्ग आंखला. मुंबई व महाराष्ट्र हा प्रांत त्यांनीं आपलें कर्तव्यक्षेत्र म्हणून पसंत केला. व त्या आपल्या कोमल कन्येला घेऊन पुण्याला आल्या. त्यांचीं पुण्यांत व मुंबईंत पुष्कळ पुराणें व व्याख्यानें झालीं. त्यांना अतोनात गर्दी जमे. विधवांच्या शिक्षणासाठीं प्रयत्न करण्याची त्यांची इच्छा होती, व ती त्यांनीं पुण्या-मुंबईतल्या पुढाऱ्यांना कळविली; परंतु त्यांजकडून त्यांना पाहिजे होती तेवढी मदत मिळेना. तेव्हां निराळा मार्ग आंखला. मिशनरी मंडळीच्या मदतीनें इंग्लंडला गेल्या, व तेथें इंग्रजी शिकून मग त्या अमेरिकेला गेल्या. तेथील 'वसुधैव कुटुंबकम्' या वृत्तीच्या थोर पुरुषांच्या मदतीनें त्यांनीं द्रव्याची मदत मिळविली व परत मुंबईला येऊन १८८९ सालीं चौपाटीवरील एका बंगल्यांत शारदासदनाची स्थापना केली. त्यांनीं अमेरिकेंत 'रमाबाई असोसिएशन' नांवाची संस्था काढून तिच्या शाखा मोठमोठ्या प्रसिद्ध ठिकाणीं स्थापिल्या होत्या. या संस्थेनें दहा वर्षें शारदासदनाचा खर्च चाल-विण्याचें कबूल केलें होतें. पुढें हिंदुस्थानांतल्या लोकांनीं या संस्थेचा खर्च चालवावा,

अशी योजना होती. मुंबई हें ठिकाण शारदासदनाला योग्य नव्हे, असें त्यांना वाटून त्यांनीं ही संस्था पुण्याला आणली, व लवकरच तिच्यासाठीं जागा विकत घेऊन तिजवर भव्य इमारती उठविल्या. पंडिता रमाबाई या ख्रिस्ती झालेल्या होत्या, तथापि सदनांतील विद्यार्थिनींना ख्रिस्ती धर्माचें शिक्षण न देतां हिंदु धर्माप्रमाणेंच त्यांची व्यवस्था ठेविली जाईल अशी योजना रमाबाई असोसिएशनच्या संमतीनें ठरली होती व डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं इकडील पुढाऱ्यांचें एक ॲडव्हायसरी ( सल्लामसलत देणारें ) बोर्ड स्थापन झालें होतें. लोकांमध्यें विश्वास उत्पन्न होऊन ६५ पासून ७० विद्यार्थिनी जमल्या होत्या, व त्या बहुतेक विधवाच होत्या. बाहेरून सर्व ठीक चाललेलें दिसत होतें. परंतु आंतून कांहीं विद्यार्थिनींचीं मनें ख्रिस्ती धर्माकडे वळत होतीं. इसवी सन १८९३ च्या जुलै महिन्यांत शारदासदनांतील दहा-बारा विद्यार्थिनींनीं बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्तीधर्म स्वीकारला, अशी वार्ता हां हां म्हणतां वणव्याप्रमाणें पसरली, आणि ती खरी ठरून सगळें महाराष्ट्र दुःखाकुल झालें. उच्च वर्णांतील इतक्या स्त्रिया ख्रिस्ती झाल्याचें उदाहरण हिंदुस्थानांतील मिशनऱ्यांच्या कामाच्या इतिहासांत सांपडेल कीं नाहीं, याची शंका आहे. पंडिता रमाबाईवर व ख्रिस्ती मिशनऱ्यांवर वर्तमानपत्रांतून व खासगी संभाषणांतून शिव्याशापांचे भडिमार सुरू झाले. पण आंतल्याला पीळ पडून स्वोन्नतीच्या मार्गाचा प्रयत्न मात्र व्हावा तितक्या नेटानें झाला नाहीं. डॉ. भांडारकरप्रभृति ॲडव्हायसरी बोर्डाच्या सभासदांनीं आपल्या सह्यांनीं एक पत्र प्रसिद्ध करून तें सदनांतील विद्यार्थिनींच्या पालकांकडे पाठविलें. त्यांतील मजकूर 'आम्हीं बोर्डाचा राजीनामा दिला आहे. व यापुढें मुली सदनांत ठेवणें धोक्याचें आहे' अशा अर्थाचा होता.

"ही हकीगत अमेरिकेंत रमाबाई असोसिएशनकडे जाऊन तिकडून एक बाई इकडील लोकांशीं तडजोड करण्यासाठीं आल्या. परंतु एकदां बिघडलेली घडी पुनः बसली नाहीं. हिंदूंच्या उच्च वर्गांतील विधवांना शारदासदनाचा उपयोग होईनासा झाला, आणि लवकरच त्यांनीं आपली संस्था पुण्यांतून काढून केडगांवीं नेली. पंडिताबाईंचे यापुढील प्रयत्न मुख्यत्वें हीन वर्णाच्या उन्नतीकडे वळले". ( आत्मवृत्त, पा. २७०–२७२ ).

पंडिता रमाबाई यांना हिंदु धर्माचा अभिमान होता व हिंदु समाजांतील विधवा स्त्रियांना आपलें जीवन सुखानें घालवितां यावें यासाठीं त्यांना सुशिक्षित करणें हेंच त्यांना मनोमन पटलेलें होतें. तें कार्य करण्याचें ध्येय त्यांनीं उराशीं बाळगलेलें होतें. परंतु हिंदु समाजांतील घातुक विचारप्रणाली. व ब्राह्मण्यग्रस्त लोकांची कुत्सित दृष्टी यांमुळें पंडिताबाईंना आपलें कार्य सफल करण्यासाठीं मिशनरी लोकांचा आश्रय घ्यावा लागला.

पण 'शारदासदन ही ख्रिस्ती संस्था आहे' या आक्षेपावर रमाबाईंनीं अधिक स्पष्ट व खडखडीत उत्तर दिलें. त्या लिहितातः "आमच्या देशबंधूंनीं आम्हांस योग्य

आश्रय व उत्तेजन दिलें असतें तर शारदासदन ही खिस्ती संस्था होण्याची कांहींच जरूर नव्हती. ती खिस्ती संस्था होऊं नये म्हणून पूर्वी पुष्कळ प्रयत्न चालला होता व अजूनहि तो सुरू आहे. हिंदूलोक असली शाळा घालण्याकरितां पैसे देईनात म्हणून मी खिस्ती लोकांपाशीं भिक्षा मागितली. आतां तुम्हीं ती शाळा चालविण्यास सिद्ध असाल तर आमच्या खिस्ती आश्रयदात्यांकडून या गोष्टीस बिलकूल अडथळा येणार नाहीं. तुम्हीं खर्च द्या, हवे ते शिक्षक नेमा, एखाद्या हिंदू बाईला शाळेची मुख्य करा. तसें झालें तरी मूळ हेतूस अनुसरून आम्हीं खिस्ती लोक मदतच करूं. कोणतेंहि काम स्वतः करण्यापेक्षां लोकांच्या कामांतील दोष दाखविणें हें फार सोपें आहे, हें आम्हांला आणि तुम्हांलाहि माहित असेल." (टिळक, पा. २०–२१)

पंडिता रमाबाईंच्या कार्याबद्दल केसरी पत्राचा कोणता दृष्टिकोन होता, याबद्दल टिळक चरित्रकार लिहितात :

"ता. १८ फेब्रुवारीच्या अंकांत केसरी लिहितो कीं, 'बाईचा हिंदू लोकांवरील आक्षेप आम्हीं समजलों. परंतु अशा संस्थेला हिंदू लोकांकडून हवी तितकी वर्गणी न मिळण्याचें कारण हेंच कीं तरुण विधवा व स्त्रिया यांनीं अशा शाळांतून स्वतंत्रपणें रहावें ही कल्पना हिंदु समाजास मानवायला अद्यापि थोडा अवकाश आहे. मग उगीच उताविळपणा दाखवून आपल्या व लोकांच्या जिवास संताप करून कां घ्यावा? बाईंची संस्था खाजगी असती तर आम्ही केवळ दोष दाखविण्याचें लघुत्वहि पत्करिलें नसतें. बाईंनीं शारदासदनाभोंवतालीं एखादा जंगी अभेद्य कोट घालून सार्वजनिक दृष्टि त्यांत शिरू दिली नसती, तर आम्हांला तरी ही उठाठेव कशाला हवी होती? दोष दाखविण्यांत झाला तरी संस्था सुधारून वाढवावी हाच आमचा हेतु." (टिळक, पा. ३२२)

पंडिता रमाबाई हिंदु समाजाला व धर्माला मुकल्या त्याचा हा त्रोटक इतिहास असा आहे. एका अर्थी त्या हिंदुसमाजाला व धर्माला हितावह झाल्या. कारण, त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र पुण्याजवळ केडगांव येथें निर्माण केलें व तेथें त्यांनीं हजारों हिंदु स्त्रियांना सुशिक्षित व कांहींना धर्मांतरित करून हिंदु समाजाच्या व धर्माच्या यमयातनांतून अंशतः तरी मुक्त केलें.

"माझ्या दाराशीं येईल ती माझी मुलगी. मग ती उच्चवर्णीय असो, अस्पृश्य मानलेली असो वा गुन्हेगार असलेल्या जमातींतील असो. तिच्या पालनपोषणाची, शिक्षणाची नि कांहींतरी विद्या उद्योग शिकवून तिला स्वावलंबी बनविण्याची जबाबदारी मी घेईन." (पंडिता रमाबाई, पा. ६१–६२) या उच्च ध्येयानें प्रेरित होऊन रमाबाईंनीं केडगांवच्या मुक्तिसदनाचें कार्य विस्तृत केलें. इंग्लिश, हिब्रु, गुजराथी इत्यादि भाषा शिकून खिस्ती धर्मप्रसारार्थ रमाबाईंनीं अनेक ग्रंथ लिहिले. मुक्तिसदनांत जो छापखाना त्यांनीं चालू केला, त्यांत छापण्याचें जें काम होई तें मुक्ति-

सदनांतील मुलीच करीत असत. त्यांनीं बायबलचें जें मराठी सुलभ भाषांतर केलें तें १९२४ सालीं प्रसिद्ध झालें. ( किता, पा. ६८ ) या कर्तबगार पंडिता ५ एप्रिल १९२२ रोजीं खिस्तविलीन झाल्या. ( किता, पा. ६६ )

विधवांची परिस्थिती सुधारून त्यांचें जीवन सुखावह करण्यासाठीं ज्या हिंदु पुरुषांनीं प्रयत्न केले त्यांत श्री. धोंडो केशव कर्वे हे एक प्रमुख गृहस्थ होत. यांनीं आपलें सर्व आयुष्य या कार्याला वाहून घेतलें. यांनीं ८ मार्च १८९३ रोजीं एका गोदूबाई या विधवा बाईबरोबर ( ही पंडिता रमाबाईंच्या शारदासदनांतील पहिली विधवा ब्राह्मण विद्यार्थिनी होय. सदनांत शिकत असतां ती विकेशा असे. ) डॉ. भांडारकर यांच्या घरीं पुण्यांत पुनर्विवाह केला. ( आत्मवृत्त, पा. ३९२ ) पुढें १ जानेवारी १८९९ रोजीं 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केला. आश्रमांत प्रथम एक विधवा स्त्री घेऊन आश्रम चालू केला. (आत्मवृत्त, पा. २८५) आश्रमाची दिवसें-दिवस भरभराट झाली. "मग १९०० च्या जून महिन्यांत आश्रम हिंगण्याच्या माळावर बांधलेल्या कामचलाऊ घरांत नेण्यांत आला." (आत्मवृत्त, पा. ३२९) त्यांनीं "तारीख ४ मार्च १९०७ रोजी रंगपंचमीच्या दिवशीं......सहा विद्यार्थिनी-नींशीं महिला-विद्यालयाची सुरवात केली." त्यांच्या कार्याचें क्षेत्र वाढत वाढत त्याचें रूपांतर कर्वे युनिव्हर्सिटी स्थापण्यांत झालें. या त्यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना 'कर्मवीर' हें पद अर्पण करण्यांत आलें.

त्यांचें कार्य ब्राह्मण व तत्सम जाती यांच्या विधवा व कुमारिका यांच्यापुरतेंच प्रथम होतें. ब्राह्मणेतर जातींतील स्त्रियांना त्यांच्या संस्थेंत प्रवेश मिळत नसे. याबद्दलचा अनुभव दुसरे एक कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांना आलेला होता. ते लिहितात, "ह्या सुमारास प्रो. अण्णासाहेब कर्वे यांनीं हिंगणें येथें अनाथ बालिका-श्रमाची स्थापना नुकतीच केली होती. त्यांच्याकडे मी माझ्या बहिणीसाठीं भेटावयास गेलों होतों. शेणामातीनें सारवलेल्या कुडाच्या भिंतींच्या एका खोपट्यांत प्रो. अण्णा-साहेब जमीनीवर बसले होते. त्यांच्या आश्रमांत ब्राह्मण जातीच्या १०।१५ विधवा मुली होत्या. माझ्या बहिणीला आपल्या आश्रमांत घेतां काय ह्या माझ्या प्रश्नाला, 'ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाहीं,' असें प्रोफेसर अण्णासाहेबांनीं सांगितलें व माझ्या बहिणीला आश्रमांत घेण्याचें साफ नाकारलें. ह्यामुळें माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रांत एक सुधारणा करतांना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येईल ह्याचें हें उदाहरणच आहे.' ( माझ्या आठवणी व अनुभव, पा. १६८ )

# प्रकरण १४ वें

## सिंहावलोकन ( पुढें चालू )

## इंडियन नॅशनल कॉंग्रेस

हिंदी समाज, हिंदी धर्म, हिंदी संस्कृति यांच्यावर चोहोंकडून आघात होत गेल्यामुळें आणि हिंदी समाजांत इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होत गेल्यामुळें हिंदी समाजांत आत्महिताची व स्वहक्कांची जाणीव उत्पन्न झाली. आपलें हित साधण्यासाठीं व स्वहक्क मिळविण्यासाठीं जे सुशिक्षित जनतेंत जागृतीचें कार्य करीत होते त्यांनीं या कार्यासाठीं संस्था स्थापन केल्या. बंगालमध्यें ब्रिटिश इंडिया असोसिएशन १८५१ सालांत स्थापन झाली. ईस्ट इंडिया असोसिएन ही दुसरी संस्था १८७० सालांत स्थापण्यांत आली. इंडिया असोसिएशन ही तिसरी संस्था १८७६ सालीं स्थापली. तिचे सूत्रधार सुरेंद्रनाथ बानर्जी हे होते. मुंबईत बॉंबे असोसिएशन ही संस्था शंकर जगन्नाथ शेट व दादाभाई नौरोजी यांनीं स्थापन केली होती. तिचे कार्यकर्ते मंगळदास, नथुभाई, नवरोजी फर्दुनजी हे होते. पुण्यांत सार्वजनिक सभा, मद्रासमध्यें महाजन सभा ( १८८१ ) आणि मुंबईत बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन या संस्था लोक जागृतीचें कार्य करीत असत. सर फिरोझशहा मेहता, न्या. मू. काशिनाथ त्र्यंबक तेलंग व बॅ. तय्यबजी हे बॉं. प्रे. असोसिएशनचे सूत्रधार होते. हिंदी लोकांना जास्त सवलती दिल्या तर ते आपणाला डोईजड होतील व कदाचित् १८५७ ची नवी आवृत्ति ते काढतील अशी कांहीं राजकर्त्यांची विचारसरणी असल्यामुळें ते हिंदी चळवळीला विरोध करीत असत. इंग्रजी शिक्षणामुळें ज्यांचें जीवन सुधारलेलें आहे अशा सुशिक्षितांच्या आकांक्षा पुऱ्या झाला नाहींत तर ते बंडाला प्रवृत्त होतील, अशी विचारसरणी मांडणारे कांहीं राज्यकर्ते होते. त्यांपैकीं मध्यवर्ती सरकारच्या रेव्हेन्यू, ॲग्रिकल्चर अँड कॉमर्स ( जमाबंदी, शेतकी व व्यापार ) खात्यांतून सेवानिवृत्त झालेले एक ॲंग्लोइंडियन अधिकारी ए. ओ. ह्यूम हे होते. सुरेंद्रनाथ बानर्जी हेहि सेवानिवृत्त I. C. S. गृहस्थ होते. या

दोघांच्या खटपटीमुळें व इतरांच्या सहकार्यानें सुशिक्षितांची संघटना करण्याचें ठरलें. या कार्याची रूपरेषा आखण्यासाठीं मुंबईतील गोवालिया टँकच्या जवळच्या गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजमध्यें एक बैठक १८ डिसेंबर १८८५ ला दुपारीं भरली. त्याच बैठकींत इंडियन नॅशनल काँग्रेस जन्मास आली. (काँग्रेसचा इतिहास, पा. १–१८)

१८८५ पासून १८९५ पर्यंत काँग्रेसचीं जीं वार्षिक अधिवेशनें झालीं त्यांत हिंदी समाजाच्या राजकीय व सामाजिक सुधारणेबद्दल ऊहापोह व ठराव होत. राजकीय अधिवेशन संपल्यावर सामाजिक अधिवेशन होई. मात्र दोन्ही अधिवेशनांचे अध्यक्ष व दिवस निरनिराळे असत. मंडप एकच असे. १८९५ सालांत काँग्रेसचें अधिवेशन पुण्यांत घेण्याचें ठरलें. पुणें हें जीर्णमतवाद्यांचें व पेशवाईच्या अवशेषांचें माहेरघर! तेथें राजकीय सुधारणेबरोबर सामाजिक सुधारणेचा उहापोह होणें म्हणजे पुण्याचें नाकच कापणें! ही विचारसरणी जीर्णमतवाद्यांनीं स्वीकारून सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपांत होऊं द्यावयाची नाहीं असा चंग बांधला. त्यांचें नेतृत्व टिळकांच्याकडे होतें, पण तें प्रकटपणें नव्हतें.

जीर्णमतांचें बीजारोपण चिपळुणकरांनीं केलें व टिळकांनीं आपल्या निर-निराळ्या चळवळींचें पाणी घालून तें बीज वाढविलें व त्या बीजाचा वृक्ष वाढविला.

१८९१ च्या आक्टोबरमध्यें पुण्यांत 'चहा ग्रामण्य प्रकरण' विशेष गाजलें. त्यामुळेंहि टिळकांच्या लोकछंदानुवर्ती धोरणाचा, आणि प्रतिगामी वर्तनाचा स्पष्टपणें स्फोट झाला. गोपाळ विनायक जोशी या नांवाचे एक विक्षिप्त स्वभावाचे पण मोठे चळवळे गृहस्थ होते. अमेरिकेंतून विद्याविभूषित होऊन महाराष्ट्रांत परत आलेल्या महिला महाराष्ट्रीय विदुषी डॉ. आनंदीबाई जोशी यांचे ते यजमान. ते स्वतःला कधीं सुधारक तर कधीं दुर्धारक म्हणवून घेत असत. "गोपाळराव जोशी यांनीं एक भोळा व अधाशी मिशनरी गांठला व चल मी तुला एक सुशिक्षित हिंदू येशूच्या कळपांत जाहीर रीतीनें देतों असें भासवून त्याला नादाला लाविलें. आणि अमुक दिवशीं अमुक वेळीं आपण संगमावर जाऊन बाप्तिस्मा घेणार अशी वर्तमानपत्रांतून जाहिरातहि दिली." (टिळक, पा. ३२२–३२३) त्यांच्या अशा प्रकारच्या घालमेली स्वभावामुळें त्यांची सर्व पंथांच्या लोकांशीं जानपछान होती. पुण्यांतील वेताळ पेठेंतील पांच हौद (पंच हौद) मिशनच्या ख्रिस्ती शाळेंत रे. रिव्हिंग्टन हे मुख्य शिक्षक होते. जोश्यांची या रिव्हिंग्टन साहेबांशीं चांगली मैत्री होती. मिशन शाळेंत एकादी सभा घ्यावी व तींत एकादें चर्चात्मक भाषण घडवून आणावें, आमंत्रित पाहुण्यांना अल्पोपहार द्यावा, व त्यानंतर या पाहुण्यांपैकीं खरे सुधारक कोण हे जनतेस दाखवावें, अशी जोश्यांची या प्रकरणांत भूमिका होती. या योजनेस रिव्हिंग्टन साहेब व त्यांच्या सहकारी मुख्य सिस्टर

यांनीं आपली संमति दिली. पुण्यांतील ठळक सुशिक्षितांना, जीर्णमतवाद्यांना व सुधारकांना सभेचें आमंत्रण दिलें. सभेस जे प्रमुख लोक हजर राहिले त्यांत टिळक, रानडे, इत्यादि गृहस्थ होते. सभा संपल्यानंतर रिव्हिंग्टनसाहेबांनीं प्रत्येक पाहुण्यापुढें बिस्किटें व चहा ठेवण्याची व्यवस्था केली. कांहीं जणांनीं चहा व बिस्किटें यांना फक्त हात लावून रिव्हिंग्टनसाहेबांचा मान राखला. तर कांहीं जणांनीं चहा व बिस्किटें फस्त करून त्यांचा मान राखला. या नंतर जोशीबुवानीं 'पुणें वैभव' या पत्रांत सभेचा वृत्तांत प्रसिद्ध केला. सभेस हजर असलेल्यांचीं नांवें व चहा-बिस्किटें यांचा कार्यक्रम हेंहि वृत्तांतांत प्रसिद्ध केलें. तेव्हां पुण्यांत मोठा हलकल्लोळ उडून गेला. सभेस हजर नसलेल्या लोकांचींहि नांवें जोश्यांनीं पुणें वैभवांत प्रसिद्ध केलीं होतीं, तेव्हां त्या लोकांनीं पुणें वैभवावर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. व त्या पत्राच्या संपादकाला २०० रु. दंड झाला.

ख्रिस्त्यांच्या हातचीं चहा-बिस्किटें ज्या ब्राह्मणांनीं घेतलीं त्यांच्यावर पुण्यांतील धर्ममार्तंडांनीं ग्रामण्य रचलें, श्री. शंकराचार्यांकडे त्यांच्यावर फिर्याद गुदरली. "श्रींच्या दरबारांतून प्रतिवादींना नोटिसा निघून प्रकरण सुरू झालें...... ग्रामण्यांतील वादींना श्रींनीं कमिशन पाठविलें. व आरोपींनीं त्यांचा अधिकार कबूल केला. या गोष्टींत धन्यता वाटून त्यांनीं हें प्रकरण होईल तेवढें लांबविलें... कमिशननें खालीलप्रमाणें व्यक्तिशः निकाल दिला......टिळकांनीं चहा घेतल्यानंतर श्रीक्षेत्र काशीस जाऊन सर्व प्रायश्चित्त घेतल्याचा खात्रीलायक दाखला दिला. शिवाय पुण्यासही दोन कृच्छ्रें प्रायश्चित केलें म्हणून त्यांनीं आणखी प्रायश्चित घेण्याचें कारण नाहीं असें कमिशननें ठरविलें." ( टिळक, खंड १ ला, पा. २८९ )

या प्रकरणासंबंधीं आगरकरांनीं १४ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकांत 'वेळेवर सूचना' हा अग्रलेख लिहिला. व त्यांत 'रा. टिळकांसही आमचें तेंच सांगणें आहे. ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात व बिसकुटें झोडून, श्रीशंकराचार्यांशीं वर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं,' असा मजकूर लिहिला. टिळकांनीं या मजकुराचा केसरीच्या ता. २२ नोव्हेंबर १८९२ च्या अंकांत इन्कार केला. हा वाद टिळक व आगरकर यांच्यांत बराच वाढला व शेवटीं मी मेस्मनच्या हातचा भात खाल्ल्याचें गेल्या सुधारकांतील विधान खोटें आहे; करितां तें परत तरी घ्यावें अथवा त्याच्या समर्थनार्थ तुमच्या जवळ असलेला पुरावा तरी प्रसिद्ध करावा, नाहींतर बदनामी केल्याबद्दल तुमच्यावर कोर्टांत फिर्याद करणें भाग पडेल, अशा आशयाचें धमकीवजा पत्र टिळकांनी आगरकरांना पाठविलें. पण आगरकरांनीं सुधारकांत केलेलें विधान परत घेण्याचें नाकारलें.

शेवटीं सीताराम गणेशपंत देवधर (सुधारकाचे उपसंपादक) व रानडे या दोघांनीं टिळकांशीं विचारविनिमय करून आगरकरांची समजूत घातली. नंतर

आगरकरांनीं ' टिळकांनीं मेस्मनच्या हातचा भात खाल्ला ' याबद्दलचें आपलें विधान २८ नोव्हेंबर १८९२ च्या सुधारकांत परत घेतलें. (आगरकर, पा. २८०–२८९) टिळकांनीं वाठारच्या स्टेशनावर बटलरच्या हातचें जेवण खाल्लें होतें ही गोष्ट आगरकरांना माहिती होती. (आगरकर, पा. ८८) पण साक्षीपुराव्याच्या अभावीं त्यांचें विधान कोर्टांत फोल ठरेल ही जाणीव देवधर व रानडे यांनीं आगरकरांना दिली म्हणून त्यांना आपलें विधान परत घेणें भाग पडलें. याचा परिणाम असा झाला कीं, आगरकर हे टिळकांवर खोटे आरोप करतात हें जें टिळकांचें म्हणणें होतें तें सत्य समजण्यांत आलें. यामुळें टिळक व त्यांचे अनुयायी हे जीर्णमतवाद्यांच्या मनांत मोठे धर्मनिष्ठ पुढारी ठरले गेले. आणि आगरकर व त्यांचे साथीदार सुधारक हे असत्याचारी व धर्मभ्रष्ट लोक होत, असा समज पसरला.

सुधारकांच्या हल्ल्याला पद्धतशीरपणें तोंड देण्यासाठीं जीर्णमतवाद्यांना एकादा आंग्लविद्याविभूषित पण जीर्णमताभिमानी पुढारी हवा होता. चिपळुणकर असले पहिले गृहस्थ होते. पण त्यांच्यांत सभाधीटपणा नव्हता. व लोकांत मिळुनमिसळून राहाण्याचें अंग तर त्यांना कांहींच नव्हतें. टिळकांमध्यें हे गुण होते. शिवाय ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. संमतिवयाच्या कायद्याच्या वावटळांत रावसाहेब मंडलिक यांच्या प्रेरणेनें व प्रोत्साहनानें टिळकांनीं आपण जीर्णमताभिमानी आहोंत ही भूमिका स्वीकारली तेथूनच त्यांच्या राजकीय चरित्राला सुरवात झाली. जीर्णमताभिमान्यांनीं त्यांना आपला पुढारी म्हणून मुक्रर केलें व त्यांच्या नेतृत्वाखालीं सामाजिक व धार्मिक सुधारणांना विरोध करण्याचा चंग बांधला. सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याचा सरकारला कांहीं एक हक्क नाहीं व सुधारक या बाबतींतील सरकारपुढें जें लांगूलचालन करतात तें त्याज्य होय, अशी टिळकांनीं भूमिका स्वीकारली. याच भूमिकेंतून त्यांनीं पुढें अशी दुसरी भूमिका उत्पन्न केली कीं, हिंदु समाजाचें व हिंदु धर्माचें सुधारणेशिवाय कांही अडून राहिलेलें नाहीं. हिंदुस्थानाला प्रथम राजकीय स्वातंत्र्य हवें मग या देशांत हव्या तेवढ्या सुधारणा आम्ही घडवून आणूं. ही भूमिका जीर्णमतवाद्यांना पटल्यामुळें त्यांनीं टिळकांना राजकीय चळवळींत जिवापाड मदत केली. आणि सुधारकांची सुधारणेच्या बाबतींतील चळवळ हाणून पाडण्यास त्यांनीं टिळकांबरोबर कंबर कसली. आपण जीर्णमतवादी आहोंत तर चहाग्रामण्याबद्दल प्रायश्चित घेणें जरूर आहे हें ठरवून टिळकांनीं शास्त्रीलोकांनीं ठरविलेलें प्रायश्चित घेतलें. त्यांच्यावर ग्रामण्यें चालू होतीं तेव्हां त्यांच्या घरांत जीं धार्मिक व सामाजिक कर्में झालीं त्या वेळीं पूजार्चेसाठीं त्यांना ब्राह्मण मिळाले नाहींत. १८९३ सालीं त्यांचा थोरला मुलगा विश्वनाथ याचा व्रतबंध झाला. त्याच सालीं त्यांच्या थोरल्या कन्येचा विवाह झाला. या व इतर कार्यांकरितां त्यांना ब्राह्मण मिळविण्यास फार अडचण पडली. कारण त्यांना भोंवलेलें मिशनचें चहा-

ग्रामण्य. तेव्हां टिळकांनीं दरमहा वेतन देऊन कांहीं पुरोहित, पुराणिक व वैदिक ब्राह्मण नोकरीस ठेवले व त्यांच्या हस्तें घरांतील सर्व धार्मिक कृत्यें ते करूं लागले." ( टिळक, पा. ३०५-३०६ )

सामाजिक व धार्मिक प्रश्नासंबंधीं जीं प्रकरणें उपस्थित झालीं त्यांत टिळकांनीं व त्यांच्या अनुयायांनीं सामाजिक व धार्मिक सुधारणेचें बीजांकूर खरडून काढण्याचे आटोकाट प्रयत्न केले. अल्पवयी मुलीशीं वाटेल तितक्या वयाच्या पुरुषाचें लग्न होतें हें मुलीच्या व तिच्या पतीच्या हिताच्या दृष्टीनें वाईट आहे, ही विचारसरणी सुशिक्षित हिंदूंनीं समाजांत प्रसृत केली. मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा कायद्यानें वाढवावी, अशी चळवळ मलबारी या नांवाच्या पार्शी गृहस्थानें सुरूं केली. याच सुमारास एका अल्पवयीन विवाहित मुलीचें आयुष्य दुःखपर्यवसायी झालें. त्याचा वृत्तांत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला. तेव्हां चोहोंकडे या प्रकरणाबद्दल चर्चा होऊं लागली.

हरी मोहन या नांवाच्या ३० वर्षं वयाच्या बंगाली गृहस्थानें एका अल्पवयी मुलीबरोबर लग्न केलेलें होतें. तिचें नांव फुलमानी. त्यानें तिच्याबरोबर जबरी संभोग केला. त्या बलात्कारानें फुलमानी मरण पावली. सरकारनें हरी मोहनवर मनुष्यवधाचा खटला भरला. हें फुलमानी प्रकरण १८९० च्या ऑगस्टमध्यें गाजलें. मलबारी व सुधारक हिंदु गृहस्थ यांनीं मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्याची जी चळवळ चालूं केली होती तिला या प्रकरणानें मोठा टेकू दिला. इंडियन पिनल कोडाच्या कांहीं कलमांत संमतिवयाचें मान १२ धरलेलें होतें व कांहीं कलमांत बलात्कारासंबंधाची वयोमर्यादा १० वर्षांची धरलेली होती. पिनल कोडांतील हीं परस्परविरोधी कलमें दुरुस्त करून संभोगसंमतीची वयोमर्यादा जी १० कायदेशीर धरली जात होती ती १२ करावी अशी मागणी सरकारकडे करणारें पत्रक दयाराम गिडूमल या नांवाच्या समाजसुधारकानें प्रसिद्ध केलें. मलबारी वगैरे सुधारकांनीं सरकारला जाहीर विनंती केली कीं, या बाबतींत सरकारनें कायदा मंजूर करावा. या प्रश्नावर सरकार आणि सुधारक यांच्यांत भवति न भवति होऊन शेवटीं सरकारनें कायदा करण्याचें ठरविलें. १८९१ सालाच्या प्रारंभीं संमतिवयाच्या कायद्याचें बिल वरिष्ठ कायदे कौन्सिलांत प्रविष्ट झालें.

संमतिवयाचा कायदा सरकारनें करावा ही सुधारकांची चळवळ चालूं झाली तेव्हां टिळक व इतर सनातनी यांनीं या चळवळीला खो घालण्यासाठीं नाना प्रकार केले. हिंदु धर्मांतील शास्त्रपुराणांत जी वयोमर्यादा घातलेली आहे तीच योग्य होय, ती बदलण्याची सरकारला कांहीं जरूरी नाहीं, असे विचार प्रदर्शित करणारें एक पुस्तक लिहून टिळकांनीं तें प्रसिद्ध केलें. तें पुस्तक म्हणजे गिडूमल यांच्या पुस्तकाला उत्तर होतें. स्त्रियांवर गुदरणारा अनिष्ट प्रसंग टाळण्याचा हा ( कायदा ) एक मार्ग होता, व त्यानें कोणत्याहि प्रकारच्या धर्मावर घाला पडत नव्हता. परंतु कायद्यांत सरकार

फेरबदल करणार या एकाच गोष्टीनें पुराणाभिमानी समाज संतापला. गिडूमल यांच्या पुस्तकांतल्या मुद्यांना जवाब देऊन संमतीचें आहे तेंच वयोमान योग्य आहे, असें आग्रहानें प्रतिपादन करणारें तें पुस्तक टिळकांनीं छापून काढलें व त्या वेळेपासून त्यांची गणना धर्मसंरक्षकांत होऊं लागली. ( रानडे, पा. ४२१-२२ )

संमतिवयाची चळवळ हाणून पाडण्यासाठीं सनातन्यांनीं नाना प्रकार केले. पुण्यांतील सनातन्यांनीं अजब करामत करून या चळवळीची टिंगल केली. या लोकांनीं दोन महिन्यांची गाढवी व सहा महिन्यांचा गाढव पैदा करून त्यांचा विवाह-समारंभ मोठ्या थाटामाटानें पुण्यांतील प्रमुख रस्त्यांतून वाजत गाजत मिरवणूक काढून साजरा केला. गर्दभवराचे पिताजी कै. डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पतिराज हे झालेले होते. गर्दभ वधू व वर यांचे मुखवटे लग्नपत्रिकेंत छापून त्या लग्नपत्रिका लोकांना वाटल्या. वरात वाजत गाजत काढण्यासाठीं सनातन्यांनीं पोलीसची परवानगी मागविण्यासाठीं अर्ज केला पण तो मंजूर झाला नाहीं. तरीहि सनातन्यांनीं गर्दभ वधुवरांची वरात काढली. पण पोलिसांनीं ती वरात मधेंच अडविली. ( रानडे, पा. ४३७-३८ ). संमतिवयाचें बिल वरिष्ट कायदेमंडळांत आलें ( १८९१ ) तेव्हां सनातन्यांनीं ठिकठिकाणीं सभा भरवून बिलाचा, सुधारकांचा आणि सरकारचा जाहीर निषेध केला. पुण्यांतील सनातन्यांनीं शनिवारवाड्यासमोर जाहीर सभा भरवून बिलाला विरोध केला. या सभेचे प्रमुख पुढारी टिळक व जिनसीवाले हे होते. जिनसीवाल्यांनीं आपल्या भाषणांत रानडे, भांडारकर, आगरकर यांची मनस्वी नालस्ती केली. ते आगरकरांबद्दल म्हणाले, " अरे ! तोफेचा गोळा हवा कशाला ? काठी फेकली तर सहन होणार नाहीं ! आधींच दमा झाला आहे. एक बुक्कादेखील सहन होणार नाहीं." संमतिवयाच्या कायद्याला अनुकूल लोकमत तयार करण्यासाठीं सुधारक झटत होते. डॉ. भांडारकर व तेलंग हे धर्मशास्त्रवचनें पुढें ठेवून सुधारकांची बाजू सबळ करण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत होते. टिळक हे व्हिक्टोरिया राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्यांतील कलमांचा आधार घेऊन व संमतिवयाला प्रतिकूल शास्त्रवचनें पुढें करून आपल्या प्रतिगामी पक्षाची बाजू लोकांपुढें सबळ करीत होते. संमतिवयाच्या कायद्याला जाहीरपणें पाठिंबा व्यक्त करण्याकरितां सुधारकांनीं पुण्यांतील क्रीडाभुवनांत सभा भरविली. " या सभेवर पुण्यांतल्या विद्यार्थीवर्गानें दगडविटांची वृष्टि केल्यामुळें तिचें कार्य सुरळित पार पडण्याची आशा उरली नाहीं, व दगडविटांच्या वृष्टींतच घाईघाईनें सुधारकांना सभेचा उद्देश सिद्धीस न्यावा लागला. या सभेला टिळक हजर होते. त्यांची मूर्ति सभास्थानानजिक येतांच त्यांच्या नांवाचा जयजयकार झाला. ते जोंवर दिसले नव्हते तोंवर 'आमचा पार्नेल कुठें आहे ?' अशा गौरवदर्शक चौकशीच्या आरोळ्या सभा मोडणारांकडून ठोकल्या जात होत्या. वास्तविक या सभेला जाण्याचा टिळकांना हक्क नव्हता. परंतु आपण केसरी-मराठ्याच्या बातमीदारांना पोंचविण्याकरितां आलों आहों

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २३५५१... दि: ...
क्रमांक ...... नों: दि: ......



असें सांगून टिळकांनीं सभास्थानीं प्रवेश करून घेतला. सभा संपल्यावर कित्येक मंडळी मारामारी केल्याच्या आरोपावरून फौजदारी न्यायासनासमोर खेंचली गेली. पण आरोप कोणावरच शाबित न झाल्यामुळें फिर्यादीचा खटाटोप व्यर्थ ठरला. (रानडे, पा. ४४३)

"कायदा झाल्यानंतर संमतिवयाचा वाद संपतां संपतां शिमग्याचा सण आला. आणि सुधारकांच्या नांवानें अहर्निश जळफळणाऱ्या पुणेकरांनीं आपली सूड उगवण्याची हौस परोक्ष रीतीनें पुरवून घेतली. इंग्रजी राज्यांत सुधारकांचे मुडदे पाडून कोल्ह्याकुत्र्यांना त्यांच्या शवांची मेजवानी चारणें सुधारणेच्या शत्रूंना शक्य नव्हतें. म्हणून त्यांनीं धुळवडीच्या दिवशीं सुधारकांचे एक नकली प्रेत तयार केलें. आणि ठळक ठळक सुधारकांच्या दारांवरून मिरवीत व त्यांच्या नांवानें 'दुनियेंतले सुधारक मेले' असा तोंडाचा पांचजन्य वाजवीत त्या प्रेताला स्मशानभूमीकडे नेलें. प्रेताला सजविण्यांत त्याच्या कर्त्यांनीं बरीच कल्पकता लढविली होती. तोंडांत अंडें, गळ्यांत पावबिस्किटांचा हार, उरावर दारूची बाटली आणि खाकेंत सुधारक व इंदुप्रकाश हीं दोन पत्रें, असा त्या प्रेताचा साज होता. प्रेतामागून शाळेंतील मुलें व बरेच मोठ्या वयाचे टवाळ, यांची गर्दी चालली होती. स्मशानभूमींत त्याला शास्त्रोक्त अग्निसंस्कार देण्यांत पुरुषार्थ नाहीं असें वाटूनच कीं काय तेथून त्यास लांब नेलें व एका नाल्यांत फेंकून दिलें. परत घरोघर जातांना या प्रेतवाहकांनीं आणखी एकदां 'दुनियांतले सुधारक मेले' असा तोंडाचा वाजा कांहीं वेळ चालविला होता. या शिवाय सदर शिमग्यांत पुण्यास संमतिवयाच्या कायद्याचे दुष्परिणाम दाखविणारे तमाशे अनेक पेठांतून झाल्याची साक्ष तत्कालिन वृत्तपत्रें देतात. शिमग्याच्या समाप्तीनंतर हा सामाजिक वाद ऐकूं येईनासा झाला." (रानडे, पान ४४४)

टिळक व आगरकर हे सहाध्यायी होते तेव्हां दोघांचे विचार सामाजिक व धार्मिक सुधारणांबद्दल अनुकूल होते. केसरी हें पत्र १८८१ पासून आगरकरांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें. आणि मराठा हें इंग्रजी पत्र टिळकांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें. या दोन्ही पत्रांत सुधारणेला अनुकूल असे लेख १८८१ ते १८८७ पर्यंत येत होते. (आगरकर, पा. ६६) पुढें टिळकांनीं आपला पवित्रा बदलला व ते सनातनी बनूं लागले, त्यामुळें टिळकांचे व आगरकरांचे खटके उडाले व त्यांच्यांत कायमची दुही माजली. "१८८४ सालापर्यंत तरी आगरकर आणि टिळक यांचा 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः' असा संबंध होता. पुढें क्रमाक्रमानें टिळकांची पगडी फिरली. तेव्हां हींच मतें त्यांच्या चरित्रकारांनीं एकांतिक होती म्हणून विधान ठोकून आपल्या आराध्य देवतेची महापूजा केली. परंतु या महापूजेच्या समारंभांत खुद्द त्या देवतेविषयीं मात्र गैरसमज पसरविण्याचें पाप घडून आलें आहे." (आगरकर, पान ११०)

संमतिवयाचा कायदा सरकारनें लोकमत अजमविण्यासाठीं १८८९ सालीं प्रसिद्ध केला तेव्हां सनातन्यांतर्फे रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक हे कायद्याला विरोध करण्यास पुढें सरसावले. ते टिळकांच्या वडिलांचे स्नेही, त्यांच्या उपदेशामुळें टिळक सनातनी कंपूंत शिरले. या कायद्याला विरोध करतांना टिळकांना रानडे, भांडारकर, आगरकर, इत्यादिकांशीं वितंडवाद पिकवावा लागला.

" सदरहू वादळाच्यावेळीं टिळकांनीं जीं स्मृतिवचनें पुढें आणलीं होतीं त्यांचा अर्थ लावण्यांत त्यांनीं खुद्द डॉ. भांडारकरांची मदत घेतली होती, इतकेंच नव्हे तर वादविवाद किंवा टिळकांचे लेख वाचून त्यांना कांहीं पारिभाषिक शब्द ऐकूनहि माहीत नव्हते, व टिळकांनीं कांहीं वचनांचा आपणास हवा तसा अर्थ काढण्याकरितां त्यांतील शब्दांची फिरवाफिरव केली होती, या गोष्टी भांडारकरांनींच उघडकीस आणल्या आहेत. याशिवाय सबंध वादांत टिळक आपणाशीं मुद्दाम असभ्यपणानें बोलत होते असें भांडारकरांनीं स्पष्ट म्हटलें आहे. याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या गृहस्थाचे — कै रा. ब. यशवंत वासुदेव उर्फ बापूसाहेब आठले यांचे-वादविषयाच्या बाबतींतील मत टिळकांस मान्य होऊन त्याबद्दल त्यांनीं त्यांची सढळ हातानें स्तुति करून त्यांना डॉ. भांडारकरांच्या बरोबरीचे किंबहुना कांकणभर जास्त विद्वान ठरविलें होतें, त्यांनींच मग पत्र लिहून केसरीच्याद्वारें सदरहू सर्व प्रकारचा निषेध करून भांडारकरांनीं दिलेला अर्थ प्रायःच बरोबर आहे असें स्पष्ट मत कळविलें. हे बापूसाहेबांचें पत्र ता. १७ मार्च १८९१ च्या केसरींतच प्रसिद्ध झालेलें असून केळकरांनीं आपल्या बाराव्या प्रकरणांत दिलेला हकिकतींत त्याचा पत्ता नाहीं. " ( तेलंग, पा. २५१-५२ )

संमतिवयाच्या प्रश्नावर टिळक आणि आगरकर यांचें जबर वाग्युद्ध झालें. टिळक जीं जीर्णमतें प्रतिपादीत त्याप्रमाणें ते घरीं आचरण करित नसत. मुलींच्या वयाची मर्यादा वाढवूं नये या मुद्यावर टिळकांनीं आकाशपाताळ एक करून सनातन्यांना सुधारकांविरुद्ध आणि सरकाराविरुद्ध उभें केलें. परंतु त्यांनीं आपली कन्या कृष्णाबाई हिचा विवाह सोळाव्या वर्षी केला. तेव्हां आगरकरांनीं या बाबतींत एक स्फुट १२ जून १८९३ च्या सुधारकांत लिहून टिळकांच्या दुटप्पी वर्तनावर प्रकाश टाकला. तें स्फुट येणें प्रमाणें:

## " अनुकरणीय विवाह

"रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांची कन्या कृष्णाबाई व रा. रा. गंगाधर नरसिंह केळकर यांचे चिरंजीव विश्वनाथराव यांचा गेल्या गुरुवारीं विवाह झाला हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. या विवाहाचा विशेष निर्देश करण्याचें कारण या विवाहांतील वधूचे वय प्रौढ हें होय. आतां १६ वर्षांपर्यंत आम्ही आपल्या कन्येचा विवाह करणार नाहीं अशा दुसऱ्या लोकांपासून सह्या मागणारे रा. टिळक

यानीं आपल्या कन्येचा त्या वयापूर्वीं विवाह करावा, व सर्व विवाह एकदम न करतां त्यापैकीं कांहीं भाग दिवसगतीवर टाकण्याचा नवीन प्रघात आपण पाडणार म्हणून उगाच वाच्यता करून शेवटीं ती जागच्या जागींच जिरावी ह्या गोष्टी आमचे बंधू केसरीकार यांस कदाचित पसंत पडोत न पडोत व ते त्यांस त्यांच्या मानसिक धैर्याबद्दल वाटेल तितकीं बरीं वाईट दूषणें देवोत ; परंतु अशा गोष्टी सर्वथा एकाच व्यक्तीच्या हातीं नसतात, त्यांचा इतरांशीं पुष्कळ संबंध पोंचत असतो हें आम्हीं पूर्णपणें जाणून आहों म्हणून रा. टिळकांनीं हर प्रयत्न करून निदान चौदावें वर्ष लागेपर्यंत तरी आपली कन्या अविवाहित ठेविली याबद्दल आम्ही त्यांचें मनापासून अभिनंदन करतों व इतरांनींही यथाशक्ति यांचें अनुकरण करण्याची मनापासून इच्छा धरावी अशी सर्वांस शिफारस करतों. असो, सरते शेवटीं या नूतन दंपत्यास 'दीर्घायुरस्तु धनधान्यसंसृद्धिरस्तु, इष्टकार्यसिद्धिरस्तु' असा आशीर्वाद देऊन आम्ही हा छोटा अभिनंदन लेख संपवितों." (आगरकर, पा. २६१-२६२)

या मजकुरांत १६ वर्षांपर्यंत मुलीचें लग्न करूं नये याबद्दल टिळकांनीं लोकांकडून सह्या मागितलेल्या होत्या असा जो उल्लेख आहे, त्यावर टिळकांनीं केसरींत आक्षेप घेतला व हें विधान वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें आहे, असा आगरकरांना टोला मारला. त्या आक्षेपाला आगरकरांनीं सुधारकाच्या ता. १९ जून १८९१च्या अंकांत उत्तर दिलें. त्यांतील प्रमुख भाग येणें प्रमाणें :

"आमचे बंधू आम्हांस विचारतात कीं १६ वर्षांपर्यंत (कन्येचा) विवाह करणार नाहीं अशा तऱ्हेच्या सह्या रा. टिळकांनीं कधीं केल्या होत्या हें सुधाकार निश्चयानें सांगतील तर बरें होईल. पण जें विधान आम्ही मुळीं केलेंच नाहीं त्याचें समर्थन आम्ही कसें करावें हें आम्हांस समजत नाहीं! अशा सह्या रा. टिळकांनीं केल्या होत्या असें आम्ही कधींही म्हटलें नाहीं; दुसऱ्या लोकांपासून ते सह्या मागत इतकेंच काय तें गेल्या अंकांत म्हटलेलें आहे. वस्तुस्थितीचा असा विपर्यास करण्यांत आमच्या बंधूंचा काय उद्देश होता न कळे! आतां आम्ही लिहिल्याप्रमाणें रा. टिळकांनीं अशा सह्या कधीं मागितल्या होत्या हें जर आमच्या बंधूंस निश्चयानें जाणून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं ता. २७ आक्टोबर १८९० चा ज्ञानप्रकाश पहावा. म्हणजे रा. टिळकांच्या सहीनिशीं प्रसिद्ध झालेलें जे विनंती पत्रक त्यांत उतरून घेतलें आहे, त्यामध्यें पुढील मजकूर त्यांच्या वाचनांत येईल:

> "माझ्या मतें ज्या सुधारणा होणें अवश्य आहे त्या खालीं नमूद केल्या आहेत. (१) मुलींचें लग्न सोळा वर्षांच्या आंत करूं नये. (२) वीस वर्षांच्या आंत मुलाचें लग्न करूं नये. (३) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये. (४) चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं विवाह

( करावा. ५ ) दारू पिणें बंद असावें. ( ६ ) हुंड्याची चाल अजिबात बंद करावी. ( ७ ) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा. ( या मंडळीच्या कामीं ) ( ८ ) विधवेचें वपन करूं नये. सदर सुधारणा अंमलांत आणल्या असतां जातीबाहेर टाकण्याची भीति बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं.

"सदर विनंतिपत्रांत सुचविलेल्या सुधारणा अंमलांत आणण्याच्या हेतूनें पुढे ता. १ नोव्हेंबर १८९७ रोजीं रा. टिळक व रावबहादुर भिडे या दोघांच्या आमंत्रणा-वरून जोशी हॉलमध्यें जी सभा भरविण्यांत आली होती, त्या वेळीं आपल्या विनंतिपत्रांत दाखल केलेली कन्याविवाहाची मर्यादा एकदोन वर्षांनीं कमी करण्यास आपली कांहीं हरकत नाहीं अशा आशयाचे उद्गार रा. टिळकांनीं काढले होते हें आम्हांस माहित आहे. परंतु त्यापूर्वी आपल्या सोळा वर्षांच्या सूचनेस सह्या **मिळविण्याचें** काम त्यांनीं चालविलें होतें हेंही आम्हास पाहिजे तर सिद्ध करून देतां येईल. या वरून सोळा वर्षांपर्यंत आम्ही आपल्या कन्येचा विवाह करणार नाहीं अशा दुसऱ्या लोकांपासून रा. टिळक सह्या मागत होते हें आमचें विधान वस्तुस्थितीस धरून होतें किंवा त्यांत वस्तुस्थितीचा विपर्यास केला होता, हें वाचकांनींच ठरवावें. आतां बाराचे चौदा केल्याचा जो आमच्यावर आरोप केला आहे तो अंशतः खरा आहे हें कबूल केलें पाहिजे. तथापि, त्यांतही केसरीकारांनीं वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याची आपली खुबी दाखविण्याची संधी गमाविली नाहीं. वस्तुस्थिती म्हटली तर वधूस १४ वें वर्ष लागण्यास अद्याप कांहीं महिने अवधि आहे व एवढ्यावरून केसरीकारांस फारतर १३ चे १४ केल्याचा आरोप आम्हांवर आणतां येईल. परंतु एवढ्यानें केसरीकारांची तृप्ति व्हावी कशी ? तेव्हां त्यांनीं वकिली लढविली कीं तेरावें वर्ष लागून कितीही महिने झाले असले तरी पूर्ण वर्ष संख्या जर बाराच आहे तर म्हणाना बाराचे चौदा ! असो, असल्या शब्दच्छलापासून वाचकांस काडीचाही फायदा होण्याचा संभव नाहीं हें आम्हांस माहित आहे; परंतु जाणून बुजून वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचा जबरदस्त आरोप आमच्यावर केला गेला असल्यामुळें स्वसंरक्षणार्थ वरील मजकूर लिहिणें जरूर पडलें. तथापि कर्ते सुधारक म्हणून नेहमीं घमेंड मारणारांनीं १४ व्या वर्षापर्यंत आपल्या कन्येचा विवाह न करण्याची सही दिली असूनही १३ व्या वर्षींच तो उरकून घेतला ही जी कबुली या वादांतून बाहेर पडली तीच काय थोड्या महत्त्वाची आहे ?"

या उत्तरानें टिळक वास्तविक चारी मुंड्या चीत झाले व त्यांची दोन चार वर्षांपूर्वीची सुधारकी मतें बाहेर पडल्यामुळें आणि तीं तशीं नव्हतीं असें म्हणणें शक्य नसल्यामुळें टिळकगणांत हलकल्लोळ झाला. अंगीं उत्तर देण्याची ताकद नाहीं तेव्हां उत्तरादाखल केसरीकर्त्यांनीं "रा. टिळकासंबंधीं हवी तशी खरीं

खोटीं विधानें करण्याचा त्यांचे पूर्वाश्रमीचे बंधु गोपाळराव आगरकर यांनीं मक्ताच घेतला आहे " असे लब्धप्रतिष्ठितपणें हुंदके देण्याला सुरवात केली. बाजू अंगावर आली तरी माझी मिशी वर असें म्हणणें यांत वीरवृत्ति आहे व भगवान श्रीकृष्णाच्या धोरणाचें रहस्य सांठविलें आहे, असें समजणारे कांहीं अर्धवट लोक या भडभडून आलेल्या हुंदक्यामुळें त्यावेळीं फसले नसतील असें नाहीं. पण मेस्मनच्या हातचा भात खाल्ला या विधानाबद्दल आगरकरांना कोर्टांत खेचूं पहाणारे कायदेबाज टिळक 'खरी खोटी' विधानें ऐकून स्वस्त बसले असते, याच्यावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं. आगरकरांनीं यावेळीं नुसती विधानें केलीं नव्हतीं तर ज्यांवर तीं अवलंबून होतीं तो पुरावाहि जगजाहीर केला. 'विधवेचें वपन करूं नये', 'सोळा वर्षांपूर्वीं मुलीचें लग्न करूं नये', 'पुरुषानें चाळीस वर्षांनंतर विवाह करणेंच असल्यास विधवेशीं करावा', असलीं नास्तिक मतें आपल्या आराध्य देवतेनें तीन वर्षांपूर्वीच प्रतिपादिलीं होतीं हें पुराव्यानिशीं बाहेर आलेलें पाहून त्याच्या भक्तमंडळांत आक्रांत झाला असेल! त्यांना कृष्णाचें अवतार समजून त्यांच्यावर काव्य लिहावयास बसलेल्या, अल्पस्वल्प कविशक्ति असलेल्या, पण अक्कल नसलेल्या कवींची आचरट लेखणी जिथल्या तेथें थबकून राहिली असेल! त्यांच्या साहाय्यानें सुधारकीचें संकट हाणून पाडण्याबद्दल मनोराज्य करीत असलेल्या जुन्या भटाभिक्षुकांची दांतखिळी बसली असेल! व या सर्व मोठमोठ्या मंडळींत आतां आपली 'अब्रू' राहील कशी या विवंचनेनें बिचारे अब्रूदार टिळक हवालदील झाले असतील यांत कांहीं नवल नाहीं. (आगरकर, पां. २९३-२९६)

राजकीय प्रगतीसंबंधी कॉंग्रेसच्या अधिवेशनांत विचारविनिमय व ठराव करण्यांत येतात त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणांसंबंधीं कॉंग्रेसच्या अधिवेशनांत विचारविनिमय व ठराव करण्यांत यावेत, असा दृष्टिकोन असणारे कांहीं गृहस्थ होते. सामाजिक परिषद कॉंग्रेसच्या अधिवेशनांत दरवर्षी भरवावी, असा त्यांनीं पक्ष मांडला व कॉंग्रेसच्या सूत्रधारांनीं तो मान्य केला. १८८७ च्या डिसेंबरमध्यें कॉंग्रेसचें अधिवेशन मद्रासला भरलें, तेव्हां कॉंग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद पहिल्यांदा भरविण्यांत आली. या परिषदेचे अध्यक्ष राजा सर टी. माधवराव हे होते. १८८७ पासून १८९४ पर्यंत या परिषदा कॉंग्रेसच्या मंडपांत भरविण्यांत आल्या. १८९५ चें कॉंग्रेसचें अधिवेशन पुण्यांत भरविण्याचें ठरलें तेव्हां सामाजिक परिषदेचें अधिवेशन पुण्याला भरूं द्यावयाचें नाहीं असा पुण्यांतील जीर्णमतवाद्यांनीं चंग बांधला. यावेळीं टिळकांनीं जीर्णमतवाद्यांची बाजू घेऊन व अनेक युक्त्याप्रयुक्त्या योजून सामाजिक परिषद भरवूं इच्छिणाऱ्या सुधारकांना हैराण केलें. कॉंग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविली तर आम्ही मंडपाला आग लावूं व सुधारकांना झडवून काढूं अशा उघड धमक्या पुण्यांतील जीर्णमतवाद्यांच्यातर्फे जाहीर करण्यांत आल्या.

सुधारकांचें व दुर्धारकांचें या प्रकरणांत जें वाग्युद्ध जुंपलें होतें तें हातघाई-वर येत आहे असें पाहून सुधारकांचे अग्रणी रानडे, गोखले वगैरे पुढाऱ्यांनीं संयम राखून पड घेतली. त्यामुळें १८९५ सालीं सामाजिक परिषद सालाबादाप्रमाणें काँग्रेसच्या मंडपांत भरविली नाहीं. ती निराळी भरविण्याचें ठरलें. सुधारकांनीं स्वतंत्र सभामंडप उभारण्याचें ठरविलें तेव्हां सनातन्यांच्या हस्तकांनीं असें जाहीर केलें कीं, सुधारकांनीं सामाजिक परिषद पुण्यांत भरवूं नय, ते ती भरवूं पाहतील तर त्या सभेचा मंडप अगोदरच जाळण्यांत येईल. या तंग वातावरणांत परिषद भरवून जास्त बखेडा माजविणें बरें नव्हे असें ठरवून सुधारकांनीं परिषद भरविण्याचा नाद सोडून द्यावा असें कांहींचें मत पडलें, तर इतर म्हणूं लागले कीं, हें धोरण चळवळीला घातक आहे. अखेर परिषद पोलीस संरक्षणांत भरविण्यांत आली. येथूनच सामाजिक व धार्मिक सुधारणांची वाढ खच्ची होत गेली आणि राजकीय सुधारणा प्रथम व नंतर सामाजिक व धार्मिक सुधारणा ही विचार-सरणी हिंदु समाजांत पुढें जोरांत वाढत गेली. (" Under the leadership of the late Mr. Tilak, the courtesy with which the Congress allowed the Social Conference the use of its pandal was withdrawn and the spirit of enmity went to such a pitch that when the Social Conference desired to erect its own pandal a threat to burn the pandal was held out by its oppnents. Thus in course of time the party in favour of political reform won and the Social Conference vanished and was forgotten. "--Annihilation of Caste, p. 4)

या मुद्यासंबंधी श्री. श्रीनिवास नारायण कर्नाटकी यांनीं खालीलप्रमाणें विचार प्रदर्शित केलेले आहेत : " बंगालमधील उमेशचंद्र बानर्जी, सुरेंद्रनाथ बानर्जी, लाहोरचे लाला लजपतराय, लाला मुनशीराम हे सर्व प्रसिद्ध राजकीय पुढारी त्यांच्या प्रांतांत सामाजिक परिषद आली म्हणजे तिला आनंदानें हजर राहून व अन्य रीतीनें मदत करीत असत. याला सर्व हिंदुस्थानांत अपवाद म्हणजे फक्त आमचा महाराष्ट्र. ...सन १८८७ सालापासून सामाजिक परिषद दरवर्षी राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सभेचे काम संपल्यानंतर भरत असे व तिचे काम एक दिवस चाले... फक्त १८९५ मध्यें पुण्यास राष्ट्रीय सभा आली तेव्हां त्या सभेचा मंडप सामाजिक परिषदेला द्यावयाचा नाहीं असा क्षुल्लक कारणावरून वाद उपस्थित होऊन शेवटीं परिषद दुसऱ्या ठिकाणीं भरवावी लागली. पुण्यास १८९५ मध्यें सामाजिक परिषदेस विरोध करणारे गृहस्थ पूर्वीच्या परिषदांना हजर राहिले होते. इतकेंच नव्हे तर त्यांनीं कित्येक ठरावांच्या सूचना पुढें आणल्या होत्या व दुसऱ्या कित्येकांना अनु-मोदनें दिलीं होतीं. अशा गृहस्थांनीं परिषदेस विरोध कां करावा व तो पुण्यासच कां करावा याचा वाचकांनीच विचार करावा. याचा यापेक्षां जास्त इकडे उल्लेख करण्यांत अर्थ नाहीं. " ( तेलंग, पा. २३७ )

प्रो. माधव दामोदर आळतेकर यांनीं टिळकांच्या प्रतिगामीपणाबद्दल खालील विचार प्रदर्शित केलेले आहेत : "तेव्हां कॉलेजमध्यें झालेले म्हणून कल्पित संवाद प्रसिद्ध करून टिळकांच्या त्या वेळच्या मतांचा व मनःस्थितीचा समन्वय पुढील काळांतील त्यांच्या मतांशीं व मनःस्थितीशीं करण्याचा प्रयत्न हा जसा हास्यास्पद आहे तसाच तो अत्यंत गैरशिस्तही आहे. टिळकांच्या मतांचा विकास कसकसा झाला व कोणत्या कारणांमुळें होत गेला याचा विचार करणें ही गोष्ट निराळी आणि स्वतःच्या पूर्वग्रहावरून व स्वतःला प्रिय असलेल्या मतांच्या अभिमानामुळें टिळक जन्माला आले तेव्हांच पुराणमताभिमानी म्हणवणाऱ्यांना प्रिय असलेलीं मतें घेऊन आले असें म्हणणें निराळें. संमतिवयाच्या वादाला तोंड लागेपर्यंत टिळक हे सुधारक म्हणून प्रसिद्ध होते. ही गोष्ट टिळकांचे चरित्र लिहिण्याऐवजीं त्यांच्यावर कादंबरी लिहिण्याचा ज्यांचा मानस आहे अशा कांहीं थोड्या विचित्र लोकांखेरीज सर्वांना माहित आहे." (पा. ७४)

"अपरंपार अहंकार, परमावधीची परोत्कर्षासहिष्णुता आणि जें जें उत्तम किंवा स्तुत्य आहे त्याबद्दल अतोनात हेवा आणि उभ्या जगाचा कारभार केवळ आपल्या मर्जीप्रमाणें चालावा अशी महत्त्वाकांक्षा आणि सर्वांना सतत उजळा देणारी कुत्सित बुद्धि इत्यादि गुणांचा टिळकांच्या ठिकाणीं पुढें पुढें जो उत्कर्ष होऊं लागला त्यांची सुरवातीला बीजरूपानें आगरकरांना आपल्या सालस स्वभावामुळें कल्पना येणें जसें शक्य नव्हतें, कांहींही कारणामुळें गांवातील छिद्रान्वेषी आणि गांवगुंड कुटाळांचा वेढा हळूहळू टिळकांभोंवतीं पडूं लागला. स्वतःची स्तुति करणाऱ्यांकडून होणारी परनिंदा त्यांना साहजिकपणें लागते तसाच कांहींसा प्रकार टिळकांच्या बाबतींत झाला." (आगरकर, पान ६३)

टिळक हे जीर्णमतांची बाजू घेणारे आणि सामाजिक सुधारणांना विरोध करणारे होते याबद्दल आर. जी. प्रधान यानी 'India's Struggle for Swaraj' या आपल्या पुस्तकांत स्पष्ट मत प्रदर्शित केलेलें आहे. ते लिहितात : "Mr. Tilak continued the work began by Vishnu Krishna Chiplunkar....... He opposed the Age of Consent Bill, an extremely moderate piece of social legislation on the ground that social reform must not be forced by legislation, particulary by a foreign government, and he led the agitation against it with an ability and vigour that at once marked him out as on outstanding popular leader...He strongly and persistently attaekcd social reform movement......He defended caste and Hindu social and religious order in general. ........ In matters social and religious, it (Kesari) stood for national revival, not reform, and vehemently

opposed all causes and movements that went against the grain of Hindu orthodoxy." ( p. 64-65 ).

सामाजिक व धार्मिक बाबतींत जरी टिळकांची असली जुनीपुराणीं मतें व आचरण होतें तरी तीं राजकीय बाबतींत अत्यंत प्रगतिशील व जहाल होती. सरकारनें त्यांच्यावर खटले भरल्यामुळें व तुरुंगवास दिला म्हणून ते लोकांत फार प्रिय झालेले होते. १९१४ सालीं लार्ड कर्झननें बंगालची फाळणी केली त्यामुळें बंगाली जनता व इतर हिंदी जनता यांच्यांत असंतोष पसरला. हा असंतोष एकसारखा धुमसत होता. त्याचा जनतेनें स्फोट करावा व सरकारला सळो कीं पळो करावें या हेतूनें जनतेपुढें राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं एक चतुःसूत्री कार्यक्रम ठेवला. हा चतुःसूत्री कार्यक्रम म्हणजे स्वदेशीचें व्रत पाळणें, विदेशी मालावर बहिष्कार घालणें, राष्ट्रीय शिक्षणाला उत्तेजन देणें व स्वराज्य मिळविण्यासाठीं अनेक साधनांचा उपयोग करणें या कल्पना होत. या चतुःसूत्रीमुळें कॉंग्रेसमध्यें जहाल मतांचा फैलाव झाला. या पक्षाचे अध्वर्यू लाल, बाल व पाल ही त्रिमूर्ति होती. लाल म्हणजे पंजाबचे सिंह लाला लजपतराय, बाल म्हणजे महाराष्ट्राचे लोकमान्य टिळक व पाल म्हणजे बंगालचे बिपिनचंद्र पाल. या तिघांमुळें कॉंग्रेसमध्यें जो जहाल पक्ष निर्माण झाला तो डिसेंबर १९०७ सालीं सुरतेस भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत. या अधिवेशनांत टिळकपक्ष व मवाळपक्ष यांच्यांत प्रत्यक्ष मारामारी झाली व अधिवेशन पोलीससंरक्षणाखालीं समाप्त झालें.

या मारामारीचें कारण सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं 'A Nation in Making' याग्रंथांत असें दिलें आहे कीं, टिळक कॉंग्रेसचे अध्यक्ष व्हावेत म्हणून त्यांनीं व त्यांच्या अनुयायांनीं खूप प्रयत्न केला. परंतु नेमस्तांनीं तो प्रयत्न हाणून पाडला आणि म्हणूनच टिळक व त्यांचे अनुयायी या अपेशाचा वचपा काढण्यासाठीं सुरतेला दंगामस्ती करण्यास सरसावले. " There was a strong party in favour of the election of Mr. Tilak as President, and they would not have Sir Rash Behari Ghose to preside over the Congress. Rather that the Congress should be broken up than that Sir Rash Behari should preside. That was the feeling of this party, and the Congress was broken up. Chairs and shoes and slippers were flung at the leaders, the platform was rushed—I remained on the platform with some of my friends forming a guard over. I was led along with Sir Pherozeshah Mehta and others to the tent behind, and the police cleared the pandal" (p. 236)

सामाजिक सुधारणांना हाणून पाडून राजकीय सुधारणांचें तद्दू पुढें घुसविण्याचें कार्य जरी टिळकांनीं, त्यांच्या अनुयायांनीं आणि ब्राह्मण्यग्रस्त विचार-

सरणीच्या लोकांनीं हातीं घेतलें होतें तरी हे लोक या कार्यांत सर्वस्वी यशस्वी झालेले नव्हते. सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याचें प्रचारकार्य धिम्मे धिम्मे कां होईना पण चालू होतें. मुंबईत पूर्वी परमहंस संस्था, कॉस्मॉपॉलिटन क्लब, वगैरे संस्थातर्फे जातिभेद, अस्पृश्यता इत्यादि कल्पनांवर प्रहार करणारी चळवळ चालत होती. हेंच कार्य डी. सी. मिशन, आर्यन ब्रदरहूड इत्यादि संस्था करित होत्या. आर्यन ब्रदरहूडतर्फे १९१२ सालीं एक सहभोजन झालें तें फारच गाजलें. "ह्या सहभोजनांत सर्व जातीच्या लोकांनीं भाग घेतलेला होता. प्रार्थना समाजाचे सभासद डॉ. सोळंकी व प्रसिद्ध क्रिकेटपटू श्री. बाळू हे भोजनप्रसंगीं पंगतींत असलेले पाहून कोणीही धर्म बुडण्याच्या भीतीनें पानांवर बसल्यानंतर उठून गेले नाहींत. परंतु एक मोठे नामांकित गृहस्थ डॉ. सोलंकी व मि. बाळू आपल्या पंक्तीचा लाभ देणार आहेत अशी कुणकुण कळतांच परत गेले! पुढें कांहीं वर्षांनीं ह्या गृहस्थांचें हें सोंवळे सुटलें! भोजनोत्तर कांहीं दिवसांनीं थोडी खळबळ उडाली. कांहीं गुजरातीबंधूंना भोजनांत भाग घेतल्याबद्दल जातीच्या जुलमामुळें पश्चात्ताप झाला व प्रायश्चित घेतल्यानंतर त्यांचे आत्मे शांत झाले हा भाग निराळा. परत भोजनांत भाग घेतल्याबद्दल ज्ञातिमंडळाकडून जाब विचारला असतां लीलाधर संपत ह्यांनीं जो जबाब दिला त्यावरून जातिभेदांचीं बंधनें चांगलींच शिथिल झाल्याचें दिसून आलें" (चंदावरकर, पा. २२९)

वरील उताऱ्यांत अस्पृश्य समाजांतील ज्या दोन सद्गृहस्थांचीं नांवें दिलेलीं आहेत ते म्हणजे डॉ. पुरुषोत्तम सोलंकी हे सुरतेकडील माह्यावंशी समाजाचें व पुढील काळांत डॉ. आंबेडकरांचें सहकारी म्हणून प्रसिद्धीस आलेले सद्गृहस्थ होत. आणि पी. बाळू या नांवानें सर्वश्रुत आलेले सुप्रसिद्ध बोलर बाळू बाळाजी पालवणकर हे दाभोळी चांभार समाजाचें सद्गृहस्थ होत.

सामाजिक व धार्मिक बाबतींत सुधारणा झाल्या पाहिजेत, अशी जी चळवळ १९१२ सालापर्यंत सुधारकांनीं चालवीत आणली, तिचा परिणाम पांढरपेशा समाजांतील अगदीं थोड्या लोकांत अन् तोहि थोडासा झालेला होता. तो इतपत कीं, या सुधारणा व्हायला हव्यात एवढें बोलण्यापर्यंत त्यांच्या मनाची तयारी झालेली होती. कांहींचें मन सहभोजनांत भाग घेण्यास तयार झालेलें होतें. परंतु, सर्व जातीचे लोक समान पातळीवर समजावेत इतके मानण्याइतकी कोणा हिंदूची तयारी झालेली नव्हती. आणि पांढरपेशा वर्ग सोडला तर त्याच्या खालीं जे इतर अनेक वर्ग होते त्यांच्यांत या सुधारणावादाचें वारें शिरलेलें नव्हतें.

# प्रकरण १५ वें

## ( सिंहावलोकन — पुढें चालू )

### अस्पृश्यांच्या चळवळीचें निशाण

१८५७ च्या युद्धानंतर इंग्रज सरकारनें उच्च वर्णीय हिंदु व मुसलमान यांना पाण्यांत पाहाण्याचें धोरण स्वीकारलें; कारण हेच लोक १८५७ चें युद्ध पेटविण्यास व चालविण्यास कारणीभूत झालेले होते. या दोन समाजाला शक्य तों नामोहरम करण्याचें कंकण इंग्रज अधिकाऱ्यांनीं हातांत बांधलें होतें. कारण कीं, या लोकांना गोडीगुलाबीनें वागविलें व राज्यकारभारांत त्यांना मानापानाचें स्थान दिलें तर ते लोक पुनः इंग्रजी राज्य उलथून पाडण्यासाठीं बंडाळी करतील ! त्यांतल्या त्यांत हिंदूंना इंग्रज बरें पाहात असत व राज्यकारभार हांकण्यास त्यांचा उपयोग करीत असत. मुसलमान हे अशिक्षित होते व अनेक रीतीनें मागासलेले होते. त्यांना सुशिक्षित करावें व हिंदूंप्रमाणें त्यांना उच्चाधिकारांवर चढवावें असें इंग्रज राज्यकर्त्यांना वाटत नव्हतें. यामुळें लष्करांत व सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांचा प्रवेश होऊं देऊं नये म्हणून इंग्रज लोक कटाक्षानें दक्षता पाळीत असत. बंगालमध्यें कित्येक वर्षें नोकरी केल्यानंतर सर वुइल्यम् डब्लू. हंटर I. C. S. या गृहस्थानें हिंदी मुसलमान ('Indian Mussalmans') हें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानीं मुसलमानांना लष्करांत घेत नसत याबद्दलची माहिती दिलेली आहे : "The Army is now completly closed to them. No Muhamedan gentleman of birth can enter the regiments. A few Muhamedan gentlemen hold commissions from the Governor-General, but, so far as I can learn, not one from the Queen."- p.156: quoted at p. 56 in the Communal Triangle, ) सरकारी नोकऱ्यांतहि मुसलमानांचा प्रवेश होऊं देऊं नये असा सरकारनें बंदोबस्त केलेला होता. या बाबतींत सर हंटरनें असें स्पष्ट लिहिलेलें आहे (पा. ८५) कीं, पोर्टर, जासूद, दौतींत शाई भरणारा व चाकूनें लेखण्या तयार करणारा शिपाई, यापेक्षां उच्च

दर्जाच्या नोकऱ्या मुसलमानांना मिळत नसत. मुसलमानांची ही हीन व दीन अवस्था पाहून सय्यद अहमदखान या सुशिक्षित गृहस्थाचें अंतःकरण तीळतीळ तुटूं लागलें. हे गृहस्थ सुसंस्कृत, सुविद्य आणि खानदानी घराण्यांतील होते. ते उत्तम दर्जाचे लेखक, कवि आणि तत्त्वज्ञानी होते. हिंदू लोकांनीं इंग्रजी विद्या व संस्कृति आत्मसात करून इंग्रजी राज्यकारभारांत मानापानाच्या जागा पटकाविण्याची धडपड सुरूं केलेली पाहून यांना वाटलें कीं, मुसलमानांनीं अशी धडपड केली नाहीं तर ते कांहीं काळानें पददलित अवस्थेला पोहोंचतील. म्हणून त्यांनीं मुसलमानांना इंग्रजी शिक्षण देण्याचा कार्यक्रम हातीं घेतला. मुसलमानी समाज विलक्षण अडाणी व धर्मखुळा होता. मुल्ला व मौलवी यांचे उपदेश हेंच आपलें शिक्षण आणि पवित्र कुराणामधील ज्ञान हेंच पवित्र ज्ञान, अशी त्यांची श्रद्धा. इंग्रजी शिक्षण घेणें म्हणजे पवित्रधर्माविरुद्ध वर्तन होय, म्हणून मुसलमानांनीं सय्यद अहमदांना फार विरोध केला. पण त्या समाजसेवकानें विरोध, छळ आणि शिव्याशाप सहन करून इंग्रजी शाळांचें जाळें मुसलमान समाजांत पसरविलें आणि अलिगढ येथें कॉलेज व मुस्लीम युनिव्हर्सिटी स्थापन केली. या शिक्षणक्रमांतून जे कांहीं लोक यशस्वी झाले ते सरकारी मुलकी व लष्करी खात्यांत शिरले; कांहीं जणांनीं समाजसेवेला वाहून घेऊन मुसलमान समाजांत जागृतीचें कार्य चालू केलें. मुसलमानांत कांहीं शिक्षणप्रसार झाला होता; पण राजकीय जागृति मुळींच झालेली नव्हती. हिंदूंत या दोन्ही गोष्टी झालेल्या होत्या. तेव्हां सरकारनें हिंदूंबद्दलचें आपलें अनुकूल मत आस्ते आस्ते बदललें आणि मुसलमानांबद्दलचें प्रतिकूल मतहि हळुहळू बदललें. सरकारच्या या धोरणाचा फायदा मुसलमानांनीं करून घेतला. त्यांनीं आपले लोक सरकारी नोकऱ्यांत आणि लष्करांत घुसविले.

मुसलमान समाजांत ही जी जागृति होत होती, त्याच काळांत अस्पृश्यांतहि जागृतीचा उषःकाल उगवत होता. या जागृतीचें बीजांकुर लष्करांतील अस्पृश्यांच्या अंतःकरणांत रुजूं झालें! या पूर्वीच्या काळांत हा कपिलाषष्ठीचा योग प्राप्त झाला नाहीं याचें कारण, हिंदूंनीं अस्पृश्यांवर लादलेली धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय गुलामगिरी! ब्राह्मणी धर्मग्रंथांनीं अस्पृश्यांना पशूंच्या कोटींतील जीवन जगण्यास भाग पाडलें. ब्राह्मणी धर्मगुरूंच्या आहारीं गेलेल्या राज्यकर्त्यांनीं अस्पृश्यांना पदतळीं तुडविलें, आणि हिंदू लोकांनीं अस्पृश्यांना गुलामगिरीच्या खातेऱ्यांत बुडविलें तरी अस्पृश्यांना आपल्या रक्ताचें तेज दाखविण्याची जेव्हां जेव्हां चुकून वा जाणूनबुजून इतरांनीं संधि दिली तेव्हां अस्पृश्यांनीं आपल्या तेजस्वी रक्ताचें दिव्य तेज जगाला दाखविलें. याबद्दलचे उल्लेख कांहीं ग्रंथकारांनीं आपापल्या पुस्तकांत दिलेले आहेत. अस्पृश्यांपैकीं महार म्हणून जे लोक आहेत, त्यांच्यासंबंधीं हे उल्लेख बऱ्याच ग्रंथांत सांपडतात. विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या 'भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्र कोश' या ग्रंथांत पुढील उल्लेख सांपडतात :

"**अंबनाक काननाक**—कोरेगांवच्या लढाईत पेशव्यांच्या विरूद्ध इंग्रजातर्फे कामीं आलेला एक महार सैनिक." (पान ९३)

"**अंबरनाक**—दामाजीपंत नांवाचा ब्राह्मण मंगळवेढ्याचा कमावीसदार होता. त्यानें दुष्काळपिडीतांस सरकारी धान्य वाटलें. त्यामुळें सरकारी देण्याची तोहमत दामाजीपंतावर आली. तीमधून विठू महार यानें आपल्याजवळील पुरलेलें धन सरकारांत भरून त्याची सुटका केली. आणि महारांच्या बावन हक्कांची सदन दामाजीपंताच्या हातची लिहिलेली बाहमनी बादशाहाकडून मिळविली. त्या उपलब्ध सनदेस अंबरनाक असें नांव आहे. अमृतनाथ महारास ही सदन मिळाली असें कित्येक महारांचें म्हणणें आहे [ वि. रा. शिंदेकृत 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न,' १९४ ]". (पान ९३)

"**मलक्या महार साधु** (१७३० सुमारे)—दारव्ह्याजवळ अंजनी येथें मलक्या या नांवाचा एक महार साधु होता. त्याजविषयीं एक पोवाडा त्याचे घराण्यांत उपलब्ध आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, कान्होजी भोंसल्यानें त्या साधूस त्रास दिल्यावरून त्यानें शाप दिला कीं, तुझें राज्य जाऊन तुझा निर्वंश होईल. त्याप्रमाणें कान्होजीचा अधिकार जाऊन तो कैद झाला. नंतर त्याचा मुलगा रायजी यानें त्या साधूची फार विनवणी केली व रायाजीची स्थिति थोडी सुधारली; परंतु 'होयाचं तें झालें तुझ्या कुळीमध्यें अंधार । बोलला सबद माग परतून नाहीं येणार' असें मलक्यानें सांगितलें व रायाजी निपुत्रिक मरण पावला, ही गोष्ट मात्र त्यानें सिद्ध होतें." (पान ६०१)

"**वाडीकर महार**—श्री छत्रपति शिवाजीनें रोहिडा किल्ल्यावर यास अटकेंत ठेवलें होतें. नंतर सर्जा बुरजाखालीं यास पुरून टाकण्याची सजा देण्यांत आली [ वि. रा. शिंदेकृत 'भारतीय अस्पृश्यतेचा उगम' ]." (पान ७२८)

"**विठ्या महार** (सन १५०० सुमारे)—हा मंगळवेढ्याचा महार. दामाजीपंत मंगळवेढेकर हा कमाविसदार असतांना दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. त्या काळांत आपल्या प्रांतांतील गोरगरीबांच्या हालअपेष्टांनीं कळवळून जाऊन त्यानें सरकारी कोठारांतील धान्य त्यांस देऊन त्यांचे जीव वांचविले. या त्याच्या कृत्याबद्दल तोहमत येऊन बादशाही धरणें आलें. अशा संकटांत दामाजीपंत असतां त्याला या महारानें आपल्याजवळ होतें नव्हतें तेवढें सर्व द्रव्य सरकारांत भरून दामाजी-पंताच्या नांवाची रसीदीची पावती दिवाणांकडून दिली व दामाजीपंताचे प्राण व अब्रू वाचविली. बेदरच्या बादशाहानें महारांना हक्काची सनद करून दिल्यावर नंतर त्याची पुनः उजळणी एकनाथाच्या वेळीं झाली.

"राजवाड्यांना सांपडलेल्या महजरांत लिहिलें आहे कीं, 'हे देणें पाछाचे व दामाजीपंताच्या हातचा कागद असे हा महजर सातारकर महाराजांच्या दप्तरांत सापडला.' [ म. चतुर्थ सं. पा. ५३ ]"–(पान ७३९).

श्री. माटे यांनीं महारांच्याबद्दल धन्योद्गार वेळोवेळीं काढलेले आहेत. त्यांचे खालील उद्गार पहा:

" एखादें ' दिव्य ' करण्याच्या बाबतींत महाराच्या वचनाला केवढें प्रामाण्य दिलें जात होतें हें फार पाहाण्यासारखें आहे. शके १६६५ मध्यें फुरसंगी येथें पाटिलकी-बद्दल कामठे–वोराडे व गायकवाड यांच्यांत तंटा लागला. कृष्णावेणी संगमीं समस्त गोत जमलें. वादीप्रतिवादी व येसनाक महार मेहेतर प्रवाहांत शिरले. त्यानें कामठयांना उजव्या हातानें धरले व प्रवाहांतून प्रथम बाहेर काढले, व गायकवाडांना डाव्या हातानें धरून मागून बाहेर काढले. याचा अर्थ असा कीं, कामठे यांची पाटिलकींत निम्मी भागी असून शिवाय त्याजकडे वडिलकीचा मानही आहे व गायकवाड यांच्याकडे उरलेला निम्मा भाग असून त्याजकडे धाकटे-पणाचा मान आहे. हा येसनाक महाराचा निकाल मान्य झालेला आहे. [ शाहू रो. पृ. १६८ ]

" खामगांव वुद्रुक व यवत येथील शिवेचें भांडण उद्भवलें. भोंवतालच्या भागांतील सर्व गांवकरी जमा झाले. खामगांवकर निळनाक महार यानें आपला मान घेतला व शिवेनें म्हणजे खामगांवच्या शिवाराच्या हद्दीनें चालला. ज्या हद्दीनें तो चालत गेला ती हद्द सर्व गांवकऱ्यांनीं खरी मानली. [ रा. खं. ६ पृ. १११ ] गांवाचीं शिवारें ठरविण्यांतच महाराचा निर्णय मान्य होत होता असें नाहीं, हें वर दिलेल्या फुरसंगीच्या पाटिलकीच्या वादावरून कळण्यासारखे आहे; पण खुद्द पांढरीं-तही म्हणजे गांवठाणांतहीं हद्दीचा तंटा पडला, तर त्याच्या निकालानें काम होई असें दिसतें. वेल्सर येथील न्हावी व गरूड यांच्या घरांच्या जागेच्या हद्दीबाबत तंटा सुरू झाला. गांवचे बाराबलुते जमा झाले. दशरात्र पंचरात्रीची क्रिया नेमिली; महा-राचे डोईवर देवीचा अंगारा व पांढरीचा भेंडा दिला व नाहावियाच्या घरांची जागा पुरातन असेल तेथवर त्यानें जावें असें ठरलें. हें होऊन उभयतांचा कज्जा करण्यांत आला. [ खंड ६, ले. ९० ] यांत महाराच्या डोक्यावर दिलेल्या वस्तूकडे या निवाड्याचा कांहीं भाग जातो हें खरें असले तरी, त्या वस्तु धर्म्य मानून आपल्या प्रामाणिकपणाला अनुसरूनच महार निकाल देणार, हें अज्ञ गांवकऱ्यांनाही कळण्या-सारखें होतें. या उदाहरणांवरून महारांना काळीपांढरीची म्हणजे शेतजमिनी व गांवठाण यांची उत्तम माहिती ठेवावी लागे व धर्मास स्मरून त्यांनीं निर्णय दिला असें समजून सर्व लोक तो मानीत हें स्पष्ट दिसतें.

" मौजे कलंबी, प्रांत मिरज, हा गांव जप्त झाला होता, पण चवकशी करतां कळलें कीं, हा सबंध गांव राजनाक वल्लद काळनाक यांजकडे पूर्वीपासून आहे व तो हुजूर चाकरी करीत असतो. हें कळतांच त्या गांवाचा मोकासा म्हणजे जमीन-महसूल त्याचा त्याच्याकडे पावता करण्याचा व गांव जप्तींतून मोकळा झाल्याचा हुकूम पेशव्यानें केला. [ थो. मा. रो. भाग १, पृ. ३१० ]

"महार हा सरकारचा वतनदार अधिकारी म्हणून अधिकारी, कुलकर्णी व खोतपाटील यांच्याप्रमाणें पाली गांवचा भोयी महार यांस घराण माफ करण्यांत आलें. [ नानासा रो. भा. १, पृ. २०३ ] महारांच्या जुन्या परंपरागत हक्कांची जपणूक सरकार कशी करी हें पंढरपूरच्या महारांनीं केलेल्या तक्रारीवरून दिसून येईल. पंढरपुरांत 'राडीचा खेळ' होत असे. राडीचा मान महाराचा असे. राड खणावी ही चाल 'सुदामत' असतां बडवेच ती खणूं लागले व म्हणूं लागले कीं, आम्हीच आधीं पूजा करूं, मग सर्वांनीं खेळावें. नव्या 'दिफती' बडवे करूं लागले. म्हणून हुजुरांतून हुकूम झाला कीं, सुदामतप्रमाणें राड वतनदार महारांकडून खणून महाद्वारापुढें सर्वांनीं खेळ खेळावा. नवा कायदा कोणी सांगू नये, सांगितल्यास गुन्हेगारी पडेल. [ सवाई मा. रो. ३-२८५ ] या पेशवाईतील उल्लेखांवरून महार हा वतनदार गांवकरी समजला जाई व त्याच्या परंपरागत हक्कांची पायमल्ली कोणाकडूनही न होऊं देण्याविषयीं सरकार दक्ष असें, हे वाचकांच्या ध्यानांत येईल." (अस्पृष्टांचा प्रश्न, २१३-२१५)

मराठ्यांच्या राज्यांत, आणि विशेषतः पेशव्यांच्या कारकीर्दींत महारांचा अत्यंत तिरस्कार केला गेला. तरीहि त्या कारकीर्दींत महारांनीं धारातीर्थीं आपलें दिव्य तेज प्रगट केलें, याबद्दलचे खालील उल्लेख पहाः

## "लष्करांत प्रवेश

"महारांच्याकडे रखवालीचेंहि काम फार जुन्या काळीं असे असें दिसतें. शके ९७३ च्या सुडी येथील कानडी शिलालेखावरून दिसतें कीं, शहरांत जर कांही चोरीस गेलें तर अर-तराळाला म्हणजे जो तराळ त्यावेळीं कामावर असेल त्यालाच त्याची भरपाई करावी लागत असे. हा तराळ महारच असे, असा अंदाज करण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. गांवकीच्या भांडणांचे निकाल करतांना जी बलुतेदार मंडळी जमत व ज्यांच्या सह्या त्या निवडपत्रांवर होत, त्यांत महार हा असेच. महारांची 'काठी', मांगांची 'दोरी' व चांभारांचा 'इंगा' अशा निशाण्या असतात, असें महजर ऐतिहासिक कागदपत्रांत शेकडोंशें छापलेले आहेत. पण वतनदारीचा, बलुतेदारीचा किंवा रखवालदारीचा पेशा संभाळून महार राहिले होतें असें नाहीं. बिगार म्हणून हुजूरपागेंत त्यांची व मांगांचीही नेमणूक होत असे व आरमाराकडे चांभारांची नेमणूक होत असे. पुणें, राहुरी, खेड, संगमेश्वर, जुन्नर, पारनेर, नेवासें, कर्डे, बेलापूर, गांडपूर या ठिकाणीं ३१३ महार, ५४ मांग, ५२ चांभार हुजूरकडे असल्याचा उल्लेख नानासाहेब यांच्या रोजनिशींत आहे. तसेंच पुणें, गंगथडी, पारनेर, उंबरें, करकम इत्यादि निरनिराळ्या ठिकाणीं मिळून हुजूरपागेंत म्हणजे घोडदळाकडे २७७ महार 'राबते' म्हणून होते. राणोजी भोसले यांच्या पागेकडेही ते असेच नोकर असत. हें राबत्याचें किंवा बेगाऱ्याचें कामच केवळ महार करीत, असें

नाहीं. लढाईच्या प्रसंगीं जखमी लोकांना परत आणण्याचें काम महारांकडे असे [ सवाई मा. रो. १-४३ ] इ. स. १७७८ तळेगांवाहून लष्करांतील जखमी लोक पुण्यास आणण्यासाठीं इतरांबरोबर पुण्याहून महारांची रवानगी झालेली होती. [ सवाई मा. रो. भा. २, पृ. ४३ ] वसईच्या मोहिमेंत उत्तम पोहणारे असे पेटेकरी महार-मांग होते. वसईच्या वेढ्याच्या वेळीं माणसें, पत्रें वगैरे पाण्यांतून पोचविण्याचें मोठें जोखमीचें काम या लोकांनीं बजावलें असें म्हटलें आहे. [ पेशवे द. ३-२०९ ] पण याहीपुढें महारांनीं प्रवास केलेला होता असें दिसतें. शिवाजीची मुलगी सखूबाई ही बाबाजी निंबाळकराच्या मुलाला दिली होती. तिच्यावर एकदां संकट गुदरलें. त्या प्रसंगीं वाल्हें येथील महार तिच्या उपयोगी पडले म्हणून तिनें त्यांना भाऊ म्हटलें व तेव्हांपासून आपलें आडनांव 'भोंसले' असें पडलें असें त्यांचें म्हणणें आहे. कोठें कोठें पाटिलक्या महारांच्याकडे होत्या. अर्थात गांवकामदार, वतनदार, सैन्यांतला बिगारी, कोठला कदाचित पाटिलही असलेला हा महार येथेंच थबकला असेल असें नाहीं. जंजिऱ्याच्या मोहिमेंत सिद्दी-साताच्या बाजूनें कोंडनाक महार लढत होता असें ब्र. स्वा. चरित्रांत म्हटलें आहे. पेशव्यांच्या सैन्यांत 'हुलस्वार' म्हणून महारांचें पथक असे. [ पेशवे सनदा, प्र. १७, पृ. ३०४ ] हूल या नांवावरून असे वाटतें कीं, शत्रूच्या फौजेला हूल दाखविण्याचें काम या महार घोडेस्वारांकडे असे. वाई प्रांतांतील नागवेडी येथील पाटिलकी कदीम मिरासी महाराची असे. पण गुरवांनीं त्यांच्या वडिलांचे 'मागचुरे' करून ती मिरासी घेतली. तेव्हां शेजारच्या लोकांनीं साक्षी दिल्यामुळें ती त्याजकडे परत आली. तथापि गुरवाची धडपड चालली होती. राजाराम महाराजांपर्यंत प्रकरण गेलें. त्यांनीं सांगितलें कीं, महारांनीं वैराटगड जिंकून द्यावा व हें धारादिव्य करून नागेवाडीची पाटिलकी मिळवावी. त्यावर महारांनीं पराक्रम करून वैराटगड जिंकून महाराजांच्या हवालीं केला व नागेवाडीची पाटिलकी परत मिळवली. [सप्र. सम्म. वृत्त, पृ. ५६, १६९८] म्हणजे इतक्या पूर्वीपासून महारांच्या शौर्याचा प्रत्यय सत्ताधीशांना आलेलाच होता. तो पुढेंही यत राहिला असें दिसतें.

"खर्ड्याच्या (?) लढाईंत शिदनाक महाराचें पथक होतें. हा तासगांवाकडील कळंबी गांवचा वतनदार होता. शाहू सुटून इकडे आल्यावर याचा आजा त्यांच्या फार उपयोगी पडला म्हणून महाराजांनीं त्याला हा गांव वतन दिला होता. शिदनाक आपल्या पथकासह खर्ड्यावर आला होता. त्याचा तळ इतर ब्राह्मण-मराठे सरदारांच्या तळांशेजारीच पडला होता. अर्थात सरदार मंडळींत थोडी चुळबुळ चालू झाली व होतां होतां सवाई (?) माधवरावापर्यंत ही तक्रार पोंचली. श्रीमंतांच्या शेजारीं वृद्ध मराठा सरदार हिरोजी पाटणकर हे बसलेले होते. श्रीमंतांनीं तक्रार ऐकून त्यांच्याकडे पाहिलें. तो म्हातारा गुरगुरून म्हणाला, 'ही कांहीं जेवणाची पंगत आहे? येथें विटाळ-चंडाळ कांहीं नाहीं.'

श्रीमंतांनीं निकाल दिला कीं, शिदनाकाचा तळ आहे तेथेंच असू द्यावा. ही कथाही बोधप्रदच आहे. शिदनाकचें सैन्यांतील महत्व व त्यामुळें त्याचा फिटलेला विटाळ दोनही बाबी सुधारणेच्या दृष्टीनें फारच अर्थपूर्ण आहेत; पण याहीपेक्षां अत्यंत हर्ष वाटण्यासारखी ऐतिहासिक हकीकत म्हणजे वसई व जंजिरा येथल्या प्रसंगांच्या वेळची होय. जे कोणी फार मोठा पराक्रम गाजवितील त्यांना 'उडत रुमाल' अशी बहुमानाची पदवी देण्याचा प्रघात असे. 'उडत रुमाल' हा शब्द मूळचा मानपद्धतीचाच द्योतक आहे. ज्यांनीं फार मोठें शौर्य गाजविलें असेल त्याला ही पदवी म्हणजे हा अधिकार देण्यांत येई. त्या शूर वीराच्या भोंवतीं लोकांनीं उभे रहावयाचें व त्याचा जयजयकार करीत त्यांच्या डोक्यांवर मोर्चेलाप्रमाणें पांढरें रुमाल उडवावयाचें, असा हा बहुमान असे. हा मान फक्त महार शूरांनाच असे असें इतिहाससंग्रहांत म्हटलें आहे; पण केवळ महारांच्यासाठींच हा नवा हलका मान काढला होता असें नाहीं; तर जंजिऱ्याच्या स्वारीच्या प्रसंगीं बीरवाडीकडील नावजी मराठे, होनाजी लकवडे या मराठा वीरांनाही हाच मान दिला होता असें इतिहाससंशोधक श्री. शंकरराव जोशी यांचें म्हणणें आहे. अर्थात् इतर सरदारांच्या बरोबरीनें हा 'उडत रुमाली' चा अधिकार व मान महारांनाही दिलेला होता. महारांच्या शौर्याची गुणपारख व त्या शौर्याला साजेसा बहुमान मराठी अंमलांत कसा होई हें दाखवावयास आणखीही एक पुरावा आहे. वसईच्या मोहिमेंत तुकनाक महार यानें मांडवीकडील मोर्चा उत्तम रीतीनें लढविला व थोर यश मिळविलें. या नामांकित लढवय्याला त्याच्या कर्तबगारीबद्दल कंठी, कडीं, तोडे अशीं मोठीं बक्षिसें देऊन पेशव्यांनीं त्याचा गौरव केला आहे.

"यावरून दिसून येईल कीं, महार वीरांच्या गुणांचें कौतुक पेशव्यांच्या फौजेंत बिनहरकत होत होतें. आतां हा अस्पृश्यांचा सैन्यांतील प्रवेश केवळ अपवादादाखल होता असें मानावयाची जरूरी नाहीं. प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. आबा चांदोरकर यांनीं नुकत्याच केलेल्या शोधांवरून असें खास सिद्ध होतें कीं, पेशव्यांच्या फौजेंत महार लढवय्ये अगर शिपाई तुरळकच कोठें असत असें नव्हें, तर त्यांच्या ज्ञातींचे कित्येक पथकदारच असत.

"या सर्व वर्णनावरून हें ध्यानांत आलें असेल कीं, स्वराज्य सुरू झाल्यावर हळूहळू महारांच्या गुणांचें चीज व्हावयासही सुरवात झाली. ऐन शिवकालांतही येल्या मांग व खंड्या महार असे शूर शिपाई बाजी पासलकरापाशीं शरीरसंरक्षणासाठीं असत. तेथपासून तो 'उडत रुमाल' ही पदवी व कंठी, कडीं, तोडे हे अलंकार, आणि इतर सरदारांच्या पंक्तीला तळ ठोकण्याचा अधिकार हे महारांना पेशवाईच्या शेवटपर्यंत हळूहळू प्राप्त होत गेले हें वाचकांस स्पष्ट झालें असेल." (अस्पृष्टांचा प्रश्न, पा. २२३-२२७)

मराठ्यांच्या व पेशव्यांच्या कारकीर्दींत महारांनीं समरांगणांत अतुल पराक्रम केलें. म्हणूनच ते अस्पृश्य गणले असतांहि त्यांचे पराक्रम मराठे व ब्राह्मण राज्य-

कर्त्यांना मान्य करणें भाग पडलें असावें. ते पराक्रम इतके नेत्रदीपक असले पाहिजेत कीं, ज्यांच्यामुळें राज्यकर्त्यांना महारांची जबरदस्त दहशत बसली असेल; महारांच्या वाढल्या पराक्रमाला योग्य वेळीं पायबंद घातले नाहींत तर महार शिरजोर होतील, शत्रूंना मिळून मराठी राज्य बुडवतील, किंवा स्वतःच राज्यकर्ते होतील, या धास्तीनेंच पेशवाईत महारांच्या गळ्यांत थुंकण्यासाठीं गाडगें व पायांचे धुळींतील छाप पुसण्यासाठीं कमरेला बोराटीच्या झुडपांचे फेस बांधण्यास पेशव्यांनीं महारांना भाग पाडलें असावें. समोर ब्राह्मण दिसला कीं, त्याच्या अंगावर आपली छाया पडूं नये म्हणून ब्राह्मण दूरवर जाईपर्यंत महारानें धुळींत पालथें पडून राहावें, असा दुसरा निर्बंध पेशव्यांनीं महारांवर घातलेला होता. पंजाबचे राज्यकर्ते डायर व ओडवायर यांनीं पंजाबांतील हिंदी लोकांना रात्रौ गुडघे टेकून चालावयास भाग पाडलें होतें. हिटलरच्या कारकीर्दीत जर्मनांनीं ज्यू लोकांना पशूंप्रमाणें हातापायांवर चालण्यास व गवत खाऊन राहाण्यास भाग पाडलें होतें. हीं उदाहरणें व जगाच्या इतिहासांतील यासारखीं आणखी उदाहरणें राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीचें चित्र तर दाखवितातच; पण यामागें त्यांचे कोणते हेतु होते, हेंहि उघड करून दाखवितात. आपल्या डोकीवर मिऱ्या वाटतील असे जे लोक राज्यकर्त्यांना वाटतात त्यांना ते चारी बाजूंनीं सतावून पददलित अवस्थेला पोहोंचवितात. महारांच्या गळ्यांत मडकें व कमरेला बोराटीचा फेस ज्या पेशव्यांनीं बांधवविला त्यांचे हेतु अशाच प्रकारचे असावेत, हें अंदाजी विधान खरें नसावें हें मान्य केलें, आणि पेशव्यांनीं ब्रह्मवृंदांना केवळ खूष करण्यासाठीं महारांवर हे अमानुष निर्बंध लादले असावेत, असें विधान पुढें केलें तर असे प्रश्न उद्भवतात कीं, हे निर्बंध एकट्या महारांवरच कां लादले? ते मांग व चांभार यांच्यांवर कां लादले नाहींत? महार हे ब्राह्मणांना मांग व चांभार यांच्यापेक्षा तिरस्करणीय कां वाटले असावेत?

गळ्यांत मडके व कमरेला बोराटीचा फेस या निर्बंधांचा 'मॉर्शल–लॉ' पेशव्यांनीं फक्त महार जातीविरुद्ध जेव्हां पुकारला असेल तेव्हां महाराष्ट्रांत काय झालें असेल? ज्यांच्या नसानसांतून शौर्याचें व स्वाभिमानाचें रक्त सळसळत होतें, त्या महारांनीं या मॉर्शल-लॉपुढें गोगलगाय होऊन मान वाकविली असेल काय? किंवा झुंजार महारांनीं या मॉर्शल लॉच्या विरुद्ध उभ्या महाराष्ट्रांत प्रचंड चळवळ उभारली असेल? हे व यासारखे इतर प्रश्न चालू किंवा भावी काळांतील संशोधक विद्वानांनीं संशोधन करून सोडविण्यासारखे आहेत.

इंग्रज लोक जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां हिंदु व मुसलमान समाजांपासून अलग असलेल्या अस्पृश्यांकडे त्यांची दृष्टि वळली. त्यांनीं अस्पृश्यांना आपल्या दिमतीस ठेविलें. गळ्यांत मडकें व कमरेला बोराटीचा फेस लावून फिरणाऱ्या

महारांना पेशव्यापेक्षां इंग्रज जास्त जवळचा वाटूं लागला. त्यांनीं इंग्रजांचें साम्राज्य हिंदुस्थानांत स्थापण्यासाठीं पिढ्यान् पिढ्या खतम केल्या; परंतु राज्यकारभार सुरळीत व यशस्वी चालविणें हें इंग्रजांचें प्रमुख ध्येय होतें व त्यासाठीं त्यांना सुशिक्षित हिंदूंचा व मुसलमानांचा संपूर्ण पाठिंबा हवा होता. म्हणून ते अस्पृश्यांना एका विवक्षित मर्यादेपर्यंतच सरकारी व लष्करी नोकरींत चढूं देत. हिंदु व मुसलमान समाजाला जेणेंकरून अपमान वाटेल असें कृत्य अस्पृश्यांसाठीं करण्यास इंग्रज तयार नव्हतें. इतकें असूनहि त्यांनीं लष्करांतील अस्पृश्यांना साक्षर करण्याचें कार्य हातीं घेतलें व तें यशस्वी केलें.

अस्पृश्यांमध्यें शिक्षणप्रसार करण्याचें कार्य सरकार अळंटळं करीत का होईना, करीत होतें. मिशनरी लोकांनीं मात्र अनेक गांवच्या अस्पृश्यांच्या वस्ती-शेजारी शाळा सुरूं करून अस्पृश्यांमध्यें शिक्षणप्रसाराचा धूमधडाका सुरूं केला होता. ईस्ट इंडिया कंपनीनें आपल्या पलटणींत सर्व लोकांना शिक्षण सक्तीचें केलें होतें. पलटणींतील प्रत्येक कुटुंबांतील मुलांमुलींनीं दिवसाच्या शाळेंत गेलें पाहिजे व वयस्कर लोकांनीं रात्रींच्या शाळेंत गेलें पाहिजे या नियमाचें जें कुटुंब उल्लंघन करील त्याला दंड भरून आपलीं मुलें शाळेंत घालावीं लागत व वयस्कर मंडळींला रात्रींच्या शाळेंत जावें लागे. १८५७ च्या बंडानंतर हिंदुस्थानांत कंपनी सरकार बंद पडलें व ब्रिटिश अंमल सुरूं झाला. हिंदु-स्थानांतील पलटणींसंबंधीं चौकशी करण्याकरितां सरकारनें एक कमिशन नेमलें. या कमिशनपुढें कांहीं लोकांनीं आपल्या साक्षींत असें मत प्रगट केलें कीं, लोकांना विद्यादान केलें तर ते शहाणे होतील व सरकारला ते लोक डोईजड व त्रासदायक होतील. या साक्षीप्रमाणें सरकारनें सैन्यांतील सक्तीचें शिक्षण बंद केलें. सक्तीचें शिक्षण अशा रीतीनें बंद होण्याच्या अगोदर पलटणींतील अस्पृश्य लोकांत शिक्षणाचा प्रसार उत्तम झालेला होता. याप्रमाणें कंपनी सरकार, लष्करी खातें व मिशनरी लोक यांच्या प्रयत्नांमुळें अस्पृश्यांमध्यें बराचसा शिक्षण-प्रसार झालेला होता.

या सुशिक्षित लोकांना हिंदुधर्मांतील धार्मिक ग्रंथांचें पहिल्यांदा विलक्षण आकर्षण वाटलें. त्या ग्रंथांचा त्यांनीं कसून अभ्यास केला. धार्मिक ग्रंथांच्या छापील प्रती मिळत नसल्या तर ते कोठून तरी एखादी प्रत मिळवून तिच्या हस्तलिखित प्रती तयार करून देव्हाऱ्यांत ठेवीत. जे धार्मिक ग्रंथ ब्राह्मणांच्या घरीं नसत त्यांच्या हस्तलिखित प्रती महार व चांभार लोकांच्या घरीं असत. हे सुशिक्षित लोक कीर्तनें करीत. स्त्रियाहि कीर्तनें व पुराणांवर प्रवचनें करीत. (डॉ. आंबेडकर यांचें भाषण, कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, ता. १९-२० मार्च १९२७, बहिष्कृत भारत, ता. ३-४-२७)

धार्मिक ग्रंथांचा चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करणारे कांहीं लोक अस्पृश्यांत निघाले. अस्पृश्य लोकांबद्दल सर्व धार्मिक ग्रंथांत अत्यंत तिरस्कारपूर्ण उल्लेख त्यांना पहा-

वयास मिळाल्यामुळें त्यांच्या चिकित्सक बुद्धीला व विचारसणीला चालना मिळाली. सवर्ण हिंदूंतील अट्टल सोंवळया लोकांपेक्षांहि कांकणभर जास्त असे धर्मनिष्ठ व भक्तितत्पर असे अनेक अस्पृश्य लोक असतांना त्यांना सवर्ण लोक अस्पृश्य व हीन समजतात याबद्दलचें कोडें त्यांना सुटेना. चोखा, रोहिदास इत्यादि संत अस्पृश्य समाजांत झाले, त्यांचे गोडवे पुराणांत गाइलेले आहेत; तरपिण त्यांनाहि अस्पृश्य व हीन कां समजण्यांत आलें असावें ? असे अनेक प्रश्न चिकित्सक अस्पृश्यांना सुचूं लागले. त्यावेळीं जे बरेच वरच्या दर्जाचें शिक्षण घेतलेले लोक होते, त्यांनाहि सवर्ण लोक अस्पृश्य समजून तुच्छतेनें वागवीत होते. सुरतेंतील सवर्ण लोकांत एक वाचनालय चालविलेलें होतें. त्याचा चिटणीस एक पार्शी गृहस्थ होता. सुरतेंतील रहिवाशी व उच्चदर्जाचें शिक्षण घेतलेला असा एक धेड त्या वाचनालयाचा सभासद होता. त्याला वाचनालयांतील वर्तमानपत्रें व पुस्तकें यांचें वाचन वाचनालयाच्या व्हरांड्यांत बसून करावें लागत असे. पार्शी चिटणीस त्याला वर्तमानपत्रें व पुस्तकें दुरून टाकून देत असे. इतर सभासदांप्रमाणें वाचनालयाची फी मी भरतों, मी हिंदुधर्म पाळतों, तरी पण मला रक्तपित्याप्रमाणें व्हरांड्यांत बसून वाचावें लागतें, आणि मुसलमान, पार्शी व ख्रिस्ती मात्र वाचनालयांत सवर्ण हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून वाचन करतात, याबद्दल त्या धेड सभासदाच्या डोक्यांत विचारक्रांति सुरू झाली. आपल्याला जनावराप्रमाणें जें वागविण्यांत येतें त्याचें शल्य त्या धेडाच्या अंतःकरणांत एकसारखें सलूं लागलें. एके दिवशीं त्यानें वाचनाल्याच्या लोकांना स्पष्टपणें सांगितलें कीं, मी मुसलमान, पार्शी व ख्रिस्ती सभासदांप्रमाणें फी देत आहे, तेव्हां त्यांच्याप्रमाणेंच वाचनालयांत बसून वाचन करणार ! त्या धेडाचा हा आग्रही निश्चय पाहून सवर्ण हिंदु सभासदांच्या तोंडचें पाणी पळालें. तरी पण त्यांनीं धेडाला वाचनालयांत बसूं द्यावयाचें नाहीं, असा कसून प्रयत्न केला. अशा मानहानीच्या परिस्थितींत वाचन करण्यापेक्षां तें नको, असा निश्चय करून धेडानें सभासदत्वाचा राजिनामा दिला. या प्रकरणाचा वृत्तांत 'बॉंबे गॅझेट' या पत्राच्या तारीख २५ सप्टेंबर १८८५ च्या अंकांत प्रसिद्ध झाला. [ या प्रकरणाचा उल्लेख टाईम्स ऑफ इंडियाच्या ता. २७।८।१९१५ च्या अंकांत "The Depressed Classes Complete Educatinal Question" या मथळयाखालीं प्रसिद्ध झालेल्या स्फुटांत केलेला आहे. ] तेव्हां सुरतेंत व इतर ठिकाणीं बरीच खळबळ उत्पन्न झाली. अशा तऱ्हेचीं प्रत्यक्ष उदाहरणें सुशिक्षित चिकित्सक अस्पृश्यांना वेळोवेळीं पहावयास व ऐकावयास मिळत असत. त्यामुळें त्यांच्या मनांत मनस्वीं उद्वेग उत्पन्न होई. या चिकित्सक लोकांनीं विचारांतीं असें आपलें मत बनविलें कीं, हिंदुधर्मग्रंथांनीं आमच्यावर अस्पृश्यतेचा जो कलंक लावलेला आहे, तो आमच्या सर्व नाशाला कारणीभूत झालेला आहे, आणि जोंपर्यंत हा कलंक आम्ही स्वतःच्या हिंमतीनें साफ धुवून टाकणार नाहीं, तोंपर्यंत आमची कितीहि आध्यात्मिक,

धार्मिक, नैतिक व आर्थिक प्रगति होवो, आम्ही सवर्ण हिंदूंच्या दृष्टीनें व पर्यायानें सर्व जगाच्या दृष्टीनें अस्पृश्य व हीनच राहूं! हिंदुधर्मग्रंथांनीं अस्पृश्यांवर हा जो कलंक लावलेला आहे, तो कितपत सत्याला व न्यायाला धरून लावलेला आहे, याची पाळेंमुळें शोधून काढण्यांत हे सुशिक्षित चिकित्सक लोक गढून गेले होते.

अशा तऱ्हेचे जे सुशिक्षित चिकित्सक अस्पृश्य लोक होते त्यांच्यांत अग्रगण्य गृहस्थ गोपाळबुवा कृष्णा वलंगकर हे होते. हे महाडाजवळच्या ५।७ मैलांवर असलेल्या रावदूल या खेडेगांवचे महार रहिवाशी. वयांत आल्यावर ते पलटणींत प्रविष्ट झाले. पलटणींत असतांना त्यांनीं श्रीगणेशाला सुरवात केली. ते शेवटीं नॉर्मलची परीक्षा पास झाले. त्यांनीं रामानंदी पंथाचा स्वीकार केला. त्यांनीं हिंदुधर्म-शास्त्रें व पुराणें यांचा उत्तम अभ्यास केलेला होता. 'अस्पृश्यता कोणी व कधीं उत्पन्न केली' आणि 'ती अस्पृश्य समाजावर कोणी, कशा प्रकारें लादली,' याचा छडा लावण्या-करतां वलंगकर व त्यांचे साथीदार यांनीं जंगजंग पछाडले. पण त्याबद्दल त्यांना कोणत्याहि धर्मशास्त्रांत व पुराणांत सबळ पुरावा मिळेना. वलंगकरांची पलटण पुण्याला व मुंबईला येई तेव्हां ते जोतिराव फुले व त्यांचे सहकारी, यांच्याशीं पुराणें, शास्त्रें, जातिभेद, इत्यादि विषयांवर चर्चा करीत. जोतीरावांची ज्वलज्जहाल विचारसरणी वलंगकरांनीं आत्मसात् केली. त्या दृष्टीनें ते हिंदुधर्मातील ग्रंथ पाहूं लागले. तेव्हां त्यांना हें कळून आलें कीं, ज्याअर्थीं धर्मशास्त्रांत व पुराणांत अस्पृश्यांना अत्यंत हीन दर्जा दिलेला आहे व अस्पृश्यांनीं कधींहि वर डोकें करूं नये म्हणून त्यांच्यावर अत्यंत अमानुष धार्मिक, सामाजिक व आर्थिक बंधनें लादलेलीं आहेत, त्या अर्थीं अस्पृश्यांवर हीं बंधनें लादणारे लोक हे जेते असावेत व अस्पृश्य लोक हे जित असावेत. अस्पृश्यांवर बंधनें लादणारे हे लोक पर्यायानें अस्पृश्यांचे हाडवैरी असावेत, असें अनुमान काढणें त्यांना भाग पडलें. त्यांचा हा समज दृढ होण्याला अनेक कारणें होतीं. महार समाजांत अशी दंतकथा रूढ होती, व अद्यापहि ती आहे कीं, महार लोक हे या देशाच मूळचे रहिवाशी. बाहेरून येऊन त्यांना जिंकणारे व सांप्रत उच्चवर्णीय हिंदु समजले जाणारे लोक हे पर्येसी (परदेशी) होत. हे पर्येसी लोक स्वतःला आर्य म्हणवीत असत व जित लोकांना अनार्य म्हणवीत. अशाच अर्थाची विचारसरणी महात्मा जोतीराव यांनींहि त्यावेळीं आपल्या चळवळींत प्रसृत केलेली होती. याशिवाय दुसरें एक ऐतिहासिक कारण, हा समज दृढ करण्यास कारणीभूत झालें, तें असें. मोंगल, इराणी ग्रीक, सिथियन, मुसलमान, पार्शी, ज्यू आणि ख्रिस्ती लोक परदेशांतून आले. आर्य म्हणविणाऱ्या लोकांनीं सिथियन लोकांना हिंदुधर्मांत व समाजांत विलीन करून घेतलें, मुसलमानांशीं सेवक या नात्यानें वागले व कित्येकांनीं मुसलमान सरदार व बाद-शाहांच्या घराण्याशीं बहिणी व मुली देऊन आपले संबंध दृढ केले. इराणांतील मुसलमानांच्या धर्मच्छळांना कंटाळून पारशी लोक आर्मझ बेटांतून दीव बंदरांत

आले. हिंदूंनीं त्यांना आश्रय दिला. ते तेथें २० वर्षें राहिले. त्यानंतर ते सुमारें १७१६ सालीं संजाणा बंदरास आले. तेथें ३०० वर्षें शेतीकाम करून राहिले. तेथून कांहीं कुटुंबें निरनिराळ्या भागांत उदरनिर्वाहासाठीं गेलीं. १७६० सालांत ईस्ट इंडिया कंपनीची वखार सुरतेंत स्थापन झाली तेव्हां बरींच पारशी कुटुंबें सुरतेस आलीं. ईस्ट इंडिया कंपनीचीं जहाजें बांधणें, गोदी तयार करणें, व्यापाराची एजन्सी करणें, इत्यादि कामें स्वीकारून पारशी लोकांनीं आपली आर्थिक परिस्थिति उत्तम केली व कांहीं दिवसांनीं मुंबई व इतर ठिकाणचे व्यापार काबीज केले. ते परकी होते पण त्यांना हिंदूंनीं अस्पृश्य गणलें नव्हतें. ज्यू लोकांपासून उत्पन्न झालेल्या बेने इस्राएल या लोकांशींहि हिंदूंनीं चांगलें वर्तन केलें. तसेंच ख्रिस्ती लोकांशीं त्यांनीं उत्तम वर्तन केलें. मुसलमान, पारशी, बेने इस्राएल, व ख्रिस्ती लोक हे हिंदूंच्या भर वस्तींत राहूं लागले. त्या परदेशी व परधर्मी लोकांना हिंदूंनीं अस्पृश्य मानलें नाहीं! ही गोष्ट वलंगकर व त्यांचे साथीदार यांना विचार करावयास लावी. परकीयांना कवटाळणारे व अस्पृश्यांना लाथाडणारे हिंदु हे अस्पृश्यांचे हाडवैरी असले पाहिजेत, असे त्यांना दृढपणें वाटावें यांत मग नवल काय?

पलटणींतील नोकरींतून १८८६ सालीं हवालदार म्हणून पेन्शन घेतल्यानंतर वलंगकर हे दापोलीला राहण्यास आले. तेथून त्यांनीं आपली चळवळ सुरू केली. सवर्ण हिंदु हे आर्य व अस्पृश्य लोक अनार्य होत, अशी वलंगकर व त्यांचे सहकारी यांची दृढ समजूत झालेली होती. आपल्यावरील अस्पृश्यतेचा कलंक दूर केला तरच आपल्या प्रगतीच्या मार्गांतील धोंड दूर होणार, हें त्यांनीं पक्कें ओळखलें होतें. अस्पृश्यता निवारण्याची चळवळ चालविण्यासाठीं त्यांनीं दापोलीला ‘अनार्य दोष-परिहार समाज’ स्थापन केला. या समाजाच्या महाराष्ट्रांत शाखा स्थापन करण्यासाठीं त्यांनीं महाराष्ट्रांत दौरे काढले. या दौऱ्यांत ते कीर्तनें करून, अस्पृश्य लोकांवर आर्य म्हणविणाऱ्या हिंदूंनीं कशीं बंधनें लादलीं आहेत याबद्दल धर्मग्रंथ व पुराणें यांतील उदाहरणें घेऊन, अस्पृश्यांना आपल्या माणुसकीच्या हक्कांबद्दल जागृत करीत होते. ‘सुधारक’ व ‘दीनबंधु’ या वर्तमानपत्रांतून ते अस्पृश्यांच्या मानवी हक्कांबद्दल लेखहि प्रसिद्ध करीत असत. जातिभेद व अस्पृश्यता हे दोन काल्पनिक राक्षस आर्य म्हणविणाऱ्या हिंदूंनीं निर्माण केलेले आहेत. त्यांत परमेश्वराचें काडीमात्र अंग नाहीं. परमेश्वरानें जातिभेद व अस्पृश्यता हीं निर्माण केलीं असें जें हिंदुधर्म शास्त्रांत लिहिलेलें आहे, तें सपशेल खोटें व लबाडीचें आहे, हा सिद्धांत सिद्ध करण्यासाठीं वलंगकरांनीं पन्नास पानांचें पुस्तक लिहून शिळाप्रेसवर छापवून घेतलें. त्याचें नांव “विटाळ विध्वंसन.” हें पुस्तक आश्विन, विजयादशमी, शके १८१० (इ. स. १८८८) या दिवशीं प्रसिद्ध झालें. वलंगकरांनीं या पुस्तकांत जातिभेद व अस्पृश्यता

यासंबंधीं अनेक प्रश्न उपस्थित करून त्यांचीं उत्तरें आर्य म्हणविणाऱ्या सवर्ण हिंदूंनीं किंवा त्यांचे धर्माधिपति शंकराचार्य यांनीं द्यावींत, असें जाहीर आव्हान दिलेलें होतें.

अस्पृश्यांच्या चळवळीचे आद्यजनक गोपाळबुवा वलंगकर हे १९०० सालीं रावदुल्ला वारले. त्यांना दोन अपत्यें झालीं. मुलगी यमुनाबाई व मुलगा शांताराम. रमाबाई आंबेडकर यांच्या माहेराकडून गोपाळबुवा हे आंबेडकर घराण्याचे नातलग होते.

कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद ता. १९।२० मार्च १९२७ रोजीं डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालीं महाड येथील थिएटरांत भरली होती. आपल्या अध्यक्षीय भाषणांत डॉ. आंबेडकर यानीं वलंगकर यांचा आत्मीयतेनें उल्लेख करून त्यांच्यासंबंधीं खालीलप्रमाणें उद्गार काढले होते :

" मुंबई इलाख्यांतील अस्पृश्य समाजांत सार्वजनिक काम करण्याकरितां ज्या संस्था कालांतरानें स्थापन झाल्या त्यांत " अनार्य दोषपरिहार मंडळी " ही पहिली संस्था आहे असें संशोधनाअंतीं दिसून येईल. १८९३ सालीं जेव्हां अस्पृश्य लोकांना लष्करांत भरती होण्याची बंदी झाली, त्यावेळीं याच संस्थेनें प. वा. महादेव गोविंद रानडे यांच्या साहाय्यानें सरकारकडे एक मोठा अर्ज केला होता. यावरून या संस्थेची सल्लामसलत मोठमोठ्या लोकांशीं होत असे, हें उघड आहे. १८९७ सालीं कॉंग्रेसला उद्देशून याच संस्थेनें एक प्रश्नमालिका तयार केली होती. तींत सामाजिक सुधारणा केल्याशिवाय तुम्हांला राजकीय सुधारणा मागण्याचा काय अधिकार आहे असा पक्ष मांडला होता. यावरून संस्थेंत किती जोम होता हें दिसून येतें. १८९८ सालीं सर हर्बर्ट रिसले साहेबांनीं जेव्हा हिंदु लोकांच्या रीतिरिवाजांची संकलित माहिती गोळा करण्याचें काम सुरू केलें होतें, त्यावेळीं सदर साहेबांनीं आपल्या प्रश्नांची यादी संस्थेलाही पाठविली होती. यावरून सरकारकडून विचारपूस होण्याइतक्या महत्त्वाची ही संस्था होती हें स्पष्ट आहे. हें सर्व मीं पुराव्यानिशीं सांगूं शकतों; कारण या संस्थेचे सर्व कागदपत्र हल्लीं माझ्या ताब्यांत आहेत; परंतु ही सभा रत्नागिरी जिल्ह्यांत दापोली येथें स्थापन झाली त्यावरून हें उघड आहे कीं, अस्पृश्योन्नतीची चळवळ प्रथम सुरू केल्याचा मान जर कोणास द्यावयाचा झाला, तर तो या संस्थेस आणि या प्रांतास देणें प्राप्त आहे. संस्थेच्या चालकांनीं संस्थेच्या मार्फत फक्त अडचणी दूर करण्याचें काम केलें असें नाहीं. लेखनद्वारें जागृति करण्याचें कामहि त्यांनीं पुष्कळ केलें. सत्यशोधक समाजाचे अध्वर्यू जोतीबा फुले यांचे खरे साथीदार व उत्साही शिष्यांपैकीं बरेचसेजण या संस्थेच्या चालकांपैकीं होते. एकाच्या नांवाचा उल्लेख केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. ते गृहस्थ म्हणजे कै. गोपाळबुवा वलंगकर हे होत. त्यांनीं आपल्या लेखनद्वारें जी जागृति केली ती अनुपम आहे. ज्यांना ती पाहावयाची

अनुक्रम ...... दि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

असेल त्यांनीं दीनबंधूच्या जुन्या फाईली वाचून पाहव्यात म्हणजे कळेल.”
(बहिष्कृत भारत, ता. ३ एप्रिल १९२७).

बाबा वलंगकर यांची चळवळ विटाळविध्वंसन, अस्पृश्यताविवारण, करण्याविषयीं आखलेली होती. त्या चळवळीनें त्यांनीं अस्पृश्य समाजांत नवें युग सुरू केलें. त्यांनीं आपल्या जिवंत वाणीनें व लेखणीनें त्या वेळच्या तरुण अस्पृश्य पिढीच्या अंतःकरणांत सामाजिक, धार्मिक, आर्थिक, इत्यादि प्रकारच्या गुलामगिरीच्या जाळ्यांतून बाहेर पडण्याची प्रेरणा उत्पन्न केली. त्या प्रेरणेनें फुरफुरलेले तरुण सामाजिक चळवळीच्या आखाड्यांत उतरले. त्यांत पुण्याचे श्री. शिवराम जानबा कांबळे हे प्रमुख होत. ते लहानपणीं एका युरोपियनाकडे नोकरी करीत होते. तेव्हां वयाच्या दहाव्या वर्षीं (१८८५) श्रीगणेशाला सुरवात करून त्यांनीं आपला स्वाध्याय वाढविला. तरुणपणांत अस्पृश्योन्नतीची चळवळ सुरू केली. प्रो. राजारामशास्त्री, लोकहितवादी, बाबा पदमजी, आगरकर, फुले वगैरे समाजसुधारकांचे लेख व पुस्तकें वाचून त्यांनीं अस्पृश्यांच्या सुधारणेबद्दलचा आपला दृष्टिकोन बनविला. पुढें त्यांनीं अस्पृश्यांच्या हितासंबंधीं वर्तमानपत्रांत लेख लिहिण्यास सुरवात केली.

त्यांचा पहिला लेख कोल्हापुरांत प्रसिद्ध होत असलेल्या “मराठा दीनबंधु” या पत्रांत आक्टोबर १९०२ मध्यें प्रसिद्ध झाला होता. आपल्या लोकांना लष्कर व पोलीसखात्यांत नोकऱ्या मिळाव्यात व मुलांमुलींचें शिक्षण सरकारनें पत्करावें, यासंबंधीं सरकारला जाहीर विनंति करण्यासाठीं त्यांनीं सासवड येथें ता.२४।११।१९०२ ला ५१ गांवच्या महार लोकांची सभा भरविली. अस्पृश्यांच्या हितासाठीं सरकारनें काय काय कार्य करावें, याबद्दलचा ऊहापोह करणारा अर्ज कांबळे यांनीं तयार करून त्यावर १५८८ महारांच्या सह्या घेतल्या व तो अर्ज सरकारकडे पाठविला. अस्पृश्यांतर्फे सरकारला गेलेला अर्ज हाच पहिला अर्ज होय. या अर्जाच्या इंग्रजी प्रति इंग्लंडमधील व हिंदुस्थानांतील प्रमुख गृहस्थांकडे व इंग्रजी वर्तमानपत्रांकडे पाठविल्या होत्या; पण सरकारनें त्या अर्जाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यामुळें चिडून श्री. आगरकर यांनीं ‘सुधारका’च्या ता. १४।११।१९०४ च्या अंकांत, “महारांचा अर्ज, सरकार आणि आपला समाज” या मथळ्याखालीं सरकारावर एक कडक स्फुट लिहिलें. या अर्जाचा विचार सरकारनें सहानभूतिपूर्वक केला नाहीं, म्हणून इतर वर्तमानपत्रांनींही सरकारवर टीका केली.

कांबळे यानीं ता. १ जुलै १९०८ ला ‘सोमवंशीय मित्र’ या नांवाचें मासिक सुरू केलें, त्याची वार्षिक वर्गणी ८ आणे होती. या मासिकांतून त्यांनीं अस्पृश्य वर्गांच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठीं अनेक लेख लिहिले व त्यांनीं समाजसुधारणेसाठीं चालविलेल्या चळवळींचे वृत्तांत या मासिकाद्वारें प्रसिद्ध केले.

अस्पृश्य जातींत देवींना मुली व मुलगे वाहण्याची जी दुष्ट रुढी होती, तिच्याविरुद्ध त्यांनीं जोरांत चळवळ केली. मुरळ्या व जोगत्या म्हणून देवींना मुली सोडणें व त्या वयवर झाल्यानंतर त्यांच्या देहविक्रयावर त्या मुलींच्या नातलगांनीं जगणें, ही रुढी अत्यंत अमानुष, तिरस्करणीय व समाजहितबाधक आहे, अशी त्यांनीं चळवळ केली. तेव्हां कांहीं मुरळ्या व जोगत्या आपला पेशा सोडून लग्नें करून संसारी जीवन कंठण्यास तयार झाल्या. अशा स्त्रियांपैकीं शिवुबाई लक्ष्मण जाधव या एका बाईनें विवाह करून संसारास सुरवात केली, तेव्हां तिनें श्री. कांबळे यांचे आभार मानणारें व इतर मुरळ्यांना व जोगतीणींना आपलें अनुकरण करा असा उपदेश करणारें पत्र कांबळे यांना उद्देशून लिहिलें. तें पत्र कांबळे यांनीं 'सोमवंशीय मित्र' या मासिकाच्या ता. १ डिसेंबर १९०८ च्या अंकांत प्रसिद्ध केलें. यामुळें अस्पृश्य समाजांत बरीच खळबळ झाली. कांहीं देवदासींनीं शिवुबाईचा कित्ता गिरविला.

१९०२ सालीं अहमदनगर येथील सार्वजनिक हौदांत गोविंद वल्द मुकुंदा महार या गृहस्थानें आपला पोहरा सोडून स्वतः पाणी काढलें व तें पाणी तेथेंच प्याला. हा प्रकार पाहून नगरांतील सवर्ण हिंदूंच्या अंगाचा तिळपापड उडून गेला. सवर्ण हिंदु ज्यावर पाणी भरतात, आंघोळी करतात व कपडे धुतात, त्या पवित्र हौदावर एका महारानें पाणी भरावें म्हणजे केवढें पातक ! गोविंदाच्या या कृत्याबद्दल चोहोंकडे चर्चा सुरू झाली. महाराष्ट्रांतील महार समाजांत तर या अचाट कृत्याबद्दल रात्रंदिवस भवति न भवति होऊं लागली. नगरांतील धर्ममार्तंडांनीं हौद "भ्रष्ट" केल्याबद्दल गोविंदावर इं. पि. कोड्याच्या २७७ कलमाखालीं कोर्टांत फिर्याद ठोकून दिली. आरोपीचा बचाव व्हावा म्हणून महाराष्ट्रांतील महारांनीं सरकारकडे विनंति अर्जांचीं भेंडोळीं पाठवून दिली. बचावमदतीचा फंड उभारला. त्यावेळचे नगरचे मॅजिस्ट्रेट बापू हरि गोडबोले (दुसरा वर्ग) यांच्यापुढें खटला चालला व त्यांत त्यांनीं आरोपीला दोन आठवड्यांची साधी कैद व आठ रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. सदर शिक्षा अन्यायमूलक आहे, अशी त्यावेळचे नगरचे कलेक्टर सर रिचर्ड यांनीं हायकोर्टाकडे तक्रार केली. हायकोर्टानें गोविंदाला झालेली शिक्षा रद्द केली व त्याला दोषमुक्त केलें. गोविंदाचा खटला त्यावेळीं महाराष्ट्रांत फारच गाजला. त्या खटल्याची माहिती कांबळे यांनीं "सूचिपत्र" या नांवाच्या आपल्या छोट्या पुस्तकांत दिली सरकारी व गांवकरी यांच्या कामानिमित्त महार लोकांवर ठिकठिकाणीं कसे अन्याय होतात, याचीं प्रत्यक्ष उदाहरणें गोळा करून कांबळे यांनीं सदर पुस्तकांत तीं गोंवलीं. महारलोकांवर होत असलेल्या अन्यायांना जनतेंत प्रसिद्धी मिळावी म्हणून कांबळे यांनीं सदर पुस्तक छापून त्याच्या प्रती गांवोगांवी वाटल्या.

कांबळे यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानें १९०४ ला पुणें येथें "श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज" ही संस्था स्थापन

केली; व "श्री सच्चिदानंद वाचन गृह" उघडलें. तें आपल्या समाजांत जागृति करीत असत, तसेंच सवर्ण हिंदूंनीं चालविलेल्या सार्वजनिक हिताच्या चळवळींत भाग घेत असत. पुण्याच्या रे मार्केट समोर मद्यपान निषेधाची एक जंगी जाहीर सभा सवर्ण हिंदूंनीं भरविली होती. तींत लोकमान्य टिळक, श्री. खाडिलकर इत्यादि प्रमुख गृहस्थ होते. या सभेच्या अध्यक्षांना चिठ्ठी पाठवून कांवळे यांनीं सभेंत बोलण्याबद्दलची परवानगी मागितली. आपण महार जातीचे आहोंत, असा ह्या चिठ्ठींत कांबळे यांनीं मुद्दाम उल्लेख केलेला होता. ती चिठ्ठी अध्यक्षांनीं टिळकांना दाखविली व टिळकांनीं कांबळे यांना प्लॅटफॉर्मवर आपल्याजवळ बसवून घेऊन त्यांचें भाषण करविलें. एरवीं टिळक हे सनातनी वृत्तीला उचलून धरणारे गृहस्थ, असा त्यांचा दुर्लौकिक होता; पण कांबळे यांना प्लॅटफॉर्मवर स्वतःच्या शेजारीं बसवून घेण्यांत त्यांनीं जी समयसूचकता व मनोधैर्य दाखविलें, त्याबद्दल वर्तमानपत्रांनीं टिळकांची वाखाणणी केली.

कांबळे यांनीं अस्पृश्य समाजांत जागृतीची जी चळवळ चालवीत आणली तिची वार्ता अस्पृश्यांबद्दल अत्यंत आस्थेवाईक बुद्धीनें वागणारे श्रीमंत समाजीराव महाराज यांच्या कानीं पडली. तेव्हां त्यांच्याशीं ओळख व्हावी व त्यांच्या कार्याला उत्तेजन द्यावें, या हेतूंनीं सयाजीराव महाराजांनीं कांबळे यांना बडोद्याला ता. ११-९-१९०८ ला बोलावून घेतलें व त्यांचा सन्माननीय पाहुण्यांत मानमरातब ठेवविला. महाराजांनीं ता. १३-९-१९०८ रोजीं कांबळयांशीं विचार-विनिमय केला. "सोमवंशीय मित्र" हें मासिक कांबळे यांनीं ता. १ जुलै १९०८ ला सुरू केलेलें होतें. मासिकांत श्री. कांबळे यांनीं महार समाजांतील अनिष्ट रूढींविरुद्ध मोहीम सुरू केली. तेव्हां या चळवळीविरुद्ध महारांतील धर्मभेलंडांनीं कांबळे यांच्या विरुद्ध काहूर माजवून समाजांत तेढ उत्पन्न केली. अशा परिस्थितींत कांबळे यांना आपलें मासिक बंद ठेवावें लागलें.

सामाजिक सुधारणेंत महारांची व इतर अस्पृश्यांची मनोभूमिका अजून तयार झालेली नाहीं, हें पाहून कांबळे व त्यांचे सहकारी यांनीं ता. ५ एप्रिल १९१० रोजीं जेजुरी येथें दुसरी सोमवंशीय परिषद भरविली. तिचे अध्यक्ष पेनशनर सुभेदार बहाद्दर गंगाराम कृष्णाजी भातनकर, पनवेल येथील महार जहागिरदार व ऑनररी मॅजिस्ट्रेट हे होते. या परिषदेंत जे ठराव पास केले त्यांत अस्पृश्य समाजाची स्थिति सुधारण्याकरितां सरकारनें काय काय केलें पाहिजे, याचा आराखडा मांडलेला होता. परंतु जेव्हां प्रांतिक सरकार (मुंबई) व मध्यवर्ति सरकार यांकडे ते ठराव पाठविण्यांत आले तेव्हां दोन्हीं सरकारनीं त्या ठरावांच्या बाबतींत डोळेझांक केली. हें पाहून कांबळे यांनीं अस्पृश्यांच्या न्याय्य हक्कांचा पाढा भारतमंत्री व पार्लमेंटचे कांहीं सभासद यांच्या कानांवर घालण्याचें ठरवून त्याप्रमाणें त्यांनीं एक छापील

अर्ज त्यावेळचे भारतमंत्री रा. ऑ. दी अर्ल ऑफ क्र्यू यांच्याकडे ता. १४ डिसेंबर १९१० ला पाठविला. त्या इंग्रजी अर्जाच्या प्रती पार्लमेंटचे प्रमुख सभासद, इंडिया हाऊसचे सभासद व विलायतेंतील व हिंदुस्थानांतील निरनिराळीं वर्तमानपत्रें यांच्याकडे पाठविल्या होत्या. या अर्जांत मुख्यतः मुलकी खातें, पोलीस खातें व लष्करी खातें यांत महारांना खालच्या दर्जाच्या जागा द्याव्यात, अशी मागणी होती. इंग्रजी सत्तेचा पाया हिंदुस्थानांत स्थिर झाल्यापासून अस्पृश्यवर्गाची परिस्थिति थोडीबहुत सुधारली खरी; तरीपण इंग्रजी सत्तेच्या गेल्या १००।१२५ वर्षांच्या काळांत ही परिस्थिति जितकी सुधारायला पाहिजे, तितकी ती सुधारली नाहीं, अशी या अर्जांत तक्रार आहे. ही स्थिति सुधारण्याचें इंग्रज अधिकाऱ्यांनीं मनांत आणलें असतें, तर तें त्यांना हां हां म्हणतां साध्य करतां आलें असतें; परंतु तसें त्यांना न करतां येण्याचें मुख्य कारण म्हणजे, अस्पृश्य-वर्गांना सुधारून वर आणलें तर त्यांना सरकारी खात्यांत उच्च दर्जाच्या जागा देणें भाग पडेल व अस्पृश्य-वर्गांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हुकमतींत वागायला व राहायला सर्व हिंदु लोक तयार होणार नाहीं, आणि हिंदु लोकांना जर दुखविलें तर ते आपल्या साम्राज्यावर उलटून पडतील, अशी त्या अधिकाऱ्यांना भीति वाटत होती, असें त्या अर्जांत दाखविलेलें होतें. ही भीति सरकारनें व त्यांच्या अधिकाऱ्यांनीं सोडून द्यावी व अस्पृश्यांना नोकरींत प्रवेश द्यावा, अशी अर्जांत विनंति होती. सरकारी नोकऱ्या करण्यास अस्पृश्य वर्ग योग्य नाहींत अशी जर सरकारची भीति असेल तर ती नाहींशी करण्यासाठीं महार लोकांनीं पूर्वी लष्करांत किती थोर दर्जाच्या अधिकारावर नोकऱ्या केल्या याची माहिती त्या अर्जांत दिली होती. तिचा सारांश असा :

१८९१ च्या पूर्वी लष्करांत अस्पृश्यांचा सर्रास शिरकाव होत होता. तेव्हां मुंबई इलाख्यांत ३० बटालियन्स होत्या. त्यांत विशेषतः महाराष्ट्रांतील महार व चांभार जातीचे बरेच लोक होते. ते लष्करांत उच्च दर्जाला चढले. त्यांत सुभेदार कित्येक होते. धर्मनाक सबनाक (सेकंड ग्रेनेडियर बॉंबे इन्फंट्री), रामनाक नामनाक (सिक्स्थ बॉंबे इन्फंट्री), चांगनाक (एथ् बॉंबे इन्फंट्री), रामनाक चांगनाक (ट्वेंटीएथ् बॉंबे इन्फंट्री) व दहिवाडकर (ट्वेंटीफर्स्ट मरीन) हे सुभेदार मेजर होते. इटनाक भिकनाक (नाइन्थ बॉंबे इन्फंट्री) हे सुभेदार मेजर व सरदार बहादूर होते. गंगनाक सजननाक (ट्वेल्थ बॉंबे इन्फंट्री) हे सुभेदार मेजर व बहादूर होते. सोननाक हिरनाक (ट्वेंटीएथ बॉंबे इन्फंट्री) हे सुभेदार व तलवार बहादूर होते. सायगांवकर (ट्वेंटीफर्स्ट मरीन सॅपर्स अँड मायनर्स) हे जमेदार होते. त्यांना ऑर्डर ऑफ मेरिटचें पदक मिळालें होतें. लॉर्ड किचनेर हे हिंदुस्थानचे सरसेनापति झाले, तेव्हां त्यांना हिंदी लष्कराची पुनर्घटना जातीय पायावर करणें इष्ट व जरूर वाटलें व म्हणून त्यांनी त्या कार्याला १८९१ मध्यें सुरवात केली. त्यांनीं असा हुकूम काढला कीं, लष्करांत अस्पृश्यांची नवीन

भरती करावयाची नाहीं. या हुकुमान्वयें १८९५-९६ सालापासून अस्पृश्यांची लष्करांत भरती होणें बंद झालें. यामुळें अस्पृशांच्या उपजीविकेचें साधन व कार्यक्षेत्र बंद झालें. ब्राह्मण्याला लॉर्ड किचनेर बळी पडल्यामुळें त्यांनीं अस्पृश्यांच्या लष्कर-भरतीस बंदी केली. त्याचा दुष्परिणाम खुद्द लष्करी खातें व हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश साम्राज्य यांना भोगावा लागला. कारण पूर्वी समारांगणावर घायाळ झालेल्या सैनिकांना औषधोपचारासाठीं वाहून (धुलीवर) नेण्याचें काम मुख्यतः महार लोक करीत असत. त्या बाबतींत ते इतके वाकबगार झाले होते कीं, तें काम इतर जातींच्या सैनिकांच्या हातीं देण्याचा विचार लष्करी अधिकाऱ्यांना एकदांहि सुचला नाहीं; परंतु लॉर्ड किचनेरच्या धोरणानुसार तें धूली वाहण्याचें कार्य दुसऱ्या जातींतील सैनिकांकडे गेलें व त्यांत त्यांनीं असा गोंधळ माजविला कीं, त्याबद्दल खुद्द 'टाइम्स ऑफ इंडिया' या पत्राला खरमरीत टीका करावी लागली. ("Formerly on any Indian Campaign there was a trained and highly efficient corps of *dhooly* bearers, men born and bred to the job, who performed with the greatest gallantry and *sang froid* their duties in action. These disappeared before the Kitchenerian scythe and in their place were enlisted attenuated cadres of inexperienced carriers, men who had never seen a dhooly and cartainly never wanted to carry one. The first experience of the new experiment was in the small expeditions on the N. W. Frontier of last year, and assuredly the result was not encouraging......For every serious casualty at least six fighting men had to be withdrawn from the ranks to carry the wounded man to the rear, and these six, however writhing, rarely had a chance of rejoining the ranks in time to be of any value. The corps of ameteur *dhooly*-bearers to whom the wounded man next fell were entirely incompetent and his sufferings were greatly augmented thereby...")

अस्पृश्य वर्गांतील लोकांना संधि मिळाली तर ते उच्च हुद्यांवर व्यवस्थितपणें काम करूं शकतात असा अर्जांत सूर होता. या अर्जाला भारत मंत्र्यांतर्फे हिंदी सरकारकडून उत्तर पाठविण्यांत आलें. त्यांत अस्पृश्यांच्या मागण्यांबद्दल स्पष्टपणें होकारार्थी किंवा नकारार्थी असा संदर्भ नव्हता. प्रांतिक सरकार, मध्यवर्ति सरकार व साम्राज्य सरकार हे सर्व अस्पृश्य वर्गाच्या बाबतींत एका माळेचे मणी ठरले.

अस्पृश्यांच्या हितासाठीं चळवळ निर्माण करण्याचा पहिला मान जरी जोतिराव फुले यांच्याकडे जातो, तरी त्या चळवळीचीं सारीं सूत्रें हालविण्याचें कार्य खुद्द अस्पृश्यवर्गांतील लोकच करीत असत. त्या चळवळीच्या कार्याला सक्रीय पाठिंबा

देणारा एक माणूस स्पृश्यवर्गातून पुढें आला. तो माणूस म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे. यांचा जन्म जमखिंडी येथें एका खानदानी मराठा कुटुंबांत ता. २३ एप्रिल १८७३ रोजीं झाला. ते जमखिंडींतील परशुराम भाऊ हायस्कुलांतून १८९१ सालीं मॅट्रिक झाले. घरची गरिबी असतांहि त्यांनीं हरप्रयत्नांनीं उच्च शिक्षणक्रम पुण्यांत पुरा केला. ते बी. ए. च्या वर्गांत असतांना श्रीमंत सयाजीराव महाराज, बडोदें, यानीं त्यांना एक शिष्यवृत्ति चालू केली. १८९८ सालांत ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. एल्.एल्. बी. च्या टर्म्स् भरीत असतां त्यांचा ब्राह्मोसमाजाशीं संबंध आला. ऑक्सफर्ड कॉलेजांत तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठीं 'ब्राह्मो समाज' विद्यार्थ्यांना पाठवीत असे. या समाजाची युनिटेरियन स्कॉलरशिप शिंद्यांना मिळाली. ते ता. २१ सप्टेंबर १९०१ ला एस्. एस्. पर्शिया या बोटीनें विलायतेला गेले. परंतु कांहीं पदवी न घेतांच तें ता. ६ ऑक्टोबर १९०३ ला स्वदेशीं परत आले. परत आल्यानंतर त्यानीं निकृष्टावस्थेला पोहोंचलेल्या समाजांत मिशनऱ्यांच्या धर्तीवर कार्य करण्याचें ठरविलें. या कार्याला प्रत्यक्ष सुरवात करण्याच्या अगोदर समाजांतील एकंदर परिस्थितीची पाहणी करण्याचें त्यांनीं ठरविलें. हें कार्य सुकर व्हावें म्हणून बडोदें संस्थानांतील अस्पृश्य-वर्गाच्या शाळांची पहाणी करण्यासाठीं त्यांनीं सयाजीराव महाराज यांची संमति मिळविली. शाळांची पहाणी झाल्यानंतर त्यांनीं विद्याखात्याला अस्पृश्यांच्या शाळांमधून कोणत्या सुधारणा घडवून आणाव्यात, याबद्दल कांहीं सूचना केल्या. अहमदनगर येथील महार लोकांनीं "सोमवंशीय समाज" या संस्थेतर्फे आपल्या समाजाला वर कसें आणतां येईल याबद्दल चळवळ चालविली होती. त्या संस्थेच्या कार्याची व त्यांतील कार्यकर्त्यांची ओळख करुन घेण्यासाठीं व त्यांच्याशीं विचार-विनिमय करण्यासाठीं शिंदे नगरला गेले. पुणें, नगर, बेळगांव, मुंबई इत्यादि ठिकाणीं खुद्द अस्पृश्य लोकांनीं आत्मोन्नतीसाठीं जी चळवळ चालविली होती, ती पाहून शिंद्यांच्या मनावर फार परिणाम झाला. व अस्पृश्य लोकांच्या प्रगतीसाठीं कार्य करीत राहावें व त्यासाठींच सर्व आयुष्य वाहून द्यावें, असे त्यांचे विचार वाहूं लागले. विलायतेहून परत आल्यानंतर शिंदे मुंबईंतील प्रार्थना सामाजाचे प्रचारक झाले. त्यासाठीं त्यांना १९०३ तें १९०५ च्या दरम्यान हिंदुस्थानांत फिरावें लागलें. या प्रवासांत त्यांनीं निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या अस्पृश्य जातींची काय परिस्थिति आहे, याबद्दल सूक्ष्म पहाणी केली व पुष्कळ माहिती जमा केली. विलायतेंतील खालच्या वर्गासाठीं कार्य करीत असलेल्या संस्था त्यांच्या पाहण्यांत आलेल्या होत्या. तशा तऱ्हेची संस्था हिंदुस्थानांत असावी, असा त्यांचा विचार ठरला व त्याप्रमाणें त्यानीं प्रार्थना समाजांत या विषयावर माहितीनें भरलेलें एक व्याख्यान देऊन अशा प्रकारची संस्था स्थापणें व ती चालविणें किती जरूर आहे याची सभासदांना

जाणीव करून दिली; आणि असली संस्था प्रार्थना समाजाशिवाय दुसऱ्या कोणाकडून चालविणें संभवनीय नाहीं, तरी प्रार्थना समाजांतील सभासदांनींच हें कार्य हातीं घ्यावें, असा आग्रह धरला. प्रार्थना समाजाचे अध्यक्ष श्री. दामोदरदास गोवर्धनदास यांनीं अशी संस्था काढणें जरूर आहे असें सांगून सदर कार्यास एक हजार रुपयांची देणगी दिली. ता. १८-१०-१९०६ (कार्तिक शुद्ध प्रतिपदा) रोजीं न्या. मू. नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं "डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया" ही संस्था स्थापन झाली. त्या संस्थेची पहिली शाळा त्याच दिवशीं एल्फिन्स्टन रोड (बी. बी. सी. आय. रेल्वे, मुंबई) स्टेशनलगतच्या मुरारजी बंगल्यांत सुरू करण्यांत आली.

शिंद्यांच्या संस्थेला जसजसा लोकांकडून पाठिंबा मिळूं लागला, तसतसा संस्थेच्या कार्याचें क्षेत्र वाढूं लागलें. संस्थेच्या कार्याला आर्थिक मदत देण्यासाठीं हिंदु, ख्रिस्ती, पारशी, मुसलमान, इत्यादि समाजांतून धनिक लोक पुढें येऊं लागले. सरकारी अधिकारीहि संस्थेकडे सहानभूतीनें पाहूं लागले. खुद्द मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क त्यांची मुलगी मिस् व्हायोलेट क्लार्क यांनीं या संस्थेच्या कार्याला सक्रीय पाठिंबा दिला. मिस् क्लार्क यांनीं सदर संस्थेला मदत मिळवून देण्यासाठीं पुण्याच्या जिमखान्यावर ता. १६।९।१९०८ रोजीं एक मोठा मनोरंजक कार्यक्रम केला. या कार्यक्रमांत तिनें स्वतः गाण्याचें व नाटकांतील प्रवेशांतील मुख्य पात्राचें काम केलें. मिस् क्लार्कच्या या कार्यक्रमांतील सर्व उत्पन्न संस्थेला मिळालें. खुद्द गव्हर्नर व त्यांची मुलगी यांचा या संस्थेला पाठिंबा मिळालेला पाहून सरकारी, बिनसरकारी, संस्थानिक, व्यापारी, इत्यादि लोकांनीं संस्थेला आर्थिक मदत केली. या आर्थिक साहाय्यामुळें संस्थेला आपल्या शाखा मुंबई व नागपूर प्रांतांत उघडतां आल्या. खुद्द गव्हर्नर साहेब यांनीं संस्थेचे पेट्रन व्हावें, अशी विनंति करण्यासाठीं सौ. परांजपे (रँगलर परांजपे यांच्या पत्नी) यांच्या नेतृत्वाखालीं डॉ. मॅन, बॅ. एच्. ए. वाडिया व प्रो. डी. के. कर्वे यांचें शिष्टमंडळ ता. २५।८।१९१० ला गव्हर्नरसाहेबांकडे गेलें होतें. परंतु सर जॉर्ज क्लार्कनीं पेट्रन होण्याचें नाकारलें. मुंबई इलाख्यांत १९०८ सालीं संस्थेच्या दिवसाच्या १५ शाळा, रविवारच्या ६ शाळा, ५ भजन समाज, ४ औद्योगिक शाळा व ७ मिशनरी प्रचारक होते. मिस्टर शशिभूषण रथ व दुसरे जर्मन तज्ज्ञ यांच्या नेतृत्वाखालीं संस्थेनें 'को-ऑपरेटिव्ह लेदर वर्क्स' चालविलेलें होतें. काळबादेवी रोडवर एक कातड्याचा छोटा कारखाना चालविला होता.

संस्थेच्या शाळांतील मुलांचा बक्षिस-समारंभ ता. २१।३।१९११ ला भायखळा, मोर्लंड रोड, इंप्रूव्हमेंट ट्रस्ट चाळींच्या भव्य पटांगणांत करण्यांत आला. समारंभाचे अध्यक्ष गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क होते. समारंभांत गव्हर्नरसाहेबांचें फार कळकळीचें भाषण झालें. त्यांच्या कन्या मिस् व्हायोलेट या परलोकवासी झाल्या

होत्या. त्यांच्याबद्दल शिंद्यांनीं दुःखाचे उद्गार काढले व शेवटीं एक योजना गव्हर्नरसाहेबांच्या संमतीसाठीं जाहीर केली. मिस् क्लार्क यांनीं संस्थेसाठीं बरीच आर्थिक मदत मिळवून दिली होती. त्यांचें संस्थेंत कायमचें स्मारक रहावें म्हणून संस्थेंतून ५०००- रु. चा " मिस् क्लार्क मेमोरियल फंड " उभारावा व ५०० रु. पोर्ट ट्रस्ट बँडस्मध्यें गुंतवून त्यांच्यावर जें व्याज मिळेल त्यांतून संस्थेच्या मुंबई-तील वसतिगृहांत राहणाऱ्या लायक मुलांना शिष्यवृत्त्या द्याव्यात, अशी ती योजना होती. गव्हर्नरसाहेबांनीं या योजनेस आपली संमति दिली. ( Bombay Gazette, 22-3-1911 ) कोल्हापुरांत राजर्षि शाहू महाराज यांनींहि मिस् क्लार्क यांच्या स्मारकासाठीं बोर्डिंग उघडलें. तें " मिस् क्लार्क हॉस्टेल " या नांवानें प्रसिद्ध आहे.

मुंबई इलाख्यांत गुन्हेगार जाती गणल्या गेलेल्या आहेत, त्यांच्या उन्नती-साठीं एक योजना शिंदे यांनीं तयार केली. ती एका शिष्टमंडळातर्फे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड वुइलिंग्डन यांच्यापुढें ऑगस्ट १९१५ मध्यें ठेवण्यांत आली. या योजनेची माहिती शिंदे यांनीं ता. ७।१२।१९१५ च्या केसरीमध्यें प्रसिद्ध केली होती. गुन्हेगार जातींची एक वसाहत स्थापन करावी, अशी ती योजना होती. या योजनेस २०,००० रु. खर्च येणार होता. या योजनेची अंमल-बजावणी करण्यासाठीं डॉ. परांजपे, डॉ. मॅन, ना. कामत, व वॅ. वाडिया यांची कमिटी स्थापन केली होती. सातारचे (रा. ब.) काळे वकील, श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, इत्यादि मंडळींच्या खटपटीनें सदर्न मराठा रेल्वे नजिकच्या कुंडल व बुध-गांव या गांवांमध्यें असलेलें एक मोठें रान वसाहतीसाठीं मिळविण्यांत आलें होतें. भरपूर आर्थिक साहाय्य न मिळाल्यामुळें वसाहतीची योजना तेथेंच विराम पावली. ( विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्यानें आणि उपदेश, आणि माझ्या अडचणी. ) १९१४ अखेर संस्थेचा आठवा अहवाल शिंदे यांनीं प्रसिद्ध केला. त्याचा सारांश ता. २०-८-१९१५ च्या ज्ञानप्रकाशमध्यें प्रसिद्ध झाला होता. संस्थेच्या सर्व शाळांमधून १६०० अस्पृश्य विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थेचा कायम निधि ३६,००० रु. चा होता. व्हॉईसरॉय लॉर्ड हॉर्डिंज व त्यांच्या पत्नी लेडी हॉर्डिंज यांनीं संस्थेस २५० रु. व १००० रु. (अनुक्रमें) देणग्या दिल्या होत्या. व्हॉईस-रॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांनींही १०० रु. ची देणगी दिली होती.-(बॉम्बे क्रॉनिकल, ता. २-१२-१९१६ ).

डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांनीं अमेरिकेंतील निग्रो लोकांच्या उन्नतीसाठीं चळवळ चालवून ती नांवारूपास आणली होती. त्यासाठीं त्यांची संस्था टस्केजी येथें अव्याहत कार्य करीत होती. डॉ. वॉशिंग्टन हे ता. १६-११-१९१५ ला दिवंगत झाले. तेव्हां त्यांच्या दुखवट्याचा ठराव शिंदे यांनीं आपल्या संस्थेतर्फे टस्केजीला पाठवून आपल्या संस्थेच्या कार्याची माहिती टस्केजीच्या संस्थेला कळविली. ( बॉंबे क्रॉनिकल, ता. २२।११।१९१५ ). हेतु हा कीं, अमेरिकें-तील लोकांची आपल्या संस्थेसाठीं सहानुभूति मिळवावी.

शिंदे यांनीं आपल्या कार्याबद्दल व संस्थेबद्दल सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांची सहानुभूति मिळविली. हिंदुस्थानांतील संस्थानिकांचेंहि मन त्यांनीं आकर्षून घेतलें. ता. ३१-३-१९१६ ला म्हैसूरचे महाराज यानीं परळमधील संस्थेस भेट दिली, (संदेश, ता. १-२-१९१६) इंदूरचे सर तुकोजीराव होळकर, यांनीं संस्थेस इमारती बांधण्यासाठीं २० हजार रुपयांची देणगी जाहीर केली. परंतु इमारती बांधण्यास योग्य अशी जागा शिंद्यांना कोठें मिळाली नाहीं.

संस्थेच्या मुलांचा बक्षिस समारंभ पुण्यांतील किर्लोस्कर थिएटरमध्यें ता. ३०।६।१९१६ ला साजरा करण्यांत आला. तेव्हां लॉर्ड वुइलिंग्डन हे अध्यक्ष होते. आपल्या भाषणांत श्री. शिंदे यांनीं सरकारला जागेची मागणी केली. (संदेश, ता. २।७।१९१६), पुढें भोकरवाडींत शिंदे यांना सरकारकडे जागा मिळाली, त्या जागेवर "अहिल्याश्रम" नांवानें ओळखल्या जाणाऱ्या इमारती बांधण्यांत आल्या.

अस्पृश्यता-निवारणाबद्दल बरेंचसें लोकमत तयार झाल्यानंतर अस्पृश्यता निवारणाचा एक मोठा मार्ग म्हणजे सहभोजन करणें, हा होय, ही जागृति उत्पन्न झाली.

"...१९१२ सालींच गुरुवर्य डॉ. रामकृष्ण भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें ऑक्टोबर महिन्यांत तीन दिवस अस्पृश्यता-निवारण-परिषद फर्ग्युसन कॉलेजच्या अँफी थिएटरमध्यें भरली होती. ह्या परिषदेंत डॉ. कुर्तकोटी व इचलकरंजी संस्थानाधिपति यांनीं भाग घेतला होता. त्यावेळीं बाहेरगांवाहून आलेले सर्व जातींचे पाहुणे व प्रतिनिधि ह्यांनीं कोणत्याहि प्रकारें जातिभेद न पाळतां पाहुणचार घेतला. जें मुख्य सहभोजन झालें, त्यांत ३५० 'अस्पृश्य' वर्गाचे आणि ५० ब्राह्मण वगैरे 'उच्च' वर्गाचे पाहुणे होते. ही सर्व मंडळी एकाच पंक्तींत बसली होती." (चंदावरकर, पान४६९-७०).

अस्पृश्य-वर्गाच्या उन्नतीसाठीं सर्व हिंदुस्थानांत सहानुभूतीचें वातावरण उत्पन्न झालेलें पाहून हिंदुस्थानचे पितामह दादाभाई नौरोजी यांनीं अस्पृश्योन्नतीसाठीं मध्यवर्ति सरकार व लोकहीतासाठीं झटणाऱ्या हिंदुस्थानांतील निरनिराळया संस्था, पुढारी व राजकीय पक्ष यांनीं काय कार्य हातीं घ्यावें, याबद्दलचा ऊहापोह करणारा ठराव इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या ता. १६।३।१९१६ च्या बैठकींत मांडला. अस्पृश्य-वर्गाबद्दल हिंदु-समाज व सरकार नेहमीं कशी अनास्था दाखवितात याबद्दल सोदाहरण विवेचन करून दादाभाईनीं अर्धा तास भाषण केलें. अमेरिकेंतील निग्रो लोकांची गुलामगिरी कायद्यानें बंद करून अमेरिकन सरकारनें निग्रो लोकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगति घडवून आणण्यासाठीं अनेक योजना हातीं घेतल्या व त्या पार पाडल्या; या कार्यांत खुद्द अमेरिकन गोरे लोक सामील झाले; व त्या कार्यांत त्यांनीं तन, मन, व धन खर्च

केलें; कित्येक गोऱ्या लोकांनीं आपलें सर्व आयुष्य निग्रो लोकांच्या कार्यासाठीं अर्पण केलें; अमेरिकन सरकार व लोक यांनीं निग्रो लोकांसाठीं जशी मनापासून खटपट केली, तशी हिंद सरकार, हिंदी जनता, व विशेषतः सवर्ण हिंदु लोक यांनीं अस्पृश्यांसाठीं मनापासून खटपट केली तर अस्पृश्य-वर्गाची उन्नति लौकर होईल, व अस्पृश्यांचा प्रश्न कायमचा निकालांत निघेल; यासाठीं सरकार व हिंदु लोक यांनीं एकत्र जमून अस्पृश्यांच्या उन्नतीसाठीं शाळा चालविणें, वसाहती स्थापन करणें, शेतकी व औद्योगिक शिक्षणांचीं केंद्रें चालविणें—वगैरे बाबींसंबंधी योजना हातीं घेतल्या पाहिजेत, अशा आशयाचें भाषण दादाभाईंनीं कौन्सिलच्या बैठकींत केलें.

दादाभाईंच्या भाषणाचा रोख असा होता कीं, अस्पृश्यांच्या प्रगतीसाठीं सतत झटणें ही सरकार व हिंदु लोक यांची नैतिक जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडण्यास ते पुढें येत नाहींत, हें त्यांना दूषणास्पद आहे. या रोखामुळें हिंदी सरकारचे सरकारी प्रतिनिधि सर रेजिनॉल्ड क्रॅडॉक व हिंदु-समाजाचे [कौन्सिलमधील] प्रतिनिधी चिडले. सर रेजिनॉल्ड यांनीं सरकारतर्फे दादाभाईंना उत्तर देतांना म्हटलें कीं, प्रत्येक प्रांतिक सरकार आपापल्यापरीनें सर्व मागासलेल्या जातींच्या उन्नतीसाठीं दक्षता राखीत आहे, आणि अस्पृश्यवर्ग व भिल्ल लोक यांच्यासंबंधीं कार्य करणाऱ्या संस्थांना मदत देत आहे; तेव्हां हिंदुस्थान सरकारला याबाबतींत आणखी कांहीं जास्त करण्याचें प्रयोजन नाहीं. लोकप्रतिनिधि सुरेंद्रनाथ बानर्जी व पं. मालवीय यांनीं दादाभाईंना असें उत्तर दिलें कीं, अस्पृश्यांचा प्रश्न हा मुख्यतः धार्मिक व सामाजिक स्वरूपाचा आहे, व तो सोडविण्यासाठीं हिंदूंनीं पुढें आलें पाहिजे, हें जरी खरें असलें तरी हिंदूंना त्याबाबतींत सर्वस्वीं दोषी ठरविणें योग्य नाहीं. अस्पृश्यांच्या बाबतींत सध्यां जें लोकमत आहे, त्यांत इष्ट बदल होण्यास बराच काळ लागेल व कालांतरानें हा प्रश्न धसास लागेल. (टा. इं., ता. १७।३।१९१६).

सरकार व लोकप्रतिनिधि यांचें ठरावाबद्दलचें प्रतिकूल धोरण पाहून दादाभाईंनीं आपला ठराव परत घेतला. सदर ठरावासंबंधीं बॉम्बे क्रॉनिकल पत्रानें ता. १८।३।१९१६ ला "The Tragedy of the Depressed" या मथळ्याखालीं अग्रलेख लिहून सरकार व हिंदु-सभासद यांच्या दुटप्पी वर्तनाबद्दल खरमरीत टीका केली.

लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखालीं डी. सी. मिशनच्या शाळेंतील विद्यार्थ्यांचा बक्षिस-समारंभ ता. ३०।६।१९१६ ला पुण्यांतील किर्लोस्कर थिएटरांत झाला तेव्हां आपल्या भाषणांत शिंदे यांनीं सरकारला अशी विनंति केली होती कीं, सैन्यांत दाखल होऊन सरकारला महायुद्धांत मदत करण्याची अस्पृश्य-वर्गाला फार इच्छा आहे; परंतु सरकारनें अस्पृश्यांना सैन्यांत दाखल होण्यास १८९१ पासून मज्जाव केलेला आहे, त्यामुळें अस्पृश्यांची सैन्यांत भरती होत नाहीं तरी सरकारनें अस्पृश्यांवरील ती बंदी काढावी, व अस्पृश्यांची सैन्यांत भरती करावी. या विनंतीला

उद्देशून लॉर्ड साहेबांनीं हा प्रश्न आपल्या अधिकारांत नाहीं, तो हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांतला आहे, असा अभिप्राय दिला होता. (टा. इं., ता. ३।७।१९१७). अस्पृश्य लोकांनीं आपली सैन्यांत भरती व्हावी म्हणून प्रांतिक व मध्यवर्ति सरकारांकडे १९१५ मध्यें अनेक विनंत्या-अर्ज पाठविले होते; पण त्या सर्वांना सरकारनें नकारात्मक उत्तरें दिलीं होतीं. सैन्यांत भरती होण्याबद्दल अस्पृश्यांची चळवळ व त्यासंबंधीं लॉर्ड वुइलिंग्डन यांनीं केलेलीं भाषणें व उत्तरें यासंबंधीं टाईम्स ऑफ इंडियानें ता. १।७। १९१७ ला " अस्पृश्य वर्ग व सैन्य " या मथळ्याखालीं एक स्फुट लिहिलें. अस्पृश्यांच्या सैन्य भरतीच्या इच्छेबद्दल सहानुभूति व्यक्त करून या स्फुटांत असें सुचविलें होतें कीं, सरकार जर सैन्यांतील पदवीच्या जागा देण्यास तयार नाहीं, तर अस्पृश्यांनीं तरी त्याबद्दल उगीच हट्ट कां धरावा ? इंग्लंडमधील बड्या व श्रीमंत घराण्यांतील लोक साम्राज्यावरील महायुद्धाचें संकट निवारण्यासाठीं लष्करांत मिळेल तें काम करण्यास पुढें येत आहेत; त्यांचा कित्ता पुढें ठेवून अस्पृश्यांनीं उच्च पदव्यांच्या जागांचा हव्यास न धरतां लष्करांतील हलक्या-सलक्या नोकऱ्या स्वीकारण्यास कां पुढें येऊं नये ?

१९१६-१७ च्या काळांत महायुद्धाला रंग चढला. प्रत्येक आघाडीवर जर्मनांची सरशी होऊं लागली. मेसापोटेमियांत ( इराक ) कुत-अल-अमारा व भूमध्य समुद्रांतील गॅलिपोली या बंदरांत इंग्रज सैन्यांची भयंकर वाताहत झाली. अशा पडत्या काळांत इंग्रजांना अधिक सैन्याची जरूरी भासूं लागली. त्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांतील अनेक देशांत सैन्य भरतीचें कार्य अगदीं जोरांत सुरूं झालें. हें कार्य हिंदुस्थानांत सुरूं झालें. सरकारला अस्पृश्यांवरील सैन्य भरतीची बंदी बाजूला सारणें भाग पडलें. या बंदी निवारणाचा हुकूम सरकारनें ता. ६।२। १९१७ ला प्रसिद्ध केला. (ज्ञानप्रकाश, ता: ६-२-१९१७). मुंबई इलाख्यांत महारांची सैन्य-भरती जोरांत झाली व त्यांची १११ वी महार बटालियन उभारली.

स्वतःला गरज भासली म्हणून का होईना, सरकारनें अस्पृश्यांची सैन्यांत भरती करावयाचें ठरविलें. याबद्दल त्यांचें आभार मानण्यासाठीं अस्पृश्यांचे पुढारी व मिलिटरी पेन्शनर यांनीं ता. ८।७।१९१७ ला संध्याकाळीं मुंबईतील टाऊन हॉलमध्यें जाहीर सभा भरविली. मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी ऑ. मि. पी. आर. कॅडेल हे अध्यक्ष होते. या सभेचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडियानें ता. ९-७-१९१७ च्या अंकांत 'बॉम्बे महार्स' व 'ए रिक्रुटिंग मीटिंग' या मथळ्याखालीं प्रसिद्ध केला होता. या सभेंत अस्पृश्यांतर्फे नगरचे मिलिटरी पेन्शनर महार गृहस्थ श्री. गणपत गोविंद, बेळगांवचे कॉन्ट्रॅक्टर श्री. पापन्ना जालय्या, पुण्याचे श्री. शि जा. कांबळे, रा. ब. नाईक, श्री. वि. रा. शिंदे इत्यादींची आभारप्रदर्शक भाषणें झालीं. सरकारतर्फे मि. कॅडेल, दक्षिण भागाचे कमिशनर मि. एल्. जे. माऊंटफोर्ड, रिक्रुटिंग

ऑफीसर मि. सी. एस. कॅंबेल, व सर नारायणराव चंदावरकर यांची भाषणें झालीं. त्यापैकीं मि. कॅंडेल (अध्यक्ष) व सर नारायणराव चंदावरकर यांच्या भाषणांत नवी माहिती व नवी दृष्टि दृग्गोचर होत असल्यामुळें त्यांचा सारांश देण्याचा मोह आवरत नाहीं.

मि. कॅंडेलः—१८९१ च्या सुमारास सरकारनें जातिनिहाय पलटणी सुरू करण्याचें धोरण स्वीकारण्याचें ठरविलें. या धोरणामुळें निरनिराळ्या पलटणींतील लोक महारांना आपल्या पलटणींत दाखल करण्यास विरोध करूं लागले. व त्यामुळें महारांना पलटणींत स्थान मिळेना; व म्हणून कित्येक लष्करी अधिकाऱ्यांना महारांच्याबद्दल सहानुभुति वाटत होती तरी त्यांच्या मर्जीविरुद्ध सरकारला महारांच्या लष्कर-भरतीवर बंदी घालावी लागली. तेव्हांपासून आपल्या कित्येक पिढ्यांपासून लष्करांत नोकरी करण्याचा महारांचा जो हक्क चालत आलेला होता, तो आपणांस सरकारनें द्यावा, म्हणून महारांनीं जवळ जवळ आठ वेळां सरकारकडे विनंती अर्ज पाठविलें. त्या अर्जांत त्यांनीं व त्यांच्या वाडवडिलांनीं राजनिष्ठ राहून कित्येक लढायामध्यें कसे पराक्रम केले याबद्दल त्या अर्जदारांनीं सविस्तर माहिती दिली होती. व्हिक्टोरिया राणी-सरकारच्या १८५८ च्या जाहीर-नाम्यांतील तत्त्वाकडे त्यांनीं अंगुलि-निर्देश केला होता. निरनिराळ्या पलटणींत जातिनिर्बंधाचे कांटे महार सैनिकाच्या मार्गांत पसरलेले होते, तरी ११७ महार लोक लष्करांत कमिशन्ड ऑफिसर्स पूर्वी होऊन गेले, अशी महार अर्जदारांनीं आपल्या अर्जांत माहिती दिली होती. महारांचे हे सर्व अर्ज केविलवाण्या स्थितीनें भरलेले असल्यामुळें लॉर्ड हॅरिस, लॉर्ड सँढर्स्ट, लॉर्ड लॅमिंग्टन आणि लॉर्ड सिडेन्‌हॅम या मुंबईच्या गव्हर्नरांची महार अर्जदाराबद्दल पूर्ण सहानुभूति होती. परंतु जातिनिहाय पलटणी चालू करण्याच्या निकालाला हिंदुस्थानसरकारला चिकटून राहणें भाग पडल्यामुळें या बाबतींत कोणाला कांहींच करतां आलें नाहीं. आतां जो प्राणांतिक झगडा चालला आहे, त्यांत आपलें साम्राज्य गुंतलें गेलें आहे; आणि ज्याला समरांगणावर प्राणांची तिलांजली देऊन साम्राज्याची सेवा करण्याची इच्छा होत आहे, त्यानें पुढें येण्याची आतां संधि साधली पाहिजे. मराठा पलटणींनीं युद्धांत बरेंच शौर्य प्रकट केलें आहे. आणि आतां अशी सबळ आशा करावयास हरकत नाहीं कीं, ज्या महारांनीं मराठ्यांच्या खांद्याला खांदा लावून ब्रिटिशांचा झेंडा कोरेगांवापासून कंदाहारपर्यंत नाचविला त्या महारांचे वंशज आपल्या पराक्रमशाली पूर्वजांचा व मराठे बंधूंचा कित्ता गिरवून आपलें क्षात्रतेज अधिक प्रमाणानें प्रकट करतील! हिंदुस्थान सरकारनें सध्यां एका बटालियनची मागणी केली आहे. तरीपण रिझर्व्ह म्हणूनहि कांहीं महारांची भरती करणें जरूर आहे.

४० वर्षांपूर्वी फक्त रत्नागिरी जिल्ह्यांतून एका वर्षीं १०३० महार केवळ शिपाई म्हणून पलटणींत नोकरी करीत होते. आतां आपणाला एक लक्षाहून अधिक महार-संख्या असलेल्या इलाख्यांत लष्कर-भरती करावयाची आहे. त्यांतून एक नमुनेदार

महार बटालियन उभारण्याची आमची इच्छा नाहीं. तर ड्रायव्हर्स, फालोअर्स कोअर, इत्यादि आक्झीलियरी फोर्समध्यें त्यांची भरती करण्याचें आहे. त्यावेळीं महार लोक आपल्या कर्तव्यकर्मास जागले तर त्यांच्याबद्दल लोकांत आदरभाव व कृतज्ञता उत्पन्न होईल. आणि त्यांच्या समाजांतहि थोर दर्जा वाढेल. हें महारांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. ......हिज एक्सलन्सी लॉर्ड वुइलिंग्डन यांनीं या सभेला असा संदेश निवेदन करण्यास सांगितलें आहे कीं, महारांनीं आपली स्वतंत्र बटालियन उभारण्याची जी चळवळ सुरु केली आहे ती पाहून मला आनंद झाला आहे. या वेळीं राजनिष्ठा राखून महार लोक आलेल्या संधीचा फायदा करुन घेतील तर त्यांचा सामाजिक दर्जा खात्रीनें वाढेल.

मिस्टर कॅडेल यांच्या भाषणांत लॉर्ड वुइलिंग्डन यांच्या संदेशाचा जो संदर्भ आलेला आहे, तो त्यांनीं बक्षीससमारंभाच्या वेळीं ता. ३०।६।१९१६ ला 'किर्लोस्कर थिएटरांत,' 'अस्पृश्यांची लष्करांत भरती करण्याचें सरकारला प्रयोजन वाटत नाहीं,' अशा आशयाचे जे उद्गार काढलेले होते, ते लक्षांत घ्यावेत; म्हणजे सरकार आपल्या स्वतःच्या फायद्यासाठींच अस्पृश्यांचा उपयोग करीत होते, व अस्पृश्यांच्या मदतीची सरकारला जेव्हां मुळींच गरज भासत नव्हती, तेव्हां सरकार अस्पृश्यांकडे ढुंकूनेहि पाहात नसे, हें स्पष्टपणें लक्षांत येईल.

सर नारायण चंदावरकर—देशाची सेवा करण्याकरितां इतके महार येथें जमा झालेले आहेत; मी जर महार असतों तर किती बरें झालें असतें? सरकार व देश यांची सेवा मनोभावानें करण्याचा महारांना उपदेश करुन सर साहेबांनीं आपल्या लहानपणीं ऐकलेली एक गोष्ट सांगितली. कर्नाटकांत एका गांवीं ब्राह्मण राहात असत. तेथें महार नव्हते. त्या गांवांत एकदां वाघ आला. तेव्हां त्या वाघाचें पारिपत्य करण्यास तेथें कोणी नव्हता. म्हणून त्या गांवांतील ब्राह्मण जवळच्या गांवांत रहात असणाऱ्या महाराकडे धांवत गेले व ते त्यांना म्हणाले, 'अहो, महारांनो! आमचे प्राण वांचवा! आमच्या गांवांत वाघ शिरला आहे!' आतां सरकारनेंहि महारांना अशाच प्रकारची हाक मारली आहे. 'अहो! महारांनो! आम्हांला मदत करा! शत्रू आमच्या घरांत शिरला आहे!' ही गोष्ट सांगून सर साहेबांनीं महारांना लष्करांत भरती होण्यास विनंति केली. तेथेंच भरतींत नांवें घेण्यास सुरवात केली, तेव्हां शंभर महार तरुणांनीं आपलीं नांवें दिलीं.

ता. ६।२।१९१६ ला सरकारची अस्पृश्यांच्या लष्कर-भरतीवरील बंदी उठल्या-नंतर अल्पावधींत महारांच्या दोन कंपन्या तयार झाल्या. त्यांना '१११ वी, महार बटालियन' हें नांव दिलें. मुंबई प्रांतिक सैन्य भरतीच्या बोर्डानें जी कामगिरी केली तिचा तपशील मुंबई सरकारनें आपल्या प्रेस-नोटमध्यें प्रसिद्ध केला होता. त्या प्रेस-नोटवर लिहितांना ता. ५।३।१९१८ च्या केसरीनें "प्रांतिक सैन्य भरती"

आ.क्रमांक 23557 दि: ......

या मथळ्याखालीं आंकडेवार माहिती दिली आहे. त्यांत मुंबई इलाख्यानें ३३९० लढाऊ सैनिक दरमहा पुरविलें पाहिजेत, अशा सरकारच्या मागणीचा उल्लेख केला आहे. यावरून सरकारला माणसांची किती जरुरी होती व म्हणूनच अस्पृश्यांवरील लष्कर भरतीची बंदी त्यांना उठवावी लागली हें स्पष्ट दिसतें. केसरीकार पुढें म्हणतात : " कोंकणी महारांनीं मात्र आपलें नांव राखलें व त्यांची आतां दुसरीहि पलटण तयार होत आहे, दक्षिणी महार अगदींच थोडें आले ."

सरकारचे आभार मानण्यासाठीं महारांनीं जी ता. ८।७।१९१७ ला सभा भरविली तिची हकिगत सविस्तर देण्याचा माझा हेतु एवढाच आहे कीं, याच सभेंत भाषण करणारे सरकारी अधिकारी हे १९२१ सालीं सरकारनें '१११' वी महार बटालियन बंद केली तेव्हां याच अधिकाऱ्यांनीं आपल्या काखा कशा वर केल्या, हें वाचकांना स्पष्ट करून यावें.

शिंद्यांची व खुद्द अस्पृश्यांची मुंबई शहरांत जी चळवळ चालू झाली, तिचा अनुकुल परिणाम जनतेच्या मनावर होत चालला. त्यामुळें बरेंच सुशिक्षित सद्गृहस्थ (स्पृश्य व अस्पृश्य) मुंबई शहरांत अस्पृश्योन्नतीचें कार्य व चळवळ करीत होते. अस्पृश्य वर्गांतील महार जातीचे लोक त्या चळवळींत अग्रगण्य होते. महारजातीची सुधारणा व्हावी व त्यासाठीं सरकारनें महार जातीच्या मुलांना मोफत शिक्षण यावें व महारकीबाबतच्या कामांत विशेष सवलती मिळाव्यात, अशा स्वरूपांच्या त्यांच्या मागण्या होत्या. पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणाच्या प्रसंगीं मुंबईत महार लोकांची २५ मे १९१२ रोजीं जंगी 'जाहीर-सभा' झाली. त्या सभेंत महारांच्या मागण्याबद्दलचा एक चार पानी छापील अर्ज वांटण्यांत आला. गांव कामगार महार यांना पाटील-कुळकर्णी व सरकारी अंमलदार यांच्याकडून कसा अमानुष जुलूम सहन करावा लागतो, हें दिग्दर्शित करणारी चार हस्तरेखित चित्रें काढून या अर्जाच्या शेवटच्या दोन पानांवर दाखविलेलें होतें. पहिल्या दोन पानांवर ओवीबद्ध कवितेंतून महारांच्या दैन्यावस्थेचें चित्र चितारलेलें होतें.

# प्रकरण १६ वें

## सिंहावलोकन (पुढें चालू)

### अस्पृश्यांच्या चळवळीचें विस्तृत क्षेत्र

१९१७ च्या पुढील दोन तीन वर्षांत अस्पृश्यांच्या चळवळीचें क्षेत्र वाढत गेलें. आम्हांला सामाजिक हक्क द्या व माणसांप्रमाणें वागवा, अशी प्रथम चळवळ सुरू झाली. नंतर आम्हांवरील धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी लादलेली आहे ती नष्ट करा, अशी चळवळ सुरू झाली. आम्हांला सक्तीचें मोफत शिक्षण द्या, स्कॉलरशिपा द्या, वसतिगृहें बांधा, सरकारी नोकऱ्यांत प्रवेश द्या आणि राजकीय हक्क द्या, अशी अस्पृश्यांची चळवळ १९१७ च्या पुढील काळांत सुरू झाली. शिंद्यांच्या कार्यामुळें अस्पृश्य समाजांत शिंदे व चंदावरकर यांचें प्राबल्य कांहीं काळ चालू होतें. एवढेंच नव्हे तर, अस्पृश्यांच्या हितासाठीं कोणताही प्रश्न सरकारनें विचारांत घ्यावयाचा ठरविला तर सरकार चंदावरकर आणि शिंदे यांच्याशीं सल्लामसलत करीत असे. तथापि अस्पृश्यांच्या चळवळींत खुद्द अस्पृश्य समाजसेवक स्वतंत्रपणें वावरत असत. पुढें पुढें तर चंदावरकर आणि शिंदे यांची गुलामगिरी त्यांना नकोशी वाटूं लागली. या संबंधींचा इतिहास पुढें यथावकाश येईलच. १९१७ सालांत व पुढील काळांत अस्पृश्यांच्या सभांचा जोर हळूहळूं वाढत गेला. त्या सभांपैकीं तीन सभा विशेष महत्त्वाच्या आहेत. त्यांच्याबद्दलची माहिती पुढें देतों.

पहिली सभा ता. ११।११।१९१७ रोजीं १ वाजतां सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं मदनपुरा बारा माळ्यासमोरील पटांगणांत झाली. ही सभा भरविण्याचे दोन हेतु होते. एक डॉ. आंबेडकर यांचें अभिनंदन करणें व दुसरा अस्पृश्य वर्गासाठीं राजकीय हक्क मागणें. डॉ. आंबेडकर विलायतेहून १९१७ च्या जुलै महिन्यांत परत आले. तेव्हां त्यांच्याभोंवतीं मुंबईतील समाजसेवक गोळा झाले. आपल्या समाजांत इतका विद्वान झालेला हा पहिलाच गृहस्थ म्हणून

त्या समाजसेवकांना खूप आनंद झाला होता. आपल्या चळवळीला इतका विद्वान् व योग्य पुढारी मिळणार, हें चित्र त्यांना दिसत होतें, म्हणून त्यांचा आनंद द्विगुणित झालेला होता. हा आनंद प्रदर्शित करण्यासाठीं त्यांनीं डॉ. आंबेडकरांना मानपत्र व थैली अर्पण करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें एक जाहीर सभा करण्याचें मुक्रर केलें. परंतु सभा भरविण्याच्या अगोदरच डॉ. आंबेडकर हे मुंबईहून बडोद्याला नोकरीसाठीं निघून गेले. ता. ११-११-१९१७ ला जी सभा भरविण्यांत येणार होती तिला डॉ. आंबेडकर यांनीं उपस्थित व्हावें, म्हणून अकरा समाजसेवकांनीं बडोद्याला ता. ६-११-१९१७ ला पत्र पाठवून विनंती केली. परंतु डॉ. आंबेडकर सभेस हजर राहूं शकले नाहींत किंवा त्यांनीं पुढें 'मानपत्र' किंवा 'थैली' स्वीकारली नाहीं.

ता. ११-११-१९१७ ला भरलेल्या सभेचा वृत्तांत ता. १८-११-१९१७ च्या "जगद्वृत्त" या मुंबईतील पत्रांत प्रसिद्ध झाला होता. सभेस श्री. नारायणराव मल्हार जोशी, अमृतलाल ठक्कर, काशिनाथ रघुनाथ मित्र, काणे, रुय्यद, इत्यादि मंडळी हजर होती. सभेंत सात ठराव मंजूर करण्यांत आले. ठराव नंबर २ व ३ हे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसंबंधींचे होते. राष्ट्रसभा व मुस्लिम लीग यांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेमध्यें करावयाच्या सुधारणांसंबंधानें जी योजना केली आहे, तिला मान्यता व पाठिंबा देणें, हा ठराव नंबर २ जेव्हां मांडला, तेव्हां नागपूरचे श्री. अकाजी गणेश गवई यांनीं ठरावाला विरोध केला. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, राष्ट्रसभा ही स्वराज्य मागते, म्हणजे हिंदुस्थानांतील अधिकारी हिंदी असावेत व राज्यकारभार हिंदी माणसांच्या हातांत असावा. सभेच्या या मागणीला जर आम्ही अस्पृश्यांनीं पाठिंबा दिला तर आमच्या पाठीवर सध्यां जे स्पृश्यवर्गीय लोक हंटरचे फटके मारीत आहेत त्यांच्या हातांत सत्ता द्या, असें म्हणण्यासारखें आहे. शिवाय, राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांनीं काय योजना तयार केलेली आहे, ती आम्हा अस्पृश्यांना अद्याप कोठें ठाऊक आहे? श्री. गवई यांच्या विरोधी भाषणामुळें सभेंत गडबड झाली. सर चंदावरकर यांनीं खुलासादाखल भाषण करून तो ठराव पास झाल्याचें जाहीर केलें. ठराव नंबर ३ मध्यें त्यावेळचे भारतमंत्री मि. मॉंटेग्यू व व्हॉईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड हे हिंदुस्थानांत राजकीय परिस्थितीची पहाणी करीत होते त्यांना अस्पृश्यांच्या राजकीय आकांक्षांची माहिती देऊन, अस्पृश्यांना राजकीय हक्क देण्यास त्यांचें मन वळविण्यासाठीं अस्पृश्यांचें एक शिष्टमंडळ तयार करणें, असें ठरविलें. त्याचप्रमाणें सर नारायणराव चंदावरकर यांच्या नेतृत्वाखालीं एक अस्पृश्यांचें शिष्टमंडळ नेमण्यांत आलें.

सभेंतला सातवा ठराव असा होता: "आमच्या समाजांतील एक तरुण बुद्धिवान गृहस्थ डॉ. भीमराव आर. आंबेडकर हे श्रीमंत गायकवाड सरकारच्या

आश्रयानें अमेरिकेंत जाऊन कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. व पी एच्. डी. या मोठ्या पदव्या संपादन करून परत स्वदेशीं आले आहेत. त्यांचें त्या पदव्या संपादिल्याबद्दल ही सभा अभिनंदन करते, आणि अस्पृश्यवर्गातल्या एका होतकरू तरुणास असें उच्च शिक्षण संपादण्याला सहाय्य केल्याबद्दल श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचे आभार मानिते." हा ठराव श्री. मारुतीराव साबाजी गायकवाड यांनीं मांडला, व डॉ. आंबेडकर यांना कांहीं अडचणीमुळें सभेस हजर राहतां आलें नाहीं, याबद्दल आपलें दुःख प्रदर्शित केलें.

सभेचा समारोप करतांना सर नारायणराव चंदावरकर म्हणाले, "आज येथें जीं भाषणें झालीं आहेत, तीं ब्राह्मण वगैरे भाषणें करितात त्या तोडीचीं होतीं. जी एक बाजू पुढें मांडण्यांत आलेली आहे ती विचार करण्यासारखी आहे. व राष्ट्रीय सभा आपल्या हक्कांसंबंधीं विचार करील किंवा नाहीं या संबंधानें जो संशय प्रदर्शित करण्यांत आला आहे तोहि विचार करण्यासारखा आहे. असो. तुम्हीं पुढें येण्यास भिऊं नका. जे तुम्हाला खालीं दडपण्याचा प्रयत्न करतील ते पापी होतील. तुमच्यावर ईश्वराची पूर्ण कृपा आहे असें समजा. ज्या गृहस्थांचा आज येथें सन्मान व्हावयाचा होता ते तीन महिन्यांपूर्वी अमेरिकेहून येथें आल्याचें मला आतांच समजलें. त्यांच्या मातुश्री निवर्तल्यामुळें ते येथें येऊं शकले नाहींत. त्यांचें अभिनंदन सर्व जातींच्या लोकांनीं केलें पाहिजे. अस्पृश्य जातींत चांगलीं हुशार माणसें आहेत असें श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं सर्वांस दाखवून दिलें आहे. रा. आंबेडकर हे येथें जेव्हां येतील, तेव्हां येथील प्रेसीडेन्सी रिफॉर्म असोसिएशनच्या व माझ्या वतीनें पार्टी देण्याचा विचार आहे."

दुसरी महत्वाची सभा ता. २३-३-१९१८ ला भरविण्यांत आली. ता. ११-११-१९१७ रोजीं सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाल्यानंतर मुंबईतील अस्पृश्य वर्गांत जागृति करण्यासाठीं जोराची चळवळ सुरू झाली. त्यासाठीं समाज सेवकांनीं सभांचें सत्र सुरू केलें. या सभांमधून येथें कायदे कौन्सिल आणि स्थानिक निमसरकारी संस्था यांच्यामध्यें अस्पृश्यांचे खास प्रतिनिधी नेमावेत अशी मागणी करण्यांत येऊं लागली. त्यावेळीं भारतमंत्री मि. मॉंटेग्यू आणि व्हाईसराय लॉर्ड चेम्सफर्ड हे हिंदुस्थानमध्यें दौऱ्यावर असतांना मुंबईत आले, तेव्हां सर नारायणराव चंदावरकर यांच्या नेतृत्वाखालीं अस्पृश्यांचें एक शिष्टमंडळ त्यांना भेटावयास गेलें. मि० मॉंटेग्यू आणि लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं शिष्टमंडळाचें म्हणणें सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतलें, आणि अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचें आम्हीं संरक्षण करूं असें शिष्टमंडळांस आश्वासन दिलें. यानंतर पुढील काळामध्यें अस्पृश्यतानिवारणाची चळवळ स्पृश्य मंडळांतील कांहीं पुढाऱ्यांनीं हातीं घेतली. अस्पृश्यतानिवारण करण्यासाठीं मतप्रचार करावा म्हणून त्यांनीं ठिकठिकाणीं सभा

भरविल्या. त्यांतील दोन परिषदा विशेष महत्त्वाच्या असल्यामुळें त्यांची त्रोटक माहिती येथें देतों. पहिली अस्पृश्यतां-निवारक परिषद मुंबईतील फ्रेंच फुलाच्या विस्तीर्ण पटांगणांत ता. २३, २४ मार्च १९१८ रोजीं भरविण्यांत आली. तिचे अध्यक्ष श्रीमंत सर सयाजी महाराज गायकवाड आणि स्वागताध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर हे होते. या परिषदेस हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध पुढारी आणि मुंबईतील प्रमुख नागरिक हजर राहिले होते. त्यांत दक्षिणी व गुजराथी स्त्रियांचाहि भरणा बराच होता: बिपिनचंद्र पाल, अमृतलाल ठक्कर, विठ्ठलभाई पटेल, शेट दामोदर सावळाराम यंदे, शेट जमनादास, प्रो. भाटे. डॉ. साठये, शेट लक्ष्मीदास तेरसी, म. गो. अभ्यंकर, गजानन भास्करराव वैद्य, नामदार सी. व्ही. मेहता, बॅ. जयकर, लोकमान्य टिळक, नामदार खापर्डे, सौ. लक्ष्मीबाई कामत, इत्यादि थोर स्त्रीपुरुषांनीं सभेमधील निरनिराळ्या ठरावांवर भाषणें केलीं. सदर सभेस संदेश म्हणून सर रविंद्रनाथ टागोर, मि. वाडिया, डॉ. मॅन आणि करवीर पीठाचे शंकराचार्य इत्यादींनीं पाठविलेल्या तारा वि. रा. शिंदे यांनीं वाचून दाखविल्या. या तारांमधील महात्मा गांधींची तार विशेष महत्त्वाची आहे. आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा लढा यशस्वी करून हिंदुस्थानांत परतल्यानंतर गोखले यांच्या सल्ल्यावरून ते त्यावेळीं हिंदुस्थानांत राजकीय परिस्थिति प्रत्यक्ष पहाण्यासाठीं हिंदुस्थानभर हिंडत होते. परिषदेस हजर न राहतां आल्यामुळें त्यांनीं दिल्लीहून तार पाठविली कीं, " अस्पृश्यतेचा नायनाट केलाच पाहिजे. "

परिषदेस सुरवात शनिवार ता. २३।३।१८ ला दुपारीं चार वाजतां झाली. सर सयाजीराव यांचें भाषण अत्यंत महत्त्वाचें होतें. त्याचा सारांश, ता. २७-३-१८ च्या 'ज्ञानप्रकाश'मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग असा :

"मला पुष्कळ वर्षांपासून अस्पृश्यतेविषयीं कळकळ वाटत असल्यामुळें या विषयावर बोलण्याला मला आनंद वाटत आहे. अस्पृश्यतानिवारणात्मक असें कित्येक प्रयोग माझ्या राज्यांत चालू आहेत हें आपणांस माहित आहेच. अस्पृश्य वर्गाचा किंवा अतिशूद्रांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचा व त्यांची स्थिति सुधारण्याचा प्रश्न विकट असून तो सोडविण्यास मनाचा विकास, जोरदारपणा व धैर्य यांची जरूरी असते. लोकांच्या गैरसमजुतीला व लोकनिंदेला तोंड द्यावें लागतें; आणि आज पिढ्यानुपिढ्या ज्या सामाजिक कल्पनांनीं हिंदु जातींवर आपला ताबा बसविला आहे, त्या सर्व शेवटीं बदलून टाकाव्या लागतात. हा प्रश्न केवळ आपल्या याच बांधवांपुरता नसून त्याचा संबंध आपल्या सामाजिक तत्त्वसंशोधनाशीं आहे. आणि यामुळें आपलें अंतःकरण, आपली विचारशक्ति व आपली सदसद्विवेकबुद्धि या सर्वांना नवीन वळण लावून देणें जरुर आहे. हिंदु लोकांचें सजीवत्त्व दांडगें असल्यामुळें व हे लोक ध्येयांना चिकटून रहाणारे असल्यामुळें सदर प्रश्नाचा इष्ट तो परिणाम होईल, याबद्दल मला तरी शंका नाहीं. सामाजिक नवजीवनाच्या हल्ल्यापुढें

व शास्त्रीय ज्ञानासमोर अज्ञानमूलक गैरसमजुती व जात्याभिमान यांचा चिरकाल टिकाव लागणें शक्य नाहीं.

## जपानचें उदाहरण

जपानप्रमाणें ह्या देशांत एक राजकीय किंवा धार्मिक घटक नाहीं कीं एक बादशाही जाहीरनामा काढून सर्व देशावर होणारा सामाजिक अन्याय दूर करतां येईल. जपाननें १८६८–७१ या वर्षांत जी सुधारणा घडवून आणली तिचें स्वारस्य पाहून या सुधारणा केवळ राजकीय असून आर्थिक व सामाजिकहि होत्या–थोडक्या वर्षांत सामाजिक निर्बंध व वंशपरंपरागत धंदे यांची इमारत जमीनदोस्त करण्यांत आली. प्रथमतः जमिनीचा मालक जो दायमियो नांवाचा सरदार त्यानें स्वखुषीनें आपले मांडलिकत्वाचे सर्व अधिकार राजेसाहेबांस अर्पण करून त्यांच्याऐवजीं लोकप्रतिनिधीसभेच्या वरच्या सभेच्या सभासदाची जागा पतकरली. तसेंच, सामोरायी नांवाच्या लढवय्या लोकांनीं आपलीं वंश-परंपरागत वतनें व जातीचे हक्क यांचा त्याग करून स्वचरितार्थासाठीं त्यांनीं शेतकरी, उदमी, दुकानदार वगैरेचा धंदा स्वीकारला आहे. पूर्वी सामुराय लोक सामाजिकवर्गांत उच्च स्थानीं होते. आतां ते सामान्य लोकांत मिसळून गेले आहेत. या नंतर १८७१ सालीं जुलै महिन्यांत बादशाही कायद्याच्या अन्वयें जमीनदारी व जात नाहींशी करण्यांत आली व त्याच सालीं ऑक्टोबरमध्यें दुसऱ्या बादशाही हुकुमाप्रमाणें हिन्नीन नांवाच्या अंत्यजाची उन्नति करण्यांत आली. आपल्या हीन किंवा अतिशूद्रांत व जपानांत मागें असलेल्या हिन्नीन लोकांत बरेंच साम्य आहे. जपानांतला १८७१ सालचा बादशाही हुकूम याप्रमाणें आहे. "इटा व हिन्नीन हे भेद नाहीसे करण्यांत आले आहेत. ज्या लोकांना हीं नांवें होतीं त्यांना आतां लोकांच्या सामान्य यादींत समाविष्ट केलें आहे, आणि अशा लोकांचा सामाजिक दर्जा व उदरभरणाचे मार्ग इतर लोकांप्रमाणेंच यापुढें रहातील." याप्रमाणें लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी जपानांतल्या अंत्यजांची उन्नति झाली. लिंकनच्या दास्य-विमोचनाच्या जाहीरनाम्याचें अमेरिकेंत जें महत्त्व आहे, किंवा झार अलेक्झांडरच्या सर्व लोकांना मुक्त करणाऱ्या युकेस नांवाच्या हुकुमांना रशियांत जें महत्त्व आलें तेंच महत्त्व जपानांत १८७१ च्या बादशाही हुकुमाला आहे. आज इंग्लंड व अमेरिका या देशांप्रमाणेंच जपानची सामाजिक व्यवस्थाहि प्रगमनशील आहे. गेल्या दोन पिढ्यांत जपाननें राष्ट्राच्या कुटुंबांत जे महत्त्वाचे आर्थिक व राजकीय स्थान पटकावलें आहे, त्याला सदर समाजघटना पुष्कळ अंशानें जबाबदार आहे, असें म्हटल्यास त्यांत काय वावगें आहे? शिक्षण हाच रामबाण उपाय. लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं अस्पृश्यत्व किंवा अतिशूद्रत्वाची कल्पना नाहींशी करण्यास समर्थ आहे. असा बाद-शाही हुकूम काढणें आज हिंदुस्थानच्या मूठभर सुशिक्षित लोकांना शक्य नाहीं. लोकमत जागृत करणें व शिक्षणाचा प्रसार करणें या हळूहळू होणाऱ्या गोष्टींचाच

आश्रय करणें आपल्याला भाग आहे. अस्पृश्यत्वाची कल्पना सर्व प्रकारच्या हिंदु लोकांत पसरलेली आहे. प्राचीन काळांत अनुलोम व प्रतिलोम विवाह होत असत. परंतु कांहीं काळानें बुद्धीवर अंधश्रद्धेचा पगडा बसला, तत्त्वावर रूढि वरचढपणा गाजवूं लागली व भोळ्या समजुतींचीं पाळेंमुळें खोल गेलीं. अस्पृश्यता मनुष्यनिर्मित आहे, देवानें निर्माण केलेली नाहीं. तसेंच वर्गभिन्नता तर्काला अनुसरून आहे असेंहि नाहीं. आधुनिक कालांतला कोणताहि शास्त्रज्ञ किंवा तत्त्ववेत्ता असें म्हणण्यास तयार होणार नाहीं. अस्पृश्यता ही जीवशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांना धरून नाहीं. तशीच मानवशास्त्रालाहि धरून नाहीं. ब्राह्मणांना वंद्य असे संत अस्पृश्य वर्गांतहि झालेले आहेत.

## "धर्मांतरानें होणारें नुकसान

"अस्पृश्य लोकांत वर्णाश्रमधर्मासंबंधानें असंतोष निर्माण झाला, म्हणजे होणाऱ्या हानीचें आतांपर्यंत विवेचन केलें. आतां दुसऱ्या एका भीतीचें दिग्दर्शन करतों. गांवचे गांव एकजात ख्रिस्ती झाल्याचें वर्तमान ऐकिवांत आहे. ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मासंबंधानें मला कांहीं बोलावयाचें नाहीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं अंत्यजांच्या उद्धारासाठीं पुष्कळ प्रयत्न केले आहेत. माझें म्हणणें हिंदु लोकांत जो आत्मसंतोष किंवा स्वसमाधान दिसून येतें, त्या संबंधानें आहे. आम्ही आमच्या धर्मांत व्यावहारिक सुधारणा घडवून आणून अंत्यजोद्धाराचा प्रश्न सोडविला पाहिजे. आम्ही हा प्रश्न सोडविला नाहीं तर इतर राष्ट्रांचीहि आमच्याबद्दल असलेली सहानुभूति आम्ही गमावून बसूं. आपण सर्वांनीं अंत्यजोद्धाराच्या पवित्र कार्यास हात घालावा असें माझें आपणास शेवटीं आग्रहाचें सांगणें आहे."

या भाषणानंतर परिषदेंत चार ठराव पास झाले. पहिला ठराव अस्पृश्यता निवारणासाठीं पुढाऱ्यांच्या सह्यांचा एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्याबद्दलचा होता. तो बॅ. जयकर यांनीं मांडला. दुसरा ठराव हिंदुधर्मसंस्थांच्या आचार्यपीठांनीं अस्पृश्यता काढून टाकण्यासंबंधींची आज्ञापत्रकें काढावीं, अशा आशयाचा होता. या ठरावावर श्री. जमनादास द्वारकादास, बिपिनचंद्र पाल, आणि गजानन भास्कर वैद्य यांनीं भाषणें केलीं. तिसरा आणि चौथा ठराव अस्पृश्यांची औद्योगिक स्थिति सुधारण्यासाठीं निरनिराळे उपाय योजावेत, अशा आशयाचे होते हे ठराव पास झाल्यानंतर महाराज प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें परिषद सोडून गेले. दुसऱ्या दिवशीं सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखालीं परिषदेचें काम पुनः सुरू करण्यांत आलें. या दिवशींहि प्रेक्षकांची बरीच गर्दी होती. या दिवशीं बाकीचे ठराव पास करण्यांत आले. पांचवा ठराव संस्थानिकांसंबंधींचा होता. हिंदुस्थानांत जीं संस्थानें आहेत, तेथें अस्पृश्यतानिवारणासंबंधीं प्रयत्न व्हावेत व अस्पृश्यांची उन्नति करण्यासाठीं खुद्द संस्थानिकांनीं जोराचे प्रयत्न करावेत, असा विनंतिवजा ठराव बॅ. जी. के. गाडगीळ यांनीं मांडला आणि मिस.

कृष्णाबाई जव्हेरी आणि मि. सी. एम्. करसेटर्जा यांनीं अनुमोदिला. या ठरावावर के. कृ. अ. केळूसकर यांनीं रागारागानें भाषण केलें. त्यांच्या भाषणासंबंधीं ता. २६।३। १९१८ च्या संदेशमध्यें खालील उल्लेख आढळतो : " रा. कृ. अ. केळूसकर या ठरावाला अनुमोदन देतांना रागारागानें म्हणाले, ' येथें आज प्लॅटफॉर्मवर ब्राह्मण वगैरे वरिष्ठ दर्जाचे लोक बसलेले आहेत; येथें शहरांत ओरड करून काय करतां ? खेड्यांत काय चाललें आहे, तें जाऊन पहा ! येथें सभा भरवून काय उपयोग ? बडोदें संस्थानासारख्यांतसुद्धां अस्पृश्यांबद्दल हलगर्जीपणा दिसून येतो. एका महार गृहस्थाला ( डॉ. अमडेकर ) महाराज सयाजीराव यांनीं हजारों रुपये खर्च करून अमेरिकेला शिक्षणासाठीं पाठविलें. ते महार गृहस्थ एम्. ए., पी एच्. डी. होऊन आले. त्यांना सिडेनहॅम साहेबांनीं इंपीरियल सर्व्हिसमध्यें मोठी जागा देऊं केली; परंतु त्यांनीं महाराज सरकारच्या पदरीं नोकरी करणार म्हणून ती नाकारिली. ते गृहस्थ बडोदें संस्थानांत येऊन महाराजांना भेटले. ' तुमची व्यवस्था दिवाणजीकडे सोंपविली आहे,' असें त्यांना महाराजांनीं सांगितलें. दिवाणजींनीं त्यांना दीडशें रुपये पगाराची नोकरी दिली; परंतु त्यांना सगळ्या बडोदें संस्थानांत कोठेंहि रहाण्यास जागा मिळेना, बिचारे कंटाळून इकडे मुंबईत आले. सध्यां ते मुंबईत आहेत. सरकारकडे अर्जावर अर्ज करीत आहेत. परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग झालेला नाहीं. असा आपला समाज आहे."

यावर अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर उठून म्हणाले, " रा. केळूसकर यांनीं आम्हांला जो उपदेश केला आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें आम्ही शहरांतल्या शहरांतच पोकळ विवाद करून रहात नाहीं. खेड्यांतसुद्धां प्रयत्न सुरू आहेत. डॉ. अमडेकर या महार गृहस्थासंबंधानें त्यांनीं जें आपणाला सांगितलें, त्यांतला फारच थोडा भाग खरा आहे (टाळ्या). महाराज सरकार यांचें व माझें या बाबतींत संभाषण झालें असून मीहि माझ्याकडून डॉ. अमडेकर यांना शक्य ती मदत करीत आहे. अस्पृश्यत्वाचा हा प्रश्न एकदम जावयाचा नाहीं. समाजाला न दुखवितां तो काढून टाकावयाचा आहे. तेव्हां रा. केळूसकर यांचें या बाबतींतलें बोलणें सगळेंच खरें मानूं नका."

केळूसकरानंतर या ठरावावर रा. सासने, श्री. दा. सा. यंदे, आणि कालिचरण नंदा गवळी ( वऱ्हाडांतील महार ) यांचीं भाषणें झालीं.

सार्वजनिक संस्थांनीं आणि ग्रामसंस्थांनीं अस्पृश्यवर्गाच्या शारीरिक, आर्थिक, नैतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक इत्यादि बाबींकडे लक्ष पुरवून त्याची प्रगति करावी, अशा आशयाचा सहावा ठराव रा. ठक्कर (-बापा) यांनीं मांडला. त्या ठरावाला रा. हरीभाई अमीन हे अनुमोदन देत असतां लोकमान्य टिळक यांनीं परिषदेच्या भव्य मंडपांत प्रवेश केला; तेव्हां प्रेक्षकांनीं ' लोकमान्य टिळक महाराज

की जय ! ' असा जयघोष केला व टाळयांच्या कडकडाटानें वातावरण दुमदुमून सोडलें. सर नारायणराव चंदावरकर यांनीं टिळकांशीं हस्तांदोलन करून आपल्या बाजूच्या खुर्चीवर बसविलें. नंतर सभेचें काम पुढें चालू झालें. या ठरावावर रा. मारवाडी मास्तर आणि संभाजी संतूजी वाघमारे या दोन अस्पृश्य गृहस्थांनीं भाषणें केलीं. त्यांत रा. वाघमारे यांचें भाषण फारच कळवळयाचें होतें. ता. २६-३-१९१८ च्या ' ज्ञानप्रकाश ' मध्यें रा. वाघमारे यांच्या भाषणासंबंधीं असा उल्लेख केलेला आहे :

" टिळकांच्या दर्शनाचा हा माझा पहिलाच योग असल्यामुळें मला अत्यंत आनंद होत आहे. ' लोकमान्य ' ही पदवी तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणास नाहीं असें जर आहे, तर मग आम्ही लोकांच्या बाहेर आहोंत काय ? आमची काळजी तुम्हीं कां घेऊं नये ? तसेंच जगद्गुरु जगाचे गुरु. त्यांनीं आमची हेळसांड कां करावी, हें त्यांचें त्यांनाच माहित. अस्पृश्यपणाचा सर्प आमच्या डोक्यावर आहे, तो आम्हांला कांहीं सुचूं देत नाहीं. मी वरून तुम्हां मंडळींना नमस्कार चमत्कार करतों परंतु अंतरयामीं माझ्या अंगाची आग होत असते. आम्हांला विद्या शिकविण्याचें काम एकवेळ राहिलें तरी चालेल, कारण पुष्कळ शिकलेलीं पोरें व्यसनी व अजागळ असलेलीं आम्हीं पाहतों. परमेश्वर-भक्तीचा मार्ग आम्हांस खुला करून आम्हाला देवळांत जाण्याची परवानगी द्या, एवढीच माझी सर्वांना नम्र प्रार्थना आहे. हें तुम्हीं न कराल तर आम्ही सद्याच्या स्थितींत स्वस्थ बसणार नाहीं. कारण आम्ही आतां जिवावर उदार झालों आहोंत. "

वाघमारे हे पुणें जिल्ह्यांतील महार गृहस्थ असून ते मुंबईतील अस्पृश्यांचे एक प्रमुख पुढारी होते. मुंबईतील अस्पृश्य चळवळीचे ते एक सूत्रधार असल्यामुळें ते फार शिकलेले नव्हते तरी त्यांना अस्पृश्यांच्या खऱ्या उन्नतीच्या मार्गाची जाणीव झालेली होती. नुसती अस्पृश्यतानिवारणाची चळवळ न करतां अस्पृश्यांना हिंदूंच्या देवमूर्तींना स्पर्श करून त्यांची पूजा करण्याची मोकळीक द्या म्हणजे स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन समाजांतील श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा प्रकारची भावना व रूढि नाहींशी करतां येईल, असें वाघमारे यांनीं आपलें मत स्पष्टपणें प्रदर्शित केलें. पुढें १०-१२ वर्षांनीं अस्पृश्यांनीं मंदीरप्रवेशाची चळवळ हातीं घेतली. या चळवळीचें भविष्य रा. वाघमारे यांनीं अफाट हिंदु समुदायापुढें सांगितलें होतें. या चाणाक्ष समाजसेवकाला अस्पृश्यांनीं १९२३ सालीं 'लोकप्रिय' ही पदवी समारंभानें अर्पण केली होती. हे गृहस्थ १९३० सालीं दिवंगत झाले.

राष्ट्रसभा, प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या, सामाजिक परिषद, भारतीय औद्योगिक परिषद वगैरे संस्थांनीं अंत्यज लोकांचें सहकार्य व निष्ठा संपादण्यासाठीं त्यांच्यांतून प्रांतनिहाय प्रतिनिधी मिळविण्याची व्यवस्था करावी व अंत्यज लोकांना शिक्षण देण्यासाठीं आदेश पाठवावे, अशा आशयाचा सहावा ठराव रा. टिळक यांनीं मांडला.

टिळकांच्या भाषणाचा इंग्रजी अहवाल ' हिंदु मिशनरी ' (मुंबई) या पत्रांत 'The Emancipation of the Untouchables: Lokamanaya Tilak's Speech' या शीर्षकाखालीं ८ व १५ एप्रिल १९१८ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला होता. टिळकांच्या भाषणाचा सविस्तर वृत्तांत ३१ मे १९१८ च्या ' संदेश'च्या अंकांत खालीलप्रमाणें दिलेला आहेः .

## " अस्पृश्यतेचा प्रश्न

" शास्त्राधार नाहीं! पेशव्यांचें दप्तर, मोकळा दरवाजा!

"लोकमान्य टिळक या ठरावावर भाषण करतांना म्हणाले, ' अस्पृश्य वर्गाचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा असून त्याचा राजकीयदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या शक्य तितका लवकर निकाल लागला पाहिजे व तो लावण्यासारखा आहे. अस्पृश्यवर्ग म्हणजे काय? याला कांहीं शास्त्रीय आधार आहे काय? याला शास्त्रीय आधार कांहींएक नाहीं. अस्पश्यवर्गापेक्षां यवनांना अधिक मानिण्यांत येत असतें.

" या लोकांना जातवार प्रतिनिधि असावेत कीं नसावेत हा माझ्या मतें वेगळा प्रश्न आहे. त्याचा अस्पृश्यत्वाशीं कांहींएक संबंध येत नाहीं. अस्पृश्यांनीं तुमच्या-आमच्यांत आलें पाहिजे; समाजाचें व देशाचें जें कार्य आहे तें सर्वांचें आहे. तें कार्य पार पाडण्यासाठीं शक्य तितकें मनुष्यबळ पाहिजे. या कार्याआड अस्पृश्यतेचा प्रश्न येतां कामा नये. या लोकांशीं विरोध धरण्यापेक्षां देशांत दुसरीं अनेक महत्त्वाचीं कामें करावयाचीं आहेत.

"पेशव्यांच्या वेळीं सैन्यांतून ब्राह्मण वगैरे लोक कांहीं धाबळींतून पाणी आणीत नसत. पाण्यासाठीं लांब लांब जावें लागे व त्यामुळें पखालींतून आणणें भाग पडे. हें पखालींतून आणलेलें पाणी पेशवे पीत असत. अशा प्रकारचे दाखले पेशव्यांच्या दप्तरीं सांपडतात. हल्लीं आपली सामाजिक जनसमूहाची अस्पृश्यांसंबंधानें जी भावना दिसूं लागली ती आपलें राष्ट्रीयत्व नष्ट होत चाललें आहे हें दाखविणारी आहे. आपण याच कालाचें उदाहरण घेऊं या. हिंदुस्थानांत काळा मनुष्य हा गोऱ्या मनुष्याच्या दृष्टीनें अस्पृश्य आहे. लढाईवर काय प्रकार होतात? शिपाई पुढें असतात. त्यांच्या मागें कर्नलसाहेब असतात. ते नीट लढा, पाणी वगैरे प्या म्हणून सांगत असतात. गोरे व काळे यांचा युद्धप्रसंगीं अतिनिकट संबंध येत असतो. स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव लढाईच्या वेळीं रहात नाहीं अशा प्रकारचें हें अस्पृश्यत्व नष्ट होण्याला दोन्हीं पक्षांच्या लोकांना रणांगणावर खांद्याशीं खांदा लावून लढण्याचे प्रसंग यावे लागतात, तेव्हांच तो भेदाभेद नष्ट होत असतो. स्पर्शास्पर्शासंबंधानें मी मागें एकदां आपणाला बोललों होतों राजद्वारीं, मोठमोठ्या दरबारीं, त्याचप्रमाणें बाजारांत 'स्पर्शास्पर्शो न विद्येत्' असें शास्त्रांत आहे. अमक्याला शिवलें असतां पाप लागतें, अमक्याची सावली पडली असतां विटाळ

होतो, ही बुद्धि अजिबात नष्ट झाली पाहिजे. (हिअर, हिअर) एक मनुष्य इतका कमी दर्जाचा आहे कीं, त्याला शिवलें असतां पाप लागतें ही बुद्धि नाहींशी होईल, तेव्हांच आमची प्रगति होईल. (टाळ्या) हा भेद नोकरशाही व आपण यांच्यांतहि आहे. एकाद्या साहेबाला भेटायला गेलों तर ते घरांतून उठून बाहेर येतात. गोऱ्या लोकांतसुद्धां हा भेद आहे. नीग्रोला हे लोक आपल्या हॉटेलांत येऊं देत नाहींत. प्रे. विल्सन एका नीग्रोकडे जेवले म्हणून वर्तमानपत्रांतून काहूर माजून राहिलें होतें! हे भेद आहेत खरे, परंतु ते नाहींसे करण्याच्या मार्गाला लागणें, ते नाहींसे करून टाकणें हें देशसुधारणेचें चिन्ह आहे. (टाळ्या) हें भेद काढून लावणें हे धर्मसुधारणेचें रहस्य आहे. (हिअर, हिअर.) आर्य लोक हिंदुस्थानांत आले तेव्हां येथील पूर्वीच्या लोकांना ते अनार्य मानीत असत. गोरा व नीग्रो यांच्यांतील भेदाप्रमाणेंच तो भेद होता. ब्राह्मणांचे संस्कार शूद्रांनीं करावे कीं नाहीं याचा अनेकदां ऊहापोह झालेला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन मुख्य जातींना जे अधिकार आहेत तेच शूद्रांनाहि आहेत. मात्र शूद्रांनीं वैदिक मंत्र म्हणूं नयेत.

"आर्यधर्मांत इतर धर्मीयांना घ्यावें किंवा नाहीं असा एक प्रश्न 'हिंदु मिशनरी सोसायटी संबंधानें विवाद चालला असतांना निघालेला होता. ही भेसळ आहे हें खरें, परन्तु आर्यधर्मांत सर्वांचा समावेश होण्यासारखा आहे, व हा उद्योग असाच पुढें चालू ठेविला पाहिजे. (टाळ्या) 'मग या बाबतींत तुम्ही काय करतां?' असें पुष्कळाकडून विचारण्यांत येईल. हें माझें कार्य नव्हे, असें मी स्पष्ट म्हणतों. मी किती म्हणून गोष्टी कराव्या? सगळ्याच गोष्टींचा पुढाकार घ्यायला माझें डोकें तरी समर्थ नाहीं. या कार्याला माझी पूर्ण सहानुभूति आहे. १८९४ सालीं पुण्यांत गणपती उत्सवाच्या वेळीं एका चांभारानें गणपति केलेला होता. त्या काळीं आजच्याप्रमाणें रा. शिंद्यांचे उद्योग सुरू नव्हते. मी गाडींतून माझा गणपती घेऊन चाललों होतों. त्या चांभाराचा गणपती कोणी आपल्याबरोबर घेईना. मी त्या चांभाराला सांगून त्याचा गणपती माझ्या गाडींत आणून ठेविला. (टाळ्यांचा गजर) त्यावेळीं वर्तमानपत्रांतून ही गोष्ट प्रसिद्ध झालेली आहे. त्यावेळीं मी असें केलें म्हणून माझें कोणी कांहीं केलें नाहीं. (टाळ्या) प्रसंग असतात त्या त्या प्रसंगीं वेळ येईल तसें वागावें लागतें. तळेगांवला कांचेच्या कारखान्यांत कांहीं सर्वच ब्राह्मण नाहींत. बरींच माणसें ब्राह्मण आहेत, परंतु त्यांच्या हाताखालील माणसें खालच्या वर्गांतलींच आहेत.

"चांगला पोशाख घातलेला असला म्हणजे आपण त्याला 'Come on here! You are my friend, (या बसा, तुम्ही आमचे दोस्त आहांत)', असें आपण म्हणतों. मग काय? हें स्पृश्यास्पृश्यत्व पोषाखांत आहे काय?

"पुण्यांत चांभाराचीं दुकानें आहेत. तेथील ब्राह्मण लोक चांभाराच्या दुकानांत जातात, जोडे पायांत घालतात, व घरी जातात. ते घरीं गेल्यावर कांहीं स्नान

करतात असें नाहीं. दिवसें दिवस ही स्थिति सुधारत जाणार आहे व त्याप्रमाणें ती सुधारतहि आहे. कार्य जास्त झपाट्यानें कसें होईल? जितकी जितकी राष्ट्रकार्य करण्याची आमच्या लोकांना मोकळीक मिळेल, तितका तितका हा प्रश्न जास्त लवकर सुटेल.

"रोटीबेटीव्यवहार व्हावा कीं नाहीं, श्राद्धाचा प्रश्न कसा सोडवावा, हे दूरचे प्रश्न आहेत. या प्रश्नांबरोबर अस्पृश्यतेचा प्रश्न गुरफटून तो जास्त बिकट करून टाकण्याची माझी इच्छा नाहीं. तरी सभासमाजांत हिंडतांना हा अस्पृश्यत्वाचा प्रश्न आड येऊं नये. रोटीबेटी व्यवहार किंवा इतर प्रश्न हे कालानुरोधानें क्रमाक्रमानें पुढें येणार आहेत. कॉंग्रेसमध्यें अस्पृश्यवर्गाचें प्रतिनिधि घेऊं नयेत असा कांहीं नियम नाहीं. हा रस्ता आजच खुला आहे. अस्पृश्यवर्गातर्फे कोणीहि गेला तरी त्याला कॉंग्रेसमध्यें घेतील. तोच नियम इतर परिषदांसंबंधीं लावतां येईल.

"ज्या धर्माशीं इतर लोकांचा संबंध येतो अशा धर्मांत अस्पृश्य वर्गाचे लोक जितके जास्त पडतील तितका अस्पृश्यत्वाचा डाग लवकर नाहींसा होईल. त्याचप्रमाणें त्यांच्यांतून शिक्षणाचा प्रसार जितका जास्त होईल तितकी अस्पृश्यता नष्ट होण्याला जास्त मदत होणार आहे. परमेश्वराच्या घरचा दरवाजा कोणासाठींहि लावलेला नाहीं. आणि जो दरवाजा लावून टाकणारा तो परमेश्वरच नाहीं असें मी समजेन (टाळ्यांचा गजर); जी अस्पृश्यता मेल्यावर रहात नाहीं, जी अस्पृश्यता परमेश्वराच्या घरीं जातांना आड येत नाहीं, ती अस्पृश्यता आपण आपल्या समाजांत वापरूं देणें म्हणजे परमेश्वराच्या गृहीं पाप करण्यासारखें आहे. (हिअर, हिअर.)

"सर्वांना मिळून ध्येय एकच असलें पाहिजे; सर्वांना खांद्याला खांदा लावून लढण्याचे प्रसंग आले पाहिजेत. परंतु हें झाल्याशिवाय कांहीं एक करावयाचें नाहीं असें म्हणून चालावयाचें नाहीं. कॉंग्रेस सभा, औद्योगिक सभा, सामाजिक सभा यांच्यांतून हा भेद ठेवतां येणार नाहीं. कॉंग्रेसनें आपल्यापुढें जें ध्येय ठेविलेलें आहे तें जर पार पाडलें, तर सर्व प्रश्न लवकर सुटतील. (टाळ्या) योग्य वेळ पाहून त्या त्या सुधारणा घडवून आणाव्या लागत असतात.

"मी येथें पहिल्यानेंच आलों म्हणतां? असेल, आज मी पहिल्यानें आलों असेन! परंतु मनानें मी कांहीं या ठिकाणीं पहिल्यानें आलेला नाहीं. (टाळ्या) जो जो देशसेवक आहे, त्याच्या त्याच्या अंतःकरणांत हे सर्व प्रश्न घोळत असतात. अस्पृश्यांचा प्रश्न लवकर सुटला पाहिजे; परंतु याच्याहीपेक्षां जे मोठे प्रश्न आहेत, त्यांना या प्रश्नानें अडथळा केव्हां केव्हां येत असतो तो मात्र येऊं नये. माझी खात्री आहे कीं, अस्पृश्यत्वाचा हा भेद यापुढें कांहीं रहावयाचा नाहीं.

" सर विल्यम हंटरनें या बाबतींत पहिल्यानें लिहिलेलें आहे. या आर्यधर्मांत शूद्रांचा समावेश झाला. तसाच, त्याच रीतीनें, अस्पृश्यांचाहि समावेश कां होऊ नये, असा त्यानें प्रश्न केलेला आहे. पूर्वींच्या दृष्टीनें आपण गेलों तर या प्रश्नाचा लवकर निकाल लागल्याशिवाय रहाणार नाहीं. हें कार्य सगळ्या देशाचें आहे. परमेश्वराच्या घरीं अस्पृश्य, चांडाळ, शूद्र हा भेद नाहीं. आपण त्यांना आपले म्हटले तर आपण परमेश्वरी आज्ञेचें उल्लंघन केलें असें केव्हांहि होणार नाहीं. (टाळ्या)

" राष्ट्रीय कार्यांत, सामाजिक कार्यांत, आपण अस्पृश्य वर्गांना बरोबर घेतलें पाहिजे. हें आतां अपरिहार्य होऊन बसलेलें आहे. जें कार्य अपरिहार्य आहे तिकडे कानाडोळा करून कसें चालेल? अशी डोळेझांक करणें म्हणजे देशाच्या दृष्टीनें विघातक आहे.

"मी स्वतः कसा वागतों हें आपणाला सांगितलें आहे. माझ्या घरीं मी अस्पृश्यत्वाचा भेद मानीत नाहीं. ( टाळ्याचा गजर ) चोखामेळासांप्रदायाचे लोक कांहीं कामानिमित्त माझ्या घरीं आले होते. त्यांना मला कांहीं विचारावयाचें होतें. मी त्या लोकांना घराबाहेर न ठेवतां त्यांना माझ्याबरोबर घरांत बसूं दिलें. (टाळ्यांचा कडकडाट )

"असो; हा प्रश्न मी जरी हातीं घेतलेला नसला तरी त्याला माझी पूर्ण सहानुभूति आहे. मी जो मुख्य प्रश्न हातीं घेतलेला आहे, तो सुटला म्हणजे माझ्या जन्माचें सार्थक झालें असें मी समजेन. हा प्रश्न सुटला म्हणजे अस्पृश्यत्वाचा प्रश्न सुटल्याशिवाय रहाणार नाहीं. ( टाळ्या ) या कार्याला आमची जशी सहानुभूति आहे, तशीच अस्पृश्यांनींहि आमच्या कार्याला आपली सहानुभूति दिली पाहिजे; नाहींतर येथेंच हा अस्पृश्यांचा व स्पृश्यांचा भेद उपस्थित होतो. दोघांनीं आपापल्यांतील अस्पृश्यपणा काढून टाकिला पाहिजे. असें झालें म्हणजे अस्पृश्यपणा आपोआप नष्ट होत जाईल.

" मी अस्पृश्यांच्या विरुद्ध नाहीं, हें स्पष्टपणें सांगतों. अस्पृश्यता गेली पाहिजे असेंच माझें मत आहे. ही रुढी आहे; ही नष्ट झाली पाहिजे.

" सध्यां अधिकारारूढ असलेल्या नोकरशाहीनें ज्याप्रमाणें एक प्रकारचें अस्पृश्यत्व उत्पन्न केलेलें आहे तसेंच कित्येक वर्षांपूर्वीं ब्राह्मण लोकांनीं उत्पन्न केलें होतें, असें मी म्हणत नाहीं. हा समाजाला लागलेला एक प्रकारचा रोग आहे. तो काढून टाकणें आपलें कार्य आहे. या रोगाचा लवकर नायनाट होईल, इतकें बोलून मी माझें भाषण संपवितों. " ( टाळ्या )

अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायासंबंधानें चौकशी करण्यास एक खास रॉयल कमिशन सरकारनें नेमावें आणि त्या कमिशनवर कमींत कमी अर्धे सभासद हिंदू आणि तीन चतुर्थांश हिंदी असावेत, अशा आशयाचा ठराव इमानदार खापर्डे यांनीं मांडला.

इतर किरकोळ ठराव पास करण्यांत आल्यानंतर परिषदेचें काम आटोपलें. या परिषदेबद्दल बऱ्याच वर्तमानपत्रकारांनीं आपले अनुकूल अभिप्राय व्यक्त केले होते. 'जागृतिकारांनीं (बडोदें) ता. २३-३-१९१८ च्या अंकामध्यें 'अस्पृश्यत्वाविरुद्ध मोहीम' या अग्रलेखामध्यें आपले अनुकूल विचार प्रदर्शित केलेले होते. 'ज्ञानप्रकाश'कारांनीं ता. २७-३-१९१८ च्या अंकांत 'अस्पृश्यवर्गाची उन्नति' या अग्रलेखामध्यें अस्पृश्यता म्हणजे मनाची गुलामगिरी आहे, व ती नाहींशी करणें हें माणुसकीचें खरें लक्षण आहे अशा अर्थाचे उद्गार काढून सर सयाजीराव महाराज यांच्या भाषणांतील मुद्यांकडे वाचकांचें लक्ष वेधलें आहे. या अग्रलेखामध्यें 'ज्ञानप्रकाश'कारांनीं लोकमान्य टिळक आणि नामदार खापर्डे यांच्या परिषदेंतील कामगिरीबद्दल थोडीशी शंका प्रदर्शित केली आहे. ते म्हणतात : "आपण या चळवळीच्या विरुद्ध केव्हांहि नव्हतों व आपली तिला पूर्ण सहानुभूति आहे, अशा आशयाचे उद्गार रा. टिळक यानीं सदर ठरावावर भाषण करतांना काढले असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रा. टिळक हे सुधारणाविरोधी आहेत व त्यांची अस्पृश्यांच्या उन्नतीबद्दल सहानुभूति नव्हती, अर्थात ती निष्कारणच नव्हती अशी समजूत सामान्य जनतेंत पसरलेली होती. तिचें निराकरण स्पष्ट भाषेंत केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. नामदार खापर्डे यांनींहि या परिषदेंत एक ठराव सुचवून त्यांत अंत्यज वर्गाच्या उन्नतीसाठीं अनुकूल असें भाषण केलें. कांहीं वर्षांपूर्वी या वर्गाच्या उन्नतीविरुद्ध असे उद्गार खापर्डे यांनीं काढल्याचें ज्यांना स्मरत असेल त्यांना ना. खापर्डे यांनीं या वेळीं आपली चूक दुरुस्त केल्याचें पाहून समाधान वाटेल यांत शंका नाहीं. रा. टिळक व ना. खापर्डे यांच्या या नुकत्याच बदललेल्या दृष्टिकोनाचा परिणाम त्यांच्या अनुयायांवर होऊन अंत्यजोन्नतिकार्यांत त्यांच्याकडून विरोध न होतां मदत होवो, अशी आशा आम्हीं बाळगतों."

लो. टिळक आणि ना. खापर्डे यांच्याबद्दल 'सुबोधपत्रिका'कारांनीं ता. ३१-३-१९१८ च्या आपल्या पत्रांत दोन स्फुटें लिहिलीं आहेत. 'एकीकडे हानि तर दुसरीकडे लाभ!' या स्फुटांत शेवटीं ते लिहितातः "ह्या वर्गांना स्पृश्य मानावें एवढेंच नव्हे तर ते आणखी असेंहि म्हणाले कीं, 'कोणत्याहि जातीच्या लोकांना अस्पृश्य मानण्यास हिंदुधर्मशास्त्राचा मुळींच आधार नाहीं. ईश्वरासमोर सर्व जाती समान आहेत. अमूक एक जात स्पृश्य नाहीं असें म्हणणें हें पाप होय.' रा. रा. टिळकांच्या ह्या स्पष्टोक्तीबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानतों. ते मोठे कर्मठ आहेत अशी कित्येक लोकांची समजूत आहे व ती कायम राखण्यासाठीं त्यांच्या ह्या भाषणाचा एका शब्दानेंहि गेल्या केसरीच्या अंकांत उल्लेख झालेला नाहीं. तरी पण करवीरकर आचार्यांप्रमाणें रा. रा. टिळकांनीं दुटप्पीपणा बिलकूल ठेविला नाहीं. काल्पनिक भेद करून स्वतःला जबाबदारींतून सोडविण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला नाहीं, व जें कांहीं आपल्याला सांगावयाचें होतें तें त्यांनीं अगदीं स्पष्टपणें सांगितलें. ह्याबद्दलहि आम्ही

त्यांचें अभिनंदन करितों. ना. खापर्डे यांच्यावर 'सुबोध पत्रिका'कार यानीं वरील स्फुटाखालीं 'ना. खापर्डे ह्यांस उकळी फुटली!' हें स्फुट लिहिलें. 'सुबोध-पत्रिका'कार लिहितातः "न्या. मू. रानडे ह्यांच्या अमदानींत उमरावतीचे रा. खापर्डे वकील ह्यांनीं सामाजिक परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें काम केल्याचें, कांहीं वर्षांपूर्वीं अस्पृश्यवर्गाच्या उन्नतीविरुद्ध उद्गार काढतांना हल्लींचे ना. खापर्डे हे बहुतेक विसरले असावेत! पण आतां पुनः एकवार मनु बदलला आहे. आतां लोकमान्य टिळकांनीं कोणत्याहि जातीला अस्पृश्य मानावयास शास्त्राधार नाहीं असें म्हटलें. नामदार खापर्डे ह्यानांहि साहानभूतीची उकळी फुटली व परवांच्या परिषदेमध्यें त्यांनीं अस्पृश्यतेस प्रतिकूल असें भाषण केलें. ह्या आपल्या भाषणांत नामदार म्हणाले कीं, 'तुमच्यावर होत असलेला अन्याय दूर व्हावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. मात्र तसें करतांना वर्णाश्रमधर्माच्या संस्थेवर तुम्ही रोष करूं नका. स्पृश्यास्पृश्य, रोटी-व्यवहार किंवा बेटी-व्यवहार ह्या गोष्टींचा चातुर्वर्ण्याशीं कांहीं एक संबंध नाहीं ही गोष्ट तुम्ही नीट ध्यानांत ठेवा.' पूर्वीं क्षत्रियांच्या मुली ब्राह्मणांच्या घरीं देत व ब्राह्मणांच्या मुली क्षत्रियांच्या घरीं देत. यावरून वर्णाश्रमधर्मावरील ह्यांचें प्रेम कसें मासलेवाईक आहे तें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच. ना. खापर्डे म्हणतात कीं, 'उच्च वर्ण व अस्पृश्य मानलेले एकजीव होण्याचा काळ आहे!' आम्हीं म्हणतों तथास्तु! रा. रा. टिळकांनीं फार सावधगिरीनें व स्पष्ट मर्यादा घालून आपली सहानुभूति दाखविली. नामदार खापर्डे ह्यांस मागच्या विरोधाबद्दल उपरति होऊन त्यांनीं चातुर्वर्ण्य व रोटीबेटी-व्यवहार ह्यांचा कांहीं संबंध नाहीं, असे विलक्षण धाडसाचे उद्गार काढले! कांहीं असो; ह्या दोन्ही पुढाऱ्यांनीं जी सहानुभूति दाखविली तिचा त्यांच्या अनुयायांवर इष्ट परिणाम होईल अशी आशा आहे."

ह्या परिषदेसंबंधीं श्रीमंत शंकराचार्य, करवीरपीठ, यांनीं एक पत्रक ता. २-४-१९१८ च्या 'केसरी'मध्यें प्रसिद्ध केलेलें आहे. तें येणें प्रमाणें:

"अस्पृश्यता निवारक परिषद

"कोल्हापूरच्या श्री. शंकराचार्यांचें पत्र

"मुंबई शहरीं ता. २३-२४ मार्च रोजीं जी अस्पृश्यतानिवारक परिषदेची बैठक झाली, त्या बैठकीस करवीरमठाच्या श्री. शंकराचार्यांस निमंत्रण करण्यांत आलें होतें. परंतु त्यांचा मुक्काम त्या वेळीं दिल्लीस असून त्यांस परिषदेस येतां येणें शक्य नसल्यानें त्यांनीं परिषदेच्या चालकांस पुढील आशयाचें पत्र धाडलें होतें:

'आपल्या कार्याविषयीं माझी सहानुभूति आहे हें सांगावयास नकोच. तथापि, आपल्या कार्याच्या औत्सुक्यभरांत तुम्हीं प्राचीन

शास्त्राज्ञेचा अव्हेर किंवा विपर्यास करूं नका असें सांगणें मला प्राप्त आहे. शास्त्रांतील आज्ञा कांहीं कांहीं अत्यंत महत्वाच्या व आवश्यक असतात व कांहीं किरकोळ असतात. त्यांतून पहिल्या प्रकारच्या शास्त्राज्ञांचा केव्हांहि तिरस्कार करून चालावयाचें नाहीं. शुद्धाशुद्धतेविषयीं व स्पृश्यास्पृश्यतेविषयीं कांहीं नियम महत्त्वाचे व आवश्यक असून धार्मिक वृत्तीनें राहाणाऱ्यांस ते अनुल्लंघनीय आहेत. हे नियम केवळ त्या त्या व्यक्तीच्या हितासाठींच नव्हे, तर सर्व समाजाच्या कल्याणासाठीं पाळावयाचे असतात. ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, ज्याला यावज्जीव धार्मिक बंधनांत व आत्मसंयमनांत राहावयाचें असेल त्यानें कायिक, वाचिक, मानसिक सर्व प्रकारच्या अशुद्ध वातावरणापासून दूर राहिलेंच पाहिजे. याच कल्पनेपासून स्पृश्यास्पृश्यतेचा उगम आहे. आणि धार्मिक तपाचरण करणाऱ्यानें त्या नियमाचें उल्लंघन केल्यास त्याचें त्यास प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. मात्र ज्या महात्म्यांच्या अंगीं इतकें अलौकिक सामर्थ्य आलें असेल कीं, आपल्या सान्निध्यानें ते अत्यंत अमंगल वस्तूसहि पवित्र करूं शकतील, त्या महात्म्यांस हा नियम लागूं नाहीं हें उघड आहे. अशा अलौकिक विभूतींखेरीज इतर सर्व धर्माचरणी वैदिकांनीं हे नियम पाळले पाहिजेत. परंतु अशा पारलौकिक वृत्तीच्या लोकांची संख्या फारच थोडी असणार. ही वैदिकांची संख्या बाजूस वगळली असतां दुसरा मोठा वर्ग गृहस्थांचा (लौकिकाचरणी) राहतो. या वर्गास पूर्वींच्या काळांतहि बरीच मुभा असे. आणि हल्लींच्या काळीं तर यांनीं अलिकडची बदललेली परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. केवळ धर्माचरणांत काळ न घाल- विणारे जे लौकिक गृहस्थ मुसलमानांना व ख्रिस्त्यांना अस्पृश्य मानीत नाहींत, त्यांनीं आपल्यांतल्याच कांहीं हिंदूंना अस्पृश्य मानावें हें पाप आहे. शिवाय, दया ही सर्व धर्माचरणाचें मूळ असल्यामुळें अगदीं निकृष्टवर्गांतल्या लोकांविषयींहि जो भ्रातृभाव मानतो तोच खरा धार्मिक होय. अस्पृश्यवर्गांतूनहि कित्येक संत निर्माण झाले व ते ब्राह्मणांनाहि वंद्य झाले हें सर्वांस विदितच आहे. याचबरोबर निकृष्टवर्गांतील लोकांसहि माझें असें सांगणें आहे कीं, स्वतःची अंतर्बाह्य सुधारणा करणें हाच सामाजिक उन्नतीचा मार्ग होय. सर्व वर्गांची सारखी उन्नति करण्यासाठीं वरिष्ठ वर्गाला खालीं ओढणें, हा शिष्ट मार्ग नसून कनिष्ठ वर्गानें वर चढत जाणें हाच उचित उपाय आहे. आणि हें घडवून आणण्याकरितां निष्कृष्टवर्गाला सवलती व साधनें

दिलीं पाहिजेत. धर्मपीठाचें या दृष्टीनें आवश्यक धर्म व आचार यांचें पालन होण्याविषयीं मला दक्षता बाळगली पाहिजे. परंतु प्रस्तुतच्या परिस्थितीप्रमाणें अनावश्यक आचारांत फेरबदल होणें जरूर आहे. पूर्वी एके काळीं कांहीं वर्गास अस्पृश्य गणण्यांत आलें व त्या वेळीं हें कृत्य अविवेकाचें होतें, असें मानावयाचें कारण नाहीं. परंतु त्या अस्पृश्य वर्गाची रहाणी आतां सुधारत चालली असून गृहस्थांची राहणीहि केवळ पारलौकिक दृष्टीची राहिलेली नाहीं. अशा वेळीं या निकृष्ट-वर्गानें हिंदुधर्मांतून फुटून बाहेर जाऊं नये म्हणून तरी त्यांच्याशीं योग्य प्रकारची वर्तणूक ठेविली पाहिजे. या संबंधांत लोकमत दृढ करण्याचें कार्य तुम्हीं करीत आहां याचा योग्य परिणाम होऊन हल्लींची रीति बदलण्याची आवश्यकता बऱ्याच लोकांस पटूं लागली म्हणजे इतर धर्मपीठांच्या आचार्यांच्या विचारानें आम्हीं प्राचीन आवश्यक शास्त्राज्ञेस झुगारून न देतां कसा मार्ग काढावा तें ठरवूं."

ता. २३ व २४ मार्च १९१८ च्या सभेंत लोकमान्य टिळक यांनीं अस्पृश्यता निवारण्याच्या ठरावाला पाठिंबा दिला खरा, पण त्या परिषदेसंबंधीं आणि ठरावा-संबंधीं 'केसरी'च्या एकाहि अंकांत एकहि शब्द प्रसिद्ध केला नाहीं. ही गोष्ट 'सुबोध पत्रिके'च्या ता. ३१-३-१९१८ च्या स्फुटांत उघडकीस आणली गेली. 'मूकनायक' पत्राच्या पहिल्या अंकांत ( ३१-१-१९२० ) एक स्फुट लिहून आंबेडकरांनींहि यावर टीका केली होती. अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीसंबंधीं लो. टिळकांनीं काय केलें? याबद्दल श्री. न. चिं. केळकर यांनीं ( लोकमान्य टिळक यांचें चरित्र, खंड ३ रा. भाग ९, पान ३२ ) खालील खुलासा केलेला आहे:

"टिळक स्वतः अस्पृश्यता मानीत नसत व सार्वजनिक काय पण खाजगी जागेंतहि ती मानली जाऊं नये असेंच त्यांचें मत असे. आणि जुन्या समाजाला दमानें घेतलें तर तोहि ती काढून टाकील असें त्यांना वाटत असे. ते अस्पृश्य लोकांच्या निमंत्रणावरून त्यांच्याकडे पानसुपारीस जात असत. तथापि, अस्पृश्यांनीं सत्याग्रहाच्या दंडेलीनें हा प्रश्न सोडवावा असें त्यांचें मत नव्हतें. अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत सन १९२० सालीं ते मुंबईस परिषदेला हजर राहिले, पण त्यांनीं वि. रा. शिंदे यांनीं तयार केलेल्या एका प्रतिज्ञा-पत्रकावर सही केली नाहीं; म्हणून त्यांची सहानुभूति ढोंगीपणाची होती, असा एक आक्षेप त्यांचेवर आणण्यांत येतो; पण याबाबतींत शिंदे यांचें पत्र व टिळक यांचें उत्तर हीं दोन्हीं खालीं दिलीं आहेत व त्यावरून प्रतिज्ञापत्रकावर सही न करण्याचें टिळकांचें कारण कळून येईल."

श्री. शिंदे यांचें टिळकांना ता. २-६-१९१८ चें व त्याला टिळकांचें त्याच दिवशीं दिलेलें उत्तर हीं दोन्हीं पत्रें 'टिळकचरित्रा'च्या तिसऱ्या खंडांत ३३ पानावर

छापलेलीं आहेत. या पत्रांत "तुमच्या मॅनिफेस्टोच्या शेवटीं कांहीं कार्यक्रम शिरावर घेऊन तो प्रत्यक्ष अंमलांत आणण्याची व्यक्तिशः जबाबदारी त्यांत टाकलेली असल्या-मुळें सध्यांच्या माझ्या कार्यव्यापृततेमध्यें हें नवीन कार्य मला अंगावर घेतां येईलसें वाटत नाहीं. म्हणून तुमच्या जाहीर–पत्रकावर मला सही देतां येत नाहीं. याबद्दल मला माफ करा" असें टिळकांनीं शिंद्यांना लिहिलें होतें.

सन १८९४ सालीं एका चांभाराचा गणपती स्वतःच्या गाडींत घेतला, असें टिळकांनीं भाषणांत म्हटलें होतें. तो गणपती कोणत्या चांभाराचा होता, याची माहिती त्यांनीं कधींच दिली नाहीं. ती केसरीपत्रांत व टिळकांच्या अनेक चरित्रांत नमूद केलेली नाहीं. एका चांभाराचा मातीचा गणपती घोड्याच्या गाडींत बसविला तर अस्पृश्यतानिवारणाचें महत्कार्य झालें असें जर टिळकांना व त्यांच्या अनुयायांना वाटत होतें, तर सदर प्रकरणाची माहिती देण्याचे त्यांनीं कां टाळलें? टिळक अस्पृश्यांच्या पानसुपारीस जात असत, असें केळकर यांनीं टिळक–चरित्रांत विधान केलेलें आहे. टिळक कोणत्या अस्पृश्यांच्या घरीं पानसुपारीला गेलें होते व केव्हां, याची माहिती केळकरांनीं दिलेली नाहीं. अस्पृश्यांच्या बाबतींत टिळक, केळकर व त्यांचे अनुयायी यांचें हें चित्र पहा आणि मुसलमानांच्या बाबतींत त्यांचें जें दुसरें चित्र होतें, तेंहि पहा. तें दुसरें चित्र पुढीलप्रमाणें होतें: "सन १९१७ सालीं नाशिक येथील परिषद संपवून टिळक मोटारींतून संगमनेरकडे जात होते. दादासाहेब खापर्डे हे शेरडी येथील साई महाराजांच्या सान्निध्यांत राहिलेले होते. त्यांना भेटण्यासाठीं टिळक वाकडी वाट करून शेरडीला गेले. याबद्दल केळकर लिहितातः "तेथें गेल्यावर साई महाराजांनीं नित्यक्रमाप्रमाणें टिळकांच्याजवळ दक्षिणा मागितली, दिली ती थोडी म्हणून आणखी मागितली, तीहि टिळकांनीं उसनी घेतली, पण दिली. साईबाबांचा अंगारा त्यांना कोणी लावला व प्रसाद म्हणून फुलांची माळ व नारळ दिला, तोहि त्यांनीं घेतला. पण याहून कठीण असा एक प्रसंग तेथें टिळकांवर आला व त्यांत त्यांच्या भिडस्त स्वभावाची परीक्षा झाली. टिळक साई-महाराजांचा निरोप घेण्यास गेले असतां साईबाबांनीं तहान लागली म्हणून पाणी मागितलें, तेव्हां तोटी असलेला मुसलमानी थाटाचा लोटा एकानें पुढें केला. तो घेऊन ते पाणी प्याले. इतक्यांत एका भाविक शिष्याला अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, साईबाबांचें उच्छिष्ट तीर्थ मंडळींना द्यावें. झालें! तोच लोटा घेऊन उष्टावलेल्या तोटींतून प्रत्येकाच्या हातावर आचमन घालण्यास सुरवात झाली. हें पहातांच टिळकांच्या डोळयांत संकट उभें राहिलेलें दिसलें. पण त्यांच्यानें तीर्थ नाहीं म्हणवेना. त्यांनीं तोंड वाईट केलेलें दिसूं न देतां आचमन प्राशन केलें." (टिळक चरित्र, खंड ३, भा. ९, पा. ३८–३९.)

टिळकांचा भिडस्त स्वभाव मुसलमानांचें उष्टें पाणी पिण्यापर्यंत होता, हें जसें केळकरांनीं सोदाहरण दाखविलें, तसें टिळकांनीं अमक्या चांभाराचा गणपती गाडींत

घेतला, व तमक्या अस्पृश्याच्या घरीं जाऊन शुद्ध व स्वच्छ (उष्टे नव्हेत) पानविडे खाल्ले, हें कां दाखविलें नाहीं? या बाबतींत श्री. द्वा. गो. वैद्य लिहितात: "ह्या परिषदेचें (ता. २३-२४ मार्च १९१८) मुख्य काम म्हणजे अस्पृश्यता आम्ही जातीनें मोडूं असा व्यक्तिविषयक प्रतिज्ञेचा एक जाहीरनामा काढून त्यावर हिंदु वरिष्ठ जातींतील ३८० प्रमुख पुढाऱ्यांच्या सह्या मिळविल्यानंतर जाहीरनाम्याची प्रसिद्धि करण्याचा निर्णय घेणें. बळवंतराव टिळकांनीं परिषदेंत भाग घेतला, राष्ट्रीय सभेनें हा प्रश्न हातीं घ्यावा अशी सूचना केली; पण अनुयायांच्या भिडेला पडून जाहीरनाम्यावर सही केली नाहीं!" (चंदावरकर, पा. ४७२).

तिसरी महत्त्वाची सभा ता. ६ मे १९१८ रोजीं विजापूर येथें भरविण्यांत आली. यावेळीं तीन प्रांतिक परिषदा भरविण्यांत आल्या होत्या. राजकीय परिषद ता. ५-६ मे आणि औद्योगिक व सामाजिक परिषद ता. ५ ते ८ या दिवशीं भरविण्याचें मुक्रर करण्यात आलें होतें. त्यांतून अंत्यजोद्धारक ऊर्फ अस्पृश्यतानिवारक परिषदेला ता. ६ हा दिवस दिला होता. राजकीय प्रांतिक परिषदेला म. गांधी हजर राहिले होते. त्यांना लगेच विजापूर सोडून जाणें भाग होतें. त्यांच्या तोंडून कांहीं उपदेशाचे विचार सामाजिक परिषदेंत लोकांना ऐकावयास मिळावेत म्हणून परिषदेच्या चालकांनीं ती परिषद रविवारीं ता. ५ मे रोजीं रात्रौ १० वाजतां भरविली. त्या परिषदेचे स्वागताध्यक्ष डॉ. पर्डाबिद्री होते व अध्यक्ष ना. बी. एस्. कामत होते. सभेस प्रेक्षकांची चिक्कार गर्दी झाली होती. ना. कामत यांच्या भाषणाचा गोषवारा ता. ८-५-१९१८ च्या 'ज्ञानप्रकाश' मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत श्री. वि. रा. शिंदे यांच्या अस्पृश्योन्नतीच्या कार्याबद्दल प्रसंशोद्गार काढले व त्यांच्या कार्यास प्रत्येक हिंदूनें आर्थिक मदत करावी, अशी शिफारस केली. अस्पृश्योन्नतीच्या कार्यास म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें व खुद्द सरकार यांनीं परोपरीनें साहाय्य केलें पाहिजे, अशी त्यांनीं भाषणांत सूचना केली. सरकारनें अस्पृश्यांच्या शिक्षणासाठीं वसतिगृहें काढावींत व त्यांच्या तरुणांना सैन्यांत दाखल करावें, असेंहि त्यांनीं सुचविलें होतें.

या परिषदेंत चार ठराव प्रमुख होते. अस्पृश्यता मानूं नये अशा अर्थाचा जाहीरनामा प्रांताप्रांतांतल्या पुढाऱ्यांनीं काढावा, व शाळा, दवाखाने, कोर्टें वगैरे सार्वजनिक संस्थांत विटाळ पाळूं नये आणि विहिरी, तोट्या, हौद, घाट, देवघेवींचीं, व्यवहारांचीं, करमणुकीचीं किंवा देवपूजेचीं स्थळें, या ठिकाणींहि अस्पृश्यांना येण्यास मज्जाव नसावा, असा या परिषदेंत पहिला ठराव पास करण्यांत आला. अस्पृश्य वर्गावरील धर्मसंबंधाचे अवनतिकारक निर्बंध दूर केल्याखेरीज त्यांची उन्नति योग्यरीतीनें होणार नाहीं, म्हणून हिंदूंच्या धार्मिक संस्थांनीं आज्ञापत्रक काढून, धर्मोपदेशक नेमून, खऱ्या शास्त्रार्थाची माहिती प्रसिद्ध करून व इतर हिंदू जे धर्मविधि करतात त्यांत भाग घेण्यास या वर्गांना हक्क ठेवून, यांची उन्नति करण्याचा प्रयत्न करावा,

अशा आशयाचा दुसरा ठराव श्री. न. चिं. केळकर यांनीं मांडला व तो पास झाला. तिसरा ठराव काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यांत झालेल्या लखनौ कराराला अस्पृश्यांचा पाठिंबा आहे, असा त्या परिषदेंत मांडावयाचा होता. आणि अस्पृश्य वर्गाचे डेलिगेट निवडून घेऊन व त्यांच्यामध्यें उपदेशक नेमून राष्ट्रीय सभा, प्रांतिक कमिट्या, अखिल भारतीय सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद व इतर संस्था यांनीं आपल्या कामास या वर्गाची सहानुभूति संपादन करावी, अशा आशयाचा तिसरा ठराव मांडण्यासाठीं म. गांधी पुढें आले. तेव्हां लोकांनीं त्यांचें प्रचंड टाळ्यांनीं स्वागत केलें. त्यांनीं आपलें भाषण हिंदींत केलें. ठरावावर बोलण्यापूर्वी त्यांनीं "इधर कोई अच्छुत है?" असा तीन वेळ पुकार केला. परंतु कोणीहि होय म्हटलें नाहीं, किंवा हात वर केला नाहीं. हें पाहून म. गांधी म्हणाले, 'या परिषदेस डिप्रेस्ड क्लासेस् कॉन्फरन्स कसें म्हणावें? माझ्याकडे जो ठराव पुढें मांडण्याचें काम दिलें आहे, त्या ठरावांत म्हटलें आहे कीं, अस्पृश्य लोकांच्या या परिषदेचा काँग्रेस-लीगच्या योजनेस पूर्ण पाठिंबा आहे; परंतु येथें ज्या अर्थी अस्पृश्य लोकच नाहींत, त्या अर्थी हा ठरावहि मला पुढें मांडतां येत नाहीं.' एवढें बोलून त्यांनीं ठराव मांडण्याचें नाकारलें. अस्पृश्यांच्या सर्वसाधारण स्थितीवर मात्र त्यांनीं अत्यंत कळकळीनें भाषण केलें व अस्पृश्यांना तुच्छ मानणें म्हणजे परमेश्वराला हीन लेखण्यासारखें आहे, असे उद्गार त्यांनीं काढले. म. गांधींच्या या स्पष्टवक्तेपणामुळें श्रोतृसमुदायांत मोठी गडबड उडाली. परिषदेच्या चालकांचीं तोंडें उतरलीं. कारण ठरावाचा पुकारा करून तो न मांडला गेल्यामुळें त्यांची मोठी भंबेरी उडून गेली. म. गांधी ठराव मांडण्याचें नाकारून आपल्या जागेवर जाऊन बसले तेव्हां अध्यक्ष ना. कामत हे खुलासादाखल बोलण्यास उठले. 'ही परिषद अस्पृश्य लोकांची नव्हे, स्पृश्य लोकांची आहे; व त्यांनीं अस्पृश्यांशीं कसें वागावें, या विषयाचा विचार हींत करावयाचा आहे. करितां म. गांधी यांनीं तो ठराव पुढें मांडण्यास हरकत नव्हती. तथापि, मी तो आतां अध्यक्षस्थानावरून पुढें मांडतों. असें ना० कामत यांनीं खुलासादाखल भाषण करून तो ठराव परिषदेंत मांडला. त्याला श्री. वि. रा. शिंदे यांनीं अनुमोदन दिलें व तो ठराव पास झाल्याचें जाहीर केलें.

स्थानिक संस्थांनीं आपल्या नोकरींतील नोकरांच्या, विशेषतः निकृष्ट गणलेल्या वर्गांतील नोकरांच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक, आर्थिक आणि नैतिक कल्याणाकडे लक्ष पुरवावें, अशा आशयाचा चौथा ठराव श्रीमती सरोजिनी नायडू यांनीं मांडला. या ठरावावर बोलतांना नाशिकचे पाटणकर यांनीं म. गांधींवर बराच ताशेरा झाडला. रा. पाटणकरांच्या या वर्तनाबद्दल ज्ञानप्रकाशच्या बातमीदारानें विजापूरहून जें "विजापूर-विचारतरंग" म्हणून बातमी-पत्र पाठविलें होतें त्यांत येणेंप्रमाणें उल्लेख केलेला आहे: "नाशिकचे रा. पाटणकर यांनीं तर म. गांधींना जवळ जवळ मूर्ख म्हणून लहान तोंडीं मोठा घास घेण्याचा जो अश्लाघ्य प्रयत्न केला तो पुष्कळांना

किळसवाणा वाटेल, यांत शंका नाहीं. वरिष्ठ वर्गाच्या लोकांचीच जर ही परिषद असती तर कॉंग्रेस-लीगच्या योजनेला तिची मान्यता पूर्वीचीच आहे, ती नवीन देण्याचा उपद्याप कशाला? ('ज्ञानप्रकाश', ता. १६-५-१९१८). या ठरावामुळें व म. गांधींच्या सरळ वर्तनामुळें या परिषदेच्या चालकांवर असा आरोप लादण्यांत आला कीं, कांहीं मूठभर स्पृश्य लोक अस्पृश्यांच्या नांवाचा उपयोग करून आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचा घाट घालीत आहेत, अशा अर्थाचा आक्षेप श्री. ज्ञा. ध्रु. घोलप यांनीं 'जागरूक' पत्राच्या ता. २५।५।१९१८ च्या अंकांत प्रसिद्ध केला. त्याला उत्तर म्हणून श्री. वि. रा. शिंदे यांचे एक सहकारी रा. दा. ना. पटवर्धन ( त्यावेळीं कर्नाटक शाखेचे मुख्य ) यांनीं रा. घोलप यांना प्रत्युत्तर म्हणून 'जागरूक' पत्राला एक पत्र लिहून पाठविलें, तें प्रत्युत्तर म्हणून न छापतां सदर पत्राच्या संपादकानें, " सत्य लपणें शक्य नाहीं " या मथळ्याखालीं ता. ८ जून १९१८ च्या अंकांत एक स्फुट लिहिलें. त्या स्फुटांतील प्रमुख भाग खालीं देत आहे :

" विजापुरास गेल्या महिन्याच्या आरंभीं ' अस्पृश्य लोकांची परिषद " या नांवानें जी परिषद भरली होती, तिचा बॅ. गांधी यांच्या निर्भीडपणामुळें जो बोजवारा उडाला, तो आमच्या वाचकांस विदितच आहे. या संबंधानें खुद्द या वर्गापैकींच रा. घोलप या नांवाच्या गृहस्थाचें एक पत्र जागरूकच्या ता. २५ मे च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. त्याला व इतर टीकाकारांना उद्देशून डिस्प्रेड क्लासेस मिशनच्या कर्नाटक शाखेचे चालक रा. पटवर्धन यांचें एक पत्र आमच्याकडे आलें आहे. या पत्राचा आशय एवढाच आहे कीं, " या परिषदेला हजर असलेल्या श्रोत्यांमध्यें अस्पृश्य मानण्यांत येणाऱ्या जातींपैकीं कोणत्याहि जातीचे गृहस्थ मुळींच हजर नव्हते, हें म्हणणें धाडसाचें आहे. म. गांधी यांनीं " इधर कुई अच्छुत है ? " असा प्रश्न केला, पण तो समजून त्याला त्यांच्याकडून उत्तर मिळण्याच्या अगोदरच स्पृश्यांपैकीं कोणीतरी ' कुई नहीं ' असा जबाब देतांच त्याचाच प्रतिध्वनि सर्व सभागृहांत निघाला... " रा. पटवर्धनांच्या म्हणण्याप्रमाणेंच या परिषदेस अस्पृश्य कोणी असला तरी तो **श्रोता** म्हणून होता, अस्पृश्यांपैकीं प्रतिनिधी एकहि नव्हता, हें उघड आहे. तेव्हां ज्या परिषदेंत अस्पृश्यांचा एकहि प्रतिनिधी नाहीं, त्या परिषदेला अस्पृश्य वर्गाची परिषद असें नांव देऊन तेथें होमरूलच्या चळवळीला संमति देण्याचा ठराव पास करून घेणें व त्याच्या आधारें या वर्गाची त्या चळवळीला पूर्ण संमति आहे, असें भासविण्याचा प्रयत्न करणें, कितपत प्रामाणिकपणाचें आहे, याचा वाचकांनीं विचार करावा. बॅ. गांधींनीं चालकांची हातचलाखी चव्हाट्यावर आणल्यावर ' अस्पृश्यता निवारक परिषद ' हें नांव, सभेचे अध्यक्ष ना. कामत यांनीं-कदाचित् चालकांच्या सूचनेवरूनहि असेल-आपल्या डोक्यांतून काढलेलें आहे. ती परिषद अस्पृश्यता दूर करूं इच्छिणाऱ्या लोकांचीच होती, तर मग तेथें स्वराज्याचा ठराव पास करण्यांत

स्वारस्य काय? राजकीय प्रांतिक परिषदेंत या लोकांनीं त्या ठरावाला आपली संमति दिलीच होती; पण चालकांचा व त्यांच्यामागें उभें राहून सूत्रें हालविणाऱ्या इतर चळवळयांचा उद्देश सदरहू ठरावाच्याद्वारें या वर्गाची होमरूलला सहानुभूति आहे असें भासविण्याचा होता. केवळ बॅ. गांधींच्या सत्याग्रहामुळेंच तो डाव फसला. रा. पटवर्धनांनीं आतां कितीहि मखलाशी केली तरी हें सत्य लोकांच्या दृष्टीआड होणें शक्य नाहीं. रा. घोलप यांनीं अशा तऱ्हेचे प्रयत्न करण्याचें सोडण्याबद्दलच चालकांना इषारा दिला आहे... ”

चौथा ठराव झाल्यानंतरची स्थिति ता. ८।५।१९१८ च्या 'ज्ञानप्रकाशा'नें दिलेली आहे. “ यावेळीं एक अर्धवेडे गृहस्थ माणसें तुडवीत मोठ्या आवेशानें प्लॅटफॉर्मवर आले व बोडक्यानेंच कांपऱ्या आवाजांत व विलक्षण हातवारे करीत बोलूं लागले. यावेळीं फारच गडबड उडाली व परिषदेचें काम पुढें नीट तऱ्हेनें चालण्याचें चिन्ह दिसेनासें झालें. तेव्हां ना. कामत यांनीं डि. क्ला. फंडास मदत करण्याविषयीं व विजापूर येथें या लोकांसाठीं शाळा वगैरे काढण्यासाठीं असे दोन ठराव अध्यक्षस्थानावरून पुढें मांडले व ते पास झाल्यावर परिषद खलास झाल्याचें त्यांनीं जाहीर केलें. शेवटीं ना. देसाई यांनीं आभार मानल्यावर लोक आपापल्या घरीं गेले.'

या परिषदेला उद्देशून निरनिराळ्या पत्रांत बरीच चर्चा करण्यांत आली. विशेषतः अस्पृश्यवर्गाचा हिंदुस्थानच्या राजकीय मागणीला पाठिंबा आहे, हा जो ठराव परिषदेंत मांडण्यांत आला, त्याबद्दल बरीच नापसंती दाखविण्यांत आली. अस्पृश्योद्धाराच्या बाबतींत राजकीय पक्षांचे पुढारी केवळ वादविवाद व भाषणें करण्यापलीकडे कांहीं करीत नाहींत, असें आतां चोहोंकडून स्पष्टपणें विचारप्रदर्शन करण्यांत येऊं लागलें. याबाबतींत 'ज्ञानप्रकाश'कारांनीं ता. १४ मे १९१८ च्या अंकांत ' निकृष्ट वर्ग व पुढाऱ्यांचें कर्तव्य ' या शिर्षकाखालीं अग्रलेख लिहून आपले विचार मांडलेले होते, ते याच मुद्यासंबंधीं होत. ते लिहितात: “ विजापूर येथें भरलेल्या निकृष्ट वर्गाच्या परिषदेंत महात्मा गांधी यांनीं सांगितल्याप्रमाणें आज स्वतःच्या देशांत आपली जी अवहेलना, अवमान व विटंबना होत आहे, ती आपण आपल्या या देशबांधवांवर अनेक शतकें केलेल्या अन्यायाचें प्रायश्चित किंवा पापाचा झाडा होय, ही गोष्ट आतां पुष्कळांच्या मनास पटूं लागली आहे. ”

अस्पृश्यांच्या प्रगतीसाठीं आणि त्यांची चळवळ विस्तृत करण्यासाठीं ज्या वरिष्ठवर्गीय लोकांनीं मनापासून प्रयत्न केले, त्यांत कोल्हापूरचे राजर्षि श्रीछत्रपति शाहू महाराज हे अग्रगण्य होते. एवढेंच नव्हे तर, महाराष्ट्रांतील अस्पृश्यांच्या चळवळीस व्यापक व चिरायु स्वरूप जर कोणी दिलें असेल, तर तें राजर्षींनीं होय. राजर्षींचा जन्म ता. २६ जुलै १८७४ त झाला. कोल्हापूर संस्थानच्या महाराणी

2354 दि: ...

आनंदीबाईसाहेब यांनीं १७ मार्च १८८४ ला त्यांना दत्तक घेतलें. ता. २ एप्रिल १८९४ ला ते गादीवर स्थानापन्न झाले. तेव्हां त्यांना आश्चर्यानें थक्क करणारें व दुःखानें व्याकुळ करणारें असें जर कोणतें दृश्य दिसलें असेल तर तें म्हणजे संस्थानाच्या व स्थानिक स्वराज्याच्या खात्यांचा ब्राह्मण जातींच्या लोकांच्या हातून अनियंत्रितपणें चाललेला कारभार. ब्राह्मणेतर जातींतील लोक बोटांवर मोजण्याइतकेच होते. याचें कारण काय व तें कारण कसें दूर करावें याबद्दलचे विचार छत्रपतींच्या डोक्यांत एकसारखे घोळूं लागले. ब्राह्मण जातींत शिक्षणप्रसार बराच झालेला होता. शिवाय पेशव्यांच्या कारकीर्दीपासून राज्यकारभाराच्या खात्यांत ब्राह्मणाचें अढळ स्थान परंपरेनें कायम होऊन बसलेलें होतें. ब्राह्मणेतर वर्गांमध्यें शिक्षणप्रसार झालेला नव्हता व राज्यकारभाराच्या खात्यांमध्येंहि त्यांचा प्रवेश झालेला नव्हता. जो काय प्रवेश झालेला होता तो शिपाई, भालदार, चोपदार म्हणून. विचारांतीं छत्रपतींनीं मनांत असें ठाम ठरविलें कीं, ब्राह्मणेतरांच्या हातांत अधिकारसूत्रें आणून द्यावयाचीं तर त्यासाठीं त्यांच्यांत शिक्षणप्रसार जारी करून सुशिक्षित लोक तयार करावयाचे व त्यांना अधिकाराच्या व इतर पदांवर नेमावयाचें व त्यासाठीं बहुजन समाजांत जागृतीची जोरदार चळवळ चालवावयाची. त्याप्रमाणें छत्रपतींनीं संस्थानांत दौरे काढून शिक्षणप्रसाराची व लोकजागृतीची चळवळ धूमधडाक्यानें चालू केली.

ब्राह्मणेतर जातींतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणें व ठिकठिकाणीं वसतिगृहें चालू करून तीं स्वतःच्या द्रव्यसाहाय्यानें चालविणें हें भरीव कार्य छत्रपतींनीं हातीं घेतलें. ता. १८ एप्रिल १९०१ ला 'मराठा स्टुडंट्स् इन्स्टिटयूट' ही संस्था स्थापून छत्रपतींनीं त्या संस्थेस ४७ हजार रुपयांच्या इमारती बांधून दिल्या. या संस्थेंतील विद्यार्थी दुय्यम दर्जाचें शिक्षण संपवून उच्च शिक्षणासाठीं राजाराम कॉलेजांत जाऊं लागले. त्यानंतर छत्रपतींनीं १९०१-१९०४ च्या दरम्यान जैन हॉस्टेल, जून १९१७ मध्यें वीरशैव (लिंगायत) हॉस्टेल, नोव्हेंबर १९०६ मध्यें महॉमेडन हॉस्टेल, फेब्रुवारी १९०८ मध्यें अस्पृश्यांसाठीं मिस् क्लार्क हॉस्टेल, १९२१ सालीं नामदेव (शिंपी) हॉस्टेल, या संस्था स्थापन केल्या. त्यांच्यासाठीं इमारती बांधून दिल्या, त्यांना वार्षिक देणग्या देऊन त्या त्या जातींतील मुलांमध्यें शिक्षणप्रसार सुरू केला. या संस्था कोल्हापूर शहरांत चालू केल्या. इतर जातींसाठींहि शिक्षणसंस्था चालविल्या. संस्थानाबाहेरील ब्रिटिश हद्दींत सुद्धां छत्रपतींनीं विद्यार्थी-वसतिगृहें चालू करण्यास व चालविण्यास उत्तेजन दिलें. कांहीं संस्थांना भरपूर देणग्या दिल्या. महार, मांग, ढोर, चांभार, मराठे, शिंपी, न्हावी, मुसलमान इत्यादि जातींतील मुलें शिकून तयार झाल्यानंतर त्यांना संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांमध्यें छत्रपतींनीं नेमलें. कांहींना वकीलाच्या सनदा दिल्या. छत्रपतींच्या पुरोगामी चळवळींमुळें बहुजनसमाजाला शिक्षणाची आस लागली. व माणसकीच्या हक्कांची जागृति त्यांच्यांत उत्पन्न झाली. ब्राह्मणेतर

लोक संस्थानांतील नोकऱ्यांमध्यें शिरूं लागल्यामुळें आतांपर्यंत नोकऱ्यांची मिरासदारी भोगत आलेल्या ब्राह्मणांना संस्थानांत नोकऱ्या मिळणें अशक्य झालें. शिवाय ब्राह्मणेतर समाजांत स्वहक्कांची जाणीव झाल्यामुळें दररोजच्या व्यवहारांत आतांपर्यंत असलेला वरचष्मा कमी होऊं लागला. या सर्व परिस्थितीमुळें संस्थानांतील ब्राह्मण छत्रपतींना शत्रू समजूं लागले. छत्रपतींची चळवळ हाणून पाडण्यासाठीं ते अनेक प्रकारचे काळेबेरे डावपेंच रचूं लागले ब्राह्मणांनीं संस्थानांत व संस्थानाबाहेर चालविलेलीं वर्तमानपत्रें छत्रपतींच्या कार्याचा विपर्यास करून त्यांना मन मानेल तसे शिव्याशाप देऊं लागलीं. तरी पण छत्रपतींनीं त्यांना भीक घातली नाहीं. ब्राह्मणांच्याविरुद्ध ब्राह्मणेतर समाजाचा उठाव करणें, हें त्यांचें जें ध्येय होतें, त्याची त्यांनीं तोंपर्यंत अंमलबजावणी केली नाहीं. परंतु ब्राह्मणांनीं जेव्हां छत्रपतींविरुद्ध एक भयंकर अपमानास्पद व डोकें फिरवून टाकणारें प्रकरण उभें केलें, तेव्हां छत्रपतींनीं ब्राह्मणांविरुद्ध ब्राह्मणेतर वर्ग उठवून ब्राह्मणांना सार्वजनिक कार्यांतून व सरकारी अधिकारांतून बडतर्फ करण्याचा चंग बांधला. तें प्रकरण 'वेदोक्त प्रकरण' या नांवानें महाराष्ट्रांत कित्येक वर्षे दुमदुमत राहिलें होतें.

महाराज हिंदु धर्माचे कट्टे अनुयायी होते. एवढेंच नव्हे तर ते मराठमोळ रीतरिवाजांचे अंधभक्त होते. कुलस्वामिनी जगदंबा देवीची ते स्वहस्तें पूजा करीत, दररोज तिचें दर्शन घेत. पितृश्राद्धहि भाविकपणें करीत. उपासतापास करीत. सातव्या एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहणप्रसंगीं लंडनला गेले असतांना तेथील रीतरिवाजांप्रमाणें काट्याचमच्यानें जेवणें जेव्हां भाग पडे तेव्हांच ते काटे चमचे वापरीत. एरवीं ते हातानें जेवून टेबलासमोरच्या इंग्रज व युरोपियन लोकांना थक्कच करून सोडीत.

कार्तिकी एकादशीला पंचगंगा नदीवर दर वर्षी कोल्हापूरला यात्रा भरत असते. त्या दिवशीं महाराज सूर्योदयापूर्वीं पंचगंगेत स्नान करीत व त्यावेळीं राजगृहाचा राजोपाध्ये वैदिक मंत्र म्हणत असे. १९०० सालच्या कार्तिकी एकादशीच्या दिवशीं महाराज सहपरिवार सूर्योदयापूर्वीं पंचगंगेच्या स्नानास गेले तेव्हां त्यांचा राजोपाध्ये तेथें उशीरा आला. आल्यानंतर त्यानें प्रथम स्नान करावयाचें व नंतर शुचिर्भूत झाल्यावर महाराज व त्यांचा परिवार स्नान करीत असतांना राजोपाध्ये यांनीं वेदोक्त मंत्र म्हणायचे, असा रिवाज असतांहि तो ब्राह्मण उशीरा येऊन मुखस्तंभ होऊन उभा राहिला. स्नान करण्यास त्याला महाराजांनीं सांगितलें तेव्हां तो म्हणाला, "मला थंडीमुळें पाणी गार लागतें, शिवाय मला पुराणोक्त मंत्र म्हणावयाचे आहेत, तेव्हां मला शुचिर्भूत होण्याचें कारण नाहीं." यावर महाराज संतापले व त्याला म्हणाले, "आम्ही स्नान करण्याच्या अगोदर तूं स्नान करून तयार राहून आमच्या स्नानाच्या वेळीं वेदोक्त मंत्र इतकीं वर्षे म्हणत असस, आणि आतांच तुला हें काय वेड लागलें?" यावर ब्राह्मण म्हणाला, "महाराज,

तुम्ही राजे असला तरी शूद्र आहांत व तुम्हांला वेदोक्त मंत्र ऐकण्याचा अधिकार नाहीं. तुम्ही फक्त पुराणोक्त मंत्र ऐकावेत व ते मी शुचिर्भूत न होतां म्हणालों तरी त्याला शास्त्राची आडकाठी नाहीं.'' राजोपाध्ये याची ही गर्विष्ठ चर्पटपंजरी ऐकून महाराज संतापानें थरथर कांपूं लागले. महाराजांच्या परिवारांतील लोक त्या ब्राह्मणाला अद्वातद्वा बोलूं लागले. कांहीं संतापानें इतके बेफाम झाले कीं, ते त्या ब्राह्मणाचा गळा दाबण्यास पुढें झाले. तेव्हां महाराजांनीं स्वतःचा अपमान सहन करून व राग आवरून इतरांना सांत्वनपर चार शब्द सांगितले व त्या ब्राह्मणाला तेथून जाण्यास सांगून त्यांनीं स्नान उरकलें व ते राजवाड्याला परतले.

दुसऱ्या दिवसापासून राजोपाध्ये यानें महाराजांच्या घरच्या कार्यांत वेदोक्त मंत्र म्हणण्याचें नाकारलें. महाराज त्याच्याकडून पुराणोक्त मंत्र म्हणवून पूजाविधी वगैरे करण्यास तयार होईनात. इतकीं वर्षें राजवाड्यांतील धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें बिनतक्रार करणारा व नेहमीं आदरानें वागणारा ब्राह्मण या वर्षीं इतका मगरूर झाला, याबद्दल विचार करतांना महाराजांना कळून आलें कीं, या गृहस्थाचा संबंध ब्राह्मण चळवळ्यांशीं असला पाहिजे व त्यांची याला फूस असली पाहिजे. महाराजांचा हा कयास थोड्याच दिवसांनीं खरा ठरला. सदर ब्राह्मणास वेदोक्त पूजा करण्यास पुनः पुनः सांगितलें तरी तो ऐकेना. हा अस्तनींतील निखारा कायमचा विझवावा असें ठरवून मग महाराजांनीं सदर ब्राह्मणास बडतर्फ केलें. त्यानंतर कोल्हापुरांतील एक वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण नारायण भट सेवेकरी याला राजोपाध्ये म्हणून नेमलें. तेव्हां बडतर्फ केलेल्या ब्राह्मणानें कोल्हापुरांतील ब्रह्मवृंदापुढें महाराजांच्या विरुद्ध कैफियत मांडली. सेवेकरी यानें महाराजाचे धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें केले म्हणून त्याच्यावर ब्रह्मवृंदानें जातिबहिष्कार जाहीर केला. महाराजांना वेदोक्त अधिकार नाहीं व मूळच्या कुलोपाध्यास पुनः राजवाड्यांत नोकरींत घेऊन महाराजांनीं त्याच्याकडून पुराणोक्त पद्धतीनें धार्मिक विधी करवून घ्यावेत, अशी कैफियत ब्रह्मवृंदानें जगद्गुरु शंकराचार्य यांच्याकडे मांडली. ब्राह्मणी वर्तमानपत्रांनीं या कैफियतीच्या बाजूनें धूमधडाक्यानें प्रचार चालू केला. महाराजांचे ब्राह्मणांविरुद्ध अत्याचार काय काय झालेत त्यांचीं रसाळ व कपोलकल्पित वर्णनें तीं पत्रें देऊन महाराजांच्याविरुद्ध महाराष्ट्रांत लोकमत तयार करूं लागलीं.

नवरात्रामध्यें कुलोपाध्यानें अंबाबाईची पूजाअर्चा करावयाची असे. सेवेकरी पूजेसाठीं देवळांत शिरूं लागला तेव्हां ब्रह्मवृंदानें व मूळच्या राजोपाध्यायानें त्याला अडथळा केला. तेथें मारामारीचा प्रकार होईल कीं काय, हें जाणून महाराजांनीं दोन्ही पक्षांना मंदिरप्रवेशाची बंदी केली. मग ब्रह्मवृंदानें कोल्हापुरांतील पोलिटिकल एजंट यांच्याकडे आपली फिर्याद गुदरली. हें प्रकरण चिघळीस गेलें तर संस्थानांत व संस्थानाबाहेर अस्वस्थता माजेल, म्हणून महाराजांनीं ब्रह्मवृंदाशीं सामोपचारानें समेट करावा व पुराणोक्त पद्धत स्वीकारावी, यासाठीं पोलिटिकल एजंट व इतर

वजनदार लोकांनीं महाराजांच्यावर वजन पाडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु महाराज कोणाच्या विनवणीला व धमकावणीला नमले नाहींत. ब्राह्मणी वर्तमानपत्रें हें वेदोक्त प्रकरण लंडनच्या पार्लमेंटपर्यंत नेण्याची भाषा वापरूं लागलीं.

मूळच्या राजोपाध्याच्या घराण्याला १८८९ सालीं सनद देण्यांत आलेली होती. राजघराण्यांतील धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें करावेत व त्याबद्दल इनाम जमिनी वंशपरंपरेनें वापराव्यात, अशा अर्थाची ही सनद होती. धार्मिक विधी करण्याचे राजोपाध्यानें नाकारल्यावर महाराजांनीं ही सनद रद्द केली व इनाम जमिनी त्याजपासून काढून घेतल्या.

वेदोक्त प्रकरण सुरूं झाल्यानंतर महाराजांनीं, आपल्या वंशांत म्हणजे शिवाजीमहाराजांच्या वंशांत वेदोक्त विधी चालत होते, याची माहिती गोळा करून ठेविली. खुद्द शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणप्रसंगी काशीच्या गागाभट्टानें महाराजांना प्रथम क्षत्रिय म्हणून मान्यता दिली व तो राज्यारोहण समारंभ वेदोक्त पद्धतीनें करण्यास तयार झाला. पण ब्रह्मवृंदानें त्याचे कान भरताचे तो महाराजांना शूद्र म्हणूं लागला. गडगंज दक्षिणा हातांत पडतांच गागा भट्ट ब्रह्मवृंदाविरुद्ध उभा राहिला व शिवाजी महाराजांचा राज्यारोहण समारंभ वेदोक्त पद्धतीनें करण्यास पुनः कबूल झाला व त्याप्रमाणें त्यानें तसें केलें. हें उदाहरण व इतर उदाहरणें लक्षांत घेऊन वैदिक काळापासून आतांपर्यंत ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना धार्मिक बंधनांनीं कसें जाम जखडून टाकलेलें आहे व तीं बंधनें दूर करणें कसें अत्यावश्यक आहे, याची महाराजांना पूरेपूर जाणीव पटली. या जाणीवेंतूनच महाराजांच्या डोक्यांतून ब्राह्मणेतर चळवळ उगम पावली. त्या चळवळींमुळेंच महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचें पुनरुज्जीवन झालें. याच चळवळींतून पुढें सत्यशोधक तमाशे निघाले. या विविध चळवळींना महाराज सढळ हातांनीं द्रव्य देत असत.

वेदोक्त प्रकरण शेवटीं महाराजांच्या बाजूनें निकालांत निघालें. या वेदोक्त प्रकरणाच्या बाबतींत ब्रह्मवृंदांच्या दुष्ट कारवाया, ब्राह्मणांच्या दुष्ट चळवळी आणि आपणांस महाराष्ट्रीय जनतेच्या मनांतून उतरवून कोल्हापूरच्या गादीवरूनहि दूर करण्यासाठीं महाराष्ट्रीय ब्राह्मणी वर्तमानपत्रांनीं जी वारेमाप हाकाटी चालविली त्यामुळें महाराजांना मनस्वी मानसिक ताप झाला. या सर्व घालमेलींना तोंड देऊन महाराजांनीं ब्राह्मणांचीं नासिकें त्र्यंबकेश्वराला भिडविलीं; पण ब्राह्मण अव्वल दर्जाचे कोडगे. या सर्व प्रकारांमुळें धार्मिक वर्चस्व अजिबात नको, असें महाराजांचें ठाम मत बनलें. त्यामुळें त्यांनीं जगद्गुरु शंकराचार्य यांचें वर्चस्व झुगारून दिलें व ब्राह्मणेतरांसाठीं त्यांनीं क्षात्रजगद्गुरु हें पद उत्पन्न केलें.

वेदोक्त प्रकरणामुळें लोकमान्य टिळक आणि महाराज यांचे जाहीर खटके उडूं लागले. टिळकांनीं ब्रह्मवृंदांची बाजू धरली. त्यांनीं केसरींतून महाराजांच्या चळवळी-

वर हवे तसे प्रहार केले. कोल्हापुरांत टिळकांचे जे अनुयायी होते, त्यांनीं 'शिवाजी क्लब' (१८९५) कोल्हापूरांत स्थापन केला. या क्लबाचे कार्यक्रम व चळवळी वरवर राष्ट्रीय वृत्तीच्या असत. पण आंतून त्याचें कार्य, ब्राह्मण जातीची संघटना करून महाराजांच्या ब्राह्मणेतर जागृतीच्या चळवळींना नेस्तनाबूद करणें व महाराज हे धर्मभ्रष्ट आहेत असा बहुजनसमाजांत भास उत्पन्न करणें हें अखंड चालू असे. टिळकांनीं शिवजयंतीची चळवळ चालू केली. तेव्हां महाराजांनीं टिळकांशीं कांहीं वर्षें सहकार्य केलें. परंतु त्या चळवळींतर्फे बहुजनसमाजाचा पाठिंबा राष्ट्रीय चळवळीस मिळवावयाचा, पण बहुजनसमाजाच्या धार्मिक व सामाजिक हक्कांना विरोध करावयाचा, हें टिळकांचें दुटप्पी वर्तन महाराजांच्या लक्षांत आलें, तेव्हां त्यांनीं टिळकांशीं या शिवजयंतीच्या कार्यांतील आपला संबंध तोडला. तेव्हां टिळकांचे अनुयायी या दोन संस्थांतर्फे महाराजांविरुद्ध उघड उघड प्रचारकार्य करूं लागले.

बाबा महाराज या नांवाचे एक ब्राह्मण जहागीरदार होते. त्यांना कोल्हापूर संस्थानातर्फे इनामी जमिनी दिलेल्या होत्या; ते निपुत्रिक म्हणून निवर्तले तेव्हां त्यांची विधवा ताई महाराज यांनीं दत्तक घेण्याचें ठरविलें. रिवाजाप्रमाणें दत्तकाला कोल्हापूरसरकारची संमति मिळवावी लागे. टिळक या इस्टेटीचे एक ट्रस्टी होते. इतर तीन ट्रस्टींपैकीं एक नागपूरकर होते. यांच्या व महाराजांच्या संमतीनें ताई महाराजानीं बाळा महाराज यांना दत्तक घेतलें. तो दत्तक कायदेशीर नाहीं असा पक्ष टिळकांनीं उभारला. या पक्षांत इतर दोन ट्रस्टी सामील झाले. जगन्नाथ महाराज हेच ताई महाराजानीं दत्तक स्वीकारावेत, असा दावा मांडून व प्रिव्ही कौन्सिलपर्यंत लढवून टिळकांनीं तो यशस्वी केला.

महाराज व टिळक यांचे सार्वजनिक आयुष्यांत पुढें फारच खटके उडूं लागले. त्यांच्यामध्यें एकोपा कधींच झाला नाहीं. टिळक हे साधुवृत्तीचे, सत्वशील, सत्याचरणी, देशहितचिंतक, धर्मनिष्ठ, वगैरे वगैरे होत आणि शाहू महाराज हे दुष्ट प्रवृत्तीचे, दुराचारी, लबाड आणि इंग्रजांचे गुलाम व देशबुडवे, वगैरे वगैरे होत, अशा प्रचाराचा टिळकांचे अनुयायी व टिळकी राजकरण, समाजकारण व धर्मकारण यांना उचलून धरणारीं वर्तमानपत्रें, यांनीं एकच हलकल्लोळ उडवून दिला. त्यामुळें, महाराज हे ब्राह्मणद्वेष्टे होत, असा सर्वत्र समज रूढ झाला. परंतु महाराज टिळकांसारख्या प्रवृत्तीच्या ब्राह्मणांचे द्वेष्टे होते, रानडे, गोखले व आगरकर यासारख्या समतावादी ब्राह्मणांचे द्वेष्टे नव्हते, तर ते त्यांचे चहाते होते व त्यांना त्यांच्या कार्यांत ते सक्रीय उत्तेजन देत. आगरकरांचें प्रगतिशील वर्तमानपत्र 'सुधारक' द्रव्याभावीं डबघाईस आलें हें समजतांच त्या पत्राकडून विनंति-अर्जाची वाट न पाहतां महाराजांनां सदर पत्रास भरपूर द्रव्यसाहाय्य पाठवून दिलें. त्याचा उल्लेख करतांना 'सुधारक' पत्राचे संपादक श्री. व्ही. आर. जोशी यांनीं १९०६ सालच्या

जुलै महिन्यांत महाराजांच्या खाजगी चिटणीसास आभारप्रदर्शक पत्र लिहून महाराजांबद्दलचें ऋण मान्य केलें. ( Memoirs, pp. 255—256 )

पहिल्या महायुद्धाच्या काळांत मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन होते. महाराष्ट्रीय बहुजनसमाजांत सामाजिक, धार्मिक व राजकीय हक्कांबद्दल जागृती व्हावी, याबद्दल महाराजांनीं जी चळवळ चालविली होती तिला मुंबई सरकारनें सक्रीय मदत द्यावी, याबद्दल लॉर्ड विलिंग्डन व महाराज यांच्यामध्यें बऱ्याच वाटाघाटी झालेल्या होत्या. याबाबतींत त्यांच्यांमध्यें बराचसा पत्रव्यवहार झालेला होता. राष्ट्रीय चळवळ, टिळकांचीं राजकीय बाबतींतील प्रखर पुरोगामी पण सामाजिक व धार्मिक बाबतींतील जीर्णमताभिमानी मतें, यासंबंधीं सदर पत्रांतून गव्हर्नरसाहेब व महाराज यांनीं चर्चा केलेली होती. त्याचप्रमाणें, बहुजनसमाजाच्या सर्वांगीण चळवळींत जोम भरावयाचा तर त्यासाठीं वरिष्ठ वर्गानीं चालविलेल्या चळवळींना डावलणें किंवा पायबंद घालणें जरूर आहे, अशा आशयाचें विचारप्रदर्शन दोघांनींहि आपापल्या पत्रांमधून केलेलें होतें. टिळकांच्या कोल्हापुरांतील हस्तकानें उपरिनिर्दिष्ट पत्रव्यवहाराचें पुडकें महाराजांच्या राजवाड्यांतून अलगद हस्तगत केलें व तें टिळकांना नेऊन दिलें. तें टिळकांनीं 'केसरी' पत्रांतून क्रमशः प्रसिद्ध केलें व १९२२ सालीं तें 'आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति' या शिर्षकाखालीं श्री. न. चिं. केळकर यांच्या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलें. या प्रकरणामुळें महाराजांच्याविरुद्ध तात्पुरतें कां होईना लोकमत कलुषित झालें. तें असें कीं, महाराज ब्राह्मणांचा म्हणजे टिळकांचा सूड उगविण्यासाठीं ब्रिटिश सरकारच्या हातीं कळसूत्री बाहुलें होऊन बसले आहेत. आपल्याशीं सहमत नसणाऱ्यांना नाना तऱ्हेनें खतम् करणें टिळकांना वावडें नव्हतें, याचें हें उदाहरण आहे. त्यांच्या स्वभावाची ठेवणच तशी होती. जे लोक टिळकांचें वर्चस्व स्वीकारीत त्यांच्याशीं टिळकांचें सूत जमे; अनुयायांवर करडी हुकमत गाजविणें त्यांना आवडे. पण बरोबरीच्या लोकांशीं सहकार्यानें वागणें त्यांना जुळत नसे ( Indian Politics Since the Mutiny, pp. 81-82 )

शाहु महाराज व टिळक यांच्यासंबधीं थोडीशी जास्त माहिती देण्याचें कारण हेंच कीं, महाराजांनीं बहुजनसमाजाच्या सर्वांगीण जागृतीचें जें कार्य हातीं घेतलें होतें, त्यांतहि टिळकांनीं काटे पसरण्याचें आपलें व्रत कसें चालविलें हें वाचकांच्या लक्षांत यावें. शिवाय विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं ब्राह्मणी विचारसरणीचें बीजारोपण केलें व त्या रोपांतून टिळकांनीं वृक्ष तयार केला याचा उलगडा जास्त व्हावा, हाहि दुसरा हेतु आहे. महाराज व मराठे यांच्याकडे व त्यांच्या चळवळीकडे पहाण्याचा दृष्टिकोन टिळकांचा असा होता. मग तो दृष्टिकोन अस्पृश्यसमाज व त्याची चळवळ, यासंबंधीं कसा असेल हेंहि आपोआप सिद्ध व्हावें, हा तिसरा हेतु.

कोल्हापुरांत अस्पृश्यांच्या प्रगतीसंबंधीं महाराजांनीं जी चळवळ चालविली तींत जे कांहीं सुशिक्षित तरुण भाग घेत होते त्यापैकीं श्री. दत्तोबा संतराम पवार हे एक होत. त्यांनीं डॉ. आंबेडकरांशीं १९१७ सालीं आपला परिचय करवून घेतला व तो पुढें वृद्धिंगत होत गेला. श्री. पवारांनीं राजर्षि शाहू महाराजांना आंबेडकरांसंबंधीं माहिती सांगितली. तेव्हां दरिद्री, हीन दीन व लाचार महार समाजांतून इतका थोर सुशिक्षित तरुण तयार झालेला ऐकून राजर्षि आनंदानें बेहोष झाले. त्यांनीं डॉक्टरांशीं ओळख व परिचय करून घेण्याची इच्छा दाखविली; परन्तु तो योग १९२० पर्यंत आला नाहीं. १९१९ सालीं महाराज मुंबईस आले तेव्हां डॉक्टरांच्या प्रेरणेनें मुंबईंतील कांहीं समाजसेवकांनीं महाराजांची भेट घ्यावी व अस्पृश्यांच्या चळवळीला पोषक असें एक वर्तमानपत्र चालविणें जरूर आहे व त्यासाठीं मदतीची आवश्यकता आहे, अशा प्रकारची सूचना महाराजापुढें विचारार्थ ठेवावी असें ठरलें. अस्पृश्य समाजसेवकांनीं महाराजांची भेट घेऊन आपली योजना त्यांच्यापुढें ठेवली. महाराजांना ती योजना पसंत पडली व लगेच वर्तमानपत्र काढण्यासाठीं अडीच हजारांचा चेक दिला. या पैशांतून 'मूकनायक' या नांवाचें पाक्षिक चालविण्याचें ठरविण्यांत आलें. या पाक्षिकाचे संपादक श्री. पांडुरंग नंदराम भटकर या नांवाचे वऱ्हाडमधील अंडर ग्रॅज्युएट तरुण महार गृहस्थ होते. पाक्षिक मनोरंजन छापखान्यांत छापलें जाई. श्री. भटकर हे डॉ. आंबेडकरांच्या सल्लामसलतीनें पाक्षिक चालवीत असत. पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२०ला निघाला. त्याच्या पहिल्या तेरा अंकांतील अग्रलेख डॉ. आंबेडकरांनीं लिहिलेले होते. इंग्रजींत विचार करण्याची आणि लिहिण्याची त्यांनीं स्वतःला संवय लावून घेतलेली होती. त्या संवयीप्रमाणें ते 'मूकनायका'साठीं जो मजकूर लिहित तो प्रथम इंग्रजींत लिहीत व नंतर त्याचा तर्जुमा ते स्वतःच मराठींत करीत.

# प्र क र ण १७ वें

## सिंहावलोकन-पुढें (चालू)

## अस्पृश्यांचे राजकीय हक्क

१८५७ च्या संग्रामानंतर सरकारनें मुसलमानांना दहशतीनें वागविण्याचें धोरण स्वीकारलें. शिक्षण व नोकऱ्या देण्याच्या बाबतींत सरकारनें १८८५ पर्यंत मुसलमानांना सवतीच्या मुलांप्रमाणें वागविलें. परन्तु १८८५ पासून हिंदू लोक कॉंग्रेस-तर्फे राजकीय हक्क मागूं लागलेले पाहून सरकार हिंदूंकडे त्वेषानें व द्वेषानें पाहूं लागलें. सय्यद अहमद खान यांच्या शिक्षणप्रसाराच्या चळवळीमुळें मुसलमान सुशिक्षित होऊं लागले, तेव्हां हिंदूंना नामोहरम करण्यासाठीं सरकारनें मुसलमानांना शिक्षणांत व नोकऱ्यांत उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारलें. मुसलमानांनीं कॉंग्रेसच्या चळवळीपासून दूर रहावें, असें सरकारला वाटत होतें. म्हणून त्यानीं सय्यद अहमद खानाच्या मुसलमान जागृतीच्या चळवळीला उचलून धरिलें. मुसलमानांनीं हिंदूं-पासून दूर रहावें म्हणजेच कॉंग्रेसच्या चळवळीला पाठिंबा देऊं नये, अशी चळवळ सय्यदनें मुसलमानांमध्यें १८८८ सालांत सुरू केली. हिंदु व मुसलमान यांची राजकीय दृष्टीनें कायमची फारकत केली तर सरकारला हे दोन्ही पक्ष परस्परांविरुद्ध झुंजविता येतील व अशा रीतीनें हिंदी लोकांची राजकीय चळवळ दुबळी करता येईल, हें धोरण स्वीकारुन सरकारी बडे बडे अधिकारी हें कसें घडवून आणावें, याबद्दल विचारविनियम करूं लागले.

बंगालमधील बुद्धिजीवि हिंदूंमध्यें राष्ट्रीय चळवळीचें वारें पसरलेलें होतें. हिंदू लोकांत जी ही राष्ट्रीय भावना पसरलेली होती, तिचा नायनाट करण्यासाठीं हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं मुसलमानांना उघडपणें सरकारी मदत करण्याचें धोरण सुरू केलें. हें धोरण परिणामीं इतक्या विकोपाला गेलें कीं, कोर्टांत हिंदुमुसलमानांचे खटले आले तर त्यांत मुसलमानांच्या जबान्या स्वीकारल्या जात आणि हिंदूंच्या नाकारल्या जात. मुसलमानांनीं हिंदू विधवांशीं जबरीनें लावलेले निके कायदेशीर ठरविण्यांत येत. बॉम-फिल्ड हे पूर्व बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर असतांना

ते मुसलमानांना उघडपणें सहाय्य करीत असत. सरकारच्या या धोरणामुळें बंगाल्यांतील मुसलमान, हिंदूंवर आक्रमण करण्यास शिकले. (Indian Politics since Mutiny, pp. 55-57)

मुसलमानांच्या आक्रमणाला व सरकारच्या प्रतिकूल धोरणाला लगाम घालण्यासाठीं बंगाली हिंदू एक होऊं लागले. त्यांची ही चळवळ ठार करण्यासाठीं आणि हिंदूंवर मुसलमानांचें वर्चस्व स्थापण्यासाठीं लॉर्ड कर्झननें बंगालचे दोन तुकडे (पूर्व व पश्चिम) करण्याचें ठरविलें, त्याप्रमाणें त्यानें बंगालची फाळणी २० जुलै १९०४ रोजीं जाहीर केली. या फाळणीला विरोध करण्यासाठीं कांहीं मुसलमान हिंदूंच्या बाजूनें पुढें आले, पण त्यांना इतर मुसलमान पुढाऱ्यांनीं त्यापासून परावृत्त केलें. मुसलमानांचे राजकीय हक्क सरकारपुढें (हिंदूंच्या विरुद्ध) मांडणारे लोक एकत्र आणण्याचा बेत आर्चीबल्ड या नांवाच्या बड्या इंग्रज अधिकाऱ्यानें ठरविला. त्यानें नवाब मोहसिनुलमुल्क या श्रीमंत जमीनदाराला १० ऑगस्ट १९०६ ला पत्र पाठवून ही कल्पना सुचविली. (The Communal Triangle in India, pp. 61-62)

तुर्की साम्राज्याचा सुलतान हा इस्लामी धर्माचा खलिफा होता. १९ व्या शतकांत हें साम्राज्य मोडकळीस आलें. रशिया, जर्मनी, इंग्लंड व फ्रान्स या देशांनीं तुर्की सुलतानांना हातीं धरून आपलें राजकीय व आर्थिक प्राबल्य तुर्की साम्राज्यांत वाढविलें. या परिस्थितीविरुद्ध सुशिक्षित तुर्कांनीं संघटना करून तुर्की साम्राज्यांतून परकीयांची लुडबूड नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांनीं १९०८-९ सालांत सशस्त्र बंड करून तुर्की राजकीय सत्ता काबीज केली. १९१२-१८ या काळांतील बाल्कन युद्धें व पहिलें जागतिक युद्ध, यामुळें तुर्कांची व तुर्की साम्राज्याची विलक्षण हानी झाली. तेव्हां टर्कींत तरुण तुर्कांनीं युरोपियन देशांच्या साम्राज्यशाहीविरुद्ध बंडाळी सुरू केली. या चळवळीच्या वार्ता हिंदी मुसलमानांच्या कानांवर आल्या. त्यांच्यांत स्वहक्काची जाणीव उत्पन्न झाली. मुस्लीम लीगच्या चळवळी १९०६ ते १९०८ च्या काळांत फारशा झाल्या नाहींत, पण १९०८ सालांत व पुढील काळांत बॅ. महंमदअली जीना, मौलाना अबदुल कलम आझाद, मौलाना महमूद अली, मौलाना शौकत अली, वगैरे सुशिक्षित मुसलमान लीगला मिळाले, त्यांनीं लीगची चळवळ जातीय पायावरून कांहींशा राष्ट्रीय पायावर आणण्याचे प्रयत्न केले. हिंदूंनीं व मुसलमानांनीं एक व्हावें आणि इंग्रज सरकारला संघटितपणें तोंड द्यावें, असा १९१६ सालांत प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां लीगवाल्यांनीं कॉंग्रेसवाल्यापुढें अशी बाजू मांडली कीं मुसलमानांचें स्वतंत्र राजकीय अस्तित्व मान्य करा व मुसलमानांना प्रत्येक कायदेमंडळांत ठराविक प्रमाणांत जागा द्या, म्हणजे लीग कॉंग्रेसशीं सहकार्य करील. लीगची ही मागणी कॉंग्रेसनें मान्य केली. ती १९१६ च्या अधिवेशनांत 'लखनौ करार' या नांवानें मंजूर करण्यांत आली. हा करार करण्यांत टिळकांनीं

प्रामुख्यानें भाग घेतलेला होता. म. गांधी तटस्थ होते. पं. म. मो. मालवीयांनीं या कराराला जोराचा विरोध केला. ( लोकमान्य टिळक, पा. ५८ )

हिंदी लोकांना १८९१ पर्यंत राजकीय हक्क देण्यांत आले नव्हते; या सालीं पार्लमेंटनें जो कायदा मंजूर केला त्यांत हिंदी लोकांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे कायदे मंडळांत प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क देण्यांत आला. १९०९ सालांत जो राजकीय हक्कांचा दुसरा हप्ता हिंदी लोकांना देण्यांत आला तो मोर्लेमिंटो रिफॉर्म्स म्हणून प्रसिद्ध आहे. मुस्लीम लीगच्या चळवळीमुळें आणि सरकारच्या हिंदु लोकांच्या विरुद्ध असलेल्या मनोवृत्तीमुळें १९०९ च्या कायद्यांत जातीय पायावर राजकीय हक्क द्यावेत, असें कलम मंजूर करण्यांत आलें. मुसलमानांना व अँग्लो इंडियन लोकांना हे हक्क मिळाले. अस्पृश्यांबद्दल असा निर्णय मात्र १९०९ च्या कायद्यांत घेण्यांत आला नाहीं.

मुसलमानांतर्फे व्हॉइसरॉयकडे एक शिष्टमंडळ न्यावें ही कल्पना प्रमुख मुसलमानांना पटलीं, त्याप्रमाणें मुसलमानांचीं दोन शिष्टमंडळें व्हॉइसरॉय साहेबांना भेटली. पहिलें शिष्टमंडळ १ ऑगस्ट १९०६ रोजीं सकाळीं ११ वाजतां व्हॉइसरॉय लॉर्ड मिंटो, यांना दिल्लींत भेटलें. या मंडळांत ३५ प्रमुख मुसलमान होते. व त्याचें नेतृत्व हिज हायनेस आगासर सुलतान महमद शहा आगाखान यांच्याकडे होतें. युनिव्हर्सीटींत, स्थानिक स्वराज्यांत, सरकारी मुलकी खात्यांत व लष्करांत मुसलमानांचें अलग प्रतिनिधित्व ठरवून सरकारनें मुसलमानांचे हिंदुपासून संरक्षण करावें, आणि प्रांतिक गव्हर्नरांच्या कार्यकारी मंडळांत मुसलमानांचे प्रतिनिधीं लोकसंख्येच्या प्रमाणांत घ्यावेत, अशी शिष्टमंडळानें व्हॉइसरॉय साहेबांना विनंती केली. ( Pakistan, pp. 428-443 ) त्या विनंतीला उद्देशून लॉर्ड मिंटो यानीं जें उत्तर दिलें त्यांत त्यानीं असें आश्वासन दिले कीं, मी व ब्रिटिश सरकार मुसलमानांचे हितसंबंध सुरक्षित राखूं. ( "I can only say to you that the Mohamedan Community may rest assured that their political rights and interests as a Community will be safeguarded in any adiministrative organisation with which I am concerned and that you and the People of India may rely upon the British Raj to respect as it has been its pride to do, the religious beliefs and the national traditions of the myriads compassing the population of His Majesty's Indian Empire." Pakistan, p. 443 )

मुसलमानांचें दुसरें शिष्टमंडळ लॉर्ड मिंटो यांना सिमल्यांत ३० डिसेंबर १९०६ ला भेटलें. त्या वेळीं लॉर्ड मिंटो यांनीं मुसलमानांचे स्वतंत्र राजकीय हक्क मान्य करण्याचें वचन दिलें. मुसलमानांचे हितसंबंध सरकारतर्फे सुरक्षित राखण्या-

साठीं कायमची संस्था असावी, असें शिष्टमंडळांतील मुसलमानांना वाटल्यावरून त्याच लोकांनीं 'ऑल इंडिया मुस्लिम लीग' नांवाची संस्था स्थापन केली, व तसें आगाखानांनीं जाहीर केलें. लीगचे अध्यक्ष आगाखान झाले. कचेरीं अलीगडला ठेवली.

आपल्या हातांतील राजकीय सत्ता नष्ट झाली व आपणाला अवनत अवस्था प्राप्त झाली, या गोष्टींमुळें हिंदु समाजांतील वरिष्ठ जातींत व मुसलमान समाजांतील वरिष्ठ वर्गांत असंतोष धुमसत राहिला. आपलें गतवैभव पुनः मिळवावें म्हणून त्यांनीं १८५० सालांत सशस्त्र क्रांतीचा प्रयत्न केला, पण तो फसला. त्यानंतर इंग्रज राज्यकर्त्यांनीं हिंदी लोकांवर जरब बसविण्यासाठीं अनेक भल्या बुऱ्या उपायांचा व मार्गांचा अवलंब केला. त्यामुळें हिंदी समाजांत परकीय राज्यसत्तेबद्दल मनस्वी द्वेष उत्पन्न झाला. त्याचा परिस्फोट निरनिराळ्या बंडाळ्यांमध्यें दिसून आला. पुणें जिल्ह्यांत उमाजी नाईक ( रामोशी ) आणि वासुदेव बळवंत फडके यांचीं बंडें प्रामुख्यानें चमकलीं. त्यांतून फडक्यांचें बंड विशेषतः व्यवस्थित व विस्तीर्ण स्वरूपाचें होतें. १८५७ च्या बंडानंतरचें हें पहिलें बंड होय.

पनवेल व पेण [ जि. कुलाबा ] यांच्या दरम्यान असलेल्या शिरढोण गांवांत वासुदेवाचा जन्म १८४५ सालांत [ कार्तिक शुद्ध ५ शके १७६७ ] झाला. ते जातीनें चित्पावन ब्राह्मण, त्यांचें घराणें पेशवाईत सत्ताधारी होतें. [ फडके, पा. २५–२७ ] थोडें इंग्रजी शिक्षण झाल्यानंतर त्यांनीं जी. आय. पी. रल्वेच्या कचेरींत ऑडिट ऑफीसमध्यें नोकरी धरली. पगार दरमहा २० रुपये. [ फडके, पा. ४२–४३ ] ती नोकरी सोडून त्यांनीं ग्रँट मेडिकल कॉलेजांत दुसरी नोकरी धरली, [ फडके, पा. ४६ ] ती नोकरी सोडून त्यांनीं कॉमिसारिएट एक्झामिनरच्या कार्यालयांत तिसरी नोकरी धरली; पगार ३० रु; १८६५ सालीं त्यांची पुण्याला बदली झाली. तेथें ते मिलिटरी फायनान्स खात्यांत नोकरी करूं लागले. [ फडके, पा. ४७–४८ ] ऑफिसांतील अधिकाऱ्यांची उर्मट बोलणीं व आसपासचें सत्तांधपणाचें वातावरण पाहून वासुदेवाचे मनांत इंग्रजी सत्तेचें यंत्र उखडून टाकण्याचे विचार घोळूं लागले. त्यानें रामोशी, मांग, महार, मराठे वगैरे जातींतील लोक जमा करून १७ मार्च १८७९ रोजीं बंडाचा झेंडा उभारला. [ फडके, पा. १२६ ] पुणें जिल्ह्यांत बंडाचा वणवा पेटवून व इंग्रज अधिकाऱ्यांना हैराण करून त्यांनीं सर्व हिंदुस्थानांत आपल्याबद्दलचें कुतुहल, आदर व प्रेम निर्माण केलें. २३ जुलै १८७९ ला त्यांना गिरफदार करण्यांत आलें. [ फडके, २६९–७३ ] त्यांच्यावर जो खटला भरण्यांत आला त्यांत त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. [फडके, पा. ३४१] हा निकाल ३ नोव्हेंबर १८७९ ला लागला. त्यांना एडनला पाठविण्यांत आलें. व तेथेंच ते ता. १७ फेब्रुवारी १८८३ ला दिवंगत झाले. [ फडके, पा. ३४७ व ३६३ ]

फडक्यांनंतर २० वर्षें दहशतवादी चळवळ झाली नाहीं. हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं बंगालचा फाळणी करण्याची योजना जाहीर केली.

७ ऑगस्ट १९०५ हा दिवस राष्ट्रीय सुतक म्हणून पाळण्यांत आला. १९०५ च्या फेब्रुवारींत पदवीदान समारंभांत भाषण करतांना लॉर्ड कर्झन यांनीं हिंदी लोकांबद्दल तुच्छतापूर्वक उद्गार काढले. या सर्व कारणांमुळें फाळणीला विरोध करण्यासाठीं जी चळवळ सुरू झाली, त्या चळवळींतूनच दहशतवादाची गुप्त चळवळ उत्पन्न झालीं. या गुप्त चळवळीचे जे प्रवतक होते त्यांत योगी बाबू अरविंद घोष व त्यांचे बंधु वारींद्र कुमार हे प्रमुख होते. अरविंदबाबू संन्यस्त वृत्तीनें राहून गुप्त चळवळीचीं सुत्रें हलवीत त्यांनीं युरोपला दोनतीन तरुण बॉंब तयार करण्याची विद्या शिकण्यासाठीं पाठवले. ते तरुण परत आल्यावर बॉंबचे स्फोट बंगाल प्रांतात होऊं लागले. ( भाई परमानंद, पा. ४५-५७ )

मि. मिल्लर हे बंगालच गव्हर्नर व मि. किंग्ज फोर्ड हे एक मॅजेस्टेट असतांना वंगभंगाची चळवळ दडपून टाकण्यासाठीं त्यांनीं जें उग्र स्वरूप धारण केलें, त्यामुळें जनतेंत असंतोष व द्वेष पसरला आणि दहशतवाद्यांचें मस्तक भडकून गेलें. मि. किंग्ज फोर्ड यांना ठार करण्याचें दहशतवाद्यांनीं ठरविलें. ३० एप्रिल १९०८ ला खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकी यांनीं किंग्ज फोर्डच्या गाडीवर बॉंब फेंकला. त्यांना रंगसादृश्यामुळें ती गाडी किंग्ज फोर्डची वाटली; पण ती होती केनेडी कुटुंबाची. तींत बसलेल्या दोन स्त्रिया ठार झाल्या. २ मे १९०८ ला धर-, पकडीला सुरवात झाली. अरविंद घोष, बारींद्र कुमार घोष, सुधीर कुमार सरकार नरेंद्र गोस्वामी हे पकडले गेले. चाकीनें आत्महत्त्या केली. १७ वर्षांचा खुदीराम पकडला गेला. या बॉंब प्रकरणांत नरेंद्र गोस्वामी हा माफीचा साक्षीदार झाला. त्याला कडेकोट बंदोबस्तांत ठेवलें असतां सत्येंद्रनाथ बसू व कन्हैयालाल दत्त यांनीं आपणहि माफीचे साक्षीदार होतों असा बहाणा करून पोलिसांशीं संगनमत केलें व योग्य संधि मिळतांच त्यांनीं नरेंद्र गोस्वामीवर पिस्तुलाच्या गोळ्या झाडून त्याला अलीपूर तुरुंगाच्या इस्पितळांत १ सप्टेंबर १९०८ ला ठार केलें. २० नोव्हेंबर १९०८ ला सत्येंद्र व कन्हैयालाल दत्त यांना फांशी दिले. ते धैर्यानें फांसावर चढले. या दोघां तरुणांच्या तसबिरी बंगालमधील घरांतील देवघरांत पुजल्या जाऊं लागल्या. त्यांच्या अस्थी डब्यांत व ताईतांत घालून बंगाली लोक पुष्कळ वर्षे त्यांची पूजा करीत असत. " कन्हैया व सत्येंद्र यांच्या धैर्याच्या अनेक गोष्टी बंगालमध्यें प्रसिद्ध आहेत. कन्हैया तुरुंगांत असतांना फांशीची शिक्षा झाल्याचें ऐकूनहि त्याच्या तोंडावरील नेहमीच्या स्मितांत अगर प्रसन्नतेंत कधींच फरक पडला नाहीं. तो फांशी गेटवर असतांना प्रत्यक्ष फांशीं जावयाच्या चारच दिवस अगोदर बी. ए. च्या परीक्षेंत उच्च श्रेणींत उत्तीर्ण झाल्याचा निकाल लागला होता. हें वृत्त कळविण्यास तुरुंगांत त्याचे वडील बंधू आले. डोळ्यांतून अविरत अश्रुप्रवाह टाकीत, भरलेल्या हृदयानें त्यांनीं ती बातमी त्याला सांगितली. त्याबरोबर हंसून थट्टेच्या स्वरांत कन्हैया उद्गारला, 'माझ्याबरोबरच डिप्लोमाला फांशी द्यावें. मरणोत्तर त्याच्या तोंडावर मृत्यूची अवकळा नव्हती. ( भाई परमानंद पा. ९७-९८ ).

सरकारच्या दडपशाहींतून बंगाल्यांत दहशतवाद्यांचा उदय आला. तसा महाराष्ट्रांतहि झाला. चाफेकर बंधूंनीं पुण्यांतील कमिशनर रँड याला ठार केलें. या कटाची माहिती सरकारला नातू बंधूंनीं दिली. म्हणून वासुदेव रानडे यानें नातू बंधूंना ठार केलें. चाफेकर बंधू व रानडे यांना येरवड्याच्या तुरुंगांत फांशी दिलें. (सावरकर यांचें जीवन-चरित्र, पा. १२). फडके, चाफेकर, रानडे, इत्यादिकांनीं महाराष्ट्रांत दहशतवादाचें जें बीजारोपण केलें त्यांचा वृक्ष बॅ. सावरकर व त्यांचे बंधू आणि सहकारी यांनीं प्रथम महाराष्ट्रांत वाढविला. त्याच्या शाखा चारी खंडांत पसरविल्या. या क्रांतिकारक देशभक्तांनीं "अभिनव भारत" ही गुप्त संस्था स्थापन करून तिच्या शाखा सर्व जगभर पसरविल्या.

अभिनव भारत या संस्थेचे संस्थापक व प्रणेते स्वातंत्र्यवीर बॅ. विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म भगूर, जिल्हा नाशीक येथें ता. २८ मे १८८३ रोजीं झाला. नाशिकला शिकत असतां त्यांनीं "राष्ट्रभक्तसमूह" या नांवाची मुलांची संस्था काढली. या संस्थेची गुप्त बाजू "मित्र मेळा" या नांवानें प्रसिद्ध होती. विनायकराव हाडाचे क्रांतिकारक होते. सशस्त्र क्रांति करून हिंदुस्थानला इंग्रजांच्या दास्यांतून मुक्त करण्याची प्रेरणा त्यांना लहानपणींच उत्पन्न झाली. त्यांनीं मित्र मेळयाचें रूपांतर "अभिनय भारत" या संस्थेंत केलें. या संस्थेतर्फे ते, त्यांचे बंधू व मित्र हे गुप्त चळवळी करीत असत. १९०१ सालीं ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत असतां ते राष्ट्रीय चळवळींत उघडपणें भाग घेऊं लागले. आपल्या राजकीय मतांमुळें हिंदुस्थान सोडून लंडन व पॅरीस येथें जाऊन राहिलेले पंडित शामजी कृष्ण वर्मा हे एक गुजराथी क्रांतिकारक होते. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं गुप्त व क्रांतिकारक चळवळी कशा कराव्यात, याचा सांगोपांग अभ्यास करणारा एक हिंदुस्थानी तरुण त्यांना हवा होता. त्याच्या या बौद्धिक विद्याभ्यासासाठीं त्यानीं एक शिष्यवृत्ति ठेवलेली होती. ती शिष्यवृत्ति सावरकरांना मिळाली. ती 'शिवाजी शिष्य वृत्ति, घेऊन सावरकर लंडनला बॅरिस्टरीची पदवी घेण्यास पण प्रामुख्यानें क्रांति-शास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं गेले. (जून १९०६) लंडनकडे जाणाऱ्या पर्शिया बोटींतील हिंदी विद्यार्थ्यांना त्यानीं आपल्या अभिनव भारत संस्थेच्या गुप्त कार्यांची दीक्षा दिली इतके ते प्रभावी व्यक्तिमत्वाचे होते. लंडनमध्यें पंडित शामजी कृष्ण वर्मा यांनीं हिंदी विद्यार्थ्यांसाठीं 'भारत भुवन' (इंडिया हाउस) या नांवाची एक संस्था चालवली होती. सावरकर तेथें रहात असतांना त्यानीं १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे वार्षिकोत्सव, शिवजयंती, गुरु गोविंद सिंग जयंती इत्यादि कार्यक्रम करण्याचा धडाका चालविला. त्यांच्या गुप्त चळवळीचे धागे दोरे इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, अमेरिका, वगैरे देशांत पसरविले, त्यांच्या चळवळींत शेकडों सुशिक्षित लोक होते. कर्नल वायली हा सेक्रेटरी ऑफ

स्टेट फॉर इंडिया ऑफिसांतील एक मुख्य अधिकारी होते. त्याला या विद्यार्थ्यांच्या चळवळीचीं माहिती मिळाली. तो या मुलांना आपल्या जाळ्यांत घेण्यासाठीं महिन्यांतून एक दोनदां चहापार्टी देई. विद्यार्थी पार्टीला जात, पण त्याच्या प्रेरणेनें हिंदुस्थानांतील सूत्रें हालतात, हे ते जाणून होते. त्याला उडविण्याचें कार्य त्याच्या मित्राचाच मुलगा मदनलाल धिंग्रा (I. C. S. च्या परीक्षेचा विद्यार्थी) याला दिलें. मदनलालनें कर्नलसाहेबांना पार्टीच्या ठिकाणीं ठार मारलें. मदनलालला ब्रिस्टोलच्या तुरुंगांत १६ ऑगस्ट १९०९ ला फांशी दिलें. सावरकरांनीं लंडन, पॅरीस, वगैरे ठिकाणाहून महाराष्ट्रांत पिस्तुलें पाठविण्याची व्यवस्था केली. चतुर्भुज या नांवाच्या गृहस्थानें २० ब्राउनिंग पिस्तुलें १९०९ च्या मार्चमध्यें मुंबईंत पोहचतीं केलीं. नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांची बदली झाली तेव्हां पानसुपारी करण्याचा कार्यक्रम ठरला. नाशिकच्या विजयानंद थिएटरांत किर्लोस्कर नाट्य मंडळीचे शारदा नाटक होणार होतें. त्यांत बालगंधर्व शारदेचें काम करणार होते. जॅक्सन साहेबाला हें काम पहाण्याची व पानसुपारी ह्या वेळींच घेण्याची इच्छा झाली. नाटक ता. २३ डिसेंबर १९०९ च्या रात्रीं सुरू झालें. जॅक्सनच्या जुलुमी कारकिर्दीवर अभिनव भारताचे क्रांतिकारक गरम झालेले होते. जॅक्सन साहेबाला खतम् करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें.

विलायतेहून सावरकरांनीं डिक्शनऱ्यांत पिस्तुलें ठेवून सहा डिक्शनऱ्या नाशकाला पाठविल्या होत्या; त्यांतील एका पिस्तुलानें अनंत कान्हेरे या १८ वर्षांच्या तरुणानें विजयानंद थिएटरांत ता. २३ डिसेंबर १९०९ ला जॅक्सनला ठार केलें. कान्हेऱ्याला फांशीची शिक्षा झाली. अभिनव भारताच्या सभासदांनीं बंगालमधील अनुशीलन समिति, भारत स्वाधीन इत्यादि क्रांतिकारकांच्या संस्थांशीं १९०६ –१९०८ मध्यें आपले संबंध जोडले आणि बॉम्ब् व पिस्तुलें करण्याचे गुप्त कारखाने महाराष्ट्रांत उघडले. (अभिनव भारत पा. ४५-४९),

अभिनव भारताचे जर्मनींत व अमेरिकेंत सभासद होते. त्यांतील मुख्य लाला हरदयाळ हे प्रसिद्ध क्रांतिकारक होते. त्यांनीं जर्मनीशीं संधान बांधून हिंदुस्थानांत बरींच शस्त्रास्त्रें आणावयाचीं व इंग्रज पहिल्या युद्धांत गुंतले असतां हिंदी लोकांनीं शस्त्रांच्या सहाय्यानें हिंदुस्थानांत १८५७ ची पुनरावृत्ति करावयाची, अशी योजना आंखली. त्यांनीं आपापल्या क्रांतिकारक चळवळीचें जाळें अमेरिकेंत पसरलें. त्यांनीं १९१२ च्या मे महिन्यांत सॅनफ्रान्सिस्को येथें "गदर" या नांवाचें वर्तमानपत्र सुरू करून त्यांचे अंक हिंदुस्थानांत, युरोपमध्यें आणि विशेषतः हिंदी सैनिकांमध्यें गुप्तपणें पोंहचविण्याची व्यवस्था केली. हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्ता नष्ट करण्यासाठीं हिंदी लोकांनीं व सैनिकांनीं इंग्रजाविरुद्ध सशस्त्र बंड करावें, अशा अर्थाचे जलाल लेख 'गदर' पत्रांत असत. १८ ऑगस्ट १९१४ च्या अंकांत हरदयाळ यांनीं खालील अर्थाची जाहिरात प्रसिद्ध केली होती :

## ' पाहिजेत '

हिंदुस्थानांत जाऊन गदरची उठावणी करणारे शूर सैनिक— पगार–मृत्यु, बक्षीस– हौतात्म्या पेन्शनः स्वातंत्र्यः नोकरीचें क्षेत्र–हिंदुस्थान. (भाई परमानंद, पा. १८८).

बाबा गुरुदित सिंग यांनीं हॉंगकॉंग येथें गुरु नानक नॅव्हिगेशन कंपनी १९१३ सालीं स्थापली होती. तिचा उद्देश हिंदी लोकांना अमेरिकेंत वसाहतीला नेणें व त्यांतूनच सशस्त्र बंडाचें कार्य उभारणें, हा होता. ' कोमागाटा मारू ' या नांवाचें जपानी जहाज कंपनीनें विकत घेऊन त्यांतून हिंदी माणसांची ने आण करण्याचें कार्य सुरूं केलें. पण इंग्रज सरकारला या कंपनीच्या कार्याचा संशय आला. बाबा गुरुदित सिंगाला २५ मार्च १९१४ला अटक झाली. पण कोमागाटा मारू जहाज बंगल्याच्या उपसागरांत शिरलें. त्यांतील हिंदी प्रवाशांनीं इंग्रजी जहाजाबरोबर दोन हात करून इंग्रजी अधिकाऱ्यांच्या तोंडचें पाणी पळविलें. शेवटीं जहाज पकडलें गेलें. प्रवासी कैदी झाले.

हरदयाळ, चंपकरमण पिल्ले, अब्दुल सय्यद, चट्टोपाध्याय (सरोजिनी नायडूंचे बंधु ), रास बिहारी बोस व सावरकर यांनीं युरोपांतील विशेषतः जर्मनी व तुर्कस्थान या देशांतून हिंदी स्वातंत्र्याच्या सशस्त्र बंडाला सहानुभूति व प्रत्यक्ष साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं.

सावरकर स्वतः पकडले गेले व त्यांना ५० वर्षांचें "काळे पाणी" अशी शिक्षा झाली. त्यानंतर अभिनव भारताची चळवळ महाराष्ट्रांत थंडावली. ती इतर प्रांतांत चालू होती.

अभिनव भारताच्या क्रांतिकारक चळवळीचा इतिहास डॉ. विष्णु महादेव भट यांनीं लिहिलेल्या 'अभिनव भारत अथवा–सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था' या पुस्तकांत दिलेला आहे. हे लेखक अभिनव भारताचे एक प्रमुख कार्यकर्ते होते.

या संस्थेंत जे पूर्वी होते त्यापैकीं कांहीं पुढें नांवारूपास आले. त्यांपैकीं सेनापती बापट हे भारतमंत्री मोर्ले यांच्यावर १९०७ सालीं पिस्तुल झाडण्यास तयार झाले होते आणि पार्लमेंटवर बॉम्ब टाकून पार्लमेंट उध्वस्त करण्यासहि १९०८ सालीं तयार झाले होते, पण सावरकरानीं त्यांना थांबविले. (सावरकर यांचें जीवन चरित्र, पान २००). आचार्य कृपलानी, आचार्य काका कालेलकर, बाळासाहेब खेर, पंजाबचे सर शिकंदर हयातखान, राजरत्न माणिकराव, कुंदनमल फिरोदिया, इत्यादि सार्वजनिक कार्यकर्ते या संस्थेचे सभासद होते.

परकीयांची हिंदुस्तानांतील सत्ता नष्ट करण्यासाठीं हजारों तरुण फांसावर चढले, काळ्या पाण्यावर गेले व तुरुंगांत झिजून झिजून मेले. त्यांचा याबद्दल गौरव करावा तेवढा थोडाच आहे. या दहशतवाद्यांची येथें हकीकत देण्याचें कारण हें कीं,

हे सर्व देशभक्त सुशिक्षित पुढारलेल्या वर्गांतील होते. त्यांना राजकीय गुलामगिरीच्या शृंखला जाणवत होत्या. त्या तोडण्यासाठीं त्यांनीं प्राणार्पण केलें. त्यांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्याही शृंखला जांचत होत्या; पण त्याबद्दल त्यांना फारसा उद्वेग व खंत वाटली नाहीं. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीविरुद्ध सशस्त्र बंडाळी करण्याची प्रेरणा येण्याइतकी त्यांना ही गुलामगिरी जांचत नव्हती. बॉम्बनें देवळें उडवून देण्याची व पिस्तुलांनीं जीर्णमतवाद्यांना ठार करण्याची दृष्टि त्यांना कधींच आली नाहीं. किंवा तशी जरूरी भासली नाहीं.

ज्या अशिक्षित व मागासलेल्या लोकांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरी पदोपदीं जाणवत होती त्यांतील तरुणांनीं अनेक वेळां बंड उभारलीं; पण तीं बंडें सशस्त्र नव्हतीं. या गुलामगिरीचे पोषक व त्राते यांच्यावर त्यांनीं कधीं बाँब टाकले नाहींत, किंवा पिस्तुलांच्या गोळ्या झाडल्या नाहींत. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या खाईंत अस्पृश्य लोक हजारों वर्षें होरपळून गेले, परंतु त्यांनीहि हिंदुसमाजांतील जीर्णमताभिमानी लोकांवर पिस्तुलांच्या गोळ्या कधीं झाडल्या नाहींत व हिंदु देवळें बाँबनीं उध्वस्त केलीं नाहींत. स्वातंत्र्यासाठीं झगडणारे हिंदुसमाजांतील तरुण व सामाजिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठीं झगडणारे पददलित वर्गांतील तरुण, यांच्यांतील हा दृष्टिकोन विशेष महत्त्वाचा आहे.

अस्पृश्यांना राजकीय हक्क १९१९ सालापर्यंत मिळालेले नव्हते. हिंदुलोकांच्या राजकीय आकांक्षांना पायबंद घालण्यासाठीं सरकारनें मुसलमानांना जातीय प्रतिनिधित्व देण्याचें तत्त्व १९०९ च्या राजकीय सुधारणांत स्वीकारलें तेंच तत्त्व १९१९ च्या राजकीय सुधारणांत अस्पृश्यांना लागू करण्यांत आलं. स्पृश्य लोक अस्पृश्य लोकांचा उपयोग आपल्या राजकीय चळवळींसाठीं करीत होते हें सरकारला कळून आलें. तेव्हां सरकारनें अस्पृश्यांना राजकीय हक्क देण्याचें धोरण स्वीकारलें. हें धोरण स्वीकारण्याला ब्रिटिश सरकारला जीं कारणें दिसलीं त्यांपैकीं हें एक कारण होतें कीं, मुसलमान लोक कदाचित् अस्पृश्यांना जवळ करून ते हिंदूंविरुद्ध अस्पृश्यांचा उपयोग करतील, व कांहीं दिवसांनी अस्पृश्यांच्या साहाय्यानें हिंदी राजकारणांत शिरजोर होतील. सरकारला ही भीति वाटण्याला त्यावेळीं तशीच एक जबरदस्त घटना घडून आली. १९०९ सालांत मुसलमानांनीं सरकारला अशी विनंति केली कीं, सरकारनें अस्पृश्यांना हिंदु म्हणून शिरगणतींत नोंदू नये. ( Pakistan, p. 235 )

हिंदी लोकांना जादा राजकीय हक्क देण्याचें जाहीर केलें तर हिंदी लोक आपल्या महायुद्धाला अंतःकरणपूर्वक सहाय्य करतील, हें चाणाक्ष ब्रिटिश मुत्सद्यांनीं हेरलें होतें. म्हणून हिंदी लोकांना १९०९ सालांत जे राजकीय हक्क दिले त्यापेक्षां जादा हक्क ब्रिटिश सरकार देणार आहे, अशी घोषणा करण्याचें ब्रिटिश

प्रधानमंडळानें ठरविलें. त्याप्रमाणें ही घोषणा ता. २० ऑगस्ट १९१७ रोजीं पार्लमेंटमध्यें भारतमंत्री मॉंटेग्यू यांच्या तोंडून केली गेली. हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीचें प्रत्यक्ष अवलोकन करावें व मग हिंदी लोकांना कोणते राजकीय हक्क द्यावेत हें ठरवावें म्हणून भारतमंत्री मॉंटेग्यू हे हिंदुस्थानाच्या दौऱ्यावर आले. हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्यासमवेत ते हिंदुस्थानांत फिरले. मॉंटेग्यू दौरा संपवून परत गेल्यानंतर पार्लमेंटनें लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखालीं मतदान ( फ्रँचाइज ) कमिटी हिंदुस्थानांत पाठविली. ही साऊथबरो कमिटी जेव्हां हिंदुस्थानांतील प्रमुख भागांत फिरून हिंदी लोकांच्या प्रतिनिधींच्या साक्षी गोळा करूं लागली तेव्हां तिला असें दिसून आलें कीं, सामाजिक व धार्मिक बाबतींत सनातनी वृत्ति दाखविणारे पण राजकीय बाबतींत क्रांतिकारक दृष्टि ठेवणारे राजकीय पुढारी हिंदी लोकांना होमरूल ( स्वराज्य) हवें असें प्रतिपादूं लागले. पण अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व न देतां त्यांचें हितसंरक्षण उच्च वर्णीय हिंदु प्रतिनिधींच्या हातीं सोंपवा, अशीहीं मतें ते प्रतिपादूं लागले. या मतांचा सूर शिंदे व चंदावरकर धरूं लागले. ही परिस्थिति पाहून आंबेडकरांना मनस्वी चीड आली. हे हिंदु लोक स्वतःच्या घरांतील घाण साफ करून टाकायला अजून तयार नाहींत तर त्यांनीं स्वराज्य कां मागावें अशा अर्थाचें पत्र त्यांनीं टाईम्सला लिहिलें तें पत्र १६ जानेवारी १९१९ च्या अंकांत A Mahar on Home Rule, या नांवानें प्रसिद्ध झालें होतें. तें पत्र A Mahar [ एक महार ] या टोपणनांवानें लिहिलें होतें.

साऊथबरो कमिटी मुंबई प्रांतांत आली तेव्हां अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी कमिटीपुढें मांडण्यासाठीं विठ्ठल रामजी शिंदे आणि भीमराव रामजी आंबेडकर यांना सरकारनें निवडलें. शिंदे हे डी. सी. मिशनचे जनरल सेक्रेटरी होते. १९०४ ते १९१८ पर्यंत त्यांच्या कामाचा बोलबाला चोहोंकडे झालेला होता. शिवाय नारायणराव चंदावरकर हे सरकारच्या विश्वासांतील बडे गृहस्थ शिंद्यांच्या मिशनचे अध्यक्ष होते. तेव्हां शिंद्यांनीं साऊथबरो कमिटीपुढें अस्पृशांच्या राजकीय हितासंबंधीं कैफियत मांडावी म्हणून सरकारकडून त्यांना आमंत्रण येणें अटळ होतें. आंबेडकर त्यावेळीं सिडनहॅम् कॉलेजांत प्रोफेसर होते. खुद्द अस्पृश्य वर्गांतील एखाद्या व्यक्तीनें कमिटीपुढें कैफियत सादर करावी, असें सरकार, चंदावरकर व शिंदे यांना वाटलें नाहीं. हें वैगुण्य आंबेडकरांच्या लक्षांत आलें. ते सरकारी नोकरींत होते तरी गव्हर्नर साहेबांशीं पत्रव्यवहार करून त्यांनीं साऊथबरो कमिटीपुढें साक्ष देण्यासाठीं आपली निवड करून घेतली. शिंदे व आंबेडकर यांनीं आपापल्या कैफियती भिन्न दृष्टीकोनांतून मांडल्या.

अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणुकीस उभें राहतां यावें, त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत, अस्पृश्यांचे अस्पृश्य प्रतिनिधी

अस्पृश्य मतदारांनींच निवडले पाहिजेत आणि अस्पृश्यांच्या मतदारसंघांत अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा द्याव्यात, अशी आंबेडकर यांनीं अस्पृश्यांतर्फे साऊथबरो कमिटीपुढें साक्ष दिली. या बाबतींत त्यांनीं आपली लेखी कैफियत सादर केली. त्यानीं त्या कैफियतींत साधार माहिती देऊन अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची बाजू उत्तम रीतीनें मांडली. वरील प्रकारचे राजकीय हक्क उपभोगण्यास जी लायकी पाहिजे ती सरकारनें अस्पृश्यांची हीन व दीन अवस्था लक्षांत घेऊन ठरवावी, असेंहि आंबेडकरांनीं सुचविलें. आंबेडकरांनीं आपली कैफियत वर्तमानपत्राकडे पाठविली. पण वर्तमानपत्रांनीं तिची दखल घेतली नाहीं. अस्पृश्य वर्गांतील लोकांनीं आपल्या राजकीय हक्कांसाठीं जाहीर सभा घ्याव्यात, असें आंबेडकरांनीं मुंबईंतील समाजसेवकांना सुचविलें. परंतु ह्यावेळीं बहुतेक समाजसेवक शिंदे व सर नारायणराव चंदावरकर यांच्या सल्लामसलतीनें चळवळ करांत असत. भारतमंत्री मॅंटेग्यू हे हिंदुस्थानांत दौऱ्यावर आले तेव्हां त्याच्यापुढें अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी मांडण्यासाठीं चंदावरकर यांच्या प्रेरणेनें कांहीं अस्पृश्य समाजसेवकांनीं एक शिष्टमंडळ नेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तें शिष्टमंडळ चंदावरकर यांच्याच नेतृत्वाखालीं मॅंटेग्यू साहेब मुंबईत आले तेव्हां त्यांना भेटलें. ही बाब लक्षांत घेतली म्हणजे आंबेडकरांच्या सूचनेप्रमाणें अस्पृश्यांनीं राजकीय हक्कांसाठीं जाहीर सभा स्वतंत्रपणें कां भरविल्या नाहींत, हें स्पष्ट होईल. शिंद्यांनीं आपल्या कैफियतीला लोकमत मिळावें म्हणून चळवळ केली. मि. ए. आर. बॅनर्जी, I. C. S. यांच्या अध्यक्षतेखालीं अस्पृश्यांची एक जाहीर सभा बंगलोरमध्यें भरविण्यांत आली, तिचा वृत्तांत 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या ता. २ डिसेंबर १९१८ च्या अंकांत (पा. १०) प्रसिद्ध झाला. सभेंत शिंदे यांचें अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबद्दल भाषण झालें. राष्ट्रीय हिताला बाधक अशी अस्पृश्यांसाठीं राजकीय हक्कांची मागणी आपण करणार नाहीं; परंतु अस्पृश्यांची सध्यांची स्थिति जोंपर्यंत तशीच राहील तोंपर्यंत जातीय पायावर राजकीय हक्क दिले पाहिजेत आणि हे हक्क मिळवून देण्यासाठीं आपण प्रयत्न करीत राहूं असे विचार शिंद्यांनीं आपल्या भाषणांत प्रदर्शित केले. आपल्या कैफियतीला जनमताचा पाठिंबा मिळविण्यासाठीं शिंद्यांनीं दौरा काढला.

कायदेमंडळें, म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्ड यांत अस्पृश्यांचे प्रतिनिधी असले पाहिजेत, मुंबई कायदेमंडळांत अस्पृश्यांसाठीं किमानपक्षी पांच जागा (महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, मुंबई शहर व सिंध यांना प्रत्येकीं एक) असाव्यात आणि जे अस्पृश्य सरकार-मंजूर प्राथमिक शाळांतून चौथी इयत्ता पास झालेले असतील आणि ज्यांचें वार्षिक उत्पन्न १४४ रु. असेल, अशांना मतदानाचा हक्क असावा, असा शिंद्यांच्या कैफियतीचा सारांश होता. शिंद्यांच्या कैफियतीबद्दल 'टाइम्स' पत्रानें आपल्या २६ जानेवारी १९१९ च्या अंकांत 'Current Topics' या सदरांत एक स्फुट लिहिलें होतें. तें येणेंप्रमाणें:

## " The Depressed Classes

" In a statement presented to Franchise Committee, Mr. V. R. Shinde of the Depressed Classes Mission, proposes an extension of the Franchise to all those whose annual income is over Rs. 300 and who have read up to the Vernacular School Final Examination. In the case of the members of the Depressed Classes, he would have the franchise further lowered still. For the Depressed Classes, property qualification should be an annual income of Rs. 144, and the literary qualification the passing of the Fourth Vernacular Standard in any Primary School recognised by Government. And in order that the stigma of untouchability which in popular imagination, at present lies upon them, should be completely washed out as soon as possible, he urges that representatives of these classes should be admitted to Legislative Councils and Local Bodies for the purpose of voicing the feelings and safeguarding the interests of their classes. Mr. Shinde would have at least five seats reserved for Depressed Classes, one each for Karnatak, Maharastra, Gujrat, Sind and Bombay City, supposing the Council is to consist of 150 members. The representatives of the Depressed Classes should be elected by those classes only to be specially formed on the franchise above mentioned. "

शिंद्यांनीं दिलेल्या साक्षीचा कमिटीनें जर स्वीकार केला तर अस्पृश्य समाज आपल्या राजकीय हक्कांना मुकेल, कारण मतदानासाठीं जी लायकी अस्पृश्यांसाठीं शिंद्यांनीं सुचविली होती ती अस्पृश्यांतील मूठभर लोकांमध्येंहि सांपडणार नाहीं. आणि ती सांपडलीच तर हे मूठभर लोक शिंद्यांच्या कच्छपीं राहून शिंद्यांना अगर त्यांच्या हस्तकांना निवडून देतील व अस्पृश्यांच्या खऱ्या प्रतिनिधींना निवडून येण्याचा संभव राहणार नाहीं, ही परिस्थिती ओळखून आंबेडकरांनीं शिंद्यांची कैफियत अस्पृश्यांच्या हितांना बाधक आहे असें जाहीर करण्याचें ठरविलें. अस्पृश्यांच्या राजकीय आकांक्षा काय आहेत याचा जाहीर खुलासा एखाद्या वजनदार गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं व्हावा म्हणून अस्पृश्यांची एक परिषद छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखालीं घेण्याचें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें ही परिषद नागपूरला घेण्यांत आली. या परिषदेंत शिंद्यांच्या कैफियतीबद्दल अस्पृश्यांची नामंजुरी जाहीर करण्यांत आली. याबद्दलची हकिकत श्री. सी. ना.

शिवतरकर यांनीं 'जनते'च्या १९३३ च्या खास अंकांतील 'डॉ. आंबेडकरांच्या सहवासांतले कांहीं संस्मरणीय प्रसंग' या लेखांत निवेदन केलेली आहे. ते लिहितात. "...सन १९२० सालच्या ता. ३०–३१ मे व जून रोजीं नागपूर येथें पहिली अखिल भारतीय बहिष्कृत परिषद कै. शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या परिषदेस डॉ. आंबेडकरसाहेबांच्या बरोबर मेसर्स शि. जा. कांबळे, कदम, कै. गो. गो. कांबळे, ऐदाळे, भोवले वगैरे बरीच मंडळी महाराष्ट्रांतून प्रतिनिधी म्हणून गेली होती. मीहि त्यावेळीं हजर होतों.

"परिषदेंत डी. सी. मिशन संस्थेच्या व तिच्या चालकांच्या निषेधाचा ठराव येणार आहे अशी गुणगुण अण्णासाहेब शिंदे यांना आगाऊच लागली होती. म्हणून त्यांनीं श्री. गवई यांजकडे मुद्दाम मनुष्य पाठवून कळविलें होतें कीं, मी तुमच्या वऱ्हाड प्रांतांतील ५० मुलें माझ्या बोर्डिंगमध्यें घेतों, पण तुम्ही डॉ. आंबेडकर व शिवतरकर जो आमच्या संस्थेच्या निषेधाचा ठराव आणणार आहेत तो हाणून पाडा. त्यावर श्री. गवई व बेळगांवचे श्री. पापण्णा यांनीं आपल्या बाजूनें कडेकोट तयारी केली होती. आम्ही नागपूरास जातांना डी. सी. मिशनच्या चालकांनीं अस्पृश्यांच्या हिताविरुद्ध जें स्टेटमेंट सरकारकडे पाठविलें होतें त्याचा उतारा ज्या 'टाइम्स' पत्राच्या अंकांत आला होता, त्याची एक कॉपी, तो अंक दोन वर्षांपूर्वीचा असल्याकारणानें दोन रुपये खर्चून विकत घेतली होती. परिषदेचें पहिल्या दिवसाचें काम संपल्यावर रात्रौ विषयनियामक कमिटीची बैठक बसली. त्यावेळीं श्री. गवई यांनीं डॉ. आंबेडकरांनीं विषयनियामक कमिटीचें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना आणली. तिला अनुमोदन मिळण्यापूर्वींच मी अशी उपसूचना मांडली कीं, या विषयनियामक कमिटीचें अध्यक्षस्थान, आपल्यांतील बेळगांवचे रावसाहेब पापण्णा हे वयानें व अनुभवानें ज्येष्ठ आहेत, तसेंच ते सरकारमान्यही आहेत, करितां त्यांनीं स्वीकारावें. या सूचनेस श्री. भटकर यांनीं लागलींच अनुमोदन दिल्यावर तीं सर्वानुमतें पास झाली. व पापण्णा साहेब मोठ्या आनंदानें स्थानापन्न झाले. त्यानंतर कांहीं ठराव पास झाल्यावर डॉ. आंबेडकरसाहेब अध्यक्षांच्या परवानगीनें म्हणाले कीं, आपण येथें जमलेले सर्व प्रतिनिधी बहिष्कृत वर्गाची उन्नति होईल या दृष्टीनें विचार करण्याच्या हेतूनें जमलों आहों. म्हणून आपल्या लोकांच्या उन्नतीच्या आड येणारी व्यक्ति–मग ती बहिष्कृत वर्गांतील असो किंवा उच्च वर्णीय हिंदूंतील असो, तसेंच एकादी संस्था असो,–पण ती आपल्या हिताच्या विरुद्ध एखादें कृत्य करीत असेल किंवा तसें कृत्य तिनें मागें केलें असेल तर त्या गोष्टीचा आपण निषेध करावा कीं नाहीं? तेव्हां सगळे प्रतिनिधी एक आवाजानें म्हणाले कीं, अलबत ! आमच्या प्रगतीच्या आड येणारी कोणतीही व्यक्ति असो किंवा संस्था असो, तिचा आपण तीव्र निषेध केलाच पाहिजे. ही गोष्ट तुम्हां सर्वांना मान्य आहे काय, असे डॉ. आंबेडकरसाहेबांनीं तीनतीनदां बजावून विचारलें.

तेथें खान मुसलमानांच्या सभा घेत व त्यांना राजकीय परिस्थितीची जाणीव करून देत. कमिटी मद्रासला गेली तेव्हां खाननीं 'मुसल्मानांचें राजकारण' या विषयावर लॉली हॉलमध्यें १९ जानेवारी १९१९ ला मुसलमानांपुढें व्याख्यान देऊन मुसलमानांनीं राजकीय हक्क संपादन करण्याकरितां काय करावें, याबद्दल विचार प्रगट केले. (टॉईम्स ऑफ इंडिया १९-१-१९१९)

खान हे मुसलमानांच्या राजकीय हक्कासाठीं डोळयांत तेल घालून कार्य करीत होते; आणि त्यांच्या प्रेरणेमुळें कमिटीनें लखनौ कराराला मान्यता दिली आणि मुसलमानांचें स्वतंत्र राजकीय अस्तित्व मान्य केलें, असें मत सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं 'A Nation in Making' (p. 317) या आपल्या ग्रंथांत प्रदर्शित केलेलें आहे. कमिटीवर जे दोन हिंदु सभासद होते त्यांनीं आणि खान यांनीं अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबद्दल आस्था दाखविली नाहीं, म्हणून कमिटीनें अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबद्दल विशेष चर्चा केली नाहीं व उदारबुद्धि दाखविली नाहीं.

कमिटीचा दौरा मुंबई इलाख्यांत सुरू झाला तेव्हां मागासलेल्या वर्गांतील लोकांनींहि आपापल्याला जातींना स्वतंत्र राजकीय हक्क हवेत अशी कमिटीला व सरकारला विनंति केली. रामोशी जातीतर्फेहि अशी विनंति करण्यांत आली होती. (Times of India, 21-1-1919.)

मुसलमानांना स्वतंत्र राजकीय हक्क द्यावेत व त्यांना लखनौ कराराप्रमाणें जागा द्याव्यात, असें मुंबई सरकारनें आपलें मत कमिटीला कळविलें. अस्पृश्य लोक हे हीन, दीन, अडाणी आणि मागासलेले आहेत, म्हणून त्यांना मुसलमानांप्रमाणें जातीय प्रतिनिधित्व देऊं नये; फार झालें तर सरकारतर्फे अस्पृश्यांचा प्रतिनिधि कायदेमंडळांत नेमण्यांत यावा असेंहि मुंबई सरकारनें मत प्रदर्शित केलें.

("Communal representation may be allowed to the Musalmans. The question is what representation should be conceded Should it be based on population or on the Congress League Scheme? In this scheme the latter alternative has been adopted.

"6. In respect of other Communities including what are termed the 'Depressed Classes' no form of special representation is advocated...... As to the 'Depressed Classes,' there is also the same difficulty of definition. Further it would be very difficult, if not impossible, to devise electorates of sufficient intelligence or to secure properly qualified candidates. It is better in such cases to have recourse to nomination. (Southbourough Committee's Report, pp. 135-135)

...ग्रंथ संग्रहालय, डॉ... ...
...वि: ...

हिंदुस्थान सरकारनें ता. २३ एप्रिल १९१९ रोजीं भारतमंत्र्याला पत्र पाठवून (Letter No 40/1919, Government of India, Home Department, to the Right Honourable Edwin Montague, His Majesty's Secretary of State for India) असें कळविलें कीं साऊथबरो कमिटीनें लखनौ कराराला पाठिंबा दिलेला आहे. लखनौ कराराप्रमाणें मुसलमानांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणा-पेक्षां जास्त जागा प्रत्येक प्रांतांत मिळतील, हें उघड आहे. पण कमिटी अस्पृश्यांना सर्व हिंदुस्थानांत ७९१ जागांपैकीं ७ जागा (मद्रास २, मुंबई १, संयुक्त प्रांत १, बिहार व ओरिसा १, मध्यप्रांत १ आणि पंजाब व आसाम कांहीं नाहीं). देण्याची शिफारस करीत आहे, हें योग्य नाहीं. म्हणून अस्पृश्यांसाठीं ७९१ पैकीं २२ जागा (मद्रास ६, बंगाल ४, संयुक्त प्रांत ४, बिहार व ओरिसा ४, मुंबई २, मध्यप्रांत २,) देण्यांत याव्यात. अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबद्दल हिंदुस्थान सरकारनें बरेंच उदार धोरण स्वीकारलेलें होतें, हें यावरून दिसून येतें. या बाबतींत खालील उल्लेख जास्त प्रकाश पाडतो:

"But there is one Community whose case it appears to us requires more consideration than the Committee gave it. The Report on Indian Constitutional Reforms clearly recognise the problem of the Depressed Classes and gave a pledge respecting them.

"We intend to make the best arrangements that we can for their representation. The Castes discribed as "Hindus–others" in the Committee's Report, though they are defined varily in varying terms, are broadly speaking all the same kind of people except for differences in the rigidity of their exclusion. They are all more or less in the position of the Madras Panchmas, definitely outside that part of the Hindu Community which is allowed access to their temples. They amount to about one-fifth of the total population and have not been represented at all in the Morley–Minto Councils. The Committes Report mentions the depressed classes twice but only to explain that in the absence of satisfactory electorates they have been provided for by nomination. It does not discuss the position of the people or their capacity for looking after themselves. Nor does it explain the amount of nomination which it suggests tor them. Para 24 of the Report justifies the restriction of the nominated seats on grounds, which do not suggest that the Committee were referring to the Depressed Classes. The measure of representation which they propose for this Community is as follows:

त्यांनीं माझ्याजवळून ' टाइम्स ' पत्राचा अंक घेऊन त्यांत डी. सी. मिशन संस्थेनें सरकारला लिहून पाठविलेलें स्टेटमेंट वाचून दाखविलें. त्याचा परिणाम इतका झाला कीं, श्री. गवई व त्यांचे मदतगार लोक जागच्या जागीं थिजले ! नंतर पुढील ठराव परिषदेंत सर्वानुमतें पास करण्यांत आला. तो ठराव असाः ठराव ३ रा— बहिष्कृत वर्गाचे सुधारलेल्या कौन्सिलांत जे प्रतिनिधी घ्यावयाचे आहेत ते सरकारी नेमणुकीनें किंवा त्यांच्यांतील जातवार संस्थांतर्फे न घेतां बहिष्कृतेतरांतर्फे कौन्सिलांत निवडून गेलेल्या प्रतिनिधीमार्फत नेमण्यांत यावेत, अशी जी सूचना खास बहिष्कृत वर्गाच्या उन्नतिप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या डिस्प्रेस्ड क्लास मिशननें केली होती, तीमुळें सर्व अस्पृश्य वर्गाचें मन अस्वस्थ झालें आहे. कारण बहिष्कृतेतर वर्गाच्या प्रतिनिधींना बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधि नियोजित करण्याचा जर अधिकार दिला तर ज्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेंमुळें बहिष्कृत वर्गाचें नष्टचर्य ओढवलें आहे, ती चातुर्वर्ण्य व्यवस्था कायम करण्यास आमच्यांतील जे लोक कबूल होतील, अशाच लोकांना प्रतिनिधी नेमण्यांत येईल. त्याअर्थी या परिषदेचें असें ठाम मत आहे कीं, डिप्रेस्ड क्लास मिशननें [ भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीनें ] आपल्या आश्रितांचा असा उघडपणें द्रोह केल्यामुळें ती बहिष्कृत वर्गाच्या विश्वासास अपात्र झाली आहे.

"या ठरावावर पी. एन. भटकर, द्रविड, कदम वकील यांचीं भाषणें झाल्यावर गवई पुष्टी देतांना म्हणाले कीं, ' तुम्हांला [ जहाल मवाळांना ] जर नॉमिनेशन नको आहे तर आम्हालाच काय म्हणून असावें ? सरकारनें आमचे प्रतिनिधि नेमावेत असें जरी मिशननें मागितलें असतें तरी बरें झालें असतें. परंतु जहाल मवाळांनीं आमचे प्रतिनिधी नेमावेत अशी मागणी करणें म्हणजे आमचा द्रोह करणें नव्हे काय ? मिशननें जी आमच्या प्रतिनिधींची मागणी आम्हांला न विचारतां केलेली आहे ती अगदीं घातक आहे. यामुळें डिप्रेस्ड क्लास मिशनवरील आमचा विश्वास अजिबात उडाला आहे.' या प्रसंगानें डॉ. आंबेडकर यांनीं आपल्या विरुद्ध पक्षालाही आपल्या बाजूस कसें वळवून घेतलें व अस्पृश्यांच्या हितशत्रूंचे दांत त्यांच्या घशांत कसे कोंबले हें दिसून येईल."

साऊथबरो कमिटी मुंबईस आली तेव्हां विठ्ठलभाई पटेल ( हे त्यावेळीं मध्यवर्ति कायदे मंडळाचे सभासद होते आणि हिंदूंतील मिश्र-विवाह कायदेशीर समजावेत असें बिल मांडून ते विलक्षणपणें प्रसिद्धीस आले होते. ) यानीं कमिटीपुढें साक्ष दिली. अस्पृश्यांच्या हिताबद्दल त्यानीं असें स्पष्ट मत दिलें कीं, त्यांना स्वतंत्र मतदार संघ द्यावेत. [ टाइम्स ऑफ इंडिया, २९-८-१९१८ ]

या कमिटीपुढें अनेक हिंदु पुढाऱ्यांच्या साक्षी झाल्या, पण त्यांनीं अस्पृश्यांच्या राजकीय हक्कसंरक्षणाबद्दल दक्षता दाखविली नाहीं. साहेब जादा अफ्ताव अहमदखान हे मुसलमानांचे प्रतिनिधि आणि सुरेंद्रनाथ बानर्जी व श्रीनिवासशास्त्री हे हिंदूंचे प्रतिनिधी मिळून तीन हिंदी प्रतिनिधी या कमिटीवर होते. ही कमिटी जेथें जाईल

| | Total Population | Population of Depressed Classes | Total Seatis | Seats for Dapressed Classes |
|---|---|---|---|---|
| | (Millions) | | | |
| Madras | 39.8 | 6.3 | 120 | 2 |
| Bombay | 19.5 | .6 | 113 | 1 |
| Bengal | 45 | 9.9 | 127 | 1 |
| U. P. | 47 | 10.1 | 120 | 1 |
| Punjab | 19.5 | 1.7 | 85 | – |
| Bihar & Orissa | 32.4 | 9.3 | 100 | 1 |
| C. P. | 12.2 | 3.7 | 72 | 1 |
| Assam | 6 | 3 | 54 | – |
| Total | 221.4 | 41.9 | 791 | 7 |

'These figures speak for themselves. It is suggested that one-fifth of the entire population of British India should be allotted seven seats out of practically eight hundred. It is true that in all the Councils there will be roughly a one-sixth population of officials who may be expected to bear in mind the interests of the Depressed Classes; but that arrangement is not, in our opinion, what the Report on Reforms aims at. The authors stated that the Depressed Classes should learn the lesson of self-protection. It is truely fanciful to hope that this result can be expected from including a single member of the community in an assembly where there are sixty or seventy caste Hindus. To make good the principles of paras 151, 152, 154 and 155 of the Report we must treat the outcastes more generously. We think there should be in each Council enough representatives of the Depressed Classes to save them from being entirely submerged, and at the same time to stimulate some capacity for collective actinos. In the case of Madras we suggest that they should be given six seats; in Bengal, the United Provinces and Bihar and Orissa we could give them four; in the Central Provinces and Bombay two; and elsewhere one. In these respects we think that the Committee's Report clearly requires modification" pp. 5-6).

प्र क र ण १८ वें

## पुनः लंडन युनिव्हर्सिटींत

आंबेडकर १९१३ सालीं बी. ए. ची परीक्षा पास झाले तेव्हां त्यांच्या मनांत समाजकार्य करण्याचे जे विचार घोळत होते ते फक्त विद्या-प्रसाराबद्दलचे. अस्पृश्यांमध्यें शिक्षणाचा प्रसार करावयाचा व त्यांचा सरकारी नोकऱ्यांत प्रवेश मिळविण्याबद्दल प्रयत्न करावयाचा, असा प्रथम त्यांचा समाजसेवेचा आराखडा होता. ते उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेला गेले तेव्हां त्यांना नवें आयुष्य, नवें जग आणि नवे विचार अनुभवावयास मिळाले. त्यांच्या वैयक्तिक आकांक्षा व महत्त्वाकांक्षा वाढत गेल्या. त्यांच्याबरोबर त्यांच्या समाजसेवेच्या व समाजकार्याच्या दिशा बदलत व वाढत गेल्या. एम्. ए. व पीएच्. डी. या पदव्या मिळविल्यानंतर त्यांना आपल्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक शक्तींची व आत्मबळाची जाणीव झाली. उच्चोत्तम पदव्या मिळवाव्यात व आपलें ज्ञान सर्वांगपरिपूर्ण करावें अशी महत्त्वा-कांक्षा त्यांच्यांत उत्पन्न झाली, म्हणून आर्थिक बळाचा त्यांना फारसा आधार नस-तांहि ते उच्च शिक्षणांतील उच्चतम पदव्या मिळविण्याच्या इर्षेनें प्रेरित होऊन लंडन युनिव्हर्सिटींत १९१६ ला दाखल झाले. अस्पृश्य वर्गांत नुसते शिक्षणाचें कार्य करून भागणार नाहीं, तर सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील आपले हक्क मिळविण्याची त्यांच्यांत जागृति उत्पन्न करावयाची आणि ते हक्क मिळविण्या-साठीं त्यांच्यांत युयुत्सु वृत्ति निर्माण करावयाची असा आंबेडकरांनीं आपल्या समाज-कार्याचा आराखडा मनांत तयार केला. तो आराखडा यशस्वी करावयाचा तर आपण स्वतंत्र राहिलें पाहिजे म्हणून उपजीविकेचें साधन म्हणून बॅरीस्टरी करणें व पुस्तकें लिहिणें हीं कार्यें त्यांनीं निश्चित केलीं. पुस्तकें लिहिण्याची कला त्यांनीं अगोदरच आत्मसात केलेली होती. त्या कलेंत ते रात्रंदिवस एकसारखी नवी भर टाकीत गेले. बडोद्याची स्कॉलरशिप बंद झाल्यानंतर ते आपला विद्याभ्यास अपुरा सोडून लंडनहून मुंबईला १९१७ च्या जूनमध्यें आले. बडोद्याच्या नोकरींत अपमानास्पद वागणूक मिळाल्यामुळें ते ती सोडून मुंबईला आले (नोव्हेंबर १९१७). अस्पृश्यांच्या ज्या चळवळी निरनिराळ्या क्षेत्रांत चालत

आलेल्या होत्या त्यांना चांगला रंग भरत चाललेला होता. या चळवळींचें सिंहावलोकन मागील कांहीं प्रकरणांत केलेलें आहे. १९१७ ते १९२० च्या काळांत ज्या चळवळी झाल्या त्यांत महारांची लष्करांत भरती व्हावी, ही एक चळवळ होती. भारत सेनापति लॉर्ड किचनेर यांच्या धोरणामुळें अस्पृश्यांच्या सैन्यभरतीला १८९२ पासून पायबंद घालण्यांत आलेला होता. १९१४ ला पहिलें महायुद्ध सुरू झालें तेव्हां सरकारला मनुष्यबळाची जरुरी वाटूं लागली. म्हणून सरकारनें अस्पृश्यांना सैन्यांत नोकऱ्या देण्याचें धोरण स्वीकारलें; पण अस्पृश्यांना ज्या नोकऱ्या मिळत त्या बिन-लढाऊ जागेच्या असत. समारंगणांत प्रत्यक्ष लढण्यासाठीं अस्पृश्यांच्या स्वतंत्र पलटणी उभाराव्यात अशी चळवळ जेव्हां सुरू झाली तेव्हां सरकारनें त्याबद्दल उदारपणा दाखविला नाहीं. परंतु १९१६ सालांत बसऱ्याच्या शेजारीं कुत्-अल्-अमाराच्या किल्ल्यांत आणि तुर्कस्थानांतील गॅलिपोली या बंदरांत ब्रिटिशांच्या सैन्याची जर्मन व तुर्क यांनीं जेव्हां भयंकर कत्तल केली तेव्हां सरकारला लढाऊ लोकांच्या पलटणी हिंदुस्थानांत उभारण्याची निकड भासली. म्हणून हिंदुस्थानांतील अस्पृश्यांपैकीं महार जातीचे लोक पट्टीचे लढाऊ आहेत हें सरकारनें मान्य करून महारांची एक पलटण उभारण्याचें जाहीर केलें. या पलटणीला १११ वी महार बटालियन हें नांव दिलें. महारांची दुसरी पलटण उभारण्याची मागणी महार समाज सेवक करूं लागले. या सुमारास पहिलें युद्ध संपलें व दुसऱ्या पलटणीची मागणीची फेटाळली गेली.

आंबेडकरांना लष्करी पेशाचें फार वेड. त्यांच्या घराण्याच्या पिढ्यान् पिढ्या या पेशांत वावरत होत्या. आपणहि या पेशांत शिरावें, मर्दुमकी करावी आणि लष्करी डावपेचांना आत्मसात करून त्याबळावर आपण मोठे लष्करी अधिकारी व्हावें, असें त्यांना लहानपणी वाटत असे. महारांची पलटण उभारण्याची चळवळ चालू होती तेव्हां त्यांचें मन त्या चळवळीकडे आकर्षिलेलें होतें. परंतु हा काळ त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत प्रखर उन्हाळ्याचा होता. १९१७ नोव्हेंबर ते १९१८ नोव्हेंबर या काळांत त्यांना कायमचें उत्पन्न फारसें नव्हतें. घरच्या कुटुंबाचा वाढता खर्च ते शिकवण्या करून आणि डॉवर्स कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें प्रोफेसरकी करून कसाबसा भागवीत असत. याच काळांत बडोद्याच्या विद्याखात्याचीं पत्रें येत कीं, तुम्हीं संस्थानचें कर्ज फेडा. या आपत्तींना तोंड देऊन त्यांना लंडनमधील राहिलेला अपुरा अभ्यास पुरा करावयाचा होता, म्हणून त्यांना प्रथम आपल्या अभ्यासासाठीं व कुटुंबखर्चासाठीं पैसा मिळवावयाचा होता. या कारणामुळें अस्पृश्यांच्या अनेक चळवळीकडे त्यांचें मन आकर्षिलें जात असें तरी ते प्रत्यक्ष चळवळींत कधीं प्रगट झाले नाहींत. कारण त्यांना भीति वाटे कीं एकदां कां चळवळींत भाग घेतला तर आपण पाय माघारीं घेणार नाहीं, व त्यामुळें चळवळींत गुरफटून गेलों तर अपुरा राहिलेला अभ्यास पुरा करतां येणार नाहीं. म्हणून ते चळवळीपासून अलिप्त राहिले; परन्तु अस्पश्यांना राजकीय हक्क मिळविण्याच्या बाबतींत शिंदे व चंदावरकर हे ज्या

उद्देशानें चळवळ करीत होते त्यामुळें राजकीय बाबतींत ते अस्पृश्यांना आपल्या ओंजळीनें पाणी प्यावयास लावतील व शेवटीं सामाजिक, धार्मिक व आर्थिक बाबतींत अस्पृश्यांना स्पृश्यांची जशी गुलामगिरी पत्करावी लागते तशीच राजकीय बाबतींतहि अस्पृश्यांना अस्पृश्यांची गुलामगिरी पत्करावी लागेल या भीतिमुळें आंबेडकरांना सरकारी नोकरींत राहूनहि राजकीय बाबतींत कांहीं दिवस प्रगटपणें कार्य करावें लागलें. आपला विद्याभ्यास पुरा झाल्याशिवाय आपण कसल्याहि कार्यांत मन घालावयाचें नाहीं, हें व्रतपालन आंबेडकरांनीं अत्यंत कडकरीतीनें पाळलें. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लिमिटेड' नागपूर, या संस्थेतर्फे डॉ. श्रीधर व्यं. केतकर यांनीं १५ डिसेंबर १९१७ ला पत्र लिहून आंबेडकरांना अशी विनंति केली कीं, तुम्हीं ज्या विषयांचे तज्ज्ञ आहात त्या विषयावर 'महाराष्ट्र ज्ञानकोशा'साठीं मजकूर लिहा. 'इंडियन इकॉनॉमिक असोशिएशन'चे चिटणीस व सिडेनहॅम कॉलेजचे प्रिन्सिपॉल ॲशले यांनीं ७ नोव्हेंबर १९१८ ला आंबेडकरांना पत्र लिहून विनंति केली कीं, अर्थशास्त्रज्ञांची परिषद मुंबईंत २८ ते ३१ डिसेंबर १९१८ ला भरणार आहे; त्या परिषदेंत तुम्ही एकाद्या आर्थिक विषयावर निबंध लिहून वाचा. परंतु या व आणखी इतर आमंत्रणांचा आंबेडकरांनीं स्वीकार केला नाहीं. कारण हेंच कीं, लंडनमधील अपुरा राहिलेला अभ्यास पुरा होईपर्यंत आपण कशांतहि स्वतःला गुंतवून घ्यावयाचें नाहीं, हें त्यांचें व्रत !

हिंदी लोकांना नवीन राजकीय हक्क देण्याची घोषणा भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं जेव्हां केली ( २० आगस्ट १९१७ ) तेव्हां अस्पृश्यांतर्फे स्वतंत्र बाजू मांडणें आंबेडकरांना इष्ट वाटूं लागलें. या वेळीं अस्पृश्यांची बाजू राजकीयक्षेत्रात नीटशी मांडली नाहीं तर अस्पृश्यांना राजकीय हक्क लौकर मिळणें दुरापास्त होईल हेंहि ते जाणून होते. त्यांतून शिंदे व चंदावरकर हे अस्पृश्यांच्या वतीनें राजकीय हक्कांबद्दल चळवळ करीत होते. त्यांची चळवळ सफल झाली तर राजकीयबाबतींत अस्पृश्यांची शेंडी स्पृश्यांच्या हातीं राहील व अस्पृश्यांवर स्पृश्यांची राजकीय गुलामगिरी लादली जाईल अशी आंबेडकरांना भीति वाटत होती. म्हणून या परिस्थितीचें निराकारण करण्यासाठीं त्यांना आपलें व्रत सोडावें लागलें. ते सरकारी नोकरींत असतांहि राजकीय चळवळींत शिरले आणि नागपूर येथें भरलेल्या परिषदेंत त्यांनीं शिंद्यांच्या चळवळीवर प्रकाश टाकला. अस्पृश्यांची बाजू जनतेसमोर मांडण्यासाठीं वर्तमानपत्र काढण्याची जरूरी आंबेडकरांना भासूं लागली. साऊथबरो कमिटीचा दौरा मुंबई प्रांतांत आला, तेव्हां 'मूकनायक' हें पत्र सुरू करण्यांत आलें.

'मूकनायक' पत्र काढण्यासाठीं राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनीं अडीच हजार रुपयांची मदत केली. या पत्राचा पहिले संपादक श्री. पांडुरंग नंदराम भटकर हे महार जातीचे अंडर ग्रॅज्युएट गृहस्थ होते. पत्र श्री. काशीनाथ रघुनाथ मित्र यांच्या 'मनोरंजन' छापखान्यांत ( ३, सँडहर्स्ट रोड, गिरगांव ) छापण्यांत येई. पत्राची कचेरी १४, हरारवाला बिल्डिंग, डॉ. वाटलीवाला रोड, पोयबावडी, परेळ,

येथें होती. पत्राला अनुरूप अशी बिरुदावली शोधून काढण्यासाठीं आंबेडकरांनीं तुकारामांची गाथा, रामदासांचा दासबोध, रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथ चाळून पाहिले. शेवटीं त्यांनीं तुकारामाच्या एका अभंगांतील खालील चरणें मुक्रर केलीः—

**काय करूं आतां धरूनिया भीड।**
**निःशंक हें तोंड वाजविलें॥**
**नव्हे जगीं कोणी मुकियांचा जाण।**
**सार्थक लाजून नव्हे हित॥१॥**

पहिला अंक शनिवार ता. ३१ जानेवारी १९२० रोजीं प्रसिद्ध झाला. या अंकांतील अग्रलेख ‘मनोगत’ या नांवानें लिहिलेला होता. हा लेख व या पुढील तेरा अंकांतील लेख आंबेडकरांनीं लिहिलें होते. पहिल्या अंकांतील ‘मनोगतांत’ त्यांनीं पुढीलप्रमाणें विचार प्रदर्शित केलेलें होते :

“आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढें होणाऱ्या अन्यायांवर उपाययोजना सुचविण्यास तसेंच त्यांची भावी उन्नति व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाहीं; परंतु मुंबई इलाख्यांत निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, त्यांतील बरींचशीं पत्रें विशिष्ट अशा जातींचे हितसंबंध पहाणारीं आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेंच नव्हें, तर केव्हां केव्हां त्यांना अहितकारक असेंहि त्यांतून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा एवढाच इषारा आहे कीं, कोणतीहि एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातींस बसल्याशिवाय रहाणार नाहीं. समाज ही एक नौकाच आहे; व ज्याप्रमाणें आगबोटींत बसून प्रवास करणाऱ्या उतारूनें जाणून-बुजून इतरांचें नुकसान करावें म्हणून म्हणा किंवा त्यांची त्रेधा कशी उडते ही गम्मत पहाण्यासाठीं म्हणा. किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळें म्हणा, जर कां इतरांच्या खोलीस छिद्र पाडलें तर सर्व बोटीबरोबर त्यालाहि आधीं किंवा मागाहून जलसमाधि ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणें एका जातीचें नुकसान केल्यानें, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेंहि नुकसान होणार, यांत बिलकूल शंका नाहीं. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनीं इतरांचें नुकसान करून आपलें हित करायाचें पढतमूर्खाचें लक्षण शिकूं नये. हा बुद्धिवाद ज्यांना कबूल आहे अशीं वर्तमानपत्रें निघालीं आहेत हें सुदैवच म्हणावयाचें. ‘दीनमित्र’, ‘जागरूक’, ‘डेक्कन रयत’, ‘विजयी मराठा’, ‘ज्ञानप्रकाश’, ‘इंदुप्रकाश’ व ‘सुबोधपत्रिका’ वगैरे पत्रांतून बहिष्कृतसमाजाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते; परंतु ब्राह्मणेतर या आवडंबर संज्ञेखालीं मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नाचा त्यांत खल होतो. त्यांत बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह होण्यास पुरेशी

जागा मिळणें शक्य नाहीं, हेंहि पण उघडच आहे. त्यांच्या अति विकट स्थितीशीं संलग्न असलेल्या प्रश्नांची वाटाघाट करावयास एक स्वतंत्रच पत्र पाहिजे हें कोणीहि कबूल करील. ही उणीव भरून काढण्यासाठीं या पत्राचा जन्म आहे. खास अस्पृश्यांच्या हिताहिताची चर्चा करण्यासाठीं 'सोमवंशीय मित्र', 'हिंदनागरिक', 'विटाळ विध्वंसक' हीं पत्रें उपजलीं व लयही पावली; परंतु वर्गणीदारांकडून योग्य प्रोत्साहन मिळत गेल्यास 'मूकनायक' न डगमगतां स्वजनोद्धाराचें महत्कार्य करणारांस योग्य पंथ दाखवील, असें आश्वासन देतांना तें अनुभवाअंतीं खोटें ठरणार नाहीं अशी खात्री बाळगून हें स्वयशनिवेदन आटोपतें घेतों."

अस्पृश्यसमाजाच्या राजकीय आकांक्षाबद्दल आंबेडकरांनीं 'मूकनायका'च्या पहिल्या अंकांत पुढीलप्रमाणें विचार मांडलेलें होते :

"जर या हिंदुस्थान देशांतील सृष्ट पदार्थांच्या व मानवजातींच्या चित्रपटाकडे प्रेक्षक या नात्यानें पाहिलें, तर हा देश म्हणजे केवळ विषमतेचें माहेरघर आहे आहे असें निःसंशय दिसेल.

"हिंदु धर्मांत असलेली ही विषमता जितकी अनुपम आहे, तितकीच ती निंदास्पदहि आहे. कारण विषमतेनुरूप होणाऱ्या परस्परांच्या व्यवहारांचें स्वरूप हिंदुधर्माच्या शीलाला शोभण्यासारखें खास नाहीं. हिंदु धमात समाविष्ट होणाऱ्या जाती उच्चनीच भावनेनें प्रेरित झालेल्या आहेत हें उघड आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय. पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, या मनोऱ्यास शिडी नाहीं आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाहीं. ज्या मजल्यांत ज्यांनीं जन्मावें त्याच मजल्यांत त्यांनीं मरावें. खालच्या मजल्यांतला इसम मग तो कितीहि लायक असो त्याला वरच्या मजल्यांत प्रवेश नाहीं. व वरच्या मजल्यांतला माणूस कितीहि नालायक असो त्याला खालच्या मजल्यांत लोटून देण्याची प्राज्ञा नाहीं. उघड भाषेंत बोलावयाचें म्हणजे जातीजातींत असलेल्या या उच्चनीच भावना गुणावगुणांच्या पायावर झाल्या आहेत असें नाहीं. उच्च जातींत जन्मलेला मग तो कितीहि अवगुणी असो तो उच्च म्हणावयाचा; तसेंच नीच जातींत जन्मलेला मग तो कितीहि गुणी असो, तो नीचच रहावयाचा! दुसरें असें कीं, परस्परांत रोटी-बेटी व्यवहार होत नसल्यामुळें दर एक जात ही जिव्हाळ्याच्या संबंधांत-स्वयंवर म्हणजे तुटक आहे, ही निकट संबंधाची गोष्ट जरी बाजूस टाकली तरी-परस्परांतील बाह्य व्यवहार अनियंत्रित असा नाहीं. कांहींचा व्यवहार दारापर्यंतच होतो व कांहीं जाती तर अस्पृश्य आहेत. म्हणजे त्या जातींतील माणसाचा स्पर्श झाला असतां इतर जातींतील माणसास विटाळ होतो. विटाळामुळें या बहिष्कृत जातींशीं इतर जातींच्या लोकांशीं क्वचितच व्यवहार होतो. रोटी-बेटी व्यवहाराच्या अभावीं कायम झालेल्या परकेपणांत स्पृश्यास्पृश्य भावनेनें इतकी भर टाकली आहे कीं, या जाती हिंदू समाजांत असून

समाजाबाहेर आहेत असेंच म्हटलें पाहिजे. या व्यवस्थेमुळें हिंदुधर्मीयांचे ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे तीन वर्ग होतात. तसेंच, या विषमतेच्या परिणामाकडे लक्ष दिलें तर असें दिसून येईल कीं, तिच्या पायीं विविध जातींवर विविध परिणाम झाले आहेत. सर्वांत उच्च असलेल्या ब्राह्मणवर्गास आपण भूदेव आहोंत असें वाटत आहे. सर्व मानवांचा जन्म आपल्या सेवेसाठीं आहे असें मानणाऱ्या भूदेवांना रूढ असलेली विषमता पोषकच आहे आणि म्हणूनच ते आपल्या स्वनिर्मित हक्कानें इतरांपासून आपली सेवा करून घेऊन आपण राजरोसपणें व बिनदिक्कत मेवा खात आहेत. त्यांनीं कांहीं करणी केली आहे म्हणावें, तर ज्ञानसंचय व धर्मशास्त्र-लेखन एवढेंच काय तें ! पण तें धर्मशास्त्र म्हणजे उदात्त विचार व नीच आचार यांतील प्रबल विरोधाचें कोडेंच म्हणावयाचें ! सचेतन व तसेंच अचेतन वस्तू हीं सारीं ईश्वराचीं रूपें आहेत असें उपदेशणाऱ्या तत्त्ववादियांच्या विचारांत व आचारांत विलक्षण विषमता दिसावी हें कांहीं शुद्धीवर असणारांचें लक्षण नव्हें. वेडेंवाकडें कसेंहि असो, पण या धर्मशास्त्राची छाप लोकावर कांहीं कमी नाहीं. आपण होऊन अज्ञजन आपल्या हितशत्रूंस भूदेव म्हणून भजत आहेत, हें कोण नाकबूल करील ? विघातक धर्मभावनेच्या शृंखलेनें जखडून घेऊन शत्रूस मित्र समजून त्यांच्या पायीं इतर जन लीन कां झाले याचा उलगडा करावयास फार दूर जावयास नको. अज्ञानी लोकांकडून कांहींहि करवितां येईल आणि म्हणूनच ज्ञानसंचय-प्रसार नव्हे-ही ब्राह्मणांची मिरास हें एक धर्माचें मोठें तत्त्व बनवून ठेवण्यांत आलें आहे.

"सत्ता व ज्ञान नसल्यामुळें ब्राह्मणेतर व मागासलेले यांची उन्नति खुंटली हें निर्विवाद आहे. परंतु त्यांच्या दुःखांत दारिद्र्याची तरी भर पडली नाहीं. कारण शेती, व्यापार, उदीम अथवा नोकरी करून आपला चरितार्थ चालविणें त्यांना दुरापास्त नाहीं; पण या सामाजिक विषमतेचा बहिष्कृत समाजावर झालेला परिणाम अति घोर आहे. दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमांत हा अफाट बहिष्कृत समाज वाहवला आहे हें खास ! दीर्घकाल अंगीं मुरलेल्या दास्यामुळें उद्भवलेली हीनता त्यांना मार्गे खेचीत आहे. आहे ती स्थिति योग्य आहे, यापेक्षां बरी स्थिति आपल्या नशिबीं नाहीं अशा समजुतीचा विघातकपणा ह्या पतितांच्या नजरेंत आणण्यास ज्ञानासारखें अंजन नाहीं. पण तें अंजनहि आजकाल मिरचीमसाल्याप्रमाणें विकत घ्यावें लागत आहे. आणि दारिद्र्यामुळें तें दुर्मिळ झालें आहे. कोठें कोठें तर विकत घेऊं गेलों असतां तें मिळतहि नाहीं, कारण ज्ञानमंदिरांत सर्वच ठिकाणीं अस्पृश्यांचा प्रवेश होतो असें नाहीं. दारिद्र्याची बोळवण करण्यास कपाळीं अस्पृश्यतेचा शिक्का मारला असल्यामुळें पैका मिळविण्यास हवी तेवढी संधि किंवा मोकळीक नाहीं. नोकरी, व्यापार, उदीम इत्यादि धंद्यांत त्यांचा क्वचितच रिघाव होतो. नशीब काढण्यास कोठेंच जागा नसल्यामुळें त्यांना केवळ भुईचे खडे खात पडावें लागत आहे.

" प्रचलित हिंदू धर्माच्या अति घोर अन्यायास्तव आपल्या समाजास अस्पृश्य मानण्याचें महापातक विश्वजनक प्रभूला न जुमानतां करणारे कोटयावधि अविवेकी व दुराग्रही जन जोंपर्यंत या देशांत वावरत आहेत, तोंपर्यंत आपला समाज निकृष्ट स्थितीमध्येंच खितपत रहाणार आहे, याची जाणीव या बहिष्कृत समाजांतील बऱ्याच लोकांस झाली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तसेंच परस्थ सरकारास आपल्या तंत्रानें वागावें लागत आहे याचा फायदा घेऊन अस्पृश्यवर्गाच्या खऱ्या स्थितिविषयीं वरिष्ठ हिंदूंकडून त्यांचा कसा गैरसमज करून देण्यांत येत आहे, हें देखील त्यांना कळून चुकलें आहे. जातिभेद व जातीमत्सर यांनीं ग्रस्त झालेल्या या देशांत खरें स्वराज्य नांदण्यास या वहिष्कृत वर्गास त्यांच्या स्वतंत्र प्रतिनिधींतर्फे राजकीयसत्तेचा पुरेसा भाग मिळावा या मागणीस त्यांच्या वरिष्ठांनीं करून केलेल्या विरोधाच्या खोडसाळपणाबद्दल बहिष्कृत वर्गानें तक्रार केली आहे. एवंच राजकीयसत्ता मिळवून तिच्या जोरावर सामाजिक विषमतेचें दडपण कायम करूं पहाणारांचा कावा बहिष्कृत समाजानें ओळखला आहे. ही त्यांच्यांत उपजलेल्या जागृतेची साक्ष होय !" (मूकनायक, ३१-१-१९२०)

टिळकांनीं राजकीयबाबतींत जें कार्य केलें व करीत होतें. त्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार पुण्यांत होणार होता. या प्रसंगाला उद्देशून 'मूक नायक' मध्यें खालील स्फुट बाबासाहेबांनीं लिहिलें होतें :

" पण रा. टिळक राजकीय व सामाजिक बाबतींत विसंगतपणा व्यक्त करूनच केवळ थांबले नाहींत. मागासलेल्या व अस्पृश्य वर्गांच्या उन्नतीला विरोध करण्याच्या कामीं व त्यांना कायमचें अज्ञानांधकारांत व अवनतिगर्तेत ठेवण्याच्या कामींहि त्यांनीं गेलीं कित्येक वर्षें आपलें पुण्य खर्ची घातलें आहे. जातवार निवडणुकांचा प्रश्न पुढे आला नव्हता, तोंपर्यंत जातीभेदाचें समर्थन व गीतारहस्य समजून सांगण्याच्या मिषानें उपदेश करून त्यांनीं या वर्गाचें अकल्याण करण्याची खबरदारी घेतली. व हेच वर्ग स्वतंत्र प्रतिनिधी मागूं लागतांच त्या योगानें 'जातिजातींत वैमनस्यें माजून जातीभेद नष्ट होणें लांबणीवर पडेल, या सबबीवर त्यांनीं त्यांचें नुकसान करण्यास कंबर कसली. कायदेमंडळांत जाऊन कुणब्यानें नांगर हांकावयाचे नाहींत किंवा वाण्यांनीं तागड्या धरावयाच्या नाहींत असें म्हणणाऱ्या रा. टिळकांचा गौरव पुण्याच्या सर्व नागरिकांतर्फे हे लोक होऊं देणार नाहींत, हें समजण्याइतके दूरदर्शित्व त्यांच्या चहात्यांना असावयास पाहिजे. त्यांच्या व त्यांच्या अनुयायांच्या विरोधाला भीक न घालतां पार्लमेंटरी कमिटीनें जेव्हां स्वतंत्र प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाला मान्यता दिली तेव्हांच त्यांची लोकमान्यता सर्वस्वी नष्ट झाली, हें त्यांच्या लक्षांत यावयास पाहिजे होते !

"ज्या दीन, हीन, दुबळ्या व असहाय्य अस्पृश्यांविषयीं प्रत्येक जाणत्या व सहृदय हिंदी माणसाचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे, त्यांची प्रतारणा करण्यासहि

रा. टिळकांनीं कमी केलें नाहीं. अस्पृश्यांच्या उद्धाराला आपली सहानुभूति कमी आहे असें नाहीं, असें विलायतच्या मजूरांना उजळ तोंडानें भासवितां यावें म्हणून त्यांनीं अस्पृश्योद्धाराच्या परिषदेंत चांभाराच्या गणपतीची कथा सांगून वेळ मारून नेली; पण या भाषणापैकीं एक अक्षरहि केसरींत न येईल अशी त्यांनीं तजवीज केली. पुढें अस्पृश्योद्धाराच्या राजिनाम्यावर (शपथपत्रिकेवर) सही मागण्यांत आली तेव्हां त्यांनीं सर्वस्वी उडवाउडवी करण्याची जबाबदारी घेतली ती निराळीच !

"समता, बंधुप्रेम व दीन देशबांधवांविषयीं सहानुभूति या सर्वच बाबतींत उघड उघड माघार खाल्लेल्या या नामधारी पुढाऱ्याचा गौरव करून वरील जगमान्य तत्त्वाविषयींचा आपला अनादर कोणी व्यक्त करणार असतील तर बापडे खुशाल करोत ! मिश्रविवाहाच्या बिलास विरोध करणाऱ्या व सर्व ब्राह्मणेतरांना शिद्दी लोकांच्या जोडीस नेऊन बसविणाऱ्या 'केसरी'च्या या मालकांना मान देऊन बहुसंख्य जनतेच्या स्वाभिमानाला पायाखालीं तुडविण्यास कोणी स्वाभिमानशून्य व्यक्ति तयार होत असल्या तर खुशाल होवोत ! आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, या व्यक्तींना पुण्याच्या सर्व नागरिकांच्या नांवावर ही गोष्ट करूं द्यावयाची नाहीं, असा आमचा निश्चय आहे; व ज्यांना तो पसंत असेल त्या सर्वांना सदर सभेस हजर राहून आपले विरुद्ध अभिप्राय जाहीर करण्याविषयीं आमची विनंती आहे."

मुंबईत अस्पृश्यांनीं चालविलेल्या ज्या संस्था होत्या त्यांत 'सोमवंशीय निराश्रित फंड' ही एक संस्था होती. अस्पृश्यांच्या सार्वजनिक उपयोगांसाठीं इमारत बांधणें, हें तिचें ध्येय होतें. या संस्थेबद्दल 'मूकनायका'च्या पहिल्या अंकांत खालील अभिप्राय दिलेला होता :

## "सोमवंशीय निराश्रित फंड

"या फंडाचा नुकताच बाहेर पडलेला रिपोर्ट आमच्याकडे आला आहे. मुंबई येथें सार्वजनिक कामाचा विचारविनियम होण्यासाठीं येथील समस्त महार मंडळीस सोईस्कर होईल असें एक मंदिर बांधण्याकरितां सदरहू फंडाची स्थापना ता. १३ नोव्हेंबर १९०९ रोजीं 'सोमवंशीय मित्रसमाजा'चे विद्यमानें आली असें रिपोर्टावरून समजतें. फंडाच्या चालकांनीं गर्वोक्तीनें इतर संस्था अशा प्रकारचा अहवाल सादर करीत नाहींत असें म्हटले आहे. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठीं निघालेल्या सर्व संस्थांनीं आपले तपशीलवार रिपोर्ट वेळोवेळीं सादर करावे या इषाऱ्यास आमचें अनुमोदन आहे. हा इषारा फार महत्त्वाचा आहे हें निर्विवाद आहे. पैशाचा तपशीलवार हिशेब वेळोवेळीं दाखविल्याखेरीज समाजाला संस्थेच्या कार्याची सत्यता पटणें कठीण आहे. रिपोर्टाच्या अभावी पैशाची मदत करण्यास समाजांतील उदार माणसें धजत नाहीं हें सर्व संस्थानीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. इतरांना दिलेला हा इषारा सदरहू सोमवंशीय निराश्रित मंदिर फंडाच्या संस्थेनें पाळला असता तर तो त्यांना हितावह झाला असता असें आम्हांस वाटतें. फंड स्थापन झाल्यापासून आजतागायत फक्त रु. ११८३-३-७,

फंड गोळा झाला आहे. त्यांतल्यात्यांत पाहूं गेलें असतां गेल्या चार वर्षांत फंडाची वाढ मुळींच झाली नाहीं. याचें कारण फंड स्थापन झाल्यापासून या संस्थेनें मुळींच रिपोर्ट सादर केला नाहीं असें असावे असा आमचा समज आहे. ह्या फंडाच्या हेतू-संबंधानें अजून समाजांत एक मत नाहीं. अस्पृश्यवर्गानें उच्च वर्णीय हिंदु लोकांच्या देवळांत जाण्याचा समाजिक हक्क मिळविण्याचा प्रयत्न करावा किंवा पैसे गोळा करून आपल्या धार्मिक हितासाठीं स्वतंत्र देऊळ बांधावे या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल आज आम्हांला देतां येत नाहीं. तेवढ्यावरून फंडाची वाढ कर-ण्याचा प्रयत्न मात्र कमी होऊं देऊं नका. पुढेंमागें जरी फंडाचा हेतु बदलावा लागला तरी फंड असल्यानें कांहीं वावगें नाहीं; कांहींतरी इष्टच घडवून आणतां येईल. चाल-कांनीं मात्र फंडाच्या कामीं निराश न होतां तो अव्याहत चालू ठेऊन त्याचा तपशील-वार रिपोर्ट देत जाणें हें बरें, अशी आमची त्यांस सूचना आहे. कोंडाजी रामजी मास्तर, लिंबाजी तुळशीराम ओझरकर, बापूजी अंबूजी वाव्हळ, रा. कोंडीराम माणकोजी रोकडे, मारुति साबाजी गायकवाड हे या फंडाचे ट्रस्टी असून फंडाची रक्कम मुंबई सेव्हिंग्ज बँकेंत आहे असें समजतें."

मुंबईत मदनपुऱ्यास चंदावरकरांच्या अध्यक्षतेखालीं अस्पृश्यांची जी परिषद दि. ११ नोव्हेंबर १९१७ ला भरविण्यांत आली होती तींत अनेक राजकीय ठराव मंजूर झालेले होते. त्यांतील एक ठराव असा होता कीं, काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यामध्यें राजकीय हक्कासंबंधीं जो करार—लखनौ करार—झालेला होता, त्या कराराला अस्पृश्यांचा पाठिंबा आहे. १८ नोव्हेंबर १९१७ ला दुसरी एक सभा झाली. तीहि अस्पृश्यांचीच होती. तिचे अध्यक्ष सर भालचंद्र भाटवडेकर हे होते. ही सभा 'मॅंटेग्यू चेम्सफर्ड यांच्या सुधारणांवर मत प्रदर्शित करण्यासाठीं' सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या हॉलमध्यें भरविण्यांत आली होती. साऊथबरो कमीटीनें अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबद्दल जो प्रतिकूल निर्णय प्रसिद्ध केलेला होता, त्याचा सरकारनें फिरून विचार करावा, असा एक ठराव या सभेंत मंजूर झाला. अस्पृश्य समाजाला स्वतःचे प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असावा, असा ठराव इंडियन नॅशनल काँग्रेसच्या जादा अधिवेशनांत काँग्रेसनें मंजूर करावा, अशी विनंति करणाराहि एक ठराव याच सभेंत मंजूर झाला. जादा काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्व अस्पृश्य वर्गाच्या लोकांची एक जंगी सभा भरविणें असाहि एक ठराव याच सभेंत मंजूर करण्यांत आला. अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं मुंबईत मदनपुरा येथें २७ ऑक्टोबर १९१८ ला सुभेदार गणपतराव गोविंद रोकडे यांच्या अध्यक्षते-खालीं सभा भरली होती. (१) अस्पृश्य वर्गाच्या स्वतंत्र मतदार संघांनीं निवडलेले प्रतिनिधी त्या वर्गाच्या संख्येच्या मानानें कायदे कौन्सिलांमध्यें घेतले जावेत; (२) कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त प्रतिनिधींनीं अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी निवडावे,

अशी जी पद्धति डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीनें सुचविलेली आहे तिचा निषेध करणें; आणि (३) मुंबईंत भरणाऱ्या नेमस्त पक्षाच्या अखिल भारतवर्षीय परिषदेला हजर राहून तेथें अस्पृश्य वर्गातर्फे आपलें म्हणणें मांडण्याकरतां प्रतिनिधी निवडणें, असे राजकीय स्वरूपाचे ठराव या सभेंत मंजूर झाले. विजापूर येथें ६ मे १९१८ ला श्री. कामत यांच्या अध्यक्षतेखालीं जी अस्पृश्यतानिवारक परिषद झाली तींत अस्पृश्य हजर नसतांनाहि असा एक ठराव मंजूर करण्यांत आला कीं, लखनौ कराराला अस्पृश्यांचा पाठिंबा आहे. या सर्व परिस्थितीचा आढावा लक्षांत घेतला तर आंबेडकरांनीं 'मूकनाय'कच्या पहिल्या अंकांत वरिष्ठ हिंदू लोक अस्पृश्यांवर राष्ट्रीय गुलामगिरी लादूं पहात आहेत, पण अस्पृश्य लोक त्यांचे प्रयत्न हाणून पाडतील, असा जो गंभीर इषारा ध्वनित केला, त्याचें मर्म कळून येते. ३०–३१ मे व १ जून १९२० रोजीं शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखालीं अस्पृश्यांची जी परिषद नागपूरला भरली होती तींत आंबेडकरांनीं शिंद्यांचे डावपेंच लोकांपुढें कां मांडले, याचेंहि मर्म कळून येतें.

भीमराव बडोद्याहून मुंबईला परत आले तेव्हांपासून त्यांचे वडिल बंधु आनंदराव मूळव्याधीच्या आजारानें आजारी होते. ते मधून मधून लांब मुदतीच्या रजा काढून औषधोपचारासाठीं घरीं रहात. त्यामुळें घरखर्चाला व औषधोपचाराला नोकरीचें मासिक वेतन पुरें पडत नसें. याच काळांत भीमराव नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. प्रोफेसरची जागा मिळाल्यानंतर भीमरावांनीं आनंदरावांना औषधोपचारासाठीं बाहेरगांवीं पाठविलें. आनंदराव आपल्या सासुरवाडीस म्हणजे महाड तालुक्यांतील गोमीटगांव येथें राहिले; तेथेंच ते १९१८ सालीं मरण पावले. त्यांना दोन मुलगे झाले होते. पहिला मुकुंद व दुसरा गंगाधर. गंगाधर दीड वर्षांचा असतांना आनंदराव निवर्तले. त्यानंतर सहा महिन्यांनीं गंगाधरहि निवर्तला. या सर्व घटना घडल्यानंतर रमाबाईंना मुलगा झाला. त्याचें नांव आनंदरावांच्या मृत मुलाच्या स्मरणार्थ गंगाधर असें ठेवलें.

११ नोव्हेंबर १९१८ ते ११ मार्च १९२० च्या काळांत सिडेन्हॅम कॉलेजमधील प्रोफेसराचें काम करीत असतांना आंबेडकरांचें सार्वजनिक व कौटुंबिक आयुष्य मागें वर्णन केल्याप्रमाणें व्यतीत होत होतें. लंडन युनिव्हर्सिटींतील अपूर्ण राहिलेला आपला विद्याभ्यास पुरा करण्याचें ध्येय त्यांच्या मनःचक्षूपुढें नंदादिपाप्रमाणें एकसारखें तेवत होतें. तें ध्येय साध्य करण्यासाठीं त्यांना जो खर्च लागणार होता तो भागविण्यासाठीं त्यांनीं आपल्या पगारांतून शिल्लक टाकून द्रव्यनिधि सांठविला होता. घरखर्चासाठीं ते दरमहा १०० रुपये देत. घरचा खर्च कांटकसरीनें व्हावा म्हणून ते फार दक्षता बाळगीत. ती इतकी कीं, काड्याच्या दोन पेटया महिनाभर पुरविल्याच पाहिजेत, तिसरी पेटी विकत घेऊं नये, अशी सक्त ताकीद त्यांनीं रमाबाईंना दिलेली होती. ती साध्वी त्याबरहुकूम संसारखर्च चालवित होती. रमाबाईंचें जीवन घरंदाज मराठमोळा वातावरणांत गेलेलें होतें. त्यांनीं शाळेचें तोंडहि पाहिलेलें नव्हतें. त्यांना

सुशिक्षित करण्याचा भीमरावांनीं स्वतः लग्न झाल्यापासून अटोकाट प्रयत्न केला होता. वडील माणसांसमोर उभे न रहाणें, त्यांच्या आज्ञा मनापासून पाळणें, पतीची पूजा व सेवा करणें, अशी रमाबाईंची विचारसरणी व रहाणी असल्यामुळें त्या पतीला म्हणत, बायकांना शिकून काय करावयाचें ! यामुळें भीमरावांनीं त्यांना शिकविण्याची एवढी धडपड करूनहि बरेंच दिवस रमाबाईंची प्रगति साक्षरतेच्यापलीकडे फारशी झाली नाहीं. आपला पति खूप शिकलेला आहे याचा त्यांना फार अभिमान वाटे. त्या स्वतःला पतीची पडछाया समजून वागत असत. पतीच्या प्रोत्साहनानें त्यांनीं १९२० पर्यंत आपले विचार पत्रांतून व्यवस्थितपणें मांडण्याइतकी प्रगति केली. भीमराव अमेरिकेंत होते. तेव्हां ते आपलीं पत्रें आनंदरावांच्या नांवें लिहित. आनंदराव त्यांना उत्तरें पाठवीत; पण भीमराव १९२० सालांत लंडनला गेले तेव्हां ते आपलीं पत्रें रमाबाईंच्या नांवें पाठवीत. पतिपत्नीच्या बौद्धिक आणि वैचारिक पातळींत जमीन-अस्मानाचें अंतर होतें; तरी तें दांपत्य परस्परांवर जिवलग मित्राप्रमाणें प्रेम करीत असे. भीमराव रमाबाईंना रामू या लाडक्या नांवानें हांक मारीत असत. ते पत्रांतील पहिला मायनाहि तितक्याच लाडिकपणें लिहित असत–' प्रियतम रामू ! नमस्ते. ' पत्रांवरील पत्त्यांत मात्र ' श्रीमती रामूबाई आंबेडकर ' असा निर्देश असे.

सिडेनॅहम कॉलेजांत भीमरावांना प्रोफेसरची जागा मिळाली तेव्हां रमाबाईंचा असा समज झाला कीं, आतां आपले पतिराज संसाराला लागले. तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. पतीचा पहिला पगार हातांत आल्यावर त्यांना संसारोपयोगी गोष्टी ह्या करूं कां त्या करूं असें होऊन गेलें. मुलांना, नणंदांना, जाऊबाईंना आणि इतर आप्तस्वकीयांना रमाबाईंनीं कपडे केले. हें सर्व करणें पाहून भीमरावांनीं रामूला एके दिवशीं सांगितलें कीं, ही माझी नोकरी कायमची नाहीं, फक्त दोन वर्षांची आहे; या दोन वर्षांत अत्यन्त कांटकसरीनें राहून मला पैसे शिल्लक टाकून अपुरा राहिलेला अभ्यास पुरा करण्यासाठीं परत इंग्लंडला जावयाचें आहे. हें ऐकून रमाबाईंचा उत्साह मावळला. कांहीं दिवस गेल्यानंतर त्या मधून मधून पतीराजांना म्हणत, " साडेचारशेची नोकरी आहे तीच आपणाला पुरे ! पुढच्या अभ्यासाचा नाद सोडून द्यावा. आतां संसारांत लक्ष घालून नेटका संसार करावा ! " आपला पती सतत जवळ असावा, मुलेंबाळें व संसार याकडे पतीनें सारें लक्ष पुरवावें, अशी स्त्री–हृदयाची आकांक्षा रमाबाईंनींहि बाळगणें वावगें नव्हतें. त्यांचा पहिला मुलगा यशवन्त लहानपणापासून संधिवातानें आजारी होता. त्यांच्या पाठचीं दोन मुलें लहानपणींच गेलेलीं. विद्याभ्यापुढें पतीला संसाराचें कांहींच खंत वाटत नाहीं हें कांहीं बरें नव्हे, ही विचारसरणी रमाबाईंना भेडसावित असे. आसपासच्या बाया आपआपल्या संसारांत आनंदी झालेल्या आहेत, तसें आपणहि आनंदी व्हावें, असें रमाबाईंना वाटे

म्हणून त्या कधीमधीं भीमरावांना पुस्तकें बाजूला करून संसारांत लक्ष घालण्याबद्दल विनवीत. तेव्हां ते ती गोष्ट कधीं थट्टेवारी नेत, तर कधीं कधीं हमरीतुमरीवर येऊन रमाबाईना टाकून बोलत व अंगावर हात टाकायलाहि कमी करीत नसत. अशीं भांडणें विकोपाला गेलीं कीं रमाबाई अबोलवृत्तीनें यंत्राप्रमाणें आपलीं घरकामें करीत असत. त्यांची अबोलवृत्ती कधीं कधीं चार महिने टिके. अशा वेळीं भीमरावांना हार खावी लागे. कांहींतरी निमित्त करून तेच प्रथम रमाबाईशीं बोलणें सुरू करीत. पतिपत्नीचें खडाष्टक इतर कोणत्याहि गोष्टीवरून होत नसें. जें होई ते पतीच्या विद्याभ्यासावरून. कधीं कधीं रमाबाई फारच हट्टाला पेटल्या तर पतिराज आपल्या भात्यांतला शेवटचा बाण बाहेर काढीत. ते म्हणत कीं, तूं जर माझ्या विद्याभ्यासांत असे अडथळे आणूं लागशील तर मी दुसरी बायको करीन. तुझ्यासारख्या अडाणी स्त्रीला त्याची काय किंमत ! तेव्हां रमाबाईहि मोठ्या तोऱ्यांत म्हणत कीं, जा वाटेल तेवढ्या बायका करा ! पण या माझ्या घरांत मी एकीलाहि पाऊल टाकूं देणार नाहीं ! अशीं भांडणें पुष्कळ वेळां विनोदी वातावरणांत रंगत व शेवटीं तीं आनंदपर्यवसायीहि होत !

विद्याभ्यासाचें जबर व्यसन आपल्या पतीला जडलेलें आहे आणि तें दारूच्या व्यसनापेक्षांहि जालीम आहे; या व्यसनापासून आपल्या पतीला परावृत्त करणें महा कठीण कर्म आहे, अशी शेवटीं रमाबाईनीं मानाशी खूणगांठ बांधली आणि अपूर्ण राहिलेला विद्याभ्यास पुरा करण्यासाठीं पतीला लंडनला जाण्यास त्यांनीं बिनशर्त संमति दिली. एवढेंच नव्हे तर आपल्या पतीच्या विद्याभ्यासांत कोणत्याहि प्रकारचा अडथळा येऊं नये म्हणून त्या डोळ्यांत तेल घालून वागत असत. एका खोलींत सात आठ माणसें व दुसऱ्या खोलींत भीवरावांचा अभ्यास. घरांतील माणसांचीं दुखणीं, खर्चाची टंचाई, स्वतःचें काबाडकष्ट व दुखणें इत्यादि गोष्टींबद्दल पतीच्या कानावर अवाक्षरहि जाऊं नये याबद्दल त्या दक्षता बाळगीत. घरांतील मुलें व शेजारचीं मुलें यांनीं पतीच्या खोलीसमोर खेळतांना गोंगाट करूं नये म्हणून त्या व्यवस्था करीत. आणि पतिराज अर्थशास्त्रावरील जाडजूड ग्रंथ वाचण्यांत आणि त्यांचीं टिप्पणें काढण्यांत आपल्या खोलींत गर्क असत. खोलीचा दरवाजा आंतून बंद करून ते अभ्यासाच्या समाधींत गुंग झालेले असत. जेवणाची वेळ झाली म्हणून रमाबाईनीं बाहेरून ओरडून ओरडून दमावें, तरी पतीच्या अभ्यासाची समाधि उतरत नसे. कधीं कधीं ते न जेवतां दिवसभर व रात्रभर याच समाधींत असत. रमाबाईना त्यांचेबरोबर उपास करावा लागे !

ऑक्टोबर १९१७ पासून चार वर्षे आंबेडकरांच्या विद्याभ्यासांत अंतर पडलें तरी तें मान्य करण्याचा ठराव लंडन युनिव्हर्सिटीच्या सिनेटनें १८ जुलै १९१७ ला केलेला होता. ही मुदत संपण्याच्या आंत आणि विश्वविद्यालयाची टर्म सुरू होण्याच्या आंत आंबेडकरांना लंडनला पोहोंचणें भाग होतें. म्हणून त्यांनीं लंडनला जाण्याची

तयारी जून १९२० मध्यें सुरु केली. त्यांना लंडनच्या वास्तव्यांतील खर्चाची व मुंबईतील घरच्या खर्चाची तरतूद करावयाची होती. त्यासाठीं शाहू महाराजांनीं आंबेडकरांना दीड हजार रुपये दिले. त्याशिवाय महाराजांनीं एके दिवशीं आंबेडकरांच्या परळमधील सिमेंटच्या चाळींतील घरीं येऊन, रमाबाई ही माझी धाकटी बहिण, तुम्ही लंडनहून परत येईपर्यंत मी तिला माहेरीं कोल्हापुरीं घेऊन जातों, असें आर्जवानें सांगितले. आंबेडकरांनीं शाहू महाराजांच्या या सौजन्याबद्दल त्यांचे आभार मानून त्यांना सांगितलें कीं, मी कुटुंबाची मुंबईस शक्य तोंवर सर्व व्यवस्था करून जात आहे, आपण याबद्दल त्रास घेऊं नये !

विलायतच्या दोनतीन वर्षांच्या खर्चासाठीं आंबेडकरांनीं ९५० पौंड जमा केले. त्यांपैकी ५०० पौंड (सुमारें ८५०० रुपये) स्वतःच्या लंडनमधील खर्चाला व बाकीचे कुटुंबखर्चासाठीं अनामत म्हणून ठेवले. ५ जुलै १९२० रोजीं सिटी ऑफ एक्सिटर या बोटीनें आंबेडकरांनीं मुंबई सोडली. ६ जुलैला भयंकर वादळ झालें. बोट लहान असल्यामुळें प्रवाशांना भयंकर त्रास झाला; पण या वादळामुळें आपणाला कांहींहि त्रास झाला नाहीं, असें ता. १७-७-१९२० रोजीं त्यांनीं तांबड्या समुद्रांत बोट गेल्यावर पत्र लिहून घरीं कळविलें.

लंडनची राहणी भारी महाग पडते याचा आंबेडकरांना १९१६-१७ च्या काळांत अनुभव आलेला होता. आपल्याजवळ मोजके पैसे आहेत, त्यांतून आपला तीन वर्षांचा खर्च भागवावयाचा आहे याची जाणीव ठेवून त्यांनीं शक्य तितक्या साधेपणें राहण्याचा बेत केला. रहाण्याजेवण्याची एकत्र व्यवस्था असलेल्या हॉटेल्सचा दरमहाचा खर्च फार येतो म्हणून राहण्याचीच फक्त व्यवस्था पहावी व जेवण परवडेल त्याप्रमाणें बाहेर घ्यावें असें त्यांनीं ठरविलें. एका खाजगी इमारतींत त्यांनीं राहण्याची व्यवस्था केली. ३० सप्टेंबर १९२० ला लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची एम्. एस्सी. ची ११ पौंड ११ शिलिंग एवढी फी भरून नंबर ११०३८ चा स्टूडंटस् पास मिळविला. ग्रेज इन् मध्येंहि त्यांनीं नांव दाखल केलें. एम्. एस्सी. च्या परीक्षेची त्यांनीं मुंबईंत बरीच तयारी केलेली होती. तरी पण लंडन युनिव्हर्सिटीची जनरल लायब्ररी, गोल्डस्मिथस् लायब्ररी ऑफ इकॉनॉमिक लिटरेचर, ब्रिटिश म्युझियमची लायब्ररी आणि इंडिया ऑफीसची लायब्ररी या चार लायब्ऱ्यांतून एम्. एस्सी. व डी. एस्सी. च्या परीक्षेसाठीं एकामागून एक ग्रंथ आणि जुने रिपोर्टस् वाचण्याचा व त्यांवर टिप्पणें काढण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. सकाळीं ६ वाजतां उठून लँडलेडी जी न्याहारी देईल ती घेऊन लागलीच कपडे करून ते लायब्ररींत जाऊन बसत असत. दुपारीं एकाच्या सुमारास एक प्याला बॉव्हरिन व पाव असा थोडासा फराळ करीत किंवा कधीं कधीं एक कप चहावर भागवून पुनः लायब्ररींत जाऊन बसत ते लायब्ररी बंद होईपर्यंत. लायब्ररी बंद झाल्यावर ते संध्याकाळीं सहाच्या सुमारास घरीं येत आणि हातांत काठी घेऊन मोकळ्या हवेंत अर्धा एक तास

फिरून परत घरीं येत. जेवण घेऊन रात्रौ आठाच्या सुमारास पुनश्च अभ्यासाला बसत ते थेट कांहींकांहीं वेळां पहाटेपर्यंत. ते फार थोडा वेळ झोप घेत असत. अशा रीतीनें त्यांनीं आपला कार्यक्रम आंखला होता. लायब्ऱ्या उघडण्याच्या व इतर माणसें येण्याच्या अगोदर ते लायब्ररींच्या दरवाजांत जाऊन उभे रहात. लायब्ररी उघडली कीं आपणाला हवीं तीं पुस्तकें व रिपोर्टस् आपल्या पुढ्यांत ठेऊन घेऊन वाचायला बसत. एकदां पुस्तकें आपल्या पुढ्यांत ठेऊन घेतली कीं लायब्ररी बंद होई-पर्यंत त्यांवर आपला हक्क, असा या लायब्ऱ्यांचा नियम असल्यामुळें ते वर सांगि-तल्याप्रमाणें करीत. उशीरा येणाऱ्या वाचकांना जर यांतील पुस्तक हवें असेल तर तें बहुधा त्यांना मिळत नसें. कारण नित्यनियमानें आंबेडकर लौकर येऊन तीं पुस्तकें आपल्या टेबलावर ठेवून बसत. आंबेडकरांकडे पाहून ते लोक हातपाय आपटीत निघून जात. म्युझियममधील लायब्ररीचा नोकरवर्ग आंबेडकरांचा हा अधाशीपणा पाहून मिस्किलपणें हसे. ते केव्हां केव्हां आंबेडकरांना म्हणत कीं, आतांपर्यंत सकाळीं लायब्ररी उघ-डल्यापासून संध्याकाळीं बंद होईतों सतत अभ्यास करणारा तुमच्या सारखा उत्साही विद्यार्थी आमच्या पहाण्यांत आला नाहीं, व पुढेंहि असा पहायला मिळेल, असें वाटत नाहीं.

त्यावेळीं आंबेडकरांच्या बरोबर मुकर्जी, नायडू, मथूर, देसाई, गांधी, हाजी, कुडाळकर, अस्नोडकर, वगैरे हिंदी विद्यार्थी इंग्लंडमध्यें विद्याभ्यास करीत होते. आंबेडकर आपले कपडे व्यवस्थित घडी घालून बिछान्याखालीं घालत, त्यामुळें त्यांचे दोस्त त्यांना म्हणत कीं, तुम्ही दररोज कपड्यांना इस्त्री करतां कां? आंबेडकर हंसून आपलें गुपित आपल्याजवळच ठेवीत.

वहुतेक हिंदी विद्यार्थी नाटकें, सिनेमा पहाण्यांत किंवा गौरकाय युवतींशीं प्रणयचेष्टा करण्यांत आपला बराच वेळ दवडीत असत हें आंबेडकरांच्या लँडलेडीला माहीत होतें. आंबेडकरांच्या एकंदर वर्तनावरून हे त्या श्रेणींतल्या नाहींत हें तिनें ओळखलें. म्हणून तिला व तिच्या घरांतील मंडळींना आंबेडकरांबद्दल विलक्षण आदर व कौतुक वाटे. हे लोक कधीं कधीं आंबेडकरांशीं गप्पा मारावयास येत. आंबेडकर आपल्या परिस्थितीबद्दल सांगतांना म्हणत कीं, मी विवाहित आहे, मला मुलं आहेत, मला हा अभ्यासक्रम पुरा करून घरीं लौकर गेलें पाहिजे म्हणून ख्यालीखुशालीचें जीवन घालविणें मला कसें परवडेल! आणि खरं म्हणाल तर मला त्याची आवडहि नाहीं. हें ऐकून या मंडळींचा आंबेडकरांबद्दलचा आदर द्विगुणित होई.

आंबेडकर लंडनला गेले तेव्हां 'मूकनायक' पत्राचें संपादकत्व पांडुरंग नंदराम भटकर यांच्याकडे होतें. त्यांनीं व्यवस्थापक मंडळाच्या सल्ल्यानें पत्र चालवावें असें ठरलें होतें. भटकर हे इंटरपर्यंत ( फर्ग्युसन कॉलेज, १९०८ ) शिकलेले होते. लहान-पणीं लग्न होऊन त्यांना दोन मुलेंहि झालेलीं होतीं म्हणून त्यांना शिक्षणाचा नाद सोडून देऊन पोर्टट्रस्टमध्यें नोकरी पत्करावी लागली. वि. रा. शिंद्यांशीं त्यांचा

चांगला परिचय होता. शिंद्यांच्या मुंबईच्या वसतिगृहांत यमुनाबाई नांवाची एक सारस्वत विधवा नर्स होती. या बाईशीं भटकरांनीं पुनर्विवाह केला. दोन स्त्रियांच्या दादल्याची जी गत व्हायची तीच भटकरांची झाली. तशांत हा गृहस्थ मनस्वी आळशी. वर्तमानपत्र चालविण्याइतपत त्याला मनःस्वास्थहि नसे व त्यांच्या आळसामुळें वेळेवर कामहि होत नसे. म्हणून व्यवस्थापक मंडळानें भटकरांच्या हातून संपादकीय सूत्रें काढून घेऊन तीं १९२० सालीं श्री. ज्ञानदेव ध्रुवनाक घोलप यांच्या हातीं दिली. हा प्रकार आंबेडकरांच्या नजरेस आला तेव्हां ते आपल्या अभ्यासांत गर्क झालेले होते. तशांत वेळांत वेळ काढून ते मूकनायक कोणत्या धोरणानें चालवावा, याबद्दल मधून मधून सूचना लंडनहून देत असत.

श्री. ज्ञा. ध्रु. घोलप हे सातारा जिल्ह्यांतील वाळवे तालुक्यांतील सरूड [ सागांव ] या गांवचे रहिवाशी. ते कोल्हापूरच्या इंदुमति बोर्डिंगांत व शिंद्यांच्या डी. सी. मिशनच्या पुण्याच्या व मुंबईच्या बोर्डिंगांत राहून शिकले. इंग्रजी पांच सहा इयत्तेंतूनच त्यांना शिक्षणाला रामराम ठोकून पोर्टट्रस्टमध्यें नोकरी पत्करावी लागली. त्यांना लिहिण्यावाचण्याचें व सामाजिक कार्याचें विलक्षण वेड होतें. ते वर्तमानपत्रांतून अस्पृश्यांची बाजू मांडीत व सभांमधूनहि भाग घेत. आंबेडकर १९१७ला जेव्हां मुंबईत परत आले तेव्हां त्यांचें लक्ष घोलपाकडे विशेष वेधलें गेलें. साउथबरो कमिटीपुढें आंबेडकर साक्ष देण्याची तयारी करीत होते तेव्हां घोलपांनीं त्यांना लोकसंख्येबद्दलची वगैरे माहिती गोळा करून देऊन बरीच मदत केली होती.

१९१९ चा राजकीय सुधारणा कायदा पास झाल्यानंतर कायदेमंडळांतील अस्पृश्यांचे प्रतिनिधि म्हणून आपली किंवा आपल्या स्पृश्य वर्णीय सहकाऱ्यांची निवड व्हावी म्हणून शिंदे सरकारदरबारीं प्रयत्न करतील तर तो प्रयत्न हाणून पाडावा याबद्दल आंबेडकरांनीं आपल्या समाजसेवेकांना आदेश दिला होता. त्याप्रमाणें अस्पृश्यवर्गीय पुढारी सभा भरवून तसे ठराव पास करून सरकारकडे पाठवूं लागले. या चळवळीचा सरकारवर परिणाम झाला तेव्हां सरकारनें चंदावरकरांचा सल्ला विचारला. अस्पृश्यांच्या चळवळीचा रागरंग ओळखून त्यांनीं असा सल्ला दिला कीं, अस्पृश्यांचा प्रतिनिधि म्हणून कोणी स्पृश्य न घेतां अस्पृश्यांच्या प्रमुख पुढाऱ्यांपैकींच कोणी घ्यावा. चंदावरकरांच्यामुळें या शिफारशी घोलप यांची सरकारनें निवड केली. " त्यावेळीं नव्या कौंसिलमध्यें अस्पृश्यांतील एक पुढारी नेमावयाचा होता, व एक अगर अनेक नांवें सुचविण्याचें काम नारायणरावांवर गव्हर्नरसाहेबांनी सोंपविलें होतें. सोहनींनीं अनेक नांवें सुचविलीं त्यांत मिशनमध्यें शिकून अस्पृश्यांच्या हितसंवर्धनासाठीं वर्तमानपत्र चालविणाऱ्या एका तरुणाचे ( श्री. घोलप यांचें ) नांव होतें. त्यांचीच शिफारस करण्याचें त्यांनीं ठरविलें. कारण ते म्हणाले, श्री. घोलप यांच्या हातांत वर्तमानपत्र ही अजब सामर्थ्याची चीज आहे. तिचा त्यांना अस्पृश्यांच्या हितासाठीं भरपूर

उपयोग करितां येईल. कौन्सिलांत श्री. घोलप हेच अस्पृश्यांचे पहिले प्रतिनिधी म्हणून नेमले गेले होते. " ( चंदावरकर,पा. ३४४-४५ )

मुंबई कायदेमंडळाची पहिली बैठक १ एप्रिल १९२१ ला सुरू झाली. सरकारनें मंडळाच्या अध्यक्षपदावर चंदावरकरांची नेमणूक केली.

लंडन युनिव्हर्सिटींत प्रत्येक विद्यार्थ्यानें एकाद्या विषयावर स्वतंत्र विचारांचा निबंध विद्यार्थिसंघापुढें (Students' Union) वाचण्याचा पायंडा आहे. त्यानुसार लंडन युनिव्हर्सिटी आणि ग्रेज इन येथील अभ्यासक्रमास सुरवात केल्यानंतर थोड्याच दिवसांनीं आंबेडकरांनीं 'हिंदुस्थानांतील लोकशाही सरकारच्या जबाबदाऱ्या' ( Responsibilities of a Representative Government in India) असा एक निबंध वाचला. विद्यार्थिसंघापुढें अनेकांनीं अनेक निबंध यापूर्वी वाचले होते. पण त्यापैकीं कोणत्याहि निबंधासंबंधीं उठले नव्हतें एवढें चर्चेचें वादळ आंबेडकरांच्या निबंधांतील खोंचक, बोचक व मौलिक विचारसरणीनें युनिव्हर्सिटींतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यांत उठविलें. आंबेडकरांच्या मतप्रणालीशीं सहमत असलेले व त्या मतप्रणालीविरुद्ध असलेले विद्यार्थी व शिक्षक यांच्यांत मोठा विचारवाद सुरू झाला. हॅरॉल्ड लास्की (हे पुढें राजकीय विषयावरचे अधिकारी पंडित व लेखक म्हणून प्रसिद्धीस आले ) यांनीं निबंधावर असा आरोप केला कीं, त्यांतील विचारसरणी अस्सल राज्यक्रांतिकारक प्रचारकाला शोभण्यासारखी आहे; असल्या विचारसरणीवर चर्चा होऊं देणें हें युनिव्हर्सिटीसारख्या संस्थेंत इष्ट नव्हें. निबंधावरील चर्चेला यामुळें निराळीच कलाटणी मिळाली व साहजिकपणेंच नंतर चर्चा बंद झाली. या निबंधांतील प्रगट झालेल्या विचारसरणीवरून कांहींजण आंबेडकरांना हिंदी क्रांतिकारकांपैकीं एक असें समजूं लागले, तर कांहींजण त्यांना रशियन क्रांतिकारकांचे प्रचारक म्हणूं लागले. या समजामुळें युनिव्हर्सिटींतील शिक्षक व विद्यार्थी आंबेडकरांशीं घनिष्ठ संबंध ठेवण्याची टाळाटाळ करूं लागले. ही परिस्थिति लक्षांत आल्यानंतर आंबेडकरांनीहि त्यांच्यांत मिसळण्याचें सोडून दिलें. त्यांनीं आपला सारा वेळ अभ्यासांत घालविण्यास सुरवात केली.

हातांत घेतलेल्या ग्रंथांत इतर ग्रंथांतील संदर्भ व निर्देश आल्यास ते ग्रंथ मुळांत वाचण्याची आंबेडकरांना प्रबळ इच्छा होई. असे ग्रंथ ग्रंथालयांत न मिळाल्यास ते विकत घेण्यासाठीं लंडनमधील पुस्तकविक्रेत्यांची दुकानें आंबेडकर धुंडाळून पहात. एकाद्या पुस्तकविक्रेत्याकडे हवें तें पुस्तकमिळालें नाहीं तर आंबेडकर दुसऱ्या दुकानीं जात; आणि तें पुस्तक घेईपर्यंत नजरेस पडलेलीं इतर उपयुक्त पुस्तकेंहि ते विकत घेत. ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदी अर्थव्यवहारासंबंधीं पहिल्यापासून ते शेवटपर्यंत (इ. स. १७०० ते १८५८ ) जे वार्षिक अहवाल प्रसिद्ध केले ते व त्यानंतर १९२० पर्यंत ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केलेले अहवाल आणि या अहवालांच्या अनुषंगानें कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व पार्लमेंट यांनीं घेतलेले जे

निणय प्रसिद्ध झाले ते सर्व विकत घेण्याची व अभ्यासण्याची आंबेडकरांना उत्कट इच्छा झाली. या इच्छापूर्तिप्रित्यर्थ त्यांनीं लंडनमधील पुस्तकविक्रेत्यांची दुकानें पालथीं घातलीं. व जबर किंमती देऊन अहवाल व ग्रंथ विकत घेतले. रात्रंदिवस त्यांच्या वाचनांत घालवून त्यांवर टिप्पणें काढल्यानंतर त्यांनीं अनुपमेय आनंदाचा सुस्कारा सोडला !

पुस्तकें विकत घेण्याच्या या दुर्दमनीय षोकाचा असा परिणाम झाला कीं, मुंबईहून आणलेल्या पैशांपैकीं एक चतुर्थांश पैसे आधीं ठरविलेल्या अंदाजपत्रकांत जमेस न धरलेल्या कारणीं खर्च पडले ! राहिलेल्या पैशांत पुढील दिवसांचा खर्च कसा भागवावा हीं एक नवीन काळजी त्यांना उत्पन्न झाली. जास्त काटकसरीस सुरवात झाली. दररोज सकाळीं व संध्याकाळीं फक्त एक कप चहा व पावरोटी घेणें व दोनतीन दिवसांनीं एकदां भरपूर जेवण घेणें, शहरांतील प्रवास शक्य तोंवर पायीं करणें, नवे कपडे व बूट घेणें लांबणीवर टाकणें, अशा तऱ्हेची काटकसरीची कात्री त्यांनीं आपल्या खर्चाला लाविली.

याच सुमारास (नोव्हेंबर १९२१) रमाबाईकडून पत्र आलें कीं, जवळचे पैसे संपले; यशवंत व गंगाधर आजारी आहेत, त्यांच्या औषधपाण्याला पैसा नाहीं ! आंबेडकरांनीं लंडनहून १०० रु. पाठवून रमामाईना पत्रांतून उपदेश केला कीं, धीर खचूं देऊ नकोस. आलेल्या संकटांना तोंड देऊन उज्वल भविष्य काळाची वाट पहा ! आपल्या धाकट्यां भावाच्या कुटुंबाचे हाल पाहून यावेळेपर्यंत स्वतंत्र राहात असलेलें भीमरावांचे वडिल बंधु बाळाराम कुटुंबांत राहावयास आले. त्यावेळीं त्यांना म्युनिसिपल वॉटर वर्क्समध्यें हेड क्लार्क म्हणून दरमहा १२० रु. पगार होता. ते कुटुंबांत आल्यानंतर या आधीं होणारे हाल नाहींसें झालें. भीमरावांना ही परिस्थिति पत्रद्वारें माहित झाल्यानंतर त्यांची एक काळजी दूर झाली.

सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देत असतांनाहि आपला डी. एस्सी. चा प्रबंध पुरा करण्यांत त्यांनीं कसलीहि कसूर राहूं दिली नाहीं. प्रबंधाचें लेखन पुरें झाल्यानंतर आपले शिक्षक प्रोफेसर एड्विन कॅनन यांच्या अनुमतीनें भीमरावांनीं तो 'Problem of the Rupee' या संज्ञेखाली १९२२ च्या आक्टोबर महिन्यांत युनिव्हर्सिटीला सादर केला. अवघ्या १७ महिन्यांपूर्वीं म्हणजे जून १९२१ मध्यें युनिव्हर्सिटीनें त्यांचा 'Provincial Decntralisation of Imperial Finance in British India' हा प्रबंध एम्. एस्सी. चे पदवीसाठीं स्वीकारला होता.

प्रबंध युनिव्हर्सिटीला सादर केल्यानंतर भीमरावांनीं बार-ॲट-लॉ च्या परीक्षेच्या अभ्यासाकडे आपलें लक्ष वळविलें. एव्हांपर्यंत त्यांनीं ह्या अभ्यासाची कधींच दगदग केली नव्हती, ते आपल्या अर्थशास्त्राच्या अभ्यासांत संपूर्णतयः दंग असत. लवकरच बारची शेवटची परीक्षा झाली व तींत भीमराव उत्तीर्ण झाले.

'हिंदी चलनांचा प्रश्न' (Problem of the Rupee) या प्रबंधावरील परीक्षकांच्या समितीचा निर्णय जाहीर होण्यास ५।६ महिने लागणार होते. या काळाचा कसा सदुपयोग करावा हा त्यांच्यापुढें प्रश्न होता. विचारांतीं त्यांनीं असें ठरविलें कीं, जर्मनींतील बॉन विश्वविद्यालयांत एकाद्या आर्थिक विषयावर संशोधनात्मक लिखाण करून त्या विश्वविद्यालयाची डॉक्टरेट मिळवावी. या युनिव्हर्सिटींत जें कांहीं लिहावयाचें तें जर्मन भाषेंत. म्हणून आंबेडकरांनीं जर्मन भाषेचा व त्याबरोबर फ्रेंच भाषेचाहि अभ्यास सुरू केला. बॉन युनिव्हर्सिटीकडे त्यांनीं आपलें म्हणणें कळविलें. तिकडून होकारार्थी उत्तर येतांच ते बॉनला गेले. तेथें त्यांनीं ३।४ महिने आपल्या प्रबंधाची तयारी करण्यांत घालविले. इतक्यांत (१९२३ सालीं) प्रो. एडवीन् कॅनन यांचेकडून पत्र आलें कीं, समीतींतील सभासद प्रबंध मंजूर करायला तयार नाहींत; तरी तुम्ही ताबडतोब लंडनला यावें. आंबेडकर ताबडतोब लंडनला गेले. प्रथम प्रो. कॅननची भेट घेतली. तेव्हां त्यांना असें कळून आलें कीं, हिंदी चलनपद्धतीसंबंधीं सरकारी धोरण आणि अर्थशास्त्रज्ञांचे कोते विचार यांबद्दल आंबेडकरांनीं जी खरपूस टीका आपल्या प्रबंधांत केलेली होती ती तर सभासदांना वर्मी झोंबलेली होतीच; शिवाय आंबेडकरांनीं आपले मौलिक विचार सदर ग्रंथांत प्रदर्शित करून जगांतील सर्व अर्थशास्त्रज्ञांना थक्क करून सोडणारे जे निष्कर्ष मुद्या-पुराव्यानींशीं या प्रबंधांत काढलेले होते ते पाहून सभासद सर्द झालेले होते. असला प्रबंध मंजूर करून आंबेडकरांना त्यावर डी. एस्‌सी. पदवी बहाल करा, अशी युनिव्हर्सिटीला शिफारस करण्यास आपण तयार नाहीं, असें सभासदांनीं चक्क सांगितलें होतें. सभासदांनीं हा निर्णय १९२३ च्या मार्चमध्यें घेतला.

मोंगलांच्या कारकीर्दीत, इस्ट इंडिया कंपनीच्या अंमलांत आणि ब्रिटीश राजवटींत हिंदी चलन पद्धतींत सोन्याची व रुप्याचीं नाणीं कशीं प्रचारांत आलीं, त्यांचीं स्थित्यंतरें केव्हां, कां व कशीं झालीं, त्यांचे इष्टानिष्ट परिणाम हिंदुस्थानांतील व्यापार, उद्योगधंदे व आम जनता इत्यादिकांवर कसे झाले, याचें समालोचन शेकडों ग्रंथ, सरकारी अहवाल आणि भारतीय व ब्रिटिश लोकसभांत वारंवार झालेल्या असंख्य चर्चा, यांच्या आधारानें करून हें नाणें हिंदी चलन पद्धतींत कसें स्थिर करतां येईल म्हणजे जनता, सरकार, व्यापार व उद्योगधंदे यांच्यावर एकंदर फलदायी परिणाम होतील, याबद्दल सोपपत्तिक बाजू आंबेडकरांनीं या प्रबंधांत मांडलेली होती. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं प्रत्येक मुद्यासंबंधीं गेल्या कित्येक वर्षांची आंकडेवार माहिती दिली. प्रबंधांत आपण मांडलेली बाजू बळकट आहे व काढलेले निर्णय शास्त्रीय व अचूक आहेत, यासंबंधीं आंबेडकरांनीं प्रो. कॅनन आणि समितीचे सभासद यांची खात्री पटवून देण्याचे जीव तोडून प्रयत्न केले, पण त्याचा एकाहि सभासदावर परिणाम झाला नाहीं. हे लोक आंबेडकरांना

सांगत कीं, सरकार आणि इतर अर्थशास्त्रज्ञ यांच्यावर प्रबंधांत जे कोरडे ओढलेले आहेत ते अजिबात गाळावेत आणि निर्णयांत थोडाफार फेरफार करावा, म्हणजे तुमच्या प्रबंधाला मान्यता देऊन त्याबद्दल तुम्हांला डी. एस्सी. ची पदवी द्यावी, अशी युनिव्हर्सिटीकडे आम्ही शिफारस करतों. त्यांचें हें म्हणणें ऐकून आंबेडकर त्यांना म्हणाले कीं, माझें कोणतें म्हणणें अशास्त्रीय वा चुकीचें आहे तें मला दाखवून द्या, म्हणजे तेवढा भाग मीं गाळतों; पण सर्व प्रबंध आमच्या मतासारखा करा असा जो तुमचा सल्ला आहे तो मी मानणें शक्य नाहीं. तुम्ही मला पदवी दिली नाहीं तरी बेहत्तर ! मी हिंदुस्थानांत जाऊन प्रबंध प्रसिद्ध करीन. मग तरी जगांतील अर्थशास्त्रज्ञांची खात्री पटेल कीं, माझी बाजू सशास्त्रीय आहे व तुमची बाजू लंगडी आहे ! प्रबंधाच्या बाबतींत हा जो पेचप्रसंग उत्पन्न झाला त्याला प्रो. कॅनन् यांनीं अशी तोड सुचविली कीं, या प्रबंधांतील सर्व माहिती ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असल्यानें ती प्रबंधांत तशीच ठेवून तिच्यावरून काढलेल्या निष्कर्षां-नाहि धक्का न लावतां सर्व प्रबंधाची मांडणी फक्त निराळ्या पद्धतीनें करावी. ही तडजोड उभयपक्षीं मान्य झाली. आंबेडकरांनीं बॉन युनिव्हर्सिटीच्या प्रबंधाला रामराम ठोकला व ते 'हिंदी चलनाचा प्रश्न' या प्रबंधाला निराळ्या स्वरूपांत मांडण्याच्या उद्योगाला लागले. एव्हांना त्यांच्याजवळचे पैसे संपत आले अन् प्रबं-धाचें काम तर आणखी दोन तीन महिने घेणार होतें. नाइलाजानें त्यांनीं उर्वरित काम हिंदुस्थानला परतून करण्याचें ठरविलें. १४ एप्रिल १९२३ रोजीं मुंबईला भीमराव परत येऊन पोहोंचले. सुधारून लिहिलेला आपला प्रबंध त्यांनीं मुंबईहून लंडन युनिव्हर्सिटीला १९२३ च्या ऑगस्ट महिन्यांत पाठविला. तो मंजूर होऊन युनिव्हर्सिटीनें त्यांना १९२३ च्या नोव्हेंबर महिन्यांत डी. एस्सी. ची पदवी अर्पण केली. पदवी मिळाल्याची तार लंडनहून आली तेव्हां ते आनंदातिरेकाच्या उर्मीमुळें व प्रबंधासाठीं सोसलेल्या अनंत हालअपेष्टांच्या स्मृतींमुळें ओक्साबोक्शी रडले.

ही आनंदाची बातमी सांगण्यासाठीं आंबेडकर घरीं गेले तेव्हां रमाबाईंना बरें वाटत नसल्यामुळें त्या अंथरुणावर पडल्या होत्या. ही बातमी ऐकतांच त्या अंथरुणावरून उठल्या आणि सचैल स्नान करून कुलदेवताच्या पूजेला बसल्या. पूजा संपल्यावर त्या पतीला हळूंच म्हणाल्या, आणखी एखादी पदवी घ्यायला विलायतला जाणार नाहीं ना? पतिराजांना या प्रश्नांतील भोळा भाव आणि नर्मविनोद कळला. ते हंसून म्हणाले, नाहीं!

लंडनमध्यें असतांनाच या प्रबंधाचें प्रकाशन व्हावें म्हणून आंबेडकरांनीं प्रयत्न केलेले होते. लंडनच्या पी. एस्. किंग अँड सन् लि. या सुप्रसिद्ध प्रकाशन संस्थेनें प्रबंधाचे हस्तलिखित घेऊनहि ठेविलें होतें. या कंपनीनें सदर ग्रंथ १९२३ च्या डिसेंबरांत छापून प्रसिद्ध केला. या ग्रंथाला प्रस्तावना प्रो. कॅनन् यांनी लिहिली. भीमरावांचा जेव्हां जन्महि झालेला नव्हता तेव्हांपासून प्रो. कॅनन् हे अनेक अर्थ-

शास्त्रीय ग्रंथांचे लेखक म्हणून प्रसिद्ध पावलेले होते. परंतु ते सद्भावनेचे सद्गुरु होते. कारण या प्रस्तावनेंत त्यांनीं असें मान्य केलेलें आहे कीं, आंबेडकर हे माझे शिष्य आणि मी जुना व अनुभवी शिक्षक ! परंतु आंबेडकरांनीं या ग्रंथांत अशी कांहीं मौलिक स्वरूपाची अचाट बुद्धिमता दाखविली आहे कीं, त्यांचें म्हणणें मला पटत नसतांहि त्यांनीं काढलेले निष्कर्ष हे पूर्ण व्यवहारी दृष्टीचे व ग्राह्य आहेत, असें कबूल करावें लागतें ! प्रो. कॅनन लिहितातः

"As he is aware, I disagree with a good deal of his criticism. In 1893 I was one of the few economists who believed that the rupee cold be kept at a fixed ratio with gold by the method then proposed, and I did not fall away from the faith when some years elapsed without the desired fruit appearing (see Economic Review July 1898, pp. 400-403). I do not share Mr. Ambedkar's hostility to the system, nor accept most of his arguments against it and its advocates, but he hits some nails very squarely on the head, and even when I have thought him quite wrong, I haye found a stimulating freshness in his views and reasons. An old teacher like myself learns to tolerate the vagaries of originlity, even when they resist 'severe examination' such as that of which Mr. Ambedkar speaks.

"In his practical conclusion I am inclined to think he is right." (Foreward, p. xi) म्हणजे, माझ्या शिष्यानें माझ्यावर ताण केली, असेंच प्रो. कॅनन् यांनीं पर्यायानें प्रस्तावनेंत मान्य केलेले आहे. शिष्यादिच्छेत्पराजयम् ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम २३५५७ दि.
क्रमांक ... नों. दि.

# आधारभूत ग्रंथ


Ambedkar, Dr. B. R. : (1) Castes in India (The Indian Antiquary, March 1917 )
(2) Annihilation of Caste.
(3) Pakistan or Partition of India.
(4) What Congress and Gandhi have done to Untouchables.

Banerjea, Sir Surendranath : A Nation in Making.

Bergg, Emil P. : The Conversion of India.

Bhatt, Vanmati A. : The Harijans of Maharashtra.

Bloomfield, Dr. : Religion of Veda.

Bolton, Henry : The Tragedy of Gandhi.

Chintamani, Sir C. Y. : Indian Politics since the Mutiny.

Hunashal, S. M. : The Lingayat Movement— A Social Revolution in Karnatak.

Latthe, A. B. : Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur. (Volumes I & II)

Mehta, Asoka and Patwardhan, Achyut : The Communal Triangle in India.

Mookerjee, S. C. : The Decline and Fall of the Hindus.

Navalkar, H. N. : The Life of Shivram Janaba Kamble.

Nehru, Jawaharlal : The Discovery of India.

Pannikar, K. M. : A Survey of Indian History.

Pearson, Hesketh : Bernard Shaw–His Life and Personality.

Pradhan, R. G. : India's Struggle for Swaraj.

Prasad, Dr. Beni : The State in Ancient India.

Roy, M. N. : Materialism.

Stoddards, Lothrop : Clashing Tides of Colour.

अळतेकर, प्रो. माधव दामोदर : गोपाळ गणेश आगरकर, चरित्रात्मक निबंध.

कर्वे, डॉ. इरावती : मराठी लोकांची संस्कृति.

कर्वे, धोंडो केशव : आत्मवृत्त.

केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश : प्राचीन महाराष्ट्र

केळकर, द. के. : संस्कृतिसंगम.

केळकर, न. चिं. : लोकमान्य टिळक यांचें चरित्र (तीन खंड).

कोलते, डॉ. वि. भि. : चक्रदेव आणि ज्ञानदेव.

कोसंबी, प्रो. धर्मानंद : (१) बुद्ध, धर्म आणि संघ. (२) हिंदी संस्कृति आणि अहिंसा.

खानपूरकर, डॉ. दत्तात्रय पुरुषोत्तम : नवा महाराष्ट्र "दलित समाज"

चित्राव, विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री : भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश.

चिपळुणकर, विष्णुशास्त्री : निबंधमाला.

जोशी, गणेश नारायण : हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास.

जोशी, विनायक कृष्ण (व रामचंद्र केशव लेले) : वृत्तपत्रांचा इतिहास.

जोशी, विष्णु श्रीधर : वासुदेव बळवंत फडके-चरित्र.

ठाकरे, केशव सीताराम. : पंडिता रमाबाई.

तवकर, ना. गो. : प्राचीन भारतीय विद्यापीठें.

देशपांडे, वामन नारायण : विचारसमीक्षा.

पटवर्धन, वि. वि. : सत्तावनचें स्वातंत्र्यसमर.

पाध्ये, प्रभाकर (व श्री. रा. टीकेकर) : आजकालचा महाराष्ट्र.

फडके, प्रो. ना. सी. : लोकमान्य टिळक.

बेहेरे, प्रो. ना. के. : "सन १८५७"

भट, डॉ. विष्णु महादेव : अभिनव भारत अथवा सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था.

भागवत, दुर्गा : कै. राजारामशास्त्री यांचे निवडक लेख.

भावे, वासुदेव कृष्ण : पेशवे कालीन महाराष्ट्र.

भोपे, डॉ. र. ग. : स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर यांचें जीवनचरित्र.

माटे, श्री. म. : अस्पृष्टांचा प्रश्न.

मोरे, शं. शां. : प्राथमिक शिक्षण.

लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख : शतपत्रें.

वैद्य, द्वा. गो. : नारायण गणेश चंदावरकर.

सीतारामय्या, डॉ. पट्टभी : कॉंग्रेसचा इतिहास.

शिंदे, विठ्ठल रामजी : (१) वि. रा. शिंदे यांचे लेख व संभाषणें.
(२) माझ्या आठवणी व अनुभव.

हरदास, वाळशास्त्री. : भाई परमानंद यांचें जीवनचरित्र

## रिपोर्ट इत्यादि

(1) Indian Constitutional Reforms–Reports of the Southborough Committee, and Government of India's Despatches on them.

(2) The Joint Memorandum of the Depressed India Association, Bombay and the Servants of Somavanishi Society, Bombay, presented to the Royal Statutory Commission, 1927–28.

(3) Statements sutbmited to the Indian Statutory Commission (Simon Commission) by the Bahishkrithitkarini Sabha, Bombay and the Depressed India Association, Bombay, on 29th May 1928.

(4) Government File No. 38/14 (Baroda Record Office).

(5) Government File, Education Department, No 65-I/1918.

(6) Letter dated 17-11-1950 from the Registar, Columbia University, U. S. A.

(7) Letters No. EMT/EAV dated 7-12-1950 and No. WSC/EH dated 6-3-1951 from the Registrar, The London School of Economics and Political Science, University of London.

## वर्तमानपत्रें, नियतकालिकें

(1) The Bombay Chronicle.
(2) The Bombay Gazette.
(3) The Bombay Government Gazette.
(4) The Bombay University Calendars.
(5) The Hindu Missionary.
(6) The Reader's Digest.
(7) The Times of India.

(८) केसरी.
(९) जनता.
(१०) जगद्वृत्त.
(११) जागरूक.
(१२) जागृति.
(१३) धनुर्धारी.
(१४) नवयुग.
(१५) बहिष्कृत भारत.
(१६) मूकनायक.
(१७) सुबोधपत्रिका.
(१८) सोमवंशीय मित्र.
(१९) संदेश.
(२०) ज्ञानप्रकाश.

मराठी ग्रंथ ~~संग्रहालय,~~ ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23६५९ दि: ५.८.६...
५८० नों. दि: ६/५/७५

REFBK-0007779